महाराष्ट्र - ग्रंथ - प्रदीपावलि : प्रदीप सातवा

रा व ब हा दू र

# दादोबा पांडुरंग

पूर्वार्ध : आत्मचरित्र

उत्तरार्ध : चरित्र


संपादक व चरित्रलेखक

अनंत काकबा प्रियोळकर


पंतप्रधान बाळासाहेब खेर यांचा पुरस्कार

प्रो. रा. कृ. लागू यांचा आत्मचरित्रविषयक निबंध


केशव भिकाजी ढवळे, श्रीसमर्थ–सदन, मुंबई ४

मूल्य बारा रुपये

in marathi - 13/07/10

सर्वाधिकार सुरक्षित

V2wM14
H7
175457

प्रथमावृत्ति : १९४७

मुद्रक : बा. ग. ढवळे, कर्नाटक मुद्रणालय, चिरा बाजार, मुंबई
प्रकाशक : के. भि. ढवळे, श्रीसमर्थ-सदन, गिरगांव, मुंबई

# महाराष्ट्र–ग्रंथ–प्रदीपावलि

कोणत्याही राष्ट्राचा इतिहास ही एक नित्य घडत असलेली घटना आहे. समोर ठेवलेलीं ध्येयें हस्तगत करण्यासाठीं होणारा प्रयत्न हा त्या इतिहासाचा एक मोठा आणि महत्त्वाचा भाग आहे. किंबहुना हीं ध्येयें जितकीं उदात्त आणि उज्ज्वल असतील आणि त्यांसाठीं होणारे प्रयत्न जितके निश्चयाचे आणि प्रामाणिक असतील, तितका तो इतिहास स्फूर्तिदायक आणि अभिमानास्पद ठरतो. गेल्या शतकाच्या आरंभीं महाराष्ट्राचा स्वराज्यसूर्य मावळला आणि जिकडे तिकडे निराशा आणि असहायता यांचा अंधकार पसरल्यासारखा झाला; परंतु या तमोमय निशेच्या पोटींच भावी उन्नतीचे प्रभातकिरण लपलेले होते. गेल्या पन्नास पाऊणशें वर्षांत महाराष्ट्रांत जी चैतन्याची लाट उठली तिनें महाराष्ट्राला खडबडून जागें केलें. महाराष्ट्र जो थंड गोळा होऊन पडला होता त्याला ऊब देऊन जागें करण्याचें श्रेय लोकहितवादी, ज्योतिबा फुले, चिपळूणकर, रानडे, आगरकर, टिळक, राजवाडे यांच्यासारख्यांना आहे. वाङ्मयाच्या क्षेत्रांत हेंच कार्य हरिभाऊ आपटे, केशवसुत, टिळक, बालकवि, गोविंदाग्रज, खाडिलकर, कोल्हटकर, परांजपे यांनीं आणि त्यांच्या समकालीनांनीं केलें आहे.

आज महाराष्ट्र एका नव्या युगाच्या प्रवेशद्वाराशीं उभा आहे. आतां कांहीं तरी करून दाखवण्याची वेळ आली आहे. त्याच्यापुढें अनेक प्रश्न उभे आहेत. शिक्षण, सामाजिक पुनर्घटना, व्यापार आणि उद्योगधंदे, कला आणि साहित्य, इत्यादि अनेक प्रश्न त्याला यशस्वीपणें सोडवायचे आहेत. ते सोडवायचे कांहीं मार्गही त्याला दिसताहेत. इतर देशांतून हेच किंवा यांसारखे प्रश्न सोडवण्यासाठीं जे प्रयोग करण्यांत आले ते त्याच्या दृष्टीसमोर आहेत. त्या प्रयोगांच्या मागची जी विचारसरणी आहे तीही त्याला अवगत आहे. पहिल्या महायुद्धानंतर सर्वत्र जगभर जी नवीन विचारांची लाट उठली तिच्या तडाख्यांतून महाराष्ट्रही सुटला नाहीं.

परंतु या नव्या विचारसरणीमुळें आपले सर्व प्रश्न सुटतील काय ? आपली जी पूर्वींची विचारसंपदा आहे, जें वाङ्मयधन आहे, जी संस्कृतिपरंपरा आहे, तिच्याशीं पूर्ण फारकत करणें आवश्यक आहे काय ? किंवा अशी फारकत करून आपलें उद्दिष्ट साधेल ह्याची खात्री आहे काय ? प्रत्येक राष्ट्राची कांहीं प्रकृति म्हणून असते. ती तिच्या इतिहासानें घडवलेली असते आणि उलट ही प्रकृति त्या राष्ट्राचा इतिहास घडवीत असते. या दोन्ही गोष्टी अन्योन्याश्रयी आहेत. आपली

राष्ट्रकृति काय हें आपण आधीं ओळखलें पाहिजे तरच आपल्याला आपलें भवितव्य यथार्थतेनें आकलतां येईल. ही आपली राष्ट्रकृति काय आहे याचें आज आपल्याला इतिहासावरून आणि वाङ्मयावरूनच मुख्यतः ज्ञान होण्याचा संभव आहे. म्हणून त्याचें परिशीलन निदान त्याचा परिचय हा प्रत्येक सुजाण, सुशिक्षित आणि सुसंस्कृत स्त्री-पुरुष व्यक्तीला आवश्यक आहे.

हें महाराष्ट्राला शक्य करून यावें ह्या उद्देशानें आम्ही ही महाराष्ट्र-ग्रंथ-प्रदीपावलि प्रकाशित करीत आहों. सामाजिक जीवन हें विविधरूप असतें आणि त्याचीं जितकीं अंगें अधिक तितकें तें अधिक समृद्ध आणि सुसंस्कृत समजलें जातें. हें लक्षांत घेऊन, पौराणिक, धार्मिक, तात्त्विक, ऐतिहासिक, सामाजिक, राजकीय, शैक्षणिक, आर्थिक, औद्योगिक, शास्त्रीय, ललित, इत्यादि सर्व विषयांवर अधिकारी व्यक्तींनीं लिहिलेले आणि अवश्य तर लिहवून घेतलेले ग्रंथ प्रकाशित करणें हें आमचें ध्येय आहे. ही माला कोणत्याही पंथाच्या किंवा पक्षाच्या पुरस्कारासाठीं काढलेली नाहीं पण कोणत्याही पंथाला किंवा पक्षाला तींत मज्जावही नाहीं. ग्रंथ कसोशीनें संशोधन करून लिहिलेले असावेत व तत्त्वशोधन आणि मार्गदर्शन हेंच त्यांचें ध्येय असावें, एवढींच त्यांवर बंधनें आहेत. त्याचप्रमाणें हे ग्रंथ शक्य तितक्या कमी किंमतींत मराठी वाचकांना उपलब्ध करून द्यावेत हेंही आमचें निश्चित धोरण आहे. आणि ही गोष्ट आतांपर्यंत प्रकाशित झालेल्या ग्रंथांवरून दिसून येईल.

आतांपर्यंत प्रदीपावलींत सहा ग्रंथ प्रकाशित झाले आहेत आणि आतां हा सातवा प्रकाशित होत आहे. वस्तुतः आमच्या मूळ संकल्पाप्रमाणें वर्षांतून सरासरी चार ग्रंथ प्रकाशित व्हायचे; परंतु युद्धकालीन विपरीत परिस्थिति, कागदाची आणि कामगारांची टंचाई, त्यानंतर खुद्द मुंबईंत उत्पन्न झालेली विलक्षण चिंताजनक स्थिति अशा अनेक कारणांमुळें आम्हांला आपल्या बेताप्रमाणें ग्रंथप्रकाशन करतां आलें नाहीं. तथापि यापुढें शक्य तोंवर मूळ योजनेची अंमलबजावणी होईल असाच कार्यक्रम ठेवण्याचा आमचा प्रयत्न राहील.

महाराष्ट्रीय वाचकांनीं या प्रदीपावलीचे आश्रयदाते होऊन ती प्रज्वलित ठेवण्याच्या कामीं आम्हांला साहाय्य करावें अशी नम्र विनंती आहे.

के. भि. ढवळे

# पुरस्कार

ह्या पुस्तकाला मी पुरस्कार लिहावा अशी लेखक श्री. प्रियोळकर व चरित्र नायकाचे वंशज, श्री. भास्करराव तर्खडकर ह्यांची फार इच्छा असल्यामुळें मी हे चार शब्द लिहीत आहें.

रा. रा. रा. ब. दादोबा पांडुरंग ह्यांचा जन्म १८१४ व मृत्यु १८८२ सालीं झाला. हा काळ इंग्रजी अंमलाच्या अव्वल सुरुवातीचा. आत्मचरित्र १८४७ पर्यंतच आहे व पुढील १८४७–८२ चा चरित्राचा भाग श्री. प्रियोळकरांच आहे. तो इतका माहितीनें पूर्ण आणि मनोवेधक आहे कीं लेखकाचें अभिनंदन व पुस्तकाची प्रशंसा करावी तेवढी थोडी. मिळालेल्या माहितीचा किंबहुना फार परिश्रमानें मिळविलेल्या माहितीचा, श्री. प्रियोळकरांनीं फार चातुर्यानें उपयोग केला आहे.

प्रथम आत्मचरित्राबद्दल लिहितों, नंतर चरित्राबद्दल. पहिली लक्षांत येणारी गोष्ट म्हणजे दादोबांची भाषा. १९ व्या शतकाच्या आरंभीं बरेच मराठी शब्द वापरले जात होते ते आज वापरांत नाहींत. भाषा इतकी घरेलु (homely) चटकदार आहे कीं पुस्तक खालीं ठेववत नाहीं. 'बाळपणाचें स्मरण' ह्या गोष्टीची साक्ष देईल. लहानपणीं मुलांना निद्रा फार प्रिय असते. विशेषतः सकाळच्या प्रहरची तर अत्यंत मोहक असते. माझ्या आईबापांना मी एकुलता एक मुलगा. सकाळीं लवकर उठून नित्यकर्मास लागावें, असा त्यांचा परिपाठ असे. मी आपला झोपून राहत असें. माझी पहिली स्मृति : आईबापांनीं माझे बिछान्याजवळ यावें व म्हणावें :—

> कसा तुला छंदचि खेळण्याचा ।
> मऊ बिछान्यावर लोळण्याचा ॥
> कशी तुला वाटत लाज नाहीं ।
> सदा हसावें तुजला जनांहीं ॥

मग आम्हीं सर्वांनीं हंसून मीं उठावें. मी पुरस्कार लिहीत आहें, माझें आत्मचरित्र लिहीत नाहीं; पण 'बाळपणाचें स्मरण' हें दुसरें प्रकरण आणि 'माबाईच्या ओव्यां' मधून त्यांत उद्धृत केलेला भाग वाचून कोणाही सहृदय वाचकास आनंद वाटल्यावांचून राहणार नाहीं. कालिदासानें वर्णन केलेला :—

आलक्ष्यदन्तमुकुलाननिमित्तहासै-
रव्यक्तवर्णरमणीयवचःप्रवृत्तीन् ।
अङ्काश्रयप्रणयिनस्तनयान्वहन्तो
धन्यास्तदङ्गरजसा मलिनीभवन्ति ॥

हा मुग्धावस्थेतून ११-१२ वर्षें वय होईपर्यंतचा काळ जितका महत्त्वाचा असतो तितकाच तो रम्य असतो. माझ्या शालेय शिक्षणाची सुरवात दादोबा पांडुरंगांच्या, "शुद्ध कसें बोलावें व शुद्ध कसें लिहावें; हें शुद्ध कां व अशुद्ध कां हें व्याकरण शिकल्यानें समजतें," हें वाक्य पाठ करण्यानें झाली. त्याविषयीं एक मनोरंजक गोष्ट आमचे एक शेजारी आम्हांस सांगत. वचनें किती आहेत? एकवचन, द्विवचन व बहुवचन, हा व्याकरणांतील पाठ एक मुलगा घोकीत असतां, जुन्या चालीच्या एका करारी बापास तें आवडलें नाहीं. वचन एकच असतें. श्रीरामचंद्र एकवचनी होते. शाळेंत गेल्यावर मुलाला "वचनें अनेक असतात," असें शिकविण्यांत येतें असें पाहून त्यानें मुलाची शाळा बंद केली! असें अनीतिमूलक शिक्षण कुचकामाचें आहे, असें त्या जुन्या चालीच्या गृहस्थास वाटल्यास नवल नाहीं. लघुव्याकरणांतल्या टीपांमध्यें दादोबा पांडुरंगांनीं लिहिलेल्या मोठ्या व्याकरणाचा जेथें जेथें संदर्भ असे, तेथें तेथें "माझ्या मोठ्या व्याकरणांत पहा," अशा आशयाची टीप असे. मग विठ्ठलेचा हात आणून आम्हीं तें मोठें व्याकरण काढून वाचीत असूं. पण तें समजत नसे, एवढें मला आठवतें. आत्मचरित्रांत त्यांनीं त्या शिक्षण देण्याच्या पद्धतीचा फार उद्बोधक इतिहास आहे. मराठी शाळेंतील वार्षिक समारंभांत १८२६ साली मुलांस रेशमी थैल्यांत भरून रुपये मिळाले होते. १४ वे वर्षी दादोबांचें लग्न झालें आणि लग्नांत गुंतल्यामुळें त्यांना परीक्षेस बसतां आलें नाहीं. तथापि शाळेंत पहिला नंबर असल्यामुळें त्यांस बक्षी मिळालें. शूद्रांच्या मुलांस शाळेंत घेण्याची बंदी करण्याचा हुकूम त्या साली झा-

सोसाइटीच्या शाळेंत दादोबा पांडुरंग शिकत होते. तिचे ' सक्रतार ' सदाशिव काशीनाथ ऊर्फ बापू छत्रे ह्यांनीं माझीं ल्हानपणचीं अत्यंत आवडतीं पुस्तकें, ' इसापनीतिकथा ' व ' बाळमित्र ' हीं इंग्रजी पुस्तकांचीं सुरस भाषांतरें लिहिलीं हें मला ह्या चरित्रांतून प्रथमच कळलें. सन १८३५ सालीं दादोबा पांडुरंगांना असिस्टंट मास्तरची रु. २० ची आसामी मिळाली. त्यांनीं आपलें व्याकरण लिहिण्यास १८३४ चे अखेरीस सुरुवात करून १८३६ चे आरंभीं तें शिलाछापखान्यांत छापून घेतलें. १८३६ च्या नोव्हेंबरमध्यें भिंवडी, नाशिक, चांदवड, मालेगांव ह्या मार्गानें तापी व नर्मदा उतरून व महेश्वर, मह्‌, इंदूर, उज्जयनी व रतलाम येथें मुक्काम करून ते जावऱ्यास* गेले. तेथील नबाबास इंग्रजी शिकविण्याचे कामावर त्यांची नेमणूक झाली होती. त्या कामावर ते रुजू झाले त्यावेळीं त्यांचें वय २२ वर्षांचें होतें. (१८३६–३७) मेजर बार्थविक साहेब महिदपूरचे पोलिटिकल एजंट भिल्लभिल्लीणींबरोबर नाचतांना पाहून " धन्य हे इंग्लिश लोक व त्यांचें चातुर्य, " असें दादोबांच्या मनांत आलें. फार विचार करण्याजोगी गोष्ट आहे. माळव्यांतील होळी व गुलाल ह्यावरून त्यावेळच्या चालीरीतींची व हिंदुमुसलमानांचे संबंध कसे सलोख्याचे होते ह्याची कल्पना येते.

जावऱ्याची नोकरी सुटल्यानंतर दादोबा पांडुरंग ह्यांची नेमणूक प्रथम एल्फिन्स्टन इन्स्टिटयूशनमध्यें व नंतर सुरत येथें प्रथमच स्थापित केलेल्या इंग्रजी शाळेंत असिस्टंट इंग्लिश टीचर म्हणून झाली. तेथें झालेल्या आर्देशिर धनजीशहा ह्यांचे खटल्याची हकीकत फार मनोरंजक आहे. दादोबांच्या भिडस्त स्वभावामुळें ते कसे फसले ही हकीकत आत्मचरित्राच्या शेवटच्या विभागांत आहे. श्री. बाळ गंगाधरशास्त्री जांभेकर ह्यांच्या मृत्यूनंतर त्यांचे जागीं दादोबांची नेमणूक १८४६ सालीं झाल्याची हकीकत आहे. १८४६ सालपर्यंत दादोबांचें आत्मचरित्र आहे. पुढें मग दादोबांस १८५२ मध्यें असिस्टंट कलेक्टर नेमण्यांत आलें व मॅजिस्ट्रेटचे अधिकारही त्यांस मिळाले. अहमदनगर व ठाणें येथें नोकरी करून १८६१ सालीं दादोबा सेवानिवृत्त झाले व त्यांस रु. ११६ पेन्शन बसलें.

चरित्राचा उत्तरार्ध विद्वान् संशोधक श्री. प्रियोळकर ह्यांनीं लिहिला आहे. ह्यांत

*योगायोग काय विचित्र आहे पहा. हा जावऱ्याविषयींचा मजकूर जावऱ्याचे स्टेशनवरच मी लिहीत आहें.

रा. ब. दादोबा पांडुरंग

'मुंबईतील धार्मिक स्थित्यंतरें' हें प्रकरण फार वाचनीय आहे. धर्म व धार्मिक चालीरीति ह्या बाबतींत आज हिंदु समाजांत अनास्था आहे; परंतु परमहंससभा स्थापन झाली त्या काळीं म्हणजे १८५० सालच्या सुमारास धर्माबद्दल उदासीन राहणें कोणाही बुद्धिमान् माणसास शक्य नव्हतें. परमहंससभेचीं मूलतत्त्वें आज जवळजवळ सर्वमान्य झालीं आहेत. जातिभेदाची तीव्रता आज तेवढी जाणवत नाहीं. आज घरोघर लोक पाव खातात तरी जात मोडत नाहीं. त्यावेळीं परमहंस-मंडळीच्या सभासदास पावभक्षणाचा विधि करणें अवश्य वाटलें. दादोबांस भक्तीचा वारसा वडिलांकडूनच मिळाला होता. ते एक परमहंससभेच्या आद्यप्रवर्तकांपैकीं होते. न्यायमूर्ति रानड्यांनीं दादोबांबद्दल, 'He occupies a foremost place in the ranks of thoughtful enquirers after religious truth,' असे गौरवपर उद्गार काढले आहेत. बायबलांतील तत्त्वें मान्य असलीं तरी दादोबा मनानें ख्रिस्ती नव्हते, असें न्यायमूर्तींनीं नमूद केलें आहे. १५ वें प्रकरण 'दादोबा व राजकारण' वाचून 'Quit India' ची घोषणा पुढें हिंदुस्थानी प्रजा करील हें लोकहितवादींचें भविष्य व आजची परिस्थिति ह्यांतील साम्य चित्तास चकित केल्यावांचून राहत नाहीं. तसेंच पाकिस्तानच्या बीजाची पेरणी व प्रचार १८८५ सालापासूनच कसा सुरू झाला हेंही लक्षांत येतें. चरित्राच्या ह्या भागाबद्दल अधिक लिहिण्याची जरूरी नाहीं.

एकंदरीत अशा तऱ्हेचे चरित्रग्रंथ किती अवश्य आहेत ह्याचेंही प्रतिपादन दादोबांनींच करून ठेवलें आहे. पण आपल्याकडील प्रसिद्ध थोर व्यक्तीस चरित्रलेखनाबद्दल व त्यास लागणारीं टिपणें लिहून ठेवण्याबद्दल फार अनास्था वाटते. नुकतेंच राजकारणपटु चक्रवर्ति राजगोपाळाचारी ह्यांचेबरोबर माझें बोलणें झालें. त्यांनीही ही गोष्ट मान्य केली. मी त्यांना विचारलें, "आपण दैनंदिनी किंवा कांहीं टिपणें ठेविलीं आहेत का? सध्यां तरी ठेवतां का?" "काय करावयाचें आहे!" अशा स्वरूपाचें उत्तर त्यांनीं दिलें. ह्या प्रश्नाचें उत्तर आत्मचरित्राच्या पहिल्या पॅरिग्राफमध्यें आहे. श्री. प्रियोळकरांचें मी मनःपूर्वक अभिनंदन करतों. ह्या ग्रंथानें मराठी भाषेंत फार मोलाची भर घातली आहे ह्यांत शंका नाहीं.

उदेपूरच्या रस्त्यावर }
२२ एप्रिल १९४७ }

बा. गं. खेर

# आत्मचरित्र, चरित्र आणि आठवणी

## लेखक—प्रो. रामचंद्र कृष्ण लागू

दादोबा पांडुरंगांचें आत्मचरित्र आणि त्याच्या आधींचा बाबा पद्मनजीचा 'अरुणोदय' हीं दोनच मराठींतील आरंभींआरंभींचीं उल्लेख करण्यासारखीं आत्मचरित्रांचीं उदाहरणें होत. दादोबा पांडुरंग आणि बाबा पदमनजी या दोन्ही लेखकांना आपण कांहीं तरी नवीन लिखाण करतों आहों याची जाणीव होती. यामुळें त्यांनीं लिहिलेल्या आत्मचरित्रांतील प्रसंगांच्या आणि विचारांच्या मांडणींत एकसूत्रीपणा दिसून येतो. त्याचप्रमाणें या दोन्ही लेखकांच्या निवेदनपद्धतींतील एकरूपतेचाही वाचकाला प्रत्यय येतो. पद्मनजीची आणि दादोबांची भाषा जुन्या वळणाची असली तरी तत्कालीन राजकीय, सामाजिक आणि वाङ्मयीन परिस्थितीशीं तो समरस झालेली असल्यामुळें, वाचकाला आकर्षक वाटते. त्यांतल्या त्यांत दादोबांच्या भाषेंतील सरलता, सुबोधता आणि सहजता अरुणोदयकारांना साधत नाहीं असें म्हणणें वावगें होणार नाहीं.

खरें म्हटलें तर आत्मचरित्राची ही प्रथा कोणीं नवीनच सुरू केली असें नव्हे. वेदकालापासून तों आजतागायत तिला कधींच खंड पडलेला नाहीं. "(एकं)[1] तदैक्षत बहु स्यां प्रजायेय" या वाक्यांतील लहानसा उद्गार म्हणजे त्या विश्वनियामक सत् तत्त्वाचें (ब्रह्माचें) आत्मचरित्र होय. भगवद्गीतेंत 'सज्जनांचें संरक्षण आणि दुर्जनांचें निर्दलन करण्याकरितां वारंवार मला जन्म घ्यावा लागतो', असें श्रीकृष्ण अर्जुनाला सांगतात. तें त्यांचें आत्मचरित्रच असें म्हटलें तरी चालेल. याशिवाय अशा प्रकारचे आत्मचरित्रपर अनेक उल्लेख भगवद्गीतेंत सांपडतील. ज्ञानेश्वरही आपल्या भावार्थदीपिकेंत वेळोवेळीं वाचकाला स्वतांच्या चरित्राची ओळख करून देतात. नामदेव, तुकाराम वगैरे संतमंडळी, त्यांनीं रचलेल्या अभंगांत स्वतांच्या जन्माची, ज्ञातीची, व्यवसायाची, वैराग्याची आणि ईश्वरभक्तीची हकीगत सांगतात. म्हणजे एका परीनें ते आपलें आत्मचरित्र लिहितात. यानंतर केशवसुतापासून तों कुसुमाग्रजापर्यंतच्या अर्वाचीन कवींच्या लहानमोठ्या काव्यांत आत्मनिवेदनाची ही प्रवृत्ति स्पष्टपणें दिसून येते.

---

१ छांदोग्योपनिषद्.

## रा. ब. दादोबा पांडुरंग

पाश्चात्य राष्ट्रांच्या वाङ्मयांतमुद्धां आरंभींआरंभींच्या आत्मचरित्राचे कित्येतरी सुंदर नमुने आपल्याला पहायला सांपडतात. यहुदी धर्मातील प्राचीन ऋषिवर्यांच्या तेजस्वी वचनांत त्यांचें आत्मचरित्र गोंवलेलें असतें. याशिवाय मानवी कल्याणाचा एकमेव हेतु मनांत धरून अवतार घेतलेल्या आपल्या गुरुवर्यांच्या सदुपदेशाचा संदेश देशोदेशीं पोंचवीत असतां या गुरुवर्यांच्या सच्चरित शिष्यानें लिहिलेलीं पत्रें हींच त्याच्या आत्मचरित्राची कथा असें म्हणायला हरकत नाहीं. महाराष्ट्रांतील संतांप्रमाणें पाश्चात्य देशांतील मुनिवरांनींही अनेकविध आत्मचरित्रपर लिखाण केलें आहे. चौथ्या शतकांतील एका ख्यातनाम आत्मचरित्रापासून तों विसाव्या शतकाच्या मध्यापर्यंत पाश्चात्य वाङ्मयाला आत्मचरित्रांची उणीव भासलेली नाहीं. महाकवि डॅन्टे यानें आपल्या एका सुप्रसिद्ध काव्यांत वाचकांना स्वतांच्या चरित्राचा परिचय करून दिला आहे. इंग्लंडमध्यें चॉसरपासून तों वर्ड्स्वर्थ, शेली आणि अगदीं अलीकडचे फ्रॅन्क केन्डन आणि सिडने ब्रुक्स या कवींनीं आत्म-लेखनाची ही परंपरा अव्याहतपणें चालू ठेवलेली आपल्याला आढळून येईल.

पद्यांत नाहींतर गद्यांत, रोजनिशींत नाहींतर स्मरणवहींत, प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष स्वतांच्या चरित्राचें वर्णन करणें हा मानवी स्वभावच. आपल्या चरित्रांतील कोणतीही गोष्ट मनुष्याला लपवून ठेवतां येत नाहीं. अगदीं अमानुष, हिंस्र कृत्यें करणारे नराधममुद्धां आपल्या मित्रांजवळ आपण केलेल्या बहादुरीची हकीकत सांगतात. आपल्या सत्कर्मांचा आणि दुष्कर्मांचा पाढा कुणापुढें तरी वाचल्याशिवाय माणसाला चैन पडत नाहीं. आपण जें काय केलें तें दुसऱ्याला सांगितलें म्हणजे त्याला आपल्या मनावरचें एक दडपण दूर झाल्यासारखें वाटतें. "पूरोत्पीडे तडागस्य परिवाहः प्रतिक्रिया" त्यांतलीच ही गोष्ट.

आयुष्यांतील खळबळ उडवून देणाऱ्या रोमांचकारी प्रसंगांसंबंधींच हें खरें आहे असें नव्हे. सकाळसंध्याकाळ घडणाऱ्या साध्यासुध्या गोष्टीही कुणाला सांगितल्या-

१ Hebrew Prophets.
२ Christ.
३ St. Paul.
४ Confessions of St. Augustine.
५ Vita Nuova.

शिवाय आपल्याला राहावत नाहीं. याला कांहीं अपवाद असतील पण ते अपवादच. धर्मराजांनीं स्त्रीजातीला कोणतेंही रहस्य लपवितां येणार नाहीं असा जो शाप दिला तो एकंदर मनुष्यजातीलाच दिला असें म्हटलें तर त्यांत कांहीं गैर होणार नाहीं.

रोजनिशी, स्मरणवही, मित्रमंडळींना किंवा जवळच्या नातलगांना लिहिलेलीं पत्रें, लघुनिबंध—एका दृष्टीनें हे आत्मचरित्राचे पर्याय होत. रोजनिशी ही लेखकाच्या प्रिय मित्रासारखी असते. आपल्या मित्राला स्वतांच्या सुखदुःखाची कहाणी सांगून आपण आपलें मन हलकें करतों. रोजनिशींत स्वतांच्या सुखदुःखाची कथा लिहून ठेवणाराला हेंच समाधान लाभतें. रोजनिशी लिहिणाराला जणूं काय आपण आपल्या प्रिय मित्राशींच बोलतों आहों असें वाटतें. स्मरणवही लिहिणाराही रोजनिशीकाराप्रमाणेंच आपल्या स्मरणवहींत स्वतांच्या आयुष्यांतील घडामोडींचें टिपण करून ठेवतो. त्यालाही रोजनिशीकाराप्रमाणेंच मनावरचें एक ओझें दूर झाल्यासारखें वाटतें. पत्रें लिहिणाराचाही हाच अनुभव. जिवलग मित्राला पाठविलेल्या पत्रांत लेखक आपलें अंतःकरण उघडें करून दाखवितो. कुठलाही आडपडदा न ठेवतां तो आपल्या आशा, आकांक्षा, आपण योजलेले आणि आपले फसलेले बेत, आपले मित्र आणि शत्रु या सर्वांचें आपल्या पत्रांत प्रांजलपणें वर्णन करतो. लघुनिबंध हा एक आत्मचरित्राचाच प्रकार. लघुनिबंधांत लेखक स्वतःच्या भावना, विचार, अनुभव यांचें वर्णन करतो. लघुनिबंधकारही वाचकांशीं हितगुज करीत बोलतो आहे असें आपल्याला वाटतें. लघुनिबंध म्हणजे भावगीताचें गद्यांतलें रूप.

सारांश काय, रोजनिशींत, स्मरणवहींत, पत्रांत आणि लघुनिबंधांत लेखक आत्मचरित्र लिहीत असतो. मनमोकळेपणा, प्रामाणिकपणा, सरलता, इत्यादि गुणांमुळें रोजनिशींत, स्मरणवहींत, पत्रांत, त्याचप्रमाणें लघुनिबंधांत दिसून येणारें आत्मचरित्राचें स्वरूप मनोरम वाटतें.

महाराष्ट्रांत तरी रोजनिशी ठेवणारे लोक थोडे. श्रीयुत पांगारकर यांनीं मात्र वर्षानुवर्षे रोजनिशी लिहिण्याचा नियम पाळला आणि जेव्हां त्यांनीं आपलें आत्मचरित्र लिहिलें त्यावेळीं या रोजनिश्यांचें त्यांना बिनमोल साहाय्य झालें. नाट्यछटाकार दिवाकरही रोजनिशी लिहीत. दिवाकर या व्यक्तीची पुष्कळशी माहिती त्यांच्या रोजनिश्यांत सांपडते. स्मरणवही ठेवायची संवय महाराष्ट्रीयांना फारकरून नाहींच. राहातां राहिलीं पत्रें. श्रीयुत न. चिं. केळकर, महात्मा गांधी,

पंडित नेहरू वगैरे लोकनायकांनीं लिहिलेलीं पत्रें उपलब्ध आहेत. तथापि एखाद्या थोर व्यक्तीनें लिहिलेल्या पत्रांत त्या व्यक्तीचें समग्र आत्मचरित्र आपल्याला वाचायला मिळेल अशी अपेक्षा जर आपण केली तर ती मात्र फोल होईल. नाहीं म्हणायला 'श्यामकांताचीं (आपल्या वडिलांस लिहिलेलीं) पत्रें' हा एक अपवाद म्हणून सांगतां येईल. ऐतिहासिक पत्रांचा विचार येथें नाहींच. कारण राजकारणाची चिकित्सा हा ऐतिहासिक पत्रांचा मुख्य विषय. अशा पत्रांत व्यक्तिदर्शन झालें तरी तें ओझरतें.

पाश्चात्य राष्ट्रांच्या वाङ्मयांत मात्र रोजनिश्यांचे उत्कृष्ट नमुने हवे तितके सांपडतील. सतराव्या शतकांतील इंग्लंडमधल्या एका नाविक अधिकाऱ्यानें लिहिलेल्या रोजनिशीची[1] आपण जेवढी स्तुति करूं तेवढी थोडीच होईल. या ख्यातनाम रोजनिशींत जें गुणदोषसंमिश्र असें आपण आत्मचरित्र वाचतों तें आपणां सर्वांचें आत्मचरित्र. अशा प्रकारच्या गुणदोषसंमिश्र स्वभाववर्णनांत वाङ्मयाची इतिकर्तव्यता झाली असें रसिक म्हणतात तें खरें. नाहींतर सद्गुणांच्या निष्कलंक मूर्ति आणि दुर्गुणांचे काळेकुट्ट राक्षस यांचा आपला नित्याचा परिचय आहेच. इतक्या अव्वल दर्जाच्या नाहीं तरी आपापल्या परीनें श्रेष्ठ अशा पाश्चात्य वाङ्मयांतील[2] रोजनिश्यांचीं उदाहरणें देणें कठीण नाहीं.

राणी व्हिक्टोरिया स्वतःच्या आयुष्यांतील बारीकसारीक घटनासुद्धां आपल्या स्मरणवहींत[3] लिहून ठेवीत असे. स्कॉटलंडमध्यें प्रिन्स ॲलबर्टच्या सहवासांत तिनें जे दिवस घालविले ते तिच्या संसारसुखाचें अंतिम शिखर होय. या सुखसंपन्न काळांतल्या अनेक लहानमोठ्या प्रसंगांचीं तिनें आपल्या स्मरणवहींत नोंद करून ठेविली आहे. जरा कुठें एवढें तेवढें कांहीं झालें कीं तें आपल्या स्मरणवहींत लिहून ठेवायला ती धावतच जायची. स्मरणवहीचें हें एक संस्मरणीय उदाहरण. दुसरीं आणखी कितीं तरी आहेत. राणी व्हिक्टोरियाला पत्रलेखनाचाही हव्यास होता.

एका सुप्रसिद्ध रोमन शैलीकारानें[4] लिहिलेल्या पत्रांत त्याचें समग्र आत्मचरित्र

१ Pepys's Diary.

२ Evelyn's Diary, Fanny Burney's Diary.

३ Leaves from the Journal of our Life in the Highlands

४ Cicero.

सांपडतें आणि संपूर्ण आत्मचरित्र नसलें तरी लेखकाच्या पत्रांत त्याच्या चरित्राचें आविष्करण होतेंच. बायरन्, कीट्स्, फिट्झ्जेरल्ड आणि कार्लाइलची पत्नी यांच्या पत्रांत सहजासहजीं होणाऱ्या आत्मदर्शनामुळें त्यांचीं पत्रें आपल्याला पुन्हां पुन्हां वाचावींशीं वाटतात.

एका[1] प्रथमश्रेणींतल्या फ्रेंच लघुनिबंधकारानें लिहिलेले निबंध वाचीत असतां आपण त्याचें आत्मचरित्र वाचतों आहों अशी आपली समजूत होते. इंग्लिश वाङ्मयांतही लॅम्, हॅझ्लिट, स्टिव्हन्सन्, गार्डिनर, लूकस्, लिन्ड, बेन्सन्, प्रीस्टले वगैरे लेखक स्वतः त्यांनीं लिहिलेल्या लघुनिबंधांत आपल्या आयुष्याचें कथानक सांगत असतात. मराठी वाङ्मयांत श्रीयुत फडके, खांडेकर, प्राध्यापक दांडेकर वगैरे लेखकांनीं हा वाङ्मयप्रकार हाताळला आहे. इंग्रजी निबंधकारांप्रमाणेंच हे महाराष्ट्रीय निबंधकारसुद्धां आत्मचरित्रवजा निबंध लिहितात.

रोजनिशी, स्मरणवही, पत्रें, लघुनिबंध हे आत्मचरित्राचे अंशावतार होत, कारण या सर्वांत जें आत्मचरित्राचें दर्शन आपल्याला घडतें तें बऱ्याच वेळां अर्धवट, अप्रत्यक्ष, प्रासंगिक, आणि विस्कळित अशा स्वरूपाचें असतें. पण जेव्हां लेखक स्वतांच आत्मचरित्र लिहावयाचा हेतु मनांत धरून जन्मापासून " मृत्यु उभा ठाकला द्वारीं " पर्यंतच्या स्वतांच्या संसारयात्रेची हकीकत लिहितो तेव्हां त्या लिखाणाला आत्मचरित्र म्हणणें योग्य होईल. लेखकानें स्वतां लिहिलेल्या या हकीकतींत त्याच्या चरित्राचें संपूर्ण दर्शन आपल्याला होतें असें आपण सध्यां तरी म्हणूं.

आत्मचरित्र या वाङ्मयप्रकाराला काव्यापेक्षां गद्य जास्त मानवतें. काव्याला प्रक्षुब्ध भावना हव्या आणि कल्पनाशक्ति ही तर काव्याचा प्राणच. यामुळें काव्याला अतिशयोक्तीची फिकीर वाटत नाहीं. भावनांच्या आणि कल्पनाशक्तीच्या साहाय्यानें काव्याला मनुजजीवितांतील रहस्यांचें आणि चराचर सृष्टींतील अन्तस्तत्त्वाचें आकलन करतां येतें. काव्याची भाषाही रमणीय शब्दांनीं आणि उपमादि अलंकारांनीं सजलेली असते.

याच्या उलट गद्याचा व्यवहाराकडे ओढा. त्याला कल्पनेच्या भराऱ्या नकोत. गद्याची प्रकृति शांत, समंजस आणि विचारशील. त्याला अंतरिक्षांत उडून जायची हाव नाहीं. मनुजजीवितांतील रहस्यांचें आणि वस्तुमात्रांतील निगूढ आत्मस्वरूपाचें

१ Montaigne.

ज्ञान गद्यालाही हस्तगत करून घेणें आवश्यक वाटतें. तथापि या बाबतींत गद्याचा सर्व भर प्रमाण, युक्तिवाद, तर्क, विवेक इत्यादि साधनांवर. सहसा तें भावनेच्या आहारीं जाणार नाहीं आणि कल्पनाशक्तीचीही मदत मागणार नाहीं.

याचा अर्थ असा नव्हे कीं काव्यांत गद्याला कधींही प्रवेश मिळत नाहीं, किंवा गद्यांत काव्याला निरंतर मज्जाव असतो. किती तरी गद्यकाव्यें आपण नेहमीं वाचतों आणि काव्यांतही अनेक प्रसंगीं आपण गद्य वाचतों आहों असें आपल्याला वाटतें. तरी पण अपवादांचा विशेष विचार न करतां वर सांगितलेला काव्य आणि गद्य यांतला फरक मूलग्राही आहे असें धरून चालायला हरकत नाहीं.

निरपवाद, निर्मळ सत्य हें आत्मचरित्राचें ध्येय असल्यामुळें आत्मचरित्रांत अतिशयोक्तीला आणि कल्पनाशक्तीच्या स्वैर संचाराला वाव नाहीं. योग्य अनुमानानें, तर्कानें, प्रमाणानें, युक्तिवादानें जें सिद्ध होईल तें स्वतांच्या जीविताविषयींचें सत्य, आत्मचरित्रलेखकाला जगापुढें मांडायचें असतें. स्वतःप्रमाणें इतर कोणावर अन्याय होणार नाहीं याबद्दलही त्याला खबरदारी घ्यावी लागते. कोणत्याही प्रकरणाची शांत विचारानें छाननी करून जो निष्कर्ष निघेल तेवढा निष्कर्ष आत्मचरित्रलेखक नमूद करून ठेवतो. या सर्व गोष्टी साधायच्या म्हणजे आत्मचरित्रकाराला गद्याचा आश्रय करणें इष्ट वाटतें. सरळ, स्पष्ट शब्दांची आवश्यकता त्याला जास्त, कारण त्याला जें सांगावयाचें असतें तें वाचकाला सहज समजलें पाहिजे. काव्याच्या इंद्रधनुष्याचा त्याला तितकासा उपयोग होत नाहीं. गद्यांत लेखकानें आत्मचरित्र लिहिलें म्हणजे त्याला आपलें सत्यकथनाचें ध्येय गांठणें सुलभ होतें.

स्वतःचें चरित्र सांगायला स्वतःइतका अधिकारी दुसरा कोण लेखक असणार! कारण आत्मचरित्रलेखकाला आपल्या आयुष्याची बिनचूक माहिती असते. याशिवाय स्वतांचे अंतस्थ विचार आणि हेतु यांचा आविष्कार जसा आत्मचरित्रकार करूं शकेल तसा तो इतर कोणाला जमणार नाहीं अशी आपली समजूत. जें झालें तसेंच तें सांगितलें. यालाच सरळ निरपवाद सत्य म्हणतात. आत्मचरित्रकारानें हें निर्मळ सत्य आपल्यापुढें मांडलें कीं त्याचें काम झालें. आत्मचरित्र लिहिणें यान्या इतकी सोपी गोष्ट कोणतीच नाहीं अशा भ्रमांत आपण असतों.

पण आपल्या आयुष्यांतील निर्मळ सत्य सांगण्याचें हें काम वाटतें तितकें सोपें नाहीं. आत्मचरित्रलेखकांच्या मार्गांत दुर्लंघ्य अडचणी उपस्थित होतात. विचारवंत लेखकांनी दिलेली ही कबुली कोणालाही पटेल अशीच आहे.

# आत्मचरित्र, चरित्र आणि आठवणी

आत्मवृत्तलेखकाच्या वाटेंतली एक अडचण अशी कीं त्याला आपल्या आयुष्यांतील फारच थोड्या गोष्टी ठळकपणें आठवतात, त्यांतून स्वतांच्या बालपणींच्या आठवणी निःसंदिग्धपणें सांगणारे लेखक अगदींच दुर्मिळ. श्रीयुत केळकर म्हणतात त्याप्रमाणें बालपणींच्या आपल्या आठवणी तुटक आणि तुरळक असावयाच्या. बहुधा इतरांवर विसंबून आत्मचरित्रकार या आठवणी आपल्या पुस्तकांत नमूद करून ठेवतात. पाश्चात्य वाङ्मयांत मात्र बालपणच्या आठवणी सुसंगतपणें सांगणाऱ्या लेखकांची उणीव नाहीं. गॉस, हड्सन्, फॉरेस्ट, रीड वगैरे नांवें आपल्या चांगल्या परिचयाचीं आहेत. या बाबतींत एका स्विस[१] कवीनें लिहिलेलें आत्मचरित्र अपूर्व होय, कारण तें लेखकाच्या चवथ्या वर्षींच संपतें. असें सांगतात कीं जोंपर्यंत आपण हें चरित्र वाचलें नाहीं तोंपर्यंत आपला या गोष्टीवर विश्वास बसत नाहीं. वाचल्यानंतर मात्र त्याच्या खरेपणाबद्दल आपल्याला शंका राहात नाहीं.

बालपणींच्याच काय परंतु तरुणपणांतील आणि प्रौढवयांतीलही आत्मवृत्त-लेखकाच्या आठवणी अशाच अपुऱ्या आणि विस्कळित असतात. आपल्या स्वतःच्या तरुणपणांतील आणि प्रौढवयांतील अनेक प्रसंगांची आणि व्यक्तींची लेखकाची आठवण पार बुजलेली असते. आणि जो भाग त्याला स्पष्ट आठवतोसा वाटतो त्यांतही निर्भेळ सत्य सांपडणें मुष्किलच, कारण पूर्ववयांत अनुभविलेल्या दुःखांची आणि संकटांची स्मृति नंतर (आत्मचरित्र लिहिते वेळीं) सुखकर होते. "प्राप्तानि दुःखान्यपि दण्डकेषु संचिन्त्यमानानि सुखान्यभूवन्" या कालिदासोक्तीची लेखकाला प्रचीती येते. मनुष्याच्या स्मरणशक्तीची ही फसवेगिरी, आणि ती येथेंच संपते असें नव्हे.

पूर्वी आत्मचरित्रकाराच्या आयुष्यांत यदृच्छया घडून आलेल्या प्रसंगांतील कार्यकारणभाव त्याच्या लक्षांतही आलेला नसतो. आत्मचरित्र लिहिते वेळीं मात्र त्याची स्मरणशक्ति कार्यकारणभावाची सर्व सामग्री त्याला पुरविते. येथेंही सत्याचा विपर्यास होतो. आपण आपल्या चरित्राचें कथानक सरळ जसें झालें तसें सांगूं ही लेखकाची मनीषा सफळ होत नाहीं.

आणखी एक अडचण अशी कीं आत्मचरित्रलेखक आपल्या आयुष्यांतील संस्मरणीय घडामोडींची हकीकत वाचकांना सांगतो. वास्तविक पाहिलें तर या

---

१ Carl Spitteler.

संस्मरणीय घडामोडींनीं फार तर त्याच्या आयुष्याचा दहा पंधरा वर्षांचा अवधि व्यापला असेल. उरलेल्या पन्नास साठ वर्षांच्या काळांत आजचा दिवस कालच्यासारखा आणि उद्यांचा आजच्यासारखा अशी स्थिति असल्यामुळें लेखकाला त्याचा पूर्ण विसर पडतो, पण याचा परिणाम असा होतो कीं लेखकाचें दहा पंधरा वर्षांचें जें अंशमात्र आत्मचरित्र तेंच जणूं काय त्याचें समग्र चरित्र अशी त्याची समजूत होते. सरळ सत्याचें दर्शन त्याला घडत नाहीं. उलट त्याचें विकृत स्वरूप मात्र पाहायला मिळतें.

मानवी मनाची रचना अशी आहे कीं त्याला जें आवडतें आणि हितकर वाटतें तेवढ्याविषयींची त्याची स्मृति ताजी राहाते. मनुष्याला अप्रिय असलेल्या आणि न रुचणाऱ्या व्यक्ति ( आणि प्रसंग ) त्याच्या मनांत मूळ धरूं शकत नाहींत. साहजिकच या अप्रिय आणि लेखकाला अनिष्ट वाटणाऱ्या व्यक्तींचा आणि प्रसंगांचा आत्मचरित्रांत उल्लेख येत नाहीं. म्हणजे त्यानें लिहिलेलें आत्मचरित्र वस्तुस्थितिनिदर्शक होत नाहीं.

याशिवाय आत्मचरित्र लिहिणें ही एक कला आहे हें लेखकाला माहीत असतें. तेव्हां आपलें चरित्र कलाकृति व्हावी आणि ती सुभग दिसावी असा हेतु मनांत वागवून लेखक कल्पनेचा आश्रय करतो. स्वतःच्या चरित्रांतील साध्या प्रसंगांचें चटकदार वर्णन करतो. अशा प्रकारें आपण सत्याची वाट सोडून कल्पनाशक्ति नेईल तिकडे जात आहोंत हेंही लेखकाला माहीत नसतें असें नाहीं. जाणूनबुजून तो सत्याकडे कानाडोळा करतो. आपण निर्मिलेल्या कल्पनारम्य जगांत वावरत असतां त्याला पार्थिव सृष्टींतील दुर्धर क्लेशांची स्मृति राहात नाहीं. कला ही एक दुःखी मनाचा विरंगुळा होय असें जें म्हणतात त्याचें हें प्रत्यंतर म्हणायला हरकत नाहीं. यामुळें आत्मचरित्राचें मूळरूप बदलून तें एखाद्या कादंबरीसारखें दिसायला लागतें.

आत्मचरित्रकाराच्या वाटेंतील आणखी एक अडथळा म्हणजे लेखकाला आपल्या चरित्रांत कित्येक व्यक्तींचा आणि घटनांचा ऊहापोह करतां येत नाहीं. अशांपैकीं बऱ्याच व्यक्ति ( किंवा त्यांच्या जवळच्या नात्यांतील मंडळी ) त्यास

१ Goethe's Poetry and Truth.
प्रो. भाटे–प्रेम कीं लौकिक.

असल्यामुळें आत्मचरित्रांत त्यांचा उल्लेख करून नाना प्रकारचे गुप्त बनाव उजेडांत आणले तर त्या व्यक्तींच्या ( किंवा त्यांच्या वंशजांच्या ) भावना दुखविल्या जातील याची लेखकाला भीति वाटते. विशिष्ट घटनांची इत्थंभूत हकीकत दिल्या-शिवाय गुंतागुंतीच्या प्रकरणांचा उलगडा होत नाहीं आणि प्रांजलपणें जशीच्या तशी सर्व हकीकत द्यावी तर त्यांतून नाना प्रकारचे वाद, उत्तरें आणि प्रत्युत्तरें निर्माण होण्याचा संभव. या शृंगापत्तींत सांपडलेल्या लेखकानें 'मूले कुठारः' या न्यायानें अशा प्रसंगांविषयीं मौन स्वीकारणें बरें असें ठरविलें तर त्यांत नवल काय? अर्थात् आत्मचरित्रकाराला सत्याविषयीं प्रीति नसते असें कुणी म्हणणार नाहीं. पण सभ्यपणाच्या, सौजन्याच्या, कलेच्या मर्यादा त्याला संभाळाव्या लागतात आणि निरनिराळ्या व्यक्तींच्या भावना दुखविल्या जाणार नाहींत अशा तऱ्हेनें आत्मचरित्र लिहिणें श्रेयस्कर वाटतें. यांत त्याचें फारसें चुकलें किंवा त्यानें कांहीं विलक्षण अपराध केला असें आपण म्हणूं नये.

स्वतःच्या कामविषयक विचारांचा किंवा इतर अनैतिक आचरणाचा आत्मचरित्रकार स्फोट करूं शकत नाहीं. मनुष्याला आपली लज्जेची भावना मुळासकट उपटून काढतां येत नाहीं. निदान सध्यांच्या आपल्या मानवी संस्कृतीला वस्त्रप्रावरणांची आवश्यकता भासते. जोंपर्यंत आपण हीं आवरणें फेकून दिलीं नाहींत तोंपर्यंत आत्मचरित्रांतील ( किंवा कुठल्याही ) विवस्त्र सत्याबद्दलचा आपला अनादर स्वाभाविक होय. केव्हां केव्हां आपल्याला असे कांहीं लेखक भेटतात कीं ज्यांना कसलेंही विवस्त्र सत्य ओरडून सांगण्यांत धन्यता वाटते. यांत त्यांच्या सत्यप्रीतीपेक्षां आत्मप्रौढीचा अंश जास्त असतो. इतरांनीं केलें नाहीं तें पाहा मी करून दाखवितों अशी त्यांना शेखी मिरवावयाची असते.

आत्मचरित्र लिहिणाऱ्याच्या वाटेंतल्या या अडचणींचा विचार केला म्हणजे आपल्याला अशी शंका येते कीं सर्वांगपूर्ण, सर्वस्वीं निर्दोष असें आत्मचरित्र कोणीं कधीं तरीं लिहिलें असेल का, किंवा कोणीं कधीं लिहिणें शक्य आहे का? या प्रश्नाचें उत्तर म्हणजे आजपर्यंत तरी कोणीं असें आत्मचरित्र लिहिलें नाहीं आणि पुढेंही कधीं कोणाला तें लिहितां येईल याची सध्यां तरी शक्यता दिसत नाहीं. लौकिक सृष्टींत मनुष्याच्या जागृतावस्थेंत घडून येणाऱ्या प्रसंगांची ही कथा, मग मनुष्याच्या मनांत अहर्निश चालू असलेल्या व्यापारांचें वर्णन कोण करूं

१ Confessions of Rousseau.

संस्मरणीय घडामोडींनीं फार तर त्याच्या आयुष्याचा दहा पंधरा वर्षांचा अवधि व्यापला असेल. उरलेल्या पन्नास साठ वर्षांच्या काळांत आजचा दिवस कालच्यासारखा आणि उद्यांचा आजच्यासारखा अशी स्थिति असल्यामुळें लेखकाला त्याचा पूर्ण विसर पडतो, पण याचा परिणाम असा होतो कीं लेखकाचें दहा पंधरा वर्षांचें जें अंशमात्र आत्मचरित्र तेंच जणूं काय त्याचें समग्र चरित्र अशी त्याची समजूत होते. सरळ सत्याचें दर्शन त्याला घडत नाहीं. उलट त्याचें विकृत स्वरूप मात्र पाहायला मिळतें.

मानवी मनाची रचना अशी आहे कीं त्याला जें आवडतें आणि हितकर वाटतें तेवढ्याविषयींची त्याची स्मृति ताजी राहाते. मनुष्याला अप्रिय असलेल्या आणि न रुचणाऱ्या व्यक्ति ( आणि प्रसंग ) त्याच्या मनांत मूळ धरूं शकत नाहींत. साहजिकच या अप्रिय आणि लेखकाला अनिष्ट वाटणाऱ्या व्यक्तींचा आणि प्रसंगांचा आत्मचरित्रांत उल्लेख येत नाहीं. म्हणजे त्यानें लिहिलेलें आत्मचरित्र वस्तुस्थितिनिदर्शक होत नाहीं.

याशिवाय आत्मचरित्र लिहिणें ही एक कला आहे हें लेखकाला माहीत असतें. तेव्हां आपलें चरित्र कलाकृति व्हावी आणि ती सुभग दिसावी असा हेतु मनांत वागवून लेखक कल्पनेचा आश्रय करतो. स्वतःच्या चरित्रांतील साध्या प्रसंगांचें चटकदार वर्णन करतो. अशा प्रकारें आपण सत्याची वाट सोडून कल्पनाशक्ति नेईल तिकडे जात आहोंत हेंही लेखकाला माहीत नसतें असें नाहीं. जाणूनबुजून तो सत्याकडे कानाडोळा करतो. आपण निर्मिलेल्या कल्पनारम्य जगांत वावरत असतां त्याला पार्थिव सृष्टींतील दुर्धर क्लेशांची स्मृति राहात नाहीं. कला ही एक दुःखी मनाचा विरंगुळा होय असें जें म्हणतात त्याचें हें प्रत्यंतर म्हणायला हरकत नाहीं. यामुळें आत्मचरित्राचें मूळरूप बदलून तें एखाद्या कादंबरीसारखें दिसायला लागतें.

आत्मचरित्रकाराच्या वाटेंतील आणखी एक अडथळा म्हणजे लेखकाला आपल्या चरित्रांत कित्येक व्यक्तींचा आणि घटनांचा ऊहापोह करतां येत नाहीं. अशांपैकीं बऱ्याच व्यक्ति ( किंवा त्यांच्या जवळच्या नात्यांतील मंडळी ) ह्यात

१ Goethe's Poetry and Truth.
प्रो. भाटे–प्रेम की लौकिक.

असल्यामुळें आत्मचरित्रांत त्यांचा उल्लेख करून नाना प्रकारचे गुप्त बनाव उजेडांत आणले तर त्या व्यक्तींच्या ( किंवा त्यांच्या वंशजांच्या ) भावना दुखविल्या जातील याची लेखकाला भीति वाटते. विशिष्ट घटनांची इत्थंभूत हकीकत दिल्या-शिवाय गुंतागुंतीच्या प्रकरणांचा उलगडा होत नाहीं आणि प्रांजलपणें जशीच्या तशी सर्व हकीकत द्यावी तर त्यांतून नाना प्रकारचे वाद, उत्तरें आणि प्रत्युत्तरें निर्माण होण्याचा संभव. या शृंगापत्तींत सांपडलेल्या लेखकानें 'मूले कुठारः' या न्यायानें अशा प्रसंगांविषयीं मौन स्वीकारणें बरें असें ठरविलें तर त्यांत नवल काय ? अर्थात् आत्मचरित्रकाराला सत्याविषयीं प्रीति नसते असें कुणी म्हणणार नाहीं. पण सभ्यपणाच्या, सौजन्याच्या, कलेच्या मर्यादा त्याला संभाळाव्या लागतात आणि निरनिराळ्या व्यक्तींच्या भावना दुखविल्या जाणार नाहींत अशा तऱ्हेनें आत्मचरित्र लिहिणें श्रेयस्कर वाटतें. यांत त्याचें फारसें चुकलें किंवा त्यानें कांहीं विलक्षण अपराध केला असें आपण म्हणूं नये.

स्वतःच्या कामविषयक विचारांचा किंवा इतर अनैतिक आचरणाचा आत्मचरित्रकार स्फोट करूं शकत नाहीं. मनुष्याला आपली लज्जेची भावना मुळासकट उपटून काढतां येत नाहीं. निदान सध्यांच्या आपल्या मानवी संस्कृतीला वस्त्रप्रावरणांची आवश्यकता भासते. जोंपर्यंत आपण हीं आवरणें फेकून दिलीं नाहींत तोंपर्यंत आत्मचरित्रांतील ( किंवा कुठल्याही ) विवस्त्र सत्याबद्दलचा आपला अनादर स्वाभाविक होय. केव्हां केव्हां आपल्याला असे कांहीं लेखक भेटतात कीं ज्यांना कसलेंही विवस्त्र सत्य ओरडून सांगण्यांत धन्यता वाटते. यांत त्यांच्या सत्यप्रीतीपेक्षां आत्मप्रौढीचा अंश जास्त असतो. इतरांनीं केलें नाहीं तें पाहा मी करून दाखवितों अशी त्यांना शेखी मिरवावयाची असते.

आत्मचरित्र लिहिणाऱ्याच्या वाटेंतल्या या अडचणींचा विचार केला म्हणजे आपल्याला अशी शंका येते कीं सर्वांगपूर्ण, सर्वस्वीं निर्दोष असें आत्मचरित्र कोणीं कधीं तरीं लिहिलें असेल का, किंवा कोणीं कधीं लिहिणें शक्य आहे का ? या प्रश्नाचें उत्तर म्हणजे आजपर्यंत तरी कोणीं असें आत्मचरित्र लिहिलें नाहीं आणि पुढेंही कधीं कोणाला तें लिहितां येईल याची सध्यां तरी शक्यता दिसत नाहीं. लौकिक सृष्टींत मनुष्याच्या जागृतावस्थेंत घडून येणाऱ्या प्रसंगांची ही कथा, मग मनुष्याच्या मनांत अहर्निश चालू असलेल्या व्यापारांचें वर्णन कोण करूं

१ Confessions of Rousseau.

शकेल! बारा तासांच्या अवधींतल्या आपल्या मनोव्यापारांचें वर्णन करायला एका आयरिश ग्रंथकाराला आठशें पानें लागलीं. याच्यापुढचें गणित करून दाखवायला नकोच.

स्वतःविषयींचें सरळ, असंदिग्ध सत्य हा आत्मचरित्राचा कलिजा होय. तथापि या मुद्द्याचें वर सांगितल्याप्रमाणें सांगोपांग विवेचन करणाऱ्या सुप्रसिद्ध फ्रेंच[२] रसिकवरानें म्हटल्याप्रमाणें आत्मचरित्रांतील सत्याचें हें सावज आपण त्याचा कितीही कसून पाठलाग केला तरी आपल्या हातावर तुरी देऊन पळून जातें.

वस्तुस्थिति अशी आहे खरी. पण त्यांत काय मोठें बिघडलें! मानवी आयुष्याकडे कोणच्याही दृष्टीनें पाहा. तें कुठें सर्वांगपरिपूर्ण आहे असें आपल्याला आढळून येणार नाहीं. परिपूर्णतेची हाव मात्र आपल्याला असते. आकाशींचा चंद्रमा आपल्या हातीं यावा अशी आपली सारखी धडपड चालू असते. या धडपडींत आपलें सर्व आयुष्य केव्हांच निघून जातें. यांतही विषाद मानण्यासारखें कांहीं नाहीं. स्वतःच्या सामर्थ्याच्या पलीकडे असलेल्या ध्येयावर दृष्टि ठेवून प्रयत्नांत यत्किंचित् कसूर होतां कामा नये. मग आपलें कार्य अर्धवट, अपूर्ण राहिलें तरी त्याच्या अपूर्णतेंतच आपल्याला अमूप समाधान लाभतें.

आंग्ल कवि शेली यानें कलावंताच्या स्वतःच्या ध्येयावरील प्रेमाची एकाद्या पतंगाच्या अंतरिक्षांत तळपणाऱ्या तारकेवरील प्रेमाशीं तुलना केली आहे. ती तारका कधीं त्याच्याजवळ येईल का नाहीं याची तो पतंग फिकीर करीत नाहीं. तशीच कलावंताची ध्येयसाधना अपुरी राहिली म्हणून त्याला मुळींसुद्धां खंत वाटत नाहीं. सर्व जन्मभर ज्यानें ज्ञानाची उपासना केली त्या सर्वश्रेष्ठ ग्रीक तत्त्वज्ञान्याला आपण अज्ञानी आहों एवढ्याच ज्ञानाची प्राप्ति झाली. बुद्धिमंताचा जो केवळ मुकुटमणीच त्या शास्त्रज्ञानेंही समुद्राच्या तीरावर चार सहा गारगोट्या वेंचणाऱ्या लहान बालकाशीं आपली तुलना केली. अपूर्णता हा मानवी सृष्टीचा नियम होय.

---

१ James Joyce.
२ Andre Maurois.
३ The desire of the moth for the star.
४ Socrates.
५ Newton

# आत्मचरित्र, चरित्र आणि आठवणी

आत्मचरित्रकाराला अर्धवट, अपूर्ण अशा सत्यावरच अवलंबून राहणें भाग पडतें. पण हें सत्य जरी अर्धवट आणि मर्यादित असलें तरी तें त्यानें वाचकापुढें प्रांजलपणानें मांडलें पाहिजे. प्रांजलपणा हा आत्मचरित्राला आवश्यक असा मौलिक गुण आणि लेखक स्वतः प्रांजलपणें सर्व कांहीं सांगत असला म्हणजे तो सहसा असत्यकथन करीत नाहीं. सौजन्याच्या आणि सभ्यपणाच्या मर्यादा संभाळूनहि तो सत्याचा विपर्यास होऊं देत नाहीं. प्रांजलपणाइतकाच महत्त्वाचा गुण प्रामाणिकपणा; कारण प्रांजलपणाचा आव आणून उगाच कांहींतरी अतिशयोक्ति करून आपल्या सत्यप्रीतीची द्वाही फिरविणारे आत्मचरित्रकार आपल्याला भेटतातच. ज्या आत्मचरित्रपर लिखाणांत प्रांजलपणा आणि प्रामाणिकपणा या गुणांचा वाचकाला प्रत्यय येतो तेथेंच त्याला साहजिकता आणि सरलता हेहि गुण आढळून येतील. अशा तऱ्हेनें प्रांजल, प्रामाणिक, साहजिक आणि सरळ आत्मनिवेदन कदाचित् प्रमाणबद्ध नसेल. क्वचित् त्यांत कलेचा संयमही सांपडणार नाहीं. तथापि या दोषांची जाणीव असूनही वाचकाला या लिखाणाशीं तन्मय होतां येतें.

आत्मचरित्रलेखकाकडून आपण विनयाची आणि धैर्याचीही अपेक्षा करतों. स्वतांच्या गुणांचा आणि सत्कृतींचा ( दादोबा करतात त्याप्रमाणें ) विनयपूर्वक उल्लेख करावा म्हणजे त्यांत कांहीं गैरवाजवी झालें असें वाटत नाहीं. अशा प्रसंगीं अप्रत्यक्ष निवेदनपद्धतीचा स्वीकार करणें श्रेयस्कर. आत्मवृत्त लिहिणाराशीं परिचित असलेल्या व्यक्तींनीं लेखकाच्या विशालबुद्धीचें आणि त्यानें केलेल्या प्रशंसनीय कामगिरीचें वर्णन केलें म्हणजे "आपली आपण करी स्तुति" हा दोष टाळतां येतो. स्वतांचे, स्वजनांचे आणि आपल्या प्रिय मित्रांचे दोष दाखवितांना आत्मचरित्रकाराच्या धैर्याची परीक्षा होते. त्यानें आपले दोष असतील तसे सरळ सांगावे, कचरूं नये आणि तितक्याच सरळबुद्धीनें आपल्यांतल्या अवगुणांचा आविष्कार करावा. स्वतांच्या बाबतींत हळुवारपणा आणि नाना तऱ्हेच्या सबबी पुढें आणायच्या आणि इतरांचे अवगुण सांगतांना भडक, जळजळीत भाषा वापरायची असा पंक्तिप्रपंच होऊं देऊं नये. कळत वा नकळत आत्मवृत्ताला कुठेंही कृत्रिमतेचा कलंक लागणार नाहीं, याविषयीं आत्मवृत्तकार जेवढी सावधगिरी बाळगील तेवढी थोडीच.

आत्मवृत्त लिहिणारानें आपण आपल्या जिवलग मित्राशीं बोलतों आहों अशा भावनेनें स्वतांच्या आयुष्याची कथा सांगावी. आत्मचरित्र या

वाङ्मयप्रकारांत निरर्थक उपचाराला आणि शिष्टसंप्रदायाला जागा नाहीं. लेखक आणि वाचक एकाच पातळीवर असल्यामुळें आत्मचरित्रांत एक विशिष्ट प्रकारचा जिव्हाळा अनुभवायला सांपडतो. लेखकाचें अंतःकरण वाचकाच्या अंतःकरणाला सरळ जाऊन भिडतें असें म्हटलें तरी चालेल. आत्मचरित्राचा हा महत्त्वाचा निकष होय.

स्वतांच्या हयातींत घडून आलेल्या राजकीय, सामाजिक किंवा आर्थिक आंदोलनांची हकीकत सांगणें हें आत्मचरित्रकाराचें कर्तव्य होय. एकतर त्यानें या आंदोलनांत चिरस्मरणीय कामगिरी केली असेल म्हणून, नाहींतर आपल्या आयुष्याची पार्श्वभूमि म्हणून, आत्मचरित्रकाराला कमी अधिक प्रमाणांत अशा खळबळ उडवून देणाऱ्या प्रसंगांची माहिती द्यावी लागते. अर्थात् आत्मवृत्तलेखक स्वतःच जर राजकार्यधुरंधर अथवा उदारचरित लोकाग्रणी किंवा जनतेचा कौतुक-विषय झालेला कलावंत असेल तर त्यानें लिहिलेलें आत्मचरित्र अनेक विस्मयजनक घटनांनीं व्यापलेलें असल्यामुळें तें वाचकाला एखाद्या कल्पनारम्य कादंबरीपेक्षांही अधिक मनोरम वाटेल. वाचायला सुरवात करायचा अवकाश कीं मग तें संपविल्याशिवाय त्याला खालीं ठेवतां येणार नाहीं.

लौकिक सृष्टींत विलक्षण राजकीय, सामाजिक आणि आर्थिक स्थित्यंतरें झालेलीं आपण पाहातों. आजची नवलकथा कालच्या नवलकथेपेक्षां अधिक सरस आणि उद्यांची नवलाची गोष्ट आजच्या नवलकथेची आपल्याला आठवणसुद्धां होऊं देणार नाहीं. पण दृश्य जगांत घडून येणाऱ्या विलक्षण स्थित्यंतरांइतक्याच महत्त्वाचीं अभिनव स्थित्यंतरें आपल्या मनांतही घडून येतात. मनुष्याचें मन ही एक अजब चीज आहे. पृथ्वीचा विस्तार मोठा — विपुलाच पृथ्वी — असें आपण म्हणतों. तथापि मनुष्याचें मनही तितकेंच विशाल आहे असें म्हणणें म्हणजे अतिशयोक्ति करणें नव्हे. आत्मचरित्रकाराला आपल्या मनांतील व्यापारांचें, या अंतःसृष्टीचें सूक्ष्म निरीक्षण करतां आलें पाहिजे. स्वतः दूर उभे राहून आपल्या मनांत घडून येणाऱ्या स्थित्यंतरांचें, विचारविषयक किंवा भावनाविषयक क्रांतीचें त्यानें सम्यग्ज्ञान करून घेणें अवश्य होय. आपलें सद्वर्तन आणि

---

१ Autobiography of Benvenuto Cellini.

२ Newman's Apologia Pro vita sua.

दुर्वर्तन, आपला राग, अनुराग, द्वेष आणि लोभ, या सर्वांचीं बीजें आपल्या मनांत खोल दडून बसलेलीं असतात. या बीजांचा मूळ हेतु—वरवर दिसणारीं कारणें नव्हेत—आपण तलास लावला म्हणजे आपल्या आत्म्याचें सत्यस्वरूप आपल्या ध्यानांत येतें.

एकच आपला आत्मा असें जें आपण म्हणतों तें केवळ संक्षेपानेंच; कारण हा आपला आत्मा अनेक रूपें धारण करून जगांत वावरत असतो. " जो गोपाळ गमे प्रभातसमयीं गाई वनीं चारितां। वाटे रव्युदयीं नदीवर मुनी अर्घ्यास जो अर्पितां। जो भासे दिवसा कृषीवल शिरीं खोंवूनियां लोंबरें। " या ओळींत सांगितल्याप्रमाणें आपल्या आत्म्याची खरी स्थिति. व्यावहारिक बाह्यसृष्टींत ज्याप्रमाणें हा आपला आत्मा नानारूपें धारण करतो तसाच तो आपल्या मनांतील रंगभूमीवरही एकाद्या कुशल नटासारखा एकदां [1]चंद्रसेनाच्या भूमिकेंत दंग झालेला दिसून येईल तर दुसऱ्या एकाद्या प्रसंगीं [2]झुंझाररावाची भूमिका पार पाडील. लहानपणचा मी आणि तरुण वयांतील, मध्यम वयांतील किंवा वृद्धावस्थेंतला मी यांत पुष्कळ तफावत असते. किंबहुना असें म्हटलें तरी हरकत नाहीं कीं मनुष्याच्या शरीरांत एका आत्म्याऐवजीं अनेक आत्मे वस्ती करून राहातात.

आतांपर्यंत जागृतावस्थेंतल्या मनोविश्लेषणाचा विचार केला. मनोविश्लेषणाची ही कला आत्मचरित्रकारानें हस्तगत करून घेणें अवश्य होय. पण एवढ्यानें सर्व भागलें असें नव्हे. जागृतावस्थेंतल्या मनाच्या पलीकडे (बाह्यतः तरी) सुप्त असलेल्या मनाचें विश्लेषण करायचें कार्यही कांहीं लेखकांनीं अंगावर घेतलें आहे. या लेखकांच्या मतें स्वप्नें, अचानक सुचणारे विचार, प्रतीकें या सर्व आपल्या अज्ञात (The Unconscious) मनावर प्रकाश पाडणाऱ्या दीपज्योति होत. स्वप्नांचा वगैरे आधार घेऊन हे लेखक अज्ञात मनाच्या रात्रीचा दिवस करून दाखवितात. डा. फ्रॉईडच्या पावलावर पाऊल टाकून ते आपला मार्ग चोखाळतात हें सांगावयाला नकोच. आत्मचरित्रकारानें या अज्ञात मनाच्या विश्लेषणाची माहिती करून घेतली आणि तिचा आपल्या लिखाणांत उपयोग केला तर तें त्याच्या चरित्राचें एक वैशिष्ट्य म्हणून समजलें जाईल. मनोविश्लेषणाच्या ज्ञानाबरोबरच

---

१ Hamlet.
२ Othello.

आत्मचरित्रकाराला संमिश्र वस्तूंचे भिन्नभिन्न अवयव अलग करून त्यांची शहानिशा करणारी चिकित्सक दृष्टि हवी. सरतेशेवटीं आत्मचरित्रकारांत न्यायाधिशाचा निःपक्षपातीपणाचा गुण पाहिजे. निःपक्षपातीपणा नसेल तर त्याच्या इतर गुणांचा त्याला फारसा फायदा होणार नाहीं.

प्रांजलपणा, प्रामाणिकपणा, शालीनता, निर्भयता, वाचकाशीं समरस होऊन लिहिण्याची प्रवृत्ति, मनोविश्लेषणाचें ज्ञान, चिकित्सक दृष्टि, निःपक्षपातीपणा हा सर्व गुणसमुच्चय निदान यांपैकीं चारदोन गुण—असूनही लेखकानें स्वतांच्या चरित्राची जर कलात्मक मांडणी केली नाहीं तर तें आत्मचरित्र मनोवेधक वाटणार नाहीं, आणि मनोवेधकतेच्या अभावीं आत्मचरित्र या वाङ्मयप्रकाराला ( इतकेंच काय पण कोणत्याही इतर वाङ्मयप्रकाराला ) सहृदय वाचकांच्या दृष्टीनें विशेषसें महत्त्वच उरणार नाहीं.

अर्वाचीन आत्मचरित्रलेखकाला याची जाणीव असते. एकाद्या विशिष्ट हेतूनेंच तो आत्मचरित्र लिहायची कामगिरी हातांत घेतो आणि हा त्याचा हेतु तडीस जायचा म्हणजे त्याला स्वतांच्या चरित्राला कलाकृतीचें रूप देऊन तें जगापुढें मांडावें लागतें.

कलाकृति म्हटली कीं ती सुटसुटीत, आटोपशीर असावी अशी आपली अपेक्षा; निरर्थक विस्ताराला कलाकृतींत अवसर सांपडणार नाहीं. कलावंतानें आत्मसंयमन करून कुठचीही बाब अनावश्यक असेल तर तिची हकालपट्टी करणेंच योग्य होईल. संयम हा एका दृष्टीनें कलेचा आत्मा होय. आत्मचरित्रकारानें ज्या प्रसंगांचा आणि व्यक्तींचा चरित्रविषयाशीं दूरचा किंवा मुळींच संबंध नसेल त्यांना सरसहा फांटा दिला पाहिजे. औचित्याचा विचार करून जेथें पांच शब्दांनीं दहा शब्दांचें काम होत असेल तेथें दहा शब्द वापरायचा मोह आवरावा. आत्मचरित्रांत पुनरुक्ति होऊं देऊं नये. पुनरुक्ति टाळल्यानें ग्रंथाच्या आटोपशीरपणाला साहाय्य होतें.

कलाकृति सुबक असल्यामुळें मोहक दिसते. आत्मचरित्रांतही स्थूल भागांत—आरंभ मध्य शेवट—एकसूत्रीपणा आणला आणि इतर लहानसहान भागांची नीट जुळवाजुळव करून त्यांची आपापल्या योग्य स्थळीं योजना केली म्हणजे त्याची रचना सुश्लिष्ट होते. येथें सर्व कांहीं प्रमाणबद्ध, सुसंगत, मनोरम आहे अशी वाचकाची खात्री पटते.

उत्कृष्ट कलाकृतीमध्यें विषय निराळा आणि भाषाशैली निराळी असा भेद आपण करूं शकत नाहीं. विषय[1] (चांगला) असला म्हणजे झालें. नाहींतर विषयाची[2] मांडणी सुंदर केली कीं सर्व त्यांत आलें. नुसत्या विषयाला कसलें महत्त्व, या वादाला येथें जागा नाहीं. विषयाला सर्वस्वीं आत्मसात् करून मग लेखक तो विषय जगाला सादर करतो. विषयाला स्वतांचें वेगळें अस्तित्व राहात नाहीं. लेखकाचें व्यक्तिमत्त्व तें त्याचें रूप. त्याचप्रमाणें विषयाची रचना आणि विषय स्पष्ट आणि रमणीय व्हावा म्हणून लेखकानें वापरलेली भाषाशैली यांनाही स्वतंत्र असें अस्तित्व नाहीं. तींही लेखकाच्या व्यक्तिमत्त्वांत विलीन झालेलीं असतात. भाषाशैली हा लेखकाचा स्वतांचाच आविष्कार असें जें एका फ्रेंच[3] ग्रंथकारानें म्हटलें त्यालाही हाच अर्थ अभिप्रेत होता.

उत्कृष्ट आत्मचरित्र कलाकृति असल्यामुळें अशा चरित्रांत वरील विधानाची साक्ष आपल्याला पटते. चरित्रविषयाची आणि चरित्राच्या मांडणीची किंवा त्याच्या भाषाशैलीची वेगवेगळी प्रतीति होत नाहीं. लेखकाच्या व्यक्तिमत्त्वांतच तीं सर्व सामावलेलीं आढळून येतात. महाकवि मिल्टनसंबंधीं असें म्हणतात कीं, त्यानें लिहिलेल्या प्रत्येक ओळींत त्याच्या स्वतंत्र व्यक्तिमत्त्वाचें तेज दिसून येतें. कोणत्याही नामवंत लेखकाविषयीं आपल्याला हें विधान करतां येईल.

आत्मचरित्रलेखकाच्या व्यक्तिमत्त्वावरून त्यानें लिहिलेल्या चरित्रग्रंथाचें मूल्यमापन करतां येतें. ज्या मानानें लेखकाचें व्यक्तिमत्त्व तेजस्वी आणि प्रभावी असेल त्या मानानें त्यानें लिहिलेल्या ग्रंथाची थोरवी अधिक. काव्य, महाकाव्य, नाट्य, चरित्र, आत्मचरित्र इत्यादि वाङ्मय निर्माण करणाऱ्या व्यक्तींच्या गुणामुळेंच हें वाङ्मय वाचकाच्या हृदयाचा ठाव घेतें. आपल्याला तें इतकें आकर्षक वाटतें याचेंही कारण लेखकाचें व्यक्तिमत्त्वच. व्यक्तिमत्त्वाकडे लक्ष न देतां केवळ ग्रंथकर्त्याच्या कृतीचा अभ्यास करून त्या कृतीचें सौंदर्य आपल्याला अजमावितां येतें असें म्हणणारा एक पक्ष आहे. या लोकांचें म्हणणें अंशतः खरें असलें तरी ती अतिशयोक्तीच होय.

---

१ The subject is everything.

२ The treatment is everything.

३ The style is the man himself (Buffon).

## रा. ब. दादोबा पांडुरंग

लेखकाच्या मूळच्या प्रतिभेवर अनेकविध संस्कार झाले म्हणजे त्याच्या व्यक्तिमत्त्वाचा विकास होतो. आनुवंशिक प्रवृत्ति, स्वजनांचा आणि समवयस्क मित्रांचा सहवास, विद्यालयांत आणि महाविद्यालयांत मिळालेलें शिक्षण, स्वतांचें निरीक्षण, वाचन आणि मनन, विशेषतः समाजांत वावरत असतांना आलेले अनुभव, हीं सर्व व्यक्तिमत्त्वाच्या विकासाला उपकारक होतात. व्यक्तिमत्त्वाचा विकास झाला म्हणजे लेखक एका विशिष्ट दृष्टीनें जगाकडे पाहायला शिकतो. त्याच्या स्वतांच्या अशा तत्त्वज्ञानाची त्याला जाणीव होते. यामुळें त्यानें निर्माण केलेल्या कलाकृतींत एकाद्या आरशाप्रमाणें लेखकाच्या प्रतिभेचें, त्याच्या स्वभावविशेषांचें आणि वैयक्तिक तत्त्वज्ञानाचें निर्मल प्रतिबिंब आपल्याला पाहायला सांपडतें. लेखकाची कलाकृति ही त्याच्या व्यक्तिमत्त्वाचें प्रतिरूप होय. हें आपण मागें पाहिलेंच आहे.

आत्मवृत्तांत वाचकाला जो जिवंतपणाचा अनुभव येतो तो लेखकाच्या व्यक्तिगत गुणांमुळेंच. आत्मचरित्रकारानें परिमित का होईना, पण निर्मल सत्य आपल्यापुढें मांडलें आहे, स्वतांच्या आणि इतरांच्या गुणावगुणांचें आविष्करण करतांना त्यानें लपवालपवी किंवा अतिशयोक्ति केली नाहीं, त्याचप्रमाणें कुठेंही वायफळ आत्मस्तुतीला किंवा आत्मसमर्थनाला वाव दिला नाहीं, तसेंच लेखकाच्या मनोविश्लेषणांतील कौशल्याचा, चिकित्सकबुद्धीचा आणि न्यायनिष्ठुरतेचा आपल्याला जागोजाग प्रत्यय येतो आणि त्यानें आपल्या चरित्राची रचना आटपशीर, व्यवस्थित आणि टापटिपीनें केली आहे, अशी जेव्हां वाचकाची खात्री होते तेव्हां आत्मवृत्त लिहिणारानें आपली कामगिरी उत्कृष्ट रीतीनें बजावली असें त्याला म्हणतां येतें.

क्वचितच अशा तऱ्हेचें आत्मचरित्र आपल्याला वाचायला मिळतें, परंतु लेखकानें विशिष्ट हेतु मनांत धरून लिहिलेल्या आत्मचरित्राला यशोमंदिराची थोडीफार वाट चालतां येते. कारण विशिष्ट हेतु मनांत धरून लिहिलेल्या आत्मचरित्राला कलात्मकता लाभते. लेखकाच्या मनांतील या हेतूच्या मध्यबिंदूभोंवतीं आत्मचरित्राचें वर्तुळ फिरत राहातें आणि या हेतूमुळें आत्मचरित्राला सुसंगतता आणि सुसूत्रता येते. तरी पण हेंही खरें कीं, लेखकाच्या मनांत निश्चित हेतु असूनही पुष्कळ वेळां त्या हेतूशीं विसंगत असा मजकूर तो लिहीत जातो आणि मग त्याच्या आत्मचरित्राचा एक अवजड, ओबडधोबड आणि प्रचंड ग्रंथ होतो.

दुसरें एक असें कीं, आत्मचरित्रलेखकाच्या मनांतील हेतूच्या बरोबर आत्मचरित्राला आवश्यक अशा प्रांजलपणा, प्रामाणिकपणा वगैरे गुणांची अपेक्षा राहातेच. या गुणांपैकीं एकादा गुण ( उदाहरणार्थ कथा सांगण्याचें चातुर्य ) जरी ठळकपणें आत्मचरित्रांत दिसून आला तरी तें आत्मचरित्र वाचनीय होईल. मग ज्या आत्मचरित्रांत एकापेक्षां अधिक गुणांचा आविष्कार झाला असेल तें आत्मचरित्रपर लिखाण आकर्षक होईल हें सांगायला नकोच. इतर कांहीं असो वा नसो, लेखकाच्या व्यक्तिमत्त्वामुळें त्याचें आत्मचरित्र वाचकाच्या मनाची पकड घेतें ही गोष्ट आपण दृष्टिआड होऊं देतां कामा नये. मागें सांगितल्याप्रमाणें लेखकाचे गुण, स्वभावविशेष, अनुभव, वाचन, आणि मनन या सर्वांचा त्याच्या व्यक्तिमत्त्वांत समन्वय झालेला असतो. व्यक्तिमत्त्वाच्या या निकषानेंच वाङ्मयाचें मूल्यमापन आपल्याला करतां येतें.

दादोबा आपल्या आत्मचरित्रांत म्हणतात कीं, वेळोवेळीं स्वतांच्या मनांत आलेल्या विचारांचें टाचण करून ठेवावें. कारण पुढें हे विचार कोणा समर्थ पुरुषास कार्यप्रवृत्त करून त्याला लोककल्याणाचा मार्ग दाखवितील. आत्मचरित्र लिहिण्यांत त्यांचा हा हेतु होता. तथापि धार्मिक, सामाजिक आणि शिक्षणविषयक चळवळींचीही दादोबांना आवड असे. यामुळें त्यांच्या आत्मचरित्राचा विस्तार वाढला, तथापि तत्कालीन चळवळींच्या इतिहासांत लेखकाचें व्यक्तिमत्त्व लुप्त झालें नाहीं. दादोबांची तीव्र बुद्धि आणि अनेक भाषांवरचें प्रभुत्व, गुरुजनांविषयींचा त्यांचा आदर, मातापित्यांवरील भक्ति आणि स्वतांची पत्नी आणि मुलें यांवरील निस्सीम प्रेम, त्याचप्रमाणें त्यांचा विनय, समंजसपणा, कर्तव्यप्रीति आणि न्यायनिष्ठुरता या सर्वांचा दादोबांचें आत्मचरित्र वाचतांना आपल्याला प्रत्यय येतो.

बाबा पद्मनजींनीं आपलें आत्मचरित्र ( अरुणोदय ) स्वतांच्या मनांत घडून आलेल्या धार्मिक क्रांतीची हकीकत देण्याकरितां लिहिलें. ' अरुणोदय ' लिहिण्यांत हाच त्यांचा हेतु होता. ख्रिस्ती धर्माच्या श्रेष्ठत्वामुळें आपलीं पावलें ख्रिस्ताकडे कशीं ओढलीं गेलीं याचें अरुणोदयकारांना सविस्तर वर्णन करावयाचें होतें. याशिवाय बाबा पद्मनजींनीं आपल्या वेळीं प्रचलित असलेल्या धार्मिक आणि सामाजिक रूढींचें केलेलें वर्णन कोणाही वाचकास बोधप्रद वाटेल. बाबा पद्मनजींचीं मतें एकांगी आहेत असें जरी आपल्याला वाटलें तरी त्यांच्या प्रांजलपणामुळें

आणि आत्मविश्लेषणाची देणगी त्यांना असल्यामुळें 'अरुणोदय' वाचकाला पुन्हां पुन्हां वाचावासा वाटतो. आत्मविश्लेषण हा अरुणोदयाचा विशेष गुण होय.

विद्यार्थ्यांस, मुमुक्षूस आणि ध्येयनिष्ठ माणसास आपलें आत्मचरित्र स्फूर्तिप्रद व्हावें या हेतूनें श्री. पांगारकरांनीं आपला "चरित्रचंद्र" (चरित्रग्रंथाला दिलेलें नांव) लिहिला. पांगारकरांची सर्वत्र उफाळणारी धर्मभावना आणि आत्यंतिक कळकळ हे त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचे मुख्य गुण. त्यांचें लिहिणें आणि बोलणें दोन्ही सारखींच मोहक. संशोधक बुद्धि आणि अविश्रांत श्रम करण्याची हौस हेही गुण पांगारकरांच्या अंगीं होते. आत्मगौरवाचा त्यांना कंटाळा नाहीं. यामुळें चरित्रचंद्र वाचीत असतां "अमितगुणोऽपि पदार्थः दोषेणैकेन निन्दितो भवति" या जगन्नाथोक्तीची आठवण होते. श्री. माडखोलकरांच्या "दोन तपें" या आत्मचरित्राचाही येथेंच उल्लेख करणें योग्य होईल.

डॉ. कर्व्यांच्या आत्मवृत्तांत लेखकाच्या समाजकार्याचा विस्तृत वृत्तांत त्यांनीं दिला, तेव्हां साहजिकच आत्मवृत्ताचा आकार खूप वाढला. तरी पण कर्व्यांचें व्यक्तिमत्त्व या त्यांच्या समाजकार्याच्या हकीकतींत विलीन झालें असें आपण म्हणूं नये. कारण कर्व्यांची लीनता, साधेपणा, सभ्यता, सौजन्य, धैर्य, चिकाटी, होतां होईल तों समाजाशीं मिळतें घेऊन धीमे धीमे एकेक पाऊल पुढें टाकायची त्यांची तयारी या सर्व गुणांची आत्मवृत्त वाचीत असतां पदोपदीं आपल्याला प्रचीती येते. सीतारामपंत देवधरांनीं लिहिलेला जीवनवृत्तांत डॉ. कर्व्यांच्या आत्मचरित्रासारखाच आहे. या छोट्याशा पुस्तकांत देवधरांची समाजसुधारणेची तळमळ चांगल्या तऱ्हेनें व्यक्त झाली आहे.

हिवाळ्यांतील चंद्रप्रकाशांत दिसणारा मनोरम देखावा पाहाण्याचा अनुभव आपल्याला मिळावा या हेतूनें श्री. केळकरांनीं आपलें आत्मचरित्र (गतगोष्टी) लिहिलें. केळकरांच्या या आत्मचरित्रांत लेखकाच्या व्यक्तिमत्त्वाशीं जिव्हाळ्याचा संबंध नसलेल्या अनेक गोष्टींचा त्यांनीं समावेश केल्यानें हें आत्मचरित्र उगीचच वाढलें. मनोविनोदनाकरितां लिहिलेला ग्रंथ शेवटीं वेगळ्याच वळणावर गेला. तथापि केळकरांची भाषा ओघवती आणि सफाईदार असल्यामुळें त्यांचा चरित्रग्रंथ वाचायला घेतला कीं तो संपेपर्यंत खालीं ठेववत नाहीं. वर्तमानपत्रांत घडलेला लेखक साहित्य निर्माण करूं शकतो असें जें श्री. न. र. फाटक परवां म्हणाले त्याचें हें प्रत्यंतर होय.

# आत्मचरित्र, चरित्र आणि आठवणी

श्रीमती रमाबाई रानडे यांनीं आपल्या " आयुष्यांतील आठवणी " प्रथम मनोविनोदनाच्या हेतूनें सांगितल्या आणि नंतर त्यांनीं आपल्या " प्रिय कन्येच्या " आग्रहावरून त्या लिहून काढल्या. या आत्मचरित्राचा विषय जसा उदात्त तशी त्याची मांडणी निर्दोष, आणि भाषा तर विषयाशीं इतकी तद्रूप झालेली कीं कोणाला एक शब्द इकडचा तिकडे करतां येणार नाहीं. भावनांची कोमलता आणि ऋजुता, विचारांची उज्ज्वलता, त्याचप्रमाणें वर्णनाची कुशलता, सर्व कांहीं रमाबाईंच्या या आठवणींत आपल्याला आढळून येईल. येथें निसर्गाची सहजता तसाच कलेचा संयमही दिसून येतो. उत्कृष्ट कलाकृतीचा नमुना म्हणून या आत्मचरित्राचा निर्देश करतां येईल.

वाचक कोणच्याही दर्जाचा असो, रमाबाईंच्या व्यक्तिमत्त्वाची मोहिनी त्याच्या-वर पडणार नाहीं असें होणारच नाहीं. मनुष्यत्वाच्या एकाच पातळीवरून त्या वाचकाशीं बोलत असतात. एका आदर्श महिलेचें हें आत्मचरित्र वाचीत असतां आपल्या भावनांचें आणि विचारांचें मालिन्य धुऊन जातें. एकाद्या पवित्र मंदिरांत प्रवेश केल्यासारखा अनुभव आपल्याला येतो.

" आपणासारिखे करिती तात्काळ " ही न्यायमूर्ति रानड्यांची वृत्ति. ज्या ज्या माणसाशीं त्यांचा संबंध येई त्या त्या माणसाला ते अंतर्बाह्य सुवर्णमय करून टाकीत यांत नवल तें काय ? तेजोराशि सूर्य अस्तास जातो खरा, पण त्याचेंच तेज घेऊन आकाशांत तळपणारें चंद्रबिंब जगतावर अमृतवृष्टि करतें, तसेंच हें. " सागरः सागरोपमा " असें म्हणतात त्याप्रमाणें रमाबाईंचें आत्मचरित्र रमाबाईंच्या आत्म-चरित्रासारखें असें आपण म्हणूं या.

श्रीमती लक्ष्मीबाई टिळकांचीं स्मृतिचित्रें मराठींत लिहिलीं गेलीं हें महाराष्ट्र भाषेचें महद्भाग्य होय. आपल्या सुपुत्रानें हातीं घेतलेल्या पतीच्या चरित्राला साहाय्य करण्याच्या उद्देशानें लक्ष्मीबाईंनीं स्मृतिचित्रें लिहायला सुरवात केली, पण त्यांचा पुढें एक स्वतंत्र ग्रंथ झाला. प्रत्यक्ष नाहीं तरी अप्रत्यक्षपणें मनोविनोदनानेंच हें महत्कार्य घडवून आणलें. " मन रामीं रंगलें, अवघें मनचि राम झालें. " स्मृतिचित्रांचे चार भाग मिळून जवळजवळ पावणेसातशें पानांचा मजकूर छापून निघाला, आणि मग लक्ष्मीबाईंच्या चिरंजिवांनीं या चार भागांची एक संकलित आवृत्ति काढली. स्मृतिचित्रांची ही छोटी आवृत्ति मला फार आवडते.

## रा. ब. दादोबा पांडुरंग

लक्ष्मीबाईंच्या या आत्मचरित्राचा एकदम मनांत भरणारा विशेष म्हणजे त्यांत जागोजाग दिसून येणारा नाट्याचा आविष्कार. टिळकांना पैसा जवळ असला कीं तो कसा जाईल ह्याची काळजी, तर लक्ष्मीबाईंना पैसा राहील कसा ह्याची काळजी. टिळकांनीं कर्ज करावें आणि लक्ष्मीबाईंनीं तें फेडावें. टिळकांचा एखाद्या माणसावर विश्वास बसला कीं लक्ष्मीबाईंना त्या माणसाचा संशय यायचा. पतिपत्नींच्या या परस्परविरोधी स्वभावामुळें लक्ष्मीबाईंच्या आयुष्यांत समरप्रसंगांची रेलचेल असे, तथापि त्यांचा स्वभाव विनोदी आणि खेळकर, तेव्हां या पतिपत्नींच्या झगड्यांतील मौज वाचकाला लुटायला मिळते आणि अंतीं गोड तें सारेंच गोड या न्यायानें स्मृतिचित्रांत कुठें कडवटपणा येत नाहीं. अर्थात् पतिपत्नींमधील या द्वैताचें पुढें पुढें पूर्ण अद्वैतांत रूपांतर झालें आणि दोघेंही ख्रिस्ताची उदात्त शिकवण ध्यानांत ठेवून एकचित्तानें जनतेची पडेल ती सेवा करूं लागलीं.

लक्ष्मीबाईंच्या स्मृतिचित्रांचा विषय अगदीं साधा, एका मध्यम वर्गातील महिलेचें तें आत्मवृत्त. लक्ष्मीबाईंना, ज्याच्यामुळें आत्मचरित्र उठून दिसेल असें अभिजात कुलाचें, संपत्तीचें किंवा शिक्षणाचें, कशाचेंच साहाय्य नव्हतें. स्मृति-चित्रांत वर्णन केलेले प्रसंग वाचकाच्या नित्याच्या परिचयाचे, आणि आत्मचरित्राच्या कालक्रमानुसार केलेल्या मांडणींतही लक्ष्मीबाईंचा साधेपणा दिसून येतो. स्मृतिचित्रांची भाषा घरगुती. स्त्रियांच्या तोंडीं असते तशी. मधून मधून लक्ष्मीबाई म्हणींचा उपयोग करतात आणि टिळकांच्या (आणि इतर) काव्यांतील ओळी उद्धृत करतात. केव्हां केव्हां जलालपुराहून आमचा लक्ष्मीनारायणाचा जोडा निघाला अशा विनोदी उपमा वापरतात. वाचकाशीं त्या आपुलकीनें बोलतात, असाच आपल्याला सर्वत्र प्रत्यय येतो. प्रसाद हा स्मृतिचित्रांच्या भाषेचा मुख्य गुण. त्यांत कुठेंही कृत्रिमता किंवा भपकन् डोळे दिपवून टाकणारी शब्दांची संपत्ति किंवा अलंकारांची दीप्ति आढळून येणार नाहीं.

तरी पण लक्ष्मीबाईंच्या असाधारण व्यक्तिमत्त्वामुळें स्मृतिचित्रांचें असें एक पानही नाहीं कीं जें वाचकाला नीरस आणि कंटाळवाणें वाटेल. लक्ष्मीबाईंच्या या व्यक्तिमत्त्वाचें एक मुख्य अंग म्हणजे त्यांचा प्रेमळपणा. त्यांच्या स्वभावांत विलक्षण गोडवा आहे. स्मृतिचित्रें वाचीत असतां वाचकाला लेखिकेच्या स्वभावांतील हा गोडवा अनुभवायला सांपडतो. म्हणूनच स्मृतिचित्रांवर त्याचें लक्ष टिकून राहतें.

लक्ष्मीबाईंना त्यांच्या आयुष्यांत अनेक लहानमोठ्या संकटांना तोंड द्यावें लागलें, परंतु त्यांच्या जन्मजात गोड स्वभावावर त्याचा यत्किंचित् परिणाम झाला नाहीं. सर्वांशीं त्या खेळीमेळीनें वागत. यामुळें त्यांच्या आयुष्यांतील कोणताच प्रसंग विकोपाला गेला नाहीं. लक्ष्मीबाई सर्वांना हव्याशा वाटत, याचें कारण वर सांगितलेली त्यांची प्रेमळ वृत्ति हेंच होय.

स्वजनांवर आणि प्रत्यक्ष परिचय असलेल्या माणसांवर लक्ष्मीबाई प्रेम करीत असें नव्हे. त्यांच्या प्रेमळपणाला आणि वात्सल्याला मर्यादा नव्हत्या. मनुष्यमात्रावर त्यांचें निस्सीम प्रेम होतें. कोणच्याही प्रकारचा भेदभाव मनांत न आणतां एकंदर मानवजातीबद्दल आपुलकी वाटणें हा आत्मचरित्रकाराला आवश्यक असा गुण, पण तो विशेषतः आत्मचरित्र लिहिणारी महिला असली म्हणजे तिच्यांत आढळून येतो. लक्ष्मीबाईंच्यांत तो आहे हें सांगायला नकोच. त्यांनीं लिहिलेलीं हीं स्मृतिचित्रें वाचलीं म्हणजे (थोड्या निराळ्या अर्थानें का होईना पण) महिला ही मानवजातीची माता असें कां म्हणतात तें आपल्या ध्यानांत येतें.

अभिजात विनोदाची देणगी हें लक्ष्मीबाईंच्या व्यक्तिमत्त्वाचें दुसरें महत्त्वाचें अंग होय. विनोद हें कल्पनाशक्तीचें अपत्य असल्यामुळें विनोदी माणसाला इतरांच्या दोषांबरोबर स्वतांच्या दोषांची जाणीव असते. अशा माणसाला कोणच्याही व्यक्तीबद्दल आत्यंतिक द्वेषभाव वाटणार नाहीं. मी त्याच्या जागीं असतों तर तसाच मोहाला बळी पडलों असतों, कुणीं सांगावें, असा विचार करून विनोदी मनुष्य दुसऱ्याचे अपराध आपल्या पोटांत घालतो. लक्ष्मीबाईंचा असाच विशाल दृष्टिकोण होता. क्षमाशील, अनुकंपाप्रवण असा त्यांचा स्वभाव. प्रसंग कितीही कठीण असला तरी लक्ष्मीबाई त्याचें स्वागत करतांना हसत आणि दुसऱ्यालाही हसवीत. स्वतां ताक, कण्या, मीठ आणि बागेंतल्या मिरच्या यांवर निर्वाह करीत आणि टिळक आल्यानंतर त्यांच्यापुढें तेंच जेवण ठेवून त्यांनाही हसत हसत त्याचें स्वागत करायला लावीत.

विनोद ही वाङ्मयांतील किमया आहे. समुद्रतीरावरील वाळूवर सकाळचे सूर्याचे कोमल किरण पडले कीं ती वाळू सुवर्णकणांप्रमाणें शोभिवंत दिसूं लागते. स्मृतिचित्रांतील साध्या प्रसंगांचें लक्ष्मीबाईंनीं केलेलें विनोदी वर्णन वाचलें म्हणजे वरील सुवर्णकणांच्या उपमेची सार्थता आपल्याला पटते. स्मृतिचित्रांच्या बहुतेक

सर्व पानांवर विनोदाच्या या कोमल किरणांचें मृदु मंद तेज आपल्याला पाहायला सांपडतें.

लक्ष्मीबाईंची निःस्वार्थता हें त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचें तिसरें महत्त्वाचें अंग. सून, पत्नी आणि माता या तिन्ही भूमिका पार पाडतांना स्वतांचा विचार त्यांच्या मनांत कधीं आलाच नाहीं. निरंतर इतरांची सेवा करण्यांत त्या धन्यता मानीत. सासरा, पति, मुलें यांची गोष्ट तर राहूं द्याच, पण सर्व मनुजजातीची सेवा करण्यांत त्यांना आपल्या जीविताचें सार्थक झालें, असें वाटे.

लक्ष्मीबाईंची धर्मावरील अचल श्रद्धा हेंही त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचेंच अंग होय. आणि ही श्रद्धा निव्वळ बोलकी होती असें पण नव्हे. जे कोणी संसारांतील त्रिविध तापांनीं होरपळले असतील त्यांनीं माझ्याजवळ यावें—ही त्यांच्या प्रभूची शिकवण त्यांनीं आत्मसात् केली होती. आपल्या संकटांचा सर्व भार ईश्वरावर टाकून, अनाथ, अपंग, भुकेले, विवस्त्र, असे जे कोणी आपले बांधव असतील त्यांना मदत करायची लक्ष्मीबाईंची नेहमीं तयारी असे.

आतांपर्यंत केलेल्या विवेचनाचा निष्कर्ष म्हणून एवढें सांगितलें तरी पुरे कीं, लक्ष्मीबाईंचीं स्मृतिचित्रें ही त्यांनीं स्वतांच स्वतांची काढलेली हुबेहुब प्रतिमा होय. अशा तऱ्हेनें आत्मचरित्र लिहिणाऱ्या व्यक्तीचें समग्र दर्शन करून देणाऱ्या या ग्रंथाला कलाकृति म्हणावें कीं नाहीं प्रश्नच; कारण [१]'येथें निसर्गानेंच लक्ष्मीबाईंच्या हातांतली लेखणी घेऊन स्वतांच हें आत्मचरित्र लिहिलें, असें म्हटलें तर ती अतिशयोक्ति होणार नाहीं. स्मृतिचित्रांत लक्ष्मीबाई कितीतरी विनोदी गोष्टी सांगतात पण त्या सांगतांना त्या एक शब्द अधिकउणा वापरीत नाहींत. स्मृतिचित्रें वाचीत असतांना " स्त्रीणामशिक्षितपटुत्वं " याचाच सर्वत्र अनुभव येतो. या स्मृतिचित्रांच्या ग्रंथांत व्यवस्थितपणा, टापटीप वगैरे गुण आहेत. पण लक्ष्मीबाई कोणचीही गोष्ट जाणूनबुजून करतात असें आपल्याला म्हणतां येणार नाहीं. अंतःस्फूर्ति त्यांना जसें लिहायला सांगेल तसें त्या लिहितात " माळियें जेऊतें नेलें। तेऊतें निवांतचि गेलें। तया पाणिया ऐसें केलें। होआवेगा " ही ज्ञानेश्वरांची उपमा त्यांच्या लिखाणाला देणें उचित होईल.

---

१ वर्ड्स्वर्थच्या काव्यासंबंधीं आरनल्डनें प्रकट केलेला अभिप्राय.

लक्ष्मीबाईंच्या स्मृतिचित्रांच्या संदर्भांत लीलाताई पटवर्धनांच्या "आमचीं अकरा वर्षे" या आत्मचरित्राचा उल्लेख करायला हवा. या आत्मचरित्रांत लीलाताईंच्या छोट्याशा व्यक्तिमत्त्वाचें दर्शन आपल्याला घडतें. यामुळें हें चरित्र वाचनीय झालें आहे. कर्तव्यबुद्धीनें जरी त्यांनीं आत्मचरित्र लिहायला आरंभ केला तरी आपल्या वैवाहिक आयुष्यांतील आठवणी सांगतांना जणूं काय त्या कालांत त्या वावरत असल्यासारखी त्यांची स्थिति होते हें लीलाताईंच्या आत्मचरित्राच्या प्रकाशकाचें म्हणणें वाचकालाही पटतें.

मनाला करमणूक व्हावी या उद्देशानें कमलाबाई देशपांड्यांनीं आपलें आत्मचरित्र (स्मरणसांखळी) लिहिलें. आणि जेव्हां कमलाबाई मनोविनोदनाची वाट चालतात तेव्हां त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचें दर्शन आपल्याला घडतें, आणि स्मरणसांखळी हें पुस्तक वाचनीय आहे असें आपल्याला वाटतें. पण जेव्हां कमलाबाई वादाच्या आडरानांत शिरतात तेव्हां त्यांचा तोल त्यांना सांवरता येत नाहीं. आणि त्या आपली स्वतांची आत्यंतिक तरफदारी करूं लागतात. या त्यांच्या आत्मसमर्थनामुळें स्मरणसांखळीला चांगलेंच गालबोट लागलें आहे.

श्रीमती पार्वतीबाई आठवले यांनीं "माझी कहाणी" या नांवानें आपलें आत्मचरित्र प्रसिद्ध केलें. पार्वतीबाईंच्या भगिनी आनंदीबाई कर्वे यांनींही स्वतांचें चरित्र लिहून त्याला 'माझें पुराण' हें विनोदी नांव दिलें. आत्मचरित्रवाङ्मयांत या लहानशा आत्मचरित्राचा नंबर बराच वरतीं लागेल. आनंदीबाईंच्या 'पुराणांत' कोंकणांतील रूढ असलेल्या जुन्या रीतीरिवाजांचें वर्णन आलें आहे. तसेंच या आत्मचरित्रांत पूर्वीच्या काळच्या स्त्रियांच्या बोलण्यांत सहजासहजीं येणाऱ्या चटकदार म्हणी आपल्याला वाचायला मिळतात. कमालीचा प्रांजलपणा, आपल्याला जें वाटतें तें सरळ सांगून टाकायचें, हें या आत्मचरित्राचें आणखी एक आकर्षण. आनंदीबाई आपल्या मातुःश्रीसारख्याच कामसू आणि खरमरीत आहेत. लोकसेवेच्या व्रताचा पहिला धडा त्यांना आपल्या आईवडिलांकडून मिळाला. पुढें डॉ. कर्व्यांच्या सहवासांत या लोकसेवेच्या व्रताचा अधिकाधिक विकास झाला. पण त्यांतही आनंदीबाईंची पृथगात्मता दिसून येते. त्यांच्या आत्मचरित्राच्या संपादिकेनें (सौ. कावेरी कर्वे यांनीं) म्हटल्याप्रमाणें आनंदीबाई घाणेरड्या मुलांची, महारापोरांचीसुद्धां सेवा करीत. ज्यांना कोणीही जवळ करणार नाहीं अशा अनाथ मुलांच्या व

बायाबापड्यांच्या खुंटलेल्या जीवनाला त्यांनीं वाट फोडून देण्याचा प्रयत्न केला. कावेरीबाईच्या मतें एका अगदीं सामान्य व्यक्तीचें हें अगदीं सामान्य चरित्र असलें, तरी तें अमोल आहे. कारण आनंदीबाईंना मनुष्यमात्राबद्दल सहानुभूति वाटते आणि दरिद्री दुःखी जीवांचें पालनपोषण करणें हेंच आपलें जीवितकार्य अशी त्यांची समजूत. कावेरीबाईचें मत तेंच तुम्हांआम्हां वाचकवर्गाचें मत असें म्हणणें वस्तुस्थितीला धरूनच होईल.

तसेंच पाहिलें तर असामान्य व्यक्तींच्या आत्मचरित्रांपेक्षां सामान्य व्यक्तींच्या आत्मचरित्रांत आपलें मन जास्त रमतें. राजा, राणी, राजकारणकोविद मुत्सद्दी, युद्धकलाविशारद, सेनापति अथवा थोर कलावंत यांच्या आत्मचरित्रांत दिखाऊपणाचा भाग अधिक. त्यांचा नित्याचा कार्यक्रम अगदीं ठरीव सांच्याचा. अत्युच्च पातळीवर असणाऱ्या या व्यक्तींचें हंसणें, बोलणें, वागणें औपचारिक नियमांनीं जखडलेलें असतें. कोणतीच गोष्ट त्यांना मनमोकळेपणानें करतां येत नाहीं. यामुळें त्यांच्या व्यक्तिमत्त्वाच्या विकासाला पुरेसा वाव मिळत नाहीं. याच्या उलट सामान्य माणसाच्या व्यक्तिमत्त्वाचा सर्व बाजूंनीं विकास होतो म्हणून अशा व्यक्तींच्या आत्मचरित्रांत जें वैचित्र्य आपल्याला आढळून येतें तें इतरत्र कुठें दिसून येणार नाहीं. व्यक्ति तितक्या प्रकृति असें आपण म्हणतों. एकाचा चेहेरा दुसऱ्यासारखा नाहीं. त्याप्रमाणेंच एका सामान्य व्यक्तीचें आत्मचरित्र दुसऱ्या सामान्य व्यक्तीच्या आत्मचरित्राची निव्वळ नक्कल असणार नाहीं. तेव्हां बऱ्याच सामान्य व्यक्तींचीं आत्मचरित्रें जर आपल्याला उपलब्ध झालीं तर आपलेंही आत्मचरित्राचें वाङ्मय समृद्ध होईल. निरनिराळ्या व्यक्तींच्या अनुभवांची वाचकाला माहिती करून देणें हा आत्मचरित्राचा प्रधान उद्देश, तो सफळ व्हायचा म्हणजे पुष्कळशीं सामान्य व्यक्तींचीं आत्मचरित्रें लिहिलीं गेलीं पाहिजेत. आपल्याकडे नाहीं, पण पाश्चात्य वाङ्मयांत मात्र सामान्य माणसांचीं आत्मचरित्रें हवीं तितकीं सांपडतील. अर्थात् वरील विचारसरणी सर्वस्वी खरी आहे असें नाहीं तरी त्यांत बरेंच तथ्य आहे. यांत शंका नाहीं.

आहे त्या परिस्थितीतसुद्धां आपल्याला समाधानाला पुष्कळ जागा आहे. मराठींतील कांहीं आत्मचरित्रांचा आपण परामर्श घेतला. यांशिवाय आपापल्या परीनें चांगलीं अशीं आणखी कितीतरी आत्मचरित्रें आहेत. उदाहरणार्थ, श्रीमंत

पंतप्रतिनिधि, श्रीयुत ओंकार, श्री. ना. गो. चाफेकर, धर्मानंद कोसंबी, सावरकर या सर्वांनीं आपलीं आत्मचरित्रें लिहिलीं आहेत. श्रीयुत ना. गो. चाफेकर यांची जीवनकथा त्यांच्या श्रेष्ठ बुद्धिमत्तेचें प्रतीक होय. धर्मानंद कोसंबींनीं विद्यासंपादन करण्याकरितां अगणित हालअपेष्टा सोसल्या. अखेर त्यांना आपल्या अविचलित निश्चयाचें फळ मिळालें. ध्येयनिष्ठ माणसाला कोसंबींचें आत्मचरित्र ( निवेदन ) अनेक दृष्टींनीं बोधप्रद वाटेल. सावरकरांच्या माझी जन्मठेप या आत्मचरित्राची आपण प्रशंसा करूं तेवढी थोडीच; कारण या आत्मचरित्राच्या प्रत्येक पानावर त्यांच्या तेजस्वी व्यक्तिमत्त्वाचा प्रभाव आपल्याला दिसून येतो. परिस्थितीमुळें आजूबाजूला सर्वत्र भीषण अंधकार पसरला असला तरी अंतःकरणांत निरंतर तेवत असलेल्या ध्येयदीपाच्या प्रकाशानें त्या अंधकाराचा निरास करतां येतो हें " माझी जन्मठेप " या आत्मचरित्राचें सार होय. श्री. बनहट्टींनीं आत्मचरित्रांचा मेरुमणी असें " माझी जन्मठेप " या आत्मचरित्राचें वर्णन केलें तें एका दृष्टीनें यथार्थच होय.

जातां जातां श्री. ना. ग. गोरे यांच्या कारागृहाच्या भिंतीचा उल्लेख करणें अवश्य होय. श्री. गोरे यांना मनोविश्लेषणाची आवड आहे. आणि कारागृहांत मनोविश्लेषणाला मुबलक वेळ मिळतो. श्री. गोरे यांची भाषाही प्रासादिक. तेव्हां गोऱ्यांची ही कारागृहांतील आत्मचरित्रवजा दैनंदिनी वाचकाचें मन आपल्याकडे ओढून घेते यांत आश्चर्य काय ? श्रीमती विजयालक्ष्मी पंडित यांनीं " नैनीच्या तुरुंगांत " ही आपली छोटीशी आत्मचरित्रवजा दैनंदिनी नुक्तीच प्रसिद्ध केली. या दैनंदिनींतही वाचकाचें चित्त हरण करण्याचें सामर्थ्य आहे. मूळच्या इंग्रजीचें हें भाषांतर वाचतांना कुठेंही आपण भाषांतरित ग्रंथ वाचतों आहों असें आपल्याला वाटत नाहीं.

" कारागृहाच्या भिंती " आणि " नैनीच्या तुरुंगांत " या दोन्ही रोजनिशांना अपुरीं आत्मचरित्रें म्हणणें रास्त होईल. तसेंच म्हटलें तर दादोबा, बाबा पद्मनजी, रमाबाई रानडे, धर्मानंद कोसंबी आणि सावरकर यांचींही आत्मचरित्रें अपुरींच आहेत. अपुरेपणा हा महत्त्वाचा मुद्दा नव्हे. आत्मचरित्राचा एकादा भाग किंवा एकादें प्रकरण वाचूनसुद्धां आपलें पुरेपुर समाधान होईल. लेखकलेखिकेच्या व्यक्तिमत्त्वानें तें प्रकरण उजळलेलें असलें म्हणजे झालें.

सज्जन, सच्छील, उद्योगप्रिय, धनवान्, कीर्तिमान् ग्रंथकार, डॉक्टर, वकील,

धर्मवीर आणि राजकीय किंवा सामाजिक क्रांतिकारक यांनींच आपलीं चरित्रें लिहावीं असा दंडक नाहीं. सैन्यांतील सामान्य शिपाई, रोजचें वेतन घेऊन काम करणारा मजूर, एवढेंच काय, पण भिक्षा मागणाऱ्यांनीं आणि सराईत गुन्हेगारांनीं आपलीं आत्मचरित्रें लिहून तीं प्रसिद्ध केलीं तर तींही आपलें मन वेधून घेतील. कांहीं दिवसांपूर्वी मीं एक आत्मचरित्रावरील [1]ग्रंथ वाचला. त्यांत अशा प्रकारच्या आत्मचरित्रपर ग्रंथांची चांगली चिकित्सा केलेली मला आढळली. या ग्रंथकाराचें म्हणणें असें कीं, चिखलांतून वर डोकें काढणाऱ्या कमळाच्या फुलाचें आपण कौतुक करतों, त्याच न्यायानें मजुरांच्या, भिकेकऱ्यांच्या आणि गुन्हेगारांच्या आत्मचरित्रांत व्यक्तिमत्त्वाचा फुलोरा आपल्याला दिसला म्हणजे त्याचें आपल्याला भुरळ पडते.

पाश्चात्य वाङ्मयांत सामाजिक दृष्टीनें अगदीं खालच्या पातळीवर असलेल्या लोकांचीं बरींच आत्मचरित्रें प्रसिद्ध झालीं आहेत. आपल्याकडे अजून ही प्रथा पडलेली नाहीं. आज नाहीं उद्यां आपणसुद्धां या मर्यादेपर्यंत पोंचूं. "आगे बढो" हें आपलें ब्रीदवाक्य असणें इष्ट.

मनुष्यासारखा मनुष्य मग तो कोणीही असो – त्यानें लिहिलेल्या आत्मचरित्रा-विषयीं आपल्याला कुतूहल वाटायला हवें. उच्चनीचांचा विचार न करतां मनुष्यत्वाच्या एका पातळीवरून जगाकडे पाहाण्याची दृष्टि आपल्याला यायला पाहिजे. दुसऱ्या व्यक्तींच्या अंतरंगांतही सद्वृत्तांचा वाहाता झरा असतो. पण आपण त्याचा थांग लावूं तेव्हां तो सांपडेल. सुष्ट आणि दुष्ट, सद्वृत्त आणि दुर्वृत्त, उदासीन आणि आनंदी अशा नानाविध प्रकृतीच्या स्त्रीपुरुषांनीं गजबजलेल्या मानवी सृष्टीला आपण जग हें नांव देतों. जगांतील कोणत्याही व्यक्तीबद्दल आपल्याला अनास्था तिरस्कार किंवा द्वेष वाटतां नये. उत्तम आणि अधम, धनवान् आणि धनहीन, रोगी आणि निरोगी या द्वंद्वापलीकडे असलेल्या केवळ मनुष्यत्वावर लक्ष ठेवून ख्यातनाम रसिक वाङ्मयाचा आस्वाद घेतात. शेक्सपिअरनें इआगोचें नितांत खुनशीपणाचें स्वभावचित्र रंगविलें, किंवा चॉसरनें एखाद्या बोलघेवड्या, पांच पतींची बायको असून त्याच्या

१ Inside Out. An Introduction to Autobiography by E. Stuart Bates.

२ There is some soul of goodness in things evil, –Shakespeare.

३ It takes all sorts to make this world.

पत्नीची शांतपणें अपेक्षा करणाऱ्या जहांबाज पत्नीचें स्वभावदर्शन घडविलें म्हणून शेक्सपिअर आणि चॉसर या कविवरांना—ते दोष देणार नाहींत. आपणही वाङ्मयाचा अभ्यास करतांना अशी विशाल दृष्टि ठेवणें योग्य. एकाद्या गिरणींतील कामगारानें किंवा घणावर हातोडी मारणाऱ्या लोहारानें, नाहींतर एकाद्या गुन्हेगारानें लिहिलेल्या आत्मचरित्राबद्दल आपण औत्सुक्य दाखवूं तेव्हां आपल्या रसिकतेला रसिकता हें नांव शोभेल.

आत्मचरित्र आणि चरित्र हीं जुळीं भावंडें. तथापि जुळ्या भावंडांतही सहज लक्षांत येणारा फरक केव्हां केव्हां दिसून येतो. तसाच फरक आत्मचरित्र आणि चरित्र यांतही आपल्याला आढळून येईल.

चरित्रकाराची चरित्रविषयक व्यक्तीशीं ओळख असली तर उत्तमच; (आणि तशी ती अनेक वेळां असतेही) तथापि ओळख असली काय आणि नसली काय, चरित्रकाराला स्वतांच्या संकल्पित चरित्राची सामग्री गोळा करावी लागते. ज्या व्यक्तीचें चरित्र लिहावयाचें त्यानें ठरविलें असेल त्या व्यक्तीचीं पत्रें, टिपणें आणि रोजनिशा, तशीच त्या व्यक्तींच्या नातेवाइकांनीं दिलेली माहिती आणि मित्र-मंडळींच्या मुलाखती, अभिप्राय इत्यादि चरित्रग्रंथाचें साहित्य एकत्रित करतांना चरित्रकाराला अतोनात श्रम करणें भाग पडतें. त्यांतून हें चरित्र जर एकाद्या राजकीय, सामाजिक, किंवा वाङ्मयीन क्षेत्रांत कीर्ति संपादन केलेल्या थोर व्यक्तीचें असेल तर चरित्रकाराला आपल्या चरित्रनायकाच्या राजकीय, सामाजिक आणि वाङ्मयीन इतिहासाचा परिचय करून घ्यावा लागतो. इतकें करूनही चरित्रविषयक व्यक्तीच्या अंतरंगाची ओळख पटली असें त्याला निश्चितपणें सांगतां येत नाहीं. दुसऱ्याचें मन म्हणजे अंधकारानें दाटलेलें अरण्य होय अशी एक म्हण आहे. चरित्रकाराला या म्हणीचा पावलोंपावलीं प्रत्यय येतो. या मानानें आत्मचरित्रकाराची स्थिति बरी; कारण त्याला आपल्या चरित्राच्या साहित्याची जुळवाजुळव करतांना इतकी यातायात करावी लागत नाहीं. त्याचप्रमाणें आत्म-चरित्रकाराच्या मनानें किंवा स्मरणशक्तीनें त्याची कितीही फसवणूक केली तरी त्याला आपल्या अंतरंगाचें थोडेंफार आकलन करतां येतें.

आत्मचरित्रकाराला स्वतांविषयींचें सत्य सांगायचें असतें. "जसें घडलें तसें सांगितलें" हें त्याचें ध्येयवाक्य. आपल्या गुणांचा त्यानें निर्देश केला तसेंच

१ Another's mind is a dark forest.

बायाबापड्यांच्या खुंटलेल्या जीवनाला त्यांनीं वाट फोडून देण्याचा प्रयत्न केला. कावेरीबाईच्या मतें एका अगदीं सामान्य व्यक्तीचें हें अगदीं सामान्य चरित्र असलें, तरी तें अमोल आहे. कारण आनंदीबाईंना मनुष्यमात्राबद्दल सहानुभूति वाटते आणि दरिद्री दुःखी जीवांचें पालनपोषण करणें हेंच आपलें जीवितकार्य अशी त्यांची समजूत. कावेरीबाईचें मत तेंच तुम्हांआम्हां वाचकवर्गाचें मत असें म्हणणें वस्तुस्थितीला धरूनच होईल.

तसेंच पाहिलें तर असामान्य व्यक्तींच्या आत्मचरित्रांपेक्षां सामान्य व्यक्तींच्या आत्मचरित्रांत आपलें मन जास्त रमतें. राजा, राणी, राजकारणकोविद मुत्सद्दी, युद्धकलाविशारद, सेनापति अथवा थोर कलावंत यांच्या आत्मचरित्रांत दिखाऊ-पणाचा भाग अधिक. त्यांचा नित्याचा कार्यक्रम अगदीं ठरीव सांच्याचा. अत्युच्च पातळीवर असणाऱ्या या व्यक्तींचें हंसणें, बोलणें, वागणें औपचारिक नियमांनी जखडलेलें असतें. कोणतीच गोष्ट त्यांना मनमोकळेपणानें करतां येत नाहीं. यामुळे त्यांच्या व्यक्तिमत्त्वाच्या विकासाला पुरेसा वाव मिळत नाहीं. याच्या उलट सामान्य माणसाच्या व्यक्तिमत्त्वाचा सर्व बाजूंनीं विकास होतो म्हणून अशा व्यक्तींच्या आत्मचरित्रांत जें वैचित्र्य आपल्याला आढळून येतें तें इतरत्र कुठें दिसून येणार नाहीं. व्यक्ति तितक्या प्रकृति असें आपण म्हणतों. एकाचा चेहेरा दुसऱ्यासारखा नाहीं. त्याप्रमाणेंच एका सामान्य व्यक्तीचें आत्मचरित्र दुसऱ्या सामान्य व्यक्तीच्या आत्मचरित्राची निव्वळ नक्कल असणार नाहीं. तेव्हां बऱ्याच सामान्य व्यक्तींचीं आत्मचरित्रें जर आपल्याला उपलब्ध झालीं तर आपलेंही आत्मचरित्राचें वाङ्मय समृद्ध होईल. निरनिराळ्या व्यक्तींच्या अनुभवांची वाचकाला माहिती करून देणें हा आत्मचरित्राचा प्रधान उद्देश, तो सफल व्हायचा म्हणजे पुष्कळशी सामान्य व्यक्तींचीं आत्मचरित्रें लिहिलीं गेलीं पाहिजेत. आपल्याकडे नाहीं, पण पाश्चात्य वाङ्मयांत मात्र सामान्य माणसांचीं आत्मचरित्रें हवीं तितकीं सांपडतील. अर्थात् वरील विचारसरणी सर्वस्वी खरी आहे असें नाहीं तरी त्यांत बरेंच तथ्य आहे यांत शंका नाहीं.

आहे त्या परिस्थितींतसुद्धां आपल्याला समाधानाला पुष्कळ जागा आहे. मराठींतील कांहीं आत्मचरित्रांचा आपण परामर्श घेतला. यांशिवाय आपापल्या परीनें चांगलीं अशीं आणखी कितीतरी आत्मचरित्रें आहेत. उदाहरणार्थ, श्रीमंत

पंतप्रतिनिधि, श्रीयुत ओंकार, श्री. ना. गो. चाफेकर, धर्मानंद कोसंबी, सावरकर या सर्वांनीं आपलीं आत्मचरित्रें लिहिलीं आहेत. श्रीयुत ना. गो. चाफेकर यांची जीवनकथा त्यांच्या श्रेष्ठ बुद्धिमत्तेचें प्रतीक होय. धर्मानंद कोसंबींनीं विद्यासंपादन करण्याकरितां अगणित हालअपेष्टा सोसल्या. अखेर त्यांना आपल्या अविचलित निश्चयाचें फळ मिळालें. ध्येयनिष्ठ माणसाला कोसंबींचें आत्मचरित्र (निवेदन) अनेक दृष्टींनीं बोधप्रद वाटेल. सावरकरांच्या माझी जन्मठेप या आत्मचरित्राची आपण प्रशंसा करूं तेवढी थोडीच; कारण या आत्मचरित्राच्या प्रत्येक पानावर त्यांच्या तेजस्वी व्यक्तिमत्त्वाचा प्रभाव आपल्याला दिसून येतो. परिस्थितीमुळें आजूबाजूला सर्वत्र भीषण अंधकार पसरला असला तरी अंतःकरणांत निरंतर तेवत असलेल्या ध्येयदीपाच्या प्रकाशानें त्या अंधकाराचा निरास करतां येतो हें " माझी जन्मठेप " या आत्मचरित्राचें सार होय. श्री. बनहट्टींनीं आत्मचरित्रांचा मेरुमणी असें " माझी जन्मठेप " या आत्मचरित्राचें वर्णन केलें तें एका दृष्टीनें यथार्थच होय.

जातां जातां श्री. ना. ग. गोरे यांच्या कारागृहाच्या भिंतीचा उल्लेख करणें अवश्य होय. श्री. गोरे यांना मनोविश्लेषणाची आवड आहे. आणि कारागृहांत मनोविश्लेषणाला मुबलक वेळ मिळतो. श्री. गोरे यांची भाषाही प्रासादिक. तेव्हां गोऱ्यांची ही कारागृहांतील आत्मचरित्रवजा दैनंदिनी वाचकाचें मन आपल्याकडे ओढून घेते यांत आश्चर्य काय? श्रीमती विजयालक्ष्मी पंडित यांनीं " नैनीच्या तुरुंगांत " ही आपली छोटीशी आत्मचरित्रवजा दैनंदिनी नुकतीच प्रसिद्ध केली. या दैनंदिनींतही वाचकाचें चित्त हरण करण्याचें सामर्थ्य आहे. मूळच्या इंग्रजीचें हें भाषांतर वाचतांना कुठेंही आपण भाषांतरित ग्रंथ वाचतों आहों असें आपल्याला वाटत नाहीं.

" कारागृहाच्या भिंती " आणि " नैनीच्या तुरुंगांत " या दोन्ही रोजनिशांना अपुरीं आत्मचरित्रें म्हणणें रास्त होईल. तसेंच म्हटलें तर दादोबा, बाबा पदमनजी, रमाबाई रानडे, धर्मानंद कोसंबी आणि सावरकर यांचींही आत्मचरित्रें अपुरींच आहेत. अपुरेपणा हा महत्त्वाचा मुद्दा नव्हे. आत्मचरित्राचा एखादा भाग किंवा एखादें प्रकरण वाचूनसुद्धां आपलें पुरेपुर समाधान होईल. लेखकलेखिकेच्या व्यक्तिमत्त्वानें तें प्रकरण उजळलेलें असलें म्हणजे झालें.

सज्जन, सच्छील, उद्योगप्रिय, धनवान्, कीर्तिमान् ग्रंथकार, डॉक्टर, वकील,

दोषांचेंही यथातथ्य वर्णन केलें, अशी जेव्हां वाचकाची खात्री होते तेव्हां तो आत्मचरित्रकाराला त्याच्या सत्यप्रियतेबद्दल शाबासकी देतो.

चरित्रकारानेंसुद्धां ही सत्याची वाट सोडतां कामा नये. ज्या श्रेष्ठ व्यक्तींचीं चरित्रें लिहिलीं जातात त्या व्यक्ति आपल्या चरित्रकारांना " सत्यं वद, सत्यं वद " असें आर्जवून सांगतात. या बाबतींत एका सुविख्यात [1]सेनाधिकाऱ्याच्या उक्तीची कोणाला आठवण करून द्यायला नको. कविवर्य टिळकांनीं आपल्या चिरंजिवांना बजावून सांगितलें कीं, माझें चरित्र घडलें तसें लिहा. सामान्य जनतेचा वाचस्पति म्हणून ज्याची कीर्ति अशा [2]एका अमेरिकन कवीचाही हाच आग्रह होता. माझें चरित्र लिहिते वेळीं माझ्या दोषांकडे मुळींच दुर्लक्ष करूं नका असेंच तो आपल्या चरित्रकारांना सांगे. डॉ. जॉन्सन् ही महनीय व्यक्ति खरी, पण तुमच्याआमच्या-सारख्या साध्या माणसांत जे दोष असतात ते जॉन्सनमध्येंही आढळून येतील. उत्कृष्ट चरित्रांत छाया आणि प्रकाश एकत्र वस्ती करून राहातात. [3]डॉ. जॉन्सनच्या चरित्रकाराचें हें मत सर्वांना मान्य होण्यासारखेंच आहे. याचा अर्थ असा कीं, चरित्रविषयक व्यक्ति असामान्य असली तरी सामान्य माणसांच्या दोषांपासून ती अलिप्त राहूं शकत नाहीं. ही गोष्ट वाचकाच्या ध्यानांत आली म्हणजे त्याला असामान्य व्यक्तींच्या चरित्राबद्दल आत्मीयता वाटायला लागते. दिवसानुदिवस त्याची चरित्रवाचनाची गोडी वाढत जाते.

चरित्रकारांत प्रांजळपणा, प्रामाणिकपणा, मनोविश्लेषणाचें कौशल्य इत्यादि गुण असले म्हणजे त्याचें चरित्रकथनाचें कार्य यशस्वी होतें. दोन्ही चरित्रांत आणि आत्मचरित्रांत असलेलें साम्य विशद करून सांगण्याची आवश्यकता नाहीं. आत्मचरित्रकाराप्रमाणेंच चरित्रकारापासूनही आपण याच गुणांची अपेक्षा करतों.

चरित्रविषयक व्यक्ति देवमूर्ति नव्हे. पुण्यश्लोकांच्या वेडेपणांत आणि चाळ्यांत मानुषत्वामुळेंच असा जो लघिमा त्याची आपल्याला मनोरंजक प्रचीति येते. ही जाणीव मनांत ठेवून चरित्रकारानें चरित्रनायकाचे दोष दाखवितांना संकोच करूं नये. मनमोकळेपणानें, सहानुभूतिपूर्ण अशा पद्धतीनें दोषांचें आविष्करण

१ Cromwell.
२ Whitman.
३ Boswell.

केलें तर तें कोणालाही क्लेशकर वाटणार नाहीं. आत्मचरित्रकाराप्रमाणें चरित्रकारालासुद्धां सौजन्याच्या, सभ्यपणाच्या आणि समंजसपणाच्या मर्यादा संभाळाव्या लागतात. उगाच कोणाच्या भावना दुखवल्या जातील असें तो कांहीं लिहीत नाहीं, आणि आत्मचरित्रकाराप्रमाणेंच चरित्रकारालाही विवस्त्र सत्याचें वावडें असतें.

थोर लोकांचीं चरित्रें लिहून नव्या पिढीला नैतिक शिक्षण द्यावें असा हेतु मनांत वागवून लेखक पूर्वी चरित्रें लिहीत. चरित्रविषयक व्यक्तीच्या ठिकाणीं नसलेल्या गुणांचा तिच्यावर आरोप करून हे पूर्वीचे चरित्रकार चरित्रनायक निर्दोष, निर्व्यंग, सर्वगुणसंपन्न होता असा वाचकाचा ग्रह करून देत. त्यांच्या अतिरंजित वर्णनाला मर्यादा म्हणून नसत आणि सत्याचीही त्यांना पर्वा वाटत नसे. अशा प्रकारचीं चरित्रें भूमितलावर अवतरलेल्या देवांचें किंवा साधुपुरुषांचें गुणसंकीर्तन होय. या चरित्रांतील व्यक्तींना नाना वस्त्राभरणांनीं सजविलेल्या बाहुल्यांची उपमा शोभेल. हीं मानवांचीं चरित्रें, पण मनुष्याचें मनुष्यपण त्यांत कुठें शोधूनही सांपडणार नाहीं आणि जिवंतपणाचा गुणही त्यांत आढळणार नाहीं.

अर्वाचीन चरित्रकाराला सत्याची आणि वास्तवतेची ओळख असल्यामुळें अतिरंजित वर्णनाला त्याच्या लिखाणांत वाव मिळत नाहीं. नीतीचीं बंधनें तो पायाखालीं तुडवीत नाहीं, तरी पण अतिशयोक्ति करून नीतीची जोपासना करतां येईल हेंही त्याला पटत नाहीं. चरित्रविषयक व्यक्तीचें वाचकाला हुबेहुब दर्शन करून देणें हें चरित्रकाराचें मुख्य उद्दिष्ट याची त्याला जाणीव असल्यामुळें चरित्रविषयक व्यक्तीच्या गुणांबरोबरच त्या व्यक्तीच्या दोषांचें तो निर्भयपणें विवेचन करतो. स्वभावदर्शनाला व्यक्तीच्या चरित्रांतील महत्त्वाच्या घटनांपेक्षां वरवर क्षुल्लक दिसणाऱ्या बाबींचा जास्त उपयोग होतो, म्हणून यशस्वी चरित्रकार या क्षुल्लक बाबींची उपेक्षा करीत नाहीं. प्रत्येक व्यक्तीचें स्वतांचें वैशिष्टय म्हणून कांहींतरी असतें. कोणाची चालण्याची, तर कोणाची बोलण्याची आणि हंसण्याची एक निराळीच तऱ्हा – लकब – असते. चरित्रकारानें चरित्रनायकाच्या या वैशिष्टयांचें – लकबींचें–योग्य वेळीं आणि चटकदार पद्धतीनें वर्णन केलें म्हणजे ती व्यक्ति जणू काय आपल्या डोळ्यांसमोर उभी आहे असें आपल्याला वाटतें.

अशा तऱ्हेनें वाचकाला चरित्रविषयक व्यक्तीचें हुबेहुब दर्शन करून दिलें कीं चरित्रकारानें आपली कामगिरी चोख बजावली असें म्हणायला हरकत नाहीं. या

हुबेहुब दर्शनांत वाचकाला केवळ बाह्यांगांचीच माहिती मिळते असें नव्हे. चरित्रनायकाच्या व्यक्तिमत्त्वाचीही त्याला स्पष्ट कल्पना येते. चरित्रनायकाचें हें व्यक्तिमत्त्व वाचकाच्या गळीं उतरवीत असतां लेखकाचें — म्हणजे चरित्रकाराचें — स्वतांचें व्यक्तिमत्त्वही चरित्रांत प्रकट होतें.

उत्कृष्ट चरित्रांत चरित्रनायकाच्या आणि चरित्रलेखकाच्या अशा द्विविध व्यक्तिमत्त्वाचें दर्शन आपल्याला घडतें. डॉ. जॉन्सन्‌सारखा चरित्रकार असला तर त्याच्या दुर्दम्य व्यक्तिमत्त्वाचा चरित्रविषयक व्यक्तीला जाच होतो. अलीकडे विशेष प्रसिद्धि पावलेल्या एका इंग्लिश चरित्रकारासंबंधींही आपल्याला हेंच म्हणतां येईल. त्याचें स्वतांचें व्यक्तिमत्त्व इतकें प्रभावी आहे कीं, त्यामुळें त्यानें लिहिलेल्या चरित्रांत चरित्रविषयक व्यक्तीचा कोंडमारा होतो.

या चरित्रकारानें डॉ. जॉन्सननें अनुसरण केलें. त्यानें मोठीं चरित्रें लिहिलीं पण कोणाही चरित्रनायकाचे देव्हारे माजवून त्याचें नुसतें गुणसंकीर्तन केलें नाहीं. चरित्रविषयक व्यक्तीचें मनुष्यत्व वाचकांना पटवून देणें हें चरित्रलेखकाचें मुख्य उद्दिष्ट अशी त्याची कल्पना. यामुळें त्याच्या चरित्रविषयक लिखाणांत वाचकांना जिवंतपणाचा अनुभव येतो. याशिवाय उपरोक्त लेखकानें प्रबंधवजा लहान लहान चरित्रें लिहून चरित्रलेखन ही एक कला आहे या मूलभूत तत्त्वाची आपल्या समकालीनांना आठवण करून दिली. अनेक दृष्टींनीं या चरित्रलेखकाला आदर्श-चरित्रकार असें म्हणावें लागेल. तथापि या चरित्रकाराचा एक मोठा दोष म्हणजे त्याला चरित्रविषयक व्यक्तीबद्दल विशेषसा आदर किंवा सहानुभूति वाटत नाहीं. त्यानें लिहिलेल्या चरित्रग्रंथांत उपरोधाचें ज्वलंत शस्त्र वापरून चरित्रनायकाची हुर्रेवडी करण्याची प्रवृत्ति सर्वत्र दिसून येते आणि हा दोष " एको हि दोषो गुणसन्निपाते निमज्जति " अशा दोषांपैकीं नव्हे. चरित्रविषयक व्यक्तीबद्दल मनांत आदर आणि सहानुभूति ठेवून सर्वोत्कृष्ट चरित्रग्रंथ लिहितां येतो हें जॉन्सनच्या चरित्रकारानें दाखवून दिलेंच आहे. या बाबतींत साक्षी पटविणारें आंद्रे मोरो या फ्रेंच रसिकाचें दुसरें उदाहरण देतां येईल.

---

१ Lytton Strachey.
२ Eminent Victorians.
३ Andre Maurois; Life of Shelly; Life of Disraeli.

आपल्याकडेही लक्ष्मण कृष्ण चिपळूणकर यांचें विष्णुशास्त्र्यांचें चरित्र, श्रीयुत पारसनीस यांचें झांशीच्या महाराणी लक्ष्मीबाईचें चरित्र, श्रीयुत पांगारकरांचें मोरोपंत चरित्र आणि काव्यविवेचन वगैरे कांहीं चरित्रग्रंथ झाले आहेत. श्रीयुत नरहर रघुनाथ फाटक यांनीं लिहिलेलें न्यायमूर्ति रानड्यांचें चरित्र हा मराठींतील एक उत्कृष्ट चरित्रग्रन्थ असें म्हणायला हरकत नाहीं. तथापि चरित्रग्रंथांचा उच्चांक आपल्याला अजून गांठावयाचा आहे. श्री. केळकरांचें टिळकचरित्र हें उच्चांकाच्या दृष्टीनें निकृष्टच ठरतें. पूर्वीच्या काळीं मराठींत लिहिलेलीं चरित्रें निव्वळ स्तुतिपाठ होत हें न सांगतांही आपल्याला समजण्यासारखें आहे.

आत्मचरित्राप्रमाणें चरित्रग्रंथही पण कलाकृतिच. रचनेचें कौशल्य त्यांत पाहिजे ही आपली चरित्रासंबंधींची पहिली अपेक्षा. आरंभ, मध्य, शेवट वगैरे चरित्राच्या निरनिराळ्या अंगांची नीट जुळवाजुळव करून व्यवस्थितपणें आणि टापटिपीनें चरित्र लिहिलें म्हणजे तें सुबक दिसतें. कलाकृति म्हटली कीं लेखकानें संयमाच्या मर्यादा पाळायला हव्यात. निरर्थक फापटपसारा आणि पाल्हाळ होणार नाहीं याविषयीं त्यानें निरंतर जागरूक राहिलें पाहिजे. कलात्मक पद्धतीनें लिहिलेलें चरित्र आटोपशीर आणि सुटसुटीत असतें म्हणून कलात्मक चरित्राकडे वाचकाचें लक्ष एकदम वेधलें जातें.

चरित्रांत आणि आत्मचरित्रांत इतर अनेक बाबतींत जसा फरक नाहीं तसा याही बाबतींत विशेषसा फरक आढळून येणार नाहीं. आत्मचरित्रांतील एक विशेष मात्र चरित्रग्रंथांत सांपडणार नाहीं. आत्मचरित्र ज्या आपुलकीच्या भावनेनें — जणूं कांहीं आपल्या प्रियमित्राजवळ आपण आपलें हृद्गत सांगतों आहों या भावनेनें — लिहिलें जातें, ती आपुलकीची—जवळीकीची भावना चरित्रग्रंथांत सांपडणार नाहीं. कांचेंतून पाहिलेल्या वस्तु अंधुक अंधुक दिसतात असा एक इंग्लिशमध्यें वाक्प्रचार आहे. चरित्रग्रंथाची तीच स्थिति. चरित्रांत व्यक्तींचें, प्रसंगांचें आणि घटनांचें जें दर्शन आपल्याला घडतें तें अंधुकअंधुक, अस्पष्ट आणि थोडेंफार परकीं वाटतें. हृदयाशीं हृदय भिडत नाहीं असें म्हटलें तरी चालेल. प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष निवेदन-पद्धतींत जो फरक तोच आत्मचरित्र आणि चरित्र या दोन वाङ्मयप्रकारांत.

एखाद्या व्यक्तीच्या आयुष्यांतील आठवणींचा संग्रह हा आत्मचरित्राचा एक

१ Look at things as through a glass darkly.

प्रकार. आपल्या आयुष्यांत कांहीं क्षण—दिवस म्हणा—विशेष संस्मरणीय असे आपल्याला वाटतात. हे संस्मरणीय क्षण म्हणजे एकाद्या व्यक्तीच्या आयुष्यांतील निरनिराळे टप्पे असतात. क्वचित् प्रसंगीं एकाद्या सन्माननीय सत्पुरुषाची आपली भेट होते. या सत्पुरुषाशीं झालेलें संभाषण आपल्या मनांत कायमचें टिकून राहातें. एकादे वेळीं जगद्वंद्य अशा भगवद्गीतेसारख्या ग्रंथांतील कांहीं वचनांचा आपल्या मनावर चिरकालिक परिणाम होतो. हीं वचनें वाचून आपल्या आयुष्याला निराळेंच वळण लागतें. त्याप्रमाणेंच आपल्या आयुष्यांत असा एकादा क्षण असतो कीं, त्यांत जणूं काय आपल्या पूर्वीच्या आयुष्याचें सारच सांठविलें आहे असें आपल्याला वाटतें. हे विद्युल्लतेच्या तरलप्रभेसारखे आपल्या आयुष्यांतील संस्मरणीय क्षण एकत्र करून, त्यांची व्यवस्थित मांडणी करून, जर आपण आपल्या आठवणींचा ग्रंथ प्रसिद्ध केला तर तो मनोवेधक होईल इतकेंच नव्हे तर अनेक वाचक त्या ग्रंथाचा मार्गदर्शिकेसारखा उपयोग करतील. आपल्या स्वतांच्या आठवणी आपण ग्रंथरूपानें छापतों त्याप्रमाणेंच इतरांच्या आपल्या आठवणीही आपल्याला स्वतंत्रपणें छापतां येतात. खरें [1]म्हटलें तर पुष्कळ लेखक आठवणींचा ग्रंथ म्हणजे आत्मचरित्र असेंच समजतात.

आतांपर्यंत तरी ज्या स्त्रीपुरुषांवर प्रसिद्धीचा झगझगीत प्रकाश पडला आहे अशांचीं चरित्रें लिहिलीं जातात. त्यांच्याच आठवणी लोक प्रसिद्ध करतात. राजा, राणी, विद्वान्, सत्पुरुष, शास्त्रज्ञ, कलावंत, उद्योगपति, स्वातंत्र्यवीर इत्यादि व्यक्तींचीं चरित्रें, आठवणी वगैरे वाङ्मय प्रसिद्ध झालेलें आहे. त्याचप्रमाणें दुष्ट, नष्ट, कपटपटु खलपुरुषांचीं चरित्रें प्रसिद्ध व्हायला हवींत. तसेंच (मागें आत्मचरित्राच्या विवेचनांत म्हटल्याप्रमाणें) उच्चनीचांच्या पातळीवरून नव्हे पण निव्वळ मनुष्यत्वाच्या दृष्टीनें विचार केला तर सामान्य स्त्रीपुरुषांचीं चरित्रें आणि आठवणी आपल्याला वैचित्र्यपूर्ण आणि उद्बोधक वाटतील. अशा स्त्रीपुरुषांचा भविष्यतेशीं चाललेला नित्याचा झगडा, त्यांच्या आशा आणि आकांक्षा, आयुष्यांत त्यांना मिळालेलें यश आणि अपयश यांचें वर्णन जर आपल्याला वाचायला सांपडेल तर आपण एकाद्या गंधर्वनगरींत प्रवेश केल्याचा अनुभव आपल्याला येईल. पण तें केव्हां ! जेव्हां अशा सामान्य स्त्रीपुरुषांचीं चरित्रें लिहिलीं जातील तेव्हां.

---

१ चेस्टरटन् या आंग्ल ग्रंथकारानें या मताचा पुरस्कार केला आहे.

## आत्मचरित्र, चरित्र आणि आठवणी

ऐका सुप्रसिद्ध लेखिकेनें[1] म्हटल्याप्रमाणें—आज जी कांहीं जगाची थोडी प्रगति झालेली दिसते, आज जें थोडें सुखसमाधान आपल्याला लाभलें आहे, त्याचें सर्व श्रेय या सामान्य स्त्रीपुरुषांकडे जातें. त्यांच्या पुण्याईचें हें फळ. म्हणून सामान्य स्त्रीपुरुषांचीं चरित्रें जर आपल्याला उपलब्ध झालीं तर मराठी वाङ्मयाचें एक महत्त्वाचें दालन उघडल्यासारखें होईल.

येथवर लेखकानें आत्मचरित्र, चरित्र, आठवणी वगैरे वाङ्मयप्रकारांचा तात्त्विक विचार केला. हें त्याचें अपुरें विवेचन एकाददुसऱ्या वाचकाला जरी उपयुक्त वाटलें तरी त्याला आपले श्रम वायां गेले असें म्हणतां येणार नाहीं.

दादोबांचें अपुरें आत्मचरित्र पुरें करणारे सुप्रसिद्ध विद्वान् संशोधक श्रीयुत अ. का. प्रियोळकर यांनीं विनंती केली म्हणू नहें आत्मचरित्र – चरित्रविषयक चार शब्द लिहिले. ठरल्या वेळींच त्यांच्या हातीं हें लिखाण देतां आलें नाहीं, यामुळें त्यांची विलक्षण कुचंबणा झाली. माझाही नाइलाज झाला. तथापि या अक्षम्य विलंबाबद्दल मी फार फार दिलगीर आहें एवढेंच येथें सांगतों.

श्रीयुत प्रियोळकरांनीं आत्मचरित्राचें संपादन करीत असतां आणि तें पुरें करण्याच्या कामीं अविश्रान्त श्रम केले. या त्यांच्या लेखनकामाठीबद्दल सध्यांचीच पिढी काय पण पुढच्या पिढ्याही त्यांना धन्यवाद देतील.

पुणें २
ता. ३०-५-१९४७.

---

१ George Eliot.

# आशीर्वाद आणि धन्यवाद

...I have read your life of Dadoba Pandurang. It is an excellent production indicating your great capacity for examining and sifting what is good from what is bad. Your historic sense seems to be well developed and you do not indicate the prejudices which some historians do in dealing with the old leaders of Bombay. I have had occasion to read the work of some historians who have become eminent in Maharashtra. But, to my regret, I found their comments full of a secret prejudice against those who built up Bombay in the early days. Those who are at present on the literary front of Maharashtra are apt to suffer from the conceit that Bombay could not have done much for the literary, political or social growth of the Maharashtrian people. In fact, Bombay very rarely enters into their conception of Maharashtra except in connection with political questions like Samyukta–Maharashtra. On all other occasions arising out of literary or political history, they safely ignore Bombay and regard it as a city known for its promiscuity. But this notion is entirely mistaken both historically and politically. I was, therefore, very pleased that you were free from this conceit. This I regard as a great merit of your work. Incidentally, your book introduces the reader to many other public leaders of Bombay in commerce, industry, Bar and the Bench. In this way your book, like a real good biography, presents to the reader a complete picture of the times in which the hero lived. It is singularly free from heroworship, which is the one vice of modern biographical writers, who believe that their hero is a perfection of all human qualities. No true biography can flourish unless it is a picture of the times presented in a connected historical way, and judged by this test, your book will stand very high amongst modern biographies. I wish the book every success.

Yours sincerely,
Sd/–M. R. Jayakar.

## आशीर्वाद आणि धन्यवाद

आत्मचरित्र श्रेष्ठही पुरुषाला अगदीं निःपक्षपातीपणानें बिनचूक लिहिणें बहुतेक अशक्य आहे. ...मराठींतील आत्मचरित्रवाङ्मयांत स्वतांच्या कृत्यांचें मंडण करण्याच्या दृष्टीनेंही कांहीं चरित्रें लिहिलेलीं आढळतात. कांहींमध्यें हयात असलेल्या माणसांबद्दल लिहितांना नामनिर्देश न करितां ' वक्रतुण्ड ' अशा प्रकारच्या शब्द-प्रयोगानें त्यांचा उल्लेख करण्याची पाळी येते. दादोबांच्या आत्मचरित्रांतच विस्मरणामुळें चुका झाल्याचें योग्य संशोधन करून रा. प्रियोळकर यांनीं दाखवून दिलें आहे. ( उदाहरणार्थ पृष्ठ २९० पहा )

या पुस्तकानें मराठी वाङ्मयांत एका उत्तम ग्रंथाची भर पडली आहे. रा. प्रियोळकर यांनीं कित्येक वर्षें संशोधन करून दादोबांच्या आत्मचरित्रांतील निर्देशांचा खुलासा करण्यासाठीं ज्या टीपा दिल्या आहेत त्या अत्यंत महत्त्वाच्या आहेत. या टीपांवरून रा. प्रियोळकर यांचें विस्तृत वाचन, अविरत उद्योगानें माहिती मिळविण्याची चिकाटी व वर्ण्यविषयाशीं तादात्म्य या गुणांची उत्कृष्ट प्रतीति येते. शंभर सवाशें वर्षांपूर्वीची समाजव्यवस्था, चालीरीति, शिक्षणाचे विषय व पद्धति, धार्मिक, सामाजिक, राजकीय वगैरे प्रश्नांबाबत समाजांत उडालेली खळबळ व फरक यांचें चांगलें ज्ञान या पुस्तकानें होतें. दादोबांचें आत्मचरित्र वाचावयास घेतलें असतां तें संपविल्याशिवाय खालीं ठेववत नाहीं इतकें तें भाषेच्या व विचारांच्या साधेपणानें आणि वैचित्र्यामुळें चित्तवेधक झालें आहे. महाराष्ट्रांतील शिक्षणाचा व मिशनऱ्यांच्या धार्मिक आणि शिक्षणविषयक चळवळींचा इतिहास लिहिणारास हें पुस्तक अमूल्य मदत करील. मानवधर्मसभा, परमहंससभा, प्रार्थनासमाज इत्यादि संस्थांची अभिनव माहिती रा. प्रियोळकर यांनीं दिली आहे ती विचारणीय आहे; ती देतांना सर नारायणराव चंदावरकर यांच्यासारख्या 'राजकीय ऋषि' मानल्या गेलेल्या थोर पुरुषांच्या माहितींतील अतिशयोक्ति व वैगुण्य हें दाखविण्यास रा. प्रियोळकर कचरले नाहींत हें त्यांस भूषणास्पद आहे. दादोबा पांडुरंग मयत होऊन ६५ वर्षें झालीं तरी त्यांच्याबद्दल इतकी माहिती मिळवून त्यांच्या चरित्राचें व ग्रंथकर्तृत्वाचें यथायोग्य मूल्यमापन करण्याची सामग्री एकत्र आणण्यांत सतत परिश्रम, निःस्वार्थीपणा आणि सत्य संशोधन यांची रा. प्रियोळकरांनीं पराकाष्ठा केली आहे, शिवाय दादोबा पांडुरंग व त्यांच्याशीं संबंध असलेल्या अनेक व्यक्तींचें फोटो मिळवून तेही या पुस्तकांत दिल्यामुळें त्याचें आकर्षकत्व द्विगुणित झालें आहे. असा आदर्शग्रंथ मराठींत लिहिल्याबद्दल रा. प्रियोळकर यांस धन्यवाद द्यावे तितके थोडेच होतील.

**पांडुरंग वामन काणे**

## आशीर्वाद आणि धन्यवाद

...आत्मचरित्र श्रेष्ठही पुरुषाला अगदीं निःपक्षपातीपणानें बिनचूक लिहिणें बहुतेक अशक्य आहे. ...मराठींतील आत्मचरित्रवाङ्मयांत स्वतांच्या कृत्यांचें मंडण करण्याच्या दृष्टीनेंही कांहीं चरित्रें लिहिलेलीं आढळतात. कांहींमध्यें हयात असलेल्या माणसांबद्दल लिहितांना नामनिर्देश न करितां ' वक्रतुण्ड ' अशा प्रकारच्या शब्द-प्रयोगानें त्यांचा उल्लेख करण्याची पाळी येते. दादोबांच्या आत्मचरित्रांतच विस्मरणामुळें चुका झाल्याचें योग्य संशोधन करून रा. प्रियोळकर यांनीं दाखवून दिलें आहे. ( उदाहरणार्थ पृष्ठ २९० पहा )

या पुस्तकानें मराठी वाङ्मयांत एका उत्तम ग्रंथाची भर पडली आहे. रा. प्रियोळकर यांनीं कित्येक वर्षें संशोधन करून दादोबांच्या आत्मचरित्रांतील निर्देशांचा खुलासा करण्यासाठीं ज्या टीपा दिल्या आहेत त्या अत्यंत महत्त्वाच्या आहेत. या टीपांवरून रा. प्रियोळकर यांचें विस्तृत वाचन, अविरत उद्योगानें माहिती मिळविण्याची चिकाटी व वर्ण्यविषयाशीं तादात्म्य या गुणांची उत्कृष्ट प्रतीति येते. शंभर सवाशें वर्षांपूर्वींची समाजव्यवस्था, चालीरीति, शिक्षणाचे विषय व पद्धति, धार्मिक, सामाजिक, राजकीय वगैरे प्रश्नांबाबत समाजांत उडालेली खळबळ व फरक यांचें चांगलें ज्ञान या पुस्तकानें होतें. दादोबांचें आत्मचरित्र वाचावयास घेतलें असतां तें संपविल्याशिवाय खालीं ठेववत नाहीं इतकें तें भाषेच्या व विचारांच्या साधेपणानें आणि वैचित्र्यामुळें चित्तवेधक झालें आहे. महाराष्ट्रांतील शिक्षणाचा व मिशनऱ्यांच्या धार्मिक आणि शिक्षणविषयक चळवळींचा इतिहास लिहिणारास हें पुस्तक अमूल्य मदत करील. मानवधर्मसभा, परमहंससभा, प्रार्थनासमाज इत्यादि संस्थांची अभिनव माहिती रा. प्रियोळकर यांनीं दिली आहे ती विचारणीय आहे; ती देतांना सर नारायणराव चंदावरकर यांच्यासारख्या 'राजकीय ऋषि' मानल्या गेलेल्या थोर पुरुषांच्या माहितींतील अतिशयोक्ति व वैगुण्य हें दाखविण्यास रा. प्रियोळकर कचरले नाहींत हें त्यांस भूषणास्पद आहे. दादोबा पांडुरंग मयत होऊन ६५ वर्षें झालीं तरी त्यांच्याबद्दल इतकी माहिती मिळवून त्यांच्या चरित्राचें व ग्रंथकर्तृत्वाचें यथायोग्य मूल्यमापन करण्याची सामग्री एकत्र आणण्यांत सतत परिश्रम, निःस्वार्थीपणा आणि सत्य संशोधन यांची रा. प्रियोळकरांनीं पराकाष्ठा केली आहे, शिवाय दादोबा पांडुरंग व त्यांच्याशीं संबंध असलेल्या अनेक व्यक्तींचें फोटो मिळवून तेही या पुस्तकांत दिल्यामुळें त्याचें आकर्षकत्व द्विगुणित झालें आहे. असा आदर्शग्रंथ मराठींत लिहिल्याबद्दल रा. प्रियोळकर यांस धन्यवाद द्यावे तितके थोडेच होतील.

**पांडुरंग वामन काणे**

# संपादकीय निवेदन

## हस्तलिखिताचा शोध

रा. ब. दादोबा पांडुरंग तर्खडकर यांनीं आत्मचरित्र लिहिलें आहे, ही गोष्ट कै. लक्ष्मणराव पांगारकर यांनीं १९१५ सालच्या मुंबई महाराष्ट्रसाहित्यसंमेलनामध्यें एका निबंधद्वारा प्रथम लोकांपुढें आणिली.[१] १८९५ च्या सुमारास पांगारकर पुणें येथें विद्यार्थीदशेमध्यें असतांना सुविख्यात पंडित, कै. शंकर पांडुरंग पंडित यांच्या दोघां मुलांना खासगी शिकविण्याचें काम त्यांना मिळालें होतें. पांगारकर लिहितात, "पंडितांच्या निवडक ग्रंथांचा संग्रह मला तेथें चाळावयाला मिळाला. तो चाळीत असतांना एकदां त्यांत एक भलें मोठें हस्तलिखित बाड सांपडलें. तें दादोबा पांडुरंगांचें आत्मचरित्र होय. हें मीं समग्र चाळून पाहिलें. मला तें महत्त्वाचें व मनोरंजक वाटलें. इंग्रजी राज्य सुरू झाल्यावर मुंबईत जे पहिले पांच विद्यार्थी शिकूं लागले त्यांपैकीं दादोबा पांडुरंग तर्खडकर (१८१४–१८७२[२]) हे एक होत. पेन्शन घेतल्यावर पडल्यापडल्या यांनीं आपलें चरित्र आठवलें तसें तोंडानें सांगितलें व त्यांच्या मुलीनें तें लिहून घेतलें. **१८२० पासून १८७० पर्यंतचा महाराष्ट्र समाजाचा, महाराष्ट्रीय विद्वानांचा, मराठी गद्याचा वाढत्या काळाचा मनोरंजक इतिहास या आत्मचरित्रावरून चांगल्या प्रकारें कळून येतो.** चरित्र सोप्या, सरळ व घराऊ मराठी भाषेंत लिहिलें आहे. पंडितांच्या ग्रंथालयांत हें दादोबांच्या आत्मचरित्राचें हस्तलिखित पाहतांच त्याची नक्कल तरी आपल्याजवळ असावी, असें मला वाटलें. मीं एक हिकमत केली. माधव व वामन या मुलांना सांगून मीं तें बाड आपल्या बिऱ्हाडीं आणवलें, उसवलें व ७-८ विद्यार्थी बोलावून त्याचीं सुटीं पृष्ठें एकेकाला देऊन त्या सगळ्या बाडाची एका दिवसांत नक्कल करून घेतली व बाड पूर्ववत् बांधून दुसऱ्या दिवशीं जागच्या जागीं नेऊन ठेवलें! मीं तें मागितलें असतें तर मला मिळालें नसतें असें नाहीं; पण कदाचित् नकार मिळाल्यास एवढी उपयुक्त माहिती आपणाकडून जाईल अशा भीतीनें मीं हें काम केलें. हें कार्य गैर आहे असें माझ्या

---

१ आठव्या (१९१५) महाराष्ट्र साहित्यसंमेलनाचा रिपोर्ट, १९१७.

२ दादोबा १८८२ सालीं वारले.

मनाला वाटलें. पण अपत्यप्रेमाप्रमाणें वाङ्मयप्रेमही आंधळें असतें! सज्जन त्याबद्दल मला क्षमा करतील अशी आशा आहे.[१] ”

आपणास मिळालेलें हें दादोबांचें आत्मचरित्र संपूर्ण म्हणजे त्यांच्या समजुती-प्रमाणें १८७० पर्यंतचें आहे, अशी पांगारकरांनीं आपली समजूत करून घेतली होती, असें वरील जाड्या टायपांतील वाक्यांवरून दिसून येईल. हेंच आत्मचरित्र पुढें ‘विविधज्ञानविस्तारा’मध्यें प्रसिद्ध झालें आहे. पांगारकर म्हणतात त्याप्रमाणें १८७० पर्यंतचा महाराष्ट्राचा इतिहास त्यांत नाहीं. पांगारकरांना मिळालेली प्रत संपूर्ण होती व ‘विस्तार’ कर्त्यांनीं जिचा उपयोग केला[२] ती अर्धवट असेल असाही समज होण्याचा संभव आहे; परंतु या प्रश्नाचा जरा जास्त बारकाईनें विचार केला म्हणजे पांगारकरांची गफलत झालेली दिसते.

‘विविधज्ञानविस्तारा’ मध्यें छापलेलें व ज्यांत दादोबांचेंही हस्ताक्षर आहे तें मूळ हस्तलिखित माझ्यापुढें आहे. त्याच्यावरूनच पुढील आत्मचरित्र छापलें आहे. पांगारकरांच्या संग्रहांतील नकलेचा मीं नाशिकला व पुढें वर्धा येथें असलेल्या त्यांच्या चिरंजिवांकडे शोध केला; परंतु ती प्रत बेपत्ता झाली आहे, असें निष्पन्न झालें. पांगारकरांकडून प्रो. द. वा. पोतदार यांनीं ती आपल्या ‘मराठी गद्याचा इंग्रजी अवतार’ या पुस्तकाकरितां मागून नेली होती. दादोबांनीं “मरणापूर्वी एक आत्मचरित्र लिहून ठेवण्यास सुरुवात केली होती,” असें जें प्रो. पोतदार आपल्या या ग्रंथांत नमूद करतात, त्यावरूनही हा ग्रंथ अपूर्णच होता, असें स्पष्ट दिसून येतें. आपल्यापुढें असलेल्या त्रुटित हस्तलिखितांतील अन्तर्गत पुराव्यावरून तें दादोबांनीं १८६८ सालीं लिहावयास घेतलें व १८८२ पर्यंतचे वेळोवेळीं केलेले या हस्तलिखितांत कालनिदर्शक उल्लेख आहेत. १८४७ पर्यंत त्यांनीं ही हकीकत आणलेली आहे. ही आत्मकथा कसकशी लिहिली गेली याविषयीं जो अंतर्गत पुरावा आहे त्यावरून हा ग्रंथ पुरा करण्याचा त्यांचा संकल्प होता, परंतु त्यांच्या अन्तःकालच्या आजारीपणामुळें त्यांत खंड पडून तो सिद्धीस गेला नाहीं, असें वाटूं लागतें. शंकरराव पंडितांच्या संग्रहीं असलेल्या प्रतीचा त्यांचे चिरंजीव बॅ. माधवराव पंडित यांच्याकडे शोध केला परंतु त्यांना यासंबंधीं माहिती नाहीं. मला अशी खात्री वाटते कीं, हल्लीं आमच्यापुढें

---

[१] चरित्रचंद्र, १९३८, पृ. ६५.

[२] विविधज्ञानविस्तार, जुलै १९२७ ते जुलै १९२८.

# संपादकीय निवेदन

## हस्तलिखिताचा शोध

रा. ब. दादोबा पांडुरंग तर्खडकर यांनीं आत्मचरित्र लिहिलें आहे, ही गोष्ट के. लक्ष्मणराव पांगारकर यांनीं १९१५ सालच्या मुंबई महाराष्ट्रसाहित्यसंमेलनामध्यें एका निबंधद्वारा प्रथम लोकांपुढें आणिली.[१] १८९५ च्या सुमारास पांगारकर पुणें येथें विद्यार्थीदशेमध्यें असतांना सुविख्यात पंडित, कै. शंकर पांडुरंग पंडित यांच्या दोघां मुलांना खासगी शिकविण्याचें काम त्यांना मिळालें होतें. पांगारकर लिहितात, " पंडितांच्या निवडक ग्रंथांचा संग्रह मला तेथें चाळावयाला मिळाला. तो चाळीत असतांना एकदां त्यांत एक भलें मोठें हस्तलिखित बाड सांपडलें. तें दादोबा पांडुरंगांचें आत्मचरित्र होय. हें मीं समग्र चाळून पाहिलें. मला तें महत्त्वाचें व मनोरंजक वाटलें. इंग्रजी राज्य सुरू झाल्यावर मुंबईंत जे पहिले पांच विद्यार्थी शिकूं लागले त्यांपैकीं दादोबा पांडुरंग तर्खडकर (१८१४–१८७२[२]) हे एक होत. पेन्शन घेतल्यावर पडल्यापडल्या यांनीं आपलें चरित्र आठवलें तसें तोंडानें सांगितलें व त्यांच्या मुलीनें तें लिहून घेतलें. **१८२० पासून १८७० पर्यंतचा महाराष्ट्र समाजाचा, महाराष्ट्रीय विद्वानांचा, मराठी गद्याचा वाढत्या काळाचा मनोरंजक इतिहास या आत्मचरित्रावरून चांगल्या प्रकारें कळून येतो.** चरित्र सोप्या, सरळ व घराऊ मराठी भाषेंत लिहिलें आहे. पंडितांच्या ग्रंथालयांत हें दादोबांच्या आत्मचरित्राचें हस्तलिखित पाहतांच त्याची नक्कल तरी आपल्याजवळ असावी, असें मला वाटलें. मीं एक हिकमत केली. माधव व वामन या मुलांना सांगून मीं तें बाड आपल्या बिऱ्हाडीं आणवलें, उसवलें व ७-८ विद्यार्थी बोलावून त्याचीं सुटीं पृष्ठें एकेकाला देऊन त्या सगळ्या बाडाची एका दिवसांत नक्कल करून घेतली व बाड पूर्ववत् बांधून दुसऱ्या दिवशीं जागच्या जागीं नेऊन ठेवलें! मीं तें मागितलें असतें तर मला मिळालें नसतें असें नाहीं; पण कदाचित् नकार मिळाल्यास एवढी उपयुक्त माहिती आपणाकडून जाईल अशा भीतीनें मीं हें काम केलें. हें कार्य गैर आहे असें माझ्या

---

१ आठव्या (१९१५) महाराष्ट्र साहित्यसंमेलनाचा रिपोर्ट, १९१७.

२ दादोबा १८८२ सालीं वारले.

नाला वाटलें. पण अपत्यप्रेमाप्रमाणें वाङ्मयप्रेमही आंधळें असतें! सज्जन ाबद्दल मला क्षमा करतील अशी आशा आहे.[१] ”

आपणास मिळालेलें हें दादोबांचें आत्मचरित्र संपूर्ण म्हणजे त्यांच्या समजुतीमाणें १८७० पर्यंतचें आहे, अशी पांगारकरांनीं आपली समजूत करून घेतली होती, असें वरील जाड्या टायपांतील वाक्यांवरून दिसून येईल. हेंच आत्मचरित्र पुढें विविधज्ञानविस्तारा'मध्यें प्रसिद्ध झालें आहे. पांगारकर म्हणतात त्याप्रमाणें १८७० पर्यंतचा महाराष्ट्राचा इतिहास त्यांत नाहीं. पांगारकरांना मिळालेली प्रत संपूर्ण होती व 'विस्तार' कर्त्यांनीं जिचा उपयोग केला[२] ती अर्धवट असेल असाही समज होण्याचा संभव आहे; परंतु या प्रश्नाचा जरा जास्त बारकाईनें विचार केला म्हणजे पांगारकरांची गफलत झालेली दिसते.

'विविधज्ञानविस्तारा' मध्यें छापलेलें व ज्यांत दादोबांचेंही हस्ताक्षर आहे तें मूळ हस्तलिखित माझ्यापुढें आहे. त्याच्यावरूनच पुढील आत्मचरित्र छापलें आहे. पांगारकरांच्या संग्रहांतील नकलेचा मीं नाशिकला व पुढें वर्धा येथें असलेल्या त्यांच्या चिरंजिवांकडे शोध केला; परंतु ती प्रत बेपत्ता झाली आहे, असें निष्पन्न झालें. पांगारकरांकडून प्रो. द. वा. पोतदार यांनीं ती आपल्या 'मराठी गद्याचा इंग्रजी अवतार' या पुस्तकाकरितां मागून नेली होती. दादोबांनीं “मरणापूर्वी एक आत्मचरित्र लिहून ठेवण्यास सुरवात केली होती,” असें जें प्रो. पोतदार आपल्या या ग्रंथांत नमूद करतात, त्यावरूनही हा ग्रंथ अपूर्णच होता, असें स्पष्ट दिसून येतें. आपल्यापुढें असलेल्या त्रुटित हस्तलिखितांतील अन्तर्गत पुराव्यावरून तें दादोबांनीं १८६८ सालीं लिहावयास घेतलें व १८८२ पर्यंतचे वेळोवेळीं केलेले या हस्तलिखितांत कालनिदर्शक उल्लेख आहेत. १८४७ पर्यंत त्यांनीं ही हकीकत आणलेली आहे. ही आत्मकथा कसकशी लिहिली गेली याविषयीं जो अंतर्गत पुरावा आहे त्यावरून हा ग्रंथ पुरा करण्याचा त्यांचा संकल्प होता, परंतु त्यांच्या अन्तःकालच्या आजारीपणामुळें त्यांत खंड पडून तो सिद्धीस गेला नाहीं, असें वाटूं लागतें. शंकरराव पंडितांच्या संग्रहीं असलेल्या प्रतीचा त्यांचे चिरंजीव बॅ. माधवराव पंडित यांच्याकडे शोध केला परंतु त्यांना यासंबंधीं माहिती नाहीं. मला अशी खात्री वाटते कीं, सध्यां आमच्यापुढें

१ चरित्रचंद्र, १९३८, पृ. ६५.

२ विविधज्ञानविस्तार, जुलै १९२७ ते जुलै १९२८.

असलेलें आत्मचरित्राचें हस्तलिखितच दादोबांची कन्या अहल्याबाई यांजकडून पंडितांच्या मडळीनें वाचण्याकरितां नेलें व त्याची पांगारकरांनीं वर सांगितल्या-प्रमाणें शर्विलकी नक्कल केली असावी. हीं दोनही घराणीं प्रार्थनासमाजानुयायी असल्यामुळें त्यांचा घरोबा होताच.

## कुणीं लिहिलें

अहल्याबाई या दादोबांच्या सेक्रेटरीप्रमाणेंच होत्या. आत्मचरित्राचें उपलब्ध हस्तलिखित त्यांच्याच हातचें असावें. पण पांगारकर म्हणतात त्याप्रमाणें, दादोबांनीं तोंडीं सांगून त्यांच्या कन्येनें तें लिहिलेलें नाहीं. कारण हें हस्तलिखित जरी मराठी असलें तरी त्यांत मधून मधून फारसी व इंग्रजी लिपींतील शब्द व उतारे आहेत. तो मजकूर ज्या लेखिकेनें किंवा लेखकानें लिहिला त्या व्यक्तीला फारसी लिपी अपरिचित होती, असें स्पष्ट दिसून येतें. मूळ दुसऱ्यानें लिहिलेला हा फारसी लिपींतील मजकूर ती लिपी माहीत नसतांना जशाचा तसा प्रतिलिखित करण्याचा प्रयत्न केलेला आहे. या फारसी मजकुराबरोबर जर त्याचें देवनागरी लिप्यंतर नसतें तर त्या फारसी मजकुराचा बोध होणें अशक्य झालें असतें. एकदोन ठिकाणीं जेथें मराठी लिप्यंतर नव्हतें तो मजकूर कळणें अशक्य झालें. या निमित्तानें मीं फारसी लिपीचा परिचय करून घेतला. पण आमच्या या अल्पज्ञानानें हें कोडें सुटण्यासारखें नव्हतें. उर्दू व फारसी भाषा परिचित असलेल्या आमच्या महमदी मित्रांनीं या बाबतींत थोडी मदत केली. शेवटीं हा मजकूर निश्चित करण्याचें काम डेक्कन कॉलेजचे फारसी व अरबी भाषेचे माजी प्रोफेसर खानबहादूर शेख अबदूल कादर सर्फराज यांनीं केलें. हें पद्य म्हणजे विशेषतः १३४ पृष्ठावरील खालच्या दोन फारसी ओळी होत. त्याच्या मराठी भाषांतरामुळें हें कोडें सोडविणें शक्य झालें. यावरून दादोबांनींच तें प्रथम स्वहस्तें लिहिलें होतें असें स्पष्ट होतें.

## आत्मचरित्राचा लेखनकाल

या आत्मचरित्रामध्यें जे लेखनकालनिर्देश सांपडतात त्यावरून तें कसकसें लिहिलें गेलें तें कळून येतें. पहा:—

(१) पृ. ११-१४ वरील मागाहून जोडलेल्या मजकुराचा लेखनकाल १८८१-८२ असावा (पृ. १३ तळटीप १ पहा).

(२) पृ. १९, १८६८ याच सालीं लेखन सुरू झालें असावें.
(३) पृ. २१, चौपन्नाव्या वर्षी म्हणजे साधारण १८१४+५४=१८६८ सालीं.
(४) पृ. ३७, १८६८.
(५) पृ. ४५, १८२८+४२=१८७०.
(६) पृ. ५७, १८७१.
(७) पृ. ६६, १८७१.
(८) पृ. ६९, १८७२.
(९) पृ. ८६, १८७७.
(१०) पृ. ९९, १८३६+४५=१८८१.
(११) पृ. १२०, तळटीप १८८२.
(१२) पृ. १९१, १८८२.
(१३) पृ. १९७, तळटीप १८८२.

यावरून हें आत्मचरित्र १८६८ सालीं दादोबांनीं लिहिण्यास सुरुवात केली व १८८२ सालीं त्यांच्या अन्तःकालच्या आजारामुळें लेखन अर्धवट राहिलें, हें स्पष्ट दिसून येतें. पुढील मजकूर लिहिला जात असतांच आरंभींच्या मजकुराचा मुद्रणप्रतिलेख करण्याची कामगिरी दादोबांनीं आपल्या कन्या अहल्याबाई यांच्याकडे सोपविली व या प्रेसकॉपीची दुरुस्ती करणें व आणखी नवा मजकूर त्यांत घालणें सुरुवातीच्या हस्तलिखिताच्या सोळा पृष्ठांत (म्हणजे पुढील छापील बारा पृष्ठांत) हें काम त्यांनीं स्वहस्तें केलेलें आहे. पुढें त्यांच्या आजारीपणामुळें त्यांचें पुढील लेखन व मागच्या मुद्रणप्रतिलेखाची दुरुस्ती या दोनही गोष्टी बंद पडलेल्या दिसतात. अशा प्रकारें हें आत्मचरित्र अपुरें राहिलें आहे.

## पुरें व अपुरें आत्मचरित्र

बाकी 'आत्मचरित्र' पुरें केव्हां म्हणावें, हा एक वादग्रस्तच प्रश्न आहे. चरित्रांत ज्याप्रमाणें चरित्रनायकाची देह ठेवीपर्यंतची हकीकत येते त्याप्रमाणें 'आत्मचरित्रांत' येणें शक्य नाहीं, हें उघड आहे. अशा स्थितींत ज्या वर्षी हें लेखन पुरें केलें त्या वर्षापर्यंत जर कथाभाग आत्मचरित्रांत आला असेल तर हें आत्मचरित्र त्या काळापुरतें तरी पुरें आहे, असें म्हणावयास हरकत नाहीं. या

इथीनेंही दादोबांचें आत्मचरित्र अपुरेंच आहे. कारण १८८२ सालीं त्यांनीं लेखन बंद केलें व चरित्रभाग १८४७ पर्यंतच त्यांत आलेला आहे.

दुसरें, पुष्कळ आत्मचरित्रकार आत्मचरित्राचें कथासूत्र लेखनकालापर्यंत आणून सोडीत नाहींत. मध्येंच कुठेंतरी आयुष्यांतील एखाद्या प्रसंगापर्यंत आणून ठेवतात. उदाहरणार्थ महर्षि देवेंद्रनाथ टागोर यांचें आत्मचरित्र पहा. देवेंद्रनाथ १८१७ सालीं जन्मले व १९०५ सालीं त्यांनीं देह ठेवला. त्यांच्या आत्मचरित्राच्या इंग्रजी भाषांतरित प्रतीला त्यांचे चिरंजीव सत्येंद्रनाथ यांनीं जी प्रस्तावना लिहिली आहे त्यांत ते लिहितात, "A few years before my father's death, he had completed his autobiography and, when finished he entrusted it to his favorite pupil Priyanath Shastri for publication."[१] परंतु या आत्मचरित्रांत त्यांनीं १८५९ पर्यंतची म्हणजे हिमालयाची यात्रा करून येईपर्यंतचीच हकीकत दिली आहे. कोणत्याही अडचणीमुळें त्यांचें आत्मकथन दादोबांच्या आत्मकथनाप्रमाणें बंद पडलेलें नाहीं. मुद्दाम त्यांनींच तें तेथेंच पुरें केलें आहे. कदाचित् पुढील भाग सर्वांना ठाऊक आहे, असेंही त्यांना वाटलें असणें संभवनीय आहे.

१९१५ सालीं दादोबांच्या आत्मचरित्रांतील कांहीं 'महत्त्वाचा भाग' पांगारकरांनीं मुंबईच्या आठव्या महाराष्ट्र साहित्य संमेलनापुढें वाचून दाखविला व तोच पुढें 'महाराष्ट्र-साहित्यपत्रिका[२]' व महाराष्ट्रसाहित्यसंमेलनाचा रिपोर्ट यांमध्यें प्रसिद्ध झाला.[३] हें सबंध हस्तलिखित १९२७ सालीं विविधज्ञानविस्तारामध्यें कै. विठ्ठल शिवाजी नाडकर्णी यांनीं प्रसिद्ध केलें.[४] १९३६ सालीं 'लोकशिक्षण' मासिकामध्यें 'मराठी व्याकरणाची कुळकथा'[५] या विषयावर मीं कांहीं लेख लिहिले व त्यामुळें मुंबई, पुणें, धुळें वगैरे ठिकाणीं मराठी व्याकरणाचा शतसांवत्सरिक उत्सव साजरा झाला. त्यावेळीं दादोबांचें आत्मचरित्र स्वतंत्र

१ The Autobiography of Maharshi Devendranath Tagore, 1909, p. xxiii.

२ विविधज्ञानविस्तार, जुलै १९१५.

३ आठव्या महाराष्ट्र साहित्य संमेलनाचा रिपोर्ट, १९१७.

४ विविधज्ञानविस्तार, १९२७-२८.

५ लोकशिक्षण, जुलै, ऑगस्ट १९३६.

पुस्तकरूपानें प्रसिद्ध करण्याची कल्पना पुढें आली. सुबोधपत्रिकाकारांनीं उपरिनिर्दिष्ट शतसांवत्सरिकोत्सवाला उद्देशून जें एक स्फुट लिहिलें आहे त्याच्या शेवटीं ते लिहितात, "ज्याप्रमाणें महर्षि देवेंद्रनाथ ह्यांचें आत्मचरित्र अपूर्णावस्थेंत असलेलें पाहून सत्येंद्रनाथ व इंदिरादेवी ह्यांनीं स्वतंत्र प्रकरणें लिहून तें पुरें केलें त्याप्रमाणें ऐतिहासिक सत्याच्या रक्षणासाठीं दादोबांच्या चरित्राचा हा भाग आत्मचरित्रांत येणें अत्यंत अगत्याचें आहे."[1] कै. द्वारकानाथ गोविंद वैद्य यांनीं व्यक्त केलेली सदिच्छा अगदीं योग्य होती व ती पुरी झालेली पाहण्यास ते आज हयात नाहींत, याबद्दल मला दुःख होतें; परंतु या स्फुटांत त्यांनीं केलेलीं कांहीं विधानें भ्रामक आहेत, हेंही येथें नमूद करणें अवश्य आहे. दादोबांच्या आत्मचरित्रांत परमहंससभेविषयीं उल्लेख नाहीं, याबद्दल त्यांनीं आश्चर्य व्यक्त केलें आहे. पण १८४० च्या सुमारास ही सभा स्थापन झाली, ही त्यांची समजूतच मुळीं चुकीची आहे, हें प्रस्तुत पुस्तकावरून दिसून येईल. १८५० च्या सुमारास प्रसिद्ध झालेल्या सभेची माहिती १८४७ पर्यंतच्या हकीकतींत येणें शक्यच नव्हतें. दुसरें देवेंद्रनाथांचें आत्मचरित्र सत्येंद्रनाथ व इंदिरादेवी ह्यांनीं स्वतंत्र प्रकरणें लिहून पुरें केलें हीही माहिती त्यांना कुठून मिळाली समजत नाहीं! सत्येंद्रनाथ व इंदिरादेवी यांनीं त्यांच्या बंगाली आत्मचरित्राचें इंग्रजींत भाषांतर केलें आहे व २४ पृष्ठांच्या प्रस्तावनेंत देवेंद्रांच्या एकंदर चरित्राची थोडक्यांत रूपरेखा दिली आहे. मूळ बंगाली प्रतीमध्येंही यापेक्षां जास्त माहिती नाहीं असें शोधाअंतीं कळलें.

## अर्वाचीन मराठी वाङ्मयाचें अंधारयुग

मराठी व्याकरणाच्या शतसांवत्सरिकोत्सवांत अनेक वक्त्यांनीं दादोबांचें आत्मचरित्र स्वतंत्र पुस्तकरूपानें छापून काढण्याचा आग्रह व्यक्त केला. हें संपादनाचें काम मींच हातीं घ्यावें अशा प्रकारची विनंति रा. भास्करराव सदानंद तर्खड यांनीं केली होती. त्यांच्या दप्तरांत ता. ६-१०-३७ चें माझें एक पत्रोत्तर आहे, त्यांत माझ्या पद्धतीप्रमाणें शास्त्रीय पद्धतीनें तें संपादित करण्यास विलंब लागेल व तितकी सवड मला नाहीं, असें मीं त्यांना लिहिलेलें आढळतें. पुढें १९४३ मध्यें त्यांनीं पुनः ही गोष्ट माझ्यापुढें काढली व त्यांच्या अत्याग्रहावरून एक वर्षभर प्रयत्न करून १९४४ च्या अखेरीला पुस्तक तयार करण्याचें मीं कबूल केलें. यावेळीं

१ सुबोधपत्रिका, २७ डिसेंबर १९३६.

देवेंद्रनाथ टागोरांचें आत्मचरित्र माझ्या दृष्टीपुढें होतें. दादोबांचें आत्मचरित्र त्यांच्या शुद्धलेखनपद्धतीप्रमाणें लिहून सटीप प्रसिद्ध करावें व त्याला विस्तृत प्रस्तावना जोडून त्यांत त्यांच्या उत्तरचरित्राची माहिती द्यावी एवढाच माझा प्रथम संकल्प होता. आज ज्या स्वरूपांत तें प्रसिद्ध होत आहे त्या स्वरूपांत तें तयार करतां येईल हें माझ्या ध्यानींमनींही तेव्हां नव्हतें. कारण दादोबांचा काल म्हणजे अर्वाचीन मराठी वाङ्मयाचें अंधारयुगच म्हणावयास हरकत नाहीं. वास्तविक दादोबांनीं आपली डायरी लिहून ठेविलेली होती. ती मिळाली असती तर त्यांच्यासंबंधींच्या माहितीचा एक ठेवाच हातीं आल्यासारखा झाला असता; परंतु 'आत्मचरित्रा'च्या हस्तलिखिताशिवाय त्यांच्यासंबंधीं वैयक्तिक माहितीचा जुना हस्तलिखित चिटोराही त्यांच्या घराण्यामध्यें मिळाला नाहीं. हें आत्मचरित्र कै. डॉ. ज्ञानेश्वर आत्माराम तर्खडकर यांनीं मिळविलें व त्यांच्याकडून तें रा. भास्करराव तर्खड यांच्या हातीं आलें त्यामुळें तें सुरक्षित राहिलें. बाकीचे कागदपत्र प्रो. पोतदारांनीं यथार्थ वर्णन केल्याप्रमाणें 'मावाईच्या' ओव्यांबरोबर मेमणाच्या दुकानांत गेले असले पाहिजेत! ही झाली त्यांच्या पत्रव्यवहारा-संबंधींची गोष्ट. समकालीन मराठी वृत्तपत्रांतून कांहीं माहिती गोळा करीन म्हटलें तर त्यांच्या जुन्या फायलीही उपलब्ध नाहींत. 'केसरी' ज्या वर्षी सुरू झाला त्याच्या दुसऱ्याच वर्षी ते वारले. यावरून त्यांच्या कालाच्या पुराणत्वाची कल्पना होण्यासारखी आहे. 'केसरी'चे देखील जुने एकूणएक अंक 'केसरी' ऑफिसांतच जेथें मिळूं शकत नाहींत, त्या ठिकाणीं इतर जुन्या मराठी पत्रांचे कुठें उपलब्ध होतील? निराळ्या वैयक्तिक संग्रहांत जीं जुनीं वृत्तपत्रें किंवा मासिकें असतील तीं कोठेंतरी एका ठिकाणीं आणून सुरक्षित ठेवणें हें मोठेंच राष्ट्रकार्य आहे, असें मी समजतों. पुण्याच्या प्रादेशिक ग्रंथसंग्रहालयानें हें काम शिरावर घेण्यासारखें आहे. मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालयाला या बाबतींत काय करतां येईल हें आम्ही पहातोंच आहों.

खासगी पत्रव्यवहार व वृत्तपत्रें यांची ही दशा! बरें, दादोबांसंबंधी तोंडी माहिती मिळवावी म्हटलें तर ते दिवंगत होऊनच आज पांसष्ट वर्षें झालीं! त्यांना अगदीं लहानपणीं पाहिल्याची अंधुक माहिती असलेला 'अवघें पाऊणशें वयमान'चा एकादा माणूस कदाचित् सांपडूं शकेल; परंतु त्यांच्यासंबंधी विशेष माहिती त्याच्याकडून मिळणें शक्य नाहीं, याचाही प्रत्यक्ष अनुभव घेतला.

१८८५ मध्यें काँग्रेसची चळवळ सुरू झाल्यापासून इंग्रजी वृत्तपत्रांमध्यें आपल्या लेखकांचीं नांवें विशेषकरून झळकूं लागलीं. त्याच्यापूर्वींचा धार्मिक व सामाजिक चळवळींचा काळ होता. त्या वेळच्या या चळवळींना इंग्रजी वृत्तपत्रांमध्यें विशेष स्थान नव्हतें. अशा स्थितींत दादोबांसारख्या इंग्रजी अमदानीच्या पहिल्या पिढींतील पुरुषांचें चरित्रलेखन आणि ज्यांचें सर्व पुष्कळसें आपल्या दृष्टीसमोरच होऊन गेलें आहे व ज्यांच्यासंबंधी पत्रव्यवहार, वृत्तपत्रें किंवा तोंडी माहिती मुबलक आहे अशा अलीकडच्या थोर पुरुषांचें चरित्रलेखन यामधील फरक सहज कळून येण्यासारखा आहे. दुसऱ्या बाबतींत केवळ चरित्राची जुळवणी सुसंगत कशी करावी एवढाच प्रश्न असतो तर पहिल्या बाबतींत माहिती मिळविण्यांतच प्राण नाकीं येतात !

दादोबांचें हें जें संपूर्ण चरित्र वाचकांपुढें आज ठेवण्यांत येत आहे त्यांत माझ्या मनाजोगती माहिती मला देतां आलेली नाहीं, याबद्दल मी अत्यंत असंतुष्ट व दिलगीर आहें. परंतु वर सांगितलेल्या या कार्याचा अवघडपणा लक्षांत आला म्हणजे एवढें तरी माझ्या हातून होऊं शकलें याबद्दल मला तितकाच संतोष होतो, हेंही मला सविनय कबूल केलें पाहिजे. दादोबांचें हें आत्मचरित्र त्यांच्या वैयक्तिक माहितीपेक्षांही त्यांच्या काळच्या माहितीच्या दृष्टीनें महत्त्वाचें आहे. इंग्रजी अमदानींतील पहिल्या साठ पाऊणशें वर्षांत शैक्षणिक, सामाजिक, धार्मिक, वाङ्मयविषयक व राजकीय ज्या उलाढाली होऊन गेल्या त्यांचा हा संपूर्ण इतिहास नसला तरी त्यांचीं बीजें या ग्रंथांत सांपडूं शकतील व तळटीपांच्या आधारानें एखाद्याला जास्त माहिती मिळवितां येईल. त्या काळच्या निरनिराळ्या व्यक्तींचीही यांत माहिती आहे व त्यांच्यासंबंधी जास्त माहिती मिळविण्याची सोय तळटीपांत आहे.

## दादोबांच्या पूर्वींचीं आत्मचरित्रें

दादोबांना आत्मचरित्र लिहिण्याची स्फूर्ति कशी झाली हें नक्की सांगणें कठीण आहे. इंग्रजी भाषेमध्यें हा वाङ्मयप्रकार केव्हांच रूढ होऊन राहिला होता. त्यांतले कांहीं ग्रंथ त्यांच्या वाचनांत आले असले पाहिजेत. १८६६ सालीं प्रसिद्ध गुर्जर कवि व सुधारक नर्मदाशंकर लालशंकर यांचें आत्मचरित्र 'मारी

हकीकत '[१] या नांवानें प्रसिद्ध झालें होतें तेंही त्यांच्या दृष्टीपुढें असावें. या आपल्या ग्रंथाला नर्मदनीं जी प्रास्ताविक टीप जोडिली आहे तिच्यामध्यें, स्वतःचें चरित्र स्वतः लिहावें व तेंही स्वतःच्या हयातीमध्यें प्रसिद्ध करावें, हें अविवेकाचें कर्म आहे असें लोकांना वाटेल, पण आपणामध्यें नसलेली ही नवी प्रथा सुरू करावी, म्हणून आपण ही हकीकत लिहिण्यास प्रवृत्त झालों, असें म्हटलें आहे. सुप्रसिद्ध विष्णुबावा ब्रह्मचारी यांनीं वेदोक्तधर्मप्रकाश (१८५९) या ग्रंथाच्या पंचविसाव्या प्रकरणांत स्वतःचें चरित्र दिलें आहे, त्यालाही 'हकीकत' असेंच नांव आहे. त्यावरून नर्मदाशंकरच्या पुढें विष्णुबावा ब्रह्मचाऱ्यांचा ग्रंथ असावा की काय अशी शंका येते. विष्णुबुवा ब्रह्मचाऱ्यांचे गुजराती लोकांमध्यें बरेच भक्त होते, व त्यांच्या कांहीं ग्रंथांचें गुजरातीमध्यें भाषांतरही झालें आहे. विष्णुबुवांच्याही पूर्वीचें मराठींतील आत्मचरित्र सुप्रसिद्ध गंगाधर कृष्णशास्त्री पटवर्धन यांचें, चिपळुणकरांच्या निबंधमालेंत "This is still preserved in the Baroda Residency Records in the Marathi (Modee) character and language though incomplete and in a wormeaten state,"[२] असें या हस्तलिखिताचें एका तळटीपेंत वर्णन सांपडतें. हें चरित्र अलीकडे भारतइतिहाससंशोधकमंडळाच्या त्रैमासिकांत प्रसिद्ध झालें आहे.[३] याच्याही पूर्वीचें बाळाजी जनार्दन ऊर्फ नाना फडणीस यांचें आत्मचरित्र. आपल्या जन्मापासून माधव बल्लाळ यांस पेशवाईचीं वस्त्रें मिळून त्यांनीं यास कारभार करण्यास सांगितला तो पावेतों यांत वृत्तांत आहे. जुन्यापैकीं आणखी एक महत्त्वाचें आत्मचरित्र वासुदेव बळवंत फडके यांचें. हें आत्मचरित्र त्यांनीं श्रीशैलमल्हार्जुनाच्या देवळांत चैत्र वद्य त्रयोदशी शनिवार रोजीं लिहिलें व १८७९ सालीं ज्ञानप्रकाशांत प्रसिद्ध झालें. पण तें मूळ मराठी आज उपलब्ध नाहीं. त्याचें इंग्रजी भाषांतर 'डेक्कन हेरल्ड' मध्यें छापलें व तें नेटिव ओपिनियननें उद्धृत केलें आहे[४]. याची एक स्वतंत्र ग्रंथरूपानें प्रसिद्ध झालेली प्रत येथील सरकारी दप्तरखान्यांत मला

१ आमचे मित्र 'गुजराती' पत्राचे संपादक रा. नटवरलाल देसाई यांनीं हा ग्रंथ संपादून पुरा केला आहे.

२ निबंधमाला, अं० ७५, मार्च ते जून १८८१, पृ० २५.

३ वर्ष ३, अं. १, आषाढ, शके १८४४, पृ० १७-४१.

४ *Native Opinion*, 9-11-1879, p. 708.

पाहावयास सांपडली होती. मराठींतील आत्मवृत्तपर इतर ग्रंथांचा धावता आढावा सोबतच्या प्रो. लागू यांच्या निबंधांत आहेच, परंतु आत्मचरित्राचे जुने प्रयत्न म्हणून वरील आत्मचरित्रांचा मीं येथें निर्देश केला आहे. याच बरोबर गोविंद बाबाजी जोशी यांनीं प्रसिद्ध केलेली आपली रोजनिशी अत्यंत महत्त्वाची असून तिच्याकडे अभ्यासकांचें मी लक्ष वेधतों[1]. सातशें पृष्ठांचा हा मोठा ग्रंथ आहे.

ज्या वेळीं दादोबांनीं आत्मवृत्त लिहावयास सुरुवात केली त्यावेळीं कापसाच्या व्यापारांत मिळालेल्या ठोकरीमुळें त्यांची आर्थिक स्थिति अत्यंत हलाखीची झाली होती. आत्मचरित्र लिहून काढलें तरी तें छापून निघण्याची त्यांना आशा नव्हती, याचा उल्लेख त्यांनीं आत्मचरित्राच्या आरंभीं केलाच आहे. हा ग्रंथ त्यावेळीं प्रसिद्ध होण्याची जर त्यांना खात्री असती तर तो त्यांनीं भराभर लिहून पुरा केला असता व अशा प्रकारें तो अर्धवट पडून राहिलाच नसता, हें उघड आहे. आत्मवृत्त हा एक अत्यंत आकर्षक असा वाङ्मयप्रकार आहे. यासंबंधीं १० जानेवारी १८५५ च्या **ज्ञानोदया**मध्यें संपादकांनीं एक बातमी छापिली ती लक्षांत ठेवण्यासारखी आहे ती अशी :—

" अमेरिका देशांतील बार्णमसाहेब यानें स्वतां आपल्या विषयींची खबर लिहिली ती एका छापखानेवाल्यानें दीड लक्ष रुपये देऊन विकत घेतली. इतकी किम्मत फार झाली असें कोणाला वाटेल, परंतु फार नाहीं. कारण ग्रंथकर्ता नामांकित आहे यास्तव कारखानदार आपला खर्च पार पाडून नफाहि मिळवील यांत संशय नाहीं."[2]

हा मजकूर वाचला व याचबरोबर दादोबांसारख्या आपल्याकडील ' नामांकित ' ग्रंथकाराच्या आत्मचरित्राची आतांपर्यंत झालेली दुर्दशा पाहिली म्हणजे दुःख झाल्याखेरीज राहात नाहीं.

पूर्वसंकल्पाप्रमाणें १९४५ च्या आरंभीं हें पुस्तक छापून प्रसिद्ध व्हावयाला पाहिजे होतें. परंतु मुद्रणाच्या गैरसोईमुळें हें काम लांबलें, हें एका अर्थी बरेंच झालें; कारण त्यामुळें आणखी संशोधन करण्यास अवधि मिळाला. रा. ढवळे यांनीं प्रकाशनाची जबाबदारी आपल्या अंगावर घेऊन तें छापण्यास सुरुवात केल्यासच

१ गेल्या तीस वर्षांपूर्वींचे लोक व त्यांच्या समजूती अथवा माझे प्रवासाची हकीकत, १८९६.

२ ज्ञानोदय, पुस्तक १४, १० जाने० १८५५ अं० १, पृ० २०.

सव्वा वर्ष झालें. पुस्तकप्रकाशनाच्या बाबतींत होत असलेल्या विलंबाबद्दल आम्हांला वाईट वाटलें खरें तरी या दिरंगाईमुळें इतर कांहीं असलें तरी आणखी नवी माहितीही पुष्कळ मिळाली हें कबूल केलें पाहिजे. अजूनही याला पूर्णता आलेली आहे असें नाहीं. यांत दोषही असण्याचा संभव आहे. ते शोधून पुढच्या आवृत्तीच्या वेळीं जरूर दुरुस्त करण्यांत येतील. माझ्यापेक्षां ज्याला जास्त स्वास्थ्य व सवड असेल अशा एकाद्या विद्वानानें हें काम अंगावर घेतल्यास तें जास्त निर्दोष झालें असतें. बाकी चुका कोणाच्याही हातून होतील. प्रमादातीत असे केवळ दोघेच आहेत. पहिला परमेश्वर व दुसरा कांहींच न करणारा! आणखी माहिती मिळत जाईल तसतसी ती गोळा करून पुढच्या आवृत्तींत अन्तर्भूत करण्यांत येईल. दोष आढळतील तेही काढून टाकले जातील.

## दादोबांची लेखनपद्धति

या पुस्तकामध्यें दादोबांनीं न सांगितलेल्या त्यांच्या काळांतील महत्त्वाच्या गोष्टी व त्यांची शुद्धलेखनपद्धति (Orthography) अशीं दोन संकल्पित प्रकरणें विस्तारभयामुळें दिलीं नाहींत. तितकीं "दादोबा व राजकारण" हीं दोन प्रकरणें पूर्वी मनांत नसलेलीं नवीं घालण्यांत आलीं आहेत. त्यामुळें त्यांच्या काळच्या शैक्षणिक, धार्मिक, सामाजिक वगैरे अंगांबरोबर हें राजकीय चळवळीचें अंगही वाचकांना परिचित होईल. राजवाड्यांच्या परिश्रमाबद्दल मला परम आदर असला तरी त्यांच्या मतांबद्दल व निर्णयांबद्दल मला विशेष सहानुभूति आहे असें नाहीं; परंतु त्यावेळच्या राजकारणाच्या माहितीचें गांठोडें अडकविण्याकरितां त्यांच्या उद्गारांचा या प्रकरणांत मीं केवळ खुंटीप्रमाणें उपयोग करून घेतला आहे.

दादोबांच्या शुद्धलेखनपद्धतीविषयीं स्वतंत्र प्रकरण देतां आलें नाहीं तरी त्याच्यासंबंधी अगदींच उल्लेख न करूनही चालणार नाहीं. कारण, त्यांच्या पुढील आत्मचरित्रांतील लेखनपद्धति चालू लेखनपद्धतीपेक्षां निराळ्या प्रकारची असलेली वाचकांना दिसून येईल. ती दादोबांच्या लेखनपद्धतीला अनुसरून देण्याचा प्रयत्न करण्यांत आलेला आहे. दादोबांनीं आपल्या लेखनपद्धतीविषयीं आपल्या व्याकरणांत[1]

---

१ महाराष्ट्र भाषेचें व्याकरण (सातवी आवृत्ति), १८७९, खंड ७, पृ० ३६८–३७५.

व व्याकरणाच्या पूरणिकेंत[1] स्वतंत्र प्रकरणें देऊन इतरत्रही थोडी चर्चा केलेली आहे. परंतु त्यावरून सर्व कोडीं सुटत नाहींत व त्यांचे स्वतःचे नियम त्यांनीं आपल्या देखरेखीखालीं छापलेल्या ग्रंथांत स्वतः पूर्णपणें पाळले आहेत, असेंही नाहीं. कदाचित् मुद्रितें शुद्ध करतेवेळीं अनवधानानें हे दोष राहून गेले असतील. ऱ्हस्वदीर्घ व अनुस्वार यांच्या बाबतींत त्यांच्या लिखाणांत एकवाक्यता दिसत नाहीं; त्यालाही वरील कारण असूं शकेल. अशा स्थितींत 'कालिदासा'च्या दुष्यंतानें म्हटल्याप्रमाणें, **सतां हि संदेहपदेषु वस्तुषु प्रमाणमन्तःकरणप्रवृत्तयः** या तत्त्वाचा अवलंब करावा लागला. हस्तलिखित त्यांच्या स्वतःच्या हातचें असतें तर त्यावर पुष्कळ विश्वास ठेवतां आला असता. परंतु जेथें अन्य मार्गच नाहीं तेथें हस्तलिखित प्रमाण धरलें आहे. ग्रंथकार किंवा ग्रंथ यांच्या नांवाचें इंग्रजी स्पेलिंग जेथें चुकलें होतें तें मूळ ग्रंथ पाहून दुरुस्त करून घेतलें आहे. हस्तलिखितांत दोनचार ठिकाणीं महमदी ग्रंथ, किंवा ग्रंथकार यांचीं नांवें देवनागरी लिपींत देऊन कंसांत तीं फारसी लिपींतही लिहिलीं होतीं. पृ. १३४ वरील दोन पद्यपंक्तीपैकीं पहिली देवनागरी व फारसी व दुसरी केवळ फारसीमध्येंच लिहिली होती. हा भाग छापण्याच्या वेळेस दंगा ऐन रंगांत आल्यामुळें फारसी टाइपांकरितां मुसलमान बंधूंकडून सहकार्य मिळविणें कठीण झालें, त्यामुळें फारसी लिपीमध्यें हा मजकूर न देतां केवळ त्याच्या देवनागरी लिप्यन्तरावर समाधान मानणें प्राप्त झालें आहे.

'कीं' हें अव्यय कांहीं ठिकाणीं ऱ्हस्व लिहिणें किंवा सामान्य रूप पुढच्या शब्दयोगी अव्ययाशीं जोडून न लिहिणें अशीं जीं कांहीं दादोबांच्या लेखनपद्धतीचीं वैशिष्ट्यें त्यांचा सार्वत्रिक स्वीकार त्यांच्या काळीं किंवा पुढें कधींही झालेला दिसत नाहीं. याबद्दल त्यांनीं आपल्या व्याकरणांत (पृष्ठ ३६९) व पूरणिकेंत (पृ. १९९, २०८-९) तक्रार केलेली आहे. "माझें व्याकरण प्रसिद्ध होऊन आज सुमारें पंचेचाळीस वर्षें होऊन गेलीं; तथापि व्याकरणाच्या नियमाप्रमाणें ह्मणोन शब्दाचीं रूपें लिहिणारे असे फारच विरळा; मन मानेल तशीं रूपें लिहिणारे असेच फार; ही परम शोचनीय गोष्ट माझ्या नित्यशः दृष्टीस पडते," असें ते लिहितात.[2] परंतु

१ मोठ्या महाराष्ट्र व्याकरणाच्या सातव्या आवृत्तीची पूरणिका, १८८१, खंड १२, पृष्ठें १९९–२१०.

२ पूरणिका, पृ. १९९.

आपली लेखनपद्धति काळजीपूर्वक आपल्या ग्रंथांत अमलांत आणण्याची त्यांनींच स्वतः काळजी घेतलेली नाहीं, असें पुष्कळ ठिकाणीं दिसून येतें. त्यामुळें "लोकांत व्याकरणाच्या नियमापेक्षां प्रयोगाची सत्ता बलवत्तर असते",[१] हें त्यांचें विधान पटूं लागतें. त्यांच्या पुढील आत्मचरित्राची लेखनपद्धति त्यांच्या नियमाप्रमाणें ठेवण्यांत मला जरी शंभर टक्के यश न आलें तरी त्यांच्या देखरेखीखालीं प्रसिद्ध झालेल्या पुस्तकांपेक्षां या आत्मचरित्राची लेखनपद्धति त्यांच्या नियमांस जास्त धरून आहे, असा मला भरंवसा वाटतो. दादोबांना मान्य रूप कोणतें हें ज्या ठिकाणीं मला निश्चित कळलें तेथें मीं तें हस्तलिखितांत दुरुस्त करून घेतलेलें आहे. उदाहरणार्थ, '**म्हणून**' व '**म्हणोन**' यामध्यें त्यांनीं फरक केला आहे. ते लिहितात, "**म्हणून** हें म्हण धातूचें पूर्वकालवाचक धातुसाधित अव्यय आणि म्हणोन हें वर सांगितल्या अर्थावांचून, यास्तव इ. इतर बहुत अर्थीं असतां असें रूप लिहावें. उदाह० 'असें **म्हणून** तो तेथून निघोन गेला.' आणि —'बाबा मुला! **म्हणोन** मी तुला वारंवार सांगतों कीं तूं खेळायास जाऊं नको,' 'व्याकरण **म्हणोन** एक शास्त्र आहे,' 'त्याचें **म्हणोन** म्यां ऐकिलें,' इ. अशीं हीं रूपें अर्थभेद ठेवून लिहावीं." परंतु हा नियम त्यांनीं स्वतःच पाळलेला नाहीं! त्यांच्या मोठ्या व्याकरणाच्या सातव्या आवृत्तीच्या सुरुवातीच्या पहिल्या वाक्यांतच या नियमाचा भंग झालेला आढळतो! पहा —

"व्याकरण **म्हणून** एक शास्त्र आहे." या पहिल्याच पृष्ठावर हा शब्द आणखी तीन ठिकाणीं आला आहे.

(१) जर कोणी त्याच्या भाषेंत एकादें अशुद्ध वाक्य **म्हणून** दाखविलें —

(२) तर तो अशुद्ध **म्हणून** सांगेल.

(३) ज्यास व्याकरण **म्हणून** काय वस्तु आहे हें अगदीं ठाऊक नाहीं.....

या (२) व (३) मध्यें **म्हणोन** असें रूप पाहिजे.

एकाच शब्दाचीं दोन रूपें जरी त्यांच्या ग्रंथामध्यें कांहीं ठिकाणीं आलीं आहेत, तरी पण त्यांना मान्य कोणतें व चुकीनें किंवा अनवधानानें लिहिलेलें कोणतें, हें ठरवितां येतें. पण कांहीं ठिकाणीं दोन रूपें आढळतात व तीं जुन्या काळीं सारखींच प्रचलित होतीं. उदाहरणार्थ मिस्तर व मेस्तर हे दोनही शब्द

१ महाराष्ट्र भाषेचें व्याकरण, पृ० १४९.

दादोबांनीं वापरले आहेत. हीं एकच शब्दाचीं दोन रूपें आहेत. परंतु त्यांचे उगम भिन्न आहेत. मिस्तर हा इंग्रजी ( Mister ) व मेस्तर हा पोर्तुगीज ( Mestre ). तसेंच सेक्रेतरी हा इंग्रजी, सक्रतार हा पोर्तुगीज अशी माझी कल्पना आहे. शाही व शाई, पहिलें रूप मूळ फारसी उगम दाखविणारें असल्यामुळें तें जास्त प्रचलित 'शाई' या रूपाप्रमाणें बदलून घेतलें नाहीं. विद्वान व विद्वान् अशीं दोनही रूपें त्यांच्या इतर ग्रंथांतही आढळतात. अशाप्रकारें कांहीं ठिकाणीं जेथें निश्चय झाला नाहीं, तेथें दोनही रूपें मुळाप्रमाणें राखिलीं आहेत. पुढच्या आवृत्तींत जास्त निश्चितपणा व निर्दोषता आणतां येईल, अशी मला उमेद आहे.

## महत्त्वाचा खुलासा : प्रथम वाचा

आत्मचरित्राच्या मूळ हस्तलिखितामध्यें प्रकरणें पाडलेलीं नव्हतीं, परंतु वाचकांच्या सोयीकरितां प्रस्तुत ग्रंथामध्यें मीं तीं पाडिलीं आहेत. × अशा खुणा ज्या मथळ्याच्या आरंभीं आहेत ते सम्पादकीय समजावे. [ ] अशा समकोण कंसांमध्यें जो मजकूर आहे तोही अर्थपूर्ततेकरितां घातलेला संपादकीय जाणावा. खुणांच्या ज्या तळटीपा आहेत त्या दादोबांच्या व आंकड्याच्या तळटीपा माझ्या. हस्तलिखिताच्या आरंभीं, Rao Bahadur Dadoba Pandurung Turkhudker असा मजकूर होता; परंतु या ग्रंथाला **रा. ब. दादोबा पांडुरंग** असेंच सुटसुटीत नांव देणें मला बरें वाटलें. हेंच त्यांचें नांव जास्त प्रचारांत होतें व आपली स्वाक्षरीही ते अशीच करीत. हें आत्मचरित्र म्हणजे कांहीं ऋग्वेदाची हस्तलिखित संहिता नाहीं किंवा ज्ञानेश्वरीची जुनी हस्तलिखित पोथीही नाहीं कीं त्यांतील एकून एक क्षुल्लक बदल तळटीपांत नमूद व्हावा. पण मीं जरूर तेथें तो नमूद केलेला आहे. ग्रांथिक परिभाषा व संक्षेप यांसंबंधीं आपणास कांहीं तरी सुरवात केली पाहिजे. *Ibid, cf.* अशा सारख्या परदेशी मालावर आपण स्वातंत्र्याच्या द्वारांत पोंचलों तरी आणखी किती दिवस निर्वाह चालविणार? *ibid* हा लॅटिन *Ibidem* (in same place) या शब्दाचा संक्षेप, या शब्दाला आपल्याकडील विद्वान् लोक इबिडसाहेबही म्हणूं लागले तरीही आमचे डोळे उघडत नाहींत! मी या *ibid* बद्दल 'तत्रैव,' व *cf.* (confer = compare) बद्दल 'तुळा' असा शब्द रूढ करण्याचा उपक्रम केला आहे. Index बद्दल सूची हा शब्द प्रचारांत आहे पण 'दर्शिका' हा मला जास्त ग्राह्य वाटतो व तोच मीं योजिला आहे.

रा. ब. दादोबा पांडुरंग

Addenda et corrigenda बद्दलही ' वृद्धि आणि शुद्धि ' असें लिहिलेलें पुढें आढळेल.

आधारभूत ग्रंथांचीं स्वतंत्र नामावलि द्यावी, असा माझा प्रथम संकल्प होता, व कांहीं मित्रांनीं तसा आग्रहही केला. परंतु विस्तारभयास्तव तो विचार रद्द करावा लागला. तळटीपांत त्यांचा नामनिर्देश आढळेलच. पण त्यांखेरीज आणखी पुष्कळ ग्रंथांचा मला उपयोग झालेला आहे, हें येथें नमूद करणें अवश्य वाटतें. कांहीं आधारभूत ग्रंथांचे संक्षेप दिले आहेत ते पुढील प्रमाणें आहेत.

## संक्षेप

मुंबईसरकारच्या दप्तरखान्यांतील हस्तलिखित ग्रंथ :—

G. D. ( General Department )

R. D. ( Revenue Department )

P. D. ( Political Department ) तसेंच—

O. C. S. ( Oriental Christian Spectator )

B. B. R. A. S. ( Bombay Branch of Royal Asiatic Society )

मुं. म. ग्रं. ( मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय )

ह्या ग्रंथ छापत असतांना दंगे व संप यांचा धुमाकूळ चालू होता. त्यामुळें आमच्या इच्छेविरुद्ध कांहीं अशुद्धें राहिलीं याबद्दल खेद होतो. त्यांपैकीं महत्त्वाचीं ग्रंथाच्या अखेरीला शुद्ध केलीं आहेत. ( पृ० ४६२ ) वाचकांनीं आधीं दुरुस्ती करून नंतर ग्रंथ वाचावा.

दुसऱ्या एका गोष्टीसंबंधानें मला थोडा खुलासा केला पाहिजे. या ग्रंथांत ठिकठिकाणीं जे इंग्रजी ग्रंथांतील किंवा जुन्या कागदपत्रांतील उतारे उद्धृत केले आहेत, त्यांचें स्थलाभावामुळें मराठी भाषांतर देणें मला शक्य झालेलें नाहीं. मूळ इंग्रजी उतारा न देतां त्याचें केवळ मराठी भाषांतरच देणें मला स्वतःस पसंत नाहीं. कारण हे मूळ कागदपत्र किंवा ग्रंथ दुर्मिळ असल्यामुळें जर वाचकास मुळांत ते वाचण्याची इच्छा झाली तर शंभरांपैकीं एकालाही ते उपलब्ध होणें कठीण आहे. उलट इंग्रजी उतारा समजून घेणें ती भाषा न जाणणाऱ्या प्रत्येक व्यक्तीला शक्य आहे. शिवाय ज्याला इंग्रजी भाषा अवगत नाहीं, असा स्त्री किंवा पुरुष—वाचक अशासारखा ग्रंथ वाचण्यास सहसा हातांत घेईल, अशी

मला फारशी आशा नाहीं. त्यांतही, माझ्या किंवा दादोबांच्या पूर्वजन्मार्जित सुकृतामुळें असा एकादा वाचक या ग्रंथाला लाभला (असे कांहीं वाचक आहेत याची मला जाणीव आहे) तर त्याची जी थोडीशी गैरसोय होईल त्याबद्दल मी दिलगीर आहें. सध्यां होऊं घातलेली हिंदुस्थानी कौमी झबान (राष्ट्रभाषा) सर्वत्र प्रसृत होऊन त्यामुळें इंग्रजी भाषेचें ज्ञान मागें पडलेंसें दिसेल तर दुसऱ्या आवृत्तीमध्यें इंग्रजीचें मराठी भाषांतर जरूर दिलें जाईल.

## यशाचे भागीदार

या पुस्तकांत जे कांहीं दोष असतील त्यांबद्दल सर्वस्वी मीच एकटा जबाबदार आहें. पण जर त्यांत कुणाला कांहीं चांगुलपणाचा अंश आढळला, तर या यशाचे अनेक भागीदार आहेत, हें कृतज्ञतापूर्वक मला येथें सांगितलें पाहिजे. या प्रत्येकाचा नामनिर्देश या ठिकाणीं करणें अशक्य आहे. खरें म्हटलें तर या ग्रंथाचें सर्व श्रेय हें काम हातांत घेण्याची मला प्रथम प्रेरणा देणारे रा. भास्करराव तर्खड यांनाच दिलें पाहिजे. त्यांचे शाब्दिक आभार मानून त्यांच्या ऋणांतून मी मुक्त होणें शक्य नाहीं. आपल्या दप्तरखान्याचा मला उपयोग करण्याची परवानगी दिल्याबद्दल मुंबई सरकारचा, तसेंच मुंबई युनिव्हर्सिटी, रॉयल एशियाटिक सोसाइटी, पारशी पंचायत, प्रार्थनासमाज, गुजराती फार्बस सभा, पीपल्स फ्री लायब्ररी, मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय, ठाणें मराठी ग्रंथसंग्रहालय, इंपीरियल लायब्ररी (कलकत्ता), विल्सन कॉलेज, एल्फिन्स्टन कॉलेज, फर्ग्युसन कॉलेज वगैरे वगैरे ज्या संस्थांच्या ग्रंथसंग्रहाचा मला फायदा घेतां आला त्यांचा व तेथील सर्व लहानमोठ्या अधिकाऱ्यांचा मी ऋणी आहें. यापैकीं सरकारी दप्तरखान्याचे सेवानिवृत्त कीपर रा. दिनकर गणेश भिडे हे आपल्या जुन्या जागेवर आतां नसल्यामुळें त्यांचा नामोल्लेख करणें मला अवश्य वाटतें. ज्या व्यक्तींकडून मला दुर्मिळ ग्रंथ किंवा फोटो मिळूं शकले त्या लेडी वियागौरी नीलकंठ, डॉ. बाबासाहेब जयकर, दि. ब. कृष्णलाल जव्हेरी, रा. शं. ग. दाते, रा. वसंतराव राऊत, कृष्णराव रामचंद्र पाठारे, वसंतराव जयकर वगैरे वगैरे व्यक्तींचे उपकार मी कधीं विसरूं शकत नाहीं. बाहेरगांवाहून माहिती पुरविणारे रे० जे. एफ्. एडवर्ड्स (पुणें), श्री. मंगेश कमलाकर नाडकर्णी (बडोदें) वगैरे गृहस्थही माझ्या कृतज्ञतेस पात्र आहेत. पंतप्रधान श्रीयुत बाळासाहेब खेर यांनीं त्यांच्यापुढें कामाचे डोंगर उभे असतां माझा ग्रंथ काळजीपूर्वक वाचून

Addenda et corrigenda बद्दलही ' वृद्धि आणि शुद्धि ' असें लिहिलेलें पुढें आढळेल.

आधारभूत ग्रंथांचीं स्वतंत्र नामावलि द्यावी, असा माझा प्रथम संकल्प होता, व कांहीं मित्रांनीं तसा आग्रहही केला. परंतु विस्तारभयास्तव तो विचार रद्द करावा लागला. तळटीपांत त्यांचा नामनिर्देश आढळेलच. पण त्यांखेरीज आणखी पुष्कळ ग्रंथांचा मला उपयोग झालेला आहे, हें येथें नमूद करणें अवश्य वाटतें. कांहीं आधारभूत ग्रंथांचे संक्षेप दिले आहेत ते पुढील प्रमाणें आहेत.

## संक्षेप

मुंबईसरकारच्या दप्तरखान्यांतील हस्तलिखित ग्रंथ :—

G. D. ( General Department )

R. D. ( Revenue Department )

P. D. ( Political Department ) तसेंच—

O. C. S. ( Oriental Christian Spectator )

B. B. R. A. S. ( Bombay Branch of Royal Asiatic Society )

मुं. म. ग्रं. ( मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय )

हा ग्रंथ छापत असतांना दंगे व संप यांचा धुमाकूळ चालू होता. त्यामुळें आमच्या इच्छेविरुद्ध कांहीं अशुद्धें राहिलीं याबद्दल खेद होतो. त्यांपैकीं महत्त्वाचीं ग्रंथाच्या अखेरीला शुद्ध केलीं आहेत. ( पृ० ४६२ ) वाचकांनीं आधीं दुरुस्ती करून नंतर ग्रंथ वाचावा.

दुसऱ्या एका गोष्टीसंबंधानें मला थोडा खुलासा केला पाहिजे. या ग्रंथांत ठिकठिकाणीं जे इंग्रजी ग्रंथांतील किंवा जुन्या कागदपत्रांतील उतारे उद्धृत केले आहेत, त्यांचें स्थलाभावामुळें मराठी भाषांतर देणें मला शक्य झालेलें नाहीं. मूळ इंग्रजी उतारा न देतां त्याचें केवळ मराठी भाषांतरच देणें मला स्वतःस पसंत नाहीं. कारण हे मूळ कागदपत्र किंवा ग्रंथ दुर्मिळ असल्यामुळें जर वाचकास मुळांत ते वाचण्याची इच्छा झाली तर शंभरांपैकीं एकालाही ते उपलब्ध होणें कठीण आहे. उलट इंग्रजी उतारा समजून घेणें ती भाषा न जाणणाऱ्या प्रत्येक व्यक्तीला शक्य आहे. शिवाय ज्याला इंग्रजी भाषा अवगत नाहीं, असा स्त्री किंवा पुरुष—वाचक अशासारखा ग्रंथ वाचण्यास सहसा हातांत घेईल, अशी

मला फारशी आशा नाहीं. त्यांतही, माझ्या किंवा दादोबांच्या पूर्वजन्मार्जित सुकृतामुळें असा एकादा वाचक या ग्रंथाला लाभला ( असे कांहीं वाचक आहेत याची मला जाणीव आहे ) तर त्याची जी थोडीशी गैरसोय होईल त्यावद्दल मी दिलगीर आहें. सध्यां होऊं घातलेली हिंदुस्थानी कौमी झबान (राष्ट्रभाषा) सर्वत्र प्रसृत होऊन त्यामुळें इंग्रजी भाषेचें ज्ञान मागें पडलेंसें दिसेल तर दुसऱ्या आवृत्तीमध्यें इंग्रजीचें मराठी भाषांतर जरूर दिलें जाईल.

## यशाचे भागीदार

या पुस्तकांत जे कांहीं दोष असतील त्यांबद्दल सर्वस्वी मीच एकटा जवाबदार आहें. पण जर त्यांत कुणाला कांहीं चांगुलपणाचा अंश आढळला, तर या यशाचे अनेक भागीदार आहेत, हें कृतज्ञतापूर्वक मला येथें सांगितलें पाहिजे. या प्रत्येकाचा नामनिर्देश या ठिकाणीं करणें अशक्य आहे. खरें म्हटलें तर या ग्रंथाचें सर्व श्रेय हें काम हातांत घेण्याची मला प्रथम प्रेरणा देणारे रा. भास्करराव तर्खड यांनाच दिलें पाहिजे. त्यांचे शाब्दिक आभार मानून त्यांच्या ऋणांतून मी मुक्त होणें शक्य नाहीं. आपल्या दप्तरखान्याचा मला उपयोग करण्याची परवानगी दिल्यावद्दल मुंबई सरकारचा, तसेंच मुंबई युनिव्हर्सिटी, रॉयल एशियाटिक सोसाइटी, पारशी पंचायत, प्रार्थनासमाज, गुजराती फार्बस सभा, पीपल्स फ्री लायब्ररी, मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय, ठाणें मराठी ग्रंथसंग्रहालय, इंपीरियल लायब्ररी ( कलकत्ता ), विल्सन कॉलेज, एल्फिन्स्टन कॉलेज, फर्ग्युसन कॉलेज वगैरे वगैरे ज्या संस्थांच्या ग्रंथसंग्रहाचा मला फायदा घेतां आला त्यांचा व तेथील सर्व लहानमोठ्या अधिकाऱ्यांचा मी ऋणी आहें. यापैकीं सरकारी दप्तरखान्याचे सेवानिवृत्त कीपर रा. दिनकर गणेश भिडे हे आपल्या जुन्या जागेवर आतां नसल्यामुळें त्यांचा नामोल्लेख करणें मला अवश्य वाटतें. ज्या व्यक्तींकडून मला दुर्मिळ ग्रंथ किंवा फोटो मिळूं शकले त्या लेडी विद्यागौरी नीलकंठ, डॉ. बाबासाहेब जयकर, दि. ब. कृष्णलाल जव्हेरी, रा. शं. ग. दाते, रा. वसंतराव राऊत, कृष्णराव रामचंद्र पाठारे, वसंतराव जयकर वगैरे वगैरे व्यक्तींचे उपकार मी कधीं विसरूं शकत नाहीं. बाहेरगांवाहून माहिती पुरविणारे रे० जे. एफ्. एडवर्ड्स ( पुणें ), श्री. मंगेश कमलाकर नाडकर्णी ( बडोदें ) वगैरे गृहस्थही माझ्या कृतज्ञतेस पात्र आहेत. पंतप्रधान श्रीयुत बाळासाहेब खेर यांनीं त्यांच्यापुढें कामाचे डोंगर उभे असतां माझा ग्रंथ काळजीपूर्वक वाचून

काढला व पुरस्कार लिहून दिला, या मजवरील कृपेबद्दल त्यांचा मी आभारी आहें. आपली प्रकृति नादुरुस्त असतांही प्रो. रामचंद्र कृष्ण लागू यांनीं माझ्यावरील लोभामुळें परिश्रमपूर्वक आत्मचरित्रविषयक निबंध तयार केला, हे त्यांचे मजवरील मोठेच उपकार होत.

दादोबांच्या आत्मचरित्राची पूर्ति करण्याकरितां हातांत घेतलेली लेखणी खालीं ठेवतांना हा ग्रंथ छापून तयार झालेला पाहाण्यास अत्यंत उत्सुक असलेल्या एका व्यक्तीची मला या प्रसंगीं आठवण झाल्याखेरीज राहात नाहीं. ती व्यक्ति म्हणजे डॉ. मुक्ताबाई तर्खड या होत. १९४५ च्या मे महिन्यांत, " दादोबांचें आत्मचरित्र आम्हांला तुम्हीं केव्हां वाचावयास देणार ? " असा त्यांनीं मला प्रश्न केला. " छापण्याची व्यवस्था करा, हस्तलिखित तयार आहे, " असें मीं त्यांना हंसतच उत्तर दिलें. कांहीं दिवसांनीं त्या आजारी पडून अनपेक्षित रीतीनें एकाएकीं त्यांचा अंत झाला. हा ग्रंथ तयार झालेला पाहाण्यास जरी त्या इहलोकांत नाहींत तरी परलोकांत त्यांच्या आत्म्याला आपल्या आजोबांचें हें चरित्रकार्य शेवटास गेलेलें पाहून संतोष होईल याविषयीं मला शंका नाहीं.

अ. का. प्रियोळकर

नवलकर ब्लॉक्स, केनडी ब्रिज, मुंबई ४, ९. ५. ४७

# अनुक्रमणिका


| | पृष्ठें |
|---|---|
| पुरस्कार—ले० श्री. बाळ गंगाधर खेर | (३) |
| आत्मचरित्र, चरित्र आणि आठवणी—ले० प्रो. रामचंद्र कृष्ण लागू | (७) |
| आशीर्वाद आणि धन्यवाद | (४०) |
| संपादकीय निवेदन | (४२) |
| विषयानुक्रमणिका | (५९) |
| चित्रानुक्रमणिका | (६१) |


## विषयानुक्रमणिका


| विषय पूर्वार्ध ( आत्मचरित्र ) | पृष्ठें |
|---|---|
| १ कुलवृत्त व जन्म | १—६ |
| २ बाळपणाचें स्मरण | ७—१४ |
| ३ मराठी शिक्षणाचा प्रारंभ व मुंजीबंधन | १५—२२ |
| ४ आमचें कुंभारतुकड्यांतील घर व माझा पहिलाच इंग्रेजी अभ्यास | २३—२५ |
| ५ सोसाइटीची शाळा | २६—३३ |
| ६ या शाळेंतील पहिलीं पुस्तकें, अभ्यास व गुरु | ३४—४१ |
| ७ माझें लग्न | ४२—४७ |
| ८ सोसाइटीच्या स्कुलांतला माझा इंग्लिश अभ्यास | ४८—५४ |
| ९ हरि केशवजी, सोमवंशी क्षत्रिय पाठारे | ५५—५९ |
| १० सदाशिव काशीनाथ छत्र्ये | ६०—६२ |
| ११ घनश्यामबावा सोनगीरकर | ६३—६५ |
| १२ खरडींतील दरवडा | ६६—७० |
| १३ इ. स. १८३१ — | ७१—७७ |
| १४ सोसाइटींतील कांहीं घडामोडी व मातुःश्रीचा मृत्यु | ७८—८१ |
| १५ एल्फिन्स्टन इन्स्टिट्यूशन | ८२—८४ |
| १६ मराठींत व्याकरण रचण्याची माझी इच्छा व उपक्रम | ८५—८७ |
| १७ जावऱ्यास गमन | ८८—१०२ |

१८ जाने० १८३७ पासून जावऱ्यास राहिलों तो वृत्तांत १०३–११०
१९ माळव्यांतील होळीकरितां माझें भ्रातुष्यास जाणें १११–११६
२० मेहदपुराहून परत जावऱ्यास येणें ११७–१२३
२१ नवाबसाहेबाच्या लग्नाच्या स्वारीबराबर माझें जाणें १२४–१३१
२२ पितृवियोग १३२–१३६
२३ कन्यादर्शन १३७–१४१
२४ परत घरीं मुंबईस जाणें १४२–१४६
२५ इ. स. १८४१ पासून — १४७–१६०
२६ आर्देशिर धनजीशाह १६१–१६९
२७ बडोद्यांतील होळीचें आमंत्रण १७०–१८३
२८ माझें सन १८४६ सांत एप्रिलांत मुंबईस जाणें १८४–१८९
२९ सुरत १९०–१९५
३० पंतोजी तयार करण्याचें काम १९६–२००

## उत्तरार्ध (चरित्र)

१ मराठी शाळांचे तपासनीस २०३–२१२
२ हुजूर डेप्युटी कलेक्टर २१३–२१९
३ सत्तावन सालच्या बंडांतील कामगिरी २२०–२२६
४ नोकरीला रामराम २२७–२२९
५ मुंबईंतील धार्मिक स्थित्यंतरें २३०–२४०
६ परमहंससभेचा उगम मानवधर्मसभा २४१–२४९
७ परमहंससभा २५०–२६२
८ दादोबा व बंगालांतील पुरोगामी मंडळी २६३–२७४
९ आर्थिक अनर्थ २७५–२८७
१० दादोबांचे प्रकाशित किंवा अप्रकाशित ग्रंथ (१) २८८–३१०
११ स्वडिनबोर्गच्या धर्मपंथाची जिज्ञासा ३११–३२३
१२ दादोबांचे प्रकाशित किंवा अप्रकाशित ग्रंथ (२) ३२४–३३८
१३ मराठी ट्रान्स्लेटर ३३९–३४९
१४ दादोबांचे प्रकाशित किंवा अप्रकाशित ग्रंथ (३) ३५०–३६७
१५ दादोबा व राजकारण (१) ३६८–३८३

१६ दादोबा व राजकारण (२) ३८४–४००
१७ आणखी कांहीं संस्थांशीं संबंध ४०१–४०५
१८ अखेर ४०६–४१०
परिशिष्ट–दादोकृत शिशुबोध ४११–४४०
दर्शिका (Index) ४४१–४५७
वृद्धि व शुद्धि (नवी टिपणें व शुद्धिपत्र) ४५८–४६३

## चित्रानुक्रमणिका

१ रा. ब. दादोबा पांडुरंग स्वाक्षरीसहित पृ० २ जवळ
२ दादोबांचें हस्ताक्षर ,, ,,
३ डॉ. आत्माराम पांडुरंग ,, ,,
४ श्री० साळुबाई व रा. भास्करराव तर्खंड ,, ,,
५ राघोबा पांडुरंग ,, ,,
६ दादोबांचें अखेरच्या दिवसांतील वास्तव्यस्थान ,, ,,
७ न्या. मू. जनार्दन वासुदेव पृ० ५६ जवळ
८ नवरोजी फर्दुनजी ,, ,,
९ श्रीमंत जगन्नाथ शंकरशेट ,, ,,
१० मि. रॉबर्ट कॉटन मनी ,, ,,
११ सर जमशेटजी जिजीभाई ,, ,,
१२ फ्रामजी कावसजी ,, ,,
१३ मौंट स्टुअर्ट एल्फिन्स्टन ,, ,,
१४ सर जॉन माल्कम ,, ,,
१५ दुर्गाराम मंछाराम पृ० १५४
१६ आर्देशिर धनजीशाह पृ० १६२
१७ मराठी भाषेचें व्याकरण (मुखपृष्ठ) पृ० २८८
१८ मराठी लघु व्याकरण (मुखपृष्ठ) पृ० ३०६
१९ एम्यान्युएल स्वीडनबोर्ग पृ० ३११
२० स्वीडनबोर्गनें पाहिलेला परलोक पृ० ३१३
२१ रा. ब. राम बाळकृष्ण पृ० ३९६ जवळ

रा. ब. दादोबा पांडुरंग

| | | |
|---|---|---|
| २२ | कर्नल जॉन ब्रिग्स | पृ० ३९६ जवळ |
| २३ | डॉ. भाऊ दाजी | ,, ,, |
| २४ | दादाभाई नौरोजी | ,, ,, |
| २५ | सौ. अहल्याबाई | ,, ,, |
| २६ | श्री. वेणूबाई | ,, ,, |
| २७ | १८६० सालच्या सुमाराची चौपाटी | |

# रा. ब. दादोबा पांडुरंग

## पूर्वार्ध

[ आत्मचरित्र ]

संपादक

अ. का. प्रियोळकर

१

# × कुलवृत्त व जन्म

बहुत दिवसांपासून माझ्या मनांत असें आलें आहे कीं, आपणास जे जे विचार सुचतील ते ते टांचून ठेवावे म्हणजे कालांतरीं केव्हांतरीं ते राहिले असतां, आणि कोणी[1] सुज्ञ व समर्थ पुरुषाच्या हातीं लागले असतां, ते लोकहितार्थाच्या कामास कांहींतरीं उपयोगी पडतील. देहाची तर शाश्वती व भरंवसा नाहीं, व आपल्या विचारा प्रमाणें[2] कोणतीही गोष्ट करायास सद्यः आपल्या आंगीं तितकें सामर्थ्य नाहीं, मग जगन्नियंता जेव्हां तें आणवील तेव्हां आणवो. सद्यः तर इतकीच शक्ति आहे किं[3] लेखन, शाही[4] व पत्र घेऊन आपणास जे विचार सुचतील ते स्मरणार्थ टिपून ठेवावे[5]; इतकेंही जर न केलें तर एथें जनाचा आणि पुढें ईश्वराचा अपराध केल्या सारखें होईल. भगवान या विश्वरूप कुटुंबाचा पिता व नियंता होय; त्याणें ज्या पेक्षां या कुटुंबांत आपणास जन्म दिला आहे त्या पेक्षां जेणेंकरून एथें प्राणिमात्रांचें क्लेशाचें निवारण, त्यांत विशेषेंकरून आपले मानवजातीचे त्रिविध तापांचें उपशमन, होई अथवा होईल असें आपल्या बुद्धीनें दिसताहे, असे विचार आपल्या मनाच्या ठायीं उद्भवले असतां ते, सांप्रत नाहीं तर नाहीं, परंतु आपल्या मागेंही जनांस नकळवितां तसेच मनांत लपवून ठेवणें, आणि ते देहा सारखे नाशिवंत नसतां त्यांसही त्या बराबर नाशा प्रत पाठविणें

---

१ कोणा (?)

२ तृतीया विभक्त्यर्थदर्शक 'करून' व अपादानार्थी 'पासून' हीं अव्ययें सोडून बाकीचीं शब्दयोगी अव्ययें सामान्यरूपाशीं जोडूं नये, असें दादोबांचें मत आहे. **महाराष्ट्र-भाषेचें व्याकरण,** (आवृत्ती ७ वी) १८७९. पृ. ३६९–७० पहा.

३ 'कीं' व 'ही' हीं अव्ययें दादोबा कांहीं ठिकाणीं ऱ्हस्व व कांहीं ठिकाणीं दीर्घ लिहितात यासंबंधी नियम दादोबांचें महाराष्ट्र भाषेचें व्याकरण, पृ ३७१, किंवा **व्याकरणाची पूरणिका,** १८८१, पृ. १९९–२००.पहा.

४ शाई (फा० सियाही.)

५ तुळा–" आज सुधी घणीएक वार मारा मनमां आवतुं हतुं के जे अर्थे आ जगतमा मारो उद्योग जारी छे, अने जे जे विचार मारा मनमां उठेला छे, तथा उठे छे, ने उठशे ते सर्व लखी राखवा जोहिए..."—**दुर्गारामचरित्र.** ले० महीपतराम रूपराम नीलकंठ, १८७९, पृ. १३.

हा चौर्यकर्माहून मोठा अपराध होय. मीं सांप्रत नाहीं तर नाहीं म्हटलें याचें कारण माझ्या कित्येक वाचकांच्या लक्षांत आलेंच असेल. तें असें कीं साधुबुद्धीनें पाहतां हितकारक विचार सर्वदां लोकांस कळवत असावे हा मुख्य धर्म. परंतु कालवैगुण्येंकरून कित्येक गोष्टी परम हितकारक व खऱ्या असतांही लोकप्रवाह अज्ञाना मुळें त्यांस अनुकूळ नसतो, तेणेंकरून त्या व त्यांचा सूचक आदरास पात्र असतां उलट उपहासास्पद होतो, तेव्हां अर्थात् इष्टकार्याची सिद्धि न होतां, तितक्या चातुर्यानें तें काम न चालविलें तर तेणेंकरून अनर्थ होतो.

परंतु हे विचार टांचून ठेवण्याच्या पूर्वी जन्मादारभ्य आजपावेतों जे जे वृत्तांत घडत आले, त्यांचें स्मरण करून ते सर्व कालानुरूप यथाक्रम ग्रथित करून पुढल्या क्रमाशीं त्यांची योजना केली असतां तेणेंकरून आपल्या जन्माचा आदर्श आपण पुढें ठेविल्या सारिखें होईल, व तो पुढल्या दिवसांच्या सद्व्ययास कांहींसा हेतुरूपही होईल. म्हणोन प्रथमतः मागल्या गोष्टीस आरंभ करितों.

मुंबईंत शेतवडींत[१] माझा जन्म वैशाख वद्य ४ शके १७३६, मु॥[२] ९ मे सन १८१४ इस्वी, या दिवशीं झाला. माझ्या तीर्थरूपांचें नामाभिधान पांडुरंग व मातुश्रीचें यशोदाबाई. मीं [३]जन्मलों तेव्हांच माझ्या आईचें दूध उडालें. तें पुनः दुसरें मूल होई पर्यंत आलेंच नाहीं. या मुळें माझ्या आईस सासवानणंदांकडून फारच जाच सोसावे लागले. मीं दुधा साठीं टाहें टाहें रडावें, तेव्हां आमच्या आतेनें व आजीनें म्हणावें, "हे देवा, तूं चिडीमुंगी[४] यांस चारा देतोस, आणि या तान्ह्या बाळाचा चारा

---

१ सध्यांचें 'खेतवाडी' हें नांव पारशांच्या गुजरातीमुळें रूढ झालें आहे. 'शेतवडी' 'शेतोडी' किंवा 'शेतोर्डी' असेंही या भागाला म्हणत. पहा—"शेतोडी, ज्या ठिकाणीं हल्लीं पांच पांच सहासहा मजली पारशी लोकांनीं शेंकडों इमले उठविले आहेत, व इंग्रज लोकांस भाड्यानें देण्यास इंग्रजी तऱ्हेचे डौलदार हवाशीर बंगले बांधले आहेत ती सगळी शेती जमीन असून तेथें बारमास चिखल असे, व कोठें कोठें गरीब लोक हलक्या प्रतीचा भाजीपाला उत्पन्न करीत असत."—**मुंबईवर्णन**, गो. ना. माडगांवकर, १८६२, पृ. ५०.

२ (अरबी–मुताबीक), corresponding to, बरोबर.

३ इथपासून 'वाढविलें' पर्यंतचा मजकूर दादोबांनीं मागाहून जोडला आहे.

४ कीडमुंगी. शब्दाच्या आरंभीच्या कचा कांहीं ठिकाणीं च होतो. उदा० किरायत > चिरायत, कंदुक > चेंडु. पहा–किराते चः ।– हेमचंद्राचार्यकृत प्राकृत व्याकरण, १, १८३.



दादोबा पांडुरंग.



दादोबांचें हस्ताक्षर

पृष्ठ २ – १



राघोबा पांडुरंग

पृष्ठ १४२



दादोबांचें अखेरच्या
दिवसांतील वास्तव्यस्थान
( ठाकुरद्वार )

पृष्ठ ४०७

कशा नेलास ?"[१] मग तेथें आसपास घांटी लोकांचीं कांहीं झोंपडीं असत, तेथें एक ऐली नांवाची बायको होती तिला दूध होतें, परंतु तिचा एक मुलगा थानपिता[२] होता, त्यास तिणें पाजल्या वर आमच्या एथें मोठ्या मित्रतेनें येऊन मला पाजावें. त्या बाईचे आमच्या आईनें व आजांनीं मोठे आर्जव[3] करावे, तिला वस्त्रेंचिरगुटें द्यावीं. अशा त्या कुळवाडणीबाईच्या आर्जवानें मला माझ्या आईनें वाढविलें.

आमचें मुळचें राहणें वसईजवळ तरखड म्हणोन लहानसें खेडें आहे तिथलें. तेथें आमचे पणजे नारायणशेट राहत असत व त्यांचें दुकान होतें. पुढें आमचे आजे यशवंत यांचें लग्न जहाल्या वर ते सहकुटुंब मुंबईत रोजगारनिमित्तानें आले. पुढें एथेंच वसले. त्यांस तीन मुलें, दोन कन्या व एक कनिष्ठ पुत्र. दोघी कन्येचीं नांवें एकीचें कृष्णाबाई व दुसरीचें रेणुकाबाई. कृष्णाबाई आठनऊ वर्षांची असतां तिचें लग्न आमच्या आजानें मोठ्या थाटामाटानें केलें असें सांगतात. पुढें लवकरच ती मुलगी मेली; तेव्हां त्याच जांवयास तिची बहीण रेणुका दिली, त्याचें नांव बाळाजी[४] होतें. त्यांस मीं लहानपणीं पाहिल्याचें मला आठवतें.

---

१ येथें व पुढें कित्येक ठिकाणीं प्रत्यक्ष निवेदनांत (direct narration) अवतरण-चिन्हें मुळांत दिलेलीं नाहींत. अवतरणचिन्हें मराठींत रूढ करावींच कीं काय यावद्दल एके काळीं बायबलच्या मराठी भाषांतरकमिटीमध्यें १८५४ सालीं वाद जुंपला होता. त्यांपैकीं दोघां सुपरिचित विद्वानांचीं मतें येथें देतों:—

(1) " My opinion is decidedly against the use of quotation marks. I think they are quite contrary to the genius of oriental languages. I agree with Mr Allen in all that he has said against them and agree with Mr Hume, that " they are generally of no use whatever, " and that they are " often worse than useless." I, would, therefore avoid them. "—Tho. Candy.

(2) " I am for quotation marks. The use of them will be learned along with that of English punctuation which we agree to introduce. "—John Wilson, (**Oriental Christian Spectator,** 1854, p. 265)

२ स्तनपान करणारा.

३ (फा. आर्झू) नपुंसकलिंगी. येथें हा शब्द पुल्लिंगी वापरला आहे.

४ बाळाजी माधव कमलाकर.

आमचे तीर्थरूप एका महिन्याचे असतांच आमचे आजे निवर्तले. त्या काळीं त्यांचा सांभाळ करावयास आमची आजी उमाबाई व तिची धाकटी बहीण काशीबाई यां दोघी बायां शिवाय दुसरें कोणी नव्हतें. काशीबाई अकरा वर्षांची असतांच तिचा भ्रतार वारला, तेव्हांपासून ती बाळविधवा असून आपल्या वडील बहिणी कडेस असे. पुढें आमचे तीर्थरूप झाल्या वर लहानपणापासून त्या मुलास काशीबाईची शिक्षा[1] होती. आमची आजी उमाबाई ही काशीबाई प्रमाणें दक्ष नसे. थोडी भोळसर मात्र असे. काशीबाईनें मोठा श्रम घेऊन त्यास विद्येच्या मार्गास लाविलें. आमच्या आजाचें घर रामवाडी जवळ होतें. तें घर ते निवर्तल्या वर आमचे तीर्थरूप लहान असतांच आजाच्या कर्जदारांनीं घेतलें. काशीबाईला जरीं लिहितां वाचतां येत नव्हतें, तरीं आपल्या बहिणीचा फार गरिबीचा संसार म्हणोन लोकांचा आर्जव करून त्यांज कडून मुला करितां कागद, लेखण्या, पुस्तकें, मागून आणून आपण त्यास उनाड होऊं न देतां त्याज करवीं चार अक्षरें करविलीं; हा त्या आपल्या मावशीचा उपकार आमचे तीर्थरूप आह्मां जवळ स्वतः आठवित असत. पुढें तितक्या गरिबींत असतां दोघी बहिणींहीं मुलाची मुंज आणि लग्न केलें. आमची मातुःश्री ही कृष्णाजी शेट यांची कन्या. त्या काळीं वसईंत यांचा व्यापार-धंदा फार चांगला चालत होता; व घरचे सुखी होते. व यांचें कुटुंबही फार मोठें असे. असें सांगतात कीं या घरांत लहान मुलां करितां सकाळीं न्याहारीस दोन पायल्यांचें आटवल[2] म्हणजे जाडी पेज लागत असे. परंतु पडता काळ आला म्हणजे पहा कसा लौकर नाश होतो तो. त्या घरांत आतां तीन म्हातारीं मनुष्यें मात्र राहिलीं आहेत. एक भाऊ व दोघी विधवा बहिणी. यांतून एकासही संतान नाहीं; तेव्हां अर्थात् या कुटुंबाचें थोड्याच दिवसांत निर्मूल होणार.

पहिल्यानें आमच्या तीर्थरूपांचा संसार फार गरिबीचा होता; परंतु पुढें त्यांहीं आपल्या उद्योगानें व श्रमानें तो चांगला थाटास आणिला. त्यांणीं शेतवाडींत एक स्वतांचें लहानसें घर विकत घेतलें त्यांत माझ्या सुद्धां आह्मीं पांच भावंडें जन्मलों. या देशाच्या सांप्रतच्या स्थिती प्रमाणें पाहिलें असतां आमच्या तीर्थरूपमातुःश्रीचा जोडा फार सुखी होता. परस्पर एका विचारानें व एकमेकां वर मोठी प्रीति करून

१ शिक्षण, देखरेख.

२ गोमंतकांत गूळ नारळ व मेथी घालून बाळंतिणीकरितां केलेल्या तांदळाच्या पेजेला 'आटवल' म्हणतात.

असत. आमच्या तीर्थरूपांची फार साधुवृत्ति होती. लहानपणापासून भगवद्भजन, कीर्तनश्रवण, याज वर त्यांची मोठी आवड असे. माझ्या जन्मापासून मीं त्यांचा असाच नियम पाहत आलों कीं मोठ्या पहांटेस, सर्व घरांतल्या माणसांच्या अगोदर उठावें, नंतर मुखमार्जन करून कांहीं भगवत्स्मरण करावें, म्हणजे अभंग, भूपाळ्या,§ इत्यादि म्हणाव्या. नंतर प्रातःस्नान करून देवपूजा करावी; इतक्यांत एक दोन घडी दिवस चढे; मग देवदर्शनास जाऊन परत घरीं येतांना घरांत काय जें संसारोपयोगी पदार्थ लागतील ते स्वतः आणावे. नंतर भोजन उरकून आपल्या उद्योगा वर जावें. तेथून संध्याकाळीं घरीं येतांना कोठें देवालयीं पुराण, कीर्तन होत असेल, तें ऐकून रात्रीस आठा तासाच्या सुमारास घरीं यावें. नंतर फराळ उरकून कांहीं लिहावयाचें काम असेल तें लिहून, पुढें हरिविजय, भक्तिविजय, दासबोध इत्यादि प्राकृत ग्रंथांचा एक अध्याय वाचावा. व हातांत चिपळ्या घेऊन एक तास पर्यंत भजन करावें. मग निजावयास जावें, असा त्यांचा एकसारिखा वीस वर्षे पर्यंत मीं नियम पाहिला. आह्मीं लहान मुलें असतां आह्मांसही कधीं कधीं भजनास आपल्या बरोबर घ्यावें. त्यांचा हा असा नियमच आमच्या सुशिक्षेस मुळीं कारण झाला, असें म्हटल्यास चिंता नाहीं. आमच्या आईस आह्मीं भाऊबहिणी मिळून सव्वा, दीड वर्षाच्या अंतरानें पंधरा मुलें झालों. त्यांतून आईबाप असतां

§ त्यांतून एक ज्ञानेश्वराची भूपाळी मला अद्यापि आठवते. ती आत्मज्ञानपर असल्यानें बुधजनांस फार आवडाया सारखी आहे. ती अशी:—

## भूपाळी ज्ञानेश्वरकृत.[1]

उठीं उठीं बा गोपाळा उघडीं स्वरूपलोचना। सरली अविद्यारात्री उदयो झाला रविकीरणा ॥ध्रु०॥ * * दशमास चांदणिया दिसते ठायीं लोपलिया। लिंगदेहपद कमळीचें सुकोन गेलें तें विलया॥ वैराग्यरश्मिज्वाळा चित्तीं उगवे रविकांत। धरितां प्रकटे वन्हि विषयवन हें जाळित। तृष्णेच्या श्वापदां प्रळयो वर्ते अद्भुत। विषय हें मृगजळ मूढां मृगां भ्रमवित॥ उठीं उठीं॥ ध्रु०॥ १॥ + + + वाग्वाद्याच्या उलुका रिघती मौन्याच्या ढोलीं॥ उपनिषदाच्या अर्थें शब्दें करिती कोकिळी—

[1] ज्ञानेश्वरमहाराजांचा अभंगाचा गाथा, (इंदुप्रकाश), १९०६, पृ. ११५ मध्यें सबंध भूपाळी पहा.

नऊजणें लहानपणींच निवर्तलीं. बाकी सहाजणें राहिलीं. या सर्व पंधरा मुलांत मीं ज्येष्ठ. बाकी पांच जणांचीं नांवें–भास्कर, सुंदराबाई, राघोबा, आत्माराम, आणि दीनानाथ§. आमच्या चाली प्रमाणें लहानपणींच आमच्या मुंजी व लग्नें यां करितां आमच्या तीर्थरूपांस खर्चायाची फार ओढ येई, तेव्हां ते फार कंटाळून म्हणत कीं, "हा संसार टाकून मीं पंढरपुरास जाऊन केव्हां साधु होईन!" आमच्या तीर्थरूपांची भक्ति पूर्वीपासून पंढरपूरसांप्रदायी वैष्णवमार्गा कडेस विशेष असे.

---

§ यांतूनहि आतां दीनानाथ आणि भास्कर हे अल्पवयांतच अनुक्रमें इ. स. १८३७ सांत व १८४७ सांत परलोकास गेले. भास्कर हे ३१ व्या वर्षी दोन मुलें मागें टाकून एकाएकी परलोकवासी झाले. आणि दीनानाथ हा आमचा धाकटा भाऊ इ. स.......

२

## बाळपणाचें स्मरण

मनुष्याच्या तीन अवस्थें मध्यें बाळपण ही अत्यंत आनंदरूप अवस्था होय. मीं अत्यंत बाळपणाची गोष्ट सांगत नाहीं. परंतु जेव्हांपासून कांहीं समजूं लागतें, केवळ शून्यावस्था नव्हे या अवस्थेचा आरंभ, पाय आणि जीभ या दोहों इंद्रियांच्या व्यापाराच्या आरंभा बरोबर जाणावा. बाहेरील पदार्थांचें मनावर प्रतिबिंब पडून त्याचें ज्ञान जहाल्या विना बोलणें ही क्रिया संभवत नाहीं; मग हें ज्ञान सुपरीत अथवा विपरीत अथवा कांहीं अंशांनीं सुपरीत व कांहीं अंशांनीं विपरीत कां होईना. तथापि आणखी लक्षांत ठेविलें पाहिजे कीं ज्या प्राण्यास ईश्वरानें वक्तृत्वशक्ति दिली आहे म्हणजे एकटा नररूप जो प्राणी, त्याच्याच मनावर बाह्य पदार्थांचें प्रतिबिंब पडलें असतां तज्जन्य ज्ञानाची शब्दोद्घाटनरूप जी क्रिया ज्यास वाणी असें म्हणतात,ती घडती;[१] वरकड हें प्रतिबिंबाचें ज्ञान पश्वादिकांतही न्यूनाधिक संभवतें. परंतु त्याचें उद्घाटन करून तें आपलें ज्ञान सर्वांशेंकरून दुसऱ्यास शब्दरूपानें समजाविणें ही शक्ति त्यांच्या आंगीं पूर्ण नाहीं. म्हणजे नरा इतकी नाहीं. बाळपणांत रोगी शरीर नसल्यास बाळपण ही अत्यंत आनंदरूप अवस्था होय. यास दृष्टांत जसा एकादा गांवढ्यांतला मनुष्य एकाएकीं मोठ्या शहरांत आला, आणि जेथें अनेक प्रकारचे अपूर्व पदार्थांचा संग्रह आहे अशा दुकाना पुढें त्यास उभें केलें म्हणजे त्यांतील एकएक नवा पदार्थ पाहून त्यास जसा चमत्कार व आनंद होतो तद्वत् लहान मुलांस ज्ञान होऊं लागलें म्हणजे जो पदार्थ त्यांस दाखवावा तो त्यांस नवा व अपूर्व वाटून मोठा आनंद वाटतो, व तो आपणा जवळ असावा ही मोठी इच्छा असती. मग तो पदार्थ कितीं कां क्षुल्लक असेना. तथापि तो आपणा जवळ असावा असें त्यांस वाटतें. ही गोष्ट सर्वांच्या अनुभवास असेल कीं बाळपणीं राघू, मैना, खबुतरें किती आवडत असतात. व ही त्यांची साहजिक आवड पाहून अत्यंत लहान मुलें रडूं लागलीं असतां आई त्यास बाहेर नेऊन राघू, मैना, कावळे दाखविते अथवा एकादें खेळणें त्याज पुढें ठेविते. मनांत

१. ' घडती ' बद्दल घडत्ये किंवा घडते हा कोंकणी प्रयोग असून तोच आत मराठी-मध्यें रूढ झाला आहे. **The Principles of Murathee Grammar** by Rev. Stevenson, 1854, पृ. १५ पहा.

कीं त्याज कडेस मुलाचें लक्ष गेलें म्हणजे तें रडें एकी कडेस टाकील. अत्यंत लहानपणीं पदार्थांच्या नुसत्या दर्शनानें आनंद होतो, आणि पांच सहा वर्षांचें वय झालें म्हणजे त्याचें स्वामित्व मज कडेस असावें व त्याचा उपभोग मीं वारंवार घेत असावा अशी इच्छा उत्पन्न होत्ये. मला पक्कें स्मरण आहे कीं मीं सहा सात वर्षांचा असतां ज्यां काळीं माझी मुंज झाली त्या काळीं, आमच्या लोकांच्या रीती प्रमाणें मुलांच्या आंगास हळद लाविली म्हणजे त्यांस कांहीं पिशाचबाधा होऊं नये म्हणोन त्याच्या हातांत एक लहानसा चाकू देत असत. तो त्यांणीं हळद अंगावर आहे तों पर्यंत निरंतर आपल्या जवळ बाळगावा. हा पहिलाच चाकू माझ्या हातीं आला त्या काळीं मला स्मरण आहे कीं त्या पासून मला जो आनंद झाला, तसा आनंद आतां कोणी राजानें एक गांव बक्षीस केला असतांही होणार नाहीं.[1] तो चाकू हातांत येतांच किती उडलों नाचलों; आणि घडीघडी जाऊन बाबांस व आईस विचारावें कीं, "हा माझा चाकू हो, मीं आतां परत देणार नाहीं." पुढें आजीनें एक लहानशी पेटी दिली. त्या पेटी साठीं मीं तिची पूर्वी किती काकळूत केली तो विचार आतां मनांत आणला म्हणजे मोठा चमत्कार वाटतो. दिवसांतून दहावीसदां तिच्या पायां पडावें, दीनवाणें तोंड करावें. मागायास धैर्य तर होऊं नये, मग हळूच तिच्या तोंडा कडेस पाहून म्हणावें, "बाई, मला तुझी तेवढी पेटी नाहीं देत?" आणि मग लाजून लागलेंच पळावें. काय बाळपणाची मौज! लहानपणीं असें वाटतें कीं एकादा पदार्थ जसा आपणास आवडतो तसाच आपल्या आईबापांस आवडत असेल. तेव्हां ते आपणास तो कसे देतील, असें वाटून एकादा क्षुल्लक-अत्यंत क्षुल्लक पदार्थही मागायास मोठा संकोच वाटतो. गरीब बापडीं मुलें. आईबापांहीं व सर्वांहीं त्यांचे

---

१ अशाच प्रकारचे विचार दादोबांनीं '**माबाईच्या ओव्या**' या आपल्या एका अप्रकाशित काव्यांत प्रदर्शित केले आहेत:

गांवांची सनद । मिळे पाटलाला । पावे हरुषाला । मन त्याचें. ॥
त्याहून अधिक । हर्षे नाचे बाळी । नेसवी पुतळी । तिची कोणी. ॥
देई कोणी बाळा । चमकीदार टोपी । नाचत भोरपी । दावी त्याला. ॥
नवी चेंडूफळी । रंगीत भोवरा । देई तो सोयरा । होय त्याचा. ॥
अश्या अल्पमोलें । तोषती बाळकें । करावीं कौतुकें । कां न त्यांचीं ? ॥
मोठ्या देणगीनें । राजाचा दिवाण । संतोष पावे न । तोच जरी ॥
देतां बाळकांना । अगडबगड । होती तरी [नांहें] गोड । कां न त्यांचीं ? ॥
साबडीं निर्दोष । मनें न वगावीं । कां न पुरवावीं । कोडें त्यांचीं ? ॥

असले निर्दोष लळे पुरवित असावे; यांत मोठा आनंद आहे. शेवटीं आपल्या पेटींत कांहीं ठेवायास नसलें तर चांगले वाटोळे धोंडे आणून ते त्यांत भरावे, आणि मग आपल्या भावंडांस ती आपली संपत्ति वारंवार दाखवित असावी. मग त्यांहीं आपला मत्सर करून रडावें, व त्यांत एकादा दांडगा व बलिष्ठ असला म्हणजे त्याणें आपणास मारून तो पदार्थ आपणापासून घ्यावा, मग एक मोठा कलह होऊन ती फिर्याद घरांत बाई जवळ जावी, मग तिला राग आला, म्हणजे तिणें तें कलहाचें मूळच काढून घ्यावें, मग सर्वांहीं एवढीशीं तोंडें करून उगीच बसावें.

तसेंच लहानपणीं बाहेर आईबापा बरोबर फिरायास जाण्याचीही फार आवड असती; घरांत कोंडून राहणें मुलास आवडत नाहीं व त्याच्या शरीरास तें हितकारकही नव्हे. त्यांत आणखी रस्त्यांतून आईचा अथवा बापाचा हात धरून त्याज बराबर चालण्याची त्यास अधिक हौंस[1] असती. तितक्या बाल्यदशेंतही थोडासा डौल दाखविण्याचा अंकूर मनांत असतो. चांगलीं वस्त्रें घालून रस्त्यांतून मिरवित मिरवीत जाणें हें थोड्या मुलांस नाहीं आवडत असें नाहीं. त्यांत एऱ्हवी फिरणें त्या पेक्षां बागेंत अथवा इष्टमित्रां कडेस, अथवा आपल्या लहानशा संवगड्यांस भेटावयास जाण्यास मुलांस अधिक आवडतें. परंतु साऱ्या पेक्षां यात्रेंत जेथें नानाप्रकारचे पदार्थ, विशेषेंकरून खाऊ आणि खेळणीं मिळत असतील तेथें जाण्यास पराकाष्ठेची हौंस असती. त्यांस दोन दिवस अगोदरच माहीत असतें कीं आतां अमुकी यात्रा अथवा मेळा येणार, तेथें आपणास काय काय खरीद करण्याचें त्याची मसलत मुलां मध्यें पुष्कळ दिवसांपासून चालत असत्ये. आणखी तो दिवस आला रे आला म्हणजे त्या दिवशीं घरांतल्या माणसांच्या अगोदर उठायाचें. नित्य आंघूळ करायास अथवा जेवायास खळ[2] करायाची त्या प्रमाणें त्या दिवशीं आईबापांची मर्जी ठेवण्या करतां करायाची नाहीं, व यदा कदाचित् विसरून घडली तर आईनें म्हणावें, "मुला आज तुला यात्रेस जावयाचें नाहीं बरें." बापानें म्हणावें, "जर तूं रडला नाहींस तर मीं तुला नेईन, नाहीं तर नेणार नाहीं;" म्हणजे लागलेंच निमूटपणानें ऐकावें. या असल्या दिवशीं त्यांचा लहानसा जीव मोठा प्रसन्न असतो, म्हणोन आईबापांनीं असली मुलांची हौंस अवश्य पुरवावी, पुरवित असावी. कित्येक आईबापें अशीं क्रूर व

१ (फा. हौस) अनुस्वार पहा. गुजरातीमध्यें 'हौंस' असाच सानुस्वार शब्द वापरतात. (पहा–रा. सा. **मोहनलाल झवेरीनु संक्षेप जीवन चरित्र, पृ. ४५**)

२ हट्ट.

दुरमुखलीं असतात कीं असल्या दिवशीं घरांत कलह करितात, व आपण दुःखी व त्या गरीब लहानशा जीवांसही दुःखी करितात. या असल्या सणाच्या दिवशीं आईबापां मध्यें अंमळ कलह झालासा मुलांनीं पाहिला म्हणजे तीं केवळ दीनवाणीं होऊन एकमेकांच्या तोंडाशीं पाहतात, मनांत कीं हा यांचा कलह आपल्या सुखास प्रतिबंधक होय. कित्येक बाप व आया तर मीं इतक्या निष्ठुर पाहिल्या आहेत कीं मुलां देखतां आपण चांगला थाटमाट करून त्यांस तसेंच घरीं कोंडून ठेवून आपण बाहेर मेळेतमाशे पाहायास जातात. कित्येक दुष्ट तर तीं रडूं लागलीं असतां आणखी त्यांस मारितात. लहान मुलांचे निर्दोष लळे जर त्यांच्या वडिलांहीं न पुरवावे आणि त्यांस जर त्यांहीं वारंवार सुख न देत असावें तर त्या अनाथांहीं कुठें जावें ! म्हणोन लहानपणीं मुलांस प्रसन्न ठेवणें हा वडिलांचा मुख्य धर्म होय. मन प्रसन्न असलें म्हणजे तेणेंकरून त्यांच्या शरीरासही मोठें हित आहे. पोरें खुजट व रोगी व मंद होतात त्याचें बहुधा कारण हें कीं त्यांचीं वडिलें त्यांस मोठ्या जरबेंत आणि नेहमीं घरांतच ठेवितात. म्हणोन, लहान मुलांस त्यांच्या वडिलांनीं अत्यंत प्रीतीनें वागवावें; त्यांचे निर्दोष लळे पुरवित असावे ; आणि त्यांहीं एकादे वेळेस भलताच छंद घेतला असतां, अथवा खोडी केली असतां दटावणें झाल्यास जवळ घेऊन ममतेनें, मुला असें करूं नये, असें केलें असतां असा परिणाम होतो, असें सामोपचारानें त्यास सांगत असावें; मुलां बरोबर दिवसांतून एकदां तरी त्यांच्या समजुती प्रमाणें गोष्टी करित असाव्या. त्या वेळेस त्यास हळु हळु सदुपदेश करित असावा. त्यांत बहुतकरून आईनें नेहमीं मुलांच्या सदाचरणा कडेस बारीक लक्ष देत असावें. बापा पेक्षां आईशीं मुलांचा फार सहवास असतो, म्हणोन विशेषेंकरून तिचें लक्ष त्यांच्या सुशिक्षणा कडेस अधिक असलें पाहिजे. जसा माळी बागांत काम करित असतां नव्या रोप्या कडेस त्याचें अधिक लक्ष असतें, म्हणजे कोणत्या रोप्या खालीं गवताची काडी उगवूं लागली असतां तो उपटून टाकतो, आणि एकाद्या लहानशा वेलाच्या डहाळीचा भलते कडेस नेटावा असला तर तो नीट करून जेणेंकरून ती डहाळी अधिक टवटविन होऊन जीव धरील असा रीतीनें तीस आधार देतो तसें आईबापांनीं व वडिलांनीं मुलांच्या मनाच्या अंकुरा कडेस बारीक रीतीनें पाहून त्यांस सुप्रवण करित असावें. "यमने, तूं आपली बाहुली विनूला घेऊं देशील ?" यमनी म्हणते, "मी कां घेऊं देईन ? ती माझी बाहुली." आईनें म्हणावें, "तर मग त्याचा भोंवरा तूं घेऊं नको, तो तुला घेऊं देणार नाहीं." असें सांगितलें असतां यमनीच्या लहानशा

मनास वाटतें कीं आई बरावर सांगत्ये. "पण बये, जर मीं आपली बाहुली विनूस दिली तर मग तो आपला भवरा मला देईल किं नाहीं?" "ती त्याची खुशी, जर त्यास वाटलें तर तो देईल, नाहीं तर देणार नाहीं. तुझी जर तुझ्या बाहुलीवर सत्ता आहे तशीच त्याच्या भोवऱ्या वर त्याची सत्ता आहे; म्हणोन तुम्हीं खुषीनें एकमेकांची वस्तु एकमेकांस देत घेत असा; जबरीनें एकमेका कडून घेऊन भांडूं नका." असा त्यांस उपदेश केल्या वर पुढें अशाच गोष्टी वरून त्या मुलांचें भांडण लागलें असतां त्यांस या उपदेशाची आठवण द्यावी, आणि त्यांच्याच तोंडून न्याय करवून कलह मोडावा. तसेंच खोटें बोलणें, चोरी करणें, अशा अपराधांचे अंकूर मुलां मध्यें उगवतां पाहिले म्हणजे तत्क्षणीं मुलांनो असें करूं नये, असें केलें असतां असें होतें, असा कोमलपणानें त्यांस बोध करित असावा. एका मुलानें एकादी चांगली गोष्ट केली असतां दुसऱ्या मुलां समक्ष त्यास शाबासकी द्यावी. लहान मुलांस चांगल्या शिक्षेस लावणें ही कांहीं लहानशी गोष्ट नाहीं. मोठ्या विद्वत्तेची गोष्ट आहे. लहान मुलांचें दुःख सुख पाहणें, आणि त्यांस आनंदांत ठेवणें त्यांत मोठा सूक्ष्म विचार आहे. या विषयीं पुष्कळ लोक अनास्था करितात म्हणोनच पुढें प्रजा वाईट होत्ये. लहान मुलांच्या मनांत जे जे सद्गुणाचे अथवा दुर्गुणाचे अंकूर उगवतात ते विचाराच्या सूक्ष्म दृष्टीनें पाहणें, आणि त्यांस उत्तेजन देणें अथवा त्याचा हिरमोड करणें हें मोठें चातुर्याचें काम आहे, म्हणोन असें चातुर्य आईच्या ठिकाणीं पाहिजे. याज करितां आया सुशिक्षित पाहिजेत तरच प्रजा चांगली होत्ये. तेव्हां स्त्रीशिक्षणाचा देशकल्याणाशीं किती निकट आणि अपरिहार्य संबंध तो पहा[१].

माझ्या[२] लहानपणीं म्हणजे थोडेसें बोलायाला येऊं लागलें त्या तीन चार पांच वर्षांच्या वयांत जेव्हां आमची आत रेणुकाबाई, (तिला आम्हीं सारीं आक्का म्हणत असों, ती) जेव्हां सात आठ दिवस माहेरीं राहायास येत असे तेव्हां तिणें मला आपल्या जवळ घेऊन श्लोक बोलायास शिकवावें. त्या श्लोकांची अद्यापि मला आठवण आहे; ते असे—

---

१ तुल०–Prize essay on the condition of Hindu females by Dadoba Pandurang. O. C. S. 1841, pp. 335—345.

२ "माझ्या लहानपणीं"...पासून "वेढा पंढरीला पडला." पर्यंतचा मजकूर दादोबांनीं मागाहून स्वाक्षरें जोडिला आहे.

'मोरया मोरया नाम तूझें।
कृपासागरा हेंचि माहेर माझें ॥
तुझी सोंड बा वांकुडी एकदंता।
मला बुद्धि द्यावी मोरया ज्ञानवंता ॥
'मनी पोंवळी गाय माझी पळाली।
तिला शोधितां रात्र मध्याह्न झाली ॥
तिच्या जाग्रणें नेत्र आरक्त झाले।
कधीं ठाउकेना असे कष्ट केले ॥'
'अगे राधिके राधिके रूसलीशी ॥
पलंगा वरी जाउनी बैसलीशी ॥
पलंगा वरी सेज चांप्याकळ्याची।
कधीं येशि गे आण माझ्या गळ्याची ॥'

बरें झालें त्या बाईलाही या श्लोकांचा कांहीं अर्थ समजत नसे. आणि मीं तर अर्भक लहान मूल होतों. आमच्या जुन्या लोकां मध्यें व आतांही बहुतेक लोकां मध्यें लहान मुलांना प्रथमतः काय शिकवावें याचा कांहींच विचार नव्हता व भलत्याच अर्थांचे श्लोक, आर्या शिकविण्यांत त्यांस लाजही वाटत नसे.

मीं सात आठ वर्षांचा झालों तेव्हां आमची आई यशोदा (तिला घरांत मासवा व नणंद यश्वदी म्हणून हाका मारीत व आह्मां मुलांस त्याच नांवानें तिला हाका मारायास सांगत. या वरून प्रथम मीं आणि माझ्या मागून भावंडें), तिला यशोदा या नांवानें हाका मारूं लागलों; हिणें कधीं कधीं फुरसतीच्या वेळीं आह्मां दोन तीन मुलांस आपल्या जवळ बसवून कांहीं राजेराण्या यांच्या कहाण्या सांगाव्या. त्या ऐकण्याची लहान मुलांस फार आवड असत्ये. मीं तीस रिकामी पाहिली म्हणजे म्हणावें, "यशोदे आज आह्मांस कांहीं कहाण्या सांग, व गाणीं म्हणून दाखीव." मग फुरसत पाहून कांहीं गाणीं म्हणावीं. त्यांत तिनें असें सांगितलें किं " माझ्या माऊसभावाच्या बायकोस फार वर्षे मूलबाळ होत नव्हतें. त्या मुळें ती फार कष्टी असे. तिणें आह्मां सारख्या पोरींना घेऊन वांझ बायकोला किती दुःख असतें त्याचें वर्णन कोणी कवीनें फार सरस गाइलें आहे तें म्हणून दाखवें गाळावीं. तें कवन आमच्या आईनें आह्मांस सास्वानणंदेच्या भयानें एकां कडेस म्हणून दाखवावें.

तिलाही तें थोडें तेव्हां त्रुटकच येत होतें. त्यास आतां साठ वर्षें झालीं.[1] मला सगळें कोठून आठवेल?

§ सर्व गोष्टी अनुकूल कृपा परिपूर्ण ईश्वराची ।
नसे न्यूनता घरीं गे बाई कुण्या पदार्थाची ॥

* * *

कायावाचामनें भूकेली एका बाळकाची

* * *

आपआपल्या घरिं नारि मुल घेउनि कडे
राहताति उभ्या हंसत भ्रतारा पुढें
बोलविती मुलापासुनि वेडेंवांकुडें
हंसविती पतीला एका बाळा कडुन
रिझविती पतीचें मन एका बाळा वरुन
धिक् धिक् माझें जिणें ग बाई धिक् धिक् माझें जिणें
एका बाळका विणें ग, एका बाळका विणें
घर मंदीर दिसतें शुन ग, बाई घर मंदीर दिसतें शुन
म्यां पिंपळा प्रदिक्षणा घातल्या किती

* * *

अझूनि मजला प्रचीत कुणाची येईना संसारीं ॥ ९ ॥
येईना संसारीं एक बाळक पोटीं नाहीं
धिक् माझें वांझपण कधीं फिटल बाई
कधीं फिटल बाई एक बाळक पोटीं नाहीं ॥ १० ॥

---

§ मला वाटतें हें होनाजी बाळाचें कवन असावें. त्याचा पुष्कळ वर्षांपासून शोध करितों, परंतु त्या कवनाचा आतां कोठेंच थांग लागत नाहीं[2]. असलीं कवनें मनुष्यस्वभाववर्णनपर असल्यानें फार गोड व सरस समजलीं पाहिजेत. तीं नाहींशीं होणें खेदाची गोष्ट आहे.

१ लेखनकालनिर्देश पहा. (i) आपल्या सातआठ वर्षें वयाच्या आठवणी सांगतांना ' त्यास आतां साठ वर्षें झालीं, ' असें ते म्हणतात. त्यावरून आपल्या वयाच्या ६७–८ व्या वर्षी म्हणजे इ. स १८८१–८२ सालीं त्यांनीं हा मजकूर जोडलेला स्पष्ट दिसतो.

२ सबंध कवनाकरितां **होनाजी बाळकृत लावण्या,** (चित्रशाळा प्रेस, पुणें) **१९२४,** पृ. ८० पहा.

कधीं तिणें मला मागें कांहीं वर्षां[१] वर पंढरपुरीं भीमेस मोठा पूर आला होता त्याचें वर्णन कोणी कवीनें एका पवाड्यांत सरस वर्णिलें आहे तो पवाडा म्हणून दाखवावा. तोहि आतां मला बराबर आठवत नाहीं. परंतु कांहीं त्रुटक आठवतो तो एथें लिहितों; कारण अशा मनुष्यस्वभाववर्णनपर आणि ऐतिहासिक कांहीं अपूर्व गोष्टी पडतात त्यांच्या वर्णनाचीं कवनें आतां नष्ट होत चाललीं आहेत.

§ 'शके सोळाशें पंचायशीं। शके सोळाशें पंचायशीं।
सुभानुनाम संवत्सरे आली एकादशी। आषाढी शुद्ध एकादशी

*  *  *

अपार पडलें पाणी वेढा पंढरिला पडला।
भिमेला महापूर आला, चंद्रभागेला महापूर आला, अपार ॥ ध्रु० ॥

*  *  *

दुकानदारांची मोठी अबदा[२] । दुकानदारांची मोठी अबदा
पाय निसरुनी पडती बदबदां। म्हणती हात घाहो दादा
यात्रेकरांचीं पोरें हंसती खदखदां

*  *  *

मिठाई मेवा। अरे हरि मिठाई मेवा। वाहुनियां गेला।
नाश कितिकांचा झाला॥
अपार पडलें पाणी वेढा पंढरिला पडला॥ ध्रु० ॥

---

१ हा मूळ सबंध पवाडा मिळत नाहीं.

§ म्हणजे इ. स. १७६२. सानिपत पानपतची लढाई झाल्यावर दुसरे किंवा तिसरे वर्षी.

२ आपत्ति, दुर्दशा ( सं. आपदा )

३

# × मराठी शिक्षणाचा प्रारंभ व मुंजीबंधन

मला वाटतें मी दोन किंवा तीन वर्षांचा असेन तेव्हां माझ्या बापानें मला मूळाक्षरें उच्चारायास शिकविण्याचा आरंभ केला. ते बाहेरून घरीं आले म्हणजे केव्हां केव्हां फुरसतीच्या वेळीं मला जवळ घेऊन [ त्यांनीं ] श्रीगणेशायनमः ॐ नामासिधं अ आ इ ई असें उच्चारायास शिकवावें. त्या वेळेस हीं अक्षरें मला एक एक चित्र भिंती वर लिहिल्या सारखें दिसे. अगदीं लहानपणीं म्हणजे सुमारें वर्षाच्या वयांत बालकास सर्व काय ती आपली आई दिसूं लागत्ये, अथवा तिचा भास होतो. शब्दाचें ज्ञान कायनु बायनुच[१] होतें. मला असें आठवतें कीं रात्रीं फकीर भीक मागावयास येत, आणि ते कांहीं गाऊन बोलत तें मला असें भासे कि माझी आईच बोलत आहे. अगदीं लहानपणीं मुलास आई शिवाय दुसरें कांहींच भासत नाहीं; ज्यांत त्यांत ती दिसत असत्ये. लहानपणीं मीं जेव्हां जेवित नसें अथवा कांहीं खोडी करित असें तेव्हां वडिलांनीं मला एका लिंगणबावाचें भय दाखवून सांगावें कि "जर तूं रडलास तर तो लिंगणबावा तुला आपल्या झोळींत घालून नेईल, त्याच्या झोळींत अशीं पुष्कळ पोरें घातलीं आहेत." मग त्या वेळेस तो म्हातारा बावा भिक्षा मागायास आलाच असला तर त्याणें आपले झोळीशीं तोंड नेऊन कांहीं गुडगुड शब्द करावे म्हणजे मला आंतलीं पोरें रडतात असा भास व्हावा. मला अगदीं खरें वाटत असे कि तो म्हाताराबावा आपल्या झोळींत पोरें नेई, मग मीं त्याला भिऊन चूप राहावें. मोठेपणीं एकादा गांव वसविण्याची जितकी हौस असत्ये, तिज पेक्षांहि बाळपणीं एकादी नवी वस्तु अथवा पांखरूं, कुत्र्याचें पोर आपलेंसें करण्याची अधिक हौस असत्ये. मला पक्कें आठवतें कि मीं पांच सहा वर्षांचा असतां मीं शाळेंत होतों तेथें एका माझ्या एवढ्याच मुलानें 'मजजवळ शाळोंकी आहे' म्हणून सांगितलें आणि ती मला त्याणें एक दोनदां आपल्या घरीं नेऊन दाखविली. ती मला द्यावी म्हणोन म्यां त्या मुलाची फार खुशामत केली. त्याणेंहि तसेंच कबूल केलें. परंतु घरच्या माणसांची अडचण

---

१ कायनूबायनू, कायणुवायणु किंवा काण्णूबाण्णू. "A term expressive of insignificance or indefiniteness." (J. T. Molesworth). पहा– 'धुतारे लोकांकडून कायणु बायणु घेऊन "–यशोदापांडुरंगी, १८६५, प्रस्ता० पृ. २४.

सांगितली. परंतु ती आपल्या हातीं कशी येईल आणि कधीं येईल म्हणून मीं त्या मुलां बरोबर मोठ्या हौसेनें मसलत चालवित्ये होतों. तो मुलगा शाळेंत आला म्हणजे मला मोठा आनंद वाटावा, आणि त्याच्या जवळ जाऊन बसावें, आणि शाळेची हातीं कशी येईल याच्या मसलती कराव्या.

लहानपणीं शाळा आणि पंतोजी यांचें फार भय असतें, आणि हा शाळेंत जाण्याचा त्रास आनि पंतोजींचें भय पुष्कळ वर्षे पर्यंत मनांत असतें. मला वाटतें मला तर हें भय मीं बारातेरा वर्षांचा होई तेथपर्यंत सारिखें होतें. त्यांत अत्यंत कोमल वयांत म्हणजे सुमारें पांचापासून आठ वर्षां पर्यंत तर पंतोजी म्हटला म्हणजे मोठा भयंकर दिसे. त्याची ती मुद्रा, त्याच्या हातांत छडी, आणि त्या छडीनें तो दुसऱ्या पोरांस मारतां पाहिलें म्हणजे तो लहान मुलांस काळा सारिखा भयंकर दिसे. लहान मुलांस तोंडानें एक दोन अंकांची बेरिज, वजाबाकी, आणि गुणाकार सांगणें फार कठिण पडतें. मीं लहानपणीं ज्या शाळेंत होतों त्या शाळेच्या पंतोजीस अशी कधीं कधीं वरल्या मुलां कडून हिसाबाची झडती घेण्याची हुक्की येत असे. बहुतकरून त्या पंतोजींचे मित्र त्यास भेटावयास येत, अथवा कोणी मंडळी शाळेंत बसायास येई तेव्हां ही अशी हुक्की पंतोजीस येत असे. तो एकाद्या मुलास मध्येच बोलावून हातांत धरून इकडच्या तिकडे फिरवी आणि असा फिरविनांनां त्या मुलास २ आनि ५, ५ आणि ९, ८ आणि १०, ५ दाहीं, सहा पंचे, सातीं आठी असें फटाफट विचारी. आणि तें पोर चुकलें म्हणजे त्याच्या पाठीवर छडी मारी मग पोर रडून म्हणे, "नाहीं नाहीं पंतोजी, चुकलों. ही वेळ माफ करा." असें जेव्हां मीं दुरून बसून पाहीं; आणि मला तर यांत कांहींच समजत नसे, तेव्हां मला वाटे किं जर आतां मज वर पाळी आली, तर मीं हिसाब कसा सांगावा आणि मला त्या छडीचा मार खावा लागेल. म्हणोन पंतोजीनें लहान मुलांस भय वाटेनें कांहीं करूं नये; कारण तितक्या लहान वयांत मुलांस पंतोजीचा हेतु तर कांहीं समजत नाहीं, परंतु उलटें त्या भयानें त्यांच्या कोमळ मनास आणि शरीरास इजा मात्र होत्ये. पंतोजीनें लहान मुलांशीं फार ममतेनें बोलावें, आणि खेळत खेळत त्यांस शिकवावें. म्हणजे त्यांस मोठा आनंद वाटतो, व त्यांस तो पंतोजी आवडतो.

लहानपणीं माझ्या तीन वर्षांच्या वयापासून तर सहा वर्षांच्या वया पर्यंत सुमारें दोन तीन वर्षांच्या आंत मला चार शाळा झाल्या. पहिल्यानें आम्ही दोनबळीन

राहत होतों तेथें त्याच आळींत बाळकृष्ण शेणव्याचें घर होतें. त्याच्या ओटी वर एक कोंकणांतून आलेला शेणवी [1] पंतोजी होता. त्याच्या शाळेंत मीं गेलों, तेव्हां मीं सुमारें तीन वर्षांचा असावा. त्या शाळेंत सुमारें दोन तीन महिने मीं गेलों असेन, आणि तेथें काय शिकलों याची मला कांहींच आठवण नाहीं. मला वाटतें मीं उगीच धूळपाटी घेऊन बसत होतों. पुढें तो पंतोजी कोणी कडे निघून गेला, आणि ती शाळा नाहींशी झाली. तेव्हां वर आसपास दुसरी जवळ शाळा नसल्या मुळें माझी आत रेणुकाबाई इणें मला आपल्या घरीं नेलें; तेथें मीं तिच्या घरा जवळ काळबादेवीच्या रस्त्या वर चोहों घराच्या शेजारीं पहिल्या हणमंत गल्लींत दीना बापटच्या मोठ्या घराच्या ओटीं वर एक शाळा होती त्या शाळेंत गेलों. तेथें लिंगू नांवाचा पंतोजी होता, असें मला आठवतें. त्याणें मला दहा अंक आणि मूळाक्षरें व एक बाराखडी शिकविली. तो बाराखड्या शिकवितांनां असें मोठ्यानें मुलांना रागावून सांगत असे —

" क काना दिले का, ऱ्हस्यान कि, दीर्घ्यान की, ऱ्हस्यान कु, दीर्घ्यान कू, एकमात्र के, दुमात्र कै, काना मात्र को, दुमात्र काना कौ, माथा दिले कं, देवा दिले कः "

---

१ तुल्ना–' सर्व कोकणपट्टीमध्यें पूर्वीपासून मुलांना श्री गणेशायनमः शिकविण्याचें काम म्हणजे सारस्वत ब्राह्मणांचें–" **सरस्वती मंडळ** (ले० रा. भि. गुंजीकर) १८८४, पृ. ३१. "मला शिकावयास आरंभ करावयाचा होता, तेव्हां मी शेणवी पंतोजीच्या शाळेंत जाऊं लागलों. पहिलें शिक्षण शेणवी शाळेंत करून घ्यावें, व नंतर सरकारी शाळेंत शिकावें, अशी तेथली (मुरुड) वहिवाट होती. "–**आत्मवृत्त** (ले० प्रो. धों. के. कर्वे,) १९२८, पृ. ४६. "Before the introduction of Government education every large village had one or more private schools taught either by Shenvis or Konknasth Brahmins."—**Bombay Gazetteer, Vol. x, p. 282.** **Oriente Conquistado a Jesus Christo** या फ्रांसिस्क द सौज नांवाच्या जेजुइटानें लिहिलेल्या पोर्तुगीज ग्रंथांत, " या सर्वांना शेणवी म्हणजे शिक्षक अशी पदवी आहे. कारण कोंकणांतील इतर ब्राह्मणांना वाचन, लेखन व गणित हेच शिकवितात, " असें म्हटलें आहे. (conq. I,Dev. I, p. 13, 2nd Ed. (1886) ' शाणोपण ' किंवा ' शेणवाई ' ( **भारत इतिहास संशोधक मंडळ, अहवाल,** श. १८३४, पृ. २७ पहा ) या शब्दांचा उगम शेणवी हाच दिसतो. त्याची व्युत्पत्ति ' शिक्षाज्ञपति ' ही असावी. राजवाड्यांनीं ' शहाणा ' शब्दाची व्युत्पत्ति ' शिक्षाज्ञ ' पासूनच दाखविली आहे. ( **ज्ञानेश्वरी-कोश** पहा.) ' शेणवी ' शब्द मूळ जातिवाचक नसून पंडित या अर्थी व्यवसायवाचक आहे.

हें मीं तोंडपाठ म्हणें, पण यांत मला कांहींच समजत नसे. या शाळे वर मीं थोडे महिने गेलों असेन. पुढें सन १८१९ सांत आमच्या आत्येचा बाळाजी माधव नवरा वारला तेव्हां मीं तिच्याच घरीं होतों. तो दोन प्रहरीं वारला. मला वाटतें तें पहिलेंच मरण माझ्या बाळपणीं मीं ऐकलें. माझी आत रडायास लागली त्या वेळेस मला कोणी सांगितलें, किं नाना देवाच्या घरीं गेला. ल्हानपणीं म्यां ल्हान मुलांच्या तोंडानें ऐकिलें होतें, किं यमदूत येतात आणि ते माणसाला टोंचतात म्हणजे माणूस मरतें. तेंच माझ्या मनांत आलें, किं यास यमदूतांनीं टोंचिलें असेल म्हणून तो मेला. घरच्या मनुष्यांनीं मला आपल्या घरीं पाठविलें. तेव्हांपासून पुढें ती शाळा मीं सोडिली. मग गिरगांवांत जगन्नाथ टकल्या याच्या वाडींत ओटी वर दामोदर पंतोजीची शाळा होती तेथें मला घातलें. मीं त्या शाळेस सकाळीं दोनप्रहरीं गड्याच्या खांद्या वर बसून जात असें. तेथें सुमारें दीडदोन वर्षे गेलों असेन. पुढें माझ्या पाठी वरचा धाकटा भाऊ भास्करही मज बरोबर जाऊं लागला. आह्मीं दोघेहि गड्याच्या खांद्या वर बसून जात असों. या शाळेंत मीं सर्व धुळाक्षर व पाडे सवायकीं दिडकीं निमकीं पाउणकीं शिकलों व खरड्या वर आलों; तेव्हां माझ्या बापानें शाळे वर येऊन पंतोजीस कांहीं बक्षीस दिलें, आणि शाळे वर येणाऱ्या मुलांस मिठाई वांटली. पूर्वी या गांवठी शाळां वर अष्टमी, पौर्णिमा आणि अमावास्या मिळून महिन्यांत चार सुट्या असत[1]. सुटीच्या आदल्या दिवशीं पंतोजीस टिपरीभर तांदूळ व एक पैसा दर मुलानें द्यावा अशी चाल होती; संध्याकाळीं खडूनें सर्वांनीं आपआपल्या पाट्या माजवाव्या म्हणजे लिपाव्या, मग त्या वाळल्या वर त्यांज वर कोणी गुलाल, कोणी धूळ घालून अशी[2] सरस्वती काढावी आणि तिज वर गुलाल व फुलें घालून तिची पूजा करावी. मग परवाजा बोलून घरीं जावें. एका दिवसाचें मला स्मरण आहे, किं अशी सरस्वती

---

१ आतांच्या सारखी दर आठवड्याला शनिवार अर्धा दिवस व रविवार सगळा दिवस त्या काळीं सुटी नव्हती. ऑफिसांना रविवारची सुटी देण्याचा उपक्रम मुंबईचे गव्हर्नर सर जॉर्ज आर्थर यांनीं १८४१ साली केला. व त्यांचेंच अनुकरण पुढें १८४७ साली कलकत्ता व मद्रास प्रांतांनीं केलें (ज्ञानोदय, १५ फेब्रु० १८४१). शनिवारीं अर्धी सुटी देण्याची चळवळ १८५२ मध्यें Hanbury, Truman and Buxton या कारखान्यामध्ये विलायतेंत सुरू केली व नंतर ती इतरांनीं उचलली. (O. C. S. 1853, p. 335)

२ पुढील पृष्ठावरील आकृति पहा. या सरस्वतीच्या चिन्हाचा अर्थ काय ?

ल्याहायास व शब्दवटिका करायास उच्च स्वरांनीं सांगत उभे राहिलेले. व वरच्या वर्गा पुढें काळ्या रंगाचीं मोटीं चौरस फळीं तिपाई[1] वर किंचित् पडतीं उभीं केलेलीं व त्यांज वर सफेत्यांनीं[2] हिसाब शिकवित होते. व जेथें तेथें भिंतीला चुका लावून त्यांज वर 'मुंबईची हैंद शाळा पुस्तकमंडळी' असें मोठ्या अक्षरांनीं छापून कागद डसविलेले ल्हान ल्हान लांकडाचे तक्ते टांगलेले होते. मराठी शाळेचे पुढें तशीच डौलाची गुजराथी शाळा त्यांत गुजराथ्यांची व पारश्यांचीं मुलें बसलेलीं, व त्यां पुढें गुजराथी मेहताजी[3] शिकवित होते. व शेवटीं मुसलमानांचीं मुलें आपल्या समोर अर्धचंद्राकार हारीनें बसवून एक मुनशी[4] त्यांस शिकवित होता. मराठी शाळेच्या माथ्या वर सुमारें अठरा वर्षांच्या वयापासून तर पंचवीस वर्षांच्या वया पर्यंत असे ज्वान ज्वान ब्राह्मणांचे मुलगे एका मोठ्या शास्त्र्या पुढें मराठी. वाचित होते. त्यांत ते वेळोवेळां प्रथमा द्वितीया तृतीया पंचमी षष्ठी सप्तमी असें बोलत तेव्हां मला मोठें आश्चर्य वाटे, किं हे लोक एथें तिथीचीं नांवें कशा करितां घेतात ? मला त्यांचें वाचणें कांहींच समजत नसे. एकी कडेस वर चढण्याचा जिना टाकून दुसरी आडवी शाळा होती तींत बसायाच्या बांका व त्या पुढें तशींच अरुंद लिहिण्याचीं लांब लांब मेजें ठेवून त्या बांका[5] वर इंग्लिश शिकणारे हिंदु व पारशी यांचे मुलगे बसले होते. व एकी कडे इंग्लिश मास्तरा करितां एक मोठें हिरवी बनात जडलेलें मेज व जवळ एक दोन खुरच्या अशा होत्या. त्या इंग्लिश मास्तराचें नांव Mr. Murphy असें होतें. व त्याच्याच नांवानें तें स्कुल त्या वेळेस प्रसिद्ध होतें. मीं ज्या वेळेस सन १८२३ त व २४ त Mr. Watkin च्या स्कुलांत जात होतों त्या वेळेस हें Mr. Murphy चें स्कुल त्याच स्कुलाच्या समोर उजव्या हाता वर एके कडेस फिरंग्याची आळी आहे त्या आळींत होतें. तेथून मुलें सुटतांनां मीं कधीं कधीं पाहिलीं आहेत. रामजीच्या देवळा वरून जो रस्ता येऊन अग्यारीच्या रस्त्यास मिळतो त्या जवळच ही फिरंग्याची आळी आहे. मीं एकदां तातू शेठ्याच्या

---

१ Blackboard ला सध्यांचा फळा हा शब्द त्याकाळीं रूढ नव्हता असें वाटतें.

२ ( Chalk ) खडू !

३ पंतोजी. हेमचंद्राच्या देशी नाममालेमध्यें दिलेल्या मेढो ( म्हणजे व्यापाऱ्याचा कारकून ) या शब्दापासून हा शब्द आला असावा. –' वणि सहायए मेढो '—षष्ठवर्ग, १३८.

४ ( अरबी ) लेखक किंवा चिटणीस. पुढें शिक्षक असा अर्थ.

५ बांक व मेज हे पोर्तुगीज शब्द आहेत. मेज शब्द फारसीमध्येंही सांपडतो.

स्कुलांत असतां या Mr. Murphy च्या स्कुलांतल्या मुलांशीं आणि तातूच्या स्कुलांतल्या मुलांशीं रस्त्यांत मारामारी झाल्या वरून तातूच्या स्कुलांत हे Murphy साहेब येऊन चौकशी करितांनां पाहिले होते. ते त्या वेळेस आह्मां मुलांशीं मराठींत बोलतांनां ऐकून मला मोठें आश्चर्य वाटलें. मला त्यांणीं आपली जात विचारिली आणि ती म्यां सांगितल्या वरून त्यांणीं मला बोलून दाखविलें, किं "तुझी आणि तातू मास्तराची एक जात." मनांत किं एक जात असल्या मुळें कदाचित् त्या मुलांच्या मारामारींत मीं असेन; परंतु मीं त्या वेळेस फारच लहान असल्या मुळें मीं कांहीं मोठी मारामारी केली नसेल असेंही त्यांस वाटलें असेल म्हणून ते मला कांहीं धमकी देऊन बोलले नाहींत, अशी माझी अटकळ होत्ये. वास्तविक म्हटलें म्हणजे मला त्या तंट्याची कांहींच माहिती नव्हती. सांगायास तात्पर्य, आतां मीं सुमारें दीड वर्षा नंतर पुढें या सोसाइटीच्या शाळेंत आलों, दरम्यान मीं Murphy साहेबांस पाहिलें सुद्धां नाहीं, तथापि त्यांची धूर्तता मीं इतकी पाहिली, किं मला त्यांहीं या शाळेंत पाहतांच ओळखिलें, आणि ते म्हणाले कीं, "तूं तातू शेट्याच्या स्कुलांत होतास खरा." मग त्यांणींहि आमच्या तीर्थरूपास सांगितलें, किं "तुह्मीं या मुलास पहिल्यानें मराठी शिकवावें हें बरें आहे." असा हा, पहिल्याच दिवशीं या सोसाइटी शाळेचें इतकें मोठें अडंबर पाहून, मला मोठा अचंबा वाटला.

## माझा फारशी व संस्कृत शिकण्याचा आरंभ कसा झाला?

मीं नऊ वर्षांचा असतां Mr. Watkin च्या शाळेंत जात होतों तेथें एक पंधरा सोळा वर्षांचा मुसलमानाचा मुलगा इंग्रेजी शिकायास येत असे; त्याचें नांव ताजूद्दीन होतें. त्याचा माझा स्नेह जमला आणि तो आमच्या घरीं येऊं जाऊं लागला. मीं त्यास एके दिवशीं विचारलें, किं "तूं सकाळ संध्याकाळीं माझ्या घरीं येऊन जर मला फारशी शिकवशील तर मीं तुला माझ्या बापा कडून महिन्याचा एक रुपया देववीन." त्याणें तें कबूल केल्या वर मीं एके दिवशीं बाबांस खुशींत पाहून त्यांच्या पायीं पडलों आणि ताजूद्दीनास दरमाह एक रुपया दिला असतां त्या जवळ फारशी शिकेन अशी त्यांस विनवणी केली. कारण त्या वेळेस आह्मांस फार गरिबी होती, आणि अशा आडव्या खर्चास दरमाह एक रुपया देणें आमच्या

वाटतें माझ्या आईची आई रमाबाई त्या वेळेस नुकतीच एक वर्षा वर वारली होती. या आजीचें मला चांगलें स्मरण आहे. ती मुंबईंत आपल्या बहिणीच्या मुला कडेस असे. तेथून नित्य दोन प्रहरीं आमच्या घरीं तिणें यावें त्या वेळेस कांहींतरीं आह्मां धाकट्या नातवंडांस खाऊ आणावा. मुंबईंत बाळभाषेंत खाऊस गो गो[1] म्हणत, म्हणोन मीं तिला ‘गो गो आणत्ये ती आजी’ असें म्हणत असें. दुसरी आमच्या घरांत माझ्या बापाची मावशी असे तिला आह्मीं आजी म्हणों; म्हणोन त्या आजीला ओळखायास इतक्या लांब नांवानें बोलत असों. पहिल्या आजीच्या तोंडांत दांत नव्हते, व ती मला कडे वर घेऊन फिरवित असे हें मला आतां[2] माझ्या चोपन्नाव्या वर्षी आठवतें. ती केव्हां केव्हां आपल्या पुतण्या कडेस वसईस जात असे. तेथें आमची वडील मावशी असे. ती आजी वसईंत असतांच वारली ही खबर आमच्या बापानें दोन प्रहरीं बाहेरून आणिली, त्या वेळीं आमची आई मागील दारीं जाऊन मोठ्यानें रडूं लागली. पण ती कशा करितां रडत होती हें त्या वेळेस मला कांहींच समजलें नाहीं. बाळपणीं आपल्या ममतेचीं मनुष्यें जरीं मेलीं तरीं बाळकांस त्याचें कांहींच दुःख वाटत नाहीं. त्यांना वाटतें जशीं तीं कोठें गेलीं आहेत. केव्हांतरीं येतील. असें पहिल्यानें त्यांस वाटतें मग तीं त्यांस लौकरच विसरतात.

सन १८२२ व्याच्या पूर्वी थोड्या वर्षां वर आमच्या तीर्थरूपानें कुंभारतुकड्यांत[3] एक ल्हानशी जागा विकत घेतली होती, आणि तिज वर एक ल्हानसें कुडाचें घर बांधून तें भाड्यानें दिलें होतें. तें या सालीं मोडून नवें चांगलें चुन्याचे भिंतींचें घर बांधायास आरंभ केला. त्या घराचा पाया खाणिला आणि चुनारेती व लांकडें येऊं लागलीं होतीं. तें काम पाहण्यास आमची माऊसआजी काशीबाई दोनप्रहरीं नित्य जात असे. तसें तें घराचें काम चालत असतां काशीबाईस दुखणें लागलें. त्या दुखण्यांत ती दोन तीन महिने पर्यंत आपली खाट धरून होती. पुढें एके रात्रीस तिची अत्यवस्था होऊन ती पहांटेस मरण पावली. आमच्या बापाला तिणेंच वाढविलें, व

---

१ पारशी बालबोलीमध्यें औषधाला ‘गो गो’ म्हणतात—**Anthropological Papers**, part iv, by Dr. J. J. Modi 1929, p. 108 : “The Baby Language among the Parsis” हा निबंध पहा.

२ लेखनकालनिर्देश ( iii ), १४+५४=१८६८.

३ सी. पी. टँक जवळचा भाग.

हें मीं तोंडपाठ म्हणें, पण यांत मला कांहींच समजत नसे. या शाळे वर मीं थोडे महिने गेलों असेन. पुढें सन १८१९ सांत आमच्या आत्येचा बाळाजी माधव नवरा वारला तेव्हां मीं तिच्याच घरीं होतों. तो दोन प्रहरीं वारला. मला वाटतें तें पहिलेंच मरण माझ्या बाळपणीं मीं ऐकलें. माझी आत रडायास लागली त्या वेळेस मला कोणी सांगितलें, किं नाना देवाच्या घरीं गेला. लहानपणीं म्यां लहान मुलांच्या तोंडानें ऐकिलें होतें, किं यमदूत येतात आणि ते माणसाला टोंचतात म्हणजे माणूस मरतें. तेंच माझ्या मनांत आलें, किं यास यमदूतांनीं टोंचिलें असेल म्हणून तो मेला. घरच्या मनुष्यांनीं मला आपल्या घरीं पाठविलें. तेव्हांपासून पुढें ती शाळा मीं सोडिली. मग गिरगांवांत जगन्नाथ टकल्या याच्या वाडींत ओटी वर दामोदर पंतोजीची शाळा होती तेथें मला घातलें. मीं त्या शाळेस सकाळीं दोनप्रहरीं गड्याच्या खांद्या वर बसून जात असें. तेथें सुमारें दोडदोन वर्षे गेलों असेन. पुढें माझ्या पाठी वरचा धाकटा भाऊ भास्करही मज बराबर जाऊं लागला. आह्मीं दोघेहि गड्याच्या खांद्या वर बसून जात असों. या शाळेंत मीं सर्व धुळाक्षर व फाडे सवायकीं दिडकीं निमकीं पाउणकीं शिकलों व खरड्या वर आलों; तेव्हां माझ्या बापानें शाळे वर येऊन पंतोजीस कांहीं बक्षीस दिलें, आणि शाळे वर येणाऱ्या मुलांस मिठाई वांटली. पूर्वी या गांवठी शाळां वर अष्टमी, पौर्णिमा आणि अमावास्या मिळून महिन्यांत चार सुट्या असत[१]. सुटीच्या आदल्या दिवशीं पंतोजीस टिपरीभर तांदूळ व एक पैसा दर मुलानें द्यावा अशी चाल होती; संध्याकाळीं खडूनें सर्वांनीं आपआपल्या पाट्या माजवाव्या म्हणजे लिपाव्या, मग त्या वाळल्या वर त्यांज वर कोणी गुलाल, कोणी धूळ घालून अशी[२] सरस्वती काढावी आणि तिज वर गुलाल व फुलें घालून तिची पूजा करावी. मग परवाजा बोलून घरीं जावें. एका दिवसाचें मला स्मरण आहे, किं अशी सरस्वती

---

१ आतांच्या सारखी दर आठवड्याला शनिवार अर्धा दिवस व रविवार सगळा दिवस त्या काळीं सुटी नव्हती. ऑफिसांना रविवारची सुटी देण्याचा उपक्रम मुंबईचे गव्हर्नर सर जॉर्ज आर्थर यांनीं १८४३ सालीं केला. व त्यांचेंच अनुकरण पुढें १८४७ सालीं कलकत्ता व मद्रास प्रांतांनीं केलें (ज्ञानोदय, १५ फेब्रु० १८४३). शनिवारीं अर्धी सुटी देण्याची चळवळ १८५३ मध्यें Hanbury, Truman and Buxton या कारखान्यामध्यें विलायतेंत सुरू केली व नंतर ती इतरांनीं उचलली. (O. C. S. 1853, p. 335)

२ पुढील पृष्ठावरील आकृति पहा. या सरस्वतीच्या चिन्हाचा अर्थ काय ?

स्कुलांत असतां या Mr. Murphy च्या स्कुलांतल्या मुलांशीं आणि तातूच्या स्कुलांतल्या मुलांशीं रस्त्यांत मारामारी झाल्या वरून तातूच्या स्कुलांत हे Murphy साहेब येऊन चौकशी करितांनां पाहिले होते. ते त्या वेळेस आह्मां मुलांशीं मराठींत बोलतांनां ऐकून मला मोठें आश्चर्य वाटलें. मला त्यांणीं आपली जात विचारिली आणि ती म्यां सांगितल्या वरून त्यांणीं मला बोलून दाखविलें, किं "तुझी आणि तातू मास्तराची एक जात." मनांत किं एक जात असल्या मुळें कदाचित् त्या मुलांच्या मारामारींत मीं असेन; परंतु मीं त्या वेळेस फारच लहान असल्या मुळें मीं कांहीं मोठी मारामारी केली नसेल असेंही त्यांस वाटलें असेल म्हणून ते मला कांहीं धमकी देऊन बोलले नाहींत, अशी माझी अटकळ होत्ये. वास्तविक म्हटलें म्हणजे मला त्या तंट्याची कांहींच माहिती नव्हती. सांगायास तात्पर्य, आतां मीं सुमारें दीड वर्षा नंतर पुढें या सोसाइटीच्या शाळेंत आलों, दरम्यान मीं Murphy साहेबांस पाहिलें सुद्धां नाहीं, तथापि त्यांची धूर्तता मीं इतकी पाहिली, कि मला त्यांहीं या शाळेंत पाहतांच ओळखिलें, आणि ते म्हणाले कीं, "तूं तातू शेठ्याच्या स्कुलांत होतास खरा." मग त्यांणींहि आमच्या तीर्थरूपास सांगितलें, किं "तुह्मीं या मुलास पहिल्यानें मराठी शिकवावें हें बरें आहे." असा हा, पहिल्याच दिवशीं या सोसाइटी शाळेचें इतकें मोठें अडंबर पाहून, मला मोठा अचंबा वाटला.

## माझा फारशी व संस्कृत शिकण्याचा आरंभ कसा झाला?

मीं नऊ वर्षांचा असतां Mr. Watkin च्या शाळेंत जात होतों तेथें एक पंधरा सोळा वर्षांचा मुसलमानाचा मुलगा इंग्रेजी शिकायास येत असे; त्याचें नांव ताजूद्दीन होतें. त्याचा माझा स्नेह जमला आणि तो आमच्या घरीं येऊं जाऊं लागला. मीं त्यास एके दिवशीं विचारलें, किं "तूं सकाळ संध्याकाळीं माझ्या घरीं येऊन जर मला फारसी शिकवशील तर मीं तुला माझ्या बापा कडून महिन्याचा एक रुपया देववीन." त्याणें तें कबूल केल्या वर मीं एके दिवशीं बाबांस खुशींत पाहून त्यांच्या पायीं पडलों आणि ताजूद्दीनास दरमाह एक रुपया दिला असतां त्या जवळ फारशी शिकेन अशी त्यांस विनवणी केली. कारण त्या वेळेस आमची फार गरिबी होती, आणि अशा आडव्या खर्चास दरमाह एक रुपया देणें आमच्या

वाटतें माझ्या आईची आई रमाबाई त्या वेळेस नुकतीच एक वर्षा वर वारली होती. या आजीचें मला चांगलें स्मरण आहे. ती मुंबईंत आपल्या बहिणीच्या मुला कडेस असे. तेथून नित्य दोन प्रहरीं आमच्या घरीं तिणें यावें त्या वेळेस कांहींतरीं आह्मां धाकट्या नातवंडांस खाऊ आणावा. मुंबईंत बाळभाषेंत खाऊस गो गो[1] म्हणत, म्हणोन मीं तिला ' गो गो आणत्ये ती आजी ' असें म्हणत असें. दुसरी आमच्या घरांत माझ्या बापाची मावशी असे तिला आह्मीं आजी म्हणों; म्हणोन त्या आजीला ओळखायास इतक्या लांब नांवानें बोलत असों. पहिल्या आजीच्या तोंडांत दांत नव्हते, व ती मला कडे वर घेऊन फिरवित असे हें मला आतां[2] माझ्या चोपन्नाव्या वर्षी आठवतें. ती केव्हां केव्हां आपल्या पुतण्या कडेस वसईस जात असे. तेथें आमची वडील मावशी असे. ती आजी वसईंत असतांच वारली ही खबर आमच्या बापानें दोन प्रहरीं बाहेरून आणिली, त्या वेळीं आमची आई मागील दारीं जाऊन मोठ्यानें रडूं लागली. पण ती कशा करितां रडत होती हें त्या वेळेस मला कांहींच समजलें नाहीं. बाळपणीं आपल्या ममतेचीं मनुष्यें जरीं मेलीं तरीं बाळकांस त्याचें कांहींच दुःख वाटत नाहीं. त्यांना वाटतें जशीं तीं कोठें गेलीं आहेत. केव्हांतरीं येतील. असें पहिल्यानें त्यांस वाटतें मग तीं त्यांस लौकरच विसरतात.

सन १८२२ च्याच्या पूर्वी थोड्या वर्षां वर आमच्या तीर्थरूपानें कुंभारतुकड्यांत[3] एक ल्हानशी जागा विकत घेतली होती, आणि तिज वर एक ल्हानसें कुडाचें घर बांधून तें भाड्यानें दिलें होतें. तें या सालीं मोडून नवें चांगलें चुन्याचे भिंतींचें घर बांधायास आरंभ केला. त्या घराचा पाया खाणिला आणि चुनारेती व लांकडें येऊं लागलीं होतीं. तें काम पाहण्यास आमची माऊसआजी काशीबाई दोनप्रहरीं नित्य जात असे. तसें तें घराचें काम चालत असतां काशीबाईस दुखणें लागलें. त्या दुखण्यांत ती दोन तीन महिने पर्यंत आपली खाट धरून होती. पुढें एके रात्रीस तिची अत्यवस्था होऊन ती पहांटेस मरण पावली. आमच्या बापाला तिणेंच वाढविलें, व

---

१ पारशी बाल्बोलींमध्यें औषधाला ' गो गो ' म्हणतात—**Anthropological Papers**, part iv, by Dr. J. J. Modi 1929, p. 108: " The Baby Language among the Parsis " हा निबंध पहा.

२ लेखनकालनिर्देश ( iii ), १४+५४=१८६८.

३ सी. पी. टँक जवळचा भाग.

त्यांचा विद्याभ्यासहि तिणेंच करविला. काशीबाईचें लग्न होऊन तिचा भ्रतार लौकरच वारला. तेव्हां ती बाळविधवा झाली. तेव्हांपासून ती आपल्या वडील बहिणीचा संसार संभाळून राहिली होती; कारण आमची आजी व तिचीं दोन तीन मुलें संभाळायास तिचा भ्रतार म्हणजे आमचे आजे यशवंत वारल्या वर कोणी नव्हतें. आमची आजी फार भोळी, साधी बायको होती. तिचा सर्व संसार काशीबाईनें संभाळला. आमचे आजे वारल्या वर आमच्या आजीस मोठी विपत्ति आली. एक घर रहायाचें होतें तेंहि कर्जदारांनीं घेतलें. अशा विपत्तींत दोघी बहिणीनीं दळणकांडण करून मुलांस वाढविलें. आमच्या तीर्थरूपांचो मुंजलग्न त्यांहींच केलें. म्हणोन काशीबाईला आमचे तीर्थरूप आई पेक्षांहि अधिक मानित होते, आणि त्यांस धाकही तिचाच होता. पुढें तिची उत्तरक्रिया त्याणींच केली. तिचे दोन दीर होते, परंतु ते दूर कोठें राहत होते त्याचें मला स्मरण नाहीं. भ्रतार वारल्यापासून काशीबाई कधींच आपल्या सासरीं गेली नाहीं; व सासऱ्याची तिला खबरहि नाहीं. येतां जातां कोणी तिकडले कधीं वर्तमान सांगत तितकेंच. काशीबाईच्या मरणानें आमचे तीर्थरूप फारच श्रमी झाले. ते म्हणत, किं जरीं ती नवें घर पाहून मग मरती तरीं बरें होतें.

★

# आमचें कुंभारतुकड्यांतील नवें घर व माझा पहिलाच इंग्रेजी अभ्यास

पुढें श्रावणमासीं आमचें नवें घर तयार झालें. त्याची वास्तुशांति करून आह्मीं पुढें त्यांत रहावयास गेलों त्या वेळेस आह्मीं तिघे भाऊ आणि दोघी बहिणी होतों. सारीं एका पाठी वर एक लहान होतों. त्या वेळेस नव्या घरांत जाण्याची आह्मांस मोठी हौंस वाटली. तो नवा चुन्याचा व लांकडांचा वास येई, तेव्हां कांहीं विलक्षण वाटत असे, याचें मला अद्यापि चांगलें स्मरण आहे. या घरांत आल्या वर आमच्या तीर्थरूपानें मला इंग्लिश शिकवावयास आरंभ केला. मला Vyee's Spelling Book आणून दिलें, आणि त्या वरून मला ए, बी, सी, व बाराखड्या व लहान दोन तीन अक्षरांचे शब्द वाचावयास त्यांहीं शिकविले. पुढें त्यांणीं मला Watkin (वाट्किन) या नांवाचा एक म्हातारा इंग्रेज मास्तर होता त्याच्या स्कुलांत घातलें. तें स्कुल हाल्लीं General Assembly's School[१] बांधलें आहे त्याच्या शेजारीं रस्त्या वरच होतें. तें घर अद्यापि आहे. व ज्या खिडकींत आह्मीं बसत असों, आणि मौज पाहत असों, ती खिडकी अद्यापि पाहिली म्हणजे मला बाळपणाचें स्मरण होतें. सन १८२३ सांत सात आठ महिने मीं या स्कुलांत गेलों. त्या स्कुलांत जाण्याचे तीन वेळ असत. एकदां सहा वरा[२] पासून नऊ वरा पर्यंत. पुढें दहा वरापासून बारा वरा पर्यंत, आणि




१ Free Church General Assembly's Institution असेंही या संस्थेला म्हणत. या शाळेलाच पुढें विल्सन हायस्कुल असें संस्थापकाचें नांव देण्यांत आलें. ही इमारत सुमारें साठ हजार रुपये खर्चून १८५५ सालीं पुरी करण्यांत आली. (**O. C. S.** 1855, p. 243.)

२ (Hora) तास, पोर्तु० पोर्तुगीज लोकांनीं मुंबई बेटाबरोबर जे कांहीं आपल्या भाषेंतील शब्द हुंड्यादाखल दिले त्यांपैकींच हा एक शब्द आहे ! मुंबईतून पोर्तुगीजांचें राज्य गेलें तरी हिंदुलोक देखील त्यांची भाषा शिकतच असत ! रा. ब. नाना मोरोजी संबंधी त्यांचे चरित्रकार लिहितात, " मराठी साधारण लिहितां वाचतां येऊं लागलें, इतक्यांत या मुलांस फिरंगी शाळेंत पाठविलें. यावेळीं अद्याप हें बेट फिरंग्यांचें असें लोकांच्या मनांत वागत असे. या लोकांच्या घरांमध्यें उपयोग करण्याच्या शब्दसमूहांत बरेच शब्द फिरंगी असत, व पुरुष मंडळींत फिरंगी बोलणें म्हणजे सुशिक्षितपणाचें एक अंग मानीत असत. जुन्या लोकांमध्यें अद्यापही वृद्ध लोक पोर्तुगीज बोलणारे आढळतात. " **नाना मोरोजीचें चरित्र,** ( ले. ग. ह. भिडे ) १८९६, पृ. १०.

एक वरापासून चार वरां पर्यंत. मीं दोन वेळां जात असें. सकाळीं आणि दोन प्रहरा नंतर. बुधवारीं शनिवारीं अर्धा दिवस रजा असे, आणि रविवारीं सारा दिवस. वाट्किन मास्तर Invalid खात्यांतला Soldier ( सोल्जर ) अथवा Serjeant ( सार्जंट ) असावा. ही त्या वेळीं धर्माची शाळा असावी; कारण, तेथें जीं बुकें तो शिकवी तीं त्यास देवळांतून येत असत असें मुलें मला सांगत. त्याची शिकविण्याची रीत चमत्कारीक असे:



लोखंडाच्या लहानशा तबकड्या करून त्यांत ए बी सी पासून सातवडी[1] पर्यंत शब्द छापलेलीं कार्डे काढाघालायाचीं असत; व एक आडवें जाड कागदाचें अरुंद चेपण असे तें वरखालीं खेळत असे. त्याज वर मुलानें आपलें बोट टेंवून शब्द व अक्षरवटिका करावी; म्हणजे तेणेंकरून घड्याची खूणही राहत असे आणि शब्दाची कार्ड मळत नसे. हीं कार्डें झालीं म्हणजे मध्यें एक दोन लहान बुकें वाचायास देत असे व वरच्या वर्गास New Testament वाचावयास देत असे. दोन प्रहर झाल्या नंतर काप्या लिहावयास सांगे. त्या सर्वांच्या काप्या तो म्हातारा मास्तर स्वतः आंकून देत असे. दोनप्रहरीं आपल्या घरांतून आला म्हणजे एक तास पर्यंत हेंच काम करी. डोळ्यांस चश्मा लावून एक जाड शिशाच्या पेनसिलीनें सर्व मुलांच्या वह्या आंकून ठेवी, नंतर तिसऱ्या प्रहरीं गणित शिकवी. सर्वांच्या स्लेटी वर मिळवण्या, वजाबाक्या, गुणाकार आणि भागाकार यांचीं उदाहरणें स्वतः लिहून ठेवी. नंतर तीं उदाहरणें मुलांनीं करावीं. तीं तो सारीं तपासित असे. असा शिकविण्याचा क्रम चालत असे. मीं या शाळेंत बुका वर आलों नव्हतों. म्हणजे माझीं कार्डच चालत होतीं. Watkin (वॉट्‌कीन) सारखा कावाडी[2] इंग्लिश मास्तर मीं कोठेंच पाहिला नाहीं. इतक्यांत तो Watkin मास्तर कोणी कडेस निघून गेला. व तें School (शाळा) Mr. Fisher [फिशर] या नांवाच्या दुसऱ्या कोणी मास्तरानें घेतलें. तोहि बराच मेहनती माणूस होता. त्यास दर तीन चार मिनुटांनीं तबकील[3] ओढावी लागत असे. कधीं कधीं तो आपल्या

१ 'सात वर्डी' ( word ) असा हा शब्द असावा. तुला " इंग्रजी स्पेलिंग पुस्तकांतील सात वर्ड्यां [ सप्ताक्षरी शब्द ] वाचायास आल्या म्हणजे ती इंग्रजी भाषेंत निपुण झाला असें समजत. "— **मुंबईवर्णन**, ( माडगांवकर ), पृ. २३२.

२ कष्टाळु.

३ तपकीर; तपकील किंवा तपकाल असेही शब्द रूढ होते.

पद्रचा रुपया मोडून त्याचा खुर्दा आणवून कोणी मुलांनीं चांगलें वाचलें अथवा शुद्ध रीतीनें शब्दाची अक्षरवटिका केली, म्हणजे त्यांस एक आण्यापासून चार आणे पर्यंत बक्षीस देई एकदां मीं एका मोठ्या शब्दाची अक्षरवटिका शुद्ध केली तेव्हां मला त्याणें दोन आणे बक्षीस दिले. हें मला शाळेंत पहिलें बक्षीस मिळालें. पुढें तो Fisher मास्तर कोठें निघून गेल्या मुळें ती शाळा लौकरच मोडली. मग मीं तातु शेट्या म्हणून एक वैश्य ज्ञातीचा त्या काळीं आपणास मोठा लायर[1] म्हणविणारा गृहस्थ होता, तो सकाळ संध्याकाळीं आपल्या घरीं मुलांस कांहीं इंग्रेजी शब्द व अर्थ शिकवित असे; त्याचे शाळेंत दोन चार महिने गेलों.

ज्या काळीं मीं लहान होतों त्या काळीं माझे तीर्थरूप मला सांगत कीं, त्यांचे लहानपणीं त्यांस एक गोविंदजी नानाचें स्कूल मुंबईंत होतें. त्या काळीं जे इंग्रेजींत चाकरी करणारे परभु, शेणवी, फिरंगी हेच लोक असत, त्यांत परभु, शेणवी हे बहुतकरून त्या गोविंदजी नानाचे विद्यार्थी होते. हे गोविंदजी नाना आमचेच ज्ञातीचे वैश्य गृहस्थ होते, व ते माझे आई कडून आमचे दूरचे नातलग असत; म्हणजे माझ्या आईच्या माऊस-भावाचे सासरे. मीं अगदीं लहानपणीं त्यांस चुटपुटें पाहिल्या सारखें मला वाटतें. ते फार म्हातारे अशक्त असत असें मला स्मरतें. त्यांणीं मलबारांत इंग्रेज सरकारची चाकरी केली होती. तेथें त्यांणीं इंग्रेजी भाषा लिहावयास व वाचायास शिकली असावी[2]. मीं लहान होतों त्या काळीं जे कोणी हुद्देदार आणि पैशेवाले परभु, शेणवी, गृहस्थ होते त्यांतून बहुतेक गोविंदजी नानाचे शिष्य होते. व त्यांस आठवणारे अद्यापि थोडे म्हातारे गृहस्थ आहेत. त्यांची ते वरदहस्ती मास्तर म्हणोन अद्यापि तारीफ करितात.

१ (Lawer)

२ हा वाक्यप्रयोग बरोबर आहे काय ? ' ते...शिकले असावे ' जास्त शुद्ध.

५

## × सोसाइटीची शाळा

सन १८२५ च्या दोन तीन वर्षांपूर्वी कांपावर[1] सोसाइटीचें[2] स्कुल बांधून तयार झालें. ती नवीच सरकारी मोठी शाळा म्हणोन जिकडे तिकडे गाजलें. त्या शाळे वर Jervis[3] साहेब होते, व त्यांच्या मदतीस सदाशिव काशीनाथ

१ ( पोर्तु० Campo ) मैदान. सध्याचें Esplanade वा आझाद मैदान.

२ नेटिव एज्युकेशन सोसाइटी. हिलाच हिंदशाळा मंडळी असेंही म्हणत. ही संस्था १८२० सालच्या आगष्टमध्यें Bombay Education Society ची शाखा म्हणून निघाली. पुढें १८२२ च्या आगष्टमध्यें ती स्वतंत्र होऊन तिला The Bombay Native School and Book Society (हिंद शाळा आणि पुस्तक मंडळी ) असें नांव मिळालें पुढें १८२७ सालीं 'मुंबईची शिक्षा मंडळी' किंवा 'The Bombay Native Education Society' असें तिचें नामांतर झालें ते १८४० सालच्या एप्रिलमध्यें Board of Education ची घटना होईपर्यंत चालू राहिलें. या सालीं नेटिव एज्युकेशन सोसायटीचे वर्ग एल्फिन्स्टन कॉलेजमध्यें समाविष्ट करण्यांत आले व या संयुक्त संस्थेला The Elphinstone Native Education Institution अशी संज्ञा प्राप्त झाली




(**Report of the Board of Education, 1840—41, p. 2-3.**)

३ Captain George Ritso Jervis, B mbay Engineers. हे नेटिव एज्युकेशन सोसाइटीचे पहिले सेक्रेटरी व देशी भाषांचे जाज्वल्य पुरस्कर्ते होते. यांचे धाकटे बंधु Lt. Colonel T. B. Jervis (१७९६-१८५७) यांचें चरित्र त्यांचा मुलगा W P. Jervis यानें लिहिलेलें उपलब्ध आहे ( १८९८ ) त्यांत जॉर्ज जर्विसची कौटुंबिक माहिती मिळू शकते. त्यांत जॉर्जचा स्वतःसंबंधीचा खालील उतारा आहे—" In 1829 I was placed in charge of the Government Lithographic Establishment, the Educational Society and Engineer Institution. The examination I held of this latter before the Judges of the Supreme Court, the Governer and Commander-in-Chief, led the Government to confide to me (at a subsequent period) the future examination of those educated at that institution." p.33. जॉर्ज जर्विसचें चरित्र लिहूं इच्छिणाऱ्यास त्यांच्या वंशजांकडे अधाप साधनें मिळूं शकतील.

छत्र्ये[१] हे होते. त्यांस त्या काळीं तीनशें[२] रुपये दरमहा[३] झाला होता. हा दरमहा त्या वेळेस सर्वांस फार मोठा वाटत असे. त्या वेळेस एक दोन वर्षे पर्यंत सर्व मुंबईंत लोक अशी कल्पना आपल्या मनांत करूं लागले कीं आमच्या मुलांस शिकविण्याचें सरकारास इतकें काय अगत्य आहे. तेव्हां या धूर्त इंग्रेज सरकाराचा यांत कांहींतरीं मतलब असावा. [तो म्हणजे] आमच्या मुलांस हुशार करून त्यांस पुढें बाटवावें[४], असा सर्वांचा तर्क धांवत होता; म्हणोन ते आपलीं मुलें त्या मोठ्या शाळेंत पाठविण्यांत मोठा संशय घेत होते. आमच्या तीर्थरूपांच्याहि मनांत लोकांनीं तो संशय पुष्कळ घातला; तथापि त्यांणीं त्यां

---

१ यांना बापू छत्रे असेंही म्हणत. ज्यास्त माहिती करितां **विविधज्ञानविस्तार**, व० ३१, पृ. ३१७ पहा. हे नेटिव सेक्रेटरी होते.

२ ने. से. चा पगार रु. १००+दक्षिणेंतील मराठी शाळांचें सुपरिटेंडेंट म्हणून रु. ७५ एवढीच त्यांची मासिक प्राप्ति असावी. **G. D.** ( General Department, ) 1830, Vol. 6, p. 391; **Report of Bombay Native Education Society**, 1832 p. 42. पहा.

३ पगार.

४ मुंबईतील आद्य संस्थापकांचा असा हेतु दिसत नाहीं. पण अशा दृष्टीचे पुढें लोक इकडेही निर्माण झाले. ता. १२ अक्टो० १८३६ रोजीं कलकत्त्याहून आपल्या वडिलांस लिहिलेल्या पत्रांत लॉर्ड मॅकॉले लिहितो, " Our English Schools are flourishing wonderfully....the effect of this education on the Hindus is prodigious. No Hindoo, who has received an English education ever remains sincerely attached to his religion. Some continue to profess it as a matter of policy but many profess themselves pure Deists and some embrance Christianity. It is my firm belief that, if our *plans of education are followed up* there will not be a single idolator among the respectable classes in Benga. thirty years hence. And this will be effected without any efforts to proselytise; without the smallest interference with religious liberty; merely by the natural operation of knowledge and reflection. I heartily rejoice in the prospect. " ( **The life and letters of Lord Macaulay** by Sir George O. Trevelyan, 1893, p. 329 ).

आपल्या संशयाचें निराकरण व्हावें म्हणून आपले शेट फ्रामजी कावसजी[1] यांचें समत[2] पुसलें. ते शेट त्या सोसाइटीचे मेंबर होते. त्याणीं आमच्या तीर्थरूपांस मोठ्या खुषीनें सांगितलें, किं "तुह्मीं आपलीं मुलें बेलाशक त्या शाळेंत घाला; त्यांचें शिकणें तेथें फार चांगलें होईल. मीं तुह्मांस जर्विस साहेबां वर चिटी देईन." असें शेटजीनें सांगितल्या वर आमच्या तीर्थरूपांनीं आह्मांस त्या शाळेंत घालण्याचा विचार केला; आणि शेटजींची जर्विस साहेबां वर चिटी घेतली जर्विस साहेबांनीं मोठ्या खुशीनें ती चिठी वाचून आह्मांस शाळेंत घेण्या करितां आपले मदतनीस सदाशिव काशीनाथ छत्र्ये यांस सांगितलें. मीं आणि माझा पाठचा भाऊ भास्कर अशा आह्मां दोघांस आमच्या तीर्थरूपांनीं त्या नव्या शाळेंत नेलें. तेव्हां त्यांच्या मनांत आह्मां दोघांस निदानीं मला तरीं इंग्रेजी स्कुलांत घालावें असें होतें. परंतु मराटींत चांगलें शिकल्या शिवाय इंग्लिश स्कुलांत घेण्यास मोटी अडचण पाहून आमच्या तीर्थरूपांनीं आह्मां दोघांसहि मराठी शाळेंत ठेवण्यास रुकार दिला. मीं त्या वेळेस लहान, सुमारें दहा अकरा वर्षांचा होतों तरीं त्या शाळेचा मोटेपणा व तेथील मोठमोठे ब्राह्मण शास्त्री पंतोजी पाहून मला मोठें आश्चर्य वाटलें. मोठी लांब शाळा. त्यांत आंथऱ्यां वर मुलांचे वर्ग एका हारीनें एका पुढें एक असे बसविलेले व एक एका वर्गा पुढें लांकडी घोडे उभे केलेले, व त्यांज वर खिळ्यांनीं पाट्या अडकविलेल्या, आणि त्या पाट्यां वर मोठीं छापील मूळाक्षरें, जोडाक्षरें, बाराखड्या व दोन अक्षरी, तीन अक्षरी, चार-पांच-सहा-सात अक्षरी शब्द मोठ्या अक्षरांनीं छापलेले कागद डकविलेले. व पंतोजी व शिक्षक जेथें तेथें वर्गा पुढें उभे राहून त्या पाट्यां वरून मुलांस

१ (१७६७–१८५१) १८०१ मध्यें ईस्ट इंडिया कंपनीचे नोकर. १८०६ नोकरी सोडून स्वतंत्रपणें व्यापारांत शिरले. 'सालामानी' नांवाचें जहाज विकत घेऊन चीन देशाशीं व्यापार सुरू केला व विलक्षण नफा मिळविला. १८२० इंदशाळा मंडळाचे सभासद. व्यापार व शिक्षण याप्रमाणें कृषि व धर्म यांच्या सुधारणेंतही ते लक्ष घालीत. देशी लोकांनी ग्रँड ज्युरीसारख्या मानाच्या जागेवर स्थापना व्हावी म्हणून खूप खटपट केली. १८३४ साली नेमलेल्या पहिल्या बारा जे. पी पैकीं एक. उदारपणें पुष्कळ संस्थांना व गोरगरिबांना मदत केली. मलबार हील्वरील पारशांचे स्मशान ( Tower of silence 1832 ) व घनीतेवरील आग्यारी ( १८४५ ) हीं यांच्याच दातृत्वाचीं फळें होत. १२ फे. १८५१ रोजीं अंत. फ्रामजी कावसजी इन्स्टिट्यूट ही संस्था स्थापून त्यांच्या चाहत्यांनीं त्यांचे स्मारक केलें. **Memoir of the late Framji Cowasji Banaji**—K. N. Banaji, 1892. पहा.

२ ( अरबी–सम्त् )

काढून पूजा करित असतां आमच्या शाळे वर दोन इंग्रेज आले होते. त्यांस पंतोजी पाद्रीसाहेब म्हणूं लागले. त्यांणीं मुलांस विचारिलें, किं "हें तुह्मीं काय करितां?" मुलांनीं सांगितलें, किं "आह्मीं सरस्वतीची पूजा करितों." मग ते साहेब दोघे एकमेकांशीं कांहीं बोलून हांसून निघोन गेले. पुढें ते साहेब केव्हां केव्हां आमच्या शाळे वर येत असत व केव्हां केव्हां आमची शाळा



बंगल्याला बोलावित असत.

## माझ्या लहानपणींच्या शाळा व त्या शाळांची व्यवस्था व तेथील शिकणें

त्यांहीं जवळच गिरगांवांत एका वाडींत बंगला घेतला होता. तो बंगला अद्यापि तसाच आहे (१८६८)[१]. तो बंगला व जवळची आमच्या शाळेची जागा पाहिली म्हणजे आतां ती सारी बाळपणाची आठवण होतये. त्या पाद्यांनीं मला एक मराठी छापलेलें बुक दिलें याचें नांव 'मात्थीउक्त'[२] असें होतें. तें पहिलेंच बुक माझ्या हातीं आलें, तेव्हां मला काय जो आनंद झाला तो आतां सांगतां येत नाहीं. मीं घरीं आल्या वर तें बुक साऱ्या घरांतल्या मनुष्यांस दाखविलें आणि घडी घडी त्याच्या वरचें काळें रंगाचें पृष्ठोपत्र पहावें, व आंतील छापलेलीं अक्षरें पहावीं; त्या वेळीं मला चांगलें वाचावयास येत नव्हतें. एक एक अक्षर मात्र ओळखत असें. व त्या पुस्तकांत कोणता विषय होता हें तर मला कांहींच माहीत नव्हतें.

मीं अगदीं लहान होतों म्हणजे सुमारें पांच सहा वर्षांचा होतों तेव्हांपासून माझ्या मनांत गरीब अनाथा विषयीं फार दया येऊं लागली. गरीब भिकारी पुरुष,

---

१ लेखनकालनिर्देश लक्षांत ठेवा. (ii)

२ अमेरिकन मिशन प्रेसमध्यें पहिलेंच मराठी भाषेंतील पुस्तक आठ पृष्ठांचें १८१७ सालीं मॅथ्यूचें शुभवर्तमान हें छापलें, असें ओ. इं. स्पे. म्हणतो. (O. C. S. 1847, p. 171). पण १८१३ त अमेरिकन मिशनऱ्यांनीं छापखाना घालून मराठी भाषेंत शिला छापावर पुस्तकें छापण्याचा कारखाना सुरू केला, असें माडगांवकर लिहितात. (**मुंबईवर्णन**, पृ. २४६.) पण या विधानाच्या खरेपणाबद्दल शंका आहे.

बायको अथवा पोरगें, आपल्या दारा पुढें येऊन भीक मागूं लागलें म्हणजे मला त्या वेळीं असें वाटत असे, कि " देवा, याला कां खायाला आणि पांघरायाला मिळत नाहीं? हे इतके गरीब कां; अरे याला कोणी कां देत नाहींत?" असें त्याच्या विषयीं माझ्या मनांत यावें; त्यांत तें अशक्त म्हातारें मनुष्य असलें तर त्याचे हाल पाहून मला फारच त्याची दया येत असे, आणि मीं घरांत जाऊन त्याच्या करतां माझ्या आई जवळ व आजी जवळ, केव्हां केव्हां बापा जवळ दीनवाणें तोंड करून कांहींतरीं मागावें. मग माझें तसें दीनवाणें तोंड पाहून त्यांहीं कांहींतरीं पैसा अथवा शिजलेलें अन्न अथवा जुनें वस्त्र द्यावें, मग मीं तें मोठ्या आनंदानें धांवत जाऊन त्या भिकाऱ्यास द्यावें. केव्हां केव्हां—आतां मला त्याह्यावयास लज्जा वाटते—मीं घरांत कोणास न कळवितां घरांतलीं एकादीं जुनीं वस्त्रें त्यांस द्यावीं. तीं जिन्नस नाहींशी झाली असें समजल्या वर आजीनें व आईनें माझा वहमा* घेऊन म्हणावें कीं "ती दाद्यानें कोणातरीं भिकाऱ्यास नेऊन दिली असावी." मग मला विचारल्या वर मीं कबूल व्हावें. हा लहानपणींचा गरिबां विषयींचा कळवळा पुढें अद्याप पर्यंत तसाच माझ्या मनांत राहिला आहे, परंतु या गरिबां विषयीं निराळे विचार माझ्या मनांत आले आहेत ते प्रसंगोपात्त सांगण्यांत येतील. गरीब झाले तरीं मनाची स्वाभाविक दुष्टता व निर्दयपणा जात नाहीं. उलटे हे दुर्गुण वाढतात.

## माझें मुंजीबंधन

सन १८२२ पर्यंत आह्मीं आपल्या जुन्या शेतवळींतल्याच घरांत राहत होतों. त्याच घरांत सन १८२१ त माझी मुंज झाली. त्या वेळीं गणेशभट कोनकर आमचा उपाध्या होता. तो कऱ्हाडा ब्राह्मण होता आणि बापआजापासून त्यांचा उपाध्येपणा मुंबईत चालत होता. अद्यापि यांचें घर लोहारचाळीच्या नाक्या वर आहे. तो शरीरानें बराच स्थूळ होता, आणि त्याचें पोट फार मोठें होतें. तो आपल्या घरीं आला म्हणजे मला आपल्या पोटा वर बसवित असे, याचें मला चांगलें स्मरण आहे. तो म्हातारा असे आणि त्याच्या गळ्यांत बारीक सोन्यानें गुंतलेल्या रुद्राक्षांची माळ असे. मीं पहिलाच मुलगा, आणि माझी मुंज हें पहिलेंच कार्य, म्हणोन माझ्या बापानें माझी मुंज मोठ्या समारंभानें केली. दारा पुढें मंडप घालला होता. वसईहून माझ्या आजोळपक्षाचे पुष्कळ पाहुणे आले होते. मन्त्र

* संशय (अरबी—वहम्) मराठींत सध्या वहीम असा शब्द रूढ आहे.

बापास अगदीं लहान गोष्ट होती असें नाहीं. तथापि माझी अशी चांगली इच्छा पाहून त्यांणीं तें लागलेंच कबूल केलें. मग मीं लहान मुलांच्या हौसी प्रमाणें मुसलमानांचीं मुलें ज्या वर आपली किताब ठेऊन वाचतात तें आणविलें आणि त्यास आसमानी रंग देवविला. एका पाटीला चिक्कण खडू लावून लाखी शाईनें[1] तिज वर अक्षरें वळवायास शिकलों. पुढें लहान लहान शब्द वाचतां आल्या वर आमद्नामा म्हणजे वर फारशी शब्द आणि त्यांच्या खालीं लाल शाईनें त्याच अर्थाचा हिंदुस्थानी शब्द अशी किताब लिहवून आणून ते शब्द पाठ केले. कांहीं महिने गेल्या वर करीमा[2] पढायास घेतली व तीही अर्धी अधिक त्या ताजूद्दीना जवळ शिकलों.

आह्मीं कुंभारतुकड्यांत राहत होतों त्या आमच्या घरा समोर एका परभाचें घर होतें. त्या घराच्या मागील दारीं वासुदेव भट या नांवाच्या एका कऱ्हाड ब्राह्मणाचें बिऱ्हाड होतें. त्या ब्राह्मणाचा मुलगा नारायण नांवाचा माझ्याच वयाचा आमच्या समोर ओटी वर बसून रूपावळी म्हणत असे. तो मुलगा माझाच खेळगडी होता. म्यां त्यास म्हटलें, "गड्या, आपण दोघे म्हणत जाऊं म्हणजे आपल्या दोघांस बरें पडेल. तूं माझा पाठ घेत जा आणि मीं तुझा घेईन, म्हणजे आपल्या दोघांस चांगले पाठ होऊन एकमेकांस मदत होईल." त्या मुलालाही तें बरें वाटलें, मग मीं आणि तो रूपावळी म्हणों लागलों. 'कुंडंदधिपयोवर्म' हा श्लोक म्हणून नपुंसक शब्द चालविण्यास आरंभ केला होता. इतका माझा अभ्यास नारायणा बरोबर झाला.

## इंग्रेजी

मीं सोसाइटीच्या मराठी शाळेंत सन १८२५ त गेलों तेव्हां मला थोडें थोडें इंग्लिश वाचायास व मोठ्या अक्षरांनीं कॉपी लिहायास येत होतें. परंतु इतकें येत असतां सोसाइटीच्या मराठी शाळेंत जेव्हां मीं पहिल्यानें गेलों तेव्हां मला पंतोजीनें खालच्याच शब्दवटिकेच्या वर्गांत बसविलें. भास्करही माझ्या खालच्या वर्गांत बसला. पुढें मीं लौकरच बोधवचनाच्या वर्गांत चढलों. त्या लहानशा पुस्तकांत

१ तुळा मागें पृ. १ तळटीप ४.

२ फारसी बोधवचनें.

लहान मुलांस नीतिपर लहान लहान वाक्यें लिहिलीं असत.[१] त्याचा आरंभ असा होता. 'पहांटेस उठून ईश्वराचें स्मरण करावें.' 'पहांटेस उठून अभ्यास करावा म्हणजे विद्या लवकर येईल.' हीं वाक्यें शंभरा वर होतीं तीं सारीं तोंडपाठ करावीं लागत. कधीं कधीं तीं सारीं वाक्यें एका मागें एक आईबापां जवळ व जे कोणी आमचे नातलग, त्यांच्या भेटीस येत त्यांज पाशीं मीं गडगडित तोंडपाठ करून दाखवित असें तेव्हां त्या सर्वांस मोठी खुशी होत असे, आणि आमच्या नव्या शाळेंतलें शिकणें फार चांगलें असें त्यांस वाटूं लागलें. एकदां आमच्या वर्गांत मुलांनीं फार गलबल केली म्हणोन पंतोजीनें येऊन मुलांस धमकावून विचारलें, किं "कोणी ही गलबल केली?" तेव्हां एका मुलानें भिऊन माझें नांव सांगितलें. त्या वरून त्या पंतोजीनें माझ्या पाठी वर दोन छड्या मारिल्या. तेव्हांपासून मीं त्या पंतोजीस फार भिऊन असें. त्या पंतोजीचें नांव बाबामामा होतें. ते सदाशिव छत्र्ये यांचे मामा होते म्हणोन त्यांस सर्व मामा अशा हाका मारित असत. ते पुरुष शरीरानें जाडे व वयानें सुमारें चाळीस पंचेचाळीस वर्षांचे होते. तो फारसा विद्वान् नव्हता म्हणून भाच्यानें त्यास या कामा वर लाविलें असें मला वाटतें. परंतु जरीं विद्वान् नव्हता तरीं लहान मुलांस वाचणें लिहिणें आणि थोडें गणित शिकवून त्यांची वरल्या वर्गांत जाण्याची तयारी करण्यांत त्याज प्रमाणें मेहनती दुसरे थोडेच पंतोजी असतील; सकाळच्या दहा वरापासून संध्याकाळच्या ४ वरा पर्यंत मामा एकसारखी मेहनत करित असे. सर्व मुलांची हाजिरी टवण्याचें त्यांचें

---

१ मुलांच्या नीतिसुधारणेकडे त्या काळच्या शिक्षणाधिकाऱ्यांचें फार लक्ष असे. शिक्षणक्रमांत धर्मशिक्षणाला प्राधान्य असावें असा मिशनऱ्यांचा आग्रह. धर्मशिक्षण म्हणजे त्यांच्या मतें केवळ बायबलचें शिक्षण ! लोकांच्या धर्मभावना दुखविल्या जाऊं नयेत म्हणून धर्मशिक्षणाच्या जागीं अधिकारी नीतिशिक्षणावर भर देत. छत्रे यांची 'बोधकथा' व 'बोधवचनें,' (G. D. 1843, Vol. 24 A, p. 730) जभेकरांच्या 'नीतिकथा' किंवा विष्णुशास्त्री यांचें 'नीतिदर्पण' (१८३६) अशीं नीतिपर पुस्तकें त्याकाळचीं आढळतात. या 'बोधवचनांत' एकीकडे "गलत्कुष्ठयास स्पर्श करायास भितोस तसा तूं दुसऱ्याचे धर्मास स्पर्श करायास भी," व "प्रतिष्ठित मनुष्यास दुसऱ्याचा धर्म घेण्याहून दुसरी मोठी बेअबरू नाहीं," अशीं वाक्यें होतीं. (आवृत्ति, ४, १८३३, पृ. ४२) तेव्हां मिशनऱ्यांनीं आपला धर्म फैलावण्याच्या कामीं या वाक्यांमुळें हरकत येईल म्हणून हें पुस्तक शाळांमध्यें शिकवूं नये, अशी चळवळ चालविली होती. पहा :—रा. सा. मोहनलाल रणछोडदास झवेरिनुं जीवनचरित्र छे० चु. बा. मोदी, पृ. १५.

काम. त्या हाजिरीचा रपोर्ट करणें त्यांज कडेस. या शिवाय मूळाक्षरापासून बोधवचना पर्यंत वाचायास त्याणें शिकवावें. मुलांच्या वर्गां पुढें उभें राहून शब्दांच्या अक्षरवटिका करायास मोठ्यानें त्याणें ते शब्द बोलवे. त्याच्या त्या स्वरांनीं ती सारी शाळा नादत असे. शब्दवटिका करण्याची रीत अशी होती :– पंतोजीनें अथवा वर्गाच्या मालचाट्यानें[१] (Secretary) हातांत पाटी घेऊन अथवा पुढें टांगलेल्या पाटी वर पाहून एक शब्द वाचावा–'नागरमोथा' म्हणजे पहिल्या मुलानें **न** ला काना **ना, ग** ला कांहीं नाहीं **ग, र** ला कांहीं नाहीं **र, म** ला काना मात्रा **मो, थ** ला काना **था,** 'नागरमोथा.' अशा रीतीनें शब्दवटिका कराव्या. दोन प्रहरीं अर्ध्या तासाची सुटी झाल्या वर मग पुनः त्यांची हाजिरी होऊन गणित शिकविण्याचें काम चालत असे.

---

१ मोल्स्वर्थ यानें आपल्या कोशामध्यें "माल Worth, चाट्या – that licks – that tries and determines the respective merits of the boys; a monitor at schools," असा या शब्दाचा अर्थ दिला आहे. माल (किंवा म्हाल) गडी म्हणजे मुख्य विद्यार्थी असा शब्द गोमंतकींत प्रचलित आहे. चाट्या किंवा चाटा म्हणजे 'चाटणारा' नसून मुलगा. (सं. चेटक) श्री गोविंदप्रभुचरित्र (१९४४) या महानुभावीय ग्रंथांत 'चाटा' असा शब्द आला असून त्याचा अर्थ सं० प्रो. वि. भि. कोलते यांनीं 'मुलगा' असाच दिला आहे. (पृ. ११५ पहा).

## या शाळेंतलीं पहिलीं पुस्तकें, अभ्यास व गुरु.

मीं या शाळेंत जाण्याच्या अगोदर, शब्दवाचन[१], बोधवचनें[२], पंचोपाख्यान[3], विदुरनीति[४], सिंव्हासनबत्तिशी[५], इतकीं पुस्तकें छापून प्रसिद्ध होतीं. पुढें मीं गेल्या वर लागलीच इसपनीति[६] छापून तयार झाली. हें पुस्तक सदाशिव काशीनाथ छत्रे

---

१ हें पुस्तक पाहण्यांत नाहीं.

२ ( मूळ हस्तलिखितांत बोधवाचन असें आहे ) कर्ता स. का. छत्रे. १८३३ च्या चौथ्या आवृत्तीपासून एका पृष्ठावर बाल्बोध व दुसऱ्या पृष्ठावर मोडी अशीं हीं बोधवचनें छापलेलीं आढळतात. ( मुं. म. ग्रं. )

३ पंचोपाख्यान (पृष्ठें १५७) १८२४ ( ब्रिटिश म्युझियम ) 'Pilpay's Fables' म्हणून हा ग्रंथ प्रसिद्ध होता. पंचतंत्र वगैरे पुस्तकांवरून तयार केलेलें पुस्तक. ' पिल्पे ' किंवा बिद्पे ' हें ' विद्यापति ' याचें अपभ्रष्ट रूप नसेल ना ? तुल्ना-" Pilpay or *Bidpay* the Indian Æsop. His compilation was in Sanskrit, and entitled " *Pancha-Tantra* " Khosru the Great of Persia ordered them to be translated into Pehlvi, an idiom of Medish, at that time the language of Persia. This was in the middle of the sixth century "-Dic. of Phrase and Fable by E. C. Brewer, ( 9th Ed.).

४ " मूळ संस्कृतावरून महाराष्ट्र भाषेंत गद्यरूप करून मुंबईनगरीं कुरियर छापखान्यांत छापिली असे. " इ. स. १८२३ ( मुं. म. ग्रं. ) हा मुंबईतील शिळाछाप मुद्रणाचा उपलब्ध पहिला नमुना असून याकरितां वापरलेले मराठी टाइप सर चार्लस विल्किन्सनें पाडलेल्यांपैकी आहेत.

५ " सिंव्हासन बत्तीशी महाराष्ट्र भाषेंत करून मुंबईनगरी कौरियर छापखान्यांत छापिली असे. " १८२४, ( मुं. म. ग्रं. ) हाच ग्रंथ पं. वैजनाथ शर्मा यानें मराठी करून श्रीरामपूर प्रेसमध्यें रे० केरे यानें १८१४ मध्यें मुद्रित केलेला उपलब्ध आहे. ( मु. म. ग्रं.

६ " इसपनीतिकथा इंग्रेजीवरून (Croxall's Esop, London, 20th Edition मराठी भाषेत केल्या. मुंबईचे शिक्षा मंडळीचे छापखान्यात छापिल्या, सन इसवी १८२८." ( B. B. R. A. S. )

ांणीं इंग्रजी वरून मराठी केलें. पुढें त्यांणींच बाळमित्राचा[1] पहिला भाग केला. ा भाग तयार होऊन त्याचीं पत्रें छापित होते तेव्हां मीं वरच्या वर्गांत गेलों होतों. ;aptain G. R. Jervis साहेब यांणीं सन १८२७ त Hutton's Course of Aathematics या गणितविषयक पुस्तकाचा तर्जुमा[2] करून छापिला. त्याचे दोन ाग झाले. पूर्णांक, अपूर्णांक, गणित हा एक भाग. बीजगणित, भूमिति, त्रिकोणमिति, ेत्रफळ, घनफळ, व लाग्रत्तम हा दुसरा भाग. या शिवाय आणखी त्या साहेबानें 'asley's Practical Geometry म्हणजे कर्तव्यभूमिति[3] हें एक तिसरें पुस्तक ापून प्रसिद्ध केलें होतें. या गणित पुस्तकाचे निरनिराळे प्रकरणांचीं निरनिराळीं ुस्तकें जशीं जशीं तयार होत गेलीं, तशीं एका सांच्याचीं छापून प्रसिद्ध होत गेलीं. ीं शिकणारांस विकत मिळत. आणि पुढें तीं एकत्र करून त्यांचे, वर सांगितलेले ोन भाग बांधले. सन १८२७ त मीं वरल्या वर्गांत गेलों त्या वेळेस वरल्या दोन ीन वर्गांस वाचन, लेखन आणि व्याकरण शिकविण्या करितां बापुशास्त्री मायदेव[4] ुक्ल यांची नेमणूक झाली. हे शास्त्री संस्कृत व्याकरणांत मोठे प्रवीण होते. हे ावीनच, मला वाटतें गुरू जवळून अध्ययन करून, पुण्यांत व इतर ठिकाणीं

---

१ बालमित्र, भाग १ ला ( शिक्षा मंडळीचा शिलाछाप ) मुंबई, १८२८. Berquin नें लिहिलेल्या मूळ फ्रेंच भाषेंतील Children's Friend वरून केलेलें मराठी भाषांतर. ( B. B. R. A. S. ) या पुस्तकाचा दुसरा भाग टी. गेस्फोर्ड यानें मराठींत करून आर. प्रेरा ा शिळाछापखान्यांत १८३३ सालीं छापला. ( ठाणें म. ग्रं. )

२ हा ग्रंथ Dr. Charles Hutton व Mr Bonny Castle यांच्या इंग्रजी ुस्तकांवरून तयार करून ' शिक्षामाला ' या नांवाखालीं १८२८ सालीं जर्विसनें प्रसिद्ध केला. ' जांत गणितवहीवाटवही आणि नाण्याचे तपासणीचं वर्तमान " आहे. ( मुं. म. ग्रं. ) ुजराती भाषांतर याच सालीं प्रसिद्ध झालें.

३ जगन्नाथशास्त्री क्रमवंत यांच्या साहाय्यानें भाषांतर करून ' कोरियर ' प्रेसमध्यें १८२६ मध्यें छापला. ( ने. ज. ला. धोबीतलाव ) याचें गुजराती भाषांतर याच सालीं प्रसिद्ध झालें.

४ मूळ ठिकाण नागांव, प्रांत अष्टागर. हे हवेली तालुक्याचे मामलेदार होते. तेल, तूप या जिनसांवर हिंदुधर्मशास्त्राधारें जकात बसवितां येत नाहीं, असा कलेक्टरच्या हुकुमाविरुद्ध रिपोर्ट केल्याबद्दल अहमदाबादेस न्यायनिवाडा करण्याच्या पंचाचे जागीं त्यांची बदली करण्यांत आली. ( **मराठी भाषेचे व्याकरणकार व व्याकरणप्रबंधकार**, डॉ० मो. स. मोने, ११२७, पृ. २११ पहा. )

## ६ या शाळेंतलीं पहिलीं पुस्तकें, अभ्यास व गुरु.

मीं या शाळेंत जाण्याच्या अगोदर, शब्दवाचन[1], बोधवचनें[2], पंचोपाख्यान[3], विदुरनीति[4], सिंव्हासनबत्तिशी[5], इतकीं पुस्तकें छापून प्रसिद्ध होतीं. पुढें मीं गेल्या वर लागलीच इसपनीति[6] छापून तयार झाली. हें पुस्तक सदाशिव काशीनाथ छत्रे

---

१ हें पुस्तक पाहण्यांत नाहीं.

२ ( मूळ हस्तलिखितांत बोधवाचन असें आहे ) कर्ता स. का. छत्रे. १८३३ च्या चौथ्या आवृत्तीपासून एका पृष्ठावर बालबोध व दुसऱ्या पृष्ठावर मोडी अशीं हीं बोधवचनें छापलेलीं आढळतात. ( मुं. म. ग्रं. )

३ पंचोपाख्यान (पृष्ठें १५७) १८२४ ( ब्रिटिश म्युझियम ) 'Pilpay's Fables' म्हणून हा ग्रंथ प्रसिद्ध होता. पंचतंत्र वगैरे पुस्तकांवरून तयार केलेलें पुस्तक. 'पिल्पे' किंवा बिद्पे' हें 'विद्यापति' याचें अपभ्रष्ट रूप नसेल ना? तुल्य- "Pilpay or *Bidpay* the Indian Æsop. His compilation was in Sanskrit, and entitled "*Pancha-Tantra*" Khosru the Great of Persia ordered them to be translated into Pehlvi, an idiom of Medish, at that time the language of Persia. This was in the middle of the sixth century"-Dic. of **Phrase and Fable** by E. C. Brewer, (9th Ed.).

४ "मूळ संस्कृतावरून महाराष्ट्र भाषेंत गद्यरूप करून मुंबईनगरीं कुरियर छापखान्यांत छापिली असे." इ. स. १८२३ ( मुं. म. ग्रं. ) हा मुंबईकडील शिळाछाप मुद्रणाचा उपलब्ध पहिला नमुना असून याकरितां वापरलेले मराठी टाइप सर चार्लस विल्किन्सनें पाडलेल्यांपैकीं आहेत.

५ "सिंव्हासन बत्तीशी महाराष्ट्र भाषेंत करून मुंबईनगरी कौरियर छापखान्यांत छापिली असे." १८२४, ( मुं. म. ग्रं. ) हाच ग्रंथ पं. वैजनाथ शर्मा यानें मराठी करून श्रीरामपूर प्रेसमध्यें रे० कॅरे यानें १८१४ मध्यें मुद्रित केलेला उपलब्ध आहे. ( मुं. म. ग्रं. )

६ "इसपनीतिकथा इंग्रेजीवरून (Croxall's Esop, London, 20th Edition) मराठी भाषेंत केल्या. मुंबईचे शिक्षा मंडळीचे छापखान्यांत छापिल्या, सन इसवी १८२८." ( B. B. R. A. S. )

गांणीं इंग्रजी वरून मराठी केलें. पुढें त्यांणींच बाळमित्राचा[1] पहिला भाग केला. हा भाग तयार होऊन त्याचीं पत्रें छापित होते तेव्हां मीं वरच्या वर्गांत गेलों होतों. Captain G. R. Jervis साहेब यांणीं सन १८२७ त Hutton's Course of Mathematics या गणितविषयक पुस्तकाचा तर्जुमा[2] करून छापिला. त्याचे दोन भाग झाले. पूर्णांक, अपूर्णांक, गणित हा एक भाग. बीजगणित, भूमिति, त्रिकोणमिति, क्षेत्रफळ, घनफळ, व लाघ्रत्तम हा दुसरा भाग. या शिवाय आणखी त्या साहेबानें Pasley's Practical Geometry म्हणजे कर्तव्यभूमिति[3] हें एक तिसरें पुस्तक छापून प्रसिद्ध केलें होतें. या गणित पुस्तकाचे निरनिराळे प्रकरणांचीं निरनिराळीं पुस्तकें जशीं जशीं तयार होत गेलीं, तशीं एका सांच्याचीं छापून प्रसिद्ध होत गेलीं. तीं शिकणारांस विकत मिळत. आणि पुढं तीं एकत्र करून त्यांचे, वर सांगितलेले दोन भाग बांधले. सन १८२७ त मीं वरल्या वर्गांत गेलों त्या वेळेस वरल्या दोन तीन वर्गांस वाचन, लेखन आणि व्याकरण शिकविण्या करितां बापुशास्त्री मायदेव[4] शुक्ल यांची नेमणूक झाली. हे शास्त्री संस्कृत व्याकरणांत मोठे प्रवीण होते. हे नवीनच, मला वाटतें गुरु जवळून अध्ययन करून, पुण्यांत व इतर ठिकाणीं

---

१ **बाळमित्र**, भाग १ ला ( शिक्षा मंडळीचा शिलाछाप ) मुंबई, १८२८. Berquin नें लिहिलेल्या मूळ फ्रेंच भाषेंतील Children's Friend वरून केलेलें मराठी भाषांतर. ( B. B. R. A. S. ) या पुस्तकाचा दुसरा भाग टी. गेस्फोर्ड यानें मराठींत करून आर. प्रेरा या शिलाछापखान्यांत १८३३ सालीं छापला. ( टाणें म. ग्रं. )

२ हा ग्रंथ Dr. Charles Hutton व Mr Bonny Castle यांच्या इंग्रजी पुस्तकांवरून तयार करून ' **शिक्षामाला** ' या नांवाखालीं १८२८ सालीं जर्विसनें प्रसिद्ध केला. " यांत गणितवहीवाटवही आणि नाण्याचे तपासणीचें वर्तमान " आहे. ( मुं. म. ग्रं. ) गुजराती भाषांतर याच सालीं प्रसिद्ध झालें.

३ जगन्नाथशास्त्री क्रमवंत यांच्या साहाय्यानें भाषांतर करून ' कोरियर ' प्रेसमध्यें १८२६ मध्यें छापला. ( ने. ज. ला. थोबीतलाव ) याचें गुजराती भाषांतर याच सालीं प्रसिद्ध झालें.

४ मूळ ठिकाण नागांव, प्रांत अष्टागर. हे हवेली तालुक्याचे मामलेदार होते. तेल, तूप या जिनसांवर हिंदुधर्मशास्त्राधारें जकात बसवितां येत नाहीं, असा कलेक्टरच्या हुकुमाविरुद्ध रिपोर्ट केल्याबद्दल अहमदाबादेस न्यायनिवाडा करण्याच्या पंचाचे जागीं त्यांची बदली करण्यांत आली. ( **मराठी भाषेचे व्याकरणकार व व्याकरणप्रबंधकार**, ले० मो. स. मोने, १९२७, पृ. २११ पहा. )

शास्त्र्यांच्या सभा पाहून आलेले होते. त्यांस हें परभु. शेणवी, सोनार, वैश्य क जातीच्या मुलांस मराठी व्याकरण शिकविण्याचें काम फार हलकें वाटत होतें. ज पेशवाई असती तर ते असें काम शंभर रुपये दरमाह घेऊन टिकते ना, म चाळीस रुपयांस कोठून? परंतु आपल्या विद्वत्तेचे भोक्ते कोणी राहिले ना म्हणोन उदरनिर्वाहा करितां त्यांस असा रोजगार पाहणें जरूर पडलें. हे बापुशास्त्री शुक्ल आणि Captain Jervis साहेबांचे मुख्य पंडित जगन्नाथशास्त्री क्रमवंत हे उभयतां एकग्रामस्थ होते असें मला ठाऊक आहे.

## बापुशास्त्री शुक्ल यांची व्याकरण व वाचन शिकवण्याची पद्धति

या शास्त्रीबावांची आमच्या शाळेंत नेमणूक होण्याचे पूर्वी रामचंद्र शास्त्री जानवेकर व दुसरे Jervis साहेबांचे हाता खालचे एकदोन पंडित यांहीं मिळून प्रश्नोत्तररूपानें एक लहानसें मराठी व्याकरण रचलें होतें. नवीन पंतोजी तयार करण्याची शाळा अथवा वर्ग रामचंद्र शास्त्री व त्यांचे मदतनीस बाबाचार्य हे शिकवि होते. व्याकरणवर्गात व मराठी शाळेच्या पहिल्या दुसऱ्या वर्गांत या व्याकरणाच्या प्रती लिहून त्यां वरून मुलें व्याकरण शिकत होतीं; परंतु आमच्या मराठी शाळे व बापूशास्त्री मायदेव शुक्ल आल्या वर त्यांणीं त्या व्याकरणाची गरज न टेवता आपण तोंडानें मुलां कडून वाक्यें वाचवून त्याचें व्याकरण सांगूं लागले. ते आह्मा पाशीं म्हणत, "असल्या भुसकट व्याकरणाची मला काय गरज आहे! मीं तुह्मा स्वतंत्र रीतीनेंच व्याकरण सांगेन." मग ते तसेंच करूं लागले. ते पंचोपाख्यान विदुरनीति, सिंह्वासनबत्तिशी, इसपनीति व बाळमित्र हे ग्रंथ एका मागें ए आह्मां कडून वाचवून घेऊन आमच्या वर्णोच्चारा कडे लक्ष देऊन त्यांत जे कठीण शब्द येत त्याचा अर्थहि ते आह्मांस नीट स्पष्ट रीतीनें सांगत. केव्हां केव्हां मोरोपंतांच्या आर्या व वामनाचे एक दोन श्लोक व संस्कृत श्लोकहि ते मोठ्या प्रेमानें आह्मां शुद्ध लिहितां यावें या करतां म्हणून दाखवीत. त्यांच्या जवळ पानसुपारीची चं असे, ती उघडून पानसुपारी खात खात मोठ्या प्रेमानें त्यांणीं आह्मांस मोठ लाडकेपणानें शिकविलें. त्यांची प्रकृति थोडी विनोदी असे. म्हणोन आह्मांतून को अशुद्ध शब्द म्हटला अथवा बत्तिस सिंह्वासनींत जागोजाग लिहिलेले संस्कृत श्लो वाचले, म्हणजे ते आमचा केव्हां केव्हां थोडा विनोदहि करीत, आणि म्हण "तुह्मां परभु, सोनारांना संस्कृत शब्दांचा उच्चार बराबर येणार नाहीं. तु

ांसमासे खाणारे लोक!" असें मोठ्यानें हंसून म्हणावें. परंतु त्यांच्या बोलण्याचा ाधीं कोणास राग आला नाहीं; उलटीं आह्मी मुलें त्यांज कडून अशीं बोलणीं ऐकून ावयास खुश असों, कारण ते पुरुष फार मोकळे मनाचे होते; आणि मोकळे ानानें विनोदांत विरोधिक बोलणें बोललें तथापि त्यांचा फारसा राग कोणी मानित ाहीं; मग आह्मी तर मुलेंच होतों; आह्मांस तशा भाषणापासून राग कोठून येणार? ़लटी आह्मांस मौज वाटून पुनः पुनः तसा विनोद शास्त्रीबावांच्या मुखा वाटे ऐकावासा वाटे. एकदां शास्त्रीबावांनीं परभु लोकांच्या म्हाताऱ्या बायकांच्या सोवळ्याचें ार्णन करित असतां म्हटलें, "अरे, तुमच्या लोकांचें सोवळें म्हणजे काय? सुकटींत[1] ़ूत सांपडलें; रांडे कोळणीचा इंटाळ झाला! तुमच्या बायका कोळणीच्या टोपलींतून नेलेले मासे घेतात त्यांचा त्यांस विटाळ होत नाहीं. परंतु त्या टोपलींत जर का सूत ़ांपडलें तर मात्र त्यांस विटाळ होतो; असें तुमचें सोवळें!" असें म्हणून मोठ्यानें ़ंसावें, आणि साक्षी करितां पांडुरंग जोशी[2] अथवा बात्रामामा यांस आपला विनोद ऐकायास बोलवावें, आणि त्यांसहि हंसवावें. मीं लहान होतों तरीं या शास्त्रीबावांच्या म्हणीचा खरेपणा माझ्या मना वर पक्का ठसला, म्हणोनच ती त्या वेळेस ऐकलेली म्हण अद्यापि मला आठवत्ये. अस्तु. मला स्वभाषे विषयीं इतकी गोडी लावली यास मुख्य कारण आमचे तीर्थरूपांची दिनचर्या, आणि दुसरे हे बापूशास्त्री. म्हणोन या शास्त्रीबावांचें स्मरण मीं मोठ्या कृतज्ञतेनें करितों. हे बापुशास्त्री शुक्ल पुढें कांहीं दिवस पुण्यांत हवेलीचे मामलतदार झाले, आणि पुष्कळ वर्षे अमदावादच्या अदालतीचे[3] शास्त्री होते. हे मला दोन तीन वर्षां[4] वर मुंबईंत भेटले होते (म्हणजे १८६८ च्या सुमारास). त्या काळीं ते म्हातारपणानें फार अशक्त झाले होते तथापि त्यांची स्मरणशक्ति अशी विलक्षण पाहिली कीं, ज्या ज्या गोष्टी त्यांच्या कारकीर्दीत घडल्या त्यांचें सन तारिखवार स्मरण त्यांस होतें.

१ वाळलेले, विशेषतः बोंबील नांवाचे मासे.

२ पांनसकर. यांनींच 'ज्ञानचंद्रोदय' हें जुन्या मराठी ग्रंथप्रकाशनाला वाहिलेलें पहिलें मासिक १८४० सालीं सुरू केलें. 'प्रभाकर' पत्रावर मुद्रक व प्रकाशक म्हणूनही यांचें नांव आढळतें. (१८४२-१८५५) 'धुमकेतु' पत्रही ते छापीत असत. (ज्ञानोदय. १ फेब्रु० १८५५)

३ न्यायकचेरी.

४ लेखनकालनिर्देश (iv).

हें पाहून मीं फार विस्मित झालों. एकदां सुमारें पंचवीस वर्षां वर या शास्त्रीबावांनीं माझी सुरतेंत गांठ पडली तेव्हां ते मला म्हणाले, "दादया, तुझें केलेलें व्याकरण मीं पाहिलें आणि मला फार संतोष झाला, तसे तुझे दुसरे गुण व विद्वत्तेचा रव ऐकून मला फार संतोष होतो. परंतु गड्या, तूं नास्तिक झालास रे. तुझी आपल्या धर्मा वर निष्ठा नाहीं हें ऐकून मीं दिलगीर आहें." त्यां नम्रतेनें म्हटलें, "शास्त्रीबावा, शिष्याच्या कीर्तीनें गुरूस आनंद व्हावा हें उचित आहे; परंतु धर्मा विषयीं जो आपण मला ठपका दिला तो जर धर्म शब्दाचा यथायोग्य अर्थ समजून दिला असला तर तो मला लागत नाहीं; आणि सध्यांच्या लोकव्यवहारा प्रमाणें त्याचा अर्थ समजून जर मला दिला असला, तर तो घेणें मला प्राप्त आहे." मग त्याज वर शास्त्रीबावा कांहींच फारसे बोलले नाहींत आणि आपल्या गुरू बरोबर वाद करावा हेंही मला अगदीं आवडलें नाहीं. याच शास्त्रीबावाचे चिरंजीव त्र्यंबकराव बापूजी हालीं मुंबईच्या हैकोर्टांत ( High Court ) इंटरप्रिटर ( Interpreter ) व मुतरज्जिम[१] आहेत.

## पांडुरंग जोशी पांवसकर.

हे जोशीबावा वरच्या वर्गांत गणित शिकविण्याचें कामा वर होते. यांणीं हिंदूंचें ज्योतिःशास्त्र म्हटलें होतें; म्हणजे भास्कराचार्यांचें बीज, व लीलावती यांणीं म्हटली होती. म्हणोन यांस इंग्लिश गणिताचे ग्रंथा वरून कयापटन जर्विस ( Captain Jervis ) साहेबानें मराठींत तर्जुमे केलेल्या ग्रंथा वरून तो विषय मुलांस शिकवायास फारसा आयास लागत नसे. हे जोशीबावा सरळ बारीक अंगाचे पुरुष होते, आणि फार बुद्धिमान् होते असें त्या वेळेस सर्व लोक म्हणत असत. यांची बुद्धि फार चंचल होती. यांणीं मला पूर्णांक, अपूर्णांक, क्षेत्रफल, घनफल वर्गसमीकरणा पर्यंत बीज शिकविलें. त्या वेळेस एथ पर्यंत गणित मराठी शाळेंत शिकवित असत; आणि इंग्लिश स्कुलांत ( English school ) तर मुळींच गणित शिकविणें नसे, आणि असलेंच तर त्रैराशिका पर्यंत असेल असें मला वाटतें.

---

१ इंटरप्रिटर म्हणजेच मुतरज्जिम. (अरबी)

## वार्षिक परीक्षेचा समारंभ

सन १८२५ पासून १८२८ पर्यंत मला स्मरतें दोन मोठ्या वार्षिक परीक्षा या शाळेच्या झाल्या. एक सुमारें १८२६ साच्या समाप्तीस झाली तेव्हां मीं खालच्या वर्गात होतों. त्या काळीं मुलांस रेश्मी थैल्यांत भरून रुपये बक्षीस मिळाले होते; या परीक्षेंत मराठी शाळेंत वरल्या वर्गांत पहिला नंबर विठोबा गोडबोले [1] याचा होता, आणि दुसरा नंबर बाळाजी सुंदरजी परभु [2] याचा होता. यांत पहिल्यास ६० रुपये आणि दुसऱ्यास ४५ रुपये बक्षीस मिळाले असें मला स्मरतें. याच सुमारास मला वाटतें मुंबईचे नामदार गवर्नर Elphinstone साहेब [3] हे आपल्या देशास जाण्याच्या तयारींत होते. म्हणोन त्या समारंभा करितां दक्षिण देशांतून मोठमोठे सरदार त्यांस भेटण्या करितां आले होते. त्यां मध्यें चिंतामणराव पटवर्धन सांगलीकर हे होते. ते गोरे, स्थूल शरीराचे, वृद्ध पुरुष होते, व त्यांच्या आंगांत इतका भारी शेला होता, किं त्याच्या झोंक मागून उचलून धरायास एक खिसमतगार होता, असें पाहिल्याचें मला स्मरण आहे हे सरदार लोक या शाळेच्या वार्षिक समारंभांत होते किंवा Elphinstone साहेब स्वदेशीं जाण्याचा निराळा समारंभ झाला असून त्या करितां आले होते याचें आतां मला पक्कें स्मरण होत नाहीं. परंतु आमची शाळा पाहण्या करतां एकदां हे सारे सरदार लोक व मोठमोठे साहेबलोक व मुंबईचे मोठमोठे फ्रामजी कावसजी

---

१ यांची माहिती मिळत नाहीं.

२ यांनीं १८३१ सालीं शाळा सोडली व असि० कमि० जनरलच्या ऑफिसांत " हेड परभु " झाले. ( G. D. 1843, Vol. 24 A. p. 187. )

३ ( १७७९-१८५९ ) १८११ पुण्याचे रेसिडेंट. १८१९ ते १८२७ मुंबईचे गव्हर्नर चतुरस्र विद्वान व मुत्सद्दी. नव्या मुंबईचा पाया यांनींच घातला. हिंदुस्थानच्या गव्हर्नर जनरलची जागा यांना देऊं केलेली यांनीं नाकारली. हिंदुस्थानचा इतिहास ( १८४१ ) वगैरे ग्रंथ लिहिले. ( The Hon. Mount Stuart Elphinstone by Sir T. E. Colebrooke, 1884 पहा ).

व जमशेटजी जीजीभाई[१] व जगन्नाथ शंकर शेट[२] आदिकरून शेट सावकार जमले होते हें मला पक्कें आठवतें. त्या वेळेस या सर्व लोकांनीं एल्फिन्स्टन साहेबांचें या देशांत नांव रहावें म्हणोन त्यांच्या नांवानें मोठें विद्यालय काढावें या करितां एक मोठी टीप[3] भरून तयार झाली होती. तींत मुमारें एकंदर तीन लक्ष रुपये भरलेले होते. वर नांव श्री महाराज प्रतापसिंह राजे छत्रपति संस्थान सातारा यांचें होतें. त्यांणीं १७०००[४] (सतरा हजार) रुपये भरलेले मला आठवतात.

## नाना नारायण

मीं या मराठी शाळेंत वरच्या वर्गांत असतां त्या शाळेंत नाना नारायण[५] हा मुलगा आला. हा नारायण शेट मेंगळे शिंपी ज्ञातीचे मोठे शेट होते यांचा नातू. याची माझी पूर्वीची थोडी ओळख कुंभारतुकडींत रघुनाथ नाना जोशी यांचे घरीं, त्यांज पाशीं हा थोडे दिवस इंग्लिश शिकावयास जात असे व मींही सकाळीं थोडे दिवस जात होतों, तेथें पडली होती. नंतर हा मुलगा जेव्हां सोसाइटींत आला,

---

१ ( १७८३–१८५९ ) नवसरी येथें गरीबींत जन्म. चीन वगैरे देशांत प्रवास करून व्यापारांत पुष्कळ पैसा मिळविला, तसाच दातृत्वांत खर्चही केला. जे. जे. हॉस्पिटल व साष्टी व मुंबई बेट जोडणारा पूल हीं यांच्या औदार्याचीं प्रमुख स्मारकें होत. १८४२ साली सर व १८५८ सालीं पहिले हिंदी बॅरोनेट. १८५६ सालीं टौनहॉलमध्यें यांचा पुतळा उभारला गेला. जास्त माहितीकरितां **सर जमशेटजी जिजीभाई** ( गुजराती ) ले० रतनजी बे. मादन, १८९९ पहा.

२ ( १८०२–१८६५ ) मुंबईतील हिंदु समाजाचे एकाकाळचे दानशूर पुढारी; शिक्षण, समाज सुधारणा, राजकारण वगैरे प्रत्येक बाबतींत यांचें अंग असे. वि. ना. पितळे यांनीं यांचें चरित्र ( १९१६ ) लिहिलें आहे. **मुंबईनो बाहार** १८७४ पृ. ८५–९४ पहा.

३ वर्गणीची यादी. तुला " ही वर्गणीची टीप युरोपियन लोकांसाठीही उघडी ठेविला आहे. " ( **ज्ञानोदय**, १८५५, पृ. २७५ ).

४ हा आंकडा बरोबर असून देणग्यांची यादी **Report of N. E. Society for 1827.** ( पृ. ६६–७६ ) मध्यें दिली आहे.

५ याचें उपनांव माहीत नाहीं. मेंगळे हे त्याचे मातामह. मिस बर्ड हिच्या England Deliniated या पुस्तकाचें यानें मराठी भाषांतर केलें आहे. ( मिशन प्रेस, १८३५ ) दादोबा व नाना नारायण यांनीं मिळून नकाशाचें पुस्तक मराठींत तयार केलें आहे. ( १८३६ ) नानानें विल्सनला पाठविलेलें एक पत्र उपलब्ध असून त्यांत त्यानें पुणें कॉलेजांत ब्राह्मणेतरांनाही प्रवेश मिळावा, असें म्हटलें आहे. ( O. C. S. 1836, p. 117 ).

तेव्हां त्याचा माझा फार चांगला स्नेह जमला. हा ठेंगण्या वाढ्याचा[1] लहानसा मुलगा होता; आणि जरी मज पेक्षां एक दीड वर्षांनीं वडील होता, तरी मज पेक्षां तो लहान दिसत असे. हा मुलगा मोठा बुद्धिवान् होता, आणि मोठा उद्योगी असे. एकादे विषयांत मन घातलें म्हणजे खोंचून त्याचा विचार करण्याची याची बुद्धि असे. म्हणोन गणितांत याचा नंबर बहुतकरून वर असे. कठीण समीकरणांचीं उदाहरणें यार्णे केव्हां केव्हां आमच्या अगोदर चमत्कारिक रीतीनें सोडवावीं. या वरून हा मुलगा मोठा बुद्धिवान् म्हणोन याची वाहवा होती. पहिल्या वर्गांतले मुलगे इंग्लिश स्कुलांत ( English School ) ज्या वेळेस गेले त्यां बराबर नानाही गेला असें मला स्मरतें. मीं एक साल मागें राहिलों. पुढल्या सालीं मीं इंग्लिश स्कुलांत गेल्या वर नानाचा माझा अतिशय सहवास झाला आणि इंग्लिश भाषेंत प्रथम चांगला अभ्यास करून देण्यांत यार्णे मला फार मदत केली. बाळ गंगाधर शास्त्री जांभेकर[2] हे त्या वेळेस त्या शाळेंत विद्यार्थ्यांच्या मंडळांत अग्रगण्य होते. यांस या शिंप्याच्या मुलाची बुद्धिमत्ता पाहून मोठें आश्चर्य वाटत असे आणि ते याची तारीफ करित असत. मीं शाळेंत विद्यार्थी असतां आणि पुढें आह्मीं रोजगारास लागल्या वरहि नाना प्रमाणें मला दुसरा मित्र नव्हता. त्याणें मला नेहमी आपल्या आजाच्या घरीं न्यावें आणि आपणही नेहमी आमच्या घरीं यावें. त्याचे आमचे त्या वेळेस लोकसुधारणुके विषयीं विचार होत असावे. हिंदुलोक सुधारण्यास जात मोठी अडचण आहे असें त्याच्या भाषणांत केव्हां केव्हां यावें. या माझ्या लिहिण्यांत जागोजाग या गृहस्थाचें नांव घेण्याचे पुढें पुष्कळ प्रसंग आहेत; म्हणोन एथें आतां यांज विषयीं इतकेंच सांगून आतां पुरें करितों.

---

१. ( सं. वर्ध. ) Breed ( Molesworth ); निपज.

२ यांच्यासंबंधी जास्त माहिती पुढें आली आहे. बा. ना. देव कृत बा. गं. जांभेकर यांचें चरित्र (१८९२), दैनिक लोकमान्य (मुंबई) १७ मे १९४४ मधील माझा लेख व श्री० वि. कृ. जोशी यांच्या दर्पणसंग्रह ( १९४६ ) या पुस्तकाची प्रस्तावना पहा.

★

७

## माझें लग्न

इस्वी सन १८२८ च्या माघ मासीं माझ्या लग्नाच्या समारंभास आरंभ झाला. जगन्नाथ पांडुरंग यांची मुलगी कृष्णाबाईची मागणी ती उपजल्यापासूनच बहुतकरून झाली होती. पूर्वी Mr. Halhed या नांवाचा मुंबईचा Magistrate होता, त्याच्या हाताखालीं इनसाफाच्या कामांत मुख्य समजविणारे पुरुषोत्तम कल्याणजी, ज्यांस प्रसिद्धपणांत त्या काळीं मुंबईंत सर्व लोक नथुजी बावा म्हणत होते, व जे त्या काळीं मोठे प्रसिद्ध दरबारी मनुष्य होते, त्यांचे जगन्नाथ हे नातु. मीं त्यांस तर पाहिलें नव्हतेंच, परंतु त्यांचे चिरंजीव पांडुरंग ज्यांस धोंडबा म्हणत असत त्यांस चांगलें पाहिलें होतें. ते म्हातारे पाऊणशें ऐशीं वर्षांचे उंच वाढ्याचे पुरुष होते. माझें लग्न झाल्या वर एक दोन वर्षांनीं तेही मृत्यु पावले. या काळीं जगन्नाथ पांडुरंग यांचें मुंबईंत फार चांगलें चालत होतें. ते मुंबईचे माजिस्त्रेट Mr. Erskine,[1] एल्फिन्स्टनसाहेब गवर्नर असतां, होते, त्यांच्या ऑफिसांत हे रैटर होते. पुढें Mr. Gray माजिस्त्रेट झाल्या वर जगन्नाथ हे त्यांचे Interpreter झाले होते. तेव्हांपासून दहा पंधरा वर्षे पर्यंत हे मोठ्या प्रसिद्धपणानें माजिस्त्रेटच्या आफिसांत कारभार करित होते. कैदी सोडविण्यांत व बाहेरच्या बाहेर अमुदार लोकांचे खटले चुकविण्यांत यांचें त्या काळीं जितकें चालत होतें तितकें आतां खुद्द माजिस्त्रेटांचें चालत नाहीं. म्हणोन त्या काळीं या नुसत्या Interpreter लोकाना जो या लोकांत मान व प्रतिष्ठा होती ती आतां नेटिव माजिस्त्रेटांत नाहीं हें सर्व जुने लोक जाणून आहेत, व मींहि स्वतः पाहतों. कृष्णाबाई ही जगन्नाथ पांडुरंग

---

१ विल्यम अर्स्किन ( १७७३–१८५२ ) १८०३–४ हिंदुस्थानांत आले. प्रथम स्मॉल कॉज कोर्टामध्यें कारकून पुढें स्टायपेंडियरी मॅजिस्ट्रेट. लिटररी सोसायटीचे सेक्रेटरी व पुढें व्हाइस प्रेसिडेंट. पारशी व बौद्ध धर्मासंबंधी अनेक लेख लिहिले. History of India under Babar and Humayun ( १८५४ ) हा त्याचा ग्रंथ प्रसिद्ध आहे. पैसे खाल्ल्याच्या आरोपावरून त्यांना बडतर्फ करण्यांत येऊन १८२३ सालीं ते स्वदेशी गेले. **Bombay in the days of George IV by F. D. Drewitt, 1907 पहा.**

यांची पहिली एकुलती एक मुलगी; आणि मींहि बापाचा वडील मुलगा, आणि माझें लग्न हें आमच्या घरांत पहिलें कार्य, म्हणोन आमच्या वडिलांनीं ओढाताण करून माझ्या लग्नाचा थाट त्या काळीं आमच्या गरिबी प्रमाणें चांगला जमविला. असें माझें लग्न त्या काळीं बरेंच मोठ्या थाटामाटानें झालें. आमच्या सासऱ्यांनीं नवशें हजार रुपयांच्या खर्चाचा फकत[१] मंडप घातला होता असें लोक त्या वेळेस बोलत होते. दोन चार बैठकी झाल्या. मीं त्या वेळेस तेरा वर्षांचा होतों, आणि नवरी आठ वर्षांची होती. आमच्या लोकांत इतक्या लहानपणीं लग्नाची मोठी हौस असल्ये. लग्न म्हणजे काय याचें यथास्थित ज्ञान नसतें. नवऱ्या मुलास इतकें मात्र समजतें कीं, "ही माझी बायको' आणि नवरी मुलीस जर ती थोडी जाणती असली तर ती, "हा मुलगा माझा नवरा" म्हणोन समजल्ये. आणि अगदींच लहान असली तर तेंहि तिला समजत नाहीं. इतक्या लहान वयाच्या मुलांचें लग्न करण्याचा प्रघात या देशांत शेंकडों वर्षांपासून पडून गेला आहे. 'अष्टवर्षा भवेद्गौरी' असे शास्त्रार्थ दाखवून ब्राह्मणांनीं या चालीस उत्तेजन दिलें; तें इतकें, किं शेवटीं मुलांचीं पाळण्यांत लग्नें लावूं लागले! तेव्हां त्या रीतीशीं तुलना करून पाहतां आमचें लग्न मोठेपणींच झालें असें समजलें पाहिजे. माझें लग्न झालें त्याच्या एक दोन वर्षें पूर्वीं आमचे तीर्थरूप, फ्रामजी कावसजी यांचे ऑफिसांत इंग्लिश रैटर होते. तेथून जमशेटजी जीजीभाई यांहीं ते फार उपयोगी म्हणोन आपल्या ऑफिसांत फ्रामजी शेट कडून मागून घेतले. आणि त्यांचा दरमाहा शंभर रुपये केला. त्या काळीं आमचे तीर्थरूप हे व्यापारी लोकांचें इंग्रजींत कामकाज चालविण्यांत फार हुशार होते. आणि फ्रामजी व जमशेटजी हे त्या काळीं मुंबईंत मोठे प्रसिद्ध व्यापारी होते; त्यांत जमशेटजीचा व्यापार त्या काळीं मोठा वाढत चालला होता. चीन देशा बरोबर अफिणीच्या नव्या व्यापारांत ते गृहस्थ त्या काळीं पहिल्या कोटीचे होते. मोतीशा हा फार श्रीमंत व्यापारी होता. त्यासहि हे मार्गे हटवित चालले. माझ्या लग्नास जमशेटजीं कडून आमच्या तीर्थरूपांस मदत मिळाली. व हे त्याच्या ऑफिसांत असल्यानें व पुष्कळ वर्षें फ्रामजी शेट कडे होते. या कारणा वरून यांची गुर्जर, भाटे, मारवाडी व पारशी व्यापारी या लोकां मध्यें चांगली ओळख व प्रतिष्ठा होती. या वरून माझ्या लग्नाचा समारंभ फार चांगला

---

१ (अरबी. फकत) केवळ. अलिकडे 'फक्त' असा शब्द लिहिला जातो. परंतु मोल्स्वर्थ आपल्या कोशांत 'फकत' असाच लिहितो.

जमला होता याची मला चांगली आठवण आहे. माझ्या वरातीं बराबर जमशेटजीचे वडील चिरंजीव खरशेटजी; जे हाल्लीं सर जमशेटजी जीर्जीभाई म्हणोन प्रसिद्ध आहेत ते, होते, व पुष्कळ पारशी व वाणी यांचा थाट चालला होता. या खरशेटजीचें लग्न झालें तेव्हां मीं फार लहान होतों. त्या वेळेस आह्मीं शेतवडींत राहत होतों. तें लग्न मला वाटतें सन १८१९ अथवा २० त झालें असावें. तो फार मोठाच थाट साऱ्या मुंबईंत प्रसिद्ध होता. किती हजार रुपयांचा तर मंडप जमशेटजीनें घातला होता. तो मंडप पाहण्या करितां सारे मुंबईचे लोक बायकापोरां सुद्धां नित्य जात असत. त्यांत मला आणि माझा धाकटा भाऊ भास्कर यालाहि गड्याचे खांद्या वर बसवून नेलें होतें. त्या मंडपाचे बेगडी चांदवे भास्करानें घरीं आणल्याचें मला अद्यापि आठवतें.

## सन १८२८ ची वार्षिक परीक्षा.

माझ्या लग्नाचा समारंभ चालत असतां सोसाइटीच्या शाळेच्या तिसऱ्या वार्षिक परीक्षेचें काम चाललें. त्या वेळेस माझा वरच्या वर्गांत पहिला नंबर होता, परंतु खानगी[1] परीक्षेचें काम तर Captain Jervis साहेबानें चालविलें त्या वेळेस लग्ना मुळें मीं हाजर नव्हतों. म्हणोन माझें नांव लिहिलें नाहीं. पुढें जेव्हां बक्षिसें देण्याचा वार्षिक समारंभ जमायाचा त्या समारंभांत माझें नांव इनामाचे पटांत नसल्या मुळें मला बक्षीस मिळायाचें नाहीं असें गुरुजी कडून समजल्या वर मीं तें वर्तमान आपल्या तीर्थरूपांस सांगितलें, आणि मोठा खंती झालों. तेव्हां तीर्थरूपांनीं फ्रामजी शेटास हें वर्तमान कळविलें आणि त्यांज कडून Captain Jervis यांज वर चिठ्ठी आणली, किं लग्ना मुळें खानगी परीक्षेस हजर नव्हतों, परंतु माझा नंबर पहिला होता, तेव्हां माझें बक्षीस मला मिळावें, अशी चिठ्ठी फ्रामजीनें Jervis साहेबांस दिल्या वर मला पाहून ते साहेब हंसले आणि माझ्या बापास म्हणाले कीं, "काय वाईट चाल तुम्हां लोकांत पडून गेली आहे, किं इतक्या लहान मुलांचें तुम्ही लग्न करितां." असें म्हणून शाळेंत मज विषयीं आणखी चौकशी करून माझें नांव इनामाच्या पटांत पहिल्या नंबरा वर दाखल केलें. पुढें मार्च महिन्याच्या ८ व्या तारखेस हा वार्षिक समारंभ झाला. तेव्हां मुंबईचे नवे गवर्नर Sir John

[1] (फा.) खासगी.

Malcolm[१] साहेबबहादुर हे मुख्य स्थानापन्न[२] होते, त्यांहीं स्वहस्तानें मुलांस बक्षिसें दिलीं. त्यांत मला मराठी शाळेंत पहिलें बक्षीस तीन पुस्तकें Hutton's Course of Mathematics[३]. याचे दोन भाग आणि Pasley's Practical Geometry[४] याचीं Captain Jervis साहेबानें नवीनच मराठींत व गुजराथींत भांषातरें करून पुस्तकें छापून तयार केलीं होतीं तीं मिळून तीन पुस्तकें चांगलीं सुंदर मढवून सभोंवती सोनेरी वेल व वरच्या भागा वर सोनेरी इंग्रजी अक्षरांनीं लिहिलेला दाखला अशीं पुस्तकें बक्षीस मिळालीं तीं अद्यापि माझे संग्रहीं आहेत. त्यास आतां[५] बेचाळीस वर्षे झालीं. तो दाखला येणेंप्रमाणें होता :—

"Presented to Dadoba Pandurang,
By Major General-The Hon'ble Sir John Malcolm, G. C. B. President of the Bombay Native Education Society. 8th March 1828."

हीं पुस्तकें घरीं आणल्या वर तीं पाहून सर्वांस मोठा आनंद झाला. मग मला त्या ल्हान वयांत किती झाला असेल याचें अनुमान करा.

## शूद्रांचीं मुलें शाळेंत घेण्याचा प्रतिबंध.

या मराठी शाळेंत असतां एक कांहीं अगत्या सारखी गोष्ट माझ्या पाहण्यांत आली होती ती एथें सांगितल्या शिवाय मला या शाळेचा वृत्तांत सोडतां येत नाहीं. ती अशी : मीं या शाळेंत गेल्या नंतर सुमारें एक दीड वर्षांत आमच्या सर्व गुरूजींस व पतोजींस असा एकाएक हुकूम आला, किं या सोसायटीच्या शाळांत जितकीं कुळवाड्याचीं मुलें असतील, म्हणजे मराठे, कोळी, कुळंबी, भंडारी या जातीचीं

१ १८२७-३० मुंबईचे गव्हर्नर. History of Persia 1815, Political History of India, 1826, Sketch of the Sikhs, Memoirs of Central India वगैरे ग्रंथांचे लेखक. Sir John Kaye यांनीं लिहिलेलें यांचें चरित्र (१८५६) पहा.

२ मुळांत 'स्थापनापन्न' असा शब्द आहे.

३ मागें पृ. ३५ तळटीप २ पहा.

४ मागें पृ. ३५ तळटीप ३ पहा.

५ १८२८+४२=१८७०. लेखनकालनिर्देश. (v)

मुलें असतील त्या सर्वांस काढून टाकावें व पुढें या जातीचीं मुलें घेऊं नयेत[1]. तेव्हां या जातीचीं दहावीस-अधिक मुलें आमच्या शाळेंत होतीं, त्यांत कित्येक वरच्या वर्गांत चढलेलीं, व त्यांचा अभ्यास चांगला झाला होता, त्यांस एकदम रजा मिळाली. पुढें थोडक्याच दिवसांनीं माझ्या ऐकण्यांत असें आलें कीं, असा परस्पराचा नियम ठरविण्यांस मुख्य कारण धाकजी दादाजी[2] परभु हे होते. हे गृहस्थ त्या काळीं या सोसाइटीचे एक सभासद होते. यांणीं जगन्नाथ शंकरशेट व दुसरे हिंदु सभासद मोठ्या आग्रहानें आपल्या पक्षाचे करून हा नियम त्यांज कडून करविला आणि इतर पारशी व युरोपियन सभासदांस असें भय दाखविलें कीं, "जर तुह्मीं असा नियम न ठरवाल तर मीं सभासदाचें काम पाहणार नाहीं, व परभु लोकांचीं मुलें एथें येण्यास मना करीन." धाकजी दादाजी हे त्या वेळेस वयातीत व मोठे प्रतिष्ठित गृहस्थ होते. त्यांचें म्हणणें असें पडलें कीं, जर हे हलक्या जातीचे लोक शिकून पुढें हुशार झाले तर उंच जातीच्या लोकांत इंग्रजींत रोजगार मिळणार नाहीं, व त्यांची आपली बरोबरी होत जाईल. हें त्यांचें म्हणणें त्या काळच्या बहुत्येक लोकांस मोठें शहाणपणाचें व दूर अंदेशीचें[3] असें वाटलें, व त्यांची हिंदू लोकांत बरीच वाहवा झाली, त्यांत त्यांच्या जातींत तर फारच झाली. त्यांच्या त्या काळच्या आंखुड समजुती प्रमाणें त्यांना मोठा दोष यावा असें मला वाटत नाहीं. अद्यापि आतां इतके शिक्षित लोक झाले आहेत व सुधारलेपणाचा मोठा अभिमान

---

१ रे. विल्सन लिहितो, "The youth of certain castes, however well washed and clothed, dare not enter the Elphinstone Institution. The vernacular pantojis drive the children of certain tribes altogether from their schools. None but Brahmins, 'the Gods upon earth,' are admissible to the Sanskrit College at Poona." **Evangelization of India, 1849, p. 338.**

२ हे त्या काळच्या सनातनी लोकांचे पुढारी होते. श्रीपत शेषाद्रि खिस्ती धर्मांत गेला असतां त्याला शुद्ध करून परत हिंदुधर्मांत घेण्याचा प्रयत्न बाळशास्त्री जांभेकरांनीं केला त्याला विरोध करणाऱ्यांचे पुढारी हेच होते. ( इंदुप्रकाश, ११ मे १८६५ ) यांच्यासंबंधी जास्त माहितीकरितां मुंबईनो बाहार ( र. फा. वाच्छा ) १८७४ पहा.

३ ( फा. ) भावी संकटाची पूर्वकल्पना.

बाळगतात त्यांच्याहि मनांतून अद्यापि ही ग्रंथी सुटत, नाहीं, किंबहुना तेव्हां पेक्षां आतां जातिद्वेष आंतून अधिक वाढल्या सारखा दिसतो. मग वृद्ध धाकजी कडेस या नियमाचा मोठा दोष लावावा हें मला प्रशस्त दिसत नाहीं. पुढें धाकजीच्या वृद्धपणा मुळें या सभासदपणाचें काम त्यांणीं सोडिलें आणि हा नियम कांहीं फार दिवस टिकला नाहीं.

★

# सोसायटीच्या स्कुलांतला माझा इंग्लिश अभ्यास

ही वार्षिक परीक्षा झाल्या वर लौकरच मला व दुसऱ्या मराटींत तयार झालेल्या मुलांस त्याच शाळेच्या इंग्लिश स्कुलांत जाण्याची परवानगी मिळाली. त्या इंग्लिश शाळेचे मास्तर त्या वेळेस Mr Mainwaring होते. तेव्हां नुकतेच Mr. Murphy[1] साहेब यांणीं त्या शाळेचें काम सोडिलें आणि त्यांस Supreme Court त Head Interpreter ची जागा मिळाली. हे Murphy साहेब त्या वेळेस मराठी भाषेंत निपुण होते. त्यांस त्या वेळेस ही भाषा शिकण्याचें कांहीं साधन नसतां फकत आपल्या श्रमानें व बुद्धिकौशल्यानें त्यांणीं ही भाषा हस्तगत केली म्हणोन त्यांचा मोठा नाहा होऊन त्यांस मराटीचे Interpreter म्हणजे मुतरजिम नेमिलें. Mr. Mainwaring[2] हे पेनशनदार सारजन्ट होते. हे वरचे दोन तीन वर्ग स्वतः शिकवित असत, आणि बाकीचे खालचे वर्ग शिकवावयास चार शिक्षक

---

१ Robert Xavier Murphy ( 1803–1857 ) बॉ. ने. ए. सोसायटीचे एक शिक्षक म्हणून प्रथम हिंदुस्थानांत आले. कोणतीही हिंदी भाषा ते जलद अवगत करीत. १८३४ Bombay Gazette चे संपादक. Bomtay Times चेही कांहीं काळ संपादक. १८५२ सालीं सरकारी ओरिएंटल ट्रान्स्लेटर. अनेक हिंदी विषयांवर लेख लिहिले. पारशी स्मशानाला " Tower of Silence " ही संज्ञा प्रथम यांनीच योजिली. प्रकृतीच्या अस्वास्थ्यामुळें १८५५ स्वदेशीं प्रयाण. २६ फे. १८५७ डब्लिनमध्यें वारले.

२ W.B. Mainwaring हे पेन्शनर नसून प्रत्यक्ष कामावर होते. तुल्य " The only English schoolmaster in the employment of the Society at the period of the last general meeting was Mr. Robert Murphy who took his discharge soon after and the Committee could not succeed in providing a properly educated person to fill his place till His Excellency the Commander-in-Chief in September last kindly permitted Mr. Mainwaring belonging to the artillery of the Presidency to hold the office. " ( Report of N. E. Society, 1827, p. 20.) मेनवॉरिंग व रामचंद्रशास्त्री यांनी मिळून 'भूगोल खगोल' हें पुस्तक लिहिलें, १८३२ (G. D. 1843, VOL. 24 A. p. 730.

असत; त्यांचीं नांवें–बाळा भागवत,[1] दुसरे नारायण कृष्णा लाड,[2] तिसरे वासुदेव परभु[3] आणि चौथे गणेश करंदीकर[4] या लोकांस दरमाह पंधरा रुपये असे. यांनीं Murray's Spelling Book हें त्या वेळेस मुलांस शिकवावें आणि त्यांच्या काप्या पहाव्या. कांहीं दिवस मीं बाळा भागवत यांच्या वर्गांत होतों. ते मज वर फार लोभ करित असत. माझा पूर्वींपासून इंग्लिश वाचण्यांत अभ्यास होताच. म्हणोन मीं खालच्या वर्गांत फार दिवस न राहतां लैकरच् वरच्या वर्गांत चढलों व तेथें Mainwaring मास्तर आमचे धडे घेऊं लागले. पहिल्या[5] वर्गांत हरिश्चंद्र

---

यादी पहा) **भूगोल आणि खगोल इत्यादि विषयक संवाद** (पुणें, १८३२) असें पुस्तक उपलब्ध आहे (मुं. म. सं.) तें हेंच असावें. यावर कर्त्याचें नांव नाहीं. 'मराठी ग्रंथसूचि' कार रा. शं. ग. दाते हा ग्रंथ १८३२ सालीं पण मुंबई येथें प्रसिद्ध झाल्याचें लिहितात व त्याचें कर्तृत्व महादेवशास्त्री पुराणिक यांकडे देतात ती त्यांची गैरसमजूत दिसते. प्रो. सल्वन यांच्या पुस्तकावरून 'भूगोलखगोल' नांवाचें पुस्तक जें पुणेपाठशाळेचे महादेवशास्त्री यांनीं लिहिलें तें व वरील संवादात्मक पुस्तक निराळें आहे. याचा कर्ता रामचंद्रशास्त्री हा मुंबईचा दिसतो. पंडितकोशमंडळांतील रामचंद्रशास्त्री जन्हवेकर ते हेच असावे. The Calcutta School Book Society नें प्रसिद्ध केलेल्या '**भूगोल एवं ज्योतिष इत्यादि विषयक कथोपकथन**' या बंगाली पुस्तकांतील कांहीं प्रकरणांचें हें मराठी भाषांतर आहे. मूळ पुस्तकाची एका पृष्ठावर इंग्रजी व दुसऱ्या पृष्ठावर बंगाली अशी १८२७ सालची द्वितीयावृत्ति मुंबईच्या पिपल्स फ्री (ने. ज) लायब्ररीच्या संग्रहीं आहे.

१ एल्फिन्स्टन ने. ए. इंस्टिट्यूशनच्या इंग्रजी शाळेंतून बाहेर पडलेल्या (१८२७–१८४२) विद्यार्थ्यांची यादी उपलब्ध आहे त्यांत बळवंतराव त्र्यंबक, ब्राह्मण (१८२९ शाळा सोडली) असें नांव आहे ते हेच असावेत. कांहीं काळ अक्कलकोटच्या राजपुत्रांचे शिक्षक व १८४३ सालीं सातारच्या राजाकडे सुपरिंटेंडेंट. (G. D. 1843, VOL. 24 A, p. 187).

२ १८३० शाळा सोडली. मेसर्स व्हुड आणि कंपनीचे पुढें मागीदार झाले. यांनीं व गणपतराम मुनशी यांनीं मिळून 'ऐना शिकंदर' नांवाचें एक फारसी भाषेंत वृत्तपत्र सुरू केलें होतें (G. D. 1832, VOL. 259, p. 120). हें वृत्तपत्र फारसी–हिंदुस्थानी अशा जोडभाषांत निघावयाचें होतें. **Bombay Native Observer, March 14, 1833.**

३ (?)

४ गणेश रघुनाथ, ब्राह्मण. १८३० शाळा सोडली. नाशिकला मिशनऱ्यांकडे नोकरी.

५ त्या काळीं वर्गांचा क्रम वरून खालीं लावीत असत. म्हणजे आजचा मॅट्रिक किंवा सातवा वर्ग तो त्या काळचा पहिला वर्ग व आजच्या पहिल्या वर्गाला त्या काळीं सातवा वर्ग म्हणत.

हरिशंकर[१] याचा नंबर पहिला असे, दुसरा नंबर बाळ गंगाधर शास्त्री, तिसरा मोरोबा कान्होबा,[२] चौथा जनार्दन आपाजी गाडगीळ[३] यांचा नंबर असे. या शिवाय बाळजी सुंदरजी,[४] जनार्दन वासुदेवजी,[५] द्वारकानाथ जगन्नाथ[६] असे आणखी मुलगे या पहिल्या वर्गांत अभ्यास करित असत. या वर्गाचीं अभ्यासाचीं पुस्तकें Irving's Composition, Lindley Murray's Grammars या शिवाय Mr. Mainwaring, यांणीं त्या वेळेस पहिल्या वर्गास नुकताच Geography चा अभ्यास चालू केला होता. Goldsmith's Grammar of Geography[७] आणि Keith's on the Use of the

---

१ परभु. १८३० शाळा सोडली. पुढें कमिसारी जनरालच्या कचेरींत नोकर.

२ विजयकर (१८१३–१८७१). १८३० शाळा सोडली. १८३४ गव्हर्न्मेंट सेक्रेटरीच्या ऑफिसांत हेडट्रान्स्लेटर. १८३७–४० सातान्याला अॅ. नेटिव एजंट. १८४१ भडोचला सदर अमीन (R. D. 1852, VOL. 209, p. 243) तिकडून ठाणे, अहमदनगर व मुंबई या त्यांची बढती होऊन १८६९ सालीं १००० रुपयांवर सेवानिवृत्त. १८६३ 'घाशीराम कोतवाल' ही कादंबरी (?) लिहिली. १३ मार्च १८७० रोजीं एका विधवेशीं पुनर्विवाह केला. (नेटिव ओपिनियन २०–३–१८७०) पुढें उभयतांचीं प्रेतें गोवालिया तलाव येथें त्यांच्या बंगल्याजवळच्या विहिरींत सांपडलीं. जास्त माहितीकरितां 'मुंबईनो बाहार' पृ. १७१–७५ पहा.

३ ठाण्याच्या सरकारी शाळेंत मास्तर.

४ प्रभु. असि. कमि. जनरलच्या ऑफिसांत 'हेड परभु.' १८३४ शाळा सोडली.

५ (१८०४?–१८९४) प्रथम ट्रान्स्लेटर पर्शियन डिपार्टमेंट, पुढें सेक्रेटरियेटमध्यें रेव्हेन्यू डिपार्टमेंटमध्यें 'हेड परभु.' 'दर्पणा' चे १८३४ च्या कांहीं अंकांवर संपादक म्हणूनही त्यांचे नांव सांपडतें. धुळ्याला प्रिन्सिपल सदर अमीन. १८६४ मुंबई हायकोर्टाचे पहिले एतद्देशीय न्यायाधीश. १८ जुलै १८९४ निधन.

६ प्रभु, धारवाड कलेक्टरच्या ऑफिसांत हेड अकौंटंट.

७ (?) Goldsmith's Geography असा नामोल्लेख आढळतो. (Report of 'N. E. Society, 1832, p. 34). "Nicholls's Grammar of Geography" असें त्या काळीं पुस्तक होतें. महादेवशास्त्री पुराणिकांच्या भूगोलखगोल (१८५४) ची बैठीची प्रस्तावना पहा.

Globe हीं पुस्तकें आणून त्या वरून अभ्यास चालविला होता. तीं पुस्तकें तोंडपाठ करवित असत. पुढें लौकरच मीं या पहिल्या वर्गांत चढलों; तेव्हां वर ज्यांचीं नांवें सांगितलीं ते सर्व मुलगे त्या वर्गांत होते. हे मुळचे सर्व Murphy साहेबांचे विद्यार्थी. मज वर ते सारे वरचे मुलगे ममता करित असत; मात्र मोरोबा कान्होबा व नारायण कृष्णा लाड हे केव्हां केव्हां माझी थट्टा करित असत. म्हणोन या दोघांस मीं फार भीत असें; तथापि मोरोबानें मला पुष्कळ वेळा धडे शिकवावे, व कठीण वाक्यांचे अर्थ सांगण्यास मदत करावी; परंतु अशा प्रकारची मदत मला बाळ गंगाधर शास्त्री व नाना नारायण शिंपी यांज कडून फार मिळत असे. बाळ गंगाधर शास्त्री हे मला आपल्या घरीं संध्याकाळीं बोलावून तेथें Spectator व Rambler यांचे अर्थ सांगत असत. पुढें १८२९–३० या सालीं या शाळेंत मोठा फेरफार झाला. सदाशिव काशीनाथ छत्र्ये यांहीं पेनशन घेतलें आणि त्यांच्या जागे वर बाळ गंगाधर शास्त्री यांस दरमहा पन्नास रुपये करून नेमलें.[१] मोरोबा कान्होबा वगैरे मंडळी स्कूल सोडून रोजगार मिळवणाच्या उद्देशानें ऑफिसांत जाऊं लागली. Bombay Native Education Society या मंडळीचे सेक्रेटरी[२] Capt. George Ritso Jervis होते. यांची बदली पुण्यास होऊन त्यांच्या जागेवर Robert Cotton Money[३] Esqr., हे सेक्रेटरी झाले. ह्या गृहस्थाची मुखचर्या कोमळ असे आणि

---

१ छत्र्यांची जागा रिकामीच ठेवून (पहा—**The Bombay Calendar & Almanac for 1832, p.130**) १८३० सालीं बाळशास्त्र्यांनां डेप्युटी नेटिव सेक्रेटरी नेटिव एज्यु० सोसायटी नेमलें. १८३२ सालीं ते नेटिव सेक्रेटरी झाले. (**G. D. 1846, VOL. 28**). त्या काळीं युरोपियन सेक्रेटरीचा पगार रु. २०० व नेटिव सेक्रेटरीचा १०० होता. (**G. D. 1830, VOL. VI, p. 389–91**). ता. १८ नवंबर १८३० रोजीं गव्हर्न्मेंटच्या सेक्रेटरीला पाठविलेल्या पत्रांत रॉबर्ट मनी लिहितो, "The native secretary being considered too young received only a part of the fixed pay."

२ कॅप्टन जर्विसच्या राजीनाम्याचा स्वीकार होऊन त्यांना देशी ग्रंथ छापण्याकरितां लिथोग्राफिक प्रेस पुण्याला नेण्याची परवानगी देण्यांत आली आहे व त्यांच्या जागीं रॉबर्ट मनीची नेमणूक केल्याचें ता. २६ मार्च (**G. D. 1830, VOL. VI, p. 309**) च्या पत्रानें नें. ए. सोसायटीच्या कमिटीनें गव्हर्नरला कळविलें आहे.

३ Forbes and Co. चे एक भागीदार William Taylor Money यांचे हे चिरंजीव. यांचा जन्म हिंदुस्थानांतच झाला. मुंबईसरकारचे फारसी सेक्रेटरी म्हणून ते काम

यांची तोकडी नजर असे. म्हणोन ते नेहमी चष्मा घालित असत. या देशांतल्या लोकांनीं विद्वान् होऊन शहाणें व्हावें ही यांची मोठी इच्छा असे.[1] शाळेंत आले म्हणजे केव्हां केव्हां यांणीं इंग्लिश स्कुलांतील एकदोन वरचे वर्ग बलावून त्यांची परीक्षा घेत असावी. माझे मित्र नाना नारायण यांची लहानशी मूर्ति व बुद्धिमत्ता पाहून हे साहेब त्यांज वर फार खुष असत. यांच्या सांगण्या वरून त्या वेळेस बाळ गंगाधर शास्त्री यांहीं History of England याचें भाषांतर मराठींत केलें. सन १८२९ सांत Captain Jervis साहेबांनीं बाळ गंगाधर शास्त्री, जगन्नाथ शास्त्री क्रमवंत व बाळशास्त्री घगवे[2] यांचे साह्यानें त्या वेळेस नुकताच Lord Brougham चा तयार झालेला लहानसा A Treatise on the Object, Advantages and Pleasures of Knowledge या नांवाच्या ग्रंथाचें मराठींत व त्या वरून पुढें गुजरार्थीत भाषांतर केलें.

---

करीत होते. या मुदतींत त्यांनीं मुंबई रॉयल एशियाटिक सोसायटी व ने. ए. सो० मध्यें सेक्रेटरी म्हणून काम केलें. A Memoir on the Education of the Natives of India, 1832 (O. C.S. 1835, p. 161)—Christians in India, 1835, हें पुस्तक व यांच्या कांहीं कविता व पत्रें O. C. S. मध्यें प्रसिद्ध झालीं आहेत.

१ बाळशास्त्री जांभेकर यांच्या संबंधी लिहितात, " His zeal to promote the moral and intellectual improvement of the natives, was almost unparalleled... He hated every distinction between natives and Europeans... In him Christians have lost one of their best ornaments and natives one of their best props." (O. C. S. 1835, p. 166.).

२ दर्पण, ता २२ जून, १८३२ मधील मृत्युलेख :—" पुण्यांतील सरकारी शिक्षशाळेंतील मुख्य शास्त्री बाळशास्त्री घगवे...गेले सोमवारीं वारले...ते संस्कृतामध्यें मोठे व्युत्पन्न आणि कवी होते. त्यांणीं मुख्यत्वें काव्यनाटकांचा फार अभ्यास केला होता. ते सन १८२४ त मुंबईचे शिक्षामंडळीचे चाकरीस राहिले आणि त्या मंडळीसाठीं त्यांणीं दुसरे पंडितांचे साहाय्यानें मराठी भाषेचा कोश केला. मरायाचे पूर्वी त्यांणीं हटूणसाहेबांचा भूमितीचा ग्रंथ संस्कृत श्लोकांत करावयास आरंभिला होता आणि तद्देशीय लोकांचें विद्याभ्यासाचे कामांत त्यांचे बुद्धीपासून व मदतीपासून फार बरें होईल, आसी आशा होती. ते ३६ व्ये वर्षी मृत्यु पावले...त्यांचेबरोबर एतद्देशीय लोकांचे विद्याभ्यासाचें एक मुख्य भूषण आणि मोठा आश्रय गेला." " ते संस्कृतांत प्रवीण असून इतर संस्कृतज्ञांप्रमाणें प्राकृत भाषेला तुच्छ मानीत नसत " व " यांनी तर स्वतःची प्राकृत वचनें मोठ्या मान्यतेची आहेत, " असें दादोबांनीं आपल्या व्याकरणाच्या ( १८३६ ) प्रस्तावनेंत म्हटलें आहे.

त्याचें नांव ' विद्येचे उद्देश, लाभ आणि संतोष[1] ' असें ठेविलें ; आणि तो ग्रंथ त्यांणीं साताऱ्चे महाराज प्रतापसिंह राजे छत्रपति यांस मोठ्या आदरानें नजर केला. अशा करण्यानें Jervis साहेबानें एकी कडेस Lord Brougham आणि दुसरी कडेस His Highness Pratapsingh,[2] the Rajah of Satara या उभयतां मोठ्या पुरुषांच्या मनाची प्रसन्नता संपादित केली. हा ग्रंथ मराठींत फारच प्रौढ व सुरस झाला होता. असें असतां याची दुसरी आवृत्ति कधीं झालीच नाहीं. असे सरस प्रौढ ग्रंथ आज इतकी विद्या वाढली आहे, तथापि फारसे पाहण्यांत येत नाहींत. असा मागल्या ग्रंथकाराचें नांव व त्याची कृति यांस बहुतकरून बुडविण्याच्या बुद्धीस इतक्यांतच आरंभ झाला. तसेच Captain Molesworth[3]

---

१ "विद्येचे उद्देश लाभ आणि संतोष या विषयाचे संवाद." १८२९ सालीं छापला. जगन्नाथशास्त्री क्रमवंत यांच्या साहाय्यानें जॉर्ज जर्विस यांनीं तयार केला, असें ग्रंथावर नमूद आहे. ( तेलगू लायब्ररी, मुंबई. )

२ र. गो. राणे यांनीं लिहिलेलें यांचें चरित्र ( १८२९ ) पहा.

३ James T. Molesworth. ( १७९५–१८७२ ) "जेव्हां महाराष्ट्र व इंग्लिश कोशाची प्रथम आवृत्ति छापून निघाली तेव्हांपासून जुन्या लोकांत हे **मोरेश्वरशास्त्री** ह्या नांवानें प्रसिद्ध झाले." ( सत्यदीपिका ). ईस्ट इंडिया कंपनीच्या लष्करी खात्यामध्यें अधिकारी असतां १८१४ सालीं त्यांनीं मराठी व हिंदुस्थानी या भाषांची परीक्षा दिली. पुढें Commissariat खात्यामध्यें गेल्यावर त्यांनीं इतर देशी भाषांचा परिचय करून घेतला. १८२२ सालीं मोल्स्वर्थ व थोमस कँडी मिळून भाषांतराच्या सोयीकरितां म्हणून सोलापूर येथें मराठी शब्दांच्या याद्या तयार करूं लागले. पुढें १८२३ सालीं मुंबईला त्यांची बदली झाल्यावर त्या वेळचे मुंबईचे गव्हर्नर एल्फिन्स्टन यांच्याकडे, आपण मराठी–इंग्रजी व इंग्रजी–मराठी कोश तयार करतों, परंतु चालू कामांतून आपली मोकळीक करावी, असी इच्छा त्यांनीं प्रदर्शित केली. त्याप्रमाणें कायरा ( गुजरात ) येथें असतां १८२४ सालीं त्यांनीं कोशाचें काम जोरानें सुरू केलें. १८२६ सालीं जॉर्ज कँडी व थोमस कँडी यांची त्यांना मदत देण्यांत आली व १८३१ सालीं त्यांचा मराठी–इंग्रजी कोश प्रसिद्ध झाला. या प्रतीच्या प्रस्तावनेंत "It was undertaken from a desire to promote the propagation of the glorious gopel" असें त्यांनीं नमूद केलें आहे. ख्रिस्ती मनुष्यानें शिपायाचें काम करावें हें योग्य नाहीं असें म्हणून त्यांनीं आपला हुद्दा सोडला व स्वदेशीं गेले. इतकेंच नाहीं तर लष्करी चाकरीच्या दिवसाचें जें पेन्शन त्यांना मिळालें असतें तेंही त्यांनीं घेतलें नाहीं! संस्कृत, फारसी, ग्रीक, लॅटीन वगैरे भाषाही त्यांस

आणि Lieut. Thomas Candy[1] यांच्या हाता खालीं पंडित होते त्यांणीं दोन मोठ्या पुस्तकांत मराठी कोश[2] तयार केला. आणि तो सुंदर शिलाछापा वर छापिला. त्या वरून त्या साहेबांनीं इंग्लिशांत मराठी कोश तयार केला तो प्रसिद्ध आहेच; परंतु पंडितांचा कोश कोठें दिसेनासा झाला. हें मोठें अद्भूत कृत्य मराठी भाषेंत त्या वेळेस झालें. परंतु अशा कृत्याचे गुणग्राहक पुढें कोणी झालेच नाहींत.

★

---

अवगत होत्या. "मोल्स्वर्थसाहेब एतद्देशीय लोकांशीं फार प्रीतीनें व स्नेहानें वागत असत. त्यांच्या कोशाच्या कामांत साहाय्य करणारे जे शास्त्री त्यांजवळ होते त्यांस तर हे आपणांतीलच एक वृद्ध शास्त्रीबुवा आहेत, असें वाटत होतें ... त्यांपैकीं जर कोणी अद्याप जीवंत असते व त्यांस ह्यांच्या मरणाची खबर समजली असती तर ते क्षणभर सुतक धरून स्नान केल्याशिवाय राहिले नसते, असें सत्यदीपिकाकारांनीं त्यांच्या मृत्युलेखांत म्हटलें आहे. पुढें मराठी-इंग्रजी कोशाची दुसरी आवृत्ती तयार करण्याकरितां त्यांना बोलावून आणण्यांत आलें. ही द्वितीयावृत्ति १८५७ सालीं प्रसिद्ध झाली. कोशाशिवाय, 'शालापद्धति' (१८२४) 'पापपीडितांस शांति' (१८२८) हीं मराठी चोपडीं त्यांनीं लिहिल्याचे उल्लेख सांपडतात. (अनुपलब्ध) (**ज्ञानोदय**, ता. १ अक्टो० १८७२, पृ. २९५ ;**वाक्यावळी** – J. Wilson, १८६८ प्रस्तावना ; **In Western India**– J. Murray Mitchel, p. 262,1899)

१ (१८०६–१८७७) १८२२ मध्यें हिंदुस्थानांत आगमन. १८३७ पुणें पाठशाळेचे मुख्याध्यापक. १८४७ इंग्रजी-मराठी कोश. पुष्कळ मराठी शालोपयोगी पुस्तकें लिहिलीं. समकालीन ग्रंथकारांना जरी यांचा सासूसारखा जाच भोगावा लागला तरी त्यांनीं मराठी भाषेच्या लेखनपद्धतीमध्यें एकसूत्रीपणा आणला. अत्यंत धार्मिक वृत्ति. कांहीं ख्रिस्ती धार्मिक चोपडींही त्यांनीं लिहिलीं आहेत : देवाच्या दहा आज्ञा १८२८, भाव कोणावर ठेवावा याचा विचार १८२९, खरा मार्ग कोणता याविषयीं विचार १८३०. (**15th Report of Bombay Tract & Book Society**, 1840). महाबळेश्वर येथें वारले. मामुली चरित्र, **बालबोध**, फेब्रु. १९११, पहा.

२ "महाराष्ट्रभाषेचा कोश," मुंबई. भाग १–२ (१८२९) रचणार जगन्नाथशास्त्री क्रमवंत, बाळशास्त्री घगवे, गंगाधरशास्त्री फडके, रामचंद्रशास्त्री जन्हवेकर, सखाराम जोशी, दाजीशास्त्री शुक्ल व परशुरामपंत गोडबोले. या कोशाची पुरवणी १८३१ सालीं पुणें येथें छापिली. (ठाणें म. ग्रंथसंग्रहालय.) हा कोशही मूळापासून शेवटपर्यंत आपल्याच ध्यांत आपल्याच देखरेखीखालीं तयार झाला असें आपल्या कोशाच्या दुसऱ्या आवृत्तीच्या प्रस्तावनेंत मोल्स्वर्थ म्हणतो. (Preface xxi)

# ९ हरि केशवजी, सोमवंशी क्षत्रिय पाठारे[1]

याच सुमारास हरि केशवजी यांणीं Mrs. Marcet's Conversations of Natural Philosophy[2] या इंग्लिश ग्रंथाचें मराठींत फार सरस भाषांतर केलें, तें Bombay Native Education Society या मंडळीनें त्यांस बक्षीस देऊन तें आपल्या खर्चानें शिलाछापा वर छापिलें. हरि केशवजी यांची मराठी लिहिण्याची इतकी खुबी होती कीं, हा ग्रंथ इंग्लिश ग्रंथाचें भाषांतर असतांहि तसें त्या वेळेस कोणास वाटलें नाहीं; मूळचाच मराठी ग्रंथ असावा असें बहुतांस वाटावें; त्या वेळेस मराठींत 'विद्येचे उद्देश, लाभ आणि संतोष,' व हरि केशवजीचा 'सिद्धपदार्थविज्ञान' हे मोठे प्रौढ व सरस ग्रंथ तयार झाले. परंतु पुढें विद्याखात्या वरील अधिकारी इंग्लिश लोक, व एतद्देशीय लोक यांची देशभाषे विषयीं इतकी रुचि कमी होत गेली कीं, हे ग्रंथ इतके सरस असतांहि आतां कोणास कांहींच त्यां विषयीं माहिती नाहीं. हे हरि केशवजी पांचकळशी म्हणजे सुतार जातीचे गृहस्थ मुंबईचे राहणारे होते. जसे परभु आपणास क्षत्रिय म्हणवितात असे हेहि आपणास सोमवंशी क्षत्रिय

१ (जन्म १८०४–मृत्यु १८५८) हरिकेशवजीनीं लिहिलेल्या स्त्रीशिक्षणावरील निबंधाच्या प्रास्ताविक टीपेंत रे. विल्सन लिहितो, " Hari Keshavaji is a kshatri of the Som Vaunsh, and at present a translator in the Court of Sadar Adalat, in Bombay. He received the rudiments of English education in a private school and for two or three years he enjoys the valuable direction and assistance of the Rev. R. Kenny formerly of Church Missionary Society in the prosecution of his studies. But to his intercourse with that devoted friend of India, the Hon'ble James Farish, Esq. he is principally indebted for his mental and moral improvements." (O. C. S. 1838, p. 129) यांचें एक छोटें चरित्र त्यांचे चिरंजीव रामचंद्र हरि यांनीं लिहिलें आहे. (१९११).

२ **सिद्धपदार्थशास्त्रविषयक संवाद,** (ने. ए. सो. शिला छा० मुंबई) १८३३, Mrs. Marcet च्या ग्रंथाची मूळ १८२० साल्ची इंग्रजी प्रतही आमच्या संग्रहीं आहे.

म्हणवितात.[१] परंतु हे लोक सुतारपणाचा धंदा करून व शेतीवाडी करून गरीबीच्या हालांत असत म्हणोन उघड रीतीनें आपल्यांस क्षत्रिय म्हणवत नसत. हे लोक मुंबई, साष्टी, वसई या प्रांतांत जुने राहणारे खरे असें दिसून येतें. अस्तु. हरि केशवजी हे या जातीचे असतांहि त्यांणीं आपल्या श्रमानें विद्या व लौकिक मिळविला. ते कोणतेहि सरकारी शाळेंत जाऊन शिकले नव्हते. परंतु सुमारें १८२० साच्या [२] सालीं एथें पहिल्यानें American Missionary आले त्यांत the Rev. Kenny (?)[3] साहेब यांणीं आपला बंगला गिरगांवांत घेतला होता त्यांज कडेस हरि केशवजी हे जाऊं येऊं लागले व त्या पाद्री साहेबाच्या योगानें हरि केशवजी यांस इंग्लिश भाषेची व त्याज बराबर धर्मसंबंधी चर्चा होत असतां इतर पुष्कळ विषयांची माहितगारी झाली.[४] पुढें यांची बुद्धिमत्ता व उद्योग व शांत स्वभाव पाहून त्यांज वर पाद्री साहेबांची मर्जी बसली, आणि त्यांणीं त्यांची शिफारस Mr. James Farish जे त्या वेळेस मुंबईंत सरकारी

---

१ जास्त माहितीकरितां, **Proceedings of the Bombay Geographical Society**, Jan. 1837 ( Remarks on the history of some of the oldest races now settled in Bombay by R. X. Murphy. ) p. 23 व '**बिंबाख्यान** ( प्र. र. पु. राणे ) १८७७ पहा.

२ १८१२ फेब्रुवारीमध्यें रे. जडसन, न्यूवेल, हाल, नाट व राइस असे पाच मिशनरी हिंदुस्थानास येण्यास निघाले व पहिले दोन ता. १७ जून व बाकीचे तीन ता. ८ आगष्ट रोजीं कलकत्ता येथें पोंचले. ते लोकांना बाटवितील व हिंदी लोक क्षुब्ध होतील म्हणून त्यांस इंग्रजांनीं कलकत्त्यांत राहूं दिलें नाहीं. त्यामुळें जडसन व राइस हे सिरामपूर या डेनी सरकारच्या अखत्यारांत व न्यूवेल मरिशस बेटांत गेले. हाल व नाट कलकत्ता सोडून ता. ११ फेब्रु० १८१३ रोजीं मुंबईला आले. यावेळीं इंग्लंड व अमेरिका या राष्ट्रांमध्यें युद्ध चालू झाल्यामुळें त्यांच्या संबंधी शंका उत्पन्न झाली पण स. १८१३ च्या ईस्ट इंडिया कंपनीला दिलेल्या नव्या सनदीप्रमाणें त्यांना शेवटीं येथें राहूं दिलें. ( **ज्ञानोदयाचीं पहिलीं शंभर वर्षें**, सं. प्रो. भा. पां. शिवाळे, १९४२, पृ. ३–८ ) रे. केनी हे अमेरिकन मिशनऱ्यांच्या नंतरच्या तुकडींतील असावेत.

३ नांव बरोबर आहे. "**रसायनशास्त्रविषयक संवाद,**" (१८३७) या ग्रंथाची प्रस्तावना पहा.

४ मुंबई ट्रॅक्ट आणि बुक सोसायटीच्या पुस्तकमालेंत 'सुमार्गशोधकाचा वृत्तांत' (१८३२) हें हरि केशवजीनें केलेलें भाषांतर आहे.

मोठ्या हुद्या वर होते[१] त्याज पाशीं केली. पेशवाई गेल्या वर मुंबई इलाख्यांत पहिले मिशनरी American (अमेरिकन) आले असें दिसतें; व त्यांणीं शाळा वगैरे घालून धर्मोपदेश करण्याचा प्रथम उद्योग आरंभिला. Mr. James Farish हे मोठे धर्मिष्ठ गृहस्थ होते. त्यांचा व पाद्री लोकांचा सहज स्नेह झाला असावा. पुढें त्यांच्या शिफारशी वरून हरि केशवजी यांचें जाणें येणें त्या साहेबा कडेस होऊं लागलें; त्यांत हरि केशवजीचा स्वभाव इतका गरीब व शांत होता कीं, कोणीही त्यास पाहिल्या वर त्याज वर त्यांणीं लोभ केल्या शिवाय राहूं नयें. Mr. Farish साहेबानें तर त्यांस आपला विद्यार्थीच केला. हें सिद्धपदार्थविज्ञानशास्त्र त्यांणींच त्यांना समजावून त्यांच्या हातून हा ग्रंथ त्यांणीं तयार करविला. पुढें सन १८३६ सांत बाईचा म्हणजे Mrs. Marcet यांचा आणखी दुसरा Conversation on Chemistry हा ग्रंथ त्यांस समजावून त्यांतील रसायनशास्त्राचे प्रयोग त्यांस दाखवून त्यांहीं ग्रंथाचें मराठी भाषांतर[२] त्यांच्या हातून तयार करविलें. हे दोन ग्रंथ हरि केशवजीच्या हातून फार सरस झाले. ते अथवा त्यांचे कर्ते यांचीं आतां म्हणजे सन १८७१ त मीं हें लिहितों त्या काळीं[३] थोड्या लोकांस माहिती असेल. या शिवाय आणखी हरि केशवजी यांणीं त्याच Mrs. Marcet बाईच्या Conversations on Political Economy या ग्रंथाचें भाषांतर तयार केलें होतें, असें त्यांणींच मला सांगितल्याचें स्मरतें; परंतु तो ग्रंथ छापून प्रसिद्ध झाला किंवा नाहीं याची मला आतां माहिती नाहीं.[४] Chambers' Moral Class Book of Reading या ग्रंथाचें भाषांतर त्यांणीं केलें आणि तें छापलें

---

१ हे मुंबई कौन्सिलचे सिनिअर सभासद होते. हे १८४१ सालीं स्वदेशीं गेले. जातेवेळीं कांहीं विद्यार्थी मंडळीनें दिलेलें मानपत्र उपलब्ध आहे. (O. C. S. 1841, p. 87).

२ **रसायनशास्त्रविषयक संवाद** (आर प्रेरा शि. छा.) १८३७.

३ लेखनकालनिर्देश. (vi)

४ **देशव्यवहारव्यवस्था** (ग. कृ.) १८५४ हा ग्रंथ १८५१ सालीं डेक्कन व्ह. ट्रान्स्लेशन सोसायटीनें Mrs. Marcet's conversations व Mill's Treatise on Principles of Political Economy या ग्रंथाचे आधारें प्रि. ग्रीन यांच्या नेतृत्वाखालीं तयार करविला. हरि केशवजींना रु. ९०० व त्यांना मदत केल्याबद्दल नॉर्मल स्कॉलर विश्वनाथ नारायण मंडलीक यांना रु. ३०० मिळाले.

होतें तें माझ्या पाहण्यांत आहे[1] या शिवाय आणखी या गृहस्थानें मदिरापाननिषेधक एक ल्हानसें मौजेचें पुस्तक[2] रचून छापलें होतें तेंहि माझ्या वाचण्यांत आहे. त्यांत मद्यपी लोकांस त्यांच्या मना वर ठसाया जोगा उपदेश त्यांणीं केला होता, परंतु दैवगति अशी विलक्षण कीं, उत्तरवयांत तेच स्वतः त्या प्राशनाच्या स्वाधीन झाल्या सारिखे होऊन मृत्यू पावले! हरि केशवजी[3]... गृहस्थ होते. यांस पुढें Sudder Adawlut एथें Translator म्हणजे तरजुमा करण्याची जागा मिळाली. हीच काय ती त्यांस मोठी जागा James Farish यांणीं मोठी मेहरबानी करून देवविली. खरें म्हटलें असतां त्या वेळेस हरि केशवजी पेक्षां अतिक्रम[4] विद्वानांस अधिक पगाराच्या जागा पुष्कळ मिळाल्या व Mr. Farish हे Acting Governor चेंही कांहीं दिवस काम पाहत होते; परंतु त्यांणीं या आपल्या अशा योग्य विद्यार्थ्यास कां वाढविलें नाहीं, हें समजत नाहीं. Mr. Farish हे धर्मिष्ठ असल्यानें बहुधा हरि केशवजीस व इतर नेटीव लोकांस त्यांचा हा मोठा निकराचा उपदेश असे, कीं तुह्मीं थोडक्यांत तृप्त रहावें; हें मला स्वतांच्या अनुभवानें माहीत आहे. हरि केशवजी यांणीं ख्रिस्ती शास्त्राच्या पुष्कळ गोष्टी ऐकल्या होत्या व ते निरंतर पाद्री लोकांच्या मंडळींत जात असत, परंतु त्यांचा कल बहुतकरून वेदांतशास्त्रा कडेस फार असे. त्यांणीं तरुणपणीं शामराव तात्या[5] या नांवाचे संत मुंबईंत आले होते त्यांचा अनुग्रह घेतला होता; या मुळें ते ज्ञानेश्वरी, अमृतानुभव, विवेकसिंधु हे ग्रंथ चांगले समजत असत. परंतु वेदांतशास्त्राचा कल बहुतकरून

---

१ शालोपयोगी नीतिग्रंथ. (ग. कृ.) १८४६.

२ हें पुस्तक पाहण्यांत नाहीं.

३ येथें एकादा शब्द लिहावयाचा राहिलेला दिसतो.

४ कमी दर्जाचे.

५ शामराज तात्या केसकर. यांची समाधि पुणें येथें सदाशिव पेठेंत श्रीरुक्मिणीपांडुरंगाचे देवालयांत आहे. हा पांडुरंग 'उपाशी विठोबा' या नांवानें पुण्यांत सध्यां प्रसिद्ध आहे. शामराजाचे चिरंजीव रामचंद्र यांनीं शामराजाच्या शिष्यांच्या मदतीनें हें देवालय बांधलें. पुढें रामचंद्र शामराजासंबंधी शिष्यवर्गाच्या मनांत कांहीं शंका उत्पन्न होऊन देवालयाच्या नित्यखर्चाकरितां मदत देण्याचें त्यांनीं बंद केलें. त्याबरोबर 'देव उपाशी आहे' अशी रामचंद्रपंतांनीं देवालयाच्या दारावर पाटी लाविली! त्यामुळें देवाला हें नवें नांव मिळालें!!! शामराजांचीं कांहीं वेदांतपर पदें उपलब्ध आहेत. (हरि केशवजीचें चरित्र, पृ. १ पहा.)

तन्निष्ठ लोकांच्या मनास लोककल्याण करण्याच्या कामांत उदासीन करण्याचा असतो; म्हणोन हे गृहस्थ त्या कामाच्या ज्ञाना वरून पाहिले असतां तशा कामांत म्हणजे लोकसुधारणेच्या कामांत उदासीनच होते.[1]

★

१ यांचीं धर्मविषयक मतें त्यांच्या चरित्रांत पहा. ( पृ. ३८-४९ )

१०

## सदाशिव काशीनाथ छत्रे

सन १८३० या सालांत अथवा ३२ सांत, (आतां बराबर स्मरण नाहीं,) Mr. Mainwaring Schoolmaster (मेस्तर मेनवारींग आमचे स्कुल मास्तर) यांहीं सोसाइटीची चाकरी सोडून मुंबईच्या किल्ल्यांत कांहीं दिवस स्वतांची शाळा घातली. कोणत्या कारणा वरून यांहीं चाकरी सोडली हें माहित नाहीं; परंतु त्यांची बूज सोसाइटीच्या अधिकाऱ्यांनीं जशी जाणावी तशी जाणली नाहीं या कारणा वरून सोडली असावी अशी अटकळ होत्ये.[1] सन १८२९ सांत सदाशिव काशीनाथ छत्रे यांहीं पेनशन घेतल्या वर त्यांच्या मनांत उपयोगी इंग्लिश ग्रंथांचीं मराठी भाषांतरें लोकोपकारार्थ करून आपल्या आयुष्याचा सद्व्यय करावा असें होतें. या करतां त्यांणीं एकांतवासा साठीं वालुकेश्वरीं एक स्वतांची धर्मशाळा घेतली आणि तेथें एक छापखाना ठेवावा, असाहि त्यांचा विचार होता. या गृहस्थांनीं पूर्वीं मी मराठी शाळेंत असतां Esop's Fables (इसपनीति कथा) आणि Berquin's Children's Friend या ग्रंथाचें 'बाळमित्र' या नांवाचें भाषांतर केलें होतें. व ते त्यांचे ग्रंथ पुष्कळ वर्षें पर्यंत सर्व मराठी शाळांत चालू होते. हे दोन्ही ग्रंथ फार सुरस झाले होते. तीं भाषांतरें असें त्या वेळेस कोणास वाटत नसे. मराठींत सरस रीतीनें फक्कीकेंत[2] लिहिणारे हेच पहिले. त्यांच्या मागून आम्ही सर्व लिहिणारे झाल्यों. त्या काळीं सदाशिव काशीनाथा प्रमाणें इंग्लिश भाषा जाणणारे या मुंबई इलाख्यांत एतद्देशीय लोकां मध्यें कोणीच नव्हते. यांहीं कोठून कसें या भाषांचें ज्ञान संपादन केलें हें बराबर समजत नाहीं.[3] हे जातीचे कोंकणस्थ ब्राह्मण असून

---

१ यांच्या कारकीर्दींत मुलें वाढलीं होतीं. "The number has increased since the appointment of Mr. Mainwaring as master and now amount to 57." (4th Report of B. N. E. Society for 1827, p. 21)

२ (सं. फक्किका) तर्कशुद्ध पद्धतीनें.

३ "मुंबईमध्यें मोठा अबरुदार विद्वान् असा पहिला हिंदु गृहस्थ ग्यंबोबा नाईक. त्याच्या वेळेस सरकारी शाळा नव्हत्या. घरींच अभ्यास करून हा मोठा विद्वान् झाला. हा सरकारचा

मुंबईचे राहणारे होते. या मुंबईत वाळुकेश्वरीं या छत्र्यांची कांहीं वृत्ति अद्यापि आहे. त्या कुळांतले हे गृहस्थ होते. पुढें एथें इंजिनेराच्या आफिसांत हे रैटर होते. परंतु त्या काळीं अशा परभु, शेणवी आदिकरून जातीच्या इंग्लिश रैटरांनीं सारी मुंबई व सुरत भरली होती. व सदाशिवा पेक्षां हे लोक इंग्लिशांच्या अमलांत मोठ्या बढत्या अवस्थेंत होते. तथापि त्यांतून एकानेंही इंग्लिश भाषेचें ज्ञान यांच्या प्रमाणें संपादन केलें नाहीं; म्हटलें असतां सदाशिवा पेक्षां त्यांस ही भाषा शिकण्याच्या अधिक सोया होत्या. इतर ज्ञाती पेक्षां ब्राह्मण यांची बुद्धिमत्ता व उद्योगीपणा विशेष हें यांच्या उदाहरणा वरून स्पष्ट दिसून येतें. यांणीं या परदेशी भाषेचें इतकें सूक्ष्म व शुद्ध ज्ञान केवळ आपल्या बुद्धिकौशल्यानें व श्रमानेंच संपादन केलें यांत अगदीं संशय नाहीं. म्हणोन हे विशेषें करून आतां आपल्या स्तुतीस पात्र होत. मीं इंग्लिश स्कुलांत असतां हे गृहस्थ आमच्या वर्गांत केव्हां केव्हां स्वसंतोषानें येऊन आह्मांस इंग्लिश पुस्तकांचा मराठींत अर्थ समजावून देत असत. पुढें यांहीं एक Wisdom in Miniature[1] या नांवाचें लहानसें इंग्लिश पुस्तक छापवून याचा अर्थ हे आह्मांस मोठ्या हौसेनें सांगूं लागले; प्रसिद्ध बाळ गंगाधर शास्त्री हे यांचेच विद्यार्थी. मला पक्कें माहीत आहे, किं बाळशास्त्री हे त्या काळीं अल्पवयी असतांहि त्यांस त्यांचे विद्वत्तेवरून सर्व इत्तर लोक बाळशास्त्री बाबा म्हणोन हाका मारीत आणि हे सदाशिव त्यास बाळू असे एकेरी शब्दानें हाका मारित असत. बाळ शास्त्र्यांचे तीर्थरूप गंगाधर शास्त्री जांभेकर हे यांज कडेस आश्रिता प्रमाणें असत. यांहीं आपला मुलगा एथें आणल्या वर बापू छत्र्ये (सदाशिवांचें घरगुती प्रसिद्ध नाम) यांणीं त्यांस आपल्या जवळ ठेवून त्यांज कडून इंग्लिश भाषेचा अभ्यास करविला. बाळशास्त्र्यांनीं पुष्कळदां सांगितलें, किं "मला Johnson's Rambler पर्यंत ग्रंथ त्यांणीं घरीं समजावून सांगितले." असा त्यांचा ते मोठा उपकार स्मरून असत.

सदाशिव काशीनाथ यांणीं सन १८२९ च्या सुमारास पेनशन घेतल्या वर सुमारें

---

प्रमुख. यानेंच सदाशिव काशीनाथ छत्रे वगैरेंना उत्तेजन देऊन **त्यांजकडून इंग्रजीचा अभ्यास करविला**" – सरस्वतीमंडळ (गुंजीकर) – परिशिष्ट ४, पृ. ४७ पहा. छत्रे इंजिनेराच्या आफिसांत कारकून होते या दादोबांच्या विधानावरून वरील माहितीस पुष्टी मिळते.

१ हें पुस्तक उपलब्ध नाहीं.

एकदीड वर्षांतच ते निवर्तले.[१] लोकोपकारा विषयींच्या त्यांच्या सर्व इच्छा त्यांच्या मनांत तशाच राहून गेल्या.

## वज्रेश्वरीची यात्रा

सन १८२८ त माझें लग्न झाल्या वर त्याच वर्षी चैत्र वद्य ३० अमावास्येस वज्रेश्वरीची यात्रा भरत असत्ये. तेथें मीं आपल्या सासुरवाडीच्या लोकां बरोबर गेलों. तेथें मोठी यात्रा भरली होती. वाण्याउदिम्यांचीं दुकानें येऊन मोठा थाट जमला होता. नाशकाचीं भांडींही तेथें विकायास आलीं होतीं. मुंबई, भिवंडी, कल्याण, वसई एथील व आसपासचे लोक तेथें आले होते. एथें ऊन पाण्याचीं कुंडें आहेत, त्यांत एक गोरख कुंड आहे. त्यांत आधणाच्या पाण्या इतकें नेहमीं ऊन पाणी असतें. दुसऱ्या कुंडांत कमी होत होत शेवटऱ्या कुंडांत कोमट पाणी असतें. या पृथ्वी वर पुष्कळ देशांत अशीं ऊन पाणीं निघतात, व या पेक्षांही मोठमोठे चमत्कार आहेत व या गोष्टी ज्या लोकांस माहित नाहींत त्यांस हें ऊन पाणी पाहून हा या देवीचाच मोठा चमत्कार व साक्षात्कार आहे असें वाटल्या वांचून कदापि राहणार नाहीं.[२] चार पांच दिवस आमचा एथें मुक्काम होता. तेथ पर्यंत मीं नित्य या कुंडांत अंघुळ करायास जात असें. एथें एक लहानशी नदी आहे. ती या दिवसांत अगदीं सुकून जात्ये. तिचें नांव वैतर्णा आहे. एथील सर्व लोक या देवीस वज्राबाई म्हणतात. चार पांच दिवस एथें आम्हीं मुक्काम करून परत आलेल्या मार्गानें घरीं गेलों.

★

---

१ त्यांचा निधनकाल माहीत नाहीं. ता. १० मे १८३० गेर्जी कं. जर्विस यांस दिलेल्या मानपत्रावर ह्यांची सही आहे. (G. D. 1830, VOL. 6, p. 329).

२ जास्त माहितीकरितां श्रीवज्रेश्वरीचा इतिहास, र. वा. जोशी, श. १८५६, शिवा Thana Gaz. 1882, p. 373 पहा.

११

## घनश्यामबावा सोनमीरकर

हे संतबावा आमच्या तीर्थरूपांचे गुरु होते, म्हणजे मीं अगदीं लहान असतां अथवा माझा जन्म होण्या पूर्वी त्यांणीं या बावांचा अनुग्रह घेतला होता. यांची ही सन १८३१ सांत मुंबईस तिसरी किंवा चौथी खेप असावी असें मला वाटतें. मला इतकें मात्र स्मरण आहे, किं मीं सुमारें पांच किंवा सहा वर्षांचा होतों तेव्हां या बावांची एकदां स्वारी मुंबईत आली होती, म्हणजे सन १८२० च्या सुमारास. तेव्हां हे बावा आमच्या घरीं आल्याचें मला कांहींसें आठवतें. हे बावा सखारामबावा अमळनेरकर यांचे शिष्य होते. हे कीर्तन करून निर्वाह करित असत. यांची कीर्तन करण्याची शैली फार मौजेची आणि मोठ्या उच्चस्वरानें कीर्तन व गायन करावें आणि श्रोत्यांच्या अंतःकरणांत प्रेम उत्पन्न करण्याची हातवटी यांस चांगली साधून गेली होती. त्यांत आणखी हे औदिच जातीचे गुजराथी ब्राह्मण असल्यानें गुजराथी भाषेंतहि कीर्तन करीत. या कारणानें प्रेमळ गुजराथी वाणीलोक यांच्या कीर्तनास पुष्कळ येत असत, आणि ते लोक द्रव्यवान् असल्यानें यांस चांगली भरपूर बिदागी मिळत असे. हे गुजराथी ब्राह्मण होते हें कोणास अगदीं समजत नसे. कारण हे महाराष्ट्रभाषा देशस्थ ब्राह्मणा प्रमाणें शुद्ध बोलत होते; व ' मीं गुजराथी आहें ' असें तेहि कोणास कळवूं देत नसत. घरांत बायकांचा वगैरे लिबासहि [1] महाराष्ट्र लोकां प्रमाणेंच असे. व जवळची मंडळी सर्व देशस्थ ब्राह्मणां सारखीच असे सन १८२० त जेव्हां हे मुंबईत आले होते तेव्हां आमचे तीर्थरूप गरीब अवस्थेंत असतांहि त्यांणीं त्यांच्या मागितल्या [2] वरून एक भर्जरीचा अंगरखा त्यांस करून दिला होता. व त्यांतील थोडा कापडाचा तुकडा उरला होता त्याचा आमच्या तीर्थरूपांनीं मला लहानसा अंगरखा केला होता; तो पुढें मीं पांचसहा वर्षे मोठ्या दसऱ्या-दिवाळी सारिख्या सणांत घालित होतों. आमचे तीर्थरूप आह्मांस लहानपणीं सांगत होते, किं जेव्हां तो माझा लहान अंगरखा तयार झाला तेव्हां घनश्याम बावानें तो आपल्या बसायाच्या घोड्याच्या

१ ( अरबी-लिभास ) पेहराव.

२ [ मागण्यावरून ]

पाठी वर घालून मग प्रासादिक म्हणोन तीर्थरूपांस दिला. जेव्हां दुसऱ्या वर्षी माझी मुंज झाली आणि तो अंगरखा म्यां घातला तेव्हां आमच्या घरांतलीं माणसें असे म्हणूं लागलीं, किं हा घनश्याम बावाचा प्रसाद, म्हणोन पुढल्याच वर्षी मला त्या अंगरख्यानें सोडमुंजीच्या वेळेस घोड्या वर बसविलें. त्या खेपेस हे बावा मुंबईंत अगियारि रस्त्या वर रघुनाथ वाल्लजीच्या भाई या नांवाच्या एका परभाच्या घरीं माडी वर उतरले होते. हा परभु गृहस्थ, ज्यास भाई म्हणत तो, त्या बावाचा मोटा शिष्य होता. म्हणजे मुंबईंत जी इतर शिष्य मंडळी असे त्यांत हे गृहस्थ त्या काळीं थोडे पैसेवाले असून त्यांणीं गुरूच्या सेवेंत आपलें पुष्कळ द्रव्य खर्चिलें असें त्या वेळीं लोक म्हणत होते. मीं सात आठ वर्षांचा असतां मला माझे तीर्थरूप केव्हां केव्हां यांच्या घरीं नेत असत. तेव्हां मीं त्यांस पाहिल्याचें आतां मला स्मरण आहे. ते पाताणे परभु असून, वैष्णवा प्रमाणें कानशिला वर मुद्रा लावित असत व असे पाहीं, किं निरंतर यांच्या एथें प्राकृत पोथ्या लिहून घेण्याचा मोठा कारखानाच असे. सतत एक दोन लेखक यांणीं कित्येक वर्षे ठेविले होते. व त्यांच्या हातून पुष्कळ प्राकृत ग्रंथ सुंदर अक्षरांनीं सुंदर कागदां वर लिहून मोठ्या फरम्याचे सांचे करून त्यांस वरखालीं जरीच्या बुठ्याचीं पुष्टिपत्रें लावून वर लांकडांच्या फळ्या त्याच सांच्याच्या ठेवून तो रुमालांत लांब फितींनीं बांधून मोठ्या जतनेनें तयार करीत. जो प्राकृत ग्रंथ म्हटला तो या प्रमाणें तयार केलेला यांच्या संग्रहीं असे. हे गृहस्थ ग्रंथाचे फारच शोकी असत. स्वतः कागदाचे सांचे कापावे, दोरीच्या फळ्या वर रेखाटावे, त्यांच्या समासा वर वेलबुट्या काढाव्या इतकें काम हे स्वतः करित असत. यांचा कित्ता घेऊन आमच्या तीर्थरूपांनींही आपल्या शक्ती प्रमाणें बराच प्राकृत ग्रंथांचा संग्रह केला होता. प्रसिद्ध हरिविजय, पंढरीमाहात्म्य शिवलीलामृत हे ग्रंथ त्यांणीं माझ्या जाणतेपणाच्या अगोदर पूर्वीच लिहून ठेवलेले होते; व मीं जेव्हां सुमारें दहा बारा वर्षांचा होतों तेव्हां त्यांणीं भक्तिविजय व दासबोध हे ग्रंथ लिहविले. या खेपेस जेव्हां घनश्यामबावा आले तेव्हां भाई परभु मरून पांच सहा वर्षे झालीं होतीं, तेव्हां ते जगन्नाथ काटे यांच्या घरीं उतरले होते. हे गृहस्थहि त्यांच्या शिष्यमंडळी पैकींच होते. व खाऊन पिऊन सुखी होते. या वेळेस बावासाहेब मोठ्या सरदारी डौलानें मुंबईस आले होते. म्हणजे पांचसहा घोडे, पालखी व चोपदार, निशाणदार बरोबर घेऊन आले होते. ते एथे सांगूं लागले, किं "ही पालखी व चोपदार आम्हांस होळकरानें दिले." मग खरें खोटें ईश्वर

दादोबांचे
सहाध्यायी



न्या. मू. जनार्दन वासुदेव
पृष्ठ ५०



नवरोजी फर्दुनजी
पृष्ठ ५७



श्रीमंत जगन्नाथ शंकरशेट
( डावीकडचे )
पृष्ठ ४०



मि. रॉबर्ट कॉटन मनी
पृष्ठ ५१

जाणो. कांहीं दिवस जगन्नाथ काष्टे यांच्या घरीं राहून मग त्यांच्या आग्रहा वरून आमच्या तीर्थरूपांनीं त्यांस आपल्या घरीं कुंभारतुकडींत आणिलें. तें घर लहान एक मजल्याचें होतें तरीं ते तसेच दाटी करून आमच्या घरीं राहिले. त्यांज बराबर त्यांच्या साथीची शिष्यमंडळी, आचारी, चाकर, मोतदार, भोई मिळून पंधरावीस मनुष्यें असत. तितक्या सार्‍यांचा भोजनखर्च व चंदीवैरण मिळून दरमहा सुमारें तीनचारशें रुपये आमच्या तीर्थरूपांस खर्च येई. ते सुमारें तीन महिने आमच्या घरीं राहिले. नित्य त्यांच्या कथेची माळ गुजराथी लोकांत लागली होती व या खेपेस त्यांस बिदागी बरीच झाली. नित्य आमच्या मातुःश्रीनें त्यांस रात्रीं कीर्तनाहून परत घरीं आले म्हणजे कांहीं फलाहारास करून ठेवावें. अशी त्या गुरूची सेवा आमच्या तीर्थरूपमातुःश्रीनें केली. आमच्या तीर्थरूपांच्या फारच शक्ती बाहेर त्यांणीं हा गुरुसेवाखर्च केला यांत किमपि संशय नाहीं. घनश्यामबावा हे गोरे, उंच वाढ्याचे व थोडे पातळ अंगाचे पुरुष होते. त्या वेळेस त्यांचें वय सुमारें पन्नासपंचावन वर्षांचें होतें. आह्मीं भावंडें लहान लहान वयाचों होतों. मीं मात्र त्यांत सोळा वर्षांचा होतों. मला आतां पक्कें स्मरतें, किं एके दिवशीं मीं त्यांज वर एक आरती रचली आणि ती त्यांस गाऊन दाखविली. तिच्या रचने वरून ते बावा फार खुष झाले आणि आमच्या तीर्थरूपांस म्हणाले.– "बापू, हा तुझा मुलगा मोठा बुद्धिवान् व दैववान् निघेल." मग त्यांणीं माझें सामुद्रिक पाहिलें, व माझी अंगाची कातडी चिमटींत घेऊन म्हणाले, "पहा याची कातडी किती पातळ आहे, आणि याचे दांत मोठे आहेत." 'क्वचित् दंतालको भवेन्मूर्खः' इ० असा आणखी श्लोक म्हणून दाखविला. नंतर ती माझी रचलेली आरती त्यांणीं आपल्या कथेंत शेवटीं म्हणण्याचा पाठ ठेवण्यास आपल्या शिष्यांस सांगितलें असें मला स्मरतें. या प्रमाणें ते सुमारें तीन महिने मुंबईंत राहून पुढें आपल्या देशीं निघून गेले. त्या वेळेस पेस्तनजी भाई कडेस कोंकणाच्या रहदारीच्या जकातीचें काम होतें. त्यांणीं आपल्या हातानें मोडींत लिहिलेला परवाना त्यांस दिला याची मला आठवण आहे.

*

१२

# खरडींतील दरवडा

सुमारें चौदा वर्षांच्या वयापासून मला निद्रेंत स्वप्नावस्थेचा उपद्रव लागून माझें शरीर क्षीण होत चाललें होतें. पुढें पुढें एक आठवडाहि अशा स्वप्ना वांचून माझा जात नसे. तेव्हां माझ्या तीर्थरूपांस व मातुःश्रीस माझ्या प्रकृती विषयीं मोठी काळजी लागली. या माझ्या क्षीण प्रकृतीचें वर्तमान तीर्थरूपानें घनश्यामबाबास लिहून कळविल्या वर त्यांणीं कोंकण तालुक्यांत शाहापुरा जवळ खरडींत राहणारे धोंडभट नांवाचे वैद्य दाखविले. तेव्हां माझ्या आईनें मोठें धैर्य करून, "मीं एकटी या मुलास बराबर घेऊन धोंडभटाचा उपचार चालविण्या करितां खरडीस जात्यें," म्हणोन आमच्या तीर्थरूपांस सांगितल्या वरून व घनश्यामबावानें एका स्नेहाचें पत्र बाबजीराम भावे, शाहापुरचे मामलतदार सन १८३१, यांस वर दिल्या वरून, मातुःश्री बराबर मला खरडीस पाठवून देण्याचा आमच्या तीर्थरूपांनीं निश्चय केला. आह्मां बराबर एक स्वैंपाक करायास ब्राह्मण व एक गडी दिला. मग आह्मीं टप्प्याच्या मार्गानें प्रथम शाहापुरास गेलों. मला वाटतें, आह्मीं पांचवे किंवा सहावे रोजीं शाहापुरास पोंहचलों. जेथें आतां सन १८७१ त[1] आगगाडीनें दोन तासांत माणसें जातात. बाबजीराम भावे यांचे घरीं आह्मीं दोन दिवस राहिलों. हे मामलतदार शरीरानें पुष्ट व गोरे होते. त्यांस एक हरि नांवाचा लहान दोनतीन वर्षांचा मुलगा होता. तो जेवायाचे वेळेस फार रडत असे. तेव्हां मीं एकदां मामलतदार यांस पुसलें, किं "हा तुमचा मुलगा जेवतांना इतका कां रडत असतो ?" तेव्हां त्यांणीं हंसत हंसत सांगितलें, किं "या आमच्या जवळच्या मराठे शिपायांनीं व गड्यांनीं त्यास आपल्या घरीं नेऊन भाजलेले मासे खाण्याची चट लाविली आहे. म्हणोन तो जेवतांना बोंबील[2] मागत असतो." म्यां म्हटलें,

१ लेखनकालनिर्देश ( viii )

२ "बोंबील ही मासळी बहुधा वाळवूनच विकतात. हा पदार्थ देशांतरीं निर्यात केला जातो... या मुंबईच्या आसपासच्या बोंबील हा राजा आहे असें कोळी लोक म्हणतात. आणि हा मुंबईशिवाय दुसऱ्या समुद्रांत न सांपडण्याचें असें विलक्षण कारण सांगतात : त्यांचे



V2w1114

"तो फार लहान आहे; त्यास तुह्मीं द्या, फार रडवूं नका." ते म्हणाले, "परंतु ब्राह्मणाच्या मुलास अशी भलतीच खोडी लागली तर ती फार वाईट." म्यां म्हटलें, "खरें आहे, परंतु तो लहान आहे तेथ पर्यंत द्या. मग मुंज होण्या जोगा झाला म्हणजे मग हळुहळू तसें देण्याचें बंद करा." मग मामलतदारानें आमचा बंदोबस्त करून आह्मांस खरडीस पोंहचतें केलें. शाहापुराहून खरडी सहा कोश नाशकाच्या सडके वर आहे. तेथें आह्मीं संध्याकाळीं पोंहचलों. त्या वेळेस खरडीचा तलाठी एक कायस्थ परभु होता, त्याच्या घरीं आह्मीं बिऱ्हाडास राहिलों. दुसरे दिवसापासून धोंडभट वैद्यानें औषध चालू केलें. ते एका झाडाचा पाला वांटून त्याचा रस एका वाटींत घालून त्यांत थोडें दूध साखर मिळवून मला सकाळीं प्यावयास देऊं लागले. हा मीं मुंबईपासून इतक्या दूरच्या वाटे वर पहिल्यानेंच आलों, म्हणोन मला भूक चांगली एथें लागूं लागली. वैशाखाची अखेर होऊन ज्येष्ठ लागला होता. म्हणोन भाजीतरकारी फार नव्हती. नुसता वरणभात व तुरीच्या डाळीची वडी यांचीच गांठ असे. तरींपण तिसऱ्या प्रहरीं फार भूक लागे. म्हणोन आईनें मज करितां एक गव्हांची भाकर व तुरीच्या डाळीची वडी करून ठेवावी. ती मीं मोठ्या रुचीनें खात असें. या प्रमाणें आह्मीं तेथें पंधरावीस दिवस राहिलों. त्या गांवांत एक लहानसा ओढा आहे. तेथें मीं संध्याकाळीं फिरावयास जावें. अशी थोडे दिवस कालक्रमणा करित असतां वटपौर्णिमेच्या रात्रीस, त्या गांवांत एकाएक आमच्या वर दरोडा पडला. घरचा यजमान परभु व त्याची बायकापोरें कोठें पळून गेलीं, आणि आह्मींच त्या घरांत चोरट्यांच्या तावडीस सांपडलों. नुकतेच जेवून रात्रीस हवे वर घराच्या पुढल्या पडवींत मीं, ब्राह्मण व गडी बसलों होतों; इतक्यांत नऊदहा वराच्या सुमारास चुड्या व पलिते घेऊन दीन् दीन् दीन् ओरडत दहा बारा मनुष्यें आमच्या बिऱ्हाडघरीं शिरलीं. त्यांतून बहुतेकांनीं तोंडास मस लावली होती व धाटे[1] बांधले

रामचंद्रानें लंकेस जावयास सेतु बांधिला, त्यावेळीं सर्व मत्स्यांनीं त्यास सहाय केलें. परंतु बोंबील स्वस्थ बसून राहिला. तें पाहून रामचंद्रास राग आला आणि त्याला हातांत धरून मुरगाळिला. तेव्हांपासून त्याच्या हाडांचा चुराडा होऊन तो नरम झाला, आणि त्याच्या अंगांत कांटे राहिले नाहींत. म्हणून तो ताजा असतो तेव्हां कापसासारखा नरम असतो." मुंबईवर्णन, पृ. १२५.

१ पट्टे.

होते. सर्वांच्या हातांत बडगे, सोटे, व कित्येकांच्या हातांत नागव्या तलवारीहि होत्या असें मला स्मरतें. आई घरांतच होती. तिनें पुढल्या दारीं असा चोरट्यांचा गलबला जेव्हां ऐकिला तेव्हांच पहिल्यानें आपली नथ व हातांतल्या पाटल्या काढून घराच्या वळचणीस गवतांत खुपसून ठेविल्या आणि आपण हळूच मागील दारानें दूर पळून जाऊन एकी कडेस दडून राहिली. चोरटे घरांत शिरल्या वर पहिल्यानें भय दाखविण्या करितां आह्मां वर सोटे उगारूं लागले व घरभर शिरून जेथें तेथें चाचपाचाचप करूं लागले. एक एक, दोन दोन चोरटे घरांतल्या एकएका मनुष्या जवळ राहून बाकीचे सारे घरभर धुंधळ[1] करूं लागले. आमचीं सर्व वस्त्रे व जें हातीं सांपडलें तें त्यांहीं लुबाडिलें. हातांत सोटा व तरवार घेऊन दोघे मज जवळ उभे राहिले. एकानें माझ्या कानांत मोत्यांची भीकबाळी होती ती हिसकली, परंतु जेव्हां ती त्यास निघेना तेव्हां दुसरा म्हणाला, "पोराचा कान कापून घ्या हिसकावून!" मीं त्यांस म्हणालों, "माझा कान तोडूं नका, मीं तुह्मांस काढून देतों." मग मीं आपल्या हातानें तिचा फांसा उकलून काढून दिली. घरांत आंबे आढीस घातले होते ते सर्व रानोमाळ केले आणि त्यांतून एकानें एकदोन आंबे माझ्या तोंडास पिळून घासून टाकले. अशी सुमारें अर्धा तास पर्यंत त्या दुष्टांनीं नागवणूक व विटंबना केली. मग दीन् दीन् दीन् म्हणत लूट घेऊन चुड्या विझवून पळून गेले, तेव्हां मग गांवचे लोक आमच्या समाचारास आले तेथ पर्यंत कोणी आमच्या जवळ आलें नाहीं. गांवांत जवळ पुष्कळ लोक होते, परंतु ते सर्व आपआपल्या घरांत दडून राहिले होते. पांचदहा लोक जरीं हातांत सोटे काठ्या घेऊन धांवत येते तर ते चोरटे केव्हांच पळून गेले असते. परंतु या भित्र्या लोकांत इतकें तरी धैर्य कोठून येणार? ते चोरटे पळून गेल्या वर मात्र सर्व घर भरून गेलें. आई परसांतून आली आणि मला आपल्या उराशीं धरिलें. घरचा धनी परभु तलाठी व त्याचीं बायकापोरें कोणी कडे गेलीं तें आह्मांस समजलें नाहीं. येथें माझ्या आईनें लागलाच निश्चय केला, कि आतां या गांवांत पाणी प्यावयासही राहायचें नाहीं. दुसरे दिवशीं आह्मीं तो गांव लागलाच सोडला. धोंडभट वैद्याचा निरोप घेऊन आह्मीं निघालों. हे दरवड्याचें वर्तमान शहापुरास बाबजीराम भावे यांस कळतांच तेहि तेथून फौजदारानिशीं चौकशी करण्या करितां निघाले. यांचा आमची

[1] धुंडाळणी, शोध.

वाटेंत गांठ पडली. मग त्यांणीं आमच्यापासून झालें वर्तमान ऐकून घेऊन आह्मांस शाहापुरास जाऊन राहण्यास सांगितलें; व आपण चौकशी करतां पुढें खरडीस निघोन गेले असें मला स्मरतें. पुढें कांहीं दिवसांनीं आमच्या ऐकण्यांत असें आलें, किं ज्या परभु तलाठ्याच्या घरांत आह्मीं बिऱ्हाडास राहिलों होतों त्याचें या दरोड्यांत आंतून अंग होतें. आणि त्याचें तें नसेल असें त्याच्या वर्तणुके वरून मला वाटत नाहीं. आह्मीं मुंबईचीं झळझळीत मनुष्यें त्याच्या लोभाच्या डोळ्यांत आलों नसों असें मला दिसत नाहीं. मीं मुंबई सोडल्या वर तीर्थरूपांचीं पुष्कळ पत्रें मला व बाबजीराम भावे व धोंडो वैद्य यांच्या नांवीं आलीं. आमच्या तीर्थरूपाचा हा मोठा नियम होता, किं जें कांहीं लिहिलें त्याची नक्कल आपल्या पाशीं ठेवावी. मग त्यांत कितीही क्षुल्लक प्रकारचा मजकूर कां असेना. असा त्यांचा उद्योग असे. एक क्षणभर ते उगीच बसले आहेत असें म्यां कधींच पाहिलें नाहीं. हीं पत्रें आतां म्हणजे सन १८७२[१] च्या सालीं प्रस्तुत वृत्त घडल्या नंतर ४१ व्या वर्षीं माझ्या हातीं जुन्या आमच्या घरच्या कागदांत सांपडलीं त्यांतून एक दोन मीं एथें स्मरणार्थ व नमुन्या करतां चिकटवून ठेवितों.[२] तीं त्याच्या खुद्द हातचीं लिहिलीं आहेत. त्यांतून पहिल्या पत्राचा वरला भाग मुलां कडून लिहविला असावा असें दिसतें. त्यांच्या लिहिण्याच्या शैली वरून ते किती मनाचे सरळ पुरुष व मज विषयीं त्यांचा किती कनवाळूपणा होता तो सहज दिसतो.

## परत घरीं जाणें.

या दरवड्या मुळें माझी आई व मीं फार हवालदिल होऊन, आतां एथें फार राहूं नये, असें मनांत आणून लौकरच शाहापुराहून निघून पडघें, भिवंडी, ठाणें, कुरळें या ठिकाणीं एक एक रात्र मुक्काम करून पांचवे दिवशीं घरीं परत आलों. घरच्या सर्व मनुष्यांस दरवड्याचें वर्तमान पूर्वी कळलेंच होतें आणि तीं फार घाबरलीं होतीं, म्हणोन त्यांस आह्मांस पाहतांच मोठा आनंद झाला. मग जो कोणी पुरुष किंवा बायको आह्मांस भेटावयास येत त्यांज पाशीं आमच्या आईची पहिली गोष्ट खरडींतल्या दरवड्याची.

---

१ लेखनकालनिर्देश (ix)

२ हीं पत्रें उपलब्ध नाहींत.

## सदाशिव काशीनाथ ऊर्फ बापू छत्रे यांचा काळ.

याच सुमारास नेटिव एज्युकेशन सोसाइटीचे नेटिव सक्रतार राजेश्री सदाशिव काशीनाथ छत्रे यांहीं पेनशन घेतल्या वर[1] ते वाळकेश्वरीं राहत होते. तेथें त्यांचा काळ झाला. त्यांच्या मनांत पेनशन घेतल्या वर आपला स्वतांचा प्रेस टाकून लोकांच्या हिता करतां कांहीं ग्रंथ लिहून प्रसिद्ध करावे असें होतें. परंतु आमचे लोक असे दैववान्, किं त्यांचें कोणीं कल्याण करण्याची इच्छा केली आणि त्यांच्या कांहीं हिताचे उपाय करूं लागलें, म्हणजे असें करणारा वरच कांहीं संकट येऊन पडायाचें आणि त्यांचा नाश व्हावयाचा! सदाशिव काशीनाथ छत्रे हे घरीं बसल्या वर त्यांचे जागे वर राजेश्री बाळ गंगाधर शास्त्री यांची योजना झाली. हे त्या वेळेस इंग्लिश स्कुलांत विद्यार्थीच होते. त्यांचा पन्नास रुपये दरमाह करून त्यांस सोसाइटीचे सक्रताराचे मदतनीस नेमिलें.

★

१ डिर्कि. मागें पृ. ६१–६२ पहा.

१३

## इ. स. १८३१—

इसवी सन १८२६ सांत किंवा १८२७ सांत The Right Honorable Mount Stuart Elphinstone, मुंबईचे गवर्नर हे विलायतेस गेले आणि पुढें यांच्या जागे वर Sir John Malcolm हे गवर्नर झाले. Elphinstone साहेब विलायतेस जाण्याच्या पूर्वी सन १८२६–२७ साल्या वर्षी त्यांस मुंबईत मोठी मेहजवानी झाली. त्या समारंभास एथले चिंतामणराव पटवर्धन आदिकरून दक्षिणेंतील मोठमोठे सरदार आले होते. परळाच्या बंगल्यांत मोठी आतसबाजी झाली होती. ती पाहण्या करतां तेथें आमच्या तीर्थरूपांनीं मीं लहान मुलगा असतां मला नेलें होतें असें आतां थोडें मला स्मरतें.

१८२८ साच्या मार्च महिन्यांत आमची मराठी शाळेंत वार्षिक परीक्षा झाल्या वर मीं व माझे मित्र राजेश्री नाना नारायण असे आह्मीं उभयतां इंग्लिश स्कुलांत गेलों. त्या वेळेस Mr. Mainwaring हे तेथें स्कूलमास्तर होते. हे गृहस्थ साधे स्वभावाचे होते, फारसे विद्वान् नव्हते. तथापि यांची इंग्लिश भाषा शिकविण्याची पद्धत चांगली असे. मीं इंग्लिश स्कुलांत गेलों त्या वेळीं Mr. Mainwaring यांच्या हाता खालीं[१] नारायण कृष्णा लाड, बाळा भागवत, वासुदेव परभु आणि गणेश करंदीकर असे चौघे Assistant Teachers होते. या चौघांस खालचे वर्ग वांटून दिले होते. ते खालच्या मुलांस Murray's Spelling Book शिकवित असत. पहिले एकदोन वर्ग मात्र Mr. Mainwaring स्वतः शिकवीत. पहिल्या वर्गांत हरिश्चन्द्र परभु यांचा पहिला, बाळ गंगाधरशास्त्री यांचा दुसरा, मोरोबा कान्होबा यांचा तिसरा, जनार्दनशास्त्री गाडगीळ यांचा चौथा, बाळजी सुंदरजी यांचा पांचवा, जनार्दन वासुदेव यांचा सहावा, आत्माराम केशव भंडारी[२] वगैरे

---

१ द्विरुक्ति. मार्गे पृ. ४९–५० पहा.

२ १८२७ सालीं ने. ए. इं. ची शाळा सोडिली. The United Service Gazette चे मालक. (G.D. 1843, 24A, p. 187) 'दर्पणा'चीही मालकी रघुनाथ हरिश्चंद्रजी

यांचे खालचे नंबर असत, असें मीं पाहत होतों. माझा व नाना नारायण यांचा इंग्लिश स्कुलांत जाण्याच्या अगोदर इंग्रेजींत थोडा अभ्यास झालेला होता. मज पेक्षां नाना नारायण यांचा इंग्रेजी भाषेंत अधिक प्रवेश होता म्हणोन ते लागलेच वरच्या वर्गांत गेले आणि मीं खालच्या Assistant Teacher यांच्या वर्गांत Murray's Spelling Book शिकूं लागलों. परंतु पुढें लौकरच वरच्या वर्गांत चढून पहिल्या वर्गांत चढलों. तेथें आह्मांस वाचनाचें पुस्तक म्हटलें म्हणजे Mac Culloch's Moral Class Book व Irring's Composition हें होतें. व Goldsmith's Geography[1] हा भूगोलाचा ग्रंथ शिकवित असत. तिसऱ्या प्रहरीं Keith's On the Globe या वरून Latitude व Longitude वगैरे पाहण्याचें शिकवीत. हे विषय मुख्यत्वें बाळशास्त्री हेच शिकवित असत. इंग्लिश स्कुलांत गणिताचा अभ्यास फारच कमी होता. नव्हता म्हटल्यासहि चालेल. कारण तेव्हांचा English Master यास गणितांत फार थोडें गम्य होतें. इंग्लिश स्कुलांत विद्यार्थ्यां पेक्षां मराठी शाळेंतील विद्यार्थ्यांस गणित अधिक समजत असे. माझा व नानाचा वर्गसमीकरण व थोडे सिद्धांत एथ पर्यंत मराठींत अभ्यास झालेला होता. मीं इंग्लिश स्कुलांत गेल्या वर लौकरच थोडक्या महिन्यांत पहिल्या वर्गांतील परभु, शेणवी यांणीं स्कूल सोडून आफिसें धरलीं. जनार्दन वासुदेव हे मात्र कांहीं वर्षे टिकून राहिले होते.[2] Mr. Mainwaring हेही कंटाळून त्यांणीं आपली जागा सोडून कोटांत स्वतांचें स्कूल घातलें. Captain Jervis साहेबांचे कारकीर्दीत इंग्लिश शाळेची कांहीं व बूज नव्हती. ते इंग्लिश स्कूला कडेस पाहत सुद्धां नव्हते. त्यांचा भर सारा मराठींत शिकविण्या कडेस असे. गणिताचीं पुस्तकें सर्व छापून तयार झाल्या वर त्यांहीं बाळशास्त्री यांस कांहीं तास आपल्या ऑफिसांत Engineer School एथें बलावून ते व जगन्नाथशास्त्री वगैरे पंडित मिळून Lord Brougham's Treatise on the Object, Advantages and Pleasures of Knowledge या इंग्लिश ग्रंथा वरून 'विद्येचे उद्देश,

---

व आत्माराम केशव भांडारे या दोन गृहस्थांकडे होती. (बा. ग. जांभेकर यांचें चरित्र, बा. ना. देव, १८९२, पृ. १८) येथे नव 'भंडारी' नसून 'भांडारे' असें आहे.

१ मागें पृ. ५० पहा.

२ मागें पृ. ५० पहा.

लाभ आणि संतोष ' या नांवाचा मराठी व गुजराथी भाषेंत ग्रंथ छापून प्रसिद्ध केला,[१] व तो **श्रीमन्महाराज प्रतापसिंह राजे छत्रपति सातारा** यांस नजर केला. Mr. Mainwaring यांहीं आपली जागा सोडल्या वर या शाळेंत English मास्तरांच्या जागांची एकदोन वर्षें फारच अव्यवस्था चालली होती. ती पुढें Board of Education ही सभा स्थापित झाल्या वर Mr. Bell आणि Henderson[२] हे विलायतेहून मास्तर येत तोंपर्यंत तशीच चालली. Captain Jervis हे सोसाइटीचे सक्रतारचें काम करितच होते. परंतु त्या वेळेस मुंबईंत सन १८२५ च्या सुमारास इंजिनेरीचें काम शिकविण्या करितां एक इंजिनेरीचें स्कुल प्रथम स्थापित केलें; ती शाळा शिकविण्याचें व त्या शाळे करतां देशभाषेंत गणित विषया वर इंग्लिश भाषेंतून ग्रंथ वगैरे तयार करण्याचें व नव्या उमेदवारांस पगार देऊन त्यांस हें इंजिनेरीचें काम शिकविण्याचें हीं सर्व कामें जर्विससाहेबांच्याच स्वाधीन होतीं. ते या कामांत फारच मेहनत घेत होते.[३] सोसाइटींत जसे सदाशिव काशीनाथ छत्रे त्यांचे मुख्य मदतनीस, तसे इंजिनेरी स्कुलांत जगन्नाथशास्त्री क्रमवंत हे Jervis साहेबांचे मुख्य मदतनीस होते. आह्मीं त्या वेळेस मराठी शाळेंत शिकणारीं लहान मुलें होतों. नित्य बारा वरांच्या सुमारास Jervis साहेबांनीं सोसाइटीच्या स्कुलांत एक फेरी घालावी. त्यांची देशभाषे वर फार आवडत होती. त्यांणीं त्या वेळेस Hutton's Course of Mathematics या समग्र ग्रंथाचें जगन्नाथशास्त्र्यांच्या साहाय्यानें मराठींत भाषांतर केलें. त्याचे पूर्णांक, अपूर्णांक, बीजगणित, भूमिति, सिद्धांत, त्रिकोणमिति, लाग्रत्तम असे सर्व भाग जसजसे तयार होत तसतसे ते तेथेंच शिलाछापा वर छापित असत.[४] आणि त्या एक एक भागाचीं निरनिराळीं पुस्तकें शिवून तीं मुलांस शिकण्या करतां

---

१ द्विरुक्ति. मागें पृ. ५२–५३ पहा.

२ नवंबर १८३४ मध्यें ने. ए. सो. चे मास्तर म्हणून दरमहा ३०० रु. पगारावर ते आले (G. D. 1843, vol. 23, p. 1).

३ मागें पृ. २६ पहा.

४ तुला "We know of seven volumes on mathematics translated by Colonel George Jervis into Marathi and eleven into Gujarati." (**Life of Thomas B. Jervis**) 1898, p. 184.

विकत देण्याचाहि कारखाना तेथेंच केला होता. त्या विक्रीच्या कामा वर त्या वेळेस बापू छत्रे यांचे आश्रित राजेश्री वामनराव गानु हे होते. हे वामनराव, छत्रे यांचे घरचें खासगी काम पाहत असत. आणि आफिसांत सर्व विक्रीच्या बुकांचीं कपाटें व विक्रीचा पैसा व त्याचा जमाखर्च ठेवण्याचें सर्व काम वामनरावां कडेसच असे. परंतु वामनराव हे फक्त मराठी कारकून होते. सोसाइटीच्या शाळांचा सर्व जमाखर्च व पत्रव्यवहार चालविण्या करतां एक लहानसें इंग्लिश आफिस असे. त्याज वर Mr. A. Viegas या नांवाचे एक नेटिव पोर्तुगीज होते. हे गृहस्थ पेनशनदार असावे असें मला वाटतें. यांहीं पूर्वी नागपुरांत Mr. Jenkins[1] यांच्या हाता खालीं पोलिटिकल खात्यांत कामें केलीं होतीं. हे गृहस्थ फार चपळ व मनमिळाऊ असे होते. सकतारांचें काम बहुतकरून हेच करित असत. सदाशिव काशीनाथ हे यांच्या वर होते. परंतु ते बहुतकरून इंग्लिश ग्रंथांचीं मराठींत भाषांतरें करणें हींच कामें पाहत असत. मीं बारापासून चौदा वर्षांच्या वयाचा मुलगा होतों, तेथ पर्यंत मराठींत अभ्यास करित होतों. त्या वेळेस बोधवचनें, विदुरनीति, सिंव्हासनबत्तिशी, आणि पंचोपाख्यान हे ग्रंथ तयार असलेले–आमचीं वाचण्याचीं पुस्तकें पहिल्यानें हींच होतीं. परंतु पुढें इसपनीति व बाळमित्र हे दोन ग्रंथ सदाशिव काशीनाथ यांणीं तयार केले आणि ते छापिले. ती पुढें आमचीं वाचण्याचीं पुस्तकें झालीं.

या सालीं इंग्लिश स्कुलांत वेस्ट स्कॉलरशिप (West Scholarship) ही नवीन सुरू झाली. हे वेस्ट साहेब मुंबईच्या कोर्टाचे मुख्य जड्ज होते. ते एतद्देशीय लोकां विषयीं मोठे कनवाळू व खरे पक्षपाती होते. ते कंपनी सरकारास व त्यांच्या इंग्लिश कामदारांस अगदीं गणग्रांत नसत. उघड कोर्टा मध्यें एतद्देशीय लोकांस आपले खरे अभिप्राय निःपक्षपणानें बोलून दाखवीत. कंपनीच्या कामदारां मध्यें त्यांचा फार दरारा बसून गेला. तो बहुतेक कामदारांस दुःसह झाल्यानें पुढें मीं लिहिले.[2] त्यांचें नांव या देशांत चिरकाल रहावें म्हणोन ते पुण्‍ निवर्तल्या वर त्यांच्या

---

१ Report on the territories of the Rajah of Nagpore, 1827 हा यांचा ग्रंथ प्रसिद्ध आहे.

२ (१७६२–१८२८) १८२४ सालीं मुंबईला आले. मुंबईच्या सुप्रीम कोर्टाचे पहिले चीफ जस्टिस. लोकांना योग्य न्याय मिळवून देण्या साठीं [illegible] कंपनीच्या [illegible] नोकरांकडून त्यांना भयंकर विरोध सहन करावा लागला. [illegible]

नांवानें एथील लोकांनीं पैका जमा केला आणि ही स्कॉलरशिप स्थापित केली. दरमाह देऊन विद्यार्थ्यांस त्यांचा पुढील अभ्यास चालविण्यास उत्तेजन देण्या करतां ही पहिलीच स्कॉलरशिप स्थापित झाली. ही स्कॉलरशिप मिळविण्यास जे थोडे उमेदवार झाले होते त्यांत आह्मीं चौघे[1] मुख्य. पहिले जनार्दन वासुदेव,[2] दुसरा मीं, तिसरा नवरोजी फर्दुनजी[3] आणि चौथा नवरोजी दोराबजी गाइ.[4] इंग्रेजी वाचणें व त्याचा अर्थ सांगणें व व्याकरण करणें, गणित व भूगोल इतक्या विषयांत आमची खासगी परीक्षा होऊन पुढें आह्मांस इंग्रेजींत Essay ल्याहायास सांगितलें. त्यांत जनार्दन वासुदेव यांचा नंबर पहिला लागला, तेव्हां त्यांस पहिली १५ रुपयांची स्कॉलरशिप मिळाली; मला दुसऱ्या नंबरची १२ रुपयांची

---

आह्वानही दिलें होतें. १८-८-१८२८ रोजीं पुणें येथें वारले. (जास्त माहितीकरितां "Memoirs of Sir Edward West by F. D. Drewit, 1907 पहा.)

१ तुळा, **दर्पण** (ता. ११ मे १८३२) "सुप्रीम कोर्टांतील पूर्वीचे न्यायाधिशांत एक सर वेष्ट साहेब म्हणून होते. ते मरण पावले त्या वेळेस या बेटांतील राहाणार लोकांनीं सुमारें १२००० रुपये जमवून ते सरकारी जामदारखान्यांत ठेवण्याकरितां मुंबईचे शिक्षामंडळीचे स्वाधीन केले व त्या मोठे न्यायाधीशाचें स्मरण राहाण्याकरितां कित्येक "वेष्ट स्कॉलर्शिप" या नांवानें इंग्रजी शिकणारे विद्यार्थी नेमावे असा बेत त्यांनीं योजिला होता...गेले मार्च महिन्याचे ६ वे तारखेस त्या मंडळीचे क्यामिटीची सभा होऊन इंग्रजी शाळेंतील मुख्य मुलांची परीक्षा झाली. तेथें या खालीं लिहिलेल्या मुलांनीं चांगली परीक्षा दिली: जनार्दन वासुदेवजी, दादोबा पांडुरंग, नवरोजी फर्दुनजी, नवरोजी दोराबजी." **7th Report of the Board of Edu.** 1832, p. 15. ही रक्कम रुपये ११४०० सोळा गृहस्थांनीं दिलेल्या देणग्यांमुळें जमा झाली. (जर्विसचें १२-३-२९ चें पत्र. **G.D.** 1829, vol. 6, p. 53 पहा.).

२ मागें पृ. ५० पहा.

३ (१८१७-१८८५) जन्म भडोच. १८३५ शाळा सोडली. एल्फिन्स्टन इंस्टिट्यूशनचे असिस्टंट प्रोफेसर. 'यंग बॉंबे' पक्षाचे अध्वर्यु. स्त्रीशिक्षण, ग्रंथालय, वक्तृत्वसभा स्थापण्यांत पुढाकार. सामाजिक व धार्मिक सुधारक. यांनीं १८४० सालीं सुरू केलेलें '**विद्यासागर**' नांवाचें मासिक व मिरझा महमद कॉझिम् यांचा दुरुस्त केलेला गुजराती-इंग्रजी कोश (१८४६) आमच्या संग्रहीं आहे. १८४५ सालीं मुंबई हायकोर्टाचे दुभाषे. १८६४ सालीं सेवानिवृत्त. तीनदां इंग्लंडला जाऊन ईस्ट इंडिया असोसिएशनपुढें व्याख्यानें दिलीं. मुंबई म्युनिसिपालिटीचे कर्तृत्ववान् समासद. १८८४ C. I. E. २२ सप्टेंबर १८८५ निधन.

४ १८३५ मध्यें शिक्षण संपवून 'समाचार' पत्राचे लेखक.

आणि दोघां नवरोजींस दहा रुपये दरमाहची स्कॉलरशिप मिळाली. ही स्कॉलरशिप तीन वर्षे पर्यंत चालायाची असा ठराव होता. दरम्यान जर कोणी शाळा सोडिली तर त्यांच्या वडिलांनीं मुलास मिळालेला सर्व पगार परत द्यावा असा करार त्यांपासून लिहून घेतला होता असें मला स्मरतें. Mr. Mainwaring सोसाइटीच्या इंग्लिश स्कुलाचे मास्तर यांहीं आपली जागा सोडल्या वर दोन अडीच वर्षे पर्यंत अव्यवस्था चालली होती म्हणोन वर सांगितलें. त्या अव्यवस्थेंतच आह्मां चौघां West scholars यांचा इंग्लिश अभ्यास चालविण्याचें भागास आलें. परंतु Mr. Mainwaring निघोन गेल्या वर पुढें लागलेच आमच्या दैवानें Captain Fraser हे आह्मांस मास्तर झाले. हे लष्करी पेनशनर साहेब होते. यांज पाशीं कांहीं वर्षे यांस मराठी शिकविण्या करितां शंभु कृष्णाजी बेडेकर या नांवाचे एक अल्पवयस्क पंडित होते. ते राजश्री नाना नारायण यांचे व माझे स्नेही होते. त्यांज कडून या साहेबां विषयींची मला चांगली माहिती होती. शंभु बेडेकर आह्मांस वारंवार सांगत असत कीं, जेव्हां ते यांस मराठी शिकवायास पहिल्यानें कांहीं महिने माटुंग्याच्या बराकांत व पुढें कोटांत–Town Barracks–एथें जात असत, तेव्हां त्यांहीं याचा गरीब स्वभाव व साधुपणा पाहिला. तो असा कीं, बराकांतलीं कामाठ्यांचीं पोरें यांच्या मस्कऱ्या करीत, व हे शिकवित असतां यांच्या माथ्याच्या केसांला सुद्धां हात लावीत व यांची टोपीहि लपवित असत. तथापि यांहीं तें सर्व पाहून हंसावें मात्र व फारच त्रास देऊं लागत तेव्हां उगीच त्यांस दटावायास त्यांच्या मागें जावें व पोरांनीं पुढें हंसत असावें. इतका यांचा अपूर्व शांतपणा पाहूनच हे लष्करचे कामास नालायक म्हणोन पुढें यांस बर्तर्फी मिळाली. पुढें आह्मांस हेच School master झाले. त्या वेळेस यांचें वय चाळीस वर्षां पेक्षां कमी असावें असें मला वाटतें. ते आह्मां चौघां West scholars यांना व पहिल्या एकदोन वर्गांना शिकवीत. आमच्या कडून ते थोरली History of England वाचवीत व त्यांचा अर्थ व कठीण शब्दांचे इंग्लिश पर्याय सांगत असत. ते आह्मीं स्वतः इतके गरीब स्वभावाचे पाहिले, किं जर त्यांस स्कुला वरच्या माडी वरून लैब्ररींतून एखादें पुस्तक कोणा मारखें पाहण्याची गरज लागली तर ते स्वतः तें पुस्तक आणीत आणि पुनः तितकाच शब्द पाहून पुनः तितका जिना चढून तें लागलेंच जिकडच्या तिकडेस नेऊन ठेवीत आणि पुनः आणखी पांचदहा मिन्युटांनीं जर दुसरा शब्द पाहण्याची त्यांस जरूर पडली तर पुनः वर जात आणि पुनः आणीत. आह्मीं त्यांस विचारावें,

किं "साहेब, घडी घडी आपण हीं अशीं पुस्तकें ने आण कशा करतां करितां? गरज झाल्या वर एकदम आम्ही नेऊन ठेऊं." तर ते आम्हांस हळूच हांसून उत्तर देत कीं, "नाहीं. आपली गरज झाल्या वर ती वस्तु लागलीच जिकडच्या तिकडे ठेवावी हें बरें; मध्यें जर दुसऱ्या कोणास त्याची गरज लागली तर कसें? आपल्यास श्रम पडल्यास चिंता नाहीं." या वरून त्यांचा भ्याड व नीतिस्वभाव आम्हांस स्पष्ट दिसोन आला. वाचन झाल्या वर आम्हांपासून ते कांहीं इंग्लिश भाषेंत लिहून मागत आणि तें शुद्ध करीत. हे मास्तर आम्हांस फार दिवस राहिले नाहींत. एके दिवशीं ते स्कुलांत शिकवित असतां अकस्मात् त्यांस महामारीचा उपद्रव झाला आणि दुसरे दिवशीं ते वारल्याचें आम्हीं ऐकून सारी शाळा त्यांज करतां फार हळहळूं लागली[१]. पुढें एकदोन वर्षांत दोनचार मास्तर झाले, ते कांहीं वर्णनीय नव्हते. एक चांगला विद्वान् होता, परंतु फारच दारू पिणारा होता. या सर्व मास्तरांचा त्या वेळेस दीडशें–दोनशें रुपयांच्या आंतच पगार असे. मीं West scholar असतां असा आमचा दोन तीन वर्षे केवळ अव्यवस्थितपणानें अभ्यास चालला. मीं आणि जनार्दन वासुदेव हे मात्र एकमेकांच्या संगतीनें व विचारानें आपला स्वतांच अभ्यास चालवूं लागलों. परंतु आम्हांस नेहमी आशंका येत आणि त्यांचें समाधान करावयास कोणी तसा हुशार इंग्लिश मास्तर नसे. या मुळें आम्हांस बऱ्याच अडचणी काढाव्या लागल्या.

✶

---

१ **The Bombay Free Press** (April 17, 1835) च्या अंकांत J. W. Frazer याचा मृत्युलेख प्रसिद्ध झाला असून त्यावरून तो ता. ३ एप्रिल १८३५ रोजीं वारला असें दिसतें. हिंदुस्थानांत त्यानें बारा वर्षे वास्तव्य केलें व मराठी व हिंदुस्थानी या भाषा त्याला अवगत होत्या. त्याच्या सालस व गोड स्वभावामुळें तो एतद्देशियांमध्यें फार लोकप्रिय होता. तोफखान्यामध्यें कॅप्टनचा त्याला हुद्दा मिळाला होता. इंग्लंडला जाण्याच्या हेतूनें त्यानें आपल्या जागेचा राजीनामा दिला, परंतु हिंदुस्थानामध्येंच राहून येथील अज्ञानांधकारामध्यें बुद्धिप्रकाश पाडावा, अशी कांहीं मित्रांनीं गळ घातल्यामुळें इंग्लंडला जाण्याचा बेत रद्द केला व ने. ए. सोसायटीच्या शाळेंत शिक्षकाची नोकरी पत्करली. "If learning and humility, uprightness and piety and freedom from ostentation, these constitute a perfect character they were all united in Mr. Frazer;" असे 'दर्पण'कारांनीं (ता. १० एप्रिल १८३५) त्यांच्यासंबंधी उद्गार काढले आहेत.

१४

## ×सोसाइटींतील कांहीं घडामोडी व मातुःश्रीचा मृत्यु

सन १८२८-३० या सालीं Major Jervis यांनी इंजिनेरी शाळा पुण्यास नेण्याचा हुकूम त्यांस सरकारांतून झाला.[१] Sir John Malcolm हे मोठे राजधोरणी व दीर्घ दृष्टीचे पुरुष होते. त्यांच्या हातून बहुत वर्षे साऱ्या हिंदुस्थानांत व माळव्यांत मोठमोठालीं राजकारणें व बंदोबस्ताचीं कामें झालीं होतीं. या मुळें त्यांस या देशाची व एथील लोकांची फारच चांगली माहिती होती. पुढें त्यांणीं 'Advice to the young English officer in India'[२] अशा अर्थाचें एक लहान पुस्तक लिहून प्रसिद्ध केलेलें माझ्या वाचण्यांत आलें. तें वाचल्यानें मला त्यांच्या खऱ्या व दीर्घदृष्टीच्या विचाराचें ज्ञान होऊन मोठें आश्चर्य व समाधान वाटलें. मीं तें त्यांचें पुस्तक वाचित असतां जागोजाग त्या पुस्तकाच्या हाशया[३]वर आपला अभिप्रायहि व अनुमोदनाच्या सूचना लिहून ठेविल्या होत्या, असें आतां मला चांगलें स्मरतें. एतद्देशीय लोकांच्या शिक्षणा विषयीं त्यांचा बहुधा असा अभिप्राय असावा अशी मला आतां अटकळ होत्ये-तो असा कीं, या देशांतील लोक फार बुद्धिमान आहेत. यांस जर इंग्लिश भाषा व मोठमोठ्या

१ जार्विस पुण्याला जातांना मुंबईच्या जगन्नाथ शंकर शेट, फ्रामजी कावसजी, सदाशिव काशीनाथ छत्रे वगैरे २४ प्रतिष्ठित गृहस्थांनी त्यांना दिलेलें ता.१० मे १८३० तारखेचें मानपत्र उपलब्ध आहे. त्यांत सेक्रेटरी म्हणून ने. ए. सो. ची त्यांनीं जी सेवा केली, सोसायटीची जी इमारत उभारली, संस्थानिक व इतर लोक यांच्याकडून अडीच लाख रुपये गोळा करण्यांत त्यांनी जो हातभार लावला; लिथोग्राफिक प्रेस घालून मराठी, गुजराथी वगैरे भाषांमधें जीं पुस्तकें प्रसिद्ध केली त्या सर्व कार्यांबद्दल कृतज्ञतापूर्वक गौरव केला आहे. शिवाय त्याबरोबर तीन हजार रुपयांचें एक तबक ही त्यांना प्रेमाची आठवण म्हणून दिलें होतें. (G. D. 1830, vol. 6, pp. 328-330).

२ Instructions to officers acting under the orders in Central India, 1821 असें या पुस्तकाचें नांव आहे. A Memoir of Central India ला परिशिष्ट अठरा म्हणूनही हा मजकूर जोडला आहे. (तृ. आ. १८८० पहा).

३ (अरबी) कड, समास, कांठ.

विद्या शिकविल्या तर हाली जीं इंग्लिश लोकांस मोठ्या हुद्याचीं कामें मिळतात तीं सर्व यांसच द्यावीं लागतील. यांस आपण विद्या शिकवून हुशार केलें आणि तीं कामें त्यांस न दिलीं तर कंपनी सरकारचें राज्य सुरळीत न चालून बखेडे मात्र उत्पन्न होतील. व तशीं कामें यांस देण्याची आपल्या कडून कांहींच तयारी नाहीं, तर मग या लोकांत इंग्लंडा प्रमाणें शिक्षण वाढविल्यानें आपण आपल्या हातीं इतक्या श्रमानें व बुद्धिकौशल्यानें मिळविलेल्या राज्याचा नाश करून आपल्या देशास त्या पासून कोणताच फायदा होणार नाहीं. असा त्यांचा मुख्य मनांतील अभिप्राय असावा असें त्यांणीं प्रसिद्ध केलेल्या पूर्वोक्त लहानशा ग्रंथाच्या अवलोकनानें माझी अटकळ होत्ये.[1] व या अभिप्रायाच्या नेटानेंच त्यांहीं Captain Jervis या सारख्या नेटिव शिक्षणाच्या कामांत उद्योग करणाऱ्या लोकांस उत्तेजन न देतां पुढें त्यांचें Engineer स्कुल बंद केलें. म्हणोन त्यांचें मन फार खट्टू होऊन सन १८३०-३१ च्या सुमारास हे पुष्कळ वर्षे पर्यंत विलायतेस रजे वर गेले. त्यांच्या जागे वर Mr. Robert Cotton Money हे सोसाइटीचे सक्रतार झाले. हे साहेब थोडे प्रकृतीनें नाजूक व मंजुळ तोंडावळ्याचे व स्वभावाचे होते.[2] हे केव्हां केव्हां आह्मीं West scholar असतां व त्याच्या अगोदर आमचा वर्ग वरच्या 'हालां'त बलावून आमची खासगी परीक्षा घेत. आमच्या वर्गांत नाना नारायण असत त्यांचा वाढा फार लहान असे. या मुळें ते त्यांस लहान मुलगे वाटून व त्यांची बुद्धिही फार

१ हें टांचण माल्कमनें धुळ्याला असतांना लिहिलें असून त्यावर २९ जून १८२१ ही तारीख आहे. यांत लोकांच्या शिक्षणासंबंधी त्यानें विचारच केलेला नाहीं, यावरून दादोबांची अटकळ निराधार दिसते. माल्कम यांत लिहितो, "The people of India must by a recurring sense of benefits, have amends made them for the degradation of continuing subject to foreign masters; and this can alone be done by the combined efforts of every individual employed in a station of trust and responsibility, to render popular a Government which, though not national has its foundations laid deep on the principles of toleration, justice and wisdom...........Men may dread, but can never love or regard, those who are continually humiliating them by the parade of superiority."

२ द्विरुक्ति. पृ. ५१ पहा.

तीव्र होती या मुळें Mr. Money साहेबांचा त्यांज वर बराच लोभ बसला. त्यांनी त्यांस पुढें लहानशी असामीहि[1] लावून दिली. हे नाना नारायण जातीचे शिंपी होते. त्या काळीं शिंप्यां मध्यें मोठे नामांकित व पैकेवाले नारायण भेंगळे होते त्यांचे हे नातू, मुलीचे मुलगे. हा मुलगा इंग्रेजी चांगलें जाणत होता[2] म्हणोन आजाचा मोठा आवडता होता. तो नेहमी आजाच्या घरीं राहत असे. मींहि तेथंच त्यांज पाशीं जावें. त्यांचा माझा फारच स्नेह जमत गेला. यांची गोष्ट पुढें या माझ्या चरित्रांत वारंवार लिहिण्याचा प्रसंग येत जाईल[3].

सन १८३१–३२ सांत Mr. Robert Cotton Money हे सोसाइटीचे सक्तार झाल्या वर त्यांहीं व त्यांचे असिस्टंट बाळशास्त्री यांहीं मिळून Goldsmith's History of England या ग्रंथाचें मराठींत भाषांतर करून त्याचे दोन भाग शिलाछापा वर छापवून प्रसिद्ध केले. पुढें बाळशास्त्री यांस अक्कलकोटच्या दोन धाकट्या राजांस इंग्लिश शिकविण्या करितां सातारचे महाराज प्रतापसिंह राजे छत्रपति यांच्या इच्छे वरून नेमिलें.[4] ते अक्कलकोटांत दोन वर्षें राहिले. पुढें सन १८३४ सांत माजी मुंबईचे नामदार गवर्नर मौंट स्टुअर्ट एल्फिन्स्टन यांच्या नांवानें, ते विलायतेस जाऊं लागले तेव्हां दक्षिण देशांतील सर्व मोठ्या लहान सरदारांनीं व मुंबईच्या शेटसावकारांनीं जी सुमारें तीन लक्ष रुपये जमविण्या करितां व त्यांच्या नांवानें Elphinstone College म्हणजे मोठी विद्याशाळा उभी करण्यास ज्या रकमा भरल्या होत्या त्याची

---

१ नोकरी.

२ यांच्या इंग्रजी भाषेच्या प्रभुत्वाविषयीं रॉबर्ट मनि यांनीं बेळगांवहून पाठविलेल्या ता. २९–१०–२४ च्या पत्रांत उल्लेख आहे—"They (बेळगांवच्या मिशन शाळेंतील मुलें) read and understand English much better than any boys in the N. E. Schools did, excepting Nana and Balshastri." (O. C. S. 1849, p. 208).

३ द्विरुक्ति मागें पृ. ४१ पहा.

४ नवंबर १८३२ मध्यें ते अक्कलकोटला गेले (G. D. 1846, vol. 28) अक्कलकोटची जहागीर ही सातारकर छत्रपतींच्या हुकमतीखालीं होती. पुढें तिची व्यवस्था साताऱ्याचा ब्रिटिश रेसिडेंटकडे गेली. शहाजी व फत्तेसिंह अशीं या राजपुत्रांचीं नांवें होती. (Memoirs of the Satara Territory, 1857, p. 10).

॥ त्रे कांहीं सभासद

॥ सक्रुतार '



सर, जमशेटजी जिजीभाई

पृष्ठ ४०



मि. फ्रामजी कावसजी

पृष्ठ २८

त्रे कांहीं सभासद

सक्रतार '



सर, जमशेटजी जिजीभाई

पृष्ठ ४०



मि. फ्रामजी कावसजी

पृष्ठ २८

मुंबईचे
लोकहितेच्छु
गव्हर्नर



मौंट स्टुअर्ट एल्फिन्स्टन
पृष्ठ ३१.



सर ज्यॉन माल्कम
पृष्ठ ४५

उघराणी[1] होऊन ती विद्याशाळा स्थापण्याचा ठराव होऊन त्या शाळे करतां Professor Orlebar व Professor Harkness यांची प्रथम नेमणूक झाली, तेव्हां बाळशास्त्री यांस या गुरूंचे उपगुरु नेमिलें, जे सन १८३४ सांत अक्कलकोटची आपली जागा सोडून मुंबईस आले.

## माझ्या मातुःश्री यशोदाबाई यांचा मृत्यु

याच वर्षी कार्तिक शु॥ ११ स माझी अत्यंत प्रेमळ आई यशोदा हिचें पंधरावें बाळंतपण मोठ्या कष्टाचें होऊन सुमारें वीस दिवसांत तिसरा प्रहर टळल्या नंतर ती परलोकास गेली. त्या काळीं मला २० वें वर्ष चालू होतें. तीर्थरूप घरांत नव्हते. ते घरीं आल्या वर आमच्या घरांत मोठाच कल्होळ झाला, तो सांगतां येत नाहीं. पुढें त्याच रात्रीं त्यांचें उत्तरकार्य मीं ज्येष्ठ पुत्र म्हणोन माझ्याच हातून झालें. हा मोठा भयंकर प्रसंग मला पहिलाच. सरण कसें रचितात व प्रेतास कसें जाळितात हें मीं या पूर्वी कधींच पाहिलें नव्हतें. सरणा वर माझ्या आईस निजविली. आणि तिचें म्यां तें कोमळ सौम्य मुख पाहिलें तेव्हां तर मला दोघां तिघांनीं हातांत धरिलें इतका मीं तिच्या शोकानें विव्हळ होऊन घाबरून गेलों होतों. माझे तीर्थरूप तर फारच शोक करित एकी कडेस कोनांत बसले होते. त्यांज पाशीं मींहि जाऊन बसलों. तो सर्व दहनाचा विधि संपल्या वर नुसते राहिलेले कोळसे पाहून मीं फारच रडूं लागलों आणि वारंवार म्हणूं लागलों, किं "आतां माझी यशोदा मला कोठें दिसेल? कोठेंच दिसणार नाहीं!" पुढें सपिंडीकरण त्रयोदशाह पर्यंत सर्व विधि झाला. मीं या अशौचांत असतां हें वर्तमान ऐकून बाळशास्त्री माझ्या समाचारास आले. त्यांची अक्कलकोटाहून परत मुंबईस आल्या वर ही माझी पहिलीच भेट. माझी आई मोठी साध्वी असून गुणांनीं फार चांगली होती आणि मनाची मोठी उदार होती. तिणें आपल्या शक्ती प्रमाणें आपल्या गरीब बहीणभावांचा व सोयऱ्याधायऱ्यांचा फार समाचार घ्यावा. त्या काळीं आह्मीं कुंभारतुकडींत राहत होतों. त्या आळींतल्या सर्व पुरुषबायकांनीं आमच्या तीर्थरूपांस व मातुःश्रीस शिवपार्वतीचा जोडा असें म्हणावें.

★

१ वसुली.



त. ६

१५

## × एल्फिन्स्टन इन्स्टिट्यूशन

Mr. John Bell आणि Mr. W. Henderson हे स्कूल मास्तर आल्या वर सोसाइटीची शाळा हें नांव बदलून आतां त्यास Elphinstone Institution[1] असें नांव दिलें आणि ती शाळा, त्यांत विशेषेंकरून इंग्लिश स्कुल, यांत विद्यार्थ्यांची संख्या इतकी वाढत गेली कीं, तें पूर्वीचें स्थळ अगदीं पुरेनासें झालें. सर्व इमारत पुढें वाढविणें जरूर पडलें. हें इमारत वाढविण्याचें काम सुमारें वर्ष दोन वर्षें चालत होतें. तेव्हां आमचें इंग्लिश स्कुल कांहीं महिने कोटांत टौनबराक एथें नेलें आणि पुढें आतां जेथें माधवबाग आहे त्याच्या बंगल्यांत नेलें याची मला चांगली आठवण आहे. सन १८३३ सांत[2] विलायतेहून Mr. John Bell आणि Mr. W. Henderson हे दोघे मास्तर सोसाइटीच्या इंग्लिश स्कुला करतां आणविले, त्यांचा एकेकाचा तीनशें रुपये दरमाह केला होता.[3] हे दोघे मास्तर फार उद्योगी आणि मुलांस शिकविण्याच्या कामांत मन लावून मोठे श्रम देणारे असे पुरुष होते. त्यांत Mr. Bell हे ठेंगण्या बांध्याचे, परंतु घमसर[4] बांध्याचे असे होते आणि Mr. Henderson हे पातळ उंच पुरुष होते. त्यांत Mr. Bell यांचें गणित व Natural Philosophy ( सिद्धपदार्थविज्ञान ) व Chemistry ( रसायनशास्त्र ) या विषयांत गम्य होतें. आणि Mr. Henderson यांचें Literature यांत बरें गम्य होतें. दोघां मास्तरांनीं आपआपले विषय घेऊन शाळेचें काम सात आठ

१ मागें पृ. २६ करील तळटीप पहा.

२ नवंबर १८३४. मागें पृ. ७२ तळटीप पहा.

३ यांचा पगार सुरवातीस तीनशें होता तो पुढें पांचशेंपन्नासपर्यंत वाढत गेला. ( G. D. 1843, vol. 23 मधील बोर्डाचे सेक्रेटरी डॉ. मॅलेटचें पत्र ).

४ बळकट.

वर्षें पर्यंत मोठ्या श्रमानें व फारच चांगलें चालविलें.[१] मला जें हें या सर्व विषयांत थोडेंबहुत ज्ञान झालें तें पहिल्यानें यांच्याच पासून. सकाळीं १० वरा पासून संध्याकाळीं ५ वरा पर्यंत शाळा शिकविण्याचें काम, पुढें रात्रीं Mr. Bell हे आह्मांस आपल्या बंगल्यांतहि दोन तीन तास रसायनाचे वगैरे प्रयोग करून दाखवीत. पुढें सन १८३५ सांत आमची West Scholarship ची तीन वर्षांची मुदत सरल्या वर मला Assistant मास्तरची वीस रुपयांची आसामी मिळाली म्हणोन मीं तेथेंच या मास्तरांच्या हाता खालीं पुढला अभ्यास वाढविण्या करितां राहिलों. जनार्दन वासुदेव[२] हे Secretary च्या आफिसांत गेले. आतां आमच्या वर्गांत मीं, नारायण दीनानाथ[३] व यांचे भाऊ रामचंद्र दीनानाथ[४] व Nowrojee Furdoonjee, Merwanjee Moos[५] व विनायक वासुदेव,[६] नाना मोरोजी[७] वगैरे आणखी कांहीं असामी होतों. मीं हे रसायनशास्त्राचे प्रयोग समजून मात्र घेत असें. परंतु नारायण दीनानाथ व विनायक वासुदेव आणि नाना मोरोजी हे Mr. Bell यांच्या हाता खालीं जातीनें प्रयोग करून त्यांस मदतही देत असत. यांत नारायण दीनानाथ हे वाढ्यानें ठेंगणे

---

१ जॉन बेलनें ता. २६ नवंबर १८४५ ला राजिनामा दिला, म्हणजे अकरा वर्षें त्यानें नोकरी केली. (G. D. 1846, vol. 30, p. 59) विल्यम हेंडर्सननें बॉर्डाची नोकरी सोडून विल्सनच्या स्कुलांत ता. २ जानेवारी १८४६ पासून कमी पगारावर नोकरी पत्करली. (O. C. S. 1850, p. 270)

२ मागें टीप ५ पृ. ५० पहा.

३ प्रभु. यांनीं १८४० मध्यें शाळा सोडली. मुंबई हायकोर्टाचे मराठी ट्रान्स्लेटर नेटिव्ह ओपिनियन (ता. २२ मे १८७०) मध्यें यांचा मृत्युलेख प्रसिद्ध झाला असून त्यांत लेखन, स्त्रीशिक्षण, ग्रंथालय वगैरे सार्वजनिक चळवळींत त्यांचा पुढाकार होता, हें दाखविलें आहे.

४ यांची माहिती मिळत नाहीं, व एल्फिन्स्टन इन्स्टिट्यूशनच्या विद्यार्थ्यांच्या यादींत (G. D. 1843, 24 A, p. 187) यांचें नांव नाहीं.

५ वरीलप्रमाणें.

६ एल्फिन्स्टन इन्स्टिट्यूशनमध्यें अध्यापक. पुढें पार्शियन डिपार्टमेंटमध्यें हेड ट्रान्स्लेटर.

७ (१८२२–१८९५) उपनांव त्रिलोकेकर– ठाणें स्कूलचे हेडमास्तर – पुढें अदालतमध्यें भाषांतरकार म्हणून सुरुवात करून मॅजिस्ट्रेट व हुजूर डेप्युटी कलेक्टर पर्यंत चढले. १८८० सेवानिवृत्त. जास्त माहितीकरितां नाना मोरोजीचें चरित्र–ले. ग. ह. भिडे, १८९६ पहा.

असून अल्पवयी असत व चांगले बुद्धिमान व उद्योगी असत म्हणोन Mr. Bell यांची त्यांज वर पूर्ण मर्जी असे. Natural Philosophy व Mathematics हे विषय Mr. Bell आह्मांस Arnold's Physics या ग्रंथा वरून शिकवित असत. यांचें Mathematics मध्यें फारसें गम्य नसे, परंतु Chemistry मध्यें यांचा फार भर होता. त्यांणीं शाळेंत व आपल्या घरीं रसायनप्रयोग करण्या करितां पुष्कळ Apparatus व Acids वगैरे सर्व उपयोगी पदार्थ जमवून एक Laboratory केली होती. पुष्कळदां रात्रीस त्यांहीं बाहेरचे हुद्देदार साहेबलोक यांस बलावून त्यांच्या समक्ष हे आपल्या विद्यार्थ्यांच्या हातून चमत्कारिक प्रयोग करवून दाखवीत आणि आमच्यापासून त्या प्रश्नांचीं उत्तरें सर्वांस ऐकवीत, तेव्हां सर्व मंडळीस मोठें आश्चर्य वाटून आनंद होत असे.

या वेळीं मीं असिस्टंट मास्तर असतां माझा वीस रुपयांचा दरमाह पगार होता. तो फार थोडा म्हणोन मीं काळजींत होतों. पुढें आमचे मास्तर Mr. Henderson यांणीं माझी चाल व गरीबी जाणून उगीच निमित्त करून, "मला मराठी शिकवायास सकाळीं माझ्या बंगल्यांत येत जा, मीं तुला दहा रुपये देत जाईन," असें म्हणून कांहीं महिने ते मला दहा रुपये देत असत. आणि पुढें Mr. Murphy हे त्या वेळेस कुलाब्याच्या दांडी जवळ राहत होते आणि ते मोठ्या कोर्टाचे Chief Interpreter होते त्यांची ओळख करून दिली आणि त्यांस माझी शिफारस केली, त्या वरून ते मज पाशीं कांहीं भक्तिविजयाचे अध्याय वाचूं लागले आणि मज वर बराच लोभ करूं लागले. मीं नेहमीं इतका दूर चालून त्यांच्या बंगल्यांत जात असें. त्या वेळेस कुलाब्यास जायास लहानशी खाडी उतरावी लागत असे. ओहटीनें पाणी सुकून ती खाडी बहुत करून कोरडी पडत असे. त्या वेळेस तिज वर पूल बांधला नव्हता. तो पुढें झाला असें मला स्मरतें. हे Mr. Murphy मज बराबर चांगल्या चांगल्या ज्ञानाच्या गोष्टी बोलत असत. त्यांणीं त्या वेळेस नुकतेंच लग्न केलें होतें. ते Irishman आणि Roman Catholic धर्मविचाराचे होते. त्यांनीं मला सांगितलें, कि "तुह्मी संध्येंत जे न्यास करितां तसे आमचे Roman Catholic धर्माचे लोकही आपल्या देउळांत करितात."

★

१६

# मराठींत व्याकरण रचण्याची माझी इच्छा व उपक्रम

मीं West Scholar असतां सन १८३३ च्या अखेरीस माझ्या मनांत मराठी भाषेचें एक चांगलें व्याकरण करून ती भाषा हाल्लीं नियमांत नाहीं तिला व्याकरणाच्या नियमांत आणावी, असें आलें. पहिल्यानें मीं कांहीं बंद प्रश्नोत्तररूपानें लिहिले.[१] परंतु ती पद्धत मला आवडली नाहीं म्हणोन Lindley Murray[२] यांच्या संक्षिप्त इंग्लिश व्याकरणाच्या पद्धतीवर तें व्याकरण रचावें असें मला वाटलें. त्या वेळेस मला दुसरा कोणत्याच व्याकरणाचा आधार नव्हता. मीं मराठी शाळेंत असतां तेथें मराठी पंतोजी तयार करण्या करतां रामचंद्रशास्त्री जान्हवेकर हे मुख्य गुरु व त्यांच्या हाता खालीं बाबाचार्य हे उपगुरु होते. त्यांच्या हातांत मीं मराठी शिकत असतां एक प्रश्नोत्तररूपानें लिहिलेली लहानशी वही पाहत असें. तिच्या नकला आमच्या वर्गांतील एकदोन मुलांनींही करून घेतल्या होत्या असें मला स्मरतें. त्या वरून मला त्या काळीं उगीच नाम, सर्वनाम, क्रियापद, विभक्ति हे शब्द मात्र ऐकून माहीत झाले होते. पुढें आमच्या शाळेंत वरच्या एकदोन वर्गास मराठी व्याकरण शिकविण्या करतां बापुशास्त्री शुक्ल मायदेव यांची नेमणूक झाली; आणि ते आम्हांस केवळ आपल्या तोंडानेंच व्याकरण सांगूं लागले; ती त्यांची व्याकरण सांगण्याची पद्धति इतकी चांगली असे कीं, ते व्याकरणांत काय जें आम्हांस सांगत तें माझ्या मनांत तेव्हांच शिरत असे. त्यांणीं प्रथम आमच्या वाचण्याच्या पंचोपाख्यान, सिंव्हासन-

---

१ दादोबांनीं ता. ५ सेप्टेंबर १८३५ रोजीं हें पुस्तक बोर्ड ऑफ एज्युकेशनकडे आश्रयाकरितां पाठविलें होतें, त्यावेळीं तें प्रश्नोत्तर स्वरूपांत होतें, असें बाळशास्त्री जांभेकरांनीं लिहिलेल्या अभिप्रायावरून दिसतें. ( G. D. 1836, vol. 27, p. 88 ) जास्त माहिती उत्तरार्धांत पहा.

२ ( १७४५–१८२६ ) १७९५ सालीं त्यानें आपलें मोठें व्याकरण प्रसिद्ध केलें. इंग्लंड व व अमेरिका या देशांत तें एके काळीं फार लोकप्रिय होतें. त्याच्या निधनाच्या वर्षीं या व्याकरणाची ४० वी आवृत्ति निघाली. याशिवाय त्याचीं संक्षिप्त व्याकरणें होतीं तीं निराळींच. ह्या जुन्या ग्रामरची प्रत आमच्या संग्रहीं आहे.

बत्तिशी, विदुरनीति, इसपनीति, व बाळमित्र या ग्रंथांतून कोणतें एकादें जें आमचा वर्ग वाचित असे त्यांतून एकदोन वाक्यें वाचवून त्याचें शब्दशः आमच्या कडून व्याकरण करवावें. विभक्तीचे अर्थ सांगावे व कर्ता, कर्म, क्रियापद हे विचारावे. केव्हां केव्हां लहर आली तर मध्यें मध्यें श्लोक, आर्या यांचेही अर्थ सांगावे व तीं आमच्या कडून शुद्ध लिहून घ्यावीं आणि तपासावीं व मध्यें अशुद्धें असलीं तीं दाखवावीं. §

यांत माझा नंबर बहुधा पहिलाच पडत असे या वरून शास्त्रीबावांची मज वर बरीच मर्जी बसत गेली आणि मला त्यांनीं नेहमी लाडानें 'दाद्या' म्हणोन हांक मारावी. या वर्गांत असतां जें कांहीं मीं थोडेंबहुत मराठी व्याकरण शिकलों तेंच काय तें माझें मूळचें व्याकरणाचें ज्ञान. पुढें इंग्लिश स्कुलांत गेल्या वर तेथें Guy's Grammar,[1] Lindley Murray यांचें लहान व्याकरण अशीं शिकलों

---

§ अशा लहरींत ते आह्मांस जे जे श्लोक किंवा आर्या त्याहायास सांगत ते आतां त्या गोष्टीस पन्नास वर्षें झालीं तरी मला आठवतात. त्यांनीं आह्मांस एकदा बारा राशीं वर श्लोक म्हणून दाखविला तो असा. त्यांत कोणी धिट्ट साध्वी स्त्री कोणा एका पापबुद्धीच्या पुरुषास म्हणते—

श्लोक

ऐकें रे दुसऱ्या करीन म्हणशी तें तीसरें तूं मला
पांचाची निज शक्ति आण बरवी तें प्राप्त कैचें तुला
सर्चीशी मवर्वे तथापि पडती दृष्टीस माझीं नखें
आतां घे मकरा शिरीं मम गृहीं बाहोनि राहीं सुखें.

आर्या

मानिनि माया केवळ। अल्प सभेंतील भूमितळपट हो॥
म्हणती आदित्यादिस। त्या मेल्याचें समूळ तळपट हो॥

पद

वर असा विभो दे कीं वत्सा गा मल्लीका॥ ध्रु०॥
पदवी श्रिची गोपिकांना दिधली वैकुंठींची बल्लवपल्लीका॥

१ Guy's Geography या पुस्तकाचा उल्लेख आढळतो. (10th Report of N. E. S. 1838, p. 41) पण त्याच्या ग्रामरचा आढळला नाहीं.

२ लेखनकालनिर्देश. (x) १८२७+५० सुमारें १८७७.

आणि parsing करायास शिकलों तेणेंकरून माझ्या मराठी व्याकरणाचें ज्ञान दृढ होऊन थोडें वाढलें. तेव्हां माझ्या मनांत मराठींत एक सुबोध व थोडें विशद असें व्याकरण करावें असें आलें आणि तो ग्रंथ लिहिण्यास सन १८३४ च्या अखेरीस आरंभ केला. तो पुढें सन १८३६ साच्या आरंभीं शेवटास नेऊन पुढें गणपत कृष्णाजी यांणीं त्या वेळेस शिलाछापखाना घातला होता त्याच शिले वर छापविला. किती प्रती काढविल्या त्याचें आतां मला स्मरण नाहीं. परंतु मला वाटतें निदान हजार प्रती तरी काढविल्या असतील. तें व्याकरण बाहेर पडतांच सोसाइटीनें व Mr. Chief Secretary Wathem यांच्या शिफारशीनें सरकारांनीं सर्व प्रती घेतल्या.[1] मीं मात्र आपल्या मित्रांस देण्या करतां थोड्या प्रती ठेविल्या. त्या व्याकरणाचीं पहिलीं छापलेलीं पुस्तकें पहिल्यानें माझ्या हातीं मीं पुढें इंदुरास गेल्या वर आलीं. तीं पाहतांच मला मोठा आनंद झाला. त्यांतून एक पुस्तक मला वाटतें त्या काळीं कागदोपत्रीं माझ्याशीं नुक्ताच स्नेह झालेला Sehore Bhopaul एथील Political Agent Mr. Wilkinson[2] यांस मीं तेथून पाठविलें.

★

१ १८३६ सालीं या व्याकरणांच्यां केवळ सातशें प्रती छापिल्या होत्या (दादोबाचें ता. १२-२-१८४० चें पत्र) यांपैकीं विकून राहिलेल्या २५० प्रती सरकारनें दर प्रतीमागें दीड रुपया देऊन १८४० सालीं विकत घेतल्या. (G. D. 1840, vol. 540) जास्त माहिती पुढें उत्तरार्धांत पहा.

२ Mr. Lancelot Wilkinson. यांनीं पाश्चात्य व पौर्वात्य खगोलशास्त्राचा अभ्यास केला होता. (O. C. S. 1851, p. 253) 'सिद्धांत शिरोमणि' या संस्कृत ग्रंथाचें यांनें इंग्रजी भाषांतर केलेलें:प्रसिद्ध आहे. (Calcutta 1861, Revised EPition of Bapudeo Shastri) ता. १५ नवंबर १८४१ मध्यें वारले. (प्रभाकर, ता. २८-११-४१)

१७

## × जावऱ्यास गमन

सन १८३४-३५ या वर्षांत Mr. Robert Cotton Money हे रजे वर विलायतेस गेले व पुढें तेथें मरण पावले.[1] त्यांच्या जागे वर Lieut. George Pope हे सक्रतार झाले. त्या वेळीं हे सक्रतार असतांना इंदुरास Resident यांच्या कामा वर Mr. John Bax हे होते. त्यांचें पत्र सरकारमार्फत सक्रतारास आलें कीं, कोणी दोघे इंग्लिश शिकविण्याच्या कामास लायक व हुशार असे शाळेंत शिकलेल्या विद्यार्थ्यां पैकीं माळव्यांत जावऱ्याचे नबाब व झाबुवाचे राजे अल्पवयी आहेत त्यां कडेस जाण्यास राजी असतील तर त्यांस एथें पाठवून द्यावें. एकेकास दरमाह दीडशें रुपये मिळतील. असें Mr. John Bax यांचें पत्र आल्याचें वर्तमान मला Mr. Viegas यांणीं सांगितलें आणि पुसलें, "तुझी जाण्याची मर्जी असल्यास तुझें व तूं आणखी कोणाची शिफारस करशील त्याचें नांव मीं सक्रतार Lieut. Pope यांस सांगून आह्मीं तेथें लिहून पाठवूं." या वरून मीं मोठा खुष होऊन घरीं तीर्थरूपांस ही आनंदाची गोष्ट सांगितली आणि आपली तेथें जाण्या विषयीं मोठी उत्कंठा दाखविली. परंतु कोणीं जावरा व जाबुआ हे गांव ऐकिले देखील नाहींत, व माळवा मुलूख फार दूर आहे, एका महिन्याची वाट, असें मनांत आणून आमच्या तीर्थरूपांस व त्याज पेक्षां माझ्या बाईस म्हणजे तीर्थरूपांच्या मातुःश्रीस तर मोठेंच अवघड पडल्या सारखें झालें. आमचें कुटुंब लहान सोळासत्रा

---

१ मागें पृ. ५१ तळटीप २ पहा. ता. २६ मे १८३२ चा मनीनें दिलेला सेक्रेटरीच्या जागेचा राजीनामा ("in consequence of its interfering with my other duties") उपलब्ध असून यांतच लेफ्टनंट पोपची आपल्या जागीं नेमणूक व्हावी, अशी त्यांनीं सूचना केली आहे. (G. D. 1832, vol. 10, p. 94) मुंबईहून ते प्रथम बेळगांव व नंतर सोलापूर येथें असिस्टंट कलेक्टर म्हणून गेले. बेळगांवहून सोलापुरला आतांना जंगली तापानें त्यांना गांठलें व ता. २१ जा. १८३५ रोजीं त्यांचा सोलापूर येथें अंत झाला. (Memoirs of Mrs. Margaret Wilson, 1858, p. 397. O. C. S. 1835, p. 69.)

वर्षांचें होतें. तिला तर फारसें नाहीं, परंतु तिच्या आईबापांस व आजाआजीसही मोठें अवघडच वाटलें. तथापि आमचे तीर्थरूप फार विचारी होते. त्यांज पाशीं कामा करतां मारवाडी लोक येत जात असत त्यांज पाशीं त्यांहीं या गांवांचा पूसतपास केला. तेव्हां त्यांहीं मोठ्या खुशीनें सांगितलें, किं "रतलाम, जावरा हीं गांवें नेहमीं आमच्या पाहण्यांत आहेत. मुलख फार चांगला आहे. तुह्मीं मुलास बेलाशक पाठवा. त्याची शरीरप्रकृति एथें आह्मांस फार अशक्त दिसते तीही त्या हवापाण्या वर सुदृढ होईल व आश्रयही मोठ्याचा म्हणोन तुह्मीं या कामांत हयगई करूं नका, मुलास बेलाशक तेथें पाठवा." असें ते मारवाडी माझ्या समक्ष आमच्या तीर्थरूपांस पुष्कळदां बोलले. त्या वरून तीर्थरूपांस माझ्या प्रकृती विषयीं काळजी होतीच, ती त्या हवा पाण्या वर चांगली सुधारेल, तशांत मुलास मोठ्याचा आश्रय लागतो, आपलें वयही आतां उतरतें, घरीं म्हटली तर गरीबीच, दुसरीं मुलें सर्व लहान, हें सर्व मनांत आणून त्यांणीं मला जाण्या विषयीं रुकार दिला. तेवढाच रुकार मला पाहिजे होता. माझें वय त्या वेळेस बावीस वर्षांचें होतें. बाहेर देशाटण करण्याची मनास मोठीच हौस. मग मीं माझे त्या वेळेचे शाळेचे संवगडी व परम मित्र नाना नारायण यांसही राजी केलें.[१] या प्रमाणें आह्मां दोघांचीं नांवें तेथें लिहून गेल्या वर Mr. John Bax यांहीं "आक्टोबर नवेंबरांत सिंधव्याच्या घाटांतून त्यांहीं येऊं नये, कारण त्या महिन्यांत तेथून येणाराजाणारांस हिंवताप लागत असतो म्हणोन पुढें डिसेंबरांत त्यांस पाठवावें". म्हणोन लिहून आल्या वर, मला आपलीं आवांतर कामें संपविण्यास बरीच मुदत मिळाली. त्या वेळेस हें माझें व्याकरण छापण्याचें काम चाललें होतें. या शिवाय Mr. Viegas यांच्या मार्फत सातारच्या

---

१ **10th Report of B. N. E. Society** मध्यें पुढील मजकूर आढळतो— "Since the last General Meeting two young Native Chiefs, the Rajah of Jnabooa and the Nuwab of Jawra, have commenced the study of the English language under the tuition of two young men formerly educated in the society's schools by name Dadoba Pandurang and Nana Narayen. Possessing considerable acquirements and characterised by much steadiness and propriety of conduct the society had great pleasure in seeing these individuals respectably provided for." (p. 16)

महाराजांच्या प्रकरणाचे कांहीं कागदपत्र[1] त्यांज कडून आलेले रंगो बापूजी[2] परभु यांच्या समक्ष तर्जुमा करण्याचें काम चाललेंच होतें. अशीं हीं जरूरीचीं हातांत असलेलीं कामें संपवायाचीं होतीं तीं सारीं संपविलीं.

पुढें नवेंबर सन १८३६ च्या आखेरीस भिवंडी, नाशीक, धुळें या मार्गानें इंदुरास जाण्याचा निश्चय झाला. मला इतकें दूर परमुलखीं जाणें आहे म्हणोन वसईंत आमचें आजोळ होतें तेथें आईच्या चुलतभावास व चुलतबहिणीस भेटून, सोपाऱ्यास आमचे आजेसासरे गंगाधर रामजी यांस भेटून तेथून वज्राबाईच्या वाटेनें भिवंडीस जावें, आणि नानानें परभारें एकदम भिवंडीस जाऊन तेथें आमची गांठ पडावी असा संकेत झाला. मीं सुमुहूर्तानें बाईच्या पाया वर डोकी ठेवून तिची आज्ञा घेतली त्या वेळेस तिणें फारच शोक केला. आह्मीं तिचें समाधान करून माहीमच्या खाडी पर्यंत किंवा वानऱ्यां पर्यंत (आतां बराबर स्मरण नाहीं) गेलों. तेथ पर्यंत आमचे तीर्थरूप व ल्हान भावंडें राघोबा, आत्माराम व दीनानाथ आमच्या बराबर मला पोंहचविण्यास होतीं. तीर्थरूपांचा माझा तेथें वियोग झाला. त्या काळीं तीर्थरूपांचे नेत्र व ल्हान भावांचे नेत्र आंसवांनीं गळूं लागले. मग मीं तीर्थरूपांच्या पायां वर डोकी ठेवून त्यांची आज्ञा घेतली त्या वेळेस आमच्या सर्वांच्या नेत्रांतून अश्रुधारा चालल्या. तीर्थरूपांची व माझा कनिष्ठ प्रियकर बंधु दीनानाथ त्या काळीं बारा वर्षांचा होता त्यांची ही आतां शेवटलीच भेट हें मीं त्या समयीं कोठून जाणावें? हें पुढल्या हकीकती वरून माझ्या वाचकांस समजेलच. माझें कुटुंब माझ्या बरोबर आपल्या आजोळीं सोपाऱ्यास जाण्या करतां मज बराबर होतेंच. पुढें सारी रात्र आमची भाड्यानें केलेली बैलाची गाडी चालून पहांटेस आह्मीं घोडबंदरास

---

१ प्रतापसिंह महाराजांवर, इंग्रजांना हिंदुस्थानांतून घालवून देण्याच्या कटांत ते सामील असल्याचा आरोप ठेवून त्याबद्दल खोटा पुरावा यावेळीं तयार करण्यांत येत होता. जास्त माहितीकरितां Memoir of General John Briggs by Major Evans Bell, 1885, p. 90. प्रतापसिंह महाराज, ले. र. गो. राणे, १९२९ किंवा Story of Satara by Dr. B. D. Basu पहा.

२ प्रतापसिंहाचा स्वामिभक्त वकील. धन्याची बाजू मांडण्यास तो इंग्लंडला गेला होता. (अप्रसिद्ध ऐतिहासिक चरित्रें— वि. स. वाकसकर, १८२५, पृ. १०० पहा.)

३ वांद्रें. सध्यां जरी Bandra असें म्हणतात तरी जुन्या पोर्तुगीज लेखांत Bandora असा नामनिर्देश आढळतो. मूळ शब्द बांदिवडें (बंदिवान्याचा गांव) असावा.

पोंहचलों व तेथून तरींत बसून दहा अकरा वाजतां वसईंत मीं आपल्या आजोळीं एकदोन दिवस मुक्काम करून मामा, मामी, मावश्या यांस भेटून त्यांचा निरोप घेऊन सोपाऱ्यास आजेसासरे गंगाधर रामजी यांच्या घरीं गेलों. तेथें आमच्या आजेसासूचे बंधु लक्ष्मण दादाजी हे आमच्या समागमें थेट जावऱ्या पर्यंत यावयास तयार होतेच. त्यांस बराबर घेऊन सोपाऱ्याहून तिसरा प्रहर ढळतां ढळतां निघालों, तों सारी रात्र बैलाच्या गाडीनें बारा कोश मार्ग चालून दुसऱ्या दिवशीं सकाळीं भिंवडीस पोंहचलों. मार्गे कांहीं अडचणी मुळें आमचें कुटुंब तिच्या आजोळीं थोडें दिवस राहून घरीं मुंबईस गेलें.

भिंवडींत संकेता प्रमाणें राजश्री नाना नारायण हे आपल्या परिवारा सह आलेच होते. त्यांची आमची गांठ पडून एक दिवस भिंवडींत मुक्काम करून दुसरे दिवशीं मुक्कामास पडघ्यांत राहिलों. तेथून शाहापूर, खरडी, (ही खरडी आतां म्यां दुसऱ्यानें पाहिली. त्या वेळेस माझ्या ममताळु आईचें व तेथील दरोड्याचें स्मरण होऊन माझे डोळे भरून आले. भिंवडीपासून मला तिचें एकसारखें वाटोवाट स्मरण होत गेलें आणि तेणेंकरून मीं फारच खिन्न झालों होतों.) कसारें एथें मुक्काम करित करित कसाऱ्याहून थळघाटा वरून वाडिंबरें, तेल्याची घोटी असे मजल दर मजल गांव टाकित व मुक्काम करित साहवे सातवे दिवशीं श्री क्षेत्र नाशीक एथें पोंहचलों. वाटेंत नानाची आमची सोहबत[1] होतीच. ते व मीं बहुतकरून एकाच गाडींत बसून गोष्टीवार्ता करून मोठ्या खुशीनें मार्ग क्रमित होतों.

## नाशीक

ही नाशीक क्षेत्राची रचना पहिलीच माझ्या दृष्टीस पडली. आमचे क्षेत्रोपाध्याय पाराशर उपनांवाचे होते, त्यांस आमच्या येण्याचें वर्तमान लागलेंच समजलें. हे क्षेत्रोपाध्याय व त्यांचे ब्राह्मण नाशीकाच्या आसपास फिरतच असतात. कोणी आपल्या गांवांत नवे प्रवाशी किंवा परमुलकांतले लोक आले म्हणजे त्यांस वाटेंतच गांठतात, आणि पहिल्यानें त्यांची जात, उपनांव विचारितात. त्याचें उत्तर त्यांस कोश अर्ध कोशा वर मिळालें म्हणजे ते लागलेंच हें अमक्याचें कूळ म्हणून त्यांस लागलीच सूचना देतात. आह्मीं मुंबईचे वैश्य असें समजतांच पाराशर आमच्या वडिलांचीं नांवें

---

१ (अर-सोहबत)

दाखल असलेल्या वह्या बराबर घेऊन येतात आणि पुसूं लागतात, अमके तुमचे कोण किंवा अमुक बाई तुमची कोण? आमच्या तीर्थरूपांचे चुलते व चुलत चुलत भाऊ कांहीं वर्षां मागें तीर्थविधि करायास एथें आले होते. त्यांच्या हातचा त्यांच्या नांवाचा लेख दाखविला तर तो त्यांचा लेख पाहून जणों ते आपल्यास एथें भेटले असें वाटतें व त्या लेखा वरून आपल्या कांहीं पूर्वजांचीं नांवेंहि जाणण्यांत येतात हा मोठाच लाभ समजला पाहिजे. या पाराशराच्या वहींत आमच्या निपणज्याच्या नांवा पर्यंत शोध लागला. आमची मार्गस्थ होण्याची त्वरा होती या मुळें एथें आमचा फार दिवस मुकाम झाला नाहीं. नाहींतर मीं आणखी त्यांच्या पूर्वजांच्या नांवांचा शोध केला असता. क्षेत्रविधि करण्या विषयीं आमच्या उपाध्यायांचा व इतर ब्राह्मणांचा फार आग्रह पडला. परंतु मीं त्यांस साफ सांगितलें, "गंगाबाईंत स्नान केलें म्हणजे आमचें पाप जाईल किंवा एथें श्राद्धविधि केला असतां आमच्या पूर्वजांचा उद्धार होईल असें आह्मांस अगदीं वाटत नाहीं व तशी आमची श्रद्धाहि होत नाहीं. म्हणोन त्या खटपटींत तुह्मीं मला घालूं नका. वरकड आमच्या शक्ती प्रमाणें आह्मीं तुम्हांस दक्षिणा वगैरे देऊं." ब्राह्मणांस आणखी काय पाहिजे? त्यांस आमची किंवा आमच्या वडिलांच्या उद्धाराची थोडीच काळजी असत्ये! त्यांस त्यांच्या पोटाची काळजी असत्ये. त्याची थोडी सामग्री व्हावी हेंच त्यांस इष्ट असतें. तें त्यांचें इष्ट आह्मीं त्यांस दिलें. आमचें बिऱ्हाड गंगेच्या कांठीं माड्या आहेत त्यांतून एका माडी वर होतें. तेथून गंगाबाईचें आह्मांस चांगलें दर्शन होत होतें व घांटा वर जे लोक व बायका स्नानास व वस्त्रें धुवावयास येत असत ते सर्व थवेचे थवे आह्मांस दिसत असत. एथें बाजीरावाचा जुना वाडा आहे. तेथें मामलेदाराची कचेरी होती असें स्मरतें. सुंदरनारायणाचें देवालय आहे तें आह्मीं पाहिलें व पंचवटींत रामाचें देवालय पाहिलें.[१] असें सर्व पाहण्याचें तें एक दोन दिवस तेथें राहून पाहिलें आणि पुढें चांदवड व मालेगांव एथें जाण्यास निघालों, तों वझर, कोंकणगांव, पिंपळगांव, वडाळी, असे गांव टाकित व मुकाम करित चांदवडास पोंहचलों.

## चांदवड

चांदवड हा होळकरांचा गांव मध्येंच आहे. तेथें होळकरांचें ठाणें असतें.

---

१ या देवळांच्या माहितीकरितां Bomb. Gaz.; vol. XVI, Nasik, 1883, pp. 503–21 पहा.

चांदवड हा बराच मोठा गांव आहे, व तेथें गांवा पासून थोडें दूर एकी कडेस देवीचें देऊळ आहे, तेथें मीं व नाना व आमचे साथी लक्ष्मण मामा फिरत फिरत गेलों. देवळास जाण्याची सडक आह्मांस फार रमणीय दिसली. दोन हारीनें आंब्याचे, वडाचे व दुसरे हिरवेगार छायेचे वृक्ष लागले आहेत व मधून गांवांतले पुरुष व बायका देवीच्या दर्शनास जात येत आहेत व जवळच एक लहानशी टेंकडी, असें आह्मीं पाहून फार बरें वाटलें. या गांवांत एथें एक दिवस मुकाम करून दुसरे दिवशीं त्या टेंकडीच्या लहानशा घाटांतून उमराणा, सौंदाणा, मुंगसा, हे गांव टाकित व मुकाम करित तिसरे दिवशीं पेठ मालेगांव एथें पोंहचलों.

## मालेगांव

आतां आह्मांस खानदेश लागला. मालेगांव ही एक मोठी पेठ आहे व एथें कांहीं पलटणीचे लोकहि असतात. मालेगांव हा राजा बहादूर म्हणोन पूर्वीचे कऱ्हाडे ब्राह्मण सरदार यांचा जहागिरी गांव असावा असें मला वाटतें. ते सरदार एथें किल्ल्यांत वस्ती करून असतात. हे सरदार पूर्वी पेशव्यांचे मोठे नामांकित सरदार गोविंदपंत बुंदेले बुंदेलखंडांत होते त्यांचेंच नातलग व त्यांच्याच संबंधाचे असावेत. परळी हें त्यांचेंच एक दुसरें गांव आहे. तेथें संध्येच्या पळ्या उत्कृष्ट होतात, म्हणोन त्या गांवाची ख्याती आहे. मालेगांवांत एक दिवस मुकाम केला.

## धुळें

दुसरे दिवशीं, झोडगें, आर्वी, नर्लिंग, हे बरेच मोठाले गांव टाकित व मुकाम करित तिसरे चौथे दिवशीं धुळें एथें पोंहचलों. धुळें हा खानदेश जिल्ह्याचा गांव आहे. एथें खानदेशाचे कलेक्टर असतात. व जड्ज, प्रिन्सिपाल सदर अमीन, सदर अमीन व अमीन यांचीं कोर्टें असतात. पेशवाई गेल्या वर खानदेश इंग्लिशांचे अमलांत आल्या वर सर्व जिल्ह्याचा व आसपासच्या प्रांताचा बंदोबस्त करण्याचें काम Mr. Briggs[१] यांचे हातीं आलें. याच विद्वान् साहेबानें तवारीखें फिरिंशे या

१ General John Briggs (१७८५–१८७५) एल्फिन्स्टन पुण्याला रेसिडेंट असतांना त्याचा असिस्टंट, पुढें सातारला रेसिडेंट. १८१९ आगस्टच्या सुमारास यानेंच खानदेश इंग्रजांच्या ताब्यांत आणला. **Memoir of John Briggs by M. E. Bell,** 1885 पहा. फारसी व मराठी भाषा माहीत होत्या. Ferista's Hist. of the

नामांकित फारशींत लिहिलेल्या बखरीचें इंग्रेजी भाषेंत भाषांतर करून तें तीन पुस्तकांत प्रसिद्ध केलें आहे. या साहेबांचे नांवानें अद्यापि धुळें एथें त्यांणीं वसवलेली ब्रिग्स पेठ म्हणोन मोठी पेठ आहे. तेथेंच आह्मीं मुक्कामास राहिलों. आह्मीं ह्या वेळेस धुळ्यास गेलों तेव्हां तेथील मुख्य कलेक्टर Mr. Boyd हे होते, आणि त्यांचे मुख्य विश्वासु नेटिव कारभारी गोविंदराव अय्या हे होते. हे गोविंदराव नैडू जातीचे मद्रास जिल्ह्यांतले राहणारे असून धुळ्यांत कलेक्टरच्या कचेरींत Head Accountant ( हेड अकौंटंट ) होते. हे फार साहेबांच्या कृपेंतले होते, म्हणोन तेथील दफ्तरदारसुद्धां सर्व लोक त्यांच्या आर्जवांत असत. त्यांस आमचें पुढें इंदुरा कडेस जाण्याचें वर्तमान पूर्वीच माहीत होतें. ते आमच्या बिऱ्हाडीं आह्मांस भेटायास आले. त्यांच्या पोशाका वरून व बोलण्या वरून हे तैलंग देशांतले आहेत असें एकाएकीं कोणाच्या ध्यानांत यावया जोगें नव्हतें. Mr. Boyd हे त्या वेळेस बाहेर स्वारींत फिरत होते. तरी गोविंदरावानें सातपुड्यांतून सिंधव्याच्या घाटानें महेश्वर व इंदुरपर्यंत पोंहचविण्या करितां आमच्या रखवालीस एक दोन पट्टेवाले दिले होते असें मला आतां स्मरण आहे. Mr. Boyd हे मोठे विलासी पुरुष होते. त्यांच्या स्वारींत जनाना चालत असे असें तेथील लोक सांगत होते. परंतु बहुतकरून असे विलासी पुरुष स्वभावानें फार चांगले व गरिबां वर दया करणारे असे असतात, असें माझ्या आढळण्यांत आलें आहे. त्या प्रमाणें त्यांचा त्या प्रांतांत चांगला लौकिक होता. हे साहेब पुढें बडोद्याचे रेसिडेंट असतां तेथें मरण पावले. त्याचें प्रेत मीं पुढें सुरतेंत असतां तेथें गाडण्या करतां आणित्याचें मला थोडेसें स्मरण आहे. आतां मुंबईंत मंचेरजी पन्थकी यांज कडेस जो चरनीरोडाच्या कोपऱ्या वर Back Bay एथें बंगला आहे त्यांत हे साहेब फार दिवस राहत होते. गोविंदरावानें आमचा फार समाचार घेतला म्हणोन आह्मीं त्यांचे आभार मानिले.

## सिंधव्याचा घाट

आह्मीं दोनचार दिवस धुळें एथें राहून पुढें सोनगीर, बेटावद, हे गांव टाकित व मुक्काम करित तापीच्या कांठीं थाळनेर आहे त्या गांवीं तापी उतरून पोंहचलों,

---

Mahommedan Power, 1829, India and Europe compared, 1857, Letters addressed to a young person in India, 1832, वगैरे यांचे ग्रंथ प्रसिद्ध आहेत.

त्या वेळेस तेथें लहानसा बाजार भरला होता. परंतु त्या बाजारांत बहुतकरून मिरच्या, हळद, मीठ असेच गरीब लोकांस लागणारे जिन्नस आमच्या दृष्टीस पडले. पुढें आह्मांस सातपुड्याचा प्रसिद्ध मोठा डोंगर चढावा लागला. त्या चढण्याच्या घांटास एथें सिंधव्याचा घाट म्हणतात. या पहाडांत भिल्ल, कोळी, रामोशी या रानटी व लुटारू लोकांची वस्ती असल्या कारणानें हा सिंधव्याचा घांट माजी राज्यांत पांथस्थांस मोठाच भयंकर होता. काशीस यात्रा या वाटेनें जायाची झाल्यास बराबर रखवालीस हत्यारबंद शिपाई घेतल्या शिवाय ती यात्रा जात नव्हती. आह्मीं सिंधव्याचा घांट चढत असतां आह्मांस तेथील भिल्लांचा मोठा नाईक भेटला. त्यानें आमच्या बरोबर सरकारचे पट्टेवाले पाहून तो आह्मांस पुढें सामोरा आला आणि त्याणें बोलून चालून आमचें चांगलें आगतस्वागत केलें. तो रंगानें काळा कुळकुळीत व दोंदील, सुमारें पन्नासीच्या वयाचा होता. त्याच्या गळ्यांत सोन्याची कंठी व कानांत सोन्याच्या कुडुकबाळ्या होत्या. त्यास इंग्लिश सरकारानें वेतन करून लुटारू लोकांपासून या घाटांत वाटसरूंचें रक्षण करण्या करतां आतां ठेवला आहे. या घाटांत व आसपास चोरीचपाटी व लूट झाली असतां त्याची जबाबदारी त्याच्या माथ्या वर आहे.[१] तो एथें पूर्वीपासून आपल्या जातीचे लुटारू व मारेकरी लोक यांज वर आपली देखरेख ठेवितो. पहा, इंग्लिश लोकांचें कसें शाहणपण तें! चोरांच्याच हातानें चोरांचा बंदोबस्त. कांट्यानेंच कांटा काढण्याचें चातुर्य तें हें. आपण राजे व सरदार असतां जर दरसाल मुलखा वर स्वाऱ्या करून भिल्लां प्रमाणें लुटून वैराण[२] करूं लागलों तर आपल्या हातून भिल्लांचा बंदोबस्त कसा व्हावा? शेंपन्नास भिल्ल धरून त्यांची दावण बांधून त्यांच्या माना कापल्यानें त्यांचा बंदोबस्त कसा होतो? हीच पूर्वी राजां कडून या

---

१ तुळा: "Nearly all the Bheel chiefs and their followers fulfilled their engagements, and became once more an effective body of police under Captain Briggs's administration. Bheels were employed to convey all the local post letters, and even to convey to the treasury the revenue of the country; for a whole year gang robbery everywhere ceased to exist."—**Memoir of J. Briggs, p. 80.**

२ (फा.) उध्वस्त.

अनाडी व गरीब लोकांचा बंदोबस्त ठेवण्याची रीत होती.[1] त्यांस कामकाजें व वेतनें देऊन राजी राखण्याची रीत अगदीं नव्हती. ती रीत शहाण्या इंग्लिश लोकांनीं चालविली. या घाटा वर आणखी एक शिपाईबाण्याचा गृहस्थ आह्मांस भेटला. तो आमच्या बरावर येऊं लागला. आह्मीं त्यास विचारलें, " तुह्मीं कोण ? " तो म्हणाला, " मीं कोंकणस्थ ब्राह्मण आहें. आह्मीं या घाटांत पूर्वी लूट करित होतों. तुह्मां सारखीं सावजें आमच्या हातून जोवंत कोठून जाणार ? आतां हे आमचे असे कठीण दिवस आले आहेत. " मीं त्यांस म्हटलें, " तुह्मीं ब्राह्मण असून केवढें निर्दयपणाचें काम करित होतां. " तो म्हणाला, " अहो, संपत्ति मिळाली म्हणजे निर्दयपणा कोठला आणि धर्म कोठला ? आह्मांस त्या वेळेस कांहींच वाटत नव्हतें. " आह्मीं त्यास पुसलें, " आतां तरीं तुह्मीं या वस्तींत कशास राहतां ? " तर तो म्हणाला, " पूर्वीपासून एकदोन पिढ्यांनिशीं आमची एथेंच वस्ती आहे. आतां म्हातारपणीं कोणी कडे जावें ? एथेंच हा देह पडायचा. " असें म्हणत म्हणत ते गृहस्थ आमच्या बरावर चालत

---

१ तुळा : " To put down the Bhil rising Bajirav invested Balaji Lakshman the Sarsubhedar or governer of Khandesh with full powers. At the instigation of Manohargir Gosavi one of his captains Balaji Lakshman invited a large body of Bhils to a meeting at Kopargaon on the Godavari, treacherously seized them, and threw them down wells. This restored order for a time. But in 1806 disorder was as general as ever and Trimbakji Denglia who was then in charge of the district caused another massacre of Bhils at Ghevri–Chandgaon in Shevgaon. He commissioned Naroba Takit, Patil of Karambha to clear the Gangthadi; and 5000 to 6000 horses and a large body of infantry were given him. Naroba butchered the Bhils and all who had any connection with them wherever he found them. During fifteen months 15000 human beings are said to have been massacred. (**Bom. Gaz. vol. xvii, Ahmadnagar** 1884, p. 414) डॉ. विल्सननें आपल्या एका पत्रांत (ता. ३–८–१८७५) कांहीं वर्षांपूर्वी गायकवाडाच्या राज्यांत झाडाच्या फांद्यांना उलटे टांगून जाळलेल्या भिल्लांचे चित्र आपण पाहिल्याचें नमूद केलें आहे. (**Life of Wilson** by Smith p. 633).

होते. आमचा निरोप घेऊन ते माघारे परतले. ही एक नवीनच अकल्पित गम्मत आह्मांस सांपडली व त्याची हकीकत ऐकून आह्मांस मोठेंच आश्चर्य वाटलें. कारण ही त्या ब्राह्मणानें सांगितलेली आपली स्वतःची हकीकत खरी नसेल असा आमच्या मनांत कांहींच संशय आला नाहीं. सिंधव्याचा घाट व सातपुड्याचा पहाड चढून त्या डोंगरी रानांत आह्मीं दोन तीन गांवीं मुक्काम करून चौथ्या मजलीस नर्मदा उतरून तिच्याच कांठीं महेश्वर बरेंच मोठें शहर आहे तेथें आह्मीं पोंहचलों.

## महेश्वर

आतां होळकरशाही आह्मांस लागली. महेश्वर हें होळकरांचें मोठें आवडतें ठिकाण आहे. एथें अहल्याबाईनें बांधलेले नर्मदेच्या कांठीं मोठे सुशोभित घाट व देवालयें आहेत. आह्मीं गेलों तेव्हांहि होळकरां कडून देवालयें व छत्र्या बांधण्याचीं कामें चाललीं होतीं. त्या परम यशस्वी बाईचा असा नियम होता कीं, महेश्वरीं होळकरांची टांकी कधीं बंद पडायाची नाहीं, असें जे पाथरवट काम करित होते ते व इतर तेथील लोक आह्मांस सांगूं लागले. एथें पाषाणी घाट व देवालयें यांची आह्मांस फारच चांगली शोभा दिसली. महेश्वर यास बहुतकरून लोक ‘ चोळीमहेश्वर ’ म्हणतात.[1] चोळी म्हणायाचें कारण असें कीं एथें नजीक एक गांव आहे तो पूर्वीं श्रीमंतांनीं अहल्याबाईला चोळी करतां इनाम करून दिला होता, त्या वरून आतां यास चोळीमहेश्वर असें म्हणतात. ही एक मोठी पेठ आहे. एथें धोतरजोडे, लुगडीं चांगलीं होतात व एथें गुजराथी व मारवाडी यांचीं बरींच दुकानें आमच्या पाहण्यांत आलीं. एथें एक दिवस मुक्काम करून गडी, नालचा, भिलोड, हीं गांवें एका मागें एक टाकित म्हौच्या छावणींत येऊन पोंहचलों.

## म्हौ व इंदूर

ही छावणी इतर इंग्रजांच्या छावणी प्रमाणें सुशोभित असून तींत दोनचार मोठालीं पारशांचीं विलायती सामान विकण्याचीं दुकानें होतीं. हीं दुकानें वीस पंचवीस वर्षांपासून तेथें असावींत. म्हौच्या थेट उत्तरेस तीन कोश पर्यंत चांगल्या घोड्यांच्या

---

१ तुळा–“ तबकें बाईपुढें ठेविलीं...तदोत्तर पातळ व चोळी बाईच्या हातीं दिलीं...बाई बोलल्या,...“ कैलासवासी श्रीमंतांच्या पुण्योदयें व जगताच्या भाग्येंकरून ईश्वरें जगत्कुटुंबी प्रभु उत्पन्न केला– ” **महेश्वर दरबारचीं बातमीपत्रें,** भा. १ ला, १९१०, पृ. २०७.

गाड्या फिरविण्या जोगी सडक आहे. त्या सडके वरून दुसरे दिवशीं सकाळीं एक प्रहरांत इंदुरास दाखल झालों. एथें गांवांत देवालय होतें त्यांत आह्मीं उतरलों. त्यांत आमची राहण्याची बरी सोई होती आणि आह्मीं भरवस्तींत होतों ह्मणोन लोक जात येत ते पाहण्यास आह्मांस चांगली गम्मतहि मिळाली. आह्मांस पहिल्यानें एक गोष्ट पाहून बराच अचंबा वाटला. ती गोष्ट अशी किं या शहरांत जो कोणी मराठा, किंवा रांगडा पहावा तो हत्यारबंद. लहान मराठ्याच्या अथवा रजपुताच्या कारट्याच्या हातीं तरवार नाहीं असा थोडाच आमच्या पाहण्यांत आला. बुंदेले व थोडे अरबहि मधून मधून फिरत होते. आह्मीं गेलों तेव्हां इंदुरांत हरिराव होळकर हे गादी वर होते. ते व माजीसाहेब[1] यांचा काय तो मुख्य अम्मल. त्यांत माजीसाहेबाचा मान विशेष होता. ही माजीसाहेब माजी यशवंतराव किंवा मल्हारराव होळकर यांची ठेवलेली स्त्री होती. (आतां बराबर आठवत नाहीं.) आह्मीं पाहिली तेव्हां ही वृद्ध बाई पालखींतून पडदे लावून गांवांत कधीं कधीं फिरत असे. हरिराव होळकर यांस आह्मीं पाहिलें नाहीं, परंतु सरकारवाड्या समोर नेहमी तिसऱ्या प्रहरीं व संध्याकाळीं हत्ती, स्वार, शिपाई यांची गर्दी असे तेवढें मात्र आमच्या दृष्टीस पडे. आह्मीं ज्या देवळांत बिऱ्हाडास उतरलों होतों त्याच्या समोर सरकारी मानकऱ्यां पैकीं बाबा पोतनीस राहत होते हे मात्र आमच्या पाशीं बोलायास, गोष्टी सांगायास येत असत. म्हौच्या छावणींतच आह्मांस खास बातमी लागली किं बडे साहेब ह्मणजे एथील रेसिडेंट Mr. John Bax हे बाहेर स्वारीत फिरायास गेले होते, त्यांस आह्मीं आपल्या येण्याचें वर्तमान लिहून पाठविल्या वर त्यांहीं मला जावऱ्यास नबाब Ghous Mohomedkhan यांज कडेस जावयास सांगितलें, आणि आमचे सोबती राजश्री नाना नारायण यांस झाबुवाचे[2] राजे

---

१ मा + जी = माताजी.

२ नानानें डॉ. जार्ज स्मिटन याला पाठविलेल्या ता. १५ आगष्ट १८१७ च्या पत्रांत या संस्थानची बरीच मनोरंजक माहिती उपलब्ध आहे. पण तो या संस्थानला झाबुवा असें नांव न देतां Jalwah असा नामनिर्देश करतो ("Jalwah is about a hundred miles to the East of Baroda") आपल्या शिष्यवरासंबंधी तो लिहितो, "As to my pupil, his name is Ruttun Singh, is a lad of about seventeen years of age. Though he wants not understanding, he wants yet inclination to be a scholar." (O. C. S.. 1837

यांज कडेस जाण्यास सांगितलें. मला थोडें फारशी येत होतें. व मुसल्मान लोकांची मला चांगली माहिती होती. व जावरा हें संस्थानहि झाबुव्या पेक्षां मोठें, या वरून मला माझी नेमणूक ऐकून खुशी वाटली. नानांसहि कांहीं फारसें वाईट वाटलें नाहीं. किंबहुना त्यांस राजा पाशीं राहण्याचें बरें वाटलें. आम्हां दोघांस Major Borthwick, Political Agent at Mehidpore यांच्या हुकमा प्रमाणें रहावें म्हणोन बडे साहेबांचा आम्हांस हुकूम झाला.

## मला माझ्या मराठी व्याकरणाच्या छापलेल्या पुस्तकाचें पहिलें दर्शन

आमचा सात आठ दिवस इंदुरांत मुक्काम होता. तेव्हां तेथेंच माझ्या व्याकरणाच्या पहिल्या आवृत्तीचीं बुकें–मला तीर्थरूपांकडून बंगी पोस्टांत Mr. Wathen,[१] Chief Secretary to Government यांच्या सहीनें Free Postage आलेलीं पुस्तकें–यांचें पहिलें दर्शन झालें. तीं पुस्तकें पाहून मला मोठा आनंद झाला. मग त्याच्या दोन तीन प्रती मीं तेथेंच मित्रमंडळीस वांटून एक प्रत Mr. Wilkinson, भोपाळचे Political Agent (at Sehore Bhopal) यांस सिव्होरास पाठविली. आतां या गोष्टीस पंचेचाळ स वर्षे[२] झालीं म्हणोन मला आतां पक्कें स्मरण होत नाहीं, कि आमचे सोबती नाना यांचा आमचा एथें इंदुरांत वियोग झाला, किंवा मीं एथून जावऱ्यास जाण्याच्या मार्गा वर जावऱ्या नजीक रतलाम शहर आहे तेथून झाला. कारण झाबुव्यास जाण्यास इंदुराहून व रतलामहून दोन्ही मार्ग आहेत. त्यांत इंदुराहून भोपावडा वरून जो मार्ग आहे तो थोडा नजीकचा आहे, आणि रतलामहून थोडा दूरचा पल्ला आहे. परंतु रतलाम हें बरेंच मोठें शहर आहे व रजपूत राजाच्या संस्थानाची जागा आहे. म्हणोन कदाचित् नानाच्या

---

p. 469) खरें नांव झाबुवा असेंच आहे. तुळा–"The state (Jhābua) takes its name from the chief town, founded in the sixteenth century by a notorious freebooter Jhabbu Naik (Imp. Gaz., vol. xiv, p. 104).

१ W. H. Wathen याला मराठी येत होतें व त्या काळीं युरोपीयन लोकांच्या सरकारी नोकरीकरितां अवश्य असलेल्या देशी भाषांचा तो परीक्षक असे. (G. D. 1827, vol. 10).

२ लेखनकाल. १८३६+४५=१८८१. (x)

आईचा व बायकोचा उज्जेनीस महाकाळेश्वराचें दर्शन घेण्या विषयींचा आग्रह पडून मज बरोबर रतलामास आले असल्यास आतां मला बरोबर स्मरत नाहीं. असो.

## उज्जनी

दोन प्रहर टळल्या वर इंदुराहून मुक्कामास आम्ही सेलोडास राहिलों, आणि तेथून क्षिप्रेच्या कांठीं विक्रम राजाच्या वेळीं वेताळानें प्रेतांची स्थापना केली तें बनवासातीर्थ आहे तें पाहून तिसरे दिवशीं उज्जेनीस पोंहचलों. उज्जनी ही जगप्रख्यात पूर्वी विक्रम राजाची राजधानी होती. आतां हें शहर मोडकळीस येऊन शिंद्यांच्या ताब्यांत आहे. शिंद्या कडून एथें सुभा राहतो व हत्तींपागा असते. एथें बारा ज्योतिर्लिंगांतलें प्रसिद्ध महाकाळेश्वराचें[1] देवालय आहे. तेथें नेहमी लोक यात्रेस येत असतात. गोसावी बैरागी तर भांगभुर्की घेऊन धुंद होऊन देवालया पाशीं सदा पडलेलेच असतात. एथें दक्षणी ब्राह्मण, देशस्थ व कोंकणस्थ गृहस्थ व भिक्षुक यांची मोठी वस्ती आहे. व एथें आसपास सर्व अफिणीचा धंदा चालतो. म्हणोन मारवाडी व गुजर यांची पेठेंत मोठमोठीं दुकानें व पेढ्या आहेत. इंदुरांत अफिणीच्या व्यापाराची घडामोड मोठी. तेथून बडे साहेबाच्या परवान्या शिवाय माळव्यांतून बाहेर अफीण नेण्याचा इंग्रज सरकारचा हुकूम नाहीं. म्हणोन परवाने देण्याचें काम एथील साहेबाच्या कचेरींत नेहमी चालतें. इंदुरच्या खालोखाल रतलाम व उज्जनी हीं दोन मोठीं गांवें. या शिवाय देपाळपूर, धार, आमझेरा, भोपावड, जावरा, वगैरे पुष्कळ ठिकाणें आहेत. आम्ही गेलों तेव्हां माळव्यांत नुकतीच अफिणीचीं शेतें पेरून लहान लहान रोंप वर आले होते. शिंद्याचा घाट चढल्या वर पुढें जेथें तेथें हीं अफिणीचीं शेतें दृष्टीस पडूं लागलीं. या शेतांची पहाण्याची मौज माघ फाल्गुनांत. ते हां सर्वत्र याचीं लाल, पिवळीं, सफेद अशीं फुलें फुलून सर्वत्र एक मोठा रंगांत गालीच्याच दिसूं लागतो.

---

१ विशेष माहितीकरितां पहा क्षेत्र अवंतिका अर्थात् उज्जयिनी मार्गदर्शिका:— प्र. के. ब. डोंगरे, १९३१, पृ. १७० पहा. बारा ज्योतिर्लिंगें:—१ सोमनाथ, (काठेवाड), २ मल्लिकार्जुन (श्रीशैल, मोंगलाई), ३ महाकाळेश्वर (उज्जनी), ४ ओंकार अमरेश्वर (नर्मदातीरी), ५ वैजनाथ (परळी), ६ भीमाशंकर (भीमानदीच्या उगमाजवळ), ७ नागनाथ (औंढा, मोंगलाई), ८ विश्वेश्वर (काशी), ९ त्र्यंबकेश्वर (नाशिक), १० केदारेश्वर (हिमालय), ११ घृष्णेश्वर (वेरूळ), १२ रामेश्वर (मद्रास).

## नवलई

उज्जनी सोडल्या वर आतां बरावर मला स्मरत नाहीं, किं कोणत्या गांवीं आमचे मुक़ाम झाले. परंतु नायला किंवा नवलई हा मध्यें मोठा गांव आहे एथें तर खास झालाच असावा. या गांवांस दिवसास देपाळपूर असें म्हणतात, आणि संध्याकाळचे दिवे लागले म्हणजे तेव्हांपासून पहांटे पर्यंत नवलई असें कोणी औलियाच्या सांगण्या वरून एथें लोक या गांवांस दोन नांवें देतात. ही गोष्ट मला एथें पहिल्यानेंच आढळली, किं एकाच गांवास दिवसास एक नांव आणि रात्रीं दुसरें. एथें एकरात्र मुकाम करून दुसरे दिवशीं रणेजी, डंडोरिआ, दरार हे गांव टाकित व मुकाम करित तिसरे दिवशीं रतलामास पोंहचलों. इंदुरापासून आह्मांस मारवाड्यांच्या पेढ्यांचीं मुकामास उतरण्या करतां जागोजाग शिफारसपत्रें मिळत असत. या प्रमाणें एथें सुंदर चांदणीचौक आहे व ती मोठी पेठच आहे. त्या पेठेंत एका दुकानीं आह्मांस उतरायास चांगली जागा मिळाली तेथें आह्मीं उतरलों.

## रतलाम

रतलाम ही बरीच मोठी शहरा प्रमाणें वस्ती आहे व हें एका रजपूत राजाचे गादीचें ठिकाण आहे. या मुळें व एथें एक अफीण तोलण्या करतां कोठी आहे तींत वडेसाहेबां कडून एक इंग्लिश ऑफिसर असतो. आह्मीं गेलों तेव्हां हें तोलण्याचें काम एथें जारी होतें, या मुळें हें शहर आह्मांस चांगलें सुशोभित दिसलें. एथें ज्या मारवाडी साहुकारा वर शिफारसपत्र होतें त्याणें आमची चांगली बरदास्त ठेविली आणि एथील राजाशीं भेटही करविली. राजा जवान मनुष्य होता. त्याणें मुंबईचीं आह्मां सारख्या पोशाकाचीं माणसें मला वाटलें थोडींच पाहिलीं असावीं. ते आह्मांशीं रांगडी भाषेंतच पुसूं लागले, "ते कठेथी आईत्रा, थारो नाम कई, थांकी तबेत ठीक है."[1] अशा प्रकारें ते पुसूं लागले त्याचीं आह्मीं नम्रतेनें उत्तरें दिलीं. नंतर त्याणें पुसलें, "जावराराा नबाब अँग्रेजी भणवा चाहे छे हे ठीक छे. तें जाओ तेने भणाओ."[2] मग आह्मांस अत्तर गुलाब, पानसुपारी दिली. आह्मीं मुजरा करून त्यांचा निरोप घेतला. चांदणीचौक फिरून पाहिला, आणि

---

१ "तुह्मीं कुठून आलां ? तुमचें नांव काय ? तुमची प्रकृति ठीक आहे ना ?"

२ "जावऱ्याचा नबाब इंग्रजी शिकूं इच्छितो हें ठीक आहे. तेथें जा त्याला शिकवा."

बिन्हाडीं आलों. आतां इंदुराहून नसेल झाला तर एथून तरीं राजेश्री नानाचा वियोग झालाच असावा. ते एथून झाबुव्यास आपले खटल्या[1] सुद्धां निघोन गेले, आणि मीं, लक्ष्मणमामा, ब्राह्मण, गडी व गोविंदा शिपाई असे आह्मीं दुसरे दिवशीं पहांटेस एथील बैलाचा खटारा करून त्यांत सवार होऊन दोन प्रहर ढळल्या वर जावऱ्यास दाखल झालों. मध्यें सलाण्यास मुक्काम करून दुसरे दिवशीं जावऱ्यास गेलों किंवा एका झपाट्यानें रतलामहून जावरा दहा कोश आहे तेथ पर्यंत एकदम मजल खेटली[2] याचें आतां मला पक्कें स्मरण नाहीं. परंतु बहुतकरून आह्मीं एका झपाट्यानें गेलों असें मला वाटतें. एथें मज कडून थोडी चूक झाली. आह्मीं एथें असल्याचें वर्तमान नवाबाच्या मुख्य कामदारास कळविलें नाहीं. नाहीं तर तेथून आमच्या स्वारी करतां व खबरदारी करतां बंदोबस्त झालाच असता. परंतु तेथें कोणी परिचयाचें नसल्या मुळें मीं आपल्या संकोचबुद्धीनें तसा बंदोबस्त करण्या विषयीं कोणास कळविलें सुद्धां नाहीं. अकस्मात् लक्ष्मण शेट यांच्या दुकानीं जाऊन पोंहचलों.

★

१ कुटुंब व परिवार.

२ झपाट्यानें मुक्काम गांठला.

१८

# जाने० १८३७ पासून जावऱ्यास राहिलों तो वृत्तांत

## नवाब गौस महम्मदखान यांचे मुख्य कामगार शेख अली आझम यांची भेट

मीं जावऱ्यांत येऊन पोंहचल्याचें वर्तमान नवाबसाहेबांचे मुख्य कामगार शेख अली आझम यांस लछमन शेटजी कडून कळतांच ते तामझानांत[१] सवार होऊन लगलेच शेटजींच्या दुकानीं मला भेटायास आले. ते येतांच मीं उठून पुढें त्यांस दोनचार पावलें सामोरा गेलों. मग हातीं धरून उभयतां भेटलों. शेखजीचें वय पांसष्ट सत्तर वर्षांचें असावें किंवा थोडें अधिकहि असावें. त्यांस दम कोंडल्याचा उपद्रव असल्या कारणानें त्यांच्या बरावर त्यांचो पोकदाणी असे. मग एकमेकांची आरोग्यता पुसल्या वर शेखजी मला म्हणाले, "पंडतजी (एथें माळव्यांत व पुढें हिंदुस्थानांत अशा आमच्या पोशाकाच्या दक्षणी लोकांस पंडत म्हणायाचा चाल आहे.) आपकी उमर तो बहोतहि[२] छोटी नजर आती है." म्यां म्हटलें "अब मुझे तेईसवां बरस चलता है ए कुछ बहोत छोटी उमर नहीं है." मग मीं म्हणालों, "हम तो आपके लडकेहि हैं इस्मे कुछ शक[३] नहीं." माझ्या बोलण्या वरूनच त्यांणीं अटकळ केली किं मला फारशी येत असावें. असें समजल्या वर ते व त्यांज बराबरची दुसरी मंडळी खुष झाली. मग शेखजी म्हणाले,"हमारे नव्वाबसाहेब आपको देखके बहोतही खुष होंगे, आजतक उनके तैं पढानेके वास्ते जो मौलवी थे वोह पुख्त उमरके झईफ[४] आदमी थे. इसलिये हमारे नवाब साहेब उनको बहोत डरते थे अब वोह डर उनके दिलसे जता रेहेगा, और आपके पास बडी खुशीसें पढेंगे. हमारे नवाब साहेबभि छोटी उमरके लडके हैं. लेकिन बडे चालाक और झहीन[५] है. मै अब जाके

[१] एक ल्हान बग्गीच्या आसनासारखी पुढें मागें दोन दांड्यांची पालखी असत्ये. तिला चढवायाचें पाडायाचें धमणें असतें.

१ मूळांत 'तामझामांत' आहे.

२ मूळांत सर्वत्र 'बोहतइ' आहे.

३ शंका ४ वृद्ध.

५ बुद्धिमान

उनको सब आपकी खबर देतां हूं. और कल फजरको आपके मुलाकातकाभि इन्तिझाम[1] करतां हूं." असें म्हणून लछमन शेटजीं कडून आमच्या बिऱ्हाडाचा चांगला सोईवार बंदोबस्त करवून ते रुख्सत[2] झाले.

## नवाब गौस महम्मद खानसाहेब यांची पहिली भेट

दुसरे दिवशीं सुमारें आठ वाजतां नवाबसाहेबांनीं आपलें दरबार भरविलें आणि तेथें पहिल्यानें खडे ताजीमेनें माझी भेट घेतली. मला आपल्या उजवे कडेस बसविलें. मागें मुख्य कामगार शेख अली आझम व त्यांचे दुय्यम कामगार त्यांचेच कनिष्ठ बंधु शेख अली अकबर. (आतां मला पक्की आठवण होत नाहीं कीं त्यांचें नांव शेख अली अकबर किंवा शेख अली अक्रम होतें,) आपल्या बंधूच्या वार्धक्या मुळें आतां हेच शेख मुख्यत्वें कारभार करित होते. व त्यांच्या कचेरींतील मुत्सुद्दी मंडळीहि हाजर होती. शिवाय नवाबसाहेबांचे कांहीं नातलग व मानकरी व शिलेदारहि हाजर होते. नवाबसाहेब खडी ताजीम देण्यास उठतांच तमाम दरबारांतले लोक उठले. मग आह्मीं सर्व बसल्या वर नवाबसाहेबांनीं मला माझें नांव पुसून खैरे आफियत[3] पुसली. नवाब सुमारें चौदा[4]

---

१ व्यवस्था.

२ (अर.) रजा. परवानगी घेऊन गेले. या शब्दाचा वर्णविपर्यय (Metathesis) करून रुसकत किंवा रुखत असेंही म्हणत.

३ (अरबी–खैरीयत) खुशाली.

४ ता. २० १८३७ रोजीं दादोबांनीं मि. हेंडरसन यांना पाठविलेल्या एका पत्रांत पुढील मजकूर आहे:—

"Jawra is the capital of a small principality yielding at present a revenue of about nine lacs of rupees per annum. It was founded by Guffoor Khan Puthan, a relation and cooperator with the celebrated Ameer Khan, in the service of Yashwant Raw Holkar......Here are no Maratha people excepting four or five individuals of the Brahmin caste, who are generally distinguished by the name of Pundits But they are so amalgamated with the Rangda people here, that they seem to have forgotten some of the peculiarities of their original

पंधरा वर्षांच्या वयांत असून फार देखणे मुलगे होते. भंवया दाट कमाणदार, डोळे चंचल, आणि केतकीच्या वर्णा सारखा त्यांचा वर्ण गौरा होता. मलाहि त्यांचा तो चंचलपणा व खुबसुरत पाहून आनंद वाटला. कारण चंचल मुलगे बहुतकरून बुद्धिवान् असतात. मग शेखजींशीं व नवाबसाहेबांशीं कांहीं इकडल्या तिकडल्या गोष्टी होऊन दोन तीन दिवसांच्या आंत नवाबसाहेबांचा मज पाशीं नित्य पढण्याचा दिवस मुकर झाल्या वर मीं रुखसत मागितली. आणि बिऱ्हाडीं गेलों. मज बराबर नवाबसाहेबांस व त्यांच्या दरबारी लोकांस पाहण्या करितां आमच्या सासूबाईंचे मामा लक्ष्मण दादाजी व गोविंद मोरे व शिपाई होते.

## पहांटेचें गाणें

आमचें बिऱ्हाड पेठेंत लछमन शेटजींच्या दुकाना शेजारीं होतें. मीं नित्य मोठ्या प्रातःकाळीं बिछान्या वर असतां तेथें एक मथुरावृंदावना कडील भिकारी भिक्षेचे फेरीस फिरत असे तो—

'अब न दुहावूं ऐसी गय्यां ॥ ध्रु० ॥
जमुनाके नीर तिर गय्या चरावे—**'

असें गाणें म्हणत असे. तो त्याच्या गाण्याचा सूर ऐकिला म्हणजे मीं जागा होत असें.

## हरकारा व मशाल यांची तैनात

नवाबसाहेबां कडून माझ्या तैनातीस एक एक लाल गोंड्यांचा हरकारा[१] व एक मशालजी यांची नेमणूक झाली. आपल्या एथें जसें पट्टेवाले तसे एथें चिटीचपाटो नेण्यास व स्वारी बराबर फिरण्यास हरकारे असतात. व रात्री दिवाबत्ती करण्यास व स्वारी बराबर फिरण्यास मशालजी असतात. त्यास कचेरींतून तेल मिळत असे.

---

stock....The Nabob of this place is a youth of about fourteen years of age, possessing an elegant form and pleasing countenance united with a good degree of intelligence. He is just at his rudiments of reading and writing: for the latter he appears to be partial". (O. C. S. Oct. 1837, p. 467).

१ दूत.

आमच्या हरकाऱ्याचें नांव ओंकार आणि मशालजीचें अदेभान (उदरभरतु[1]) असें होतें.

## माझ्या स्वारी करतां चार घोड्यांची वर्दी

मीं बिऱ्हाडीं राहत होतों तें ठिकाण नवाबसाहेबांच्या महालापासून अगदीं जवळ होतें. तरीं पण सकाळ संध्याकाळीं रपेटीस जाण्या करतां नवाबसाहेबांनीं चार घोडे मुकरर केले होते; त्यांतून ज्या दिवशीं जो जो घोडा माझ्या मर्जीस येईल त्याची वर्दी दिली असतां तो तो माझ्या बिऱ्हाडा समोर हाजर होईल [असें त्यांनीं सांगितलें.] मला घोड्या वर बसण्याचा फारसा अभ्यास नव्हता. म्हणोन मीं पहिल्यानें अगदीं गरीब घोडा होता त्याज वर कांहीं दिवस बसण्याचा राबता ठेविला. घोड्याचा सईस[2] घोड्या बराबरच धांवत असे. परंतु पुढें जसेजसें माझें आसन जमूं लागलें तसतसा मीं बलिष्ट व चढत्या चालीच्या घोड्या वर सवारी करण्याचा राबता[3] ठेवित गेलों. या प्रमाणें तीनचार महिन्यांच्या आंत मीं बराच फेरफटका करूं लागलों आणि माझें आसन चांगलें जमत चाललें व घोडे चार पायीं फेकूं लागलों. कधींकधीं माझ्या बराबर शेख अली अकबरही रपेटीस येत असत. व कधीं खुद्द नवाबसाहेब.

## हत्तींची सवारी

नवाबसाहेबांचे जावऱ्यांत पांच हत्ती असत व महालीं एक दोन असत. मीं प्रथमतः हत्ती वर बसलों तो या जावऱ्यांत. कधीं चिंडी चढून नुसत्या झुली वर बसावें व कधीं हौद्यांत. कधीं नवाबसाहेब मला स्वतः हत्ती वर घेऊन बसत. परंतु मला हत्तीची सवारी पसंत नसे. एकादे समयीं कांहीं मेळा किंवा गांवांत कांहीं पाहायाचें असे तेव्हांच मीं हत्ती वर बसें, नेहमी घोड्या वरच सवारी करित असें.

## नवाबास नित्य पढविण्याचा वेळ व पहिल्यानें काय पढविलें

नवाबसाहेबांच्या व माझ्या विचारानें असें ठरलें कीं दोन प्रहरीं त्यांचें व माझें भोजन झाल्या वर मीं त्यांच्या पुढील दालनाच्या माडी वर यावें. तेथें त्यांहीं पढण्याची जागा तयार केली. बहुतकरून ते आपल्या गादी वरच बसून सबक

१ उदयभानु असें मूळ नांव असावें. मशालजी हा निशाभानुच नव्हे का?

२ (अर. साईस) मोतद्दार.

३ (अर.) मेहनत.

( म्हणजे धडे ) घेत आणि मला देत असत. जवळ एक लहानसें मेज असे त्या वर अक्षर वळवीत. मीं गेलों तेव्हां त्यांस नुसती इंग्लिश मूळाक्षरांची ओळख मात्र झाली होती. परंतु पुढें लौकरच एक दोन तीन अक्षरांची जुळणी करून वाचूं लागले. व दोनतीन महिन्यांत लहान लहान वाक्येंही वाचूं लागले. इतकें थोडें त्यांस वाचतां आल्या वर मीं त्यांस उर्दू भाषेंत शब्दांचे अर्थ हे सांगूं लागलों. व त्यांच्या हातानें ते शब्द व त्यांचे अर्थ त्यांज कडून लिहवूं लागलों. श्रीमंत दौलतीचे धनी, त्यांच्यानें काय इतर मुलां प्रमाणें मेहनत घेऊन अभ्यास करण्याचें होतें? त्यांच्या मर्जी प्रमाणें व छंदा प्रमाणें त्यांस शिकवावें लागे. " पंडतजी, आज तो हमारे सिरमें दर्द [1] होता है " " आज हमारी तबियत ठीक नहीं है. " आज हमारे नाना [2] आये हैं उनसे मिलना है " असे आठां दिवसांतून एकदोन बहाने [3] सहज निघायाचे. मग आह्मीं परत बिऱ्हाडीं जावें. त्यांस वाचण्या पेक्षां अक्षरें लिहिण्याचें अधिक आवडत असे व त्यांचें फारशी अक्षर फार चांगलें वळणदार आलें होतें. मीं जेव्हां कधीं कधीं मौजेनें त्यांशीं फारशी बोलें तेव्हां त्यांस मोठें आश्चर्य वाटे. ते म्हणत, " पंडतजी, आप तो इरानी लोगोंके मवाफिक [4] गुफ्तगू [5] करते हो, ऐसा तलफ्फुजा [6] आपके तै किस्ने सिखाया? " म्यां म्हटलें, " हमारे बंबईमें बहुत इरानी सौदागर रेहतें हैं. उनोके साथ बोलनेका मुझे थोडा महावरा [7] है. " असा त्यांचा अभ्यास चालत असे.

## MAJOR WILLIAM BORTHWICK

मीं जावऱ्यास गेल्या वर सुमारें एका महिन्याच्या आंत Major William Borthwick, Polt. Agent of Mehidpore यांची स्वारी तेथें आली; त्यांस भेटायास पहिल्यानें नवाबसाहेब व त्यांचे कामदार गेले. नंतर दोन प्रहरच्या सुमारास मींहि त्यांच्या भेटीस गेलों. त्यांणीं माझें चांगलें आगतस्वागत करून मला बसविलें आणि थोडकी इकडली तिकडली हकीगत पुसून नवाबसाहेबांचे अभ्यासा

१ ( फा. ) पीडा.
२ आजोबा, मातामह.
३ ( फा. ) सबबी.
४ ( अरबी ) सारखें.
५ संभाषण.
६ उच्चार.
७ सराव.

विषयीं पुसलें. म्यां त्यांस पूर्वी लिहून कळविलें होतें, किं नवाबसाहेब हुशार व चंचल बुद्धीचे आहेत. तसें आतांहि सांगून इतर मुलां प्रमाणें यांच्या पासून श्रमानें अभ्यास घ्यावयाचा नाहीं, त्यांच्याच मर्जी प्रमाणें त्यांजपासून अभ्यास घेतला पाहिजे असें त्यांस सांगितलें. त्यांणींही तसाच आपला अभिप्राय कळविला. नंतर त्यांणीं तेथें बंगल्यांत असलेली आपली Library म्हणजे पुस्तकसंग्रह दाखविला. तो संग्रह बराच मोठा होता. त्यांत Edinburgh Cyclopædia याचींही पुस्तकें होतीं. नंतर साहेब मोठ्या खुशीनें म्हणाले, "तुह्मीं आपल्या फुर्सतीच्या वेळीं एथें येऊन पाहिजे तें पुस्तक घेऊन वाचावें, व पाहिजे असल्यास आपल्या बिऱ्हाडींहि वाचायास न्यावें. मीं एथील माळ्यास ताकीद देईन, किं तुह्मीं जेव्हां याल तेव्हां तुह्मां करतां बंगला उघडून द्यावा." मीं त्यांचे मोठे आभार मानिले आणि या अशा देशांत, जेथें इंग्रजी भाषेचा गंधसुद्धां कोणास माहीत नाहीं. त्या देशांत इतका मोठा आपला कुतुबखाना[1] (Library) साहेबांनीं मला वापरायास दिला हा त्यांचा मज वर मोठाच उपकार मीं समजलों; कारण आतां मला आनंद झाला किं वाचण्याचा व्यासंग राहून उपयुक्त कर्मणूक होण्यास मार्ग खुला झाला.

हे मेजर बार्थविकसाहेब कांहींसे विलासी पुरुष होते. जरीं ते त्या काळीं माझ्या अजमासानें सुमारें पंचावनसाठ वर्षांच्या वयाचे होते, तरीं त्यांच्या पूर्वींचा ठेवलेला मोठा जनानखाना त्यांज बराबर असे. हे असे विलासी पुरुष बहुतकरून उदार मनाचे असतात हा माझा अनुभव मीं पूर्वींच एका ठिकाणीं धुळ्याच्या वर्णनांत सांगितला आहे.[2]

हे Major Borthwick साहेब, होळकराची व इंग्लिशांची झटापटी मेहदपुरा जवळ स. १८१४ च्या सालीं झाली, त्या झटापटींत हे लेफ्टेनंट होते म्हणून Sir John Malcolm यांहीं आपल्या Memoirs of Central India या ग्रंथांत लिहिलें आहे.[3] त्या गोष्टीस आतां वीस पंचवीस वर्षें होऊन गेलीं. पुढें त्यांस

---

१ (अर. किताब) ग्रंथ. अनेकवचन कुतुब.

२ मागें पृ. ९४ पहा.

३ मेहदपूराजवळची ही लढाई ता. २१ डिसें. १८१७ रोजीं झाली. (A Memoir of Central India by Sir John Malcolm, vol. I, 1823 p. 317) यावेळीं इंग्रज सेनापति सर थॉमस हिस्लॉप होता. बॉर्थविकचें नांव या लढाईशीं संलग्न असलेलें वरील ग्रंथांत मला सांपडलें नाहीं.

याच प्रांतीं मेहदपूरचे Political Agent नेमून जावरा, रजलास, सलाणा, सीता महेनांसवाडा, जानुआ व आणखी लहान लहान संस्थानें यां वर त्यांहीं देखरेख करावी असें सरकारनें ठरविलें. ते आज पावेतों त्या प्रांतांत तेंच काम पाहत होते. त्या वरून त्या प्रांतीं आबालवृद्धांस बोतल ( Borthwick ) हें नांव त्या काळीं माहीत नव्हतें असा मला एकही मनुष्य सांपडला नसता. आणि मीं पाहिलें तर Major Borthwick यांचीही या प्रांता वर जशी बापाची मुला वर तशी ममता जडून गेली होती.

## बार्थविक साहेबांची लायब्ररी

मेजर बार्थविक यांच्या कुतुबखान्यानें तर माझी मोठीच सोई आणि कर्मणूक केली. ज्या या सर्व प्रांतांत एकहि इंग्रेजी शब्द ऐकायास येत नसे, त्या प्रांतांत एवढ्या मोठ्या ईंग्लिश पुस्तकांच्या कुतुबखान्यांतून मला पाहिजे तें पुस्तक वाचण्याची परवानगी दिली ही त्या साहेबांनीं कांहीं माझी लहान सोई केली नाहीं; हा त्यांचा मज वर मोठाच उपकार झाला. पुढें जावरा सोडून मेजर बार्थविक प्रांतांत फिरायास गेले.

थोडक्याच दिवसांनीं मला त्या पुस्तकखान्यांत Hutton's Mathematical Recreations[१] म्हणजे गणितशास्त्रांतल्या कर्मणुकी, या नांवाचा पूर्वी कधींच म्यां पाहिला नव्हता असा एक ग्रंथ सांपडला. त्याणें खरीच माझी मोठी कर्मणूक करून मला लाभही करून दिला. त्यांत आपल्या भास्कराचार्यांच्या लीलावती प्रमाणें पुष्कळ चमत्कारिक तोटकें होतीं. त्यांतून एक असें होतें कीं, कोणा तीन माणसां पुढें कोणत्या तरी तीन वस्तु ठेवाव्या आणि त्यांस सांगावें: "माझ्या नकळत तुह्मीं एकएकांनीं पाहिजे ती वस्तु घेऊन लपवून ठेवावी, आणि मीं तुह्मां जवळ आल्या वर तुह्मांस एक दोन प्रश्न करीन त्यांचीं तुह्मीं एकएकानें मला उत्तरें द्यावीं म्हणजे मीं तुह्मांतून कोणी काय वस्त घेतली आहे ती सांगेन." अशीं दोनचार

१ Recreations in Mathematics and Natural Philosophy (4 vols.) 1814 (एल्फिन्स्टन कॉलेज लायब्ररी) M. Ozanam व M. Montucla यांच्या ग्रंथाचें Charles Hutton यानें केलेलें इंग्रजी भाषांतर.

चमत्कारिक तोटकें मीं[१] चांगली शिकून ठेविलीं. त्यांत एक Elegant Epistles[२] म्हणजे सुंदर पत्रें, असा एक ग्रंथ होता. तो मीं बहुतकरून सारा घरीं आणून वाचला. त्या वरून मला आणखी नवी गोष्ट समजली ती ही कीं, रोमन लोकांच्या उंच पदवीच्या सरदार लोकांच्या बायका आपल्या नवऱ्यांस किती प्रीतीचीं सुंदर पत्रें लिहित होत्या. असे Major Borthwick चे ग्रंथ वाचित असतां, व नवाबसाहेबांस अकरा बारा वरापासून तर तीनचार वरा पर्यंत इंग्लिश वाचायास त्याहायास शिकवित असतां, व केव्हां केव्हां संध्याकाळीं त्यांज बराबर कधीं बगींत व केव्हां केव्हां घोड्या वर त्यांहीं आपल्या बराबर फिरण्याचा आग्रह केल्या वर रपेट करित असतां, पुढें होळीचे दिवस जवळ आल्या वर माझे मित्र राजेश्री नाना नारायण यांणीं मला आपल्या बराबर होळीचा सण करावा, म्हणजे त्या योगानें झाबुवा हें संस्थान पाहण्यांत येईल आणि सण केल्या सारखेंही होईल, त्यांचे विद्यार्थी राजेसाहेब यांचीहि मला पाहण्याची फार इच्छा आहे, आणि मेजर साहेबहि होळी करतां झाबुव्यास येणार आहेत, असें पत्र पाठविल्या वरून माझ्याहि मनांत आलें कीं झाबुव्यास जावें. म्हणोन म्यां मेजर साहेबांस हा मजकूर कळविला. आणि आपली परवानगी असल्यास मीं होळीच्या सणांत झाबुव्यास जाईन म्हणोन त्यास लिहितां त्याणें लागलेंच मोठ्या खुशीनें अनुमोदन दिलें आणखी मला असें सुचविलें, कि " मींही झाबुव्यास तथेंच जाणार आहें या करितां तूं तथें जरूर ये. " मग नवाबसाहेबानें मला म्याना व बराबर सवार दिले आणि पौर्णिमेच्या सुमारास तथें सावकाश पोहोंचेन अशा बेतानें जावऱ्याहून निघालों.

★

१ कृष्णअ.

२ A Copious Collection of Familiar and Amusing Letters. या ग्रंथाची १८०७ मधली आवृत्ति [illegible] पीपल्स फ्री लायब्ररीमध्ये आहे.

## १९ माळव्यांतील होळीकरितां माझें झाबुव्यास जाणें

जावऱ्याहून झाबुवा पांचसहा मजलीची वाट आहे. झाडींतून व भिल्ल, कोळी, लंगडे यांच्या वस्तींतून जावयाचें; परंतु आतां तेथें तिलप्राय मार्गाचें भय राहिलें नाहीं. मेहदपूरची लढाई झाल्या वर एथें ठिकाणीं ठिकाणीं व लहानमोठ्या संस्थानिकांस मोठी खुशी झाली. लुटालुटीचें भय गेलें आणि जेथें तेथें सर्व प्रजेस सुख वाटूं लागलें. जावऱ्यापासून झाबुव्यास जाण्यास चांगला राजमार्ग म्हटला म्हणजे रतलाम या गांवा वरून आहे. हीं मध्यें मोठीं पेठेंचीं गांवें आहेत. हीं सर्व गांवें सोडून पांचवे किंवा सहावे दिवशीं आह्मीं दोन प्रहरच्या सुमारास झाबुव्यास पोंहचलों. तेथें पोंहचतों तों मेजर बार्थविक साहेब यांस भिल्लभिल्लिणी व दुसरे रानटी लोक यांच्या पुरुषबायकांच्या चक्राकार मंडळांत टिपरीं खेळतांना पाहिलें. त्यांहीं मला पाहतांच त्यांच्या मनांत किंचित् संकोच वाटला. ते लागलेच मज जवळ येऊन त्यांहीं माझा हात धरिला आणि थोडें हांसून मला पुसूं लागले, कि "तुला या जंगली लोकांच्या मेळ्यांत असें मला त्यांज बराबर खेळतांना पाहून मोठें आश्चर्य वाटलें असेल." म्यां म्हटलें, "थोडें वाटलें खरें." मग तो म्हणाला "Yes, we must respect the prejudices of these wild people" ("या जंगली लोकांच्या विचारास आपल्यास मान दिला पाहिजे.") म्यां म्हटलें, "म्हणोनच मीं पाहतों तों या आपल्या सर्व प्रदेशांत आपल्यास सर्व आबालवृद्ध बापा प्रमाणें मानितात." असें त्यांचें आमचें तेथें थोडें भाषण झाल्या वर मीं रा. नाना मास्तर यांच्या बिऱ्हाडीं गेलों. आणि साहेब त्या लोकां बराबर पूर्वी प्रमाणें खेळूं लागले. म्यां मनांत म्हटलें, "धन्य हे इंग्लिश लोक व यांचें चातुर्य!" ज्या लोकांचा हे आमचे सरदार व बडे लोक तिरस्कार करित होते, व ज्यांस मोठा त्रास देत होते, त्यांचीं मनें हे या प्रमाणें आपल्या कडेस वळवूं लागले आहेत. असे हे मराठे व रजपूत करते तर या सर्व लोकां मध्यें सलूक[1] राहून देशांत किती बखेडे व तंटे बंद होऊन लोक थोडे चैनेंत राहते. अस्तु.

---

१ (अरबी–) सलोखा, स्नेह.

## मध्येंच माझें मेहदपुरास जाणें

एप्रिल महिन्याच्या सुमारास मला उगीच थोडा खोकला होऊन तोंडांतून कांहीं डिखळ्या पडूं लागल्या. त्या इतक्या कठीण होत्या कीं, पाण्यांत टाकिल्या असतां तळास जाऊन बसत. तितक्या वरून मीं फार घाबरलों आणि मेजर बार्थविक यांच्या पुस्तकखान्यांतून Edinburgh Encyclopædia या ग्रंथांत consumption हा विषय वाचला तेव्हां तर मला अतिशय भय वाटलें. मीं लागलेच मेजर साहेबांस लिहिलें कीं, आपण Mehidpore एथें इंग्लिश डाक्टर आहेत त्यांज वर चिठ्ठी द्यावी म्हणजे मीं तेथें जाऊन डाक्टर साहेबांस आपली प्रकृति दाखवून औषध घेतों. साहेबानें लागलीच चिठ्ठी दिली, आणि नवाबसाहेबाची रजा घेऊन मेहदपुरास गेलों. नवाबसाहेबानें आपला म्याना व सवार मज बराबर दिले. डाक्टर साहेबानें चिठ्ठी वाचली आणि मला पाहिलें आणि हंसून म्हणाले, "तुला कांहीं एक रोग नाहीं. अशा डिखळ्या पडूं लागल्या म्हणजे क्षय झाला हें तूं कोठें वाचलेंस?" मग ते म्हणाले, "आतां ज्या पेक्षां तूं एथ वर आला आहेस त्या पेक्षां दहा पंधरा दिवस मीं तुला कांहीं Tonic (हुशारी येण्याचें औषध) देतों तें घेऊन ऐस. आणि मग परत जावऱ्यास जा."

## झाबुव्याचे राजकुंवर

मीं झाबुव्यांत पांचसहा दिवस होळीचा सण रा. नाना बराबर करून राजेसाहेबांच्या मेजवान्या घेतल्या. दिवसास सिधे[1], आणि रात्रीस नाचतमाशे. नानानें हत्ती वर बसवून मला झाबुव्याची सारी वस्ती दाखविली.

हे राजकुंवर म्यां पाहिले त्या वेळेस म्हणजे सन १८१७ च्या मार्च महिन्याच्या सुमारास सुमारें १८ वर्षांच्या वयाचे असावेत. इतक्यांत त्यांस दोन बायका होत्या. रजपूत लोकांच्या संस्थानिकांस बायका मिळण्याची अगदीं अडचण नसते. कुलीन रजपुतांच्या वाढलेल्या मुलींचे बाप नवऱ्याच्या वया कडे व आपल्या मुलीचे सुखा कडे न पाहतां त्यांना मोठ्या आतुरतेनें अशा अल्पवयी राजकुंवारांस आपली प्रतिष्ठा वाढविण्या करतां देतात. या प्रमाणें आनंदानें पांचसहा दिवस मीं झाबुव्यास राहून राजेसाहेबांचा व रा. नाना यांचा निरोप घेऊन परत जावऱ्यास गेलों.

---

१ संभावित, सरळ. (हिं. सीधा, सं. सिद्ध ?)

## झाबुव्याचें कुल उत्पन्न

झाबुवा हें लहान संस्थान आहे. त्याचें कुल उत्पन्न त्या वेळीं सुमारें तीन लक्षांचे आंत होतें. एथले राजेसाहेब मला वाटतें राठोड जातीचे रजपूत असावे. हें संस्थान डोंगरी व जंगली वस्तींत आहे. जावऱ्यापासून दक्षिणेस व थोडे पश्चिमेस. एथून पश्चिमेस व दक्षिणेस गुजराथचा प्रांत आहे. एथून अहमदाबाद, बडोदें, राजपिंपळें,[1] छोटा उदेपूर हीं गुजराथेंतलीं संस्थानें.

## कन्या जन्मल्याचें वर्तमान.

मग तेथें माझा दहापंधरा दिवस मुकाम असतां माझ्या तीर्थरूपांचें व सासऱ्याचें पत्र टपालांतून आलें. त्यांत कुटुंब प्रसूत होऊन कन्या जन्मल्याचें आनंदाचें वर्तमान वाचलें. बाळंतीण व लेंकरूं चांगलीं सुरक्षित आहेत, लेंकरूं फार सुंदर आहे म्हणोन तीर्थरूपांनीं कळविलें. हें माझें पहिलेंच लेंकरूं म्हणोन कुटुंबाच्या बाळंतपणाची मला घर सोडल्यापासून काळजीच होती. ती आतां थोडी दूर झाली. त्या मुलीचें नांव कावेरीबाई[2] ठेवावें असें मीं वडिलांस सुचविल्या वर तिचें तेंच नांव ठेविलें.

## मेहदपूरची छावणी.

मेहदपूरची लढाई झाल्या वर इंग्लिशांनीं तेथेंच एक लहानशी छावणी केली; तेथें गफूरखान व मला वाटतें दुसऱ्या आसपासच्या लहान लहान संस्थानिकांचे रिसाल्याचे लोक राहत असत. तेथें गफूरखानाचा म्हणजे हालींचे जावऱ्याचे नवाब यांच्या तीर्थरूपांचा रिसाला मोठा होता. त्या रिसाल्या वर त्यांणीं आपल्या सासऱ्यास साहेबाच्या हाता खालीं मुख्य रिसालदार नेमिलें होतें. हे रिसालदार हालींच्या नवाबसाहेबांच्या आईचे बाप. मीं जावऱ्यास होतों तेव्हां हे वारंवार आपली लेक बेगमसाहेब यांच्या भेटीस येत, आणि महालांत असल्या मुळें त्यांची माझी भेट होत असे. बडेसाहेबानें नवाबसाहेबांस अंग्रेजी पढविण्या करितां आणविलेले वस्ताद म्हणोन [मला ते ओळखत.] मीं पाहिलें तेव्हां हे नवाबसाहेबांचे मामा सुमारें साठपांसष्ठ वर्षांचे किंबहुना थोडे अधिक उमरीचे लालबुंद मोंगला सारखे, दाढीमिशांस लाल कलफ केलेला आणि थोडे क्रूर असे दिसण्यांत असत. त्यांणीं आपल्या व मागल्या गडबडींत बऱ्याच लहानमोठ्या लढाया पाहिल्या असाव्या व समयास आपली

---

१ मूळांत राजपिंवळें असें आहे.

२ दादोबांनीं 'यशोदा पांडुरंगी' ही केकावलीवरील टीका हिलाच अर्पण केली आहे.



त. ८

पठाणी तलवारही गाजविली असावी. मी आपला लहानसा पंडतजी त्यांच्या फारसा हिसाबांत नसें. ते मला कधीं कधीं अंमळ डौलानें पुसत कीं,– " पंडतजी, तुम क्या हमारे नवाबसाहेबको पढाओगे, सब वाहय्यात[1] है, हम पठाण लोगोंको अंग्रेजी इल्म[2] क्या कामका ? खैर[3], बडेसाहेबकी मर्जी है तो पढाओ." यांचा माझी मेहदपुरांत गांठ पडली किंवा नाहीं याचें मला आतां स्मरण नाहीं.

## माळव्यांतली होळी व गुल्लाला.

माळव्यांत फाल्गुण महिना हा मोठा आनंदाचा महिना मला दिसून आला. जेथें तेथें चोहों कडेस अफिणीचीं शेतें लाल, पांढऱ्या व थोड्या पिंवळ्या फुलांनीं फुल्लेलीं दृष्टीस पडूं लागलीं. त्या मुळें सर्व प्रदेशास चोहों कडे जिकडे दृष्टि लावावी तिकडे फुललेल्या बागाचीच शोभा दृष्टीस पडत्ये. तीस गुल्लाला म्हणतात. त्या शेतांत बायकापुरुष माघ महिन्यापासून कामें करित असतात. कोणी पाणी शिंपतात. कोणी अफिणीचीं बोंडें पक्कीं होत आलीं म्हणजे एका लेखंडी तिधारी सुरीनें तीं चिरत असतात, कोणी नित्य सकाळ संध्याकाळीं त्या चिरांतून चीक आला म्हणजे तो खरवडून एका मातीच्या पानांत[4] सांठवून घेतात. तो चीक तीच अफीण. पुढें तो घरीं नेऊन त्याच्या वड्या बांधितात. अफिणीची कोंवळ्या पानांची भाजी करितात. ती भाकरी बरोबर खाण्यास बरी लागत्ये. म्यां पुष्कळदां खाल्ली आहे. परंतु थोडी गुंगी आणित्ये, म्हणोन लोक फारशी खात नाहींत.

अशी गुल्लालांची अपूर्व शोभा पाहत पाहत दर गांवांत लेंहगा नेसलेल्या व ओढणीनें आपलीं तोंडें झांकलेल्या बायका मंजुळ स्वरानें रांगडी भाषेंत गाणीं गात तीं ऐकत ऐकत व होळीच्या पुरुष व बायका जागोजाग होळीचा रंग खेळत तो त्यांचा आनंद पाहत पाहत पांचवे दिवशीं जावऱ्यास परत गेलों. एथली होळी, मला असें स्मरतें कीं, रंगपंचमीपासून पुढल्या फाल्गुण वद्य पौर्णिमे पर्यंत नित्य चालत असत्ये.[5] होळीच्या ठिकाणीं एथें एक नाथुराम या नांवाचा मोठा व अति बीभत्स

---

१ निरुपयोगी.

२ शिक्षण.

३ (फा.) ठीक ! बरें आहे !

४ पानाच्या आकाराचें पात्र; वाटी.

५ Memoir of Central India, Malcolm, (Part II, 1880, p. 160) या ग्रंथांत होळी संबंधीं माहिती आहे.

पुतळा करितात. त्या सभोंवतां मुलगे व पुरुष हातांत डफ घेऊन गात बसतात. मोठी बेह्या[१] बायको असेल ती या होळीच्या दिवसांत त्या नाथुरामा जवळून अथवा समोरून आपल्या कामधंद्यास तरी जाईल.

परंतु अशा लोकांच्या बायकाही पुरुषां प्रमाणें रंगीतल्याच[२] असतात. गांवांत फिरतांनां पुरुषांस पाहिलें म्हणजे सटकन् तोंडा वर घुंगुट[३] सारावा व त्यांतून एका डोळ्यानें सर्व हळूच पाहत असावें.

मीं झाबुव्याहून जावऱ्यास पोंहचलों तरीं लोक होळी खेळतच होते. व आमचे नवाबसाहेब व त्यांचे हिंदु व तरणे मुसलमान मुत्सद्दी व मंडळीचे लोक रंगानें भरलेले मज कडे येतांनां म्यां पाहिलें. त्यांहीं मला घरांतून शोधून काढून मीं न्हात होतों त्या शिळे वर नेऊन बसविलें आणि यथेच्छ मला रंगाचें स्नान घातलें. नवाब म्हणाले, " येह क्या पंडतजी, तुमारी होली और तुमारे अंगपर कुछभी रंग नहीं ", असें म्हणत हंसत हंसत मोठ्या मोठ्या मौजेनें माझ्या अंगा वर रंगाचे गडवे रिचविले आणि परत गेले. अशी माझी एथें जावऱ्यांत होळी झाली.

## Mr. Wilkinson, Political Agent at Sehore Bhopal.

मेस्तर विल्किन्सन, सीहोर ( भोपाळचे पोलिटिकल एजंट ) हे साहेब विद्येचे मोठे शोकी असत. यांचा व बाळ गंगाधर शास्त्री यांचा मीं मुंबईंत होतों तेव्हां कागदोपत्रीं मोठा स्नेह होता. त्यांचे आलेले कागदपत्र बाळ गंगाधर शास्त्री यांहीं मला केव्हां केव्हां दाखवावे. त्यांच्या पाशीं एक सुब्बाजी बापू म्हणोन तैलंग ज्योतिःशास्त्री असत. त्यांच्या हातून या साहेबानें Copernican System याचें मराठींत भाषांतर करवून प्रसिद्ध केलें.[४] एथील लोकांस खरें ज्ञान व्हावें ही त्या Wilkinson साहेबास

१ निलाजरी. [ फारसी–बे+अरबी–हया ( लाज ) ]

२ रंगेल, खेळकर. हा शब्द अन्यत्र योजलेला आढळला नाहीं.

३ ( हिं. ) बुरखा.

४ सिद्धांतशिरोमणिप्रकाश, ( लिथो प्रेस, प्रेरा. १८३६, पृ. १२९. ) या ग्रंथाच्या शेवटीं, "लान्सिलट् विल्किन्सन्साहबवर्येण श्रीमता प्रभुणा भूपालाजिंटेनाशप्तः कृतवां त्स रामचंद्र इमं," असा मजकुर आहे. पण हा ग्रंथ कोपर्निकन पद्धति या ग्रंथाचें केवळ भाषांतर नसून या पुस्तकाच्या आरंभींच म्हटल्याप्रमाणें "A Comparison of the Pooranic, Sidhantic and Copernican Systems of the world", आहे.

मोठीच आवड असे. या मुन्वाजी बापूस ते आपल्या पत्रांत 'माझा बापू माझा बापू' म्हणोन मोठ्या आवडीनें लिहित असत. माझी व नानाची नेमणूक तेथें नवाब व राजेसाहेब यांस अंग्रेजी पढविण्याचे कामीं झाल्याचें त्यांहीं ऐकल्या वर त्यांस मोठा आनंद झाला, आणि त्यांहीं मीं जावऱ्यास गेल्या वर माझ्याशीं पत्रव्यवहार ठेवण्यास आरंभ केला. हे साहेब इंग्लिश astronomy म्हणजे ज्योतिःशास्त्र व भास्कराचार्यांचे ग्रंथ चांगले जाणत होते. यांस म्यां कोणी संस्कृतांत प्रवीण शास्त्री यांच्या ओळखीचा असल्यास माझा स्नेह करून द्यावा म्हणोन मीं त्यांस लिहितांच त्यांहीं रावजी शास्त्री कळंबकर (हे मूळचे नाशकांत राहणारे हाल्लीं उज्जनींत सुखवस्तीनें राहत होते) त्यांस लिहून कळविल्या वर, त्यांहीं आपले चिरंजीव तात्या शास्त्री कळंबकर यांस मज पाशीं जावऱ्यास पाठविलें. या Wilkinson (विल्किन्सन) साहेबांस तेथले सारे लोक 'बालकिशन' असें हिंदु नांव देऊन म्हणत असत. यांची माझी कधींच भेट झाली नाहीं, तरी यांचा मज वर त्या काळीं फार लोभ होता.

★

२०

## मेहदपुराहून परत जावऱ्यास येणें

पुढें डाक्तराच्या सांगण्या वरून मेहदपुराहून मीं पंधरावीस दिवसांनीं जावऱ्यास परत आल्या वर तात्या शास्त्री कळंबकर आपल्या तीर्थरूपांचें पत्र घेऊन मला भेटायास जावऱ्यास आले. त्यांणीं तेथें मज पाशीं राहून सुमारें एक महिना पर्यंत बरीच कर्मणूक केली. सकाळीं व रात्रीस कांहीं सुभाषिताचे संस्कृत श्लोक म्हणावे. त्यांहीं आपल्या तीर्थरूपांचा नाशकांतला व उज्जनींतला मोठा लौकिक सांगितला. त्यांच्या तीर्थरूपांहीं संस्कृतांत ग्रंथही केले आहेत असेंही माझ्या ऐकण्यांत आलें होतें; ते जे मज जवळ श्लोक म्हणत यांतून एकदोन अद्यापि मला आठवतात; ते असे :—

सुभाषितेन गीतेन युवतीनां च लीलया ।
यस्य न द्रवते चित्तं स वै मुक्तोऽथवा पशुः[1] ॥ १ ॥
कः कौ के कं कौ कान् हसति च हसतो हसन्ति तन्वंग्याः[2] ॥ २ ॥
अधरः पल्लवमोष्ठौ विंबे नवकुंदकोरकान् दंताः[3] ॥ ३ ॥

व त्यांस गाण्याचें अंग बरेंच असून त्यांचा गळा फार मंजूळ होता, तेव्हां कधीं कधीं सुंदर लावण्याही त्यांहीं मला ऐकवाव्या. मला तशा सरस लावण्या असल्या तर ऐकण्याची मोठी हौस असे. बीभत्सरस मात्र थोडा जरीं असला तरीं तो ऐकण्यास मन फार कंटाळा घेत असे. परंतु नीतिपर प्रीतीचीं भाषणें असलीं तर तीं ऐकण्यांत मला बरें वाटत असे. रामजोशी, सगनभाऊ, आनंदफंदी, होनाजी बाळा यांचीं कवनें मला आवडत असत. त्यांत होनाजी बाळा पुष्कळ ठिकाणीं घसरून जाई. खालीं लिहिलेल्या श्लोकांत श्रृंगाररसाचीं पदें कशीं गुप्त असावीं या विषयीं कोणी श्रृंगारी कवीनें श्रृंगारानेंच सुंदर वर्णिलें आहे :—

---

१ (पाठभेद) मनो न भिद्यते यस्य स योगी ह्यथवा पशुः । — सुभषितरत्नभांडागारम् का. पां. परब. (७ आ.) १९३५. पृ. २९

२ (पा. भे.) हरिणाक्ष्याः (*Ibid*—तत्रैव) पृ. १९६–७

३ (पा. भे.) अधरपल्लवमङ्घ्री हंसौ कुंदस्य कोरकान् दन्ताः " (तत्रैव)

नो गुर्जरीस्तन इवातितरां निगूढो
नांध्रीपयोधर इवातितरां प्रकाशः।
अर्थो गिरामपिहितः पिहितश्च किंचित्[४]
सौभाग्यमेति मरहट्टवधूकुचाभः।

होनाजी बाळा तर वरील श्लोकांतल्या दुसऱ्या चरणांत दाखविल्या दृष्टांता प्रमाणें आपले सर्व शृंगाररस सुज्ञ ऐकणारास कंटाळा येई इतके प्रकाशित करी. म्हणोन त्याचें कवन जें निंद्य मानिलें आहे तें योग्य आहे. परंतु तो दांडग्या रुचीच्या लोकांचा रावबाजीच्या आखेरीच्या कारकीर्दीतला कवि. तथापि मला त्याची कोठें कोठें शब्दांची ठेवण फार सरस वाटते. व लावण्यांचे नवे नवे छंद व धाटणी कानास फारच गोड [·लागते.] हे नवे नवे छंद व तऱ्हतऱ्हेच्या धाटण्या हे मराठी कवि कोठून व कसे काढित असत याचें मला मोठें आश्चर्यच आहे, व या विषयीं त्यांची सरस कल्पना रसिक जनांच्या स्तुतीस योग्य होय. जसें इतली (Italy) व जर्मनी (Germany) एथें होगार्थ[५] (Hogarth) आदिकरून अपूर्व गायनाचे कल्पक होऊन गेले, त्याच मासल्याची यांची स्तुत्य कल्पना होय. यांत होनाजी बाळा आदिकरून गरीब मराठी कवि यांज वरच मीं आपला टपका ठेवावा हें ठीक नाहीं. या पेक्षांही बीभत्स कवि संस्कृत भाषेंत पाहिजे तितके सांपडतील.

## माळव्यांतील ज्येष्ठागौरीचें मिरवणें.

या प्रमाणें तात्याशास्त्री कळंबकर यांच्या सोबतींत माझी सुमारें एक महिना भर कर्मणूक होऊन ज्येष्ठ आखेरीस म्यां त्यांची यथाशक्ति बिदागी केली. ज्येष्ठाच्या आरंभीं म्हणजे मृगाच्या पाउसाचे [वेळीं] नवे पाउसाचे शितोडे पडूं लागतात, आणि माळव्यांतील दिवसाची मोठी गरमा मिटून थोडासा थंडावा लागतो, आणि माळव्यांतल्या बायका सूर्यअस्तमानाच्या वेळेस जथ्याजथ्यानें एकीच्या माथ्या वर गौरीची बाहुली देऊन 'आगोरी पाणी पी,' 'आगोरी पाणी पी' असें गाणें गात गात नदी वर

४. (पा. भे.) कश्चित् : या श्लोकाचे चरणही १-४-२-१ अशा क्रमानें आहेत. (सुभाषितरत्नभांडागारम्) पृ. ११.

५ George Hogarth (१७८१-१८७०) जन्म एडिंबरो येथें. वाङ्मयविषयांत सर वॉल्टर स्कॉटचा सहकारी. गायनवादन विषयाचा मर्मीक्षक. (Musical critic) या विषयावर त्याचे पुष्कळ ग्रंथ आहेत. तो कविही होता. (Dic. of National Biography by Sidney Lee, Vol XXVII, 1891 पहा).

अथवा कोठें बाहेर पाणी असेल तेथें मिरवत जात असतात. हें त्यांचें गाणें माझ्या कानास गोड लागत असे. नुकताच माळव्यांतील दिवसाचा उनवारा (लू) कमी होऊन अस्तमानाच्या वेळेस पाउसाचे बारीक बारीक तुषार, त्यांत या घागरे नेसलेल्या व आपल्या घुंगटांतून एका डोळ्यांनीं लोकांस पाहणाऱ्या व पायांतील सांकळा[१] वाजविणाऱ्या बायकांचें मंजूळ शब्दांनीं गात गौरीस पाणी पाजण्या करतां मिरवणें मला बरेंच आल्हादकारक वाटत असे.

## माझा तेथें पहिला चातुर्मास.

माळव्यांत पाऊस फार थोडा. नवाबसाहेबांचा इंग्रेजी अभ्यास, आणि माझा घोड्या वर बसून घोडे दवडविण्याचा अभ्यास, दोन्ही बराबर चालत असत. एके दिवशीं आमच्या दोघांची बरोबर स्वारी असतां नवाबसाहेबांच्या पठाण स्वारांनीं नवाबसाहेबांस म्हटलें, "हजूर, अब तो पंडतजी घोडेपर चडनेको अच्छे सीखे. देखो कैसा घोडा दवडाते हैं." म्यां त्यांस म्हटलें, "हां मुझे ममइमें घोडेपर चढनेकी बिलकूल आदत[२] नथी, कभी हम चढेही नहीं, लेकीन जैसा मैं अब घोडेपर चढता हूं वैसे जो नवाबसाहब अंगरेझी इलम[३] सिखनेके घोडेपर चढकर उस घोडेको दौडायंगे तो मैं बहोतही खुष होंगा." ते म्हणाले—"इनशा अल्लाहु तआला[४] यहभी जलदी होंगा." म्यां म्हटलें—"मैंभी यही उम्मीद रखता हूं." अशी गम्मत करित करित आह्मीं फिरत होतों. एके दिवशीं नवाबसाहेबानें मला पुसलें—"पंडतजी, आपको ऊंटपर चडनेकी कुछ भी आदत है?" म्यां म्हटलें, "मैंने ममइमें ऊंट तो कभी देखाही नहीं तो उसपर चढनेकी क्या बात!" मग त्यांणीं लागलीच आपली सांडणी[५] आणविली, आणि आपण तिज वर पुढें बसून मला आपल्या मागें बसविलें. ती उठतांनां जे दोनतीन धक्के बसले तेणेंकरून मीं तर फारच भ्यालों. ते सारे हंसूं लागले. नवाबसाहेब म्हणाले—"पंडतजी, आप कुछ डरो मत, देखो मैं कैसी सांडणिको आहस्ते ले जाता हूं. आपने मुझको अच्छी तऱ्हेसे पक्कड रेहना" मग त्या प्रमाणें मीं त्यांस पकडून राहिलों, व त्यांणीं सांडणी चालविली. तिच्या

---

१ सांखळ्या.

२ संवय.

३ ज्ञान.

४ परमेश्वराची इच्छा असेल तर.

५ उंटीण.

चालण्यानें वरखालीं आचके बसत तेणेंकरून मला पडण्याचें भय वाटे. अशी ती सांडणी बरीच चालविल्या वर नवाबसाहेबांनीं मला खालीं उतरविलें, आणि आपण एकटेच तिला दौडी वर चालवून मला आपली सांडणस्वार दाखविली. तो अल्पवयी मुलगाच होता, त्यास अशी आपली हुशारी दाखविण्याची मोठी हौंस असे. कधीं कधीं नवाबसाहेबांचे मुख्य कारभारी शेख अली आझमही आमच्या बराबर सवारींत फिरायास येत असत.

## इंदुरास दसऱ्याची नवाबाची सलामीची स्वारी.

यात्रमाणें चातुर्मासाच्या आखेरीस नवाबसाहेब हे होळकर महाराजांच्या पदरचे असल्यानें आतां फक्त त्यांस सलामी करतां दसऱ्यास एकदां इंदुरास जावें लागत असे.§

ही उत्तम संधि पाहून म्यां घरीं तीर्थरूपांस लिहिलें किं "तुह्मीं नाशका पर्यंत आपल्या बाईस गंगास्नाना करतां आणावें." त्यांत तें आणखी सिंहस्थाचें साल होतें; आणि पुढें आमच्या कुटुंबास व नव्या झालेल्या मुलीस आमच्या कडे रवाना करावें. मीं एथून डोली, भोई, व सवार नाशका पर्यंत त्यांस आणायास पाठवितों. असा आमचा संकेत झाल्या वर नवाबाच्या सांगण्या वरून तितका सवारीचा सरंजाम **शेख अली आझम** यांणीं **नाशकास** रवाना केला आणि मीं नवाबसाहेबांच्या स्वारी बराबर **इंदुरास** गेलों. तेव्हां अशी आशा होती किं आमचें कुटुंब आह्मांस या स्वारींत इंदुरांत न भेटलें तरीं पुढें दिपवाळीस जावऱ्यास तरीं भेटेल. परंतु आपलें सर्व चिंतित व्यर्थ आहे तें पुढें काय झालें या वरून थोडक्याच दिवसांत पुढल्या हकीगती वरून समजेल.

आह्मीं इंदुरास पोंहचल्या वर चारपांच दिवसांनीं दसरा आला. दसऱ्याचा इंदुरांत मोठाच संभारंभ होत असतो.*

आसपासच्या **म्हौच्या** व नीमचच्या छावणी वरून इंग्लिश आफिसर तो तमाशा पाहण्यास येत असतात. मीं इंदुरांत नवाब गफूरखानाची छावणी आहे तेथें

§ आतां मला वाटतें त्याही महाराजांस देण्याच्या सलामी बंद केल्या असतील. सन १८८२.[१]

* आतां तसा समारंभ होत असेल असें मला दिसत नाहीं. (१८८२)

१ लेखनकाल निर्देश. (xi)

डेऱ्यांत उतरलों. एथें आल्या वर म्यां Mr. John Bax ( मिस्तर जॉन ब्याक्स ), इंदूरचे रेसिडेंट यांची भेट घेतली. ही त्याची माझी पहिली मुलाकात. मिस्तर ब्याक्ससाहेब हे मोठे सभ्य व सौम्य पुरुष मला दिसले. आणि मला जवळ बसवून सर्व हकीकत पुसली. माझी व नवाबसाहेबांच्या इंग्लिश अभ्यासाची. म्यां त्यांस सांगितलें किं हे संस्थानिक दौलतमंद[1] लोक आहेत. हे श्रम घेऊन अभ्यास करतील असें मला दिसत नाहीं. परंतु माझ्यानें त्यांच्या कडून जितका त्यांच्या खुशी प्रमाणें अभ्यास करवेल तितका मीं करवितों. रेसिडेंट (बडे साहेब) म्हणाले, " तसेंच केलें पाहिजे. फार नेट करून कांहीं उपयोग नाहीं. 'माझ्यानें शिकण्याची मेहनत होत नाहीं' असें म्हटल्या वर तुमचें माझें दोघांचें कांहीं चालणार नाहीं." मग एक दिवस त्यांणीं व त्यांची मड्डम या उभयतांनीं त्यांज कडून कांहीं वाचून घेतलें, व थोडा अर्थ पुसला. व त्यांणीं लिहिलेलें इंग्रेजी अक्षर पाहिलें व त्या उभयतां स्त्रीपुरुषांनीं पुढें त्यांस उत्तेजन येण्या करतां मोठी शाबासी दिली. आणि म्हणाले, " देखो नवाबसाहेब, आप थोडे दिनमें अच्छे सीखे; तुमारे उस्तादजी बडे हुशियार हैं. आप अच्छे सीखोगे तो हम लाटसाहेबको आपके वास्ते बडी सिफारश करेंगे." नंतर मला एकी कडेस या उभयतांनीं सांगितलें किं " आतां तुह्मीं या मुला वर फार सख्ती करूं नका. त्याच्या लग्नाची तजवीज चालली आहे." म्यां म्हटलें, " बरें आहे. म्यां कधींच त्याज वर सख्ती केली नाहीं."

## दसऱ्याचा समारंभ व शमीपूजन.

आज दसऱ्याची मोठीच धामधूम होती. तिसऱ्या प्रहरापासून घोडेस्वार, सांडणीस्वार, उंट, हत्ती, चढूं कडून जमूं लागले. तिनसांजेच्या वेळेस बडेसाहेब व दोनचार दुसरे साहेब महाराज हरिराव यांस वाड्यांत आणायास गेले. ( असें मला वाटतें. ) पुढें महाराजांची स्वारी अंबारीच्या हत्ती वर व त्यांत बडे साहेब व मागें दुसरे साहेब, व दरबारी मानकरी लोक त्यांच्या स्वाऱ्या, चोबदार, हलकारे बोथाटीदार,[2] भालदार, शेंकडो व हजारो जमले. असे मागेंपुढें स्वार व हत्ती व

---

१ धनवान्. दौलत-मंत. मंद < मंत ?

२ बोथाटी—" A staff of bamboo with a topknot or bunch of cloth. It is carried in procession before great men." ही धारण करणाऱ्याला ' बोथाटीवरदार ' असेंही म्हणतात. ( मोल्स्वर्थकोश )

लष्करी लोक यांची एकच गर्दी छावणींत बडेसाहेबांच्या बंगल्या पुढें जमली. तेथें एक रेडा आणिला होताच. त्यास सर्व भाल्यानें टोंचून मारूं लागले, तेव्हां हत्ती वर बसलेले साहेब व मडमा यांस तें अघोर कर्म पाहवेना. ते बडेसाहेबांच्या बंगल्यांत व डेऱ्यांत जाऊन बसले. तेथें थोडें रक्तसिंचन करून शमीची पूजा करून महाराज हरिराव व बडेसाहेब हत्तीच्या अंबारींत बसून त्यांचे दिवाणजी व सर्व दरबारी मानकरी लोक कोणी हत्ती वर, कोणी पालखींत व बहुतेक घोड्या वर स्वार होऊन स्वारी बरावर परत गांवांत सरकारवाड्यांत गेले. तेथें दरबार भरला व नवाबसाहेब व मार्जीसाहेबांचा महाराजांस मुजरा झाला. नंतर नवाबसाहेब माजीसाहेबांस मुजरा करायास महालांत गेले. त्या गर्दींत मीं नव्हतों. मग विडे, गुलाब, हारतुरे होऊन सर्व लोक आपआपल्या ठिकाणीं गेले. असा दसऱ्याचा समारंभ मीं पूर्वी कोठें कधींच पाहिला नव्हता. त्या गर्दींत मीं कोठें होतों हें आतां माझें मला आठवत नाहीं. बडे साहेबांच्या बंगल्या पाशीं नवाबसाहेबांच्या लोकां मध्यें होतों. परंतु घोड्या वर किंवा हत्ती वर हें मला स्मरत नाहीं. बहुतकरून असा तमाशा पाहण्याचें असल्यास नवाबसाहेब मला हत्ती वरच बसवीत. या वरून वाटतें कि हत्ती वरच असेन.

## दसरा सरल्या वर बडेसाहेबांच्या व त्यांच्या मेमसाहेबांच्या माझ्या एकदोन भेटी.

दसरा झाल्या वर एक दोन दिवसांनीं मीं व नवाबसाहेब मिळून बडेसाहेब व मेमसाहेब यांच्या भेटीस गेलों. तेथें मेजर बार्थविक यांच्या पुस्तकांतील Hutton's Mathematical Recreations या ग्रंथांतून शिकलेले कांहीं चमत्कार दाखविले. ते पाहून Mrs. Bax मेमसाहेब यांस मोठें आश्चर्य वाटलें. तेव्हां पासून बडेसाहेब व त्यांची मेमसाहेब मज वर फार लोभ करूं लागलीं. असो.

## बडेसाहेबांचे इराणी मुनशी यांचा माझा स्नेह.

बडेसाहेबां कडून महाराजां कडेस व मार्जीसाहेबां कडेस दरम्यान कांहीं बोलणें, कागदपत्र समजावयास एक इराणी मुनशी असत. त्यांचा लिबास अगदीं इराणी असे. ते Ispahan (इस्पहान) किंवा Shiraz एथील राहणारे असावेत. परंतु हिंदुस्थानांत फार दिवस राहिल्या मुळें व तेथील दरबारी लोकांत वागल्या मुळें

१ पोशाख.

त्यांस उर्दू भाषा बरीच चांगली येत होती. मला फारशी येतें व फारशी शब्द[१] इराणी लोकां प्रमाणें उच्चारण्याचा माझा अभ्यास पाहून त्यांचा माझा बराच स्नेह जमला. त्यांणीं मला सांगितलें, व सर्व लोकांस माहीत होतें कीं, हरिरावामध्यें फारसें बुद्धि-वैभव नव्हतें. या कारणानें त्या काळीं दरबारचा कारभार माजीसाहेब यांच्या सल्ल्यानेंच होत असे. म्हणोन बडेसाहेबां कडून या मुनशीस माजी साहेबां कडेस फार जाणेंयेणें असे. ते मुनशी मला म्हणत कीं, "माजीसाहेब बडी अकलमंद[२] औरत हैं. उन्हे तो यह सब जूने अहवालकी वाकिफकारी है. उन्होने होल-करकी बहोत दिनोसे दौलत और मरातब जाहो जलाल देखा है. हरिराव तो बिचारा कलका लडका. उन्होने अपने गोदमें[३] लेकर उनूको गादीपर बिठाया. सो बडा साहेबको दरबारके बाबत कुछभी केहना हो या पूच्छना हो तो पेहले माजीसाहेब पास मुझे भेजते." या प्रमाणें इराणी मुनशी मला सांगत असल्याचें मला थोडें-बहुत स्मरण आहे. या मुनशीचें नांव मला आतां आठवत नाहीं. ते सुमारें पस्तीस चाळीस वर्षांचे वयाचे असून मोठे चालाक होते.

## आमचें परत जावऱ्यास जाणें.

दसऱ्याच्या स्वारीचा या प्रमाणें समारंभ आटोपल्या वर आठ दिवसा नंतर नवाबसाहेबांची स्वारी बरावर मीं परत जावऱ्यास गेलों. मनांत मोठी उमेद होती कि एथें माझ्या कुटुंबाची व माझी गांठ पडेल. परंतु तसें कांहीं घडलें नाहीं. शेवटीं जावऱ्यास गेल्या वर तरीं होईल; परंतु तसेंही घडलें नाहीं. आमचे तीर्थरूप, आमची बाई (तीर्थरूपांची आई) बहीण व भाऊ, आमची सासू व तिकडली मंडळी यांहीं मुंबई सोडिली एथ पर्यंत वर्तमान घडल्याचें मात्र पत्र आमच्या तीर्थरूपाचें मला पावलें; पुढें काय झालें तें मला मीं पुढें जानेवारीच्या सुमारास टोंकेहून परत येई पर्यंत समजलें नाहीं.

★

---

१ मुळांत 'शक' आहे.

२ बुद्धिमान. (मंदबुद्धि नव्हे!)

३ कडेवर.

२१

## नवाबसाहेबाच्या लग्नाच्या स्वारी बराबर माझें जाणें

अक्टोबर सन १८३६ साच्या आरंभीं मीं इंदुराहून नवाबसाहेबां बराबर परत जावऱ्यास आल्या वर लागलीच नवाबसाहेबांच्या लग्नाची वरातीची स्वारी टोंकेस जाण्याची तयारी होऊं लागली. त्या स्वारींत साहेबाच्या हुकुमा वरून मलाही जावयाचें झालें. मलाही मोठा आनंद झाला. कारण आतां मला उत्तरे कडील बराच लांब मुलूख दृष्टीस पडेल म्हणोन त्या माझ्या अल्पवयांत मला मोठ्या आनंदाची गोष्ट होतो. आतां हिंवाळ्यास आरंभ झाला होता. तेव्हां मीं एके दिवशीं कारभारी **शेख अली आझम** यांच्या भेटीस गेलों तेव्हां मीं शालजोडी पांघरलों होतों. शेखजीनें मला आपल्या पाशीं बसवून, ते मला म्हणाले—"पंडतजी, अब तो आपके तें लंबी मुशाफरी करना है, और उसतरफ बहोत ही टहाड[१] चलेगी, सो आप इस दुशालेको एक तरफ रखना, और हमारे अंगमें जैशी रूकी[२] रजाई है वैसी आपनेभी बनवाना. टोंकमें मैं आपके वास्ते बनवा दुंगा. सबब यह है के वहां फरखाबादी छीट बहोत उमदा मिलता है. आपके वास्ते सवारी म्यानेकी और घोडेकीभी है. जिसपर मजा हो, उसपर सवार होना. दोनो सवारियां आपके वास्ते मौजूद[३] हैं." म्यां म्हटलें, "मैं आपकी शुकर गुजारी करता हूं[४]" असें त्यांचें भाषण झाल्या वर पुढें नवेंबराच्या १० व्या तारखेस सुमुहूर्तानें नवाबसाहेबाची वरातीची स्वारी जावऱ्याहून निघाली.

### स्वारीची हकीगत.

या स्वारीची मझल दरमझलची हकीगत मीं इंग्रजींत लिहून त्या काळींच आमचे परम मित्र Rhe tev Dr. John Wilson यांस मागाहून जावऱ्यास

---

१ थंडी ( संस्कृत-स्तब्ध. प्रा. थड्ड ) टहाड पासूनच 'टार' शब्द झाला असें दिसतें.

२ कापसाची.

३ तयार.

४ आभार मानतों: धन्यवाद देतों.

परत आल्या वर पाठविली. ती त्यांहीं त्या काळीं Indian Spectator[1] या मासिक इंग्रेजी पुस्तकांत प्रसिद्ध केली आहे. ती हकीकत माझ्या Journal and Diary[2] म्हणजे दिनचर्यांच्या संग्रहांत सांपडेल. परंतु त्यांतील सारांश मीं एथें थोडक्यांत उतरून घेतों.

## जावऱ्यापासून टोंकेपर्यंत नवाब गौस महमदखान याच्या लग्नाच्या स्वारींत माझी मुशाफरी.

१० वी नवेंबर सन १८३७ या दिवशीं संध्याकाळीं सुमुहूर्ता वर नवाबसाहेबांनीं आपला महाल सोडून गांवच्या हद्दी बाहेर डेरे दिले होते तेथें रात्रीस राहिले. मींहि संध्याकाळींच त्यांच्या स्वारींत जाऊन मिळालों. माझा डेरा जवळ निराळा होता. दुसरे दिवशीं आमचा कूच झाला, तो २६ वी नवेंबर या तारखेस सोळावे दिवशीं टोंकेस पोंहचलों. दरम्यान पंधरा मुकाम झाले. ते येणें प्रमाणें:—१ ला मुकाम **कचनाड,** दरम्यान गांवें लागलीं तीं:—**अर्णिया, रिचिया,** आणि **धोदर;** २ रा मु० **मंदसोर.** मंदसोर हा मोठा गांव आहे आणि ही शिंदे सरकारची सुभ्याची जागा आहे. हाल्लीं हा सुभा नानासाहेब आपटे यांज कडेस आहे. यांज कडून येथें कोणी यांचा कारभारी काम पाहत असतो. आमच्या शेखजींचें घरदार हाल्लीं मंदसोरांत आहे. त्या दोघां भावांचे दोन ल्हान दहा बारा वर्षांचे मुलगे नवाबसाहेबास सलामी करण्या करतां आले होते. मुलगे बरेच देखणे होते. त्यांचा पोशाक उंची होता. परंतु त्यांच्या गळ्यांत यज्ञोपवीता सारखी एक माळ होती. तिला दहा पंधरा रुप्याच्या ताइता गुंतल्या होत्या. म्यां पुसलें, "हें काय ?" शेखजी म्हणाले, "यह तो तावीजां है. इनोंकी मा बाहेर जानेके वख्त इस बगर जाने नहीं देतीं." यांस दृष्ट न लागावी म्हणोन ही ताइतांची माळ बाहेर जातेवेळेस यांच्या सर्व पोषाका वर घालितात. बहुधा सर्व मुसलमानांच्या मुलांच्या गळ्यांत अशा ताइता

---

१ डॉ. विल्सनच्या मासिकाचें नांव The Oriental Christian Spectator असें होतें. त्या मासिकाच्या १८३८, नं. ३ कव्हर पृष्ट ४ वर "The interesting communications of Dadoba Pandurang and Nawroji Fardunji will find a place as soon as possible," असा मजकूर आहे. परंतु दादोबांची ही हकीकत प्रसिद्ध झालेलीच दिसत नाहीं.

२ हे कागद उपलब्ध नाहींत.

असतात. ३ रा मु० **मल्हारगड.** जावऱ्याच्या नवाबास जे सात महाल तोडून जहागिरींत दिले आहेत त्यांतला हा एक महाल. एथें दक्षणी[१] ब्राह्मणांचीं दोन कुटुंबें असतात. **मल्हारगड** सोडल्या वर **पुतलाई** म्हणोन एक गांव लागला. त्यास Major Borthwick यांच्या सन्मानार्थ बोतलगंज असें आतां नांव दिलें आहे. कारण मेजरसाहेबानें हा उध्वस्त झालेला गांव श्रम घेऊन वसविला आहे आणि एथें आठवड्यांत एकदा बाजार भरतो. एथें **माळवा** आणि **मेवाड** या दोन प्रांताची सरहद्द मिळत्ये. **मल्हारगडांत** नवाबसाहेबाचा अर्धा रिसाला म्हणजे पन्नास स्वार राहतात. ४ था मु० **नीमच.** हा सिंध्याचा गांव आहे, आणि एथें इंग्लिशांचें मोठें Cantonment म्हणजे छावणी आहे. ही छावणी म्हौच्या छावणी पेक्षां मोठी आहे. एथें पारशी लोकांचीं विलायती सामानें व दारू विकण्याचीं दुकानें आहेत. एथें सुंदर सडका आहेत त्यां वरून भाग्यशाली इंग्लिश लोक बायकामुलें घेऊन बग्गीचारटांतून[२] सकाळीं हवा घेण्या करतां फिरत असतात. एथें आमचा मुकाम अधिक झाला. ५ वा मु० **नयागाम.** हा सिंध्याचा गांव आहे. एथें सिंध्याची हद्द बदलत्ये. ६ वा मु० **निमोहडा. अमीरखानास** जे सात महाल अ० परगणे तोडून दिले त्यांतील हा एक. हा गांव नीमचेपासून आठ कोस आहे. या महालाचें उत्पन्न हाल्लीं सवा लक्षाचें आहे. पूर्वी अधिक होतें. ७ वा मु० **सावा.** निमाहेज्यापासून पुढें रस्ता कांहीं बरा आहे. एथें बहुतकरून दगडाचीं घरें लागलीं. पेंढारी यांणीं उध्वस्त केलेला हा मुलुख आहे. वलुवचें मुकाम दाखविणारें बुक आहे. त्यांत हें गांव सिंध्याचें लिहिलें आहे. परंतु तें एका टाकराचें आहे. एथें एक मोठा तलाव आहे. त्याचे कांठा वरून **चितोडचा** किल्ला दिसतो. ८ वा मु० **पटाली.** आह्मीं आपला कूच मोठ्या पहांटेस केला, व ज्या पहाडा वर मोठा प्रसिद्ध **चितोडचा** किल्ला आहे, त्याच्या तळ जवळचें जंगल टाकल्या वर चितोडच्या कसब्यांत अथवा गांवांत आलों. हा गांव एका हाकिमाच्या ताब्यांत आहे. हें प्राचीनकाळचें रजपूत लोकांचें प्रसिद्ध स्थान पहाया जोगें आहे. एथें **बागड** व **विरीच** या दोन नद्या मिळतात. एथें बागड नदी वर जुना मोठा पूल आहे.

---

१ (दक्षिणी) गुजराथी लोक महाराष्ट्रियांना 'दक्षणी' अशा नांवानें संबोधित आणि तोच शब्द रूढ झाला–तुल्य: गुजराथी लोक **दक्षणी** लोकांबरोबर मोठ्या सन्मानानें व विनयानें वागत असत. **माझे प्रवासाची हकीकत** (रोजनिशी) गो. बा. जोशी, १८९६ पृ. xvii.

२ (Chariot?)

परंतु त्याची बेदाद आहे. त्या वेळेस मारवाडांत रोगाची धाम[1] उठली होती. तो रोग जवळच्या गांवांत शिरल्याचें ऐकल्या वर मीं फार भ्यालों. ९ वा मु० **हमीरगड.** ठलाई पासून चार कोस आह्मांस एका दाट जंगलांतून जावें लागलें. यास **गंगराडचें** जंगल म्हणतात. दोन प्रहरच्या सुमारास आह्मीं **हमीरगड** एथें पोंहचलों. हें चांगलें बाजाराचें गांव आहे आणि एथें एका जातीचे कापडजोडे विणतात. आमचे डेरे **बन्नास** नदीच्या किनाऱ्या वर दिले. १० वा मु० **मद्दुवा.** मारवाडच्या सांथीच्या रोगाच्या भयानें आह्मीं किंचित् आड मार्गानें गेलों. **सांगानेर व भिलवाडा** सोडून रात्रीं मला ताप भरून आला. या मुळें मीं फार भ्यालों. ११ वा मु० **शाहपुरा,** मला ताप आल्या मुळें मीं आज माझ्या म्यान्यांतच दडून होतों. हा गांव मोठा होता हें मीं, तो एका दरवाजांतून दुसऱ्या दरवाजास पोंहचायास किती काळ लागला, या वरून जाणिलें. पंधरा मिनुटें लागलीं. १२ वा मु० **कादीडा.** आह्मीं दोन प्रहराच्या सुमारास या मुकामीं आलों. एथें मेवाडची हद्द सोडून ढुंढारची हद्द लागली. १३ वा मु० **नासरीडा.** हा मुकाम सुमारें वरल्या मुकामापासून ११ कोशां वर आहे. १४ वा मु० **गनेटा.** **नासरीडा**पासून चार कोशां वर **तोडा** हा गांव आहे. हा जयपूरच्या महाराजांचा गांव आहे. एथें मोठाल्या बावडी आहेत, त्यांत सुमारें तीनशें वर्षां वर एका जयपूरच्या राणीनें बांधलेली बावडी फार मोठी आहे. ही बावडी अथवा तलाव कांहींसा मुंबईंत महालक्ष्मीच्या तलावाच्या ढबीचा आहे परंतु फार मोठा आहे. यांत विस्तीर्ण महाल खोदून काढले आहेत. ही बावडी पहायाजोगीं आहे. १५ वा मु० **टोंक.** ह्या आमच्या शेवटल्या मुकामास आह्मीं सुमारें दोन वरास पोंहचलों. आह्मांस पुनः बन्नास उतरावी लागली. **टोंक** हा गांव, अथवा शहर म्हटलें तरी चालेल, फार मोठा आहे. गांवांत सुमारें दहा बारा हजार घरांची वस्ती आहे. मुसलमान व हिंदु. त्यांत मुसलमानांची वस्ती अधिक असावी. गांवच्या कोटापासून सुमारें अर्धा कोस गंज आहे, त्यांत बहुतकरून पठाणांची वस्ती आहे. एथें चांगला मोठा बाजार आहे, त्यांत

---

१ सांथ. तुळा: 'त्यांत (गांवांत) पटकीची धाम उठली'–**धर्मविवेचन,** (जगद्दासी आर्य) १८६८, प्रस्तावना पहा. गोमंतकी मराठींत हा शब्द रूढ आहे; परंतु देशावर प्रचलित दिसत नाहीं.

कापडवाल्यांचीं दुकानें आहेत. त्यांत बहुतकरून फरक्काबाद व दुसऱ्या हिंदुस्थानच्या पेठांचें कापड असतें. फरक्काबादचें छीट फार टुंबदार असतें, व एथले अमीरलोक त्या छिटाची रू भरलेलीं डगलीं व रजाया थंडीच्या दिवसांत वापरतात.

## टोंक या गांवचें वर्णन.

मींहि तसें डगलें व रजाई या स्वारींत केली होती. हा गांव नवाब अमीरखान यांचे जहागिरीचें मुख्य गादीचें ठिकाण आहे.. हे अमीरखान व गफूरखान हे दोघे सरदार होते. हे होळकराच्या पदरीं चाकरीस राहिले. होळकरानें पुणें लुटलें तेव्हां हे त्यास मदत होते. अमीरखानानें आपल्या कारकीर्दींत होळकरा बराबर पुष्कळ लुटी केल्या आणि शेवटीं जयपुरची कृष्णकुमारी इला उदेपुर आणि जयपुराच्या भांडणाचें मुख्य कारण समजून त्या साध्वी कन्येला मारविली. अशीं पुष्कळ दुष्टकर्में करून हा पठाण सरदार वाढला. त्याचा मुलगा वजीर महंमदखान हा आतां गादी वर आहे. या अमीरखानाचा महाल सुमारें एक कोसा वर नजरबागेंत आहे, तो पाहाया जोगा आहे. येथें मुसलमानी शहरा प्रमाणें मोठे हम्माम म्हणजे स्नान करण्याच्या जागा आहेत. त्यांत पाणी तापविण्याचे हंडे आहेत. यांत एक Labyrinth म्हणजे कुवेडें बाहेर निघण्यास वाट न सांपडे अथवा मोठ्यान मेहनतीनें सांपडली तर सांपडे असें ठिकाण बांधलें असतें तें आहे. त्यांत एकदां मनुष्य शिरलें कि तें गोंधळून जातें.

## नवाब वजीर दौला यांची भेट

नवाबसाहेबांचा थोड्या दिवसांत पूर्वी योजलेल्या नवाब वजीर महम्मदखान यांच्या कन्येशीं आणि थोरले नवाब अमीरखान यांच्या नातीशीं विवाह झाला. ही मुलगी वर नवाबसाहेबां पेक्षां कांहीं वयानें थोर होती व सांवळी असून तिच्या तोंडा वर देवीचे वण होते या वरून नवाबसाहेबांस आवडावी तशी आवडली नाहीं हें त्यांनीच मला कळविलें. परंतु थोर घराण्यांतील असल्यानें त्यांस तिज बराबर विवाह करणें जरूर पडलें. तिच्याहि मनांत "मी मोठ्या घराण्यांतील आहे, आणि तीस महम्मदखान हा आमच्या पदरचा," अशी बोलून घमंडी होती. या कारणानें पुढें थोडक्याच दिवसांत तिचें याचें सूत्र जमलें नाहीं. असु. विवाहसमारंभ झाल्या वर नवाब वजीर दौला यांची माझी शेखजीच्या मारफत १७ वी डिसेंबर रोजीं भेट झाली. हे अमीरखानाचे ज्येष्ठ चिरंजीव त्या वेळेस सुमारें ३६ वर्षांच्या उमरीचे असावे असें मला दिसलें. यांची दाढी विद्वान् मौलवी प्रमाणें लांब होती. पठाण ज्यानाची दाढी बहुतकरून व

चढलेली असते, तशी नव्हती. यांचा रंग सांवळा होता. परंतु यांची चाल गंभीरपणाची होती. त्यांना पूर्वीच माहित होतें कीं, त्यांच्या जांवयांचा इंग्रेजी वस्ताद आहे. त्यांहीं मला प्रथम प्रश्न केला त्याचा अर्थ असा होता किं—"आप अंग्रेजी झुबान[१] सीखके अबतक हिंदु रहे हो ?..." मीं त्याच्या प्रश्नाचें इंगीत समजलों. आणि नम्रतेनें उत्तर दिलें किं—"अपने मजहबका[२] बदलना यह कुछ पराई झुबान जाननेका खास नतीजा[३] नहीं है. पराई झुबानमें कुछ मजहबके बापद लिखा जाता है उसके समजनपर उसका मदार है. हासिल कलाम यह है के अपनेहि समजसे मझहबका तबदील[४] तआल्लुक[५] रखता है." नंतर इंग्लिश भाषा शिकण्यांत मुख्य फायदा कोणता वगैरे या विषया वर भाषण झालें त्याचा पूर्ण अर्थ त्यांच्या लक्षांत भरला नाहीं. नंतर मीं कोठला राहणार व तेथें मुसलमानी कशी चालली आहे हें विचारलें. त्याचें उत्तर शेख अली आझम यांहींच दिलें. नंतर त्यांहीं एक इंग्लीश बुक आणविलें आणि त्याच्या प्रस्तावनेचा मला उर्दू भाषेंत अर्थ सांगा म्हणोन प्रश्न केला. नंतर म्यां बुक उघडलें नों तें Mr. Prinsep यांहीं लिहिलेल्या मध्यत नवाब अमीरखान यांचा तजखरा म्हणजे चरित्र होतें. त्या पुस्तकाच्या थोड्या ओळी वाचतांच माझ्या लक्षांत येऊन गेलें कीं त्या साहेबानें जो अमीरखानाचा अहवाल लिहिला तो निष्पक्षपाताचा आणि त्यांस अत्यंत प्रतिकुल होता. म्हणोन मीं नम्रतेनें स्तब्ध राहिलों. शेवटीं स्तब्ध राहण्याचें कारणहि त्यांस निवेदिलें. परंतु त्यांचा आग्रहच पडला कीं, "मुझायेका[६] नहीं जो कुछ उसने लिखा हो सो थोडाभी बयान[७] करना." त्या दरबारांत पुष्कळ त्यांच्या पदरचे सरदार व दरबारी मंडळी होती; म्हणोन मला त्यांच्या समक्ष त्यांचे मोठे मुरब्बी[८] **अमीरखान** यांची निंदा वाचण्यांत फार संकोच वाटला. तथापि नवाबसाहेबांच्या आग्रहा मुळें मीं थोडा वाचला व त्याचा उर्दू भाषेंत अर्थ सांगितला. तो ऐकून **नवाब वजीर दौला** यांस तर फार फार वाईट वाटलें असें दिसलें नाहीं; आणि वाटलें असलें तरीं त्यांहीं तें आपल्या गांभीर्यानें प्रदर्शित केलें नाहीं. परंतु वरकड मसलतींत जे लोक होते त्यांस तर इतक्या थोर व योग्य पुरुषास ज्यांस ते सर्व मोठ्या पूज्य बुद्धीनें मानित आले त्यांची निंदा ऐकवेना. त्यांतून मुख्य मौलवी व [illegible] तर सारे एकदम

[illegible]ticism, mystical enthusi[illegible]

१ भाषा. २ धर्म. ३ परिणाम. ४ [illegible] of complete [illegible] [illegible] Paris, 1843, Preliminary [illegible]
८ आश्रयदाता मित्र.

म्हणाले, " ला हौलवला कुव्वत इल्ला बिल्ला[1] यह क्या गुस्ताखी[2] है."

**नवाब अमीरखान** जरीं सर्व दुष्ट कर्मांनें प्रसिद्ध होते, तरीं त्यांचे पुत्र **नवाब वजीरखान** हे त्याच्या उलट गुणानें प्रसिद्ध होते. हे मोठे विद्वान् आरबी व फारशी भाषेंत निपुण व **कुराण** व **शरा**[3] यांत पारंगत असे होते. इतकें असून मोठे धर्मनिष्ठ व इन्साफी[4] होते, अशी त्या काळीं मीं यांची कीर्ति ऐकत होतों. पांच निमाझा नियमानें करीत, आणि स्वतः दर जुमारोजीं[5] मुसलमानास 'वआज' म्हणजे धर्मोपदेश करीत. यांची उपदेश करण्याची ढब इतकी सुंदर होती, किं तेणेंकरून जवळच्या गांवचा एक रजपूत जमीदार, दिल्लीचा हिंदु सौदागर यांहीं इस्लाम धर्म स्वीकारिला, असें लोक सांगत होते. ते नवाब असतां मुला सारखे वागतात. अलिकडेस लोक सांगतात किं ते इतके इस्लामधर्माच्या आधीन होत चालले आहेत किं जे मुसलमान नाहींत त्यांस ते काफर समजतात, आणि इतर लोकांची भाषा व विद्या शिकणें हें त्यांस आवडत नाहीं.

तथापि इन्साफाच्या कामांत त्यांची फार तारीफ आहे. त्यांहीं आपल्या मुलकांत दारू पिणें व रंडीबाजी करणें हें अगदीं मना केलें आहे. त्या मुळें एथें तंटेबखेडे फारसे होत नाहींत. या मुळें यांची रय्यत सुखी आहे.

या प्रमाणें टोंकेंत नवाबसाहेबांची शादी झाल्या वर नवाबसाहेब व त्यांची दुल्हण म्हणजे नवरी सर्व मिळून आल्या मार्गानें परत दोन सव्वादोन महिन्यांत जावऱ्यास गेलीं. नवाबसाहेब वजीर दौला हे कर्मठ मुल्ला सारखे वागत होते म्हणोन वर सांगितलें. आतां यांचेच दुसरे धाकटे भाऊ केवळ सुफी[6] मताचे असून त्यांचा बाणा

---

१ हें वाक्य अरबी असून त्याचा भावार्थ—'ईश्वराशिवाय इतर कोणत्याही शक्तीची भीति बाळगण्याचें कारण नाहीं,' असा आहे; परंतु येथें त्याचा शब्दशः अर्थ घ्यावयाचा नसून " ईश्वरा संभाळ !" अशासारखा केवळ उद्गारवाचक आहे.

२ उद्धटपणा. ३ धर्म[illegible] किंवा धर्मशास्त्र. ४ न्यायनिष्ठ. ५ शुक्रवारीं.

६ मुसलमान म[illegible] 'पधील साम्य व भेद यांसंबंधी Anthony Troyer लि[illegible] pointed out how Muhammedan or [illegible] with the Hindu Yogis or Sanyásis. [illegible] ble from each other. The Yajur-

फकीरी होता. ते आमच्या बराबर जावयास आले. त्यांची माझी मार्गांत मोठी गम्मत होत असे. हिंदूंचें देऊळ पाहिलें म्हणजे मुसलमाना देखत ते 'जयरघुनाथजीकी' म्हणून देवाच्या मूर्तीस नमस्कार करीत. पहा, एक भाऊ तसा आणि दुसरा असा.

★

---

veda, and other sacred books of the latter inculcate the precept that a man ought to acquire perfect indifference concerning the whole exterior world and in all places to lay aside the notion of diversity. This is what a Yogi or Sanyási endeavours to attain. He quits everything, house, wife, children, even his **caste**; the world has no more right upon him than he upon the world. In this he agrees with the Sufi; but the latter generally aspires to the divine gift of inspiration, prophetism, mystical enthusiasm, whilst the common state of a Yogi is that of complete impassiveness of torpor." ( **The Dabistan**, Paris, 1843, Preliminary discourse, p. cxlviii.)

## २२ + पितृवियोग

मीं दोन सव्वादोन महिने असा नवाबसाहेबाच्या वराती बरोबर फिरत असतां मला घरचें कांहींच वर्तमान समजलें नाहीं. माझ्या मनांत मोठी उमेद होती, कीं मीं जावऱ्यास पोंहचल्या वर माझी व कुटुंबाची व तान्ह्या मुलीची भेट होईल. परंतु दरम्यान जो अनर्थ झाला तो सांगवत नाहीं. वर हकीकत सांगितली आहे कीं मीं कुटुंबास आणण्या करतां नाशकास भोई, म्याना व स्वार पाठविले होते. परंतु तेव्हां सिंहस्थाच्या यात्रेचा मोठा मेळा होता, व त्यांत महामारी आपली स्वारी ढकलण्याची वाटच पाहत होती. तिणें त्या मेळ्यांत एकच गर्दी केली. त्या झपाट्यांत आमचे तीर्थरूप आमच्या आजीस घेऊन सर्व मुलांलेंकरां सुद्धां आमच्या कुटुंबास पुढें जावऱ्या पर्यंत रवाना करण्या करतां आले होते, त्यांज वर व आमची आजेसासू व दोन भोई यांज वर एकदम गर्दी केली. हें वर्तमान ऐकतांच मीं फार शोक केला. आमचें कुटुंब पुढें न येतां माघारें तान्ह्या मुली सुद्धां मुंबईस गेलें. आमची आजी व भाऊवहिणीही परत गेल्या. अशी येथें दाणादाण होऊन गेली. एक आमचे तीर्थरूप गेल्यानें आमच्या सर्व कुटुंबाचा मोठाच नाश झाला. त्या वेळेस माझे सर्व भाऊ लहान. भास्करा शिवाय कोणी रोजगार करणारा नव्हता आणि तोही त्या वेळेस नगरांत होता. मींच काय तो वडील व रोजगारी. शेवटीं जमशेटजीनें हें वर्तमान ऐकून दिलगीर होऊन आमचा भाऊ भास्कर यास नगराहून बोलाविलें. तेथें त्याचा पगार थोडा होता तो पगार वाढवून आमच्या तीर्थरूपांची आसामी त्यास दिली. एथून मज कडूनही मदत जात असे. असा आमच्या कुटुंबाच्या निर्वाहाचा बंदोबस्त दयाळु जमशेटजी जीजीभाई बाटलीवाले यांहीं केला. पुढें कुटुंबास भेटण्याची गोष्ट चारपांच महिने लांबणी वर पडली. आमचे तीर्थरूप पापभीरु व मोठे ईश्वरभक्त होते हें पूर्वी सांगितलें आहे. त्यांचा तो कित्ता आमच्या मोठा उपयोगीं पडला. विद्येच्या मार्गांत लावण्यास व ज्ञान प्राप्त करून घेण्यास तेच मुख्य कारणीभूत झाले असें एथें आह्मांस स्वीकारायास मोठा आनंद होतो.

नवाबसाहेब शादी करून परत घरीं आल्या वर त्यांचें लग्न शिकण्यापासून दहा:ह

दूर होत गेलें हें मीं जाणिलें. एकदम दुर्लक्ष झालें नाहीं, परंतु हळुहळू. त्यांहीं आह्मांस आपला कुतबुद्दीन खान या नांवाचा एक शिलेदार यांस इंग्रेजी शिकण्याचा फार शोक आहे, व ते गृहस्थ फारशी व आरबींत मोठे काबिल[1] आहेत ते तुह्मांस फारशी भाषेचें ज्ञान वाढवून देण्यास लायक आहेत, म्हणोन शिफारस केली होती. ते विद्वान् मुसलमान गृहस्थ आह्मां जवळ एक तास इंग्लिश शिकत आणि एक तास आह्मांस फारशी शिकवीत. त्यांणीं प्रथम इंग्लिश शिकण्यास आरंभ केला, तेव्हां जी एक गोष्ट घडून आली ती ऐकून मोठी गम्मत होईल. ते थोडे स्पेल करूं लागले तेव्हां To टू, Bough बो, Bought बॉट, Thought थॉट, असे नियमा बाहेर उच्चाराचे जेव्हां शब्द येऊं लागले तेव्हां ते आशंक होऊन मला विचारूं लागले कीं— "पंडतजीसाहेब यह क्या वाहियात[2] है के जितने हरफोंका[3] तलफ्फुज[4] नहीं होता वोह यह लोक क्युं लिखते, इन हरफोंको बिलकुल बातिल[5] क्यों नहीं करते. यह इस झुबानकी[6] बडी कमबख्ती[7] है." म्यां म्हटलें, "करनेमें बडी कबाहत[8] है. इन लफझोंका[9] वैसाही तलफ्फुज होता है. इसमें इस झुबानकी कमबख्ती नही है. सीखनारोंकी कमबख्ती है."

ते म्हणाले, "ऐसी नामाआकूल[10] झुबान हम नही सीखेंगे." म्यां म्हटलें, "कुतबुद्दीनसाहेब, आप जलदी नहीं करना इतनेमें यह झुबान नामाआकूल नही होती है. आहस्ते आहस्ते सब कुछ आसान[11] होता है." अशी पहिल्यानें थोडी गम्मत झाली. पुढें त्यांचा अभ्यास थोडा वाढत गेला.

## जावऱ्यास माझा फारशी भाषेचा अभ्यास

माझा पूर्वी फारशी अभ्यास होताच. करीमा[12] व गुलिस्तान[13] हे ग्रंथ माझे झालेच होते. कुतबुद्दीनसाहेबानें माझी इस्तिदाद[14] पाहून मला लागलेच बहार दानिश[15] व किताबे निसाब[16] इतके ग्रंथ एका मागें एक स्वतांला लागत तों पर्यंत सांगितले. नंतर फारशी भाषेंत ते म्हणाले, "मोठा कठीण ग्रंथ इनूशाए-

---

१ निष्णात. २ निरुपयोगी. ३ शब्द. ४ उच्चार. ५ उच्चाटण. ६ भाषा. ७ दुर्दैव. ८ त्रास. ९ शब्दांचा. १० अप्रशस्त. ११ सोपें. १२ शेख सादी (११९३–१२९१) याचीं नीतिवचनें. १३ 'गुलाबाचा बाग'—ग्रंथकर्ता शेख सादी.
१४ कुशलता, तयारी. १५ कथात्मक ग्रंथ. कर्ता–इनायतउल्ला.
१६ जलालउद्दिन रुमी याच्या 'मस्नवी' या ग्रंथांतील वेंचे.

झुहुरी [1] आहे." त्याचा दिबाचा [2] एथ पर्यंत मीं त्यांज पाशीं समजून ग्रंथ घेतले. गमतीचे वेळेस कुतबुद्दीनसाहेबानें केव्हां केव्हां माझ्या पाशीं फारशी व उर्दू गजल व बैते [3] म्हणावीं त्यांतून आतां मला कांहीं तुटक आठवितात. तीं,

अजब लज्ज्ञत शिकारे अफगान तेरे नैनोंके बीच ॥
हो रहा है चर्चा जिस्की सारे नखचीरोंके बीच ॥ १ ॥

म्हणजे कोणी आशिक [4] आपल्या मआशुकास [5] म्हणतो, "तुझ्या नेत्रांत व्याधकुशलतेचें मोठें आश्चर्यकारक कौशल्य आहे, ( अस्सल रुचि आहे असें आहे, परंतु मराटींत तसा अर्थ शोभत नाहीं. ) ज्याची ( ज्या कौशल्याची ) सर्व पक्षां [6] मध्यें चर्चा चालली आहे."

दस्त चूं दीद व तिफ्लीश मुनज्जिम गुफ्ता
पारह ख्वाहद् शुद अजीं दस्त गिरेबाने चंद. [7]

[ म्हणजे ] जेव्हां जोशानें तिचा हात तिच्या बाळपणीं पाहिला, तेव्हां तो म्हणाला किं या हातानें कितीएकांच्या गिरेबानी ( गळपट्टे ) फाडून तुकडे होतील. म्हणजे पुष्कळ पुरुष तिच्या वर आशिक होऊन आपसांत लढतील.

मीं जावऱ्यांत गेलों तेव्हांपासून हे हिंदुस्थानी जोशी माझ्या कडेस येऊन मीं त्यांशीं मोटा स्नेह ठेवला. हे मुळचे दिल्हीचे राहणार. नवाब गफूरखान यांस एके वेळेस कोणी टाकरा कडून गडी घेण्याचा प्रसंग आला होता आणि तो टाकूर तर सहजानें तो आपला गडी सोडीना, तेव्हां त्याज वर लहानशी स्वारी करणें भाग आलें. परंतु जयापजय कोणाचा होतो हें कोणी सांगावें म्हणोन या ब्राह्मणास पुसलें तेव्हां त्याहीं ग्रहलाघवी, मुहूर्तमार्तंड इत्यादिकरून ज्योतिःशास्त्रा वरून नवाबसाहेबास मुहूर्त दिला.

## मिसरतन मुखराय—नवाबचे दरबारचे जोशी

त्या मुहूर्ता वर नबाब गफूरखान यांहीं स्वारी केली आणि जय मिळविला या वरून खुष होऊन मिसरतन मुखरायजी यास तीनचार हजार रुपये उत्पन्नाचे दोन गांव इनाम दिले. त्यांहीं मला आपल्या गांवीं मेजवानीस नेलें होतें, तेव्हां म्यां ते गांव पाहिले. पहा

१ हा ग्रंथ पाहिला नाहीं किंवा त्याची विशेष माहितीही मिळाली नाहीं.
२ श्लोक, पंक्ति. ३ प्रस्तावना. ४ ( अरबी ) प्रेमी. ५ ( अरबी ) रमणी.
६ नखचिरों याचा मूळ अर्थ पशुपक्षी ( शिकार—game ) असा आहे.
७ या दोन ओळी मूळांत फारसी लिपींत आहेत.

तो काळ कसा होता. आतां कोणी नवें महाभारत रचिलें तरीं कोणी विचारणार नाहीं. नवावसाहेब एक छोटेखानी मुसलमान जहागीरदार, यांणीं ब्राह्मण जोशास एक शकुनाच्या दाखल्या वरून वंशपरंपरा दोन गांव इनाम दिले ! हा पुरुष मोठा उंच व शरीरानेंहि भव्य होता. आणि मीं पाहिला तेव्हां सुमारें साठ वर्षां वर यांचें वय असावें. यांस नवाब गफूरखानाची कारकीर्द चांगली माहित होती. म्हणोन मला जुन्या गोष्टी सांगत असत. एकदां त्याणें आह्मांस व लाला फत्तेहसिंग बेगमसाहेबाचा कारकून यास आपल्या घरीं मेजवानीस बलाविलें, त्या वेळेस माझ्या पुढें पुऱ्यांची चवड[1] आणून वाढिली आणि त्यांचा रामा नांवाचा हजाम होता त्याच्या बायकोस जानकी म्हणोन हाक मारून तिच्या हातून लोणचें आणवून सर्व मंडळीस पाना वर वाढविलें. म्यां म्हटलें, "मिसरजी यह क्या करते हो, हजामके[2] हातका अचार[3] हम कैसा लेंगे ?" त्यास हें माझ्या बोलण्याचें मोठें आश्चर्य वाटलें. म्यां म्हटलें, "असें लोणचें आमच्या घरांत बायका किती सोवळ्यांत ठेवितात तें आह्मांस माहित आहे." मिसरजी म्हणूं लागले, "यह तुमारे दखनिओंका सोला और बोडकी क्या होती है यह हम लोक समजते नहीं." असें म्हटलें तेव्हां ती सारी मंडळी हंसली. "हमारे यहां तो हजाम रोटी तयार करके चौकेमें हमारे हातमें देते हैं फिर हम तवे पर डालते हैं." पहा, हे मोठे विद्वान् जुन्या काळींचे गौड ब्राह्मण, यांचा आचार, आणि आमच्या एथील सुतार, सोनार यांचें सोवळें. कुठें शास्त्र राहिलें आणि अज्ञानाचा पहा कसा कोणी कडे ओघ गेला, व तें कसें भलतेंच लोकां मध्यें

---

१ (कानडीःसिवडी) ढीग.

२ तुल०-शूद्रेषु दासगोपालकुलमित्रार्धसीरिणः । भोजान्ना नापिताश्चैव यश्चात्मानं निवेदयेत् ॥ -याज्ञवल्क्यस्मृति-६,१६६. विष्णुशास्त्री बापटांनीं याचें मिताक्षरेच्या सारासह भाषांतर करतांना 'नापिताः' बद्दल 'गृहांतील कामें करणारा,' एवढेंच सोवळें भाषांतर केलें आहे! (१९१२, पृ. ४६) मिताक्षरेमध्यें 'गृहव्यापारकारयिता नापितश्च' असें स्पष्ट म्हटलें आहे. 'शूद्रकमलाकर' या ग्रंथांत, स्वदासो नापितो गोपः कुंभकारः कृषीवलः । ब्राह्मणैरपि भोज्यान्नाः पंचैते शूद्रयोनयः ॥ असें देवलवचन उद्धृत केलें आहे. शूद्रकमलाकर, निर्णयसागर, १८९५, पृ. २७२-३. मनुस्मृतीमध्यें, (४,२५३) आर्धिकः कुलमित्रं च गोपालो दासनापितौ । एते शूद्रेषु भोज्यान्ना यश्चात्मानं निवेदयेत् ॥ असें नमूद आहे. यावरून हजामाच्या हातचें अन्न निषिद्ध नाहीं, असें स्पष्ट दिसतें.

३ पोर्तुगीज भाषेमध्येंही लोणच्याबद्दल 'आशार' हा शब्द प्रचलित आहे.

मातलें. खरेंच, हें सोंवळें आणि बोडक्या नर्मदा उतरली म्हणजे दक्षणी लोकां खेरीज इतर कोणत्याच लोकां मध्यें पाहण्यांत येत नाहींत; आणि आमच्या एथील लोकांस सर्वत्र असेंच वाटतें कीं, हा आमचा धर्म व आचार सर्वव्यापक आहे. हाच काय तो खरा हिंदुधर्म सर्व जातीचे मूर्ख लोक आपआपल्या कुलाचारास समजतात.

हे मिसरतन मुखराय आह्मीं जावऱ्यांत जातांच यांणीं आमचा स्नेह मोठ्या आनंदानें संपादिला. ते नेहमी आमच्या एथें येऊन आमची कर्मणूक करीत. एकदा त्यांहीं हिंदी भाषेंत द्व्यर्थी एक दोहा म्हटला तो असा :—

मैंन कहा गोपाल भज मैं न कहा गो पाल
मैंन कहा वैसा न कियो वांको पड्यो जंजाल.

अर्थ–म्यां म्हटलें तूं गोपाळाला भज. म्यां म्हटलें नाहीं किं इंद्रियाचें पालन कर. म्यां म्हटलें तसें त्वां न केलें त्याचा हा जंजाळ पाठीस लागला.

## नवाब साहेबाचें मला गांव देण्याचें वचन

एकदां नवाबसाहेब व मीं घोड्या वर फिरत असतां नवाबसाहेब एक गांव मला दुरून दाखवून म्हणाले, "हमारे किबलगाहने[1] मिसरजीको दो गांम इनाम दिये, पंडतजी, हम आपको यह तीन हजार रुपयेका गांम देंगे, आप सबूर करो." "आपके हातमें आपकी रियासतका काम चलानेकी मुखत्यारी आवेगी जबकी बाद" असें म्यां म्हटलें त्या वेळेस ते म्हणाले, "अब मेरे हातमें मुखत्यारी आनेको बहोतसा देर[2] नहीं है."

## बडेसाहेब Mr. Bax यांची स्वारी

आह्मीं टोंकेहून परत जावऱ्यास आल्या वर थोड्या दिवसांत बडेसाहेब Mr. Bax यांची स्वारी जावऱ्यास आली. त्यांहीं आमचे तीर्थरूप निवर्तल्याचें वर्तमान ऐकतांच मोठे दिलगीर झाले आणि मला म्हणाले, "तूं श्रमी होऊं नको, मीं जमशेटजी जीजीभाई यांस तुझ्या तीर्थरूपाची आसामी तुझ्या भावास देण्या करतां शिफारसपत्र लिहितों." म्यां त्यांना फार मोठा उपकार मानिला.

★

१ वडील. २ अवधी, उशीर.

२३

# + कन्यादर्शन

पुढें मे महिन्याच्या सुमारास नवाबसाहेबांस आपली शादी झाली म्हणोन मार्जी साहेबांस व हरिराव होळकर यांस सलामीस जावें लागेल असें मला कळल्या वर त्या सुमारास कुटुंब आणण्या करतां पुनः म्याना व जावता[1] पाठविण्याची शेखजींची परवानगी मागितली. तो म्याना व जावता नाशका पर्यंत गेल्या वर तेथून आमचें कुटुंब तान्ह्या मुलीला घेऊन नाशकास आलें आणि पुढें तेथून जावऱ्यास येण्यास रवाना झालें. तों एथून नवाबाची स्वारी होळकराचे सलामीस जाण्या करतां निघाली. दरम्यान **बडनगर** म्हणजे ज्यास रात्रीं चौलाई म्हणतात, एथें नवाबसाहेबाच्या शादीच्या मुबारकबादी करतां साहेबलोक आले होते. दोन प्रहराच्या उनांत मोठी लू[2] चालत असतां त्यांतून सांडणी वरून मेजर बार्थविक-साहेब आले हें पाहून मीं फार आश्चर्य पावलों. मनांत म्हटलें, " पहा हे लोक कसे रांकड. आह्मांस दोन प्रहरच्या उन्हांत एक क्षणभर लू चालत असतां उभें राहवत नाहीं. त्यांतून हा म्हातारा साहेब सांडणी वर बसून दहा बारा मैल जमीन चालून येथें आला. "

त्या गांवीं आमचें खटलें[3] एका शेटजीच्या दुकानीं उतरलें होतें हें वर्तमान आह्मांस मार्गांत समजल्या वर आह्मीं त्या दुकानीं गेलों. तेथें नव्या मुलीस प्रथमच म्यां पाहिलें तेव्हां मोठ्या आनंदानें ती जेथें रांगत होती तेथून उचलून तिचें चुंबन घेतलें. त्या वेळेस ही मुलगी अकरा बारा महिन्यांची झाली होती. मग तेथून मीं आपलें खटलें जेथें नवाबसाहेबांचे तळ उतरले होते आणि त्यांत माझी राहुटी होती तेथें नेलें. पुढें इंदुरास गेल्या वर संकेता प्रमाणें मीं आपले मित्र नाना नारायण यांस एथें बलाविलें होतें ते येऊन पोंहचले. एकदां आह्मीं नवाबाच्या हत्ती वर हौदा घालून या मुलीस मीं व नाना दोघे घेऊन बसलों आणि जुन्या इंदुरा पर्यंत हत्ती नेला. जुनें इंदुर छावणीच्या अलीकडेस आहे. दरम्यान एक नाला आहे त्याच्या पलीकडेस नवें इंदुर. ही पहिली मुलगी कावेरी मोठी भाग्याची

१ (अरबी) परवाना, पासपोर्ट. २ उन्हाचा तडाखा. ३ मंडळी, परिवार.

होती, असें मला वाटलें. ही गर्भांत असतांच हिणें मला हत्ती, घोडे व एक ल्हानशी राजधानी दाखविली. पुढें नवाबसाहेबाशीं व हरिराव होळकर यांशीं भेट होऊन सलामी झाल्या. मासाहेबानें नवाबास आपल्या जवळ लेंकरा प्रमाणें जवळ घेऊन नवी नवरी करून आला म्हणोन चांगले उंचे अहेर दिले.

मग थोडे दिवस आह्मीं तेथें राहून बडेसाहेबांच्या व मेमसाहेबांच्या एक दोन भेटीं घेतल्या. पुढें जावऱ्यास जाण्याची तयारी केली. मीं कुटुंबास उज्जनी दाखविण्या करतां नवाबसाहेबांची रजा घेऊन उज्जनीस गेलों. तेथें आह्मीं राणेखान यांचा बाग आहे तेथें डेरे देऊन उतरलों. नवाबसाहेबाची स्वारी मला वाटतें दुसऱ्या मार्गानें परत जावऱ्यास गेली असावी. आतां बराबर आठवण नाहीं. राणेखान हा पूर्वी भिस्ती[1] होता. सोनपत पाणपतच्या लढाईत जेव्हां मराठ्यांची मोठी दाणादाण व जीव घेऊन पळापळ झाली तेव्हां या भिस्त्यानें महादजी शिंद्यास आपल्या पखालीच्या बैला वर बसवून पळविलें. हा त्याचा मोठा उपकार स्मरून महादजीबावानें त्यास खान ही पदवी देऊन हा बाग इनाम दिला. हा बाग क्षिप्रेच्या कांठीं आहे. आह्मीं उज्जनींत दोन दिवस राहून महाकाळेश्वराचें[2] दर्शन घेतलें. तेथें देवळांत पुजारी भट गोसावी भांग घोटित होते व इतर देवस्थानांत जसे तसे एथेंहि ते दांडगे आढळतात.

## शादीच्या मुबारकबादीच्या मेजवान्या

पुनः मला वाटतें आह्मीं बडनगरच्याच मार्गानें चारपांच दिवसांत जावऱ्यास पोंहचलों. नवाबसाहेबाची शादी झाली म्हणोन रतलाम, प्रतापगड, देवळा, सलाण्या, सीता, म्हऊ इ. जवळच्या ल्हान संस्थानिकांनीं नवाबसाहेबांस बलावून त्यांचा अहेर वगैरे सत्कार केला. जावऱ्यास पोंहचल्या वर नवाबसाहेबास गांवा बाहेर आमराई आहे तेथें डेरे दिले होते त्यांत रखमाबाई किबे, मंदसोरचे सुभे आपासाहेब आपटे व उज्जनीहून शिंदेसरकार कडून कामदार मंडळी शादीची मुबारक-बादी[3] करतां आली होती. त्यांस मेजवान्या झाल्या. एक मेजवानी शिवाय वकीलमंडळीस आमच्या बिऱ्हाडीं झाली.

---

१ जलवाहक. फारसी भाषेमध्यें याचा मूळ अर्थ 'स्वर्गीय' असा आहे. यावरून पाणी पुरविणाऱ्याविषयींचा आदर व्यक्त होतो.

२ मागें पृ. १०० पहा. ३ अभिनंदन.

## मज वर नवाबसाहेबांस मेजवानी

एकदां ही सर्व बाहेरची गडबड गेल्या वर म्यां नवाबसाहेबांस मेजवानी दिली. तींत सर्व आपल्या तऱ्हेचें पंचपक्वान्नाचें जेवण तयार करून नवाबसाहेब व त्यांची सर्व मुसलमान व मुत्सदी मंडळी यांस बलावून त्यांज पुढें केळीच्या पानां वर अन्न वाढून ठेविलें. त्याच्या सुवासानें ती मंडळी मोठी खुष झाली. म्यां नवाबसाहेबांस म्हटलें, "आप हमेशा पुलाव, झरदा, कबाब खाते हो. आज हमारा दालभात और फक्त तरकारिका[1] खाना खाना." नवाबसाहेबानें पहिल्यानें आंबेमोहराचा सुवासिक भाताचाच घांस घेतला, आणि म्हणाले—"खुशबू[2] आती है." मग म्यां म्हटलें, "हुजुरने बहोत जलदी की. उस चावलको[3] दाल और ताजा मख्खनका[4] घी है उसके साथ मिलाके खाना." तसें त्यांहीं केल्या वर म्हणाले, "क्या लझ्झत सुबहान अल्लाह" आमचा आचारी होता तो पूर्वी बाजीरावाच्या मुदखान्यांत नौकरीस होता, त्याला फार सुंदर स्वयंपाक करितां येत असे व नाना प्रकारचीं पक्वान्नें करितां येत असत. मग सर्व मंडळीनें म्हटलें, "तुमारी पंडतोंको पूरनपोली हमको बहोत पसंत है. उसमें आजकी पूरनपोली तो अजब लझ्झतकी है." मग म्यां म्हटलें, "यह हमारा बबरची बाजीराव पेशवेकी रसोईखानेमें नौकर था जो इसवक्त हमको हमारे नसीबसे मिलगया." असें बोलणें झाल्या वर ती सारी मंडळी फार खुष होऊन आपआपले घरीं गेली.

## बडेसाहेब व त्यांची मेम Mr. & Mrs. Bax यांची पुनः जावऱ्यास स्वारी

पुढें चातुर्मास व दीपवाळी गेल्या वर डिसेंबर व जानेवारीच्या सुमारास इंदुरचे बडेसाहेब व त्यांची मेमसाहेब यांची स्वारी जावऱ्यास आली. तेव्हां एक दिवस मेमसाहेब बेगमसाहेब व त्यांची नवी सून पाहण्या करतां महालांत गेली.

आमच्याही कुटुंबास पाहण्या करतां मेमसाहेबांचा पूर्वीच संकेत होता. त्या वरून आमचें कुटुंब व लहान मुलगीही तेथें महालांत गेलीं. तेथें सारी बायकांचीच मजलीस होती व गाणेंबजावणेंही बायकांचेंच होतें. आमच्या कुटुंबानें मुंबईच्या बायकांच्या नव्या हौशी प्रमाणें मुलीस इंग्रेजी पोषाक केला होता तो मेमसाहेबांस

१ भाजी. २ सुगंध. ३ तांदूळ. ४ लोणी.

पसंत पडला नाहीं, असें दिसून आलें. मग मेमसाहेबांचा व इतर बायांचा बेगमसाहेबां कडून आदरसत्कार होऊन मेमसाहेब बंगल्यांत गेली आणि आमचें कुटुंब रथांत बसून घरीं आलें. बडेसाहेबांची माझी भेट झाली तेव्हां त्यांणींही मला सूचना केली कीं, नवाबाच्या मनांत आतां अभ्यास करण्याचें दिसत नाहीं; आणि आपल्याच्यानें आतां त्यांज वर बलात्कारही करवत नाहीं. म्यां उत्तर दिलें, किं "हें केव्हांच माझ्या लक्षांत येऊन गेलें."

## नवाबसाहेबांची इंग्रेजी अभ्यास करण्यांत अनास्था

मीं वर सुचविलें होतें कीं, लग्न झाल्या वर नबाबाची स्वारी परत जावऱ्यास आल्या नंतर ते नित्या प्रमाणें इंग्रेजी अभ्यास करण्यास बसण्यांत टाळाटाळ करूं लागले. पुढें ती अनास्था वाढत गेली. त्यांची आई बेगमसाहेब यांसहि वाटूं लागलें किं आतां या मुलाच्या मागें साहेबाचा धंवशा[1] नसावा. त्याचे हे ज्वानीचे दिवस ऐशआराम करण्याचे, त्यास हें इंग्रजी शिकणें आतां कशास पाहिजे ! अशी त्यांची कुरकुर माझ्या कानीं आली. व मेजर बार्थविक यांज कडूनही मला सूचना आली, किं नवाबसाहेबाचें आतां शिकण्या वर अगदीं लक्ष नाहीं व आपल्याच्यानें त्यांज वर तसा बलात्कारहि करवत नाहीं. म्हणोन तुह्मीं मुंबईस परत जाण्याची तजवीज करावी. मग मे महिन्याच्या आरंभीं आह्मीं नवाबसाहेबांची व कुटुंबानें बेगमसाहेबांची आज्ञा घेतली आणि इंदुरास आलों.

## इंदुरांत बडेसाहेबांची भेट घेतली तेव्हां त्यांहीं माझ्या करतां दुसरी तजवीज सांगितली

इंदुरांत गफूरखानाची छावणी त्या वेळेस प्रसिद्ध होती. तेथें आह्मीं उतरलों. बडेसाहेबांची भेट घेतली तेव्हां त्यांणीं आह्मांस सांगितलें, किं "एथें रखमाबाई किबे, गणेशदास कृष्णाजीच्या पेढीची मालकीण आणि ह्मीं जिचे मुलगे (किंवा नातु मला बराबर आठवत नाहीं) लक्ष्मणराव किबे हे दिवाणगिरीचें काम पाहत आहेत व मोठे श्रीमंत आहेत; त्यांणीं आह्मांस सांगून टेविलें आहे कीं जावऱ्याच्या नवाबाच्या वस्तादास आपल्या एथें मुलांस इंग्रेजी शिकविण्यास

[1] कटकट. (नम्रा)

ठेवण्याचें बाईसाहेबांचें फार मानस आहे. त्यांची तीच तनखा[1] आह्मीं चालवूं आणि पंक्तीचें ताटही चालवूं. आपण ते आमच्या कडेस राहतील असें करावें." मला बडे साहेबानें राहण्याची सल्ला दिली किं "ही चांगली सोई आहे, तुह्मीं धरावी." परंतु म्यां त्यांस माझ्या अडचणी सांगितल्या कीं, "तीर्थरूप गेल्या पासून माझा जीव फार उदास झाला आहे, आणि माझीं भावंडें लहान वयाचीं आहेत. त्यांस सोडून मला आतां इतक्या दूर देशांत राहणें प्रशस्त दिसत नाहीं. माझी मुंबईंतच कोठें तरीं सोई होईल. त्यांत माझी आजी फार म्हातारी आहे ती माझी फार वाट पाहत आहे. या लोकां वर कांहीं फारसा भरंवसा देतां येत नाहीं. केव्हांच मध्यें म्हणतील किं 'आतां आह्मांस तुमची फार चाकरी नको;' मग आह्मीं काय करावें?" साहेब म्हणाले, "बरें तुह्मीं त्यांची भेट तरी घ्यावी." मग मीं लक्ष्मणराव किबे यांस भेटलों व साहेबानें सांगितला मजकूर व माझ्या अडचणी सांगितल्या. त्या वरही त्यांचा आग्रह बराच पडला. तरीं माझा निश्चय या देशांत आतां न राहण्याचा होता तेव्हां म्यां तें कबूल केलें नाहीं. शेवटीं त्यांणीं मेजवानीस बोलाविलें. मग मीं ती मेजवानी घेऊन त्यांचा निरोप घेतला.

★

---

१ (फा.) वेतन, अलीकडे हा शब्द पुल्लिंगी योजिला जातो.

## २४ परत घरीं मुंबईस जाणें

पुढें आल्या रस्त्यानेंच मार्ग धरिला. पहिल्यानें इंदूर सोडून दूर गेलों इतक्यांत ढगें येऊन बरसातीचीं चिन्हें दिसूं लागलीं. घाटा वर आलों तों बराच पाऊस लागला. तसाच मीं घोड्या वर आणि कुटुंब व ल्हान मुलों म्यान्यांत पाऊस घेत-घेत सुतोंडीचा घाट उतरून खालीं कोंकणांत शिरलों. तेथें तर पावसानें पराकाष्ठा केली, आणि आमचे फार हाल झाले. म्हातारा मुसलमान सारवान[1] व शिपाई होते तेहि थकले. बरदारीस[2] दोन उंट होते तर अगदीं चालेनासे झाले. म्हातारा सारवान वारंवार म्हणे, "या अल्लाह! हमारे ऊंट रातदीन अल्लाहके पास येही दुआ मांगते है. इलाही हमको सब मुल्क दिखलावे लेकीन यह कोकन जैसा पहाडी मुलुख नही दिखलावे यह सच है!' हे त्या म्हाताऱ्याचे शब्द ऐकून मला त्याची व त्याच्या उंटाची फारच दया आली. सलीतेहि[3] फाटून गेले, तेव्हां घोटी मुक्कामीं भाड्याच्या गाड्या करून म्हाताऱ्या सारवानास व शिपायास चांगलें बक्षीस देऊन पुढें भिवंडी वरून ठाण्याच्या वाटेनें घरीं पोहचलों.

### घरीं बाईची व भावांची भेट

घरांत शिरल्या वर पहिल्यानें मोठ्या खेदानें झाली. बाईच्या (माझ्या आजीच्या) पाया वर डोकीं ठेविली. ती मला पाहतांच फारच रडूं लागली व मींही रडूं लागलों. मला घर सोडून अडीच पावणेतीन वर्षें झालीं. इतक्यांत आमचे तीर्थरूप नाहींसे होतील, त्यांच्या दुःखानें हें प्रवासाहून घरीं पहिलें आगमन होईल, असें अगदीं वाटलें नव्हतें तें झालें. मग बाईचें समाधान केलें. आतां घरांत वडील काय तो मीं. भास्कर बापाची आमासीं चालवित होता. एक भाऊ राघोबा[4] यास त्या काळीं काही नाकरी

---

१ (फा.) उंट हांकणारा.

२ (फा.) वाहाण्यास.

३ उंटावरची खोगिरें.

४ यानें १८३८ साली शाळा सोडून मुकरल पे-मास्तराची नोकरी होती. (१८४३.)

लागली नव्हती. व दुसरे दोन धाकटे भाऊ आत्माराम[१] व दीनानाथ ही शाळेंत विद्याभ्यास करित होते, अशी घरची व्यवस्था होती. मग मीं Mr. Bell. ( Teacher in the Elphinstone Institution ) ज्याचे हाता खालीं मीं पूर्वी होतों त्यांस भेटलों. ते मला पाहून फार खुष झाले आणि त्यांहीं मला पुसलें, "आतां तुझ्या मनांत काय आहे?" म्यां म्हटलें, "कोठें तरीं कांहीं सोय पाहावी हेंच मनांत आहे."

## पुढें एल्फिन्स्टन इन्स्टिट्यूशनमध्यें Asstt. English Teacher ची जागा मिळाली.

एल्फिन्स्टन इन्स्टिट्यूशनचे सक्तार George Pope होते असें मला वाटतें. त्यांस पूर्वीच Major Borthwick यांचें पत्र मज विषयीं सरकारी नात्यानें आलेंच होतें कि नवाबसाहेबांस इंग्रेजी पढविण्यांत चांगले श्रम घेतले, परंतु आतां ते प्रौढ दशेस आले. त्यांचो शिकण्याची मर्जी नाहीं म्हणोन मला रजा मिळाली आणि मीं परत मुंबईस गेलों. त्या वरून Mr. Bell यांस मज विषयीं वर्तमान कळलेंच होतें. म्हणोन त्यांहीं एका आसिस्टंट टीचरची ऐशीं रुपये दरमाहची जागा मज करतां तयार करून ठेविली होती ती लागलीच मला देण्यास कबूल केली. अकल्पित गोष्ट तूर्त फायद्याची म्हणोन मीं लागलीच पत्करिली.

## ही आसिस्टंटाची जागा मीं नऊदहा महिने चालविली त्यांत कोण कोण विद्यार्थी होते?

ही जागा मीं आठनऊ महिने पर्यंत चालविली. त्या वेळेस कोण कोणते विद्यार्थी माझ्या क्लासांत होते त्यांचीं नांवें:—सोराबजी जमशेदजी जीजीभाई, फरामजी धनजीभाई बाटलीवाले, सोराबजी मेहता, रामचंद्र लक्ष्मणजी, आत्माराम माधवजी,

१ १८५१ मध्यें जे आठ पहिले डाक्तर मुंबईत झाले त्यांपैकीं एक. पुढें प्रार्थनासमाजाचे अध्यक्ष. जन्म-२३ डिसें. १८२३. मृत्यु २६ एप्रिल १८९८. जे. पी, मुंबई युनिव्हर्सिटीचे फेलो, म्युनिसिपल कॉर्पोरेशनचे सभासद, मुंबई शहराचे शेरीफ व कांहीं दिवस मुंबई रॉयल एशियाटिक सोसाइटीचे उपाध्यक्षही होते. दादोबांनीं सुरू केलेलें धार्मिक व सामाजिक सुधारणेचें कार्य यानींच पुढें चालविलें. जास्त माहितीकरतां द्वा. गो. वैद्य यांनीं लिहिलेलें (१८९८) त्यांचें चरित्र पहा.

सर्वोत्तम सखारामजी आदिकरून दहा बारा मुलगे माझ्या क्लासांत होते. त्यांस इंग्लिश वाचन, अर्थज्ञान, भूगोल, इतिहास वगैरे विषयांत[१] मीं पाठ देत होतों आणि दुसरा सारा वेळ आमचा शिक्षकांचा मिस्तर बेल यांहीं Chemistry, Arnold's Physics व दुसरे कांहीं विषय शिकविण्या करतां एक वर्ग केला होता त्या वर्गांत मीं, नौरोजी फरदुनजी, Mr. Da Silva, ( पुढें हे अहमदनगरास स्कूलमास्तर झाले, ) नारायण दीनानाथ, रामचंद्र दीनानाथ, विनायक वासुदेव, रामचंद्र वासुदेव, मेहरवानजी, व दुसरे थोडे आसिस्टंट टीचर होते. या वर्गास तेथें मि. बेल दहा वरा पासून बारा वरा पर्यंत शिकवीत. पुढें चार वरापासून पांचा पर्यंत व रात्रीचे सात-आठांपासून तर नवदहा वरा पर्यंत मोठा श्रम घेऊन शिकवीत. या शिवाय ते शाळेंतील वरचे एकदोन वर्ग शिकवून सारी शाळा जातीनें पाहत असत. सान्या शिक्षकां जवळ थोडा वेळ उभे राहून ते कसे शिकवितात हें पाहत. Mr. Henderson यांज कडेस इंग्लिश लिटरेचर, हिस्टरी, जिओग्राफी हे विषय शिकविण्याचें काम असे.

---

१ दादोबा कोणकोणते विषय शिकवीत होते तें पुढील अभ्यासक्रमावरून पहा :—

**English Classes** ( Senior Division )

**Second Hindu Class.** No. 28.

Goldsmith's Geography, Asia; Catechism of the Maratha History, 10 pages; Translation of Children's Friend from Maratha into English, 20 pages; idiomatical Exercises, 50 pages.

**Third Hindu Class.** No. 24.

Blair's Reading exercises, 10 pages; Guy's Grammar, Syntax; Catechism of Maratha History, 10 pages; Translation of Children's Friend, Maratha into English, 20 pages; idiomatical exercises, 50 pages.

( Junior Division ) **First Class.** No. 32. Blair's Reading Exercises, 50 pages.

**Eight Class.** No. 10 – English Spelling Book, 28 pages.

**Mathematical Classes** ( Senior )

First Class . No. 23 — Bonnycastles Algebra surds.

( 12th Report of Elphinstone College and N. E. Society, 1839 )

## बोर्ड ऑफ् एज्युकेशन

### Board of Education

### या मंडळीची प्रथम स्थापना

पुढें १८४०-४१ सांत सरकारचें लक्ष या लोकांत विद्या शिकविण्याचें काम वाढविण्या कडेस बरेंच लागत गेलें, तेव्हां Native Education Society ( एतद्देशीय शिक्षा मंडळी ) व एक पगारी युरोपियन सक्रतारी यांच्या हातून आज पावेतों हें काम चालत होतें व ती मंडळी सर्व सरकारानें नेमलेल्या खर्चाची व्यवस्था पाहत होती. तें सर्व काम सरकारानें Board of Education या नांवानें एक मंडळी स्थापून तिनें पहावें असें केलें. त्यांत सहा[1] एतद्देशीय गृहस्थ, आणि सहा युरोपियन असावेत असा नियम केला व त्यांस एक युरोपियन सक्रतारी चारशें रुपये पगाराचा, व Office Establishment दिलें. त्यांत प्रथम सभासद कोण नेमिले यांचीं नांवें मला आठवतात तीं सांगतों.

### सुप्रीम कोर्टाचे त्या वेळचे मुख्य जज्ज हे अध्यक्ष

( आतां मला नांवें आठवत नाहींत. )

---

[1] बोर्ड ऑफ् एज्युकेशनचे केवळ तीनच देशी सभासद असत. पहा "–The Board of Education should consist of six members besides a President ... Three members should be elected by the Native Education Society and should be Natives. They would represent the feelings and wishes of the Native communities. Three members should be appointed by Government and these should represent the will of Government." ( G. D. 1840, vol. 13. p. 89 ) १८४०-४१ च्या बोर्ड ऑफ एज्युकेशनच्या रिपोर्टावर पुढील सह्या आहेत. W. C. Bruce (President), W. R. Morris, John McLennan, Jugunnath Sunkersett, Joseph Glen, Mahomed Ibrahim Mukba, Jamshetjee Jijeebhoy, C. Morehead (Secretary). ता. १० मार्च १८४२. हें नवें कार्यकारी मंडळ असून यापैकीं देशी सभासदांची नेमणूक ता. १९-१-४२ रोजीं झाली ( G. D. 1842, vol 32, p. 10. ).



### एतद्देशीय गृहस्थ

१ फ्रामजी कावसजी, २ जमशेटजी जीजीभाई, ३ बमनजी वाडये, ४ महमद इब्राहिम मकबा, ५ जगन्नाथ शंकरशेट, ६ मनमोहनदास देवीदास.

Dr. Morehead, Secretary

### सुरतेंत पहिल्यानें इंग्लिश शाळा स्थापित झाली तीज वर माझी नेमणूक

पुढें थोडे महिने या प्रमाणें एल्फिन्स्टन इन्स्टिट्यूशन मध्यें आसिस्टंट टीचराचें व स्वतः शिकण्याचें काम चालवित असतां नारायण दीनानाथ यांची नेमणूक Supreme Court त [ Translator व Interpreter जगन्नाथ पड (प्रभु?) यांणीं पेन्शन घेतलें याची जागा रिकामी झाली तिज वर ] Mr. Bell यांच्या सखत शिफारशीनें त्या वेळचे मुख्य जज्ज यांणीं केली व पुढें बोर्ड आव एज्युकेशन मंडळीनें माझी नेमणूक त्या वेळेस गुजराथ प्रांतांत पहिलीच इंग्रजी शाळा[१] स्थापित झाली तिज वर केली. ही शाळा सुरतेंत स्थापण्याची योजना केली. या शाळे वर इंग्लंडाहून इंग्लिश मास्तर आणण्याचें ठरविलें, परंतु तो येई[२] पर्यंत [ माझी नेमणूक ] मला ॲक्टिंग मास्तर दीडशें रुपये दरमाह करून सन १८४० त सरकारानें बोर्ड आव एज्युकेशन यांच्या शिफारशीनें केली.

★

१ सुरतेच्या कांहीं पारशांच्या विनंतीवरून ता. २० जुलै १८४० रोजी फ्रामजी कावसजी वगैरे मुंबईच्या पारशी पुढाऱ्यांनी या शाळेकरितां सरकारकडे अर्ज केल्याचा उपलब्ध आहे. ( G. D. 1840, vol. 13, p. 214 )

२ कायम हेडमास्तर मि. ग्रीन आल्यावरही दादोबांना हा दीडशें रुपये पगार चालू होता. ( G. D. 1843, vol. 23 ).

२५

## इ. स. १८४१ पासून—

माझी नेमणूक गुजराथ प्रांतांत सुरतेंत पहिल्यानेंच इंग्रेजी शाळा स्थापण्या करतां व तिचें काम चालविण्या करितां तूर्त आसिस्टंट मास्तर (Assistant English School Master) म्हणोन सन १८४०-४१ त झाली. तेव्हां मीं पायवाटेनें सुरतेस जाण्याची तयारी केली, त्या वेळेस सुरतेस जाण्याचे दोन मार्ग होते. एक जलमार्ग आणि दुसरा वसई वरून पायमार्ग.[१]

### पायवाटेनें सुरतेस जाणें व सुरत शहरास पोंहचणें.

मीं वसईस आल्या वर आपल्या आजोळीं मामाच्या एथें उतरलों. तेथें एकदोन दिवस मुकाम करून दांतिवऱ्याची मोठी खाडी उतरून केळवें, माहीम, तारापूर, डहाणू, संजान, उमरगांव, हे मुकामाचे गांव पाहत पाहत आठनऊ दिवसांनीं सुरतेस पोंहचलों. मीं मुंबईहून निघालों तेव्हां शेट खरशेदजी जमशेदजी आमच्या कुटुंबाचे यजमानांचे वडील पुत्र यांणीं मला एक भलामण[२] पत्र एदलजी मोदी

---

१ त्याकाळच्या मुंबई ते सुरतेच्या पायमार्गाच्या प्रवासाची कल्पना खालील दादोबांच्या प्रवासखर्चाच्या ता. १४-१-१८४२ च्या टांचणावरून होईल—

| | | |
|---|---|---|
| हमाल | घरापासून माहीमपर्यंत रु. | ०-१०-० |
| ,, | माहीमपासून वांद्यापर्यंत | ०-२-० |
| खटारा | वांद्रे ते बंदर | १-०-० |
| होडी | वांद्रे ते वसई | ०-५-० |
| खटारा | वसईबंदर ते वसई टौन | ०-४-० |
| ,, | वसई ते सोपारा | ०-८-० |
| ,, | सोपारा ते आगशी | ०-४-० |
| होडी | आगशी ते दंतोरा | ०-८-० |
| दोन खटारे दंतोरा ते सुरत @ १५. | | ३०-०-० |
| | एकंदर खर्च | ३३-९-० |

(G. D. 1842, vol. 31, p. 173.)

२ मूळांत 'भतम्ण' आहे. तो लेखनप्रमाद असावा. भलामण म्हणजे गुजराती भाषेंत शिफारस.

यांज वर दिलें होतें, म्हणोन त्यांच्या घराच्या शोध करित वांके बोर्डी एथें आलों. तेथें त्यांणीं माझा मोठा सत्कार केला. त्यांस फारशी चांगलें येत होतें. त्यांशीं त्या भाषेंत संभाषण झालें तेव्हां ते फार खुश झाले. ते म्हणाले, "जर तुह्मीं पारशी असतां तर मीं मोठ्या आनंदानें दोन दिवस माझ्याच घरीं बिऱ्हाडास तुह्मांस ठेविलें असतें." मग त्यांहीं मला गोपीपुऱ्यांत प्राणशंकर मेहताजीची शाळा होती तेथें नेलें. मीं त्या मेहताजी कडेस त्या रात्रीं बिऱ्हाडास राहिलों. त्यांणीं माझा व मज बराबर ब्राह्मण व गडी होते त्यांचा चांगला समाचार घेतला.

## दुर्गाराम व दुसऱ्या मंडळीची गांठ पडून माझ्या बिऱ्हाडाची सोय कबुतरखान्यांत पाहून ठेविली होती तेथें मीं गेलों.

दुसरे दिवशीं उजेडतांच माझ्या येण्याची बातमी शहरांत पसरली आणि सकाळीं दुर्गाराम मंछाराम मेहताजी, व कांहीं परभु विद्यार्थी माझ्या भेटीस आले. त्यांस माझ्या येण्याची बातमी पुष्कळ दिवसां पासून होती, म्हणोन त्यांहीं मज करितां कबुतरखान्यांत हरिश्चंद्रजी परभु यांच्या घरा समोर एक लहानसें दोन मजली घर पाहून ठेविलें होतें तें मला दाखविलें. मीं तें फार पसंत केलें व शेजारही मुंबईकर परभांचा पाहिला. त्यांचे मुलगे इंग्रेजी शिकण्याची फार मोठी आस्था बाळगित होते म्हणोन ते नेहमी माझ्या मोठ्या आर्जवांत असत. दुर्गाराम मेहताजीनेंहि त्या सर्वांस माझी जुनी ओळख सांगितली. त्या मेहताजीस तर माझ्या येण्या पासून फारच आनंद झाला याचें कारण पुढें लौकरच समजेल.

या प्रमाणें बिऱ्हाडाची सोई लागल्या वर एकदोन दिवसांनीं मीं इंग्लिश स्कूल कमिटीचे अध्यक्ष Mr. Elliot यांची भेट घेतली. हे त्या वेळेस सुरतेचे जज्ज होते. त्यांस पूर्वी लिहून आलेंच होतें. यांहीं मला आपल्या पाशीं बसून पुसलें, "तुह्मीं एथें काय शिकविणार?" म्यां म्हटलें, "English reading, writing, arithmetic and geography हे जे स्कूलांत शिकविण्याचे विषय असतात ते." हा शब्द ऐकतांच ते हंसले व म्हणाले, "What is the use of my old Grandmother Geography to these niggers[1] ?" बोलण्याच्या झपाट्यांत त्यांस असें वाटलें, किं ज्यांस मीं विचारतों आणि जे हे विषय शिकविणारे तेहि असे

---

१ तुळा "छोकराने वंचाव्या पछी मास्तर दादोबाए व्याकरण तथा भूगोळ विषाना प्रश्नो पूछवाने विनंति करी भेटले साहेब तिरस्कारथी बोल्यो के, "What! Grammar and Geography to the Blacks!!!" (दुर्गारामचरित्र, पृ. ११)

niggers च आहेत. मग Mr. Elliot यांणीं नेटिव कमेटीदारां पैकीं Ardeshir Dhanjishah Bahadoor आणि Ferozshah Dhanjishah Bahadoor यांस भेटायास सांगितलें ; म्हणजे हे गृहस्थ शाळे करतां सोईवार घर पाहून देतील. त्या वेळेस हे दोघे भाऊ सुरतेंत मोठेच वजनदार व नामांकित होते. आर्देशिर यांज कडेस सदरअमीनीचें काम, एर्जेटीचें काम आणि साऱ्या शहराची फौजदारीहि यांच्याच कडेस होती. फिरोजशाह हे Principal Sadar Ameen होते. असें म्हटलें म्हणजे सर्व शहराची दिवाणी, फौजदारी या दोघां भावां कडेसच होती असें म्हटलें पाहिजे.

## आर्देशिर धनजीशाह व फिरोजशाह धनजीशाह यांची भेट.

त्या वेळेस English School Master म्हणजे या दोघां भावांच्या आपल्या अधिकारा पुढें कांहींच गणण्यांत नाहीं. त्यांस वाटे हा एक अंग्रेजी मेहताजी. मीं त्यां जवळ गेल्या वर त्यांणीं मला बसविलें. परंतु ते आपल्या कामाकाजाच्या गडबडींतच चूर होते. थोडें बोलून मला सांगितलें कीं, " मोगली सराई एथें एक घर पाहून ठेविलें आहे तें इंग्लिश शाळे करितां तुह्मीं जाऊन पहा आणि आह्मांस तें कसें सोईवार आहे म्हणोन सांगा, म्हणजे आह्मीं त्याच्या भाड्याचा वगैरे बंदोबस्त करून देऊं. " मीं बरें म्हणून सलाम करून त्यांचा निरोप घेतला. मग दुसरे दिवशीं परभु लोकांच्या मुलांनीं व मेहताजी दुर्गाराम यांहीं आह्मांस तें घर दाखविलें. तें घर पूर्वीच्या एका मुसलमान गृहस्थाचा महाल होता. तो बराच मोठा असून मध्य ठिकाणीं विद्यार्थ्यांस येण्याजाण्यास फार सोईवार होता. तोच ठरला. पुढें इंग्रेजी शाळेस विद्यार्थ्यांस शिकण्या करतां जो सरंजाम व सामानसुमान लागतें त्याची सर्व तर्तूद होऊन शाळा सुरू झाली. परभांच्या मुलांतून बहुतकरून सर्वांस इंग्रेजी लिहितांवाचतां येत होतें व दुसरे नागर, कायत, वाणी, पारशी यांतून बहुतेकांस नवाच मूळाक्षरा पासून आरंभ करावा लागला.

## School House कसें होतें व तें समजल्या वर प्रथम व पुढें कोणकोणते विद्यार्थी आले ?

ज्यांची पहिल्या वर्गांत बसण्याची लायकी होती त्यांचीं नांवें :—**आनंदराव चापाजी†, धाकजी नारायणराव, सुंदर हरिश्चंद्रजी, सुंदरराव, कानदास**

† हा परभु पुढें विनायक वासुदेव Oriental Translator यांच्या ऑफिसांत दोनशें रुपये दरमहा वर हेड ट्रान्स्लेटर झाला.

मंछाराम ф, नवरोजी चंद्राभाई §, मोतीराम नरभयराम $, मकंदराय मणीराय ⊙, सुंदरराव मोरोबा, मेहरवानजी नसरवानजी भावनगऱ्या ‡, नानाभाई हरिदास ¶, बाळाजी पांडुरंग ≠.

---

ф हा डींडू वाणीआ जातीचा मुलगा पुढें इंजिनेरीच्या कामा वर मुंबईत ७०० किंवा ८०० रुपये दरमहा वर इंजिनेर झाला.

§ हाही बऱ्याच योग्यतेला चढला व मुंबईंत स्वतंत्र जमिनीचे व घरांचे प्लान वगैरे काढून पैसा मिळवूं लागला.

$ हा नागर जातीचा मुलगा लहानपणींच मेला, नाहीं तर हा मोठ्या योग्यतेला चढला असता.

⊙ हा नागर जातीचा मुलगा त्या वेळेस मोतीरामा पेक्षां थोडा उतरता होता. तो आतां सुरतेंत नेटिव जज्ज आहे. व थोडक्या वर्षा मागें स. १८७९ त हे बडोद्यास कांहीं दिवस मुख्य जज्ज होते. ते मला त्या वर्षी मीं बडोद्यांत असतां मला माझ्या घरीं भेटायास आले होते. परंतु माझी त्या वेळची स्थिति पाहून त्यांस मज विषयीं फारसा कळवळा आला नाहीं.

‡ हा त्या इंग्लिश स्कुलांत आला तेव्हां फार गरीब पारशाचा मुलगा होता. पुढें तो लाचारी मुळें फारसा अभ्यास न करितां भावनगरास गौरीशंकर उदेशंकर यांच्या आश्रयानें मुंबईस येऊन व्यापार करूं लागला. तो पुढें सन १८६३–६४ च्या सालीं कापसाच्या भरभराटींत मोटा व्यापारी बनला. त्याणें आपल्या भरभराटींत मला दहा हजार रुपये एका खेपेस कापसांत मिळवून दिले.

¶ नानाभाई हरिदास हा कायस्त जातीचा ठेंगण्या बांध्याचा मुलगा होता. हा शाळेंत थोडा भांडखोर व आपमतलबी स्वभावाचा मुलगा होता. त्याचा तेथें इंग्लिश स्कुलांत अभ्यास झाल्या वर पुढें इतर मुलग्यां प्रमाणें तोहि मुंबईस अभ्यास करण्या करितां आला. त्याणें कायदे शिकून पुढें वकिलीची परीक्षा दिली. पण त्याची इंग्रजी वकीलींत परीक्षा उतरली ना ! म्हणोन तो मद्रासेस जाऊन तेथें Law म्हणजे इंग्रेजी कायदे यांत परीक्षा देऊन त्याणें सनद मिळविली आणि मुंबईच्या High Court त वकिली केल्या वर पुढें कांहीं दिवस तेथें Acting Judge चें काम त्यास मिळालें. त्याला मुंबईंत येऊन पंचवीस तीस वर्षे झालीं असतील; परंतु हा कधींच माझ्या भेटीस आला नाहीं. या वरून पहा हे हिंदु लोक थोडे चढले म्हणजे किती आपमतलबी, बेपर्वा व कृतघ्न असतात हें सहज समजेल. यांच्या वर्तणुकी पाहून मला साफ दिसतें कि हे अद्यापि मोठे अधिकारास योग्य झाले नाहींत. माझा विद्यार्थी असून, त्यास आणखी मीं त्यांच्या बंगल्यांत भेटायास गेलों असतांहि, तो परत माझ्या भेटीस आला नाहीं. इतक्या हलक्या मनाचे हे लोक असतात.

≠ बाळाजी पांडुरंग हा खानदेशांतील असें मला वाटतें. बागलाण प्रांतांतील देशस्थ

## पुढें सहामाही परीक्षेंतून गुजराथी शाळेंतून आलेले विद्यार्थी.

पुढें सहा महिन्यांनीं सरकारी गुजराथी शाळेंतून परीक्षा होऊन इंग्लिश स्कुलांत विद्यार्थी प्रविष्ट होत गेले. त्यांचीं नांवें मला आतां बराबर आठवत नाहींत; परंतु जीं थोडीं आठवतात तीं येणें प्रमाणें:—तेथील मोठे पै वजीफदार पारशी बमनजी शेट यांचे मुलगे व नातू, व पंड्ये पार्वतीशंकर यांचे दोन मुलगे उच्छौराम व मीठाराम.

अशा या विद्यार्थ्यांनीं आमचें इंग्लिश स्कूल एकदोन वर्षांत भरून गेलें.

असें इंग्लिश स्कुलाचें काम दहा वरा पासून चार वरा पर्यंत चालत असे. सकाळ संध्याकाळीं दुर्गाराम मेहताजी बहुतकरून माझ्या बिऱ्हाडीं येऊन करमणूक करित असत. कधीं कधीं मींहि त्यांच्या एथें जाऊन ते व मीं गांवांत फिरायास जात असूं.

## दुर्गाराम मेहताजी यांची माझी जुनी ओळख व एथें त्यांच्या स्नेह्यांची दाटी व त्यांच्या मार्फतीनें गांवांत ओळख व त्यांच्या बुद्धीचा प्रकार.

या मेहताजीची व माझी जुनी सन १८२५ तली पहिली ओळख. त्या वेळेस

---

ब्राह्मणाचा मुलगा. हा सुरत कोर्टांतले बापू शास्त्री यांचे एथें शागीर्द असे. तो इंग्लिश स्कुलांत शिकायास आला तेव्हां फार गरीब अवस्थेंतच व गरीब स्वभावाचा होता. त्याणें मिस्तर ग्रीन (Mr. Green) हे या स्कुला वर मुख्य मास्तर आल्या वर त्यांचा आर्जव संपादन करून त्यांचा पट्टशिष्य जमला. ग्रीन साहेबांच्या मनाचा कल नास्तिक्य मता वर बराच होता. शिष्यानें गुरू वर खरीच ताण करून सोडिली. यांस ग्रीन साहेबांच्या वशिल्यानें Sir E. Perry यांच्या कारकीर्दींत इंटरप्रीटर आणि ट्रान्सलेटरची (Interpreter and Translator) जागा मिळाली. पुढें त्याची मिझाज व मज विषयींची बेपर्वा तर फारच वाढली. हे असे हिंदु लोक! नेटिव गृहस्थांचा अधमपणा आणि युरोपियन गृहस्थांचा थोरपणा याचा मला फार अनुभव आला.

१ उपनांव भालेराव. मुंबईंतील सर्वांचे एक कार्यकर्ते डॉ. अमृत नारायण भालेराव यांचे हे आजोबा. हे एक बुद्धिमान् विद्यार्थी होते, असें बोर्ड ऑफ एज्युकेशनच्या रिपोर्टांवरून दिसून येतें. त्या काळच्या प्रत्येक सार्वजनिक चळवळीमध्यें यांचें अंग होतें. पण त्यांनीं मराठींत ग्रंथलेखन न केल्यामुळें त्यांचें नांव लुप्त झालें आहे. '**प्रस्थानचंद्रिका**' नांवाचा यांचा एक गुजराती ग्रंथ (१८६२) अहमदाबाद येथील गुजरात व्हर्न्याक्युलर सोसायटीच्या संग्रहीं आहे.

असे मराठी पंतोजी तयार करण्या करितां एक मोठा क्लास केला होता, तसा गुजराथी मेहताजी तयार करण्या करितां पगारी विद्यार्थांचा वर्ग केला होता, त्या वर **रणछोडदास गिरधरभाई**[1] हे त्या वर्गास पढवायास होते. हे मोड जातीचे भडोजचे वाणी गृहस्थ होते. ते त्या वेळेस फार तरुण होते. ते कोठें शिकले व कसे शिकले याची मला बराबर माहिती नव्हती. परंतु कोण्या साहेबानें त्यांची Jervis साहेबांसं शिफारस केल्या वरून ते या कामास लागले. ते घरचे सुखी होते. त्यांची भडोजेंत सावकारी चालत होती. त्यांच्या मनांत नव्हतें, किं माझ्या मुलानें मुंबईंत मेहताजीचें काम करावें. परंतु त्या काळीं **रणछोडदास** हे अल्पवयी होते आणि मला साहेब मोठा रोजगार देईल व माझी प्रतिष्ठा वाढेल अशी उमेद धरून ते मुंबईस आले. ते फार बुद्धिमान् आणि उद्योगी होते. या वरून गणित, व्याकरण शिकून हे विषय गुजराथी मेहताजीस शिकविण्यांस लायक झाले. त्या पहिल्या गुजराथी मेहताजीच्या वर्गांत दुर्गाराम मंछाराम हे शिकत होते. तेव्हां मीं फार लहान होतों, तरी दुर्गाराम यांची माझी ओळख झाली असावी. पुढें शिकविण्याच्या कामाची फार जलदी होती म्हणोन जसे तसे हे पंतोजी तयार करून त्यांस त्यांच्या देशी शाळा नेमून दिल्या. दोन तीन वर्षे गेल्या वर या पंतोजीचा व मेहताजीचा वर्ग[2] चांगला हुशार करण्या

---

१ (१८०३–१८७३) आधुनिक गुजरातीचे जनक. यांना गुजराती छत्रे म्हणावयास हरकत नाहीं. Tucker नांवाचा एक जखमी इंग्रज शिपाई युद्धकामाला निरुपयोगी ठरल्या-मुळें भडोच येथील चर्चाची व्यवस्था पाहत असे. रणछोडनें इंग्रजी भाषेचें ज्ञान १८२४ सुमारास याच्याकडून मिळविलें. पुढें मुंबईचे लॉर्डबिशप कार हे भडोचला गेल्यावेळीं त्यांची व रणछोडची गांठ पडली व बिशपसाहेबांनीं त्यांची ने. ए. सोसायटीकडे शिफारस केली. बाळमित्र, हिंदुस्थानचा इतिहास वगैरे कांहीं मराठी पुस्तकांचीं त्यांनीं गुजरातींत भाषांतरें केलीं आहेत. बुद्धिवर्धक सभेचे (१८५१) ते पहिले अध्यक्ष होते. (जास्त माहितीकरितां '**Farther Milestones of Guj. Literature ' by D. B. K. M. Javeri, 1924** **व रा. सा. मोहनलाल रणछोड झवेरीनु चरित्र**–' चुनिलाल बा. मोदी, १८८८ पहा) दि. ब. कृ. मो. जव्हेरी हे यांचे नातु.

२ गुजराती शिक्षकांचा हा वर्ग पुनः एकदां मे १८१९ मध्यें सुरू झाला. दर शिक्षकाला पगार रु. १९–०–० व दर दिवसाला रु. ०–१–५ भत्ता मिळत असे. वर्गामध्यें पंधरा २६ विद्यार्थी होते. ता. ७ व १० सप्टेंबर रोजीं प्रो. ऑर्लेबार व प्रो. बाळशास्त्री जांभेकर यांनीं परीक्षा घेतली, व चवदा विद्यार्थी पास झाले. दुर्गाराम पहिला आला. ता. ११–९–

करतां मुंबईस बलावून आणिला त्या वेळेस माझी आणि दुर्गाराम यांची चांगली ओळख पटली. दुर्गाराम हे जातीनें फार बुद्धिमान् आणि मोठे मार्मिक बुद्धीचे विद्यार्थी होते. त्यांहीं माझा चांगला अभ्यास पाहून मज बराबर स्नेह ठेविला. तो माझा त्यांचा स्नेह पुढें वाढत गेला. मीं सुरतेंत गेलों तेव्हां त्याच्या पूर्वी दहा बारा वर्षें पर्यंत ते गांवांत सुधारणेचा उपदेश करित होते. परंतु त्यांस इंग्रजी येत नसल्या मुळें त्यांस त्या कामांत कोणाची मदत मिळत नसे. म्हणोन त्यांस माझ्या येण्यापासून जितका आनंद झाला, तितका बहुधा इतर कोणास त्या वेळेस सुरत शहरांत झाला नसेल. मला इंग्लिश शाळेचें काम आटोपल्या वर ते सर्व शहरभर फिरवीत, आणि ज्यांची भेट घेणें योग्य त्यांची भेट करवीत. **बमनजी भावनगरी, पेस्तनजी पंटी, माणकजी बखारी** यांचे घराण्यांतले **दादु, आत्माराम भुकणकर** म्हणजे जगप्रसिद्ध पुण्यांत व दक्षिण देशांत काकाजीचे पेढीवाले सराफ यांच्या गादी वर त्या वेळेस मंछुईअ होते ते व दुसरे कितीएक मोठे लोक यांच्या भेटी करविल्या. हे दुर्गाराम मेहताजी[1] मीं गेलों तेव्हां सर्व सुरत शहरांत मोठे प्रसिद्ध

---

३९ च्या आपल्या रिपोर्टांत परीक्षकांनीं त्याची मुक्त कंठानें स्तुति केली आहे. ती वाचून त्याला बोर्डानें तीस रुपयांचीं पुस्तकें बक्षीस दिलीं व त्याच्या पगारांत दरमहा दहा रुपयांची वाढ करावी, अशी सरकारला शिफारस केली. पास झालेल्या विद्यार्थ्यांना आपआपल्या शाळांमध्यें पाठवून नापास विद्यार्थ्यांची डिसेंबर मध्यें पुनः परीक्षा घेण्यांत आल्या. या बारांपैकीं सात पास झाले व राहिलेले पांच आणखी कितीही शिकविले तरी सुधारणा होण्याची आशा नसल्यामुळें त्यांनाही त्यांच्या शाळांमध्यें परत पाठविण्यांत आलें. ( G. D. 1839, vol. 14. pp. 102—173 )

१ (१८०९–१८७८) नागर ब्राह्मण. लहानपणीं मावशी वारल्यामुळें मावशीनें प्रतिपाळ केला, पण मावशीनें सावकाराच्या पेढीवर व्याजाला लावलेले पैसे त्यानें दिवाळें काढल्यामुळें बुडाले व बाप मंछारामही एकाएकीं वारला. त्यामुळें दुर्गाराम रोजगार शोधण्याकरितां मावशीसह मुंबईला आला. नेटिव एज्यु. सोसाइटीचा एक बक्षिसमारंभ पाहून त्याला शिक्षण चालू ठेवावें असें वाटलें व नॉर्मल्वर्गामध्यें विद्यार्थी म्हणून त्यानें नांव दाखल केलें. १८२६ सालीं त्याचा सुरतेच्या सरकारी शाळेवर शिक्षक म्हणून नेमणूक झाली. ही शाळा ता. १३ सप्टें. १८२६ मध्यें उघडली. १८३१ सालीं त्याचें लग्न झालें. कांहीं वर्षांनीं बायको वारली, व विधवाविवाहाच्या प्रश्नाकडे लक्ष गेलें व स्वतः विधवाविवाह करून समाजसुधारणेचें लोकांना उदाहरण घालून देण्याचें त्यानें ठरविलें. मथुरी नांवाची एक विधवा त्याच्याशीं विवाह करण्यास राजी झाली. पण त्याच्या आप्तांनीं व जातिबांधवांनीं भयंकर हाकाटी करून न्या. मू. रानड्यांप्रमाणें अभयगौरी नांवाच्या एका कुमारिकेशीं त्याचा विवाह लावून दिला ! ( **दुर्गारामचरित्र, पहा** ).

झाले होते. ते जेथें बसत तेथें तेथें लोकांस वाईट चाली सोडण्या विषयीं व चांगल्या देशाच्या हितकारक अशा चाली घेण्या विषयीं उपदेश करीत. त्यांत पुनर्विवाह चालू असावा, तो नाहीं या मुळें गरीब स्त्रीजातीस फार क्लेश व दुःखें



**दुर्गाराम मंछाराम मेहता**

सोसावीं लागतात, हा त्यांचा मोठा आवडता विषय होता. कधीं लोक चवताळले म्हणजे ते मेहताजीस म्हणत, "तमे पेहलां तमारी मासीनो पुनर्विवाह करी देखाडो." ती त्याची मावशी साठ पांसष्ट वर्षांच्या वयाची होती. ते निमूटपणें सर्व सहन करीत, आणि हळूच युक्तीनें त्यांज वर किंचितही रोष न दाखवितां

म्हणत–" हां हुं तो घणो खुशी छौं. तेनी मर्जी. " त्यांची बोलण्याची व उपदेश करण्याची युक्ति फारच सुंदर असे. प्रतिपक्ष करणारास त्याच्याच शब्दांत पकडून घेण्याची युक्ति त्यांस फार चांगली माहीत असे. त्यांचें बोलणें फारच सयुक्तिक असे. बोलण्या मध्यें राग असल्याचें तर मीं त्यांचें कधीं पाहिलेंच नाहीं. इतकें असून ते फार खोल व मोठे मार्मिक बुद्धीचे असत. त्या काळीं जितकीं गणित शास्त्रा वर Jervis साहेबानें पुस्तकें प्रसिद्ध केलीं होतीं तीं तर त्यांस चांगलीं अवगत होतीं. परंतु पुढें बाळ गंगाधर शास्त्री यांहीं Differential and Integral Calculus म्हणजे शून्यलब्धि गणित[१] मराठींत केलें त्या वरून त्यांणीं हा गणितशास्त्राचा भागही स्वतःच्या बुद्धीनें लावून घेतला. त्यांची बुद्धि खोल व मार्मिक होती म्हणोन त्यांस गणितविषय फार आवडत असे. बहुधा, त्या वेळचे विद्यार्थी–Mathematics याला धिःकारून माथाकुटी म्हणत; अशी त्या कठीण शास्त्रा वर बहुधा सर्वांची अभिरुचि नसतां दुर्गाराम यांहीं त्या वेळेस जर्विस साहेबानें जो सर्व Hutton's Course of Mathematics व Pasley's Practical Geometry म्हणजे पास्लेची कर्तव्यभूमिति[२] ह्या सर्व विषयांचा गुजराथींत तरजुमा केला होता त्या वरून आपण स्वतः विद्यार्थ्यांस मोठ्या उत्साहानें शिकवीत.[३]

मीं गेलों त्याच सालीं किंवा लगबग पुढल्या सालीं एथील नवाबसाहेब निवर्तले.[४]

---

१ या पुस्तकाचा शोध लागलेला नाहीं.

२ (१८२६) जगन्नाथ शास्त्री क्रमवंत यांच्या साहाय्यानें तयार केलें. गुजराती भाषांतरही याच सालीं प्रसिद्ध झालें. (मुं. रॉ. ए. सो.)

३ शिक्षक या दृष्टीनें दुर्गारामाची इन्स्पेक्टर लोकांनीं मुक्तकंठानें स्तुति केली आहे. प्रो. ग्रीन (**Report of the Board of Education for 1846 No VI, pp. 53 – 54**) व मि. ग्रॅहॅम (**Rept. of Board of Ed. 1851 – 52 pp. 67–71**) यांचे शेरे पहा. " गुजरातेंत ज्या सरकारी शाळा आहेत, त्यांची तपासणी करण्याकरितां प्रो. आर्लिबार हे गेले होते...त्यांत दुर्गाराम मंछाराम मेहताजी यांच्या शाळेंतील मुलें जशीं परिक्षेस उतरलीं तशीं आमच्या ऐकण्यांत आलें आहे कीं, साऱ्या मुंबई खात्यांत कोणत्याही एतद्देशीय भाषेच्या शाळेंत उतरलीं नसतील. या शाळेंत हल्लीं सुमारें २७५ मुलें आहेत व त्या सर्वांस मेहताजी हे एक असे असतां ती शाळा अशा पद्धतीनें चालली आहे कीं बहुधा अशी तर तीच. " **प्रभाकर** – ता. २७ मार्च १८४२.

४ सुरतेचे नवाब ता. ८–८–१८४२ रोजीं वारले, आणि पुरुष वारस नसल्यामुळें नवाब ही पदवी बंद पडली. (Govt. of India's letter No. 643 of – 9 – 9 – 43. **Political Dept.** vol 88/1417 of 1842 p. 26)

त्या वेळेस सुरतेंत त्यांच्या मरणानें मोठा हाहाःकार होऊन सर्व लोकांनीं त्यांच्या मरणाच्या शोकास्तव सारा दिवस हरताळ पाडिली. शहरांत सर्व बायकांपोरां सुद्धां सर्व लोक नवाबसाहेबाची मोठी तारीफ करित होते. म्हणत कीं, मोठा दयाळू मनुष्य होता. त्यांच्या मागें त्यांची गादी कोणास मिळाली नाहीं. त्यांची खासगी मिळकत मात्र त्यांच्या कन्येस व जांवई जाफरअली यांस मिळाली. हे नवाब बडोद्याचे गायकवाडाचे पदरचे **नवाब मीर सरफराजअली यांचे पुत्र.**

पुढें सन १८४३ सांत सुरतेच्या English School वर इंग्लंडाहून Mr. Henry Green (मिस्तर हेनरी ग्रीन) हे मुख्य मास्तर आले.[1] त्यांहीं मजपासून मुख्य मास्तराच्या कामाचा चार्ज घेतला, अर्थात् मीं आंता त्यांच्या हाता खालीं मदतनीसाचें काम करूं लागलों. त्यांहीं पहिले मुख्य दोन वर्ग शिकण्याचें काम चालविलें, आणि मीं इतर सर्व खालचे वर्ग शिकवूं लागलों.

## मास्तर हेनरी ग्रीन हे इंग्लंडाहून हेड मास्तर आले त्यांचा स्वभाव व विद्वत्ता.

Mr. Green हे मोठे विद्वान् असून स्वभावानें फारच चांगले. मजशीं तर अगदीं बरोबरीच्या नात्यानें वागूं लागले. थोडक्याच दिवसांत हे सर्वांस मोठे प्रियकर झाले. ते मुलांशीं बोलतां बोलतां गुजराथी तेव्हांच चांगलें व शुद्ध बोलायास शिकले. त्यांचा वर्णोच्चारही मुलांच्या व ग्रामस्थ लोकांच्या सहवासानें

---

१ ता. १५ मार्च १८४३ रोजीं मुंबईस पोहोंचले. या दिवसापासूनच जरी त्यांची सुरत शाळेचे हेडमास्तर म्हणून दरमहा तीनशें रुपयांवर नेमणूक झाली, तरीपण ता. १ मे पर्यंत त्यांना येथील शिक्षणपद्धतीचें निरीक्षण करण्याकरितां एल्फिन्स्टन नेटीव इन्स्टिट्यूशनमध्यें ठेवून घेण्यांत आलें. (G. D. 1843, vol. 22) आगष्ट १८४९ पासून प्रि. हार्कनेसच्या रजेच्या मुदतींत ते एल्फिन्स्टन कॉलेजचे प्रिन्सिपाल झाले (G. D. 1849, vol. 20) पुढें त्यांची पुणें कॉलेजमध्यें बदली झाली व तिकडून Parsi Benevolent Institution मध्यें त्यांना मुख्याध्यापक नेमण्यांत आलें. ते अधेयवादी असल्यामुळें मिशनरी लोक त्यांच्यावर नाराज असत. गुजराती 'खगोल विद्या' (१८५०) व A collection of English Phrases with their Idiomatic Guj. equivalents (१८५१) हीं पुस्तकें त्यांनीं लिहिलीं. विद्यार्थ्यांमध्यें ते फार प्रिय होते. Kaikhusro Hormasji यांनीं Indian career of Prof. H. Green नांवाचें पुस्तक प्रसिद्ध केलें आहे. (O. C. S. 1654. p. 448.) परंतु तें उपलब्ध नाहीं. ता. १४ आगष्ट १८५४ रोजीं वारले.

फारच चांगला झाला. दुर्गाराम मेहताजीचें तर त्यांशीं फारच संघट्टन जमलें. त्या मेहताजीनें त्यांज पाशीं रात्रीस येऊन आपलें गणितज्ञान वाढविलें व त्यांच्या बुद्धीची ते मज पाशीं वारंवार तारीफ करूं लागले. मेहताजीपासून व मुलांपासून Mr. Green यांहीं त्या देशाच्या चाली व रीतिभाति यांची फार माहिती करून घेतली. ते माझ्या घरीं केव्हां केव्हां येऊं लागले. एकदां त्यांहीं माझ्या घरचा लहानसा पुस्तकसंग्रह पाहिला तेव्हां त्यांहीं ख्रिस्ती शास्त्रा वर त्या संग्रहांत बरेच ग्रंथ पाहून आश्चर्य मानिलें व आल्या वर त्यांहीं थोडक्याच दिवसांनीं मला पुसलें, किं "तुह्मीं Sir Walter Scott यांचीं Novels वाचलींत काय ?" म्यां म्हटलें, "मीं त्यांच्या ग्रंथाची तारीफ ऐकतों परंतु म्यां त्यांचें एकहि Novel वाचलें नाहीं." मग त्यांहीं मला प्रथम त्याचें हार्ट ऑफ मिडलोथियन (Heart of Midlothean) व पुढें अनुक्रमानें 'दि ब्लॅक ड्वार्फ (The Black Dwarf), ओल्ड मॉर्टालिटी (Old Mortality), राबराय (Rob Roy) या कादंबऱ्या वाचायास सांगितल्या, आणि असें सांगितलें, किं "या पुस्तकांत पुष्कळ Provincialism म्हणजे देशभाषाप्रकार जागोजाग आढळतील ते व दुसरे भाषेचे प्रकार समजायास अवघड पडेल. म्हणोन त्या त्या स्थळीं तुह्मीं खुणा करून ठेवाव्या आणि मला पुसावें म्हणजें मीं तुह्मांस चांगलें समजावून देईन." याच प्रमाणें पुढें सर एडवर्ड बुल्वर्स यांचें युजिन आरम (Sir Edward Bulwer's Eugine Aram), क्यापटन मारिअट याचें पीटर सिंपल (Captain Marryat's Peter Simple), डिकिन्स याचें पिक्विक् पेपर्स (Dickens' Pickwick Papers), मान्डी वाल्टेर याचें कँडिडस—(Mondi Voltaire's Candidus) हे ग्रंथ वाचायास सांगितले. ते म्यां मोठ्या हौसेनें वाचले. व जेथें मला लागले नाहींत तेथें मीं रात्रीं त्या जवळून समजून घेतले. हा त्यांचा मज वर मोठाच उपकार झाला. कारण हें मला त्यांहीं English Literature चें नवें रसभरित क्षेत्र प्रथम दाखविलें. हे जे नामांकित सर वॉल्टर स्कॉट, बुलवर, मारियेट कहाण्या व कादंबऱ्या लिहिणारे ग्रंथकार, व डिकिनसारखे तात्कालिन सर्व प्रकारच्या लोकांचे व्यवहार यांचें आल्हाद-कारक चित्रकार, यांचे ग्रंथ वाचले म्हणजे त्यांच्या अद्भुत कल्पनाशक्तीनें विचक्षण पुरुषांचे मनाचें रंजन झाल्या वांचून कदापि राहणार नाहीं. व असें या ग्रंथा विषयीं सांगितल्या वांचून मलाहि एथें राहवत नाहीं.

## सर राबर्ट कीथ आर्बथ्नट, अमदाबादचे कलेक्टर यांची सुरतेस बदली व त्यांचें माझें संघट्टण.

मीं सुरतेस गेल्या वर लागलीच एक दीड वर्षांनीं तेथील कलेक्टराचे जागे वर अहमदाबाद एथील कलेक्टर सर राबर्ट कीथ आर्बथनट, बारोनेट यांची बदली झाली. त्यांहीं येतांच आपल्या आफिसांत परभु[1] नारायणराव यांज कडून शोध केला, किं "सुरतेंत मला कोणी इंग्लिश व गुजराथी जाणणारा व शिकविणारा मिळेल काय?" त्यांहीं लागलेंच साहेबांस माझें नांव सांगितलें, किं " एथें नुकतेच इंग्लिश स्कूल शिकविणारे मुंबईहून मास्तर आले आहेत ते फार हुशार आहेत ते आपल्यास शिकवितील." मग साहेब म्हणाले, " ते आह्मांस भेटायास येतील काय?" मग नारायणजी व त्यांचे दुयुम[2] हरिश्चंद्रजी यांहीं रात्रीं आह्मांस साहेबांचा निरोप सांगितला. त्या वरून मीं सवड पाहून एक दोन दिवसांनीं सकाळीं पुतळाई वाडीत त्यांच्या बंगल्यांत त्यांची भेट घेतली. ते मोठे सज्जन व कुलीन असें त्यांच्या भाषणा वरून मला दिसलें. त्यांहीं मला विचारिलें, किं "तुह्मीं मज करितां ज्या गुजराथी अर्जी मज कडेस येतात त्या रोमन अक्षरांत लिहून मला एक दोन तास समजवाल तर मीं तुमचा फार उपकारी होईन." मग मीं बरें म्हटल्या वर त्यांहीं मला एक दोन अर्जा दिल्या. मीं रात्रींच त्या इंग्रजी अक्षरांत लिहून दुसरे दिवशीं त्यांस नेऊन दाखविल्या. तें पाहून त्यांस मोठा संतोष वाटला. मग म्हणाले, "तुह्मांस सकाळीं एथ पर्यंत चालून येण्यास फार मेहनत पडेल तर मीं आपलें तट्टू तुह्मां करितां नित्य पाठवित जाईन." म्यां नम्रपणानें पुष्कळ नाहीं म्हटलें तरीं त्यांणीं न ऐकतां ते नित्य सकाळीं आपला तट्टू मज कडेस बसायास पाठवीत. असा क्रम कांहीं महिने पर्यंत चालला, तेव्हां त्यांचें माझें अनायासें फार संघट्टण पडलें. ते मला वारंवार विचारीत, किं "तुह्मीं इतकें इंग्लिश कोठें शिकलेत, व इतकें पंतोजीपणाचें काम कां करितां?" म्यां म्हटलें, "ही सर्व इंग्लिश सरकारची

---

१ येथें हा शब्द कारकून या अर्थी योजिलेला दिसतो. त्या काळीं परभू लोकांचा कारकुनीच्या पेशांत इतका भरणा होता कीं त्यांच्या जातीचें नांव धंद्याला मिळालें. 'रामा' हा गडीवाचक शब्द असाच झाला आहे! याच्या उलट शेणवी हें पंतोजीवाचक व्यवसायाचें नांव जातीला मिळालेलें आहे.

२ (फा. दुयुम) रा. बेल्सरे यांनीं आपल्या गुजराती-इंग्रजी कोशामध्यें संस्कृत 'द्वितीयम्' पासून हा शब्द व्युत्पादिला आहे, तो बरोबर दिसत नाहीं.

कृपा. मला सरकारी शाळेंत इंग्लिश मास्तरांनीं पढविलें; आणि सरकारानें मला हें काम सांगितलें." त्या वरून ते म्हणाले, "हें अधिकाराचें काम नाहीं. मीं तुझ्मांस मामलीचें काम सांगितलें तर कराल?" म्यां मोठ्या खुशीनें म्हटलें, "होय." "परंतु मामलेदारांस आरंभीं शंभर रुपयांपेक्षां अधिक दरमहा मिळत नाहीं. असें तर आहे" ते म्हणाले. मग म्यां म्हटलें, "मला या जागे वर १५० रुपये दरमाह मिळतो." ते म्हणाले." इतका दरमहा तुझ्मांस पहिल्यानें मिळणार नाहीं." मग ते उगीच राहिले. परंतु मीं त्यांस नम्रतेनें म्हटलें," तूर्त नाहीं तर नाहीं परंतु केव्हां तरीं माझ्या दैवानें आपण मोठ्या हुद्या वर गेलां तर मला विसरूं नका." ते म्हणाले,"मीं तुला विसरणार नाहीं." ते मला नित्य बसायास तट्टू पाठवूं लागले तेव्हांच गांवांत मोठें आश्चर्य वाटलें, किं या नवे कलेक्टराची माझी ओळख नसतां याणें मज वर इतकी मेहरबानी केली.

सन १८४३ त मीं एक वर्षा पासून नर्भयराम शास्त्री यांज पाशीं लघुकौमुदी पढों लागलों. सकाळीं ती पढावी आणि लागलेच त्यांत पाणिनीचीं अष्टाध्यायींतलीं सूत्रें येतात, तीं अक्षरशः व पदशः समजून घेऊन त्यांचें महाराष्ट्र भाषांतर करावें. असा क्रम चालला असतां सन १८४३ त त्यांतील सारें सुबंत प्रकरण आपल्या हातानें सुंदर लिहून ठेविलें तें पुढें बोर्ड आव एज्युकेशन (Board of Education) या मंडळी कडेस आश्रय देण्या करितां पाठविलें. त्यांहीं तें त्या वेळचे मोठे प्रख्यात विद्वान् बाळ गंगाधर शास्त्री यांज कडेस अभिप्राया करतां पाठविलें. त्यांहीं तें सावंत लक्ष लावून तपासलें; परंतु त्यांतलीं पाणिनीचीं अष्टाध्यायींतलीं सूत्रें हीं वेदोक्त आहेत तीं तूर्त छापून अशी ओंवळीं केलीं असतां लोकांस आवडणार नाहींत असा आपला अभिप्राय दर्शविला, या वरून तो ग्रंथ पुढें न चालवितां मीं तसाच बांधून ठेविला. तो पुढें माझ्या संग्रहीं तसाच राहिला. माझे मित्र बाळ शास्त्री यांनींहीं जो त्या ग्रंथा विषयीं आपला अभिप्राय दिला तो त्या काळच्या समजुतीस अनुसरून होता.[१] मला त्यांत कांहीं फारसा विषाद वाटला नाहीं. कांहीं महिन्यांची माझी मेहनत मात्र फुकट गेली, परंतु तसें मला संस्कृत व्याकरणाचें थोडें ज्ञान झालें.

---

१ या लोकमतासंबंधी, गो. ना. माडगांवकर **मुंबईवर्णनांत** (१८६३) लिहितात, 'आमचे कित्येक भोळे व नैष्ठिक ब्राह्मण छापलेल्या कागदांस स्पर्श करण्यास भीत असत, आणि अद्याप मुंबईंत व बाहेरगांवीं छापील कागदास शिवत नाहींत, व छापलेलें पुस्तक

पुढें हा ग्रंथ प्रसिद्ध होईल अशी मला आशा होती.[1]

मीं एथें आल्या वर नर्भयराम शास्त्र्या कडून संस्कृत भाषेचें बरेंच ज्ञान करून घेतलें. त्यांज पाशीं सारें भागवत वाचिलें.[2] पुढें आमचे त्या शहरांत नवे झालेले परम मित्र व विख्यात विद्वान् दिनमणि शंकर शास्त्री यांचे विद्यार्थी—यज्ञेश्वर शास्त्री यांज पाशीं शाकुंतल नाटक वाचून घेतलें. त्याचा पहिला अंक मीं जसा मुळांत आहे तसा मराठींत गद्यपद्यात्मक केला.[3] त्याचा जर कोणी त्या काळीं प्रयोग करून दाखविला असता तर त्या पासून ऐकणारांस फार आनंद झाला असता. परंतु तसा योग घडून येण्याचा संभव फारच दूर होता.

✶

---

वाचीत नाहींत असे पुष्कळ सांपडतील (पृ. २४८) शाईत कांहीं वर्ज्य पदार्थ असतात अशी लोकांची समजूत होती. 'रावसाहेब मंडलीक ज्या पोथ्या सोंवळ्यानीं वाचीत त्या हस्तलिखित असत.' (रा. हवालदार, **मंडलिकांचें चरित्र**, पृ. २७७) शिळाछापाच्या शाईमध्यें लाख, साबण, रुमामसतकी, मेणपिवळें आणि चर्बी अथवा तिच्या जागीं तूप असे पदार्थ पडत. या शाईची कृति देऊन 'दिग्दर्शन'कार लिहितात, "या छापाच्या शाईत चर्बी पडत असती, यामुळें छापलेलें पुस्तक अपवित्र अशी लोकांची समजूत आहे, म्हणोन याविषयीं कांहीं लिहिलें पाहिजे. हें 'दिग्दर्शन' ज्या छापखान्यांत छापतात तेथें चर्बीच्या ठिकाणीं तुपाचा उपयोग करतात, व तेणेंकरून काम चरबीप्रमाणें होतें, परंतु तुपामध्यें चर्बीप्रमाणें तेज नाहीं. म्हणोन कांहीं मेहनत जास्त पडती"–**दिग्दर्शन** [पुस्तक १ (१८४०-४१) अं. ८. पृ. २११.]

१ मोठ्या व्याकरणाच्या **पूरणिकेंत** (१८८१, पृ. ६) 'तो ग्रंथ आतां इंग्लंडांत इंडिया लैब्ररी एथें सुरक्षित राहण्याकरितां पाठविण्याचा माझ्या मनांत निश्चय झाला आहे,' असें दादोबा लिहितात. १९०३ च्या **लघुव्याकरणाच्या** आवृत्तीवर हा ग्रंथ छापणार असल्याची जाहिरात आहे.

२ ता. १८ सप्टें० १८४२ च्या '**प्रभाकर**' पत्रांत भागवतासंबंधी दादोबांचें पत्र प्रसिद्ध झालें आहे.

३ याचा थांग लागत नाहीं. संस्कृत शाकुंतलाला मराठी पेहराव चढविण्याचा हा पहिलाच प्रयत्न होय. यानंतर चंद्रिका मासिक (१८५४), परशुरामपंत गोडबोले (१८६२), रा. भि. गुंजीकर (१८६७), कृष्णशास्त्री राजवाडे (१८६९), ब. पां. किर्लोस्कर (१८८१) वगैरे मंडळींचीं भाषांतरें प्रसिद्ध झालीं.

२६

## × आर्देशिर धनजीशाह[1]

**सुरतेंत हरगोवंद स्टोर या नामांकित पेढीचे मालक शेट दुल्लभदास हे निवर्तल्या वर त्यांच्या दौलतीच्या वारसाचा दावा करणाऱ्या दोन बाया एक मंछा आणि दुसरी प्रेमकोर यांचा मोठा तंटा चालला. तंट्यांत आर्देशिर धनजीशाह बेहादूर यांज वर पक्षपात केल्याचा व लांच घेतल्याचा आरोप घेऊन त्यांस नव्या आलेल्या जज्जानें सस्पेंड केलें त्या खटल्यांत माझी त्यांस मोठी मदत.**

पुढें थोडक्याच दिवसांनीं सुरतेचे सदरअमीन आर्देशिर धनजीशाह बहादूर यांणीं एका मोठ्या हरगोवंद स्टोर या नामांकित पेढीच्या दौलतीच्या वारशा करतां भांडणाऱ्या दोन बाया यांच्या तंट्याच्या चौकशींत मोठी लांच घेऊन तरफदारी केल्याचा आरोप आला होता. त्याची चौकशी चालविण्यांत मुंबई सरकारा कडून Mr. Luard यांस जज्ज नेमिलें. ते येण्याच्या पूर्वीच त्यांस या खटल्याची आंतून माहिती मिळाल्या वरून ते मोठ्या निकरानें या खटल्याची कची चौकशी करूं लागले. त्या काळीं आर्देशिर हे सुरतेंत मोठे प्रचंड नेटिव अधिकारी होते. त्यांज कडेस दिवाणीचें,[2] फौजदारीचें

१ (१७९६–१८५६) हा सुरतशहराचा ईस्ट इंडियाकंपनीनें नेमलेला कोतवाल (Warden General) होता. याचा वडील कंपनीसरकारच्या नोकरीमध्यें बडा पारसी अधिकारी होता. त्याचा खून झाल्यामुळें याचें व त्याच्या बंधूचें शिक्षण व संगोपन कंपनी-सरकारच्या खास आश्रयाखालीं झालें व पुढें सुरतेच्या कोतवालीचें काम याच्याकडे सोंपविण्यांत आलें. भिल्लांचें पारिपत्य यशस्वीपणें केल्याबद्दल त्याला अठरा गांवांची जहागीर देण्यांत आली. कंपनीसरकारचा तो एक नबाबच मानला जात असे. शहररक्षणाप्रमाणें न्यायदानाचें कार्यही तो चांगल्या प्रकारें करी. कोणाकडूनं लांच किंवा देणगी तो घेत नसे. दानधर्मांत त्यानें पन्नास लाखांवर खर्च केले असें म्हणतात. याचा गुणानुवाद ऐकून स्वामिनारायणानें त्याला एकदा भेट दिली व प्रसाद म्हणून एक पागोटें दिलें. या देणगीचें दर्शन घेण्याकरितां स्वामिनारायण पंथाचे लोक दरवर्षी तिकडे अद्यापि यात्रा करतात. मरतांना हा निष्काञ्चन स्थितींत वारला. **Parsi Lustre on Indian Soil, by H. D. Darukhanawala, vol. I, 1939, pp. 309–10.**

२ (फा. दिवानी) Civil.

आणि एजंटीचें अशीं तीन कामें मोठीं होतीं. हीं कामें त्यांज कडेस पुष्कळ वर्षांपासून चालत होतीं. मीं ल्हान होतों तेव्हांच ऐकत होतों, किं आर्देशिर कोतवालाचा सुरतेंत इतका अंमल कडक आहे, आणि असा बंदोबस्त आहे, किं लोकांनीं घराचे दरवाजे रात्रीं उघडे ठेवून निर्धास्त निजावें.[1] असा त्या काळीं याचा अंमल गाजत होता. तो आतां इ. स. १८४३–४४ सांत मोठ्या संकटांत आला. Mr. Luard(ल्युअर्ड)सिट[2] (?) हे साहेब सुरतेंत जज्ज येतांच हे खटले फौजदारींत चालवायाचें सुरू केलें, आणि आर्देशिर यांस सस्पेंड करून जामिना वर टेविला. त्या खटल्याचें स्वरूप असें होतें, किं हरगोविंद स्टोर यांच्या पेढीचे दौलतीचे वारस शेट दुल्लभदास हे मयत झाले तेव्हां त्यांस पुत्र नव्हता.



आर्देशिर धनजीशाह

पहिल्या बायकोची एक कन्या नामें प्रेमकोर ईस एक दोन ल्हान मुलगे होते; ही एका पक्षानें "अौंच वारस" म्हणोन भांडत होती. आणि दुसरी दुल्लभशेटची

१ पहा. "His was the boast that none need shut his gate as long as he was alive." **Parsi Lustre on Indian Soil, p. 310.**

२ सिटी मॅजिस्ट्रेट (?)

द्विर्तीय संबंधाची विधवा स्त्री नामें **मंछा** हीस संतान नव्हतें. ही " मीं वारीस " म्हणोन दुसऱ्या पक्षाची भांडत होती. असा त्या दोघी बायांचा तंटा चालत असतां पेढीची मोठी दौलत तिची अफरातफर[१] होण्याचा मोठा संभव होता. या कारणानें त्या खटल्याची कची चौकशी आर्देशिर याच्या कडे आल्या वर यांणीं ती बरीच लांबणी वर घातली. आर्देशिर कोतवाल यांचा कल **मंछे** कडेस आहे असें दिसून आलें. ती **मंछा शेटाणी** तरुण व रूपवती होती म्हणोन आर्देशिराची तिज वर कृपादृष्टि होऊं लागली असें त्या वेळेस सर्व लोक म्हणत होते. त्यांणीं त्या वेळचे कोर्टाचे बापुशास्त्री यांस आपल्या कडेस वळवून घेतलें. त्यांहीं मिताक्षरेंतील शास्त्रार्थ दिला, किं जर कोणी निपुत्रिक मरतो आणि त्याणें आपल्या दौलतीचें व्यवस्थापत्र केलें असलें तर मिताक्षरे[२] प्रमाणें याज्ञवल्क्याच्या मतें खालीं लिहिलेल्या वचनास अनुसरलें पाहिजे. तें वचन येणेंप्रमाणें—

**पत्नी दुहितरश्चैव, पितरौ भ्रातरस्तथा**[३] ॥

याच्या आधारा वरून **मंछा शेटाणी** हीच दुलभशेटची वारीस. **प्रेमकोर** कन्या ही वारीस होत नाहीं. प्रेमकोरच्या पक्षाचे लोक होते ते म्हणत, " ती पुत्रवती कन्या आहे. आणि तिचे मुलगे जरीं लहान आहेत तरीं पुढें दौहित्र म्हणोन पिंड देण्यास त्यांचाच अधिकार आहे. " अर्थात् जो पिंड देणारा तो रिक्थ म्हणजे मृताची मिळकत घेणारा होतो, असा शास्त्रार्थ सांगून तिच्या पक्षास मिळाले. परंतु **आर्देशिर** सारखा वजनदार अमलदार याचा कल पाहून पुष्कळ लोक **मंछाच्या** पक्षाचे जहाले. व त्यांत बहुतेक त्याची मर्जी संपादन करण्या साठींही तिच्या पक्षाचे जहाले. अर्थात् **मंछाचा** पक्ष लोकांच्या दृष्टीस निर्बळ असतांहि सबळ होऊं लागला असें मला दिसून आलें. घरोघर लोक जेव्हां खानगीची भाषणें करीत तेव्हां **प्रेमकोरचा** पक्ष सबळ आहे असें म्हणत. परंतु **आर्देशिर बहादूर** यांची भीति म्हणून उघडपणें कोणी बोलत नसत. मीं सुरतेंत गेल्या वर थोडक्याच दिवसांनीं हा तंटा उपस्थित झाला. शेवटीं याची कचीं चौकशी चालत असतां जों पर्यंत आर्देशिर आपल्या कामा वर आहेत तों पर्यंत पुरावा मिळणें कठीण

१ ' अफयतरूफर ' असें मूळ हस्तलिखितांत आहे. ( अरबी–इफ्रात्+तफरीत् )
२ The Mitākshara, Edited by S. S. Setlur, 1912, p. 723.
३ याज्ञवल्क्य स्मृतिः २।१३५.

यास्तव यास पूर्ण सस्पेंड करावें म्हणोन **मिस्तर ल्युअर्ड** (Mr. Luard) यांणीं सरकारास कळविलें त्या वरून आर्देशिर यांस सस्पेंड करून चौकशी चालविली. अशी त्या जज्जसाहेबांची वक्रदृष्टि व हट्ट पाहून आर्देशिर यांणीं मुंबईहून Mr. Howard यांस दररोज रुपये तीनशें देण्याचें कबूल करून व आगाऊ मोठी रक्कम देऊन आपले Barrister (ब्यारिस्टर) म्हणजे वकील म्हणोन सरकारच्या परवानगीनें आणविले. परंतु त्या काळींच्या सदर अदालतीनें त्यास निक्षून सांगितलें, किं "कायद्या प्रमाणें कोर्टाचीं कामें सर्व देशभाषेंत चालतात, तुह्मीं जो आपला बचाव व पुरावा म्हणोन द्याल तो गुजराथी भाषेंत दिला पाहिजे. इंग्रजी भाषेंत दिलेला पुरावा आह्मीं तुमच्या खटल्यांत दाखल करूं, परंतु कायद्या प्रमाणें त्या पुराव्यास आह्मीं मुख्य समजणार नाहीं." असा सदरेचा हुकूम येतांच खानबहादूर व त्यांची मंडळी मोठ्या विचारांत पडली. **मेस्तर हावर्ड** (Mr. Howard) सारखा या काळीं मोठा नामांकित बोलणारा व खुबीदार लिहिणारा वकील. यांच्या सर्व लिहिण्याच्या नोकी[१] बराबर समजून त्यांच्या लिहिण्याचा गुजराथींत बराबर तरजुमा करील असा या सुरत शहरांत मज शिवाय दुसरा कोणी त्यांच्या मंडळीस दिसला नाहीं. तेव्हां अर्थात् माझेंच नांव त्यांच्या पुढें आलें. आणि खरेंच त्या वेळेस सुशिक्षित असा इंग्रेजी जाणणारा कोणीच नव्हता. तेव्हां खानबहादूर यांहीं आपली गाडी पाठवून मला आपल्या वाडींत बलावून नेलें. याची गुणगुण मला पूर्वीं होतांच, तेव्हां दुर्गारामा सारख्या चार स्नेहीमंडळींनें मला सांगितले, किं "तुह्मीं आतां जें मागाल तें हा आर्देशिर तुह्मांस देईल. तुह्मीं भीड ठेवूं नका, पहिल्यानें पांच दहा हजार रुपये तो तुम्हांस सहज देईल ते पहिले हातांत घ्या. नंतर काम करण्याचें कबूल करा. कारण हा खटला फार दिवस लांबणार आहे." माझ्या थोर मनानें मला सांगितलें, किं एवढा हत्ती सारखा हा थोर गृहस्थ आतां चिखलांत रुतला आहे त्यास त्यांतून बाहेर काढण्यांत मज कडून मदत मिळाली असतां तो मला कदापि विसरणार नाहीं. या करितां असें भाषण बोलून त्यास पहिल्यानेंच आपल्या मनाचा हलकेपणा दाखवूं नये. पहिल्यानें आपलें कर्तृत्व दाखवून मग असें देणगीचें मागणें मागावें. आज ज्याणें आपल्या बचावा करितां इतका मोठा खर्च मांडला आहे आणि जो आर्देशिर म्हणोन आज पावेतों या शहरांत व इतर सर्व ठिकाणीं ज्याणें आपलें नांव गाजविलें आहे, तो

१ खोंचा, मुद्दे.

काय मज पासून फुकट मेहनत घेईल? असें त्याच्या लौकिका वरून आणि थोरपणा वरून अगदीं संभवत नाहीं. असा मीं आपल्या मनांत विचार करून त्याच्या वाडींत त्यास भेटलों; त्यांणीं माझा मोठा सत्कार केला आणि तेथें पुष्कळ नेटिव वकील वगैरे मंडळी बसविली होती त्या समक्ष जणो माझी परीक्षा पाहण्या करतांच काय, माझ्या हातीं Mr. Howard (मेस्तर हावर्ड) साहेबांनीं यांच्या बचावांत लिहून तयार केलेले कांहीं कागद दाखविले, आणि वाचून याचा अर्थ आह्मांस सांगा म्हणोन विनंति केली. मीं ते कागद तेथें चांगले अवलोकन करण्यास थोडा अवकाश मागून त्यांचा अर्थ त्यास पदशः सांगितला. त्या वरून खानबहादुरा सुद्धां सर्व मंडळी मोठी चकित झाली आणि "वाहवारे हावर्डसाहेब वकील, आणि वाहवारे तुमची अर्थ सांगण्याची कुशलता," असें म्हणून आह्मां उभयतांची मोठी तारीफ करूं लागली. मंडळी खानबहादुरास म्हणाली, "हमे साहेबने पेहलाच समजायवुं हतुं, शेट दादुबा जेवा अंगरेजी भाषा जाणणारा आपणा आखा शहरमां नथी, एनो अनुभव शेटने आव्यो ए जोई हमे घणा खुष थया." असें म्हटल्या वर खान बहादूर मला म्हणाले—"म्यां दररोज तीनशें रुपये देण्याच्या शर्तीनें मेस्तर हावर्ड साहेबांस मुंबईहून माझ्या खटल्यांत वकील करून आणिलें आहे; परंतु सदर अदालतीच्या जज्जांहीं मध्यें अडचण घातली आहे, किं कायद्या प्रमाणें तुमचें काम सर्व गुजराथींत चाललें पाहिजे; या साठीं हावर्डसाहेब जे जे तुमच्या खटल्यांत कागद तयार करून देतील त्याचा तरजुमा गुजराथींत करून तो मुख्य स्थानीं त्यांत दाखल केला पाहिजे." म्हणून ते मला म्हणाले, किं "आतां मला सर्व प्रकारें साहाय्य करणें तुह्मां कडे आहे. आतां मीं सर्वस्वी तुमचा आहें. या करितां या माझ्या खटल्याचा शेवटला निकाल होई पर्यंत तुह्मीं तुमच्या शाळेचें काम आटोपल्या वर रात्रीं फराळ करून आमच्या वाडींत यावें. तुह्मां करितां नित्य सहा वाजतां संध्याकाळीं माझी गाडी पाठवित जाईन. तुमचा मज वर मोठाच उपकार होईल तो मीं कदापि विसरणार नाहीं. मीं फार अडलों आहें, माझा आपण हात धरावा," अशी पुष्कळ विनवणी केली. जर मीं त्या वेळेस अडवून बसलों असतों तर ते मला त्याच बैठकीस चारपांच हजार रुपये प्रथम देण्यास कबूल करिते. खानबहादुरां कडून दहावीस हजार रुपये काढण्याची ही अमोलिक संधि होती. तसें करावयास कोणी चुकलें नसतें. परंतु मला कोणी संकटांत असतां त्यास अडवून त्या जवळून पैसा काढणें फार हलकें काम दिसे. मीं त्या

वेळेस फार गरीब मनुष्य होतों. पण माझा स्वभाव फारच भीडस्त. तो माझ्या कडून तसें कोणास अडवूं देईना. परंतु या अशा भीडस्त स्वभावा मुळें पुढें माझें फारच अनहित झालें हें सर्व समजून येईल. मला भीड तुटेना म्हणोन मीं खानबहादुरांच्या बोलण्यास मान दिला. मनांत निस्संशय मोठी आशा होती, किं एवढ्या लौकिकाचा गृहस्थ, मज गरीबा कडून व्यर्थ मेहनत घेणार नाहीं. या प्रमाणें मीं त्यांच्या वाडींत त्यांचा खटला चाले पर्यंत सातआठ महिने नित्य जात असें आणि रात्रीं दहा अकरा वाजतां घरीं परत निजायास येत असें. त्या वेळेस वकील, मेहते मिळून पुष्कळ असामी वाडींत जमत असत. दोन तीन महिने गेल्या वर एके दिवशीं आदित्यवारीं दिवसास मीं खानबहादूर यांच्या वाडींत असतां तेथें मीठाराम वकील, करसनदास देसाई, नसरवानजी वकील, बेझनजी कुर्जेवाले, (हे गृहस्थ इंग्रेजी बरेंच जाणत होते) आदिकरून तीस चाळीस मंडळीचा थाट जमला होता. त्यांत मींहि मेस्तर हावर्ड साहेबानें लिहिलेल्या पुराव्याचे कागद वाचून त्याचा अर्थ गुजराथींत सांगत होतों व तो अर्थ मेहता लिहित होता. ते आर्देशिर खानबहादूर साऱ्या मंडळी समक्ष म्हणाले, "मीं माझ्या कातड्याचे जोडे करून दादोबास दिले तरीं या प्रसंगीं त्याचा महदुपकार मजपासून फिटणार नाहीं." मला तेव्हांच विचारलें—"दादुबा शेट, तमोने शुं जोइए ते आ मंडळीदेखत हमारी पासे मागो. हमे ते तमोने आपीशु.[1]" म्यां म्हटलें, "तमे कदरदान छो, आपशो एमां कही शक नथी.[2]" तेव्हां खानबहादूर यांहीं पुनः पुनः पुसलें, "ही संधि बरी आहे. या मंडळी देखत मागा." मग म्यां म्हटलें, "तमो अने तमारा भाई तो मोटा वर्जीफदार छो. तमारूं काम पुरूं ने तमारी फतेह थाय तो मने हाल जे पगार मळे छे तेनुं आधुं मने महिनानीं आमदानी थाय एटली रकम अथवा एटली जमीन इनाम करी आपजो.[3]" तेव्हां ते मंडळीस म्हणाले—"एमनो पगार तो हाल १५० रुपयानो छे, तेनुं आधुं एटले पोणसो रुपया महिनाना थाय एटली रकम

१ "तुम्हांला काय पाहिजे तें या मंडळीदेखत आमच्यापाशीं मागा. आम्ही तें तुम्हांला देऊं"

२ "तुम्ही गुणग्राहक आहां. घाल यांत कांहीं शंका नाहीं."

३ "तुम्ही व तुमचे बंधु मोठे जमीनदार आहां. तुमचें काम पुरें होऊन तुम्हांस यश मिळालें म्हणजे मला सध्यां जो पगार मिळतो त्याच्या निम्मे रकम मला महिना मिळेल एवढी रकम किंवा जमीन इनाम द्या."

एटली आवकनीं भोय ए कंइ मोटी माग नथी,"[१] कांहीं मंडळी म्हणाली, "शेटना आगळ तो ए कंही नथी."[२] शेवटीं आर्देशिर बहादूर म्हणाले, "आखर बामणनुं मागवूं ते बामण जेवूं"[३] (यांच्या मतें मीं ब्राह्मण होतों) आणि इतक्या विद्वानास इतक्या मेहनती बद्दल हे पंधरा वीस हजार रुपयांचें मागणें फार थोडें. जवळची मंडळी मला म्हणाली, "इतकी रकम शेटजीस देणें कांहींच अवघड नाहीं." असें त्यांचें अभयवचन झाल्या वर मीं आपल्या कामास लागलों. मनांत कि नाहीं, नाहीं तर निदान मागितल्या रकमेचा बराच मोठा अंश तरीं मला मिळण्याचा आतां खास संभव आहे.

## खानबहादूर पुढें निर्दोष ठरल्या वर त्यांणीं कसा आनंद प्रदर्शित केला?

इकडे हा खटला बराच लांबणी वर पडत गेला. Mr. Luard जज्ज यांच्या मनांत खानबहादूर आर्देशिरां विषयीं दिवसानुदिवस अधिक ग्रंथी व दुराग्रह वाढत गेला. तेव्हां आर्देशिर यांणीं सदरेस अर्ज करून दुसरा कोणी निःपक्षपाती जज्ज मिळाला तरच मला इनसाफ मिळेल असा अर्ज केल्या वर या चौकशीच्या कामा वरून **मेस्तर ल्युअर्ड** (Mr. Luard) यांस मवकूफ[४] करून त्यांच्या जागे वर मिस्तर रिमिंग्टन [ Mr. Remington (?) ] यांस जज्ज नेमिलें. त्यांहीं मोठ्या चातुर्यानें व शांतपणानें चौकशी चालविली. त्यास दोन तीन महिने लागले आणि शेवटीं खानबहादूर हे निर्दोष ठरून **प्रेमकोरच्या** वतीनें ठराव झाला, असें मला वाटतें. तें असो. परंतु आपण निर्दोष आहों असें खानबहादूर यांस समजल्या वर सर्व सुरत शहरांत आपला हृद[५] प्रसिद्धपणें सर्व आबाल लोकांस व गोरगरिबांस जाहीर व्हावा म्हणोन खानबहादूर यांहीं **धरमपूर** राजाचा हौद्याचा हत्ती मागितल्या वर तो कोडताच्या दरवाजा पुढें हाजर होताच, आणि खानबहादूर यांणीं पूर्वींच रुप्याचीं

---

१ "यांचा पगार हलीं १५० पन्नास रुपये आहे. त्याचे निम्मे पाऊणसें दरमहिना होईल एवढी रकम ही कांहीं मोठी मागणी नाहीं."

२ "शेटजींना ही कांहीं फार नाहीं."

३ "अखेर ब्राह्मणानें मागितलें तें ब्राह्मणातारखेंच."

४ (अरबी—मौकूफ़) तहकूब.

५ (?) अन्तःकरण, आनंद.

व कांहीं सोन्याचीं लहान फुलें करून ठेविलीं होतीं तीं घेऊन गजारूढ होऊन आपल्या वाडी पर्यंत तीं फुलें हौद्या वरून उधळित चालले. त्या वेळेस मेस्तर हावर्ड (Mr. Howard) वकील यांस आपल्या बराबर हत्ती वर घेतलें होतें किंवा नाहीं याचें मला आतां चांगलें स्मरण नाहीं. परंतु बहुधा बराबर असावे असें मला वाटतें. वाडींत त्या दिवशीं शेटजींस मुबारकबादी देण्या करितां सर्व सुरतेंतले मोठमोठे गृहस्थ व सावकार व दरबारी मंडळी जमून मोठी मजलीस झाली होती. सुरतेंतल्या त्या काळीं मोठ्या नामांकित गाणारणी उत्तम आणि झगमग यांचें गाणें झालें असें मला स्मरतें. मींही त्यास मुबारकबादी देण्या करितां त्या मजलसींत गेलों होतों. मग मीं खानबहादूर यांचा निरोप घेऊन इतकें म्हटलें, किं 'परमेश्वरानें आमच्या सर्वांचे श्रमांस यश दिलें.' खानबहादूर त्या वेळेस आनंदाच्या थोडे गुंगींत होतेसे दिसले. कारण त्यांणीं जसें मज कडेस लक्ष द्यावें तसें दिलें नाहीं. मजलसी मध्यें कितीक लोक म्हणाले, "आ काममां शेट दादुबानी पण घणी मेहनत!" मीं शेटजींचा निरोप घेऊन घरीं गेलों.

या कामांत मीं सतत सात आठ महिने मेहनत चालविली होती. नित्य रात्रीचे दिवस केले, आणि सर्व या खटल्यांत इंग्रजी पुराव्याचा गुजराथी तरजुमा करून दिला. दोनचार रात्री तर आर्देशिर शेटच्या वाडींतच पहांटे पर्यंत जाग्रण करून घरीं परत आलों. असो, आतां शेटजींची गरज झाली. मला त्यांणीं झुले द्यावयास लाविलें. आठ पंधरा दिवसांनीं शेटजी जवळ मागणी करायास जावें, आणि म्हणावें कीं "शेटसाहेब, आ शुं? तमो मारी पासेथी आटली मेहनत लई अने मने आवो दिलासो आपी हमणां मने झुलावो छो, अने तमारा बारणा आगळ मने आवं पडे छे."[१] ते आपले थंडपणानें शेवट पर्यंत हेंच बोलत गेले कीं, "हूं तमारा उपकार कांई दहाडे भुलवानो नथी."[२] मग मीं दोनचारदां चिडचिडून म्हणालों, "हां शेटजी, तमो मारी मेहनतनो बदलो मने आ दुनयामां तो नहीं, पण आगळनी दुनयामां आपशोज आपशो."[३] असें म्हटलें तरीं त्या कोडग्या आणि कृतघ्न आर्देशिरास

१ "हें काय, तुम्ही माझ्यापासून एवढी मेहनत करून घेतली आणि अशाप्रकारची आश्वासनें देऊन तुम्ही मला झुलवित आहां व तुमच्या दाराजवळ मला यावें लागत आहे."

२ 'मी तुमचे उपकार केव्हांही विसरणार नाहीं.'

३ 'माझ्या मेहनतीचा बदला मला या लोकांत नाहीं तरी परलोकांत खासच द्याल.'

कांहींच लाज़ वाटली नाहीं. तो निमूटपणें माझें ऐकतच होता आणि मला भरंवसा देतच होता. शेवटीं मीं अगदीं निराश होऊन थकलों. मग त्या जवळ मागणी करण्याचें बंद केलें. इतकी सात आठ महिने पर्यंत मेहनत केली तिची त्या दुष्टानें मला एक कवडी देखील इनाम दिली नाहीं.

पुढें थोडक्याच दिवसांत–सुमारें एकंदोन वर्षांत–या आर्देशिर खानबहादुराची कशी दशा झाली ती कळण्यांत येईल. त्याच्या खटल्याचा निकाल झाल्या वर लागलेंच त्यास पेन्शन देण्याचें ठरलें.

★

२७

## + बडोद्यांतील होळीचें आमंत्रण

**माझें व Mr. Green यांचें, होळी येथें करावी म्हणोन बाळकृष्ण ऊर्फ भाऊसाहेब शास्त्री यांचे आमंत्रणा वरून बडोद्यास जाणें.**

सन १८४४ च्या शिमग्याच्या सुमारास मला श्रीमंत बाळकृष्ण ऊर्फ भाऊसाहेब शास्त्री पटवर्धन (गंगाधर शास्त्री ज्यांस बाजीरावानें त्र्यंबकजी डेंगळे यांच्या कडून पंढरपुरीं मारविलें त्यांचे द्वितीय पुत्र,) यांज कडून पत्र आलें, किं "तुह्मीं ग्रीनसाहेब मास्तर यांस बराबर घेऊन बडोद्यास होळी पाहण्या करितां यावें." त्या वरून आह्मीं उभयतां भडोचच्या मार्गानें बडोद्यास गेलों. आमचा भडोचेंत मुक्काम असतां तेथें जवळ चार पांच कोसां वर जगप्रसिद्ध एक **कबीरवड**[१] म्हणोन मोठें वडाचें झाड

---

१ 'भूमिदाह' या शब्दाचा अर्थ देतांना Dr. Robert Drummond लिहितो, "it is declared that Kuveer, from whose toothpick sprung that widely branching vudd tree, called **Kubbeerburr**, on an island in the Reva or Nirmuda, ten miles East of Broach, actually dug his own grave and therein gave up his ghost, whence his sainted fame and statue on that spot."—**Illustrations of the grammatical parts of the Guzerattee, Mahratta and English languages, Bombay.** 1808. या वडाचें विस्तृत मजेदार वर्णन जेम्स फॉर्बसनेंही दिलेलें आहे:—"The large trunks of this single tree amount to three hundred and fifty and the smaller ones exceed three thousand. Each of these is constantly sending forth branches and hanging roots, to form other trunks, and become the parent of a future progeny...in the march of an army, it has been known to shelter seven thousand men."—**Oriental Memoirs**, vol. I, 1834, pp. 16-19. तुल्य, "The fig-tree—not that kind for fruit renowned,
But such as this day, to Indians known,
In Malabar or Decan spreads her arms
Branching so broad and long that in the ground
The bended twigs take root, and daughters grow (पुढें चालू)

आह े. ..., ... ों व मिस्तर ग्रीन आह्मीं दोघे निघालों. तिसऱ्या प्रहरीं तेथें पोंहचलों. आ... ...ल्यानें तें झाड पाहिलें. तों आह्मांस असें दिसून आलें, किं खरीच ह्या झाडाची कीर्ति आहे ती. मूळच्या झाडाच्या आतां तीस चाळीस पारंब्या मोठमोठ्या लोंबून, त्यापासून त्या झाडाची संतति हाल्लीं वाढली आहे, त्यांचा विस्तार आह्मीं पाहिला तो इतका मोठा होता, किं त्यांच्या छाये खालीं कांहीं नाहीं त... ...हजार मनुष्यें वागतील. आह्मांस तेथें फिरतां फिरतां अगदीं सांजाव... ...आह्मां दोघांसही फार क्षुधा लागली. आमच्या पाशीं कांहीं खायास न... ...अशी अटकळ होती, किं कबीरवड पाहून संध्याकाळीं भडोचेंत जे... ...ं. परंतु तसें झालें नाहीं. तेंव्हां त्या झाडा जवळ गांव होता, तेथे ... ...गुजराथी ब्राह्मणाच्या घरीं रात्रीस जेवायास व बिऱ्हाडास राहिलों. गुजरा... ब्राह्मणाचें कुटुंब चांगलें होतें. त्यांणीं मज करतां व मिस्तर ग्रीन यांज करतां ... ...ऊन स्वैंपाक करविला. ग्रीनसाहेब मोठ्या हौसेनें त्याचा तो डाळभात व पुऱ्या जेवले. त्यांस भुई वर बसून जेवतां येईना तेंव्हां जवळच त्या ब्राह्मणाच्या गवऱ्यांचा ढीग रचला होता त्याचें ग्रीन साहेबानें मेज करून त्या वर पत्रावळ मांडून वडाच्या पानाचे चिमचे[1] केले व मोठ्या प्रीतीनें जेवले. मीं त्यांस जेवूं घालून त्यांचें जेवण आटोपल्या वर मीं ब्राह्मणाच्या घरांत हिंदूंच्या चाली प्रमाणें पाटा वर बसून पत्रावळ पुढें ठेवून जेवलों. सुंदर लोणकडें तूप, डाळभात, पोळ्या, शाखभाज्या व कढी होती, ती मेस्तर ग्रीन यांणीं पोट भरून खाल्ली. म्हणाले, "असें सुंदर रुचदार जेवण मीं कधींच जेवलों नाहीं. आमचे इंग्लिश लोक या देशांत असून त्यांस या हिंदूंच्या जेवणाची रुचि कांहींच

---

About the mother tree, a pillared shade
High overarched, and echoing walks between.
There oft the Indian herdsman, shunning heat,
Shelters in cool, and tends his pasturing herds.
At loop-holes cut through thickest shade."
**Miltons' Paradise Lost, Book, IX, 1101 — 1110.**

या कबीड वडावर सुप्रसिद्ध गुर्जर कवि नर्मद यानें एक कविता लिहिली आहे. हा वृक्ष जगांतील एक आश्चर्य आहे.

१. ( फा० चम्चा ) तुळा – पञ्जर – पिंजरा.

ठाऊक नाहीं." किती साधें व निरोगी जेवण त्या रात्रीं मला [illegible] [illegible]च निजलों. त्या ब्राह्मणास चांगली पोटभर दक्षणा देऊन पहांटे [illegible] [illegible]स जाण्यास निघालों.

## बडोद्याची होळी ही माझी बडोद्यांत पहिली होळी.

चौथे दिवशीं भडोचेहून बडोद्यास पोंहचलों. पूर्वी आमच्या येण्याची भाऊसाहेबांस सूचना होतीच. म्हणोन त्यांहीं आप[illegible] [illegible]रच्या खणांत मेस्तर ग्रीन यांची एका खोलींत राहण्याची सोई केली [illegible] मेस्तर ग्रीन साहेबांचें आगतस्वागत करून त्यांचा सत्कार व त्यां[illegible] सोई मोठ्या बेतबातानें केली. त्यांच्या वाड्यास लागूनच त्यांचे वडील [illegible]र ऊर्फ रावसाहेब शास्त्री यांचा मोठा सोवळवाडा होता. त्यांत रावसाहेबां[illegible], व अग्निहोत्र असे. हे गंगाधर शास्त्री यांचे विनायक ऊर्फ आबासाहेब [illegible] पुत्र मोठ्याच योग्यतेचे शोधक व विद्याव्यसनी होते. थोरले रावसाहे[illegible]ांची शास्त्रव्युत्पत्ति, मधले भाऊसाहेब यांची फारशी भाषेंत चांगली गति होत[illegible] आणि धाकटे आबासाहेब हे इंग्लिश भाषेचे माहितगार असून त्यांत Mathematics आणि Science यांची फार आवड होती. आणि मुंबईंत शाळेंत जात होतों तेव्हांपासून या उभयतां बंधूकडेस आमचा जाण्यायेण्याचा फार परिपाठ असे. आमचे जुने मित्र नाना नारायण यांचा ते जावऱ्याहून परत आल्या वर त्यांची या उभयतां बंधूनीं आपल्या कडेस शंभर रुपये दरमाह देऊन राहण्याची सोई केलीच होती. आह्मीं बडोद्यास गेल्या वर हे शास्त्री यांच्या वाड्यांत रावसाहेब शास्त्री यांचे चिरंजीव तात्यासाहेब यांस इंग्लिश पढविण्याचें व दुसरें चिटणिसी लिहिण्याचें काम यांज कडेस होतें. या दोघां बंधूंस, विद्वान् म्हटलें म्हणजे कोणी का जातीचे असेनात, त्यांस फार आवडत असत. त्यांहीं नानांस आ[illegible]च्या वाड्यांतच ठेविलें होतें. मिस्तर ग्रीन व मीं बडोद्यास जातांच भाऊसाहेब [illegible] त्यांची इंग्रजी तऱ्हेनें सजविलेली खोली त्यांस दाखविली. माझ्या जेवणाची व बसण्याउठण्याची सोई त्यांच्याच वाड्यांत होती. दिवसास व रात्रीस पंक्तीस भाऊसाहेबांच्या पाना समोरासमोर आमचीं दोन पानें मांडलीं असत. एक नानांचें व एक माझें. ग्रीन साहेबांचा इंग्रजी तऱ्हेचा खाना त्यांच्या खोलींत तयार असे. परंतु ग्रीन साहेब शाहणे होते. त्यांस चांगलें माहीत होतें, कि हें ब्राह्मणाचें घर आणि भाऊसाहेब जरी मोठ्या उदार मनाचे होते, त्यांच्या मनांत इतर जातीच्या लोकांच्या खाण्यापिण्या विषयीं किमपि

द्वेषभाव नसे, त[illegible] मि[illegible] मिस्तर ग्रीन हे त्या [illegible]ाड्यांत दोन दिवस होते तोंपर्यंत खाण्यापिण्याच्या पदि[illegible]रास फारच संभाळून असत. त्यांत त्यांस हिंदु लोकांचें जेवण तर फार आवडत असे. मद्य घेण्याची सवई तर त्यांस बिलकूल नव्हती. भाऊसाहेब यांस मज कडून पूर्वीच माहीत झालें होतें, किं मिस्तर ग्रीन यांस बुद्‌बळे फार चांगलीं खेळतां येतात, आणि त्यांस गायनाचा व वाद्याचा मोठा शौक असे. या वरून[illegible] दहा [illegible]ष्टीनें त्यांची मोठीच करमणूक झाली. रात्रीस एक दिवस हिंदुस्थानि[illegible]लें, आणि अ[illegible] दिवस मराठी लावण्यांचें गाणें त्यांहीं मोठ्या प्रीतीनें ऐकलें [illegible]तें. आमची ' या मराठी लावण्यांनीं तर मला माझ्या देशांत Italian Oper[illegible] ) होत असतो त्याची बरीच आठवण झाली." असे एका गु[illegible]न तीन दिवस मोठ्या आनंदानें घालवून भाऊसाहेबांचा निरोप घेऊन[illegible] ब्राह्मण[illegible] आपल्या शाळेच्या कामा वर हाज[illegible] झालों. मागें ग्रीन साहेबांनीं भ[illegible] [illegible]हेबांची लियाकत[1], थोरपणा व बहुश्रुतप[illegible] यांची मज पाशीं फार तारीफ केली. खरे दक्षणी ब्राह्मण लोकांत मोठे च[illegible] शहाणे व देखणे पुरुष ते मीं हे पाहिले. भाऊसा[illegible]बांस फारशी भाषा फार चां[illegible] येत होती म्हणोन त्यांज पाशीं निरंतर फारशी किताब[2] असत, व मुसल[illegible] लोकांचा त्यांस फार सहवास होता. एके दिवशीं तेथें त्यांहीं एक मला मोठी गम[illegible] करून दाखविली ती अशीः–तेथील कांहीं सुनी मुसलमान धर्माचे बोहरी बल[illegible] आणि त्यांशीं पुलाव, कबाब व कांदे व आलें [illegible]पण्याची चतुराई यांची तारीफ करून थट्टेनें, ' अजी मियां गोस्तकै[3] क्या लज्जत होता है, और प्याज[4] शिवाय हमको एक दिन भी चलता नहीं, ' असें म्हटलें. त्या वरून ते काना वर हात ठेवून उठूं लागले आणि म्हणूं लागले, " भाऊसाहेब, तमे एम शूं बोलो छो. प्याज अने गोस्त ए बोल तो हमे मुसलमीन छतां हामरा मोढामांथी[5] निकलता नथी, अने तमे बामणभाई बोलो छो ए तमने लायक थी–". तेव्हां भाऊसाहेबांनीं मला सांगितलें, " हे गुजराथी मुसलमान बोहरी कसे आहेत ते पाहिले ना ? मांस तर काय, परंतु कांद्यासही शिवत नाहींत." त्या [illegible]न मला मोठेंच आश्चर्य वाटलें. भाऊसाहेब मोठे गमती पुरुष होते. त्यांहीं मि[illegible]ांची तर हटकून [illegible] उडवावी. मग त्यांहीं व त्यांच्या बायकांनीं चिडावें. जेवणा[illegible] वेळेस तर ही त्यांची मोठी

---

१ (फा.) योग्यता. २ पुस्तकें. ३ मांस. ४ कांदा. ५ मुखांमधून.

गंमत असे. एक म्हातारी बाइ मराम तेथें आह्मांस ह म्हणून हाजर असे. स० १८४५ सांत मी बडोद्यांत असतां मुंबईहून बंधु भास्कर यांजकडून पत्र आलें. त्यांत असें दुःखाचें वर्तमान होतें. तें म्यांच आपल्या रोजनिशींत लिहून ठेवलें होतें त्याचा खालीं उतारा देतों:—

" २३ जुलई १८४५. आज मुंबईहून पत्र आलें. त्यांत बाईच्या मरणाचें परम खेदकारक वर्तमान आलें. जहालें: इतके दिवस मनांत होतें, कि अद्यापि आमच्या तीर्थरूपांची मातुश्री आमच्या माथ्या वर वडील आहे, तीही गेली. आतां वडिलां पैकीं कोणी आमच्या घरीं राहिलें नाहीं. एका मागें एक कशीं मनुष्यें जातात! एक दुःख विसरलें नाहीं तों दुसरें निघून जातें. काळचक्रधार फार तीक्ष्ण आहे. ती कोणास टोंचत नाहीं. आज दिवस पावेतों असें मनांत येत असे कीं, तीर्थरूप मातुःश्री अल्पवयांत निघोन गेली आणि आमची बाई अद्यापि आहे. जहालें, तिचाही मरणाचा दिवस निघोन गेला. तिणें लहानपणीं आह्मीं लहान लहान लेकरें म्हणोन आमचें कितीं लाड करावे. त्यांत मीं बाळपणापासून फार अशक्त म्हणोन मज वर इचा फार प्रेमा होता. परम दयाळू परमेश्वर हीस आपल्या जवळ ठेवो हीच आतां त्याचे पायीं निज विनंती माझी प्रार्थना आहे."

पुढें थोडे महिने गेले असतां असें वर्तमान घडून आलें, कि बडोद्याचे रेसिडेंट (Resident) मिस्तर बायड (Mr. Boyd) हे पूर्वी थोड्या वर्षी वर धुळ्याचे कलेक्टर होते त्यांचा, हे येथें वारले,[1] आणि त्याचें प्रेत मुरतेंत गाडायास आणिलें, तें आमच्या स्कुला वरून नेलें. आतां त्यांची कबर तेथेंच बांधली असतां असें मला वाटतें कीं मिस्तर बायड (Mr. Boyd) साहेबांच्या जागेस माझे मुरब्बी सर रावर्ट कीथ आर्बथनट (Sir Robert Keeth Arbuthnot) पुणेंचे कलेक्टर यांची नेमणूक झाली.[2] तेव्हां मीं त्यास भेटायास गेलों आणि या नेमणुकी विषयीं मुबारकबादी देऊन आपला आनंद प्रदर्शित केला आणि उगीच न रहातें कीं, "आपल्या वचना प्रमाणें आतां माझें कल्याण करण्याचा ईश्वरानें आपला हातीं प्रसंग दिला आहे. माझी तजवीज त्या दरबारांत योग्य रीतीनें हातीं आली आपण करालच; परंतु ही आपल्यास

1. ऑगस्ट १८४५ मध्यें Baroda Gaz., p. 246.
2. मार्च १८४५ मध्यें Baroda Gaz., p. 247.

उगीच सूचना दिली आहे." त्यांहीं मला आश्वासन तर दिलें नाहीं, परंतु त्यांहीं ती गोष्ट आपल्या ध्यानांत ठेविली. पहा हे थोर कुलाचे इंग्लिश लोक किती ममताळू असतात ते ! त्यांहीं बडोद्यास रेसिडेंटच्या कामा वर गेल्या वर थोडक्याच महिन्यानें मला लिहून कळविलें, किं "मीं तुझी गोष्ट महाराजांस कळविली आहे, तर तूं थोडक्या दिवसांची रजा घेऊन बडोद्यास ये."

एथें या साहेबाची माझ्याशीं ममतेची वर्तणूक पहा. ज्यांस म्यां एकदोन महिने गुजराथी शिकविलें होतें इतकेंच; आणि ज्यांस सात आठ महिने पर्यंत सतत रात्रीस जागरण करून ते मोठ्याच संकटांत असतां मदत केली त्या खानबहादुर आर्देशिर धनजीशाह यांची निमकहरामीची वर्तणूक पाहा. इतकें जमीनअस्मानाचें अंतर नेटिव आणि युरोपियन यांच्या वर्तणूकींत असतें.[1] असे दाखले मला पुष्कळ आले आहेत. ते मीं पुढें त्या या प्रसंगीं सांगेन.

## पुनः माझें बडोद्यास जाणें आणि तेथें महाराज सयाजीराव[2] गायकवाड यांची भेट घेण्याचा प्रसंग

या वरून मीं ग्रीन साहेबाचे मार्फत एक महिन्याची रजा काढून सन १८४६ सांत बडोद्यास गेलों आणि तेथें रेसिडेंट साहेबांस जाऊन भेटलों. त्यांहीं मला सांगितलें, किं मीं तुमच्या विषयीं **सखाराम रोडे** जे हालीं एथें महाराजां पाशीं त्याचें मुख्यत्वें काम पाहतात त्यांस त्यांचे बंधु **गोविंदराव रोडे** यांज कडून सारा मजकूर कळविला आहे. ते एथें हालीं वकील म्हणून येत असतात. ही वकीलीची जागा त्यांचीच; परंतु त्यांज वर येथून थोडी अवकृपा झाली आहे. त्याची सफाई होई पर्यंत त्यांस बंगल्यांत येण्याची मनाई आहे. ते तुमची व महाराजांची भेट करून देतील; म्हणोन पाहायानें तुम्ही त्यांस भेटा आणि पुढें काय मजकूर

---

१ आरंभीं दादोबा इंग्रज लोकांवर निहायत खूष होते, परंतु पुढें ते नव्या इंग्रजी अधिकाऱ्यांना कंटाळले; (शिशुबोध-पृ. २६ पहा.)

"माझ्या दुर्दैवानें मागून उत्तरोत्तर मला दुष्ट स्वभावाचे व वाईट मनाचे वरिष्ट अंमलदार मिळून त्यांच्या हाता खालीं कामें करावीं लागलीं...त्यांच्या पूर्वीं मला उमद्या मनाचे व सुस्वभावाचे वरिष्ट अमलदार मिळाल्या मुळें मला हा त्रास सोसेनासा झाल्या वर मीं लवकरच थोड्या पेन्शना वर सरकारचाकरी सोडून त्या त्रासांतून सुटलों."

२ (दुसरे) १८१९–१८४७.

होतो तो मला कळवा. या वरून मीं पहिल्यानें त्या दोघां भावांस भेटलों. त्यांहीं माझा चांगल्या रीतीनें सत्कार केला. आणि रेसिडेंट साहेबानें तुह्मांविषयीं आह्मांस मजकूर सांगितला आहे असेंही त्यांहीं मला कळविलें. पुढें त्या दोघां बंधूंच्या आंतील मसलतीनें माझें रेसिडेंट साहेबा जवळ कितपत वजन आहे हें पहिल्यानें पाहून मग यांस सरकारास भेटवावें. त्या वरून त्यांची तीही मीं खातरी करून दिली. पुढें त्यांहीं सयाजी महाराजांची भेट करून देण्याची योजना केली. परंतु ती भेट होण्या करितां मला सतत चारपांच दिवस वाड्यांत खडावें लागलें. एके दिवशीं तर सकाळीं बलाविलें होतें. त्या वरून मीं पहांटेस स्नान करून कांहीं आहार न करितां सरकारवाड्यांत गेलों. तों तेथें सारा दिवस आतां महाराजांची स्वारी बाहेर येते असें करतां करतां रात्रीं आठ नऊ वरा वर स्वारी बाहेर गच्चींत आली, तेव्हां मला गोविंदराव रोडे यांणीं कळविलें. बरें झालें. तेथें त्या वेळेस माझ्या दैवानें माझी बूज जाणणारे **त्र्यंबकशास्त्री मनोहर** हे मुख्य अदालतीच्या कामा वर न्यायाधीश होते. त्यांच्या कचेरींत मीं निबिड अंधारांत बसून काळ कंठित असें. मीं त्यांस पुसलें, किं "तुह्मीं अशा अंधारांत इनसाफाचें काम कसें करितां?" तेव्हां त्यांहीं मला सांगितलें, किं "ही तर काय, परंतु तुह्मी एथल्या पुष्कळ अंधाराच्या गोष्टी ऐकाल." हे पुरुष अलीबागचे राहणारे, व आमचे लहानपणांचे शाळागुरुजी जे बापुशास्त्री मायदेव शुक्र त्यांचे सहाध्यायी होते. हे गृहस्थही सयाजी महाराजां समोर मंडळी बसली होती त्यांत महाराजांच्या जवळ बसले, आणि मला जवळ बसविलें. मग त्यांहीं व गोविंदराव रोडे व सखाराम रोडे यांहीं मिळून त्यांज पाशीं माझी मोटी शिफारस केली. "साहेबांनीं जे गृहस्थ एथें आणविले आणि ज्या विषयीं मज पाशीं निरोप दिला ते हेच गृहस्थ." मग महाराज थोडे कांहीं विचारित होते, इतक्यांत त्यांचे चिरंजीव[1] **आप्पासाहेब, नानासाहेब व दादासाहेब** हे त्यांस मुजरा करायास आले. मग काय पुसतां! आप्पासाहेबां बरोबर लांबलचक खबुतरांच्या व सकाळच्या कुस्तीच्या गोष्टी चालविल्या. आप्पासाहेब तरी काय लहान नव्हते. चांगले सत्तरा अठरा वर्षांचे ज्वान होते. त्यांस महाराजांनीं विचारिलें, "काय हो आप्पासाहेब, आज सकाळीं

[1] सयाजीरावांना त्यांची पहिली राणी चिमाबाई यांपासून झालेले चार पुत्र होते. पहिला गणपतराव आणि दुसरा आप्पासाहेब ऊर्फ खंडेराव. नानासाहेब व दादासाहेब म्हणजे अनुक्रमें त्यांचे तिसरे व चौथे चिरंजीव आनंदराव व मल्हारराव असावेत.

तुमची कोणाशीं कुस्ती झाली? तुमच्या खबुतरांनीं अंडीं घातलीं काय?" आप्पासाहेब म्हणतात, " होय महाराज. आजच सकाळीं मीं ( खबुतरांच्या जोडप्याचें नांव घेऊन ) त्यांचीं दोन अंडीं पाहिलीं. आतां लौकरच त्यांस पिलीं होतील." असें खबुतरांच्या व त्या मादीच्या बाळंतपणा विषयीं व कुस्त्यां विषयींच सुमारें अर्धा तास भाषण होत होतें.[1] माझ्या कडेस त्यांचें लक्षही नव्हतें. त्यांच्या त्या भाषणांत मंडळी व हुजरेही मोठ्या आनंदानें आप्पासाहेबांची तारीफ करून म्हणाले, " आप्पासाहेबांचा तो जोडा लई लाडका. त्या वर आप्पासाहेबांचा लई हेत. " अशा प्रकारचें भाषण. त्यांत त्र्यंबकशास्त्री यांसही मिसळावें लागे. इतकें झाल्या वर उठतांना महाराजांनीं मज कडेस पाहिलें, आणि रोडे यांस सांगितलें कीं, " यांस उद्यां आह्मां जवळ घेऊन या. " मीं तर या दोनचार दिवसांच्या हेलांडीनें[2] फार कंटाळलों होतों, आणि त्या दिवशीं तर सारा दिवस उपास काढावा लागला. " आतां महाराजांची स्वारी बाहेर येत्ये घडिवरानें येत्ये, तुह्मीं भेट घेतल्या शिवाय बिऱ्हाडीं जाऊं नका, " असे वारंवार मला रोड्यां कडून व शास्त्रीबावां कडून निरोप येत होते. मग मला तसेंच वाड्यांत कंटून राहणें भाग. महाराज निघोन आंत जनानखान्यांत गेल्या वर त्र्यंबकशास्त्री मला म्हणाले, " पाहिलींत ना ही आमच्या एथील कचेरीची मौज? तुह्मीं तर इतक्या चार पांच दिवसांतच इतके कंटाळलां. आह्मांस तर अशीं वर्षेंचीं वर्षे काढावीं लागतात. कचेरी संबंधी कांहीं जरुरीचें सांगायाचें असलें तरीं हाच नकशा.[3] पंधरा पंधरा दिवस लोटतात तरीं मोठ्या अगत्याची गोष्ट आह्मांस काना वर घालायास एकांत मिळत नाहीं. इंग्रजां कडील पसाभर बाजरी घेऊन त्यांची चाकरी करावी, परंतु यांचे रुपये, मशालअबदागीर नको," असें हा पुरुष मज पाशीं वारंवार उद्विग्न होऊन म्हणत असे. त्र्यंबकशास्त्री पूर्वी अहमदाबादचे कोर्टाचे शास्त्री होते, त्यांस सयाजी महाराजांनीं आपले कडेस मागून घेतलें. हे पुरुष फार निष्कपटी व साधे

---

१ खंडेरावांची ही बाळपणाची खोड प्रौढपणींही गेली नव्हती. तुळा—'आमच्या राजे लोकांत...कित्येक खबुतरांचीं लग्नें करण्याविषयीं व जनावरांच्या झोंब्या लावण्याविषयीं शौकी असतात व त्यासाठीं हजारो रुपये खर्च करतात.' (**नेटिव ओपिनियन**, १६-६-६७) खबुतरांचें लग्न लावून राजधानींतील लोकांची करमणूक करून खंडेराव पैसा उडवीत, असें अक्रियटही म्हणतो. ( **बडोद्याचे राजकर्ते**, पृ. २९० )

२ येरझारा.

३ ( अरबी-नक्श ) नमुना.

होते. त्या वेळेस त्यांस सरकारांतून मशालअबदागीर होतें व दोनशें रुपये दरमाह होता. शिवाय पट्टण महाल यांज कडेस होता. मीं एथें असतां यांस मीं आपल्या नव्या केलेल्या लघुकौमुदीचें भाषांतर दाखविलें. तें पाहून तर ते फारच खूश झाले. त्यांहीं साऱ्या बडोद्यांत बडे लोकां मध्यें माझ्या विद्वत्तेची गोष्ट प्रसिद्ध केली.

पुढें दुसरे दिवशीं मीं महाराजांनीं सांगितल्या प्रमाणें पुनः सरकारवाड्यांत गेलों. मग त्या दिवशीं किंवा दोन तीन दिवस रखडल्या वर माझी व महाराजांची भेट झाली. परंतु या दिवशीं सखाराम रोडे आणि त्याचे बंधु गोविंदराव यांच्या समक्ष त्यांची माझी भेट झाली. मग दोघांहीं माझा सकल वृत्तांत व रेसिडेंट साहेबानें सांगितलेला निरोप पुनः महाराजां पाशीं सांगितला, आणि त्यांची खात्री केली, कीं यांज वर साहेबांची मोठी मेहरबानी आहे व हे आपल्या दरबारास मोठे उपयोगी पडण्या सारखे मनुष्य आहेत. महाराजांनींही माझ्या बोलण्या वरून असेंच जाणलें. मग ते म्हणाले, “ एवढे तुम्हीं लई हुशार असून शाळेंत पोरें शिकविण्याचें काम कां करितां? तें सोडा आणि आमच्या दरबारीं या. आम्हीं तुमचा दरमाह हाल्लीं दाडशें रुपये आहे तोच आम्हीं तुम्हांस चालवूं. परंतु पुढें तुमची योग्यता वाढवूं. आमच्या एथें दरमाह मोठा नसतो; परंतु इतर राजवैभवाच्या पुष्कळ गोष्टी आहेत. तुम्हां कडेस कांहीं काम सांगूं. या मंडळीस पुसा कीं, ‘ तुमचा दरमाह काय आहे. ’ आणखी त्र्यंबकशास्त्र्यांसही पुसा. ” गोविंदरावानें मला पूर्वींच सांगितलें होतें कीं, “ महाराज कांहीं म्हणतील, त्यास नाहीं म्हणूं नका. एकदां त्यांहीं तुम्हांस आपल्या चाकरींत ठेवण्याचें कबूल केलें पाहिजे म्हणजे झालें. ” मग म्यां म्हटलें, “ बरें सरकार, आमच्या नशिबीं हें राजवैभव पाहिजे; परंतु इतकें मात्र आहे, कीं आम्हीं आपलें काम सोडिलों असें पाहिजे म्हणजे इंग्रेज सरकारही आमचा दरमाह वाढवून ठेवण्याचें करितील तेव्हां माझा बोलण्याचा उपाय राहणार नाहीं. हाल्लीं त्या सरकारास आम्हीं उपयोगाचीं मनुष्यें वाटत आलों. ” महाराज म्हणाले, “ बरें तसें झाल्यास आम्हीही तोच दरमाह तुम्हांस देऊं. तुम्हीं आमच्याच येथें राहावें. ” असें म्हटल्या वर सखाराम रोडे यांनीं खूण केल्या वरून मीं उठून मुजरा केला आणि निरोप घेतला. गोविंदराव माझ्या बरोबर जिन्या खालीं आले आणि म्हणाले, “ फारच बरें झालें. इतक्या अगत्यानीं महाराज कोणाशींच बोलत नाहींत. हें त्यांच्या मोठ्या मेहरबानीचें चिन्ह समजा. मी साहेबांपाशीं हा मजकूर सांगेन आणि त्यांस कळवून आपल्यास रजा देववीन. ’

## रावसाहेब गोपाळराव मैराळ यांची भेट.

पुढें साहेबांची भेट झाल्या वर त्यांहीं मला सांगितलें कीं, "इतका त्यांचा आग्रह आहे तर तुह्मीं नाकारूं नये हें मला बरें दिसतें." त्र्यंबकशास्त्री वगैरे मंडळीचेंहि म्हणणें तसेंच पडलें. पुढें आह्मीं चारपांच दिवस बडोद्यास राहिलों. तेव्हां तेथील कांहीं दरखदार मंडळीचीहि भेट घेतली. त्यांत एथील मोठे नामांकित व श्रीमंत गृहस्थ रावसाहेब गोपाळराव मैराळ[1] हे होते. रावसाहेबांस ही खबर गोविंदरावां कडून व त्यांचे मुनीम बापू अरघडे यांज कडून होतीच. मीं सकाळीं प्रहर दिवसास त्यांचे भेटीस गेलों; तेव्हां ते देवपूजेंत होते, तेथें त्यांहीं मला बलाविलें. मीं गेलों तों यांज पाशीं बरीच भिक्षुक व इतर मंडळी जमली होती त्यांत मला बसायास सांगितलें. तेव्हां मीं त्या मंडळींत बसलों. या अशा श्रीमंत लोकांस भेटायास टवाळ लोकही येत असतात. त्यांहीं कोणाचा लौकिक ऐकला म्हणजे कांहीं तरीं टवाळी करून यजमानाच्या व इतरांच्या समक्ष त्यांचा पाणउतारा करावा हाच त्यांचा मतलब असतो. अशा लोकांचा तर या बडोद्यांत अगदींच तोटा नाहीं. त्यांतून अशा एका टवाळ मनुष्यानें मीं तेथें बसलों असतां एक गम्मत केली ती ऐका. त्याणें मला पुसलें, "कांहो, आह्मीं ऐकतों, कीं यांही सर्व पृथ्वीचा व पृथ्वींतील देशांचा नकाशा केला आहे. (त्या वेळेस मीं आणि रा. नाना नारायण आह्मीं दोघांहीं मिळून एक Marathi Atlas[2] केला होता तो जेथें तेथें प्रसिद्ध होताच) तर ही गोष्ट खरी आहे काय?" "मग तर बाबा शर्त आहे यांच्या बुद्धीची," असें दुसरा म्हणाला. तिसरा म्हणतो, "हें होईल तरीं कसें? यांचें वय तर अगदीं अल्प दिसतें. तेव्हां हे सर्व पृथ्वी व पृथ्वी वरील देश पाहून आले कधीं आणि नकाशा केला कधीं?" म्यां म्हटलें, "यांत आह्मीं कांहीं मोठें काम केलें नाहीं; इंग्रेजी नकाशे होतेच. त्यां वरून ते मराठींत उतरले इतकेंच." त्यांत तिसरा म्हणाला, "बरें दादासाहेब, जर आपणास इतक्या सर्व देशांची

१ "सरकारास जे हुंडीवाले रोख पैसा देत आणि कमाविसदाराकडून आपली भरपाई करून घेत त्यांस पोतदार म्हणत. हे पोतदार पांच होते. सरकारास ज्या एकंदर रकमा लागत त्यापैकीं अमक्यानें अमका भाग द्यावयाचा असा प्रत्येकाचा हक्क होता. रुपयांचे साडे पांच आणे देण्याचा गोपाळराव मैराळांचा हक्क होता." (बडोद्याचे राजकर्ते, पृ. ३५१) मल्हारराव गादीवर आल्यावर त्यांना दिवाणपदही देण्यांत आलें होतें. हे १८७२ सालीं वारले.

२ १८३६ सालीं मुद्रित झाला.

माहिती आहे, तर मग आमच्या या बडोद्यांत किती बोळ व गल्ल्या आहेत तें सांगा ना ? " मीं मनांत केलें, किं या टवाळ मंडळीनें रावसाहेबां समक्ष थोडा आमचा पाणउतारा करावा असें मनांत आणिलें आहे. मग ज्यानें हा मला प्रश्न केला त्यास उलट प्रश्न केला कीं, " बरें, आह्मीं तर बडोद्यांत कधीं फिरलों नाहीं आणि आह्मांस येथले बोळ माहीत नाहींत. परंतु तुह्मीं आपला हात आपल्या मिशां वर दिवसांतून पन्नासदां फिरवितां, तेव्हां तुह्मीं तर सहज सांगावें कीं तुमच्या मिशांत किती केस असावे तें. बरें तें सांगा पाहूं. " तेव्हां रावसाहेब चकित झाले आणि वाहवा केली. म्हणाले, " भलें समयोचित उत्तर केलें. " अशी एथें गम्मत झाली. मग रावसाहेबांच्या इशाऱ्या वरून कारकुनानें शेलापागोटें आमच्या पुढें ठेविलें, तें घेण्यांत आह्मीं फार संकोच केला, तरीं घेणें प्राप्त आलें असावें. कारण यांत देणाराचा अपमान होतो. आणि सर्व मंडळीचा आग्रह पडला, किं या घराचा रिवाज आहे. मग म्यां तें शेलापागोटें स्वीकारिलें; आणि रावसाहेबांचा निरोप घेऊन बिऱ्हाडीं गेलों.

पुढें आमचे मुरब्बी सर राबर्ट कीथ आर्बथनट रेसिडेंट यांचा मोठा आभार मानून निरोप घेतला. आणि दुसरे दिवशीं बडोदें सोडण्याचे पूर्वी महाराजांस शेवटचा मुजरा करण्या करितां त्र्यंबकशास्त्री यांच्या मेजवानीचें आमंत्रण आह्मांस होतें, ती मेजवानी घेऊन साधेल तर त्यांच्या बराबर सरकारवाड्यांत जावें असा बेत करून त्र्यंबकशास्त्र्यांच्या बिऱ्हाडीं गेलों. तेथें सर्व तयारी होतीच. त्याच समयीं शास्त्रीबावांचे गुरु नामांकित **गोपीनाथ शास्त्री आगाशे** यांचेंहि बिऱ्हाड होतें. शास्त्री यांज पाशीं नेऊन त्यांची भेट करविली, आणि म्हणाले, " हे आमचे व तुमचे गुरु बापूशास्त्री शुक्ल यांचेहि गुरु." मग मीं त्यांज पुढें भुई वर मस्तक टेवून नमस्कार केला आणि बसलों. त्र्यंबकशास्त्री यांहीं आमची विद्वत्ता व आह्मीं नवे केलेल्या लघुकौमुदीचे भाषांतराचा ग्रंथ दाखविला; परंतु विद्येच्या संबंधानें आह्मीं सूर्या पुढें खद्योता प्रमाणें असे त्यांच्या पुढें दिसलों. हे म्हणाले, " इंग्रेजींत निपुण असतील." इतकें थोडेंसें बोलून जेवायास उठले. ते तेजस्वी, गोरे, आणि वृद्ध असे ब्राह्मण होते. आह्मीं वैश्य आहों हें त्यांस समजलें होतेंच. तेव्हां ते साक्षात् आह्मांशीं फार बोलले नाहींत. परंतु जसें विद्वान् ब्राह्मणाचें तेज असतें तसें त्यांच्या मुखा वर विद्वत्तेचें तेज मला दिसलें. पुढें आह्मीं एकी कडेस त्या मंडळींत जेवायास बसलों. जेवण झाल्या वर सरकारवाड्यांत शेवटला मुजरा करायास व निरोप घेण्यास गेलों.

त्र्यंबकशास्त्री यांहीं आमची गोष्ट सरकारच्या काना वर घातल्या वर ज्या खोलींत बसले होते तेथें मला बलाविलें. तेथें गोविंदराव वकील होते. मीं थोडा वेळ बसलों तेव्हां सयाजी महाराजांनीं मुंबईच्या इकडच्या तिकडच्या गोष्टी केल्या नंतर मीं उठून मुजरा केला, आणि म्हणालों, " सरकार, आतां हा मीं निरोप घेण्याचा मुजरा करितों. " तेव्हां ते म्हणाले, " कसें, तुह्मीं आपल्या मनांत एथें परत येण्याचा पक्का इरादा केलात ना ? " म्यां म्हटलें " होय, सरकार इतकी मेहरबानी करून मला अगत्यानें बलावितात हें माझें थोर नशीब. मीं नाहीं कसें म्हणावें ? " महाराज पुनः म्हणाले, " पहा हो, ममइस गेल्या वर तुह्मी आपला बेत फिरवाल. आतां ममइस कशास जातां, एथेंच राहा ना ? " म्यां म्हटलें, " नाहीं. सरकार, मीं येथें रजे वर आहें; मला ज्या जागया वरून आलों तेथें कायद्या प्रमाणें गेलेंच पाहिजे. नंतर त्या रजेंत मीं मुंबईस जाऊंन राजीनामा देऊन तिकडल्या आमच्या साहेबास व इष्टमित्रांस भेटून आपल्या सेवेंत हाजर होतों. " महाराज म्हणाले, " माझ्या हाता वर असें वचन द्या कीं, मीं खचित येतों. " म्यां म्हटलें, " असें मीं कसें वचन द्यावें ? तेथें गेल्या वर काय होईल हें मला आज कसें समजतें ? हाता वर हात देणें म्हणजे शपथ घेण्या सारखें मीं समजतों. ज्या गोष्टीचा आपल्यास भरंवसा नाहीं त्या विषयीं शपथ कशी घ्यावी ? माझे तोंडचें वचन सरकारानें कबूल करावें. " महाराज म्हणाले, " बरें आहे. तर तुह्मीं खचित परत या. " असें म्हटल्या वर मीं मुजरा करून निघालों. गोविंदराव व सखारामपंत हे मज बरोबर बोलत बोलत खालीं आले आणि म्हणाले, " पहा हो सरकारचा आग्रह फार आहे, तुह्मीं येथें येण्यास चुकवूं नका ? " म्यां बरें म्हणून त्या सर्व मंडळीस नमस्कार केला आणि निघालों.

## नाना नारायण यांच्या एथें माझें या खेपेस बिऱ्हाड होतें.

या खेपेस माझें बिऱ्हाड आमचे बालमित्र राजश्री नाना नारायण यांच्या बिऱ्हाडीं होतें. भाऊसाहेब शास्त्री तबियेत बिघडल्या मुळें आपल्या बंगल्यांत कापांत राहायास गेले होते. त्यांसही मीं एकदोनदां भेटलों आणि सरकारवाड्यांत झालेला मजकूर सर्व कळविला. महाराजांनीं आप्पासाहेबां करितां इंग्लिश पढविण्यास शास्त्री यांज कडून नानास मागून घेतलें आणि त्यांची असामी

सरकारांत करून दिली. एथें मीं दहाबारा दिवस होतों तों पर्यंत नानाच्या बिऱ्हाडीं मोठ्या आनंदानें होतों. त्यांस हें माझें वर्तमान ऐकून मोठा आनंद झाला. ते म्हणाले, "बाळपणापासून तुमच्या आमच्या सोबतीचा योगच असा कांहीं विलक्षण आहे कीं, तुह्मीं आह्मीं थोडे दिवस राहून पुढें एकत्र मिळावें!"

'आतां तुह्मीं लौकर बडोद्यास या,' अशी आमच्या मित्रानें मोठी उत्कंठा दाखविली. हे आमच्या सोयी प्रमाणें व चैने प्रमाणें सकाळीं आप्पासाहेब (पुढें खंडेराव महाराज झाले ते) यांस इंग्रजी पाठ देण्यास जात असत. त्यांच्या कुस्त्या झाल्या वर ते त्यांच्यापासून पाठ घेण्यास सरकारवाड्यांत त्यांस खोली दिली होती तींत येत असत. तेथें नानानें मला दोन तीन वेळां नेऊन आप्पासाहेबांची चांगली ओळख करून दिली. शेवटीं ते मला म्हणाले, "महाराजांनीं तुह्मांला आमच्या एथें येण्यास सांगितलें आहे त्या प्रमाणें तुह्मीं या हो, चुकूं नका." ही माझी आणि खंडेराव महाराजांची पहिली ओळख. त्यांहीं ती पुढें चांगली ठेविली, हाही मजकूर प्रसंगोपात्त वाचकांस समजेल. आमचे मित्र नाना हे बडोद्यांत राहून थोडे राजविलासी पुरुष बनले होते. त्यांस हें माझें नित्य सरकारवाड्यांत जाऊन रखडणें आवडत नव्हतें.

## सुरतेस व मुंबईस परत जाणें. सुरतेहून मीं आपल्या कामाचा राजीनामा पाठविला आणि माझी रजा संपविण्यास घरीं मुंबईस गेलों.

ते आपल्या अनुभवा वरून मला सांगत कीं, "एथील लोकांचें इतकें आर्जव नको. मीं दिवाण भाऊ तांबेकर यांसीहि फटकून असतों. दोनदां तीनदां बलाविलान तेव्हां एकदां जातों. नाहींतर यांहीं मला एथें चैन पडूं दिलें नसतें. मलाहि आतां तुह्मांस त्यांज पाशीं नेण्यास प्रशस्त दिसत नाहीं; ते आपल्या घमेंडानें तुमचा जसा आदरसत्कार राखावा तसा राखणार नाहींत या भयानें मीं तुह्मांला त्यांच्या जवळ नेत नाहीं. पुढें दिवाणजीस भेटण्याचे प्रसंग येतीलच." असें आमच्या मित्रा बरोबर भाषण झाल्या वर मीं परत सुरतेस गेलों, आणि तेथून आपल्या कामाचा राजीनामा मिस्तर ग्रीन (Mr. Green) यांच्या मार्फत मुंबईस Board of Education या मंडळीचे सक्रेटर (Secretary) डाक्टर स्टोवेल (Dr. Stovell) यांज कडेस पाठविला. आणि लागलाच संध्याकाळीं घोरटला निरोप घेण्या करितां खानबहादूर

**आर्देशिर धनजीशाह** यांज कडेस गेलों. त्यांची आतां गरज सरली. त्यांस माझी भेट घेण्यानें कांहीं समाधान वाटलें नाहीं. कारण मीं आतां त्यांचा मागणेदार झालों, आणि ते माझे देणेदार. मग मागणेदारास पाहून देणेदार कसा खूश होतो ? मीं या वेळेस खूप रगडून आपलें मागणें केलें. आणि म्हणालों, "शेटसाहेब, म्यां इतकी सात आठ महिने पर्यंत सतत तुह्मांस मदत करण्याचे श्रम घेतले, रात्रीचा जागलों आणि तुह्मांस तर्जुमे करून दिले. त्या खटल्यांतही परमेश्वरानें तुह्मांस यश दिलें. तुह्मीं सर्व मंडळी समक्ष मला अभयवचन दिलें व त्याचें तुह्मांस आतां स्मरण आहे काय ? तुह्मीं Mr. Howard यांस रोज ३०० रुपये प्रमाणें हिशोब करून सारी रक्कम देऊन आणखी जाते वेळेस त्याच्या हातांत तीन हजार रुपयांची हिऱ्याची आंगठी घातलीत, आणि मला तुमच्या कडून एक फुटकें बदाम देखील मिळालें नाहीं. आतां इतकी मेहनत घेऊन तुह्मीं मला असें विन्मुख पाठवितां हें भगवंतास कसें बरें वाटेल ? याचा परिणाम तुह्मांस फार जड जाईल, याची पक्की आपल्या मनांत गांठ बांधून ठेवा. मीं तर जातों, परंतु तुह्मांस लौकरच याचा, माझ्या निराशेचा अनुभव येईल." असें म्हणून मीं सलाम न करितां रागानें तसाच पाठमोर होऊन परत बिऱ्हाडीं आलों. तरीं त्याणें माझें निघतांना समाधान इतकेंच केलें कीं, "तुमचें इनाम तुह्मांस घरीं पाठवून देईन." म्यां म्हटलें, "आतां तुमच्या बोलण्या वर कोण विश्वास ठेवील ? तुह्मीं स्वर्गाहून पाठवाल तरच." असें म्हणून मीं निघालों; आणि बिऱ्हाडीं आलों. पहा या सुरतेंतल्या मोठ्या नामांकित नेटिव गृहस्थाची वर्तणूक आणि एक दोन महिने उगीच एक तास खेळण्या प्रमाणें ज्यांस गुजराथी शिकवायास जात होतों त्या आर्बथनट साहेबांची वर्तणूक.

पुढें लौकरच या आर्देशिराची पहा कशी दशा झाली. मीं मुंबईस गेल्या वर यांस लौकरच पेन्शन झालें. पुढें या दोघां भावांस कर्ज झालें म्हणोन त्यांची सर्व स्थावर जंगम दरोबस्त मालमिळकत साहुकारांनीं हुकुमनामे करून लिलावांत विकली. शेवटीं एक दोन वर्षांचे आंत आर्देशिर मरण पावला, तेव्हां शेवटीं त्याच्या बायकोस लोकांचें दळणकांडण करून पोट भरावें लागलें.

मीं राजीनामा पाठविल्या वर घरीं जाण्याच्या तयारी करितां मुरब्बी लोकांस व इष्टमित्रांस भेटण्या करितां मुंबईस गेलों. बडोद्यास सयाजीराव महाराज गायकवाड यांच्या बलावण्या वरून माझ्या जाण्याचें वर्तमान पसरलें.

★

## २८

# माझें सन १८४६ सांत एप्रिलांत मुंबईस जाणें

## आणि येथें त्याच महिन्याचे सुमारास बाळ गंगाधर शास्त्री यांचा मृत्यु

मुंबईस गेल्या वर प्रथम बोर्ड आव एज्युकेशनचे सक्रतार डाक्टर स्टोवेल यांस भेटलों. माझा राजीनामा त्यांज कडेस गेला होता तो पाहून त्यांस व कित्येक बोर्डाचे सभासदांस बरें वाटलें नाहीं. डाक्टर स्टोवेल साहेब यांहीं आपली नाखुशी दाखविली आणि मला म्हणाले, "ही सरकारची नौकरी सोडून तूं बडोद्यास जातोस यांत तूं आपलें काय हित पाहिलें?" म्यां म्हटलें, "मला पुढें वाढण्याची चांगली आशा दिसत्ये." ते म्हणाले, "तूं चुकतोस." असें म्हणून त्यांहीं माझा राजीनामा तसाच आपल्या पाशीं ठेविला. इतक्यांत राजश्री बाळ गंगाधर शास्त्री हे प्राचीन लेखांचा शोध लावण्या करतां कनकेश्वरास गेले होते, त्यांस तेथें उष्णता लागून ताप लागला, त्या मुळें ते तसेच दुखणाईत घरीं आले.[१] हें मला समजतांच मीं त्यांच्या भेटीस कोलभाट वाडींत त्यांचें स्वतांचें घर बांधलें होतें, तेथें मीं गेलों. तेथें बाळशास्त्री यांचे पूर्वीचे इंग्लिश स्कुलांतले सहाध्यायी त्यांच्या समाचारास आले होते. आह्मीं उभयतांनीं पाहिलें तों शास्त्रीबावा बेशुद्ध पडले होते आणि बरळत होते. हें पाहून आह्मीं उभयतां फारच खंती झालों. आतां शास्त्रीबावांची फारशी आशा नाहीं [ असें आह्मांस वाटलें. ] आह्मांस त्यांहीं ओळखलें नाहीं. मग आह्मीं उभयतां घरीं गेलों. त्याच संध्याकाळीं शास्त्रीबावा निवर्तले असें आह्मीं घरीं ऐकलें.

---

१ तुल्य-"He caught feavour in a tour of investigation through the Concan where neither medicine nor medical attendance were procurable. He returned to the presidency on Tuesday in a very dangerous state and gradually sunk before the attacks of the malady which on Sunday afternoon ( 17-5-46 ) proved fatal to him."—**The Bombay Times and Journal of Commerce, May 20th, 1846. p. 326.**

## बाळशास्त्री यांच्या विद्वत्तेचें व गुणांचें वर्णन

बाळ गंगाधर शास्त्री जांभेकर हे मूळचे राजापूर प्रांतीं पोंवुलें गांव आहे तेथले राहणार. यांचे बाप चांगले व्युत्पन्न भिक्षुक असत. त्यांहीं आपल्या मुलास चांगली काव्यव्युत्पत्ति करून दिली होती. त्यांस सदाशिव काशीनाथ छत्र्ये ऊर्फ बापू छत्र्ये हे फार मानित होते. बापू छत्र्यांच्या सांगण्या वरून गंगाधर शास्त्री यांहीं आपला मुलगा बापू कडेस इंग्लिश शिकण्या करितां ठेविला. त्यांहीं त्या मुलाची अल्पवयांत थोर बुद्धि पाहून त्यास सोसाइटीच्या नव्या इंग्लिश स्कुलांत अभ्यासा करतां ठेविलें. त्यांचा थोडक्याच दिवसांत इंग्लिश भाषेंत फार चांगला प्रवेश होत गेला. मीं मराठी शाळेंत आलों त्याच्या पूर्वीपासून ते इंग्लिश स्कुलांत मेस्तर मेनवारिंग ( Mr. Mainwaring ) यांच्या हाता खालीं पहिल्या वर्गांत शिकत होते. दिवसास इंग्लिश शिकावें आणि संध्याकाळीं आमचा गुरु बापू शास्त्री शुक्ल यांच्या बिऱ्हाडीं कौमुदीची पोथी घेऊन तेथें पढायास जावें, असा मीं ल्हानपणीं त्यांचा क्रम पाहत असें. पुढें बापू छत्र्ये वारल्या वर पन्नास रुपयां वर त्यांस ती जागा मिळाली.[१] पुढें **राबर्ट काटन मनी** हे मेजर जर्विस यांच्या बराबर नेटिव एज्युकेशन सोसाइटीचे सक्रेतार झाले तेव्हां बाळशास्त्री हे त्यांचे आसिस्टंट झाले. उभयतांची फार प्रीति जमली. त्या वेळेस मनीसाहेबांनीं बाळशास्त्री यांच्या हातून गोल्डस्मिथस् हिस्टरी आफ इंग्लंड (Goldsmith's History of England) या ग्रंथाचें मराठींत भाषांतर[२] करवून तें शिलाछाप वर छापिलें. पुढें बाळशास्त्री यांस प्रतापसिंह महाराज छत्रपति सातारकर यांच्या इच्छे वरून सरकारानें अक्कलकोटचे दोन भाऊ राजे भोंसले यांस इंग्लिश शिकवायास पाठविलें. तेथें त्यांचा दरमाहा दीडशें किंवा दोनशें रुपयांचा होता.[३]

१ मागील पृष्ठ ५१ वरील टीप पहा.

२ इंग्लंड देशाची बखर, भा. १ ला. (१८३२) व भा. २ रा (१८३४) "By European and Native Secretary." (G. D. 1843, Vol. 24 A, p. 730)

३ दरमहा १२० रुपयांवर डिसेंबर १८३२ आरंभीं बाळशास्त्र्यांनीं अक्कलकोटला पाठविलें. तुळा "The Right Hon. The Governor in Council is pleased to sanction Rs. 120-per mensem as Bal Shastree's salary with a reasonable sum for the travelling expenses ..." मुंबई सरकारचे साताऱ्च्या रेसिडेंटला ता. १४ नवंबर १८३२ चें पत्र. (P. D. Book N. 109 of 1832).

पुढें लौकरच एक दोन वर्षांनीं एल्फिन्स्टन कालेज या पाठशाळेची स्थापना झाली आणि पाठशाळेचे Professor A. Orlebar आणि Professor John Harkness यांस गुरु नेमिलें आणि बाळ गंगाधर शास्त्री यांस त्यांचे आसिस्टंट नेमिलें. ते या आपल्या नव्या जागे वर सन १८३४ च्या सालीं अक्कलकोटाहून मुंबईस आले. त्याच वेळेस आमच्या मातुःश्रीच्या मृताशौचांत मीं होतों. हें त्यांस समजतांच ते माझ्या समाचारास बसायास आले तेव्हां त्यांहीं आपल्या द्वितीय संबंधाची गोष्ट सांगतांना "आमचें नवें कुटुंब प्रसिद्ध मोरोपंत कवि यांच्याच आप्त वर्गांतलें आहे," असें संतोषानें सांगितलें. प्रथम प्रोफेसर आर्लिबार हे मुंबईस आले. हे गणितशास्त्रांत फार निपुण होते. तेव्हां बाळशास्त्री यांहीं त्यांच्या गणितशास्त्राचें अध्ययन केलें. हेंच त्या गुरूचें पहिलें शिकविण्याचें काम. बाळशास्त्री यांची कुशाग्र बुद्धि पाहून प्रोफेसर आर्लिबार हे त्यांची फार तारीफ करून होते. मग टौन हालांत एका खोलींत थोडे लायक विद्यार्थी यांस गणित पढविण्यानें पाठशाळेचें काम सुरू झालें. पुढें बाळशास्त्री यांणीं Differential and Integral Calculus म्हणजे शून्यलब्धि गणित याचें मराठी भाषांतर केलें. हा यांचा शेवटला ग्रंथ.[1] परंतु दुसरें बाळशास्त्री यांहीं एक

---

१ हा ग्रंथ उपलब्ध नाहीं, व तो मुद्रित झाल्याचा निर्देशही अन्यत्र सांपडला नाहीं. The Bombay Times त्यांच्या मृत्युलेखांत लिहितो, "He had shortly before his death composed in Marathi an outline of the History of India on the model supplied by Mr. Elphinstone; and a manual on the intellectual system, for which the admirable work of Dr. Abercrombie was taken as the basis." (May 20th, 1846) यापैकी हिंदुस्थानचा इतिहास १८४६ सालींच प्रसिद्ध झाला. पण दुसऱ्या पुस्तकाचा थांग लागत नाहीं. J. Abercrombie याचे, On the Intellectual Powers (1838) व The Philosophy of the Moral Feelings (1836) असे दोन ग्रंथ उपलब्ध आहेत (एल्फिन्स्टन कॉ. लायब्ररी) त्यापैकीं पहिल्या ग्रंथाचें हें रूपांतर असावें. याशिवाय, सारसंग्रह, (१८३१), इंग्लंड देशाची बखर (१८३४), बाल व्याकरण (१८३६), भूगोलविद्या, (?), भूगोलशास्त्र, गणितभाग (१८३६), नीतिकथा (१८३६), हिंदुस्थानांतील इंग्लिशांच्या राज्याचा इतिहास, (१८४९) असे यांचे ग्रंथ आहेत. बोर्ड ऑफ एज्युकेशनचे सेक्रेटरी मि. एच्. एन्. रामसे यानें ता. ९ मार्च १८४१ रोजीं शिक्षणखात्यांतील क्रमिक पुस्तकांच्या सुधारणेसंबंधीं अभिप्राय मागितले होते. त्याला उत्तरादाखल पाठविलेल्या निवेदनांत बाळशास्त्री लिहितात, "In conjunction with Prof. Orlebar, I have been engaged for some years in compiling a

मोठें संस्मरणीय काम केलें तें असें. त्या वेळेस मुंबईंत मराठी व इंग्लिश भाषेंत नेटिव लोकांनीं चालविलेलें असें एकही वर्तमानपत्र नव्हतें. तेव्हां एक दोन पैकेवाले नेटिव गृहस्थ मिळून दर्पण[1] या नांवाचें मराठींत व इंग्रजींत वर्तमानपत्र काढण्याचें योजिलें आणि त्याचे बाळशास्त्री यांस एडिटर नेमिलें. शास्त्रीबावांनीं तें काम मोठ्या मनोत्साहानें कांहीं दरमाह न घेतां पत्करिलें. कारण त्यांस वाटलें, किं आतां आपला इंग्लिश भाषेंत पहिल्या विषयां वर लिहिण्याचा अभ्यास फार चांगला होईल. तसेंच झालें. त्या वर्तमानपत्रानें त्यांची मोठी कीर्ति वाढविली, आणि त्या वेळचे गव्हर्नर सर जेम्स कार्नाक यांहीं यांच्या लिहिण्या वरून खुश होऊन त्यांस एकदम जस्टिस आव दि पीस ( Justice of the Peace ) ही पदवी दिली. ही पदवी पूर्वी पैकेवाले अगदीं थोडे नेटिवांस क्वचित् मिळत असे.[2] या पदवी वरून

---

short dictionary of the roots of the English language which is now nearly ready." ( G. D. 1843, 24 A, p. 650 ). याही पुस्तकाचा पत्ता लागत नाहीं.

१ हें इंग्रजी–मराठी पाक्षिक ता. ६ जाने. १८३२ शुक्रवार पासून निघूं लागलें. या पत्राच्या कांहीं प्रती विकत घेऊन सरकारनें आश्रय द्यावा अशा आशयाचा ता. २ जाने. १८३२ चा अर्ज उपलब्ध असून त्यावर रघुनाथ हरिश्चंद्रजी, जनार्दन वासुदेवजी व बाळ गं. शास्त्री यांच्या सह्या आहेत (G. D. 1832, Vol. 259, p. 91). या पत्राचे पहिल्या दोन तीन वर्षांचे अंक मुंबई रिकॉर्ड ऑफिसामध्यें आहेत. बंगाली भाषेंतील पहिलें वर्तमानपत्र १८१८ सालीं श्रीरामपूर येथें मिशनरी छापखान्यांत निघालें त्याचें नांव ' दर्पण ' असेंच होतें. (ज्ञानोदय, १ जानु. १८५१ ) या मराठी पत्राची वा. व. रु. २४ होती व आरंभीं त्याचे २८० वर्गणीदार होते ( O. C. S. March 1833 ). यांत एकच मजकूर दोन भाषांत असे. १८३२ च्या मे पासून हें पत्र साप्ताहिक होऊन दर शुक्रवारीं निघूं लागलें व १८३९–४० पर्यंत सातआठ वर्षें चाललें.

२ १८३४ च्या पूर्वी एकंदर १६० जे. पी. होते. त्यांपैकीं ३३ मुंबई बेटांतील रहिवाशी. हे सर्व युरोपियन असत. १८३४ सालीं ३१ नवे जे. पी. केले त्यांपैकीं पहिल्यानदांच १३ देशी नेमले ते हे : महमद इ. मकबा, जगन्नाथ शंकरशेट, भाऊजी दादाजी, महमद अली रोगे, बम्मनजी होर्मसजी वाडिया, कर्सेटजी आर्देशिर दादी, कर्सेटजी रुस्तुमजी, दादाभाई पेस्तंजी वाडिया, फ्रामजी कावसजी बाणाजी, होर्मसजी भिकाजी चिनॉय, जमशेटजी जिजीभाई, नवरोजी जमशेटजी व करसेटजी कावसजी बाणाजी (G. D. Vol. 12, pp. 1–17) यांत १८४० मध्यें आणखी दहा जे. पी. ची भर पडली. त्यांत बाळ गंगाधर शास्त्री होते. ( G. D. 1840, Vol. 628, p. 14 ) त्यांनीं पॉवुर्लेहून आभारप्रदर्शक गव्हर्नरच्या सेक्रेटरींना पाठविलेलें ता. १९–१०–४० चें पत्र उपलब्ध आहे ( *Ibid*, p. 38 ).

आतां बाळशास्त्री यांची मुंबईत बडे लोकांत व मानकरी लोकांत गणना झाली. त्या काळीं **जमशेटजी जीजीभाई, फरामजी कावसजी, बमनजी नौरोझजी वाडये, जगन्नाथजी शंकरशेट, देवीदास मनमोहनदास** व थोडे आणखी इतकेच काय ते जस्टिस आव दि पीस होते; आणि त्यांचा मुंबईत सरकारदरबारीं व इतर ठिकाणीं फार मोठा मान होता. आतां प्रमाणें म्हणजे सन १८७० पासून जो उठला तो, आणि ज्याची थोडी सरकाराशीं वग[1] असली तो, असे भाराभर जस्टिस आव दि पीस होत नव्हते. 'दर्पण' हें मुंबईत इंग्लिश व मराठी भाषेत नेटिवांनीं चालविलेलें वर्तमानपत्र होतें. आतां त्याची एकही प्रत कोठेंच दिसत नाहीं. बाळशास्त्री हे काळे, ठेंगण्या बांध्याचे पुरुष होते.[2] त्यांचे नेत्र विशाल आणि चंचल होते, तरीं ते गंभीरपणानें नेहमी खालीं पाहत असत. ते फार अल्पवयी होते तरीं त्यांची चाल वृद्ध पोक्तपणाची होती.

आतां बाळशास्त्री सन १८४६ साच्या मे किंवा जून महिन्यांत (मला त्यांच्या मरणाची बराबर तारीख आठवत नाहीं)[3] वारल्या वर बोर्ड आव एज्युकेशनानें

---

१ (अरबी) वशिला.

२ बाळशास्त्र्यांच्या काळीं फोटोग्राफीचा प्रवेश हिंदुस्थानांत झाला नव्हता. त्यामुळें त्यांचे छायाचित्र उपलब्ध नाहीं. बाळशास्त्र्यांचीं इतर लोकांनीं केलेलीं वर्णनें: Political Rishi :—"Of a somewhat dark colour and short in stature, in his appearance he was more saintly than pre-possessing and no one could have said either from his features or his dress that he was one of the eminent scholars of the day"—इंदुप्रकाश (११ मे १८८५). बा. ना. देव—"त्यांचा चेहरा फार भव्य व इभ्रतदार आणि साधा होता. त्यांचा वर्ण निमगोरा—कांहिसा सांवळा म्हटला तरी चालेल. त्यांचा बांधा मध्यम होता. तो फार उंच नव्हता व ठेंगणाही नव्हता. त्यांची मुद्रा प्रसन्न दिसे. तो सदा हंसतमुख होता. नागपुरी रेशिमकांठी नेसायचीं धोतरें, पुणेशाही पांढरा अंगरखा, तांबडें—फार मोठें नाहीं फार लहान नाहीं असें पागोटें, आणि अंगावर स्वच्छ उपवस्त्र हा त्यांचा नेहमीचा पोषाक असे." (जांभेकरांचें चरित्र, पृ. १९). या निरनिराळ्या वर्णनाप्रमाणें बाळशास्त्र्यांचें चित्र रा. मुळगांवकर यांनीं तयार केलें आहे. मनोहर, जुलै, १९४६ पहा.

३ बाळशास्त्र्यांचें निधन ता. १७ मे १८४६ रोजीं झालें. ही दुःखद वार्ता सरकारला कळवितांना बोर्ड ऑफ् एज्युकेशनचे सेक्रेटरी मि. स्टोवेल आपल्या ता. २२ मे १८४६ च्या पत्रांत लिहितात, "No native in the presidency—perhaps no native in either presidency—ever distinguished himself by such

मीं पाठविलेला राजीनामा कबूल न करितां माझी त्यांच्या जागे वर नेमणूक केली.[1] आतां मुंबईत मीं त्यांचें काम घेतल्याच्या पूर्वी ज्या सुरत शहरास व तेथील माझ्या मित्रांस शेवटला 'जय गोपाळ' करायाचे पूर्वी, मला थोडें तरीं त्या शहराचें व तेथील लोकांचें व त्यांच्या रीतीभातीचें वर्णन सांगितलें पाहिजे. मग याचा पुढला धागा हातीं धरला पाहिजे.

★

extensive learning or such varied accomplishments...His death so greatly to be deplored may justly be viewed as a great public calamity." ( G. D. 1846, vol. 28, p. 59.) बोर्ड ऑफ् एज्युकेशनच्या १८४६ च्या रिपोर्टांतही ( पृ. २ व ३ पहा. ) त्याची मुक्तकंठानें स्तुति करून त्यांच्या विधवेला रु. ५० व तिच्या निधनानंतर मुलाला २५ रु. पेन्शन मिळावें, अशी शिफारस करण्यांत आलेली आढळते. त्याप्रमाणें सरकारकडून मंजुरी मिळाली. पण त्यांची पत्नि ता. २ मे १८४७ रोजीं मुंबई येथें व मुलगा ता. १ जून १८४७ रोजीं पंढरपूर येथें निवर्तला. ( Report of the Board of Education 1847-48, p. 16 )

१ दादोबांची ता. २१ मे १८४६ पासून इलाख्यांतील व्हर्न्याक्युलर शाळांचे हंगामी सुपरिंटेंडेंट व नॉर्मल क्लासचे हंगामी डायरेक्टर म्हणून नेमणूक झाली. ( G. D. 1846, vol. 28, p. 29 ) पगार दरमहा रु. २०० ( G. D. 1846, vol. 28, p. 35 )

२९

## सुरत

सुरत हें पूर्वीपासून नामांकित शहर होतें. मुंबई वसल्याचे अगोदर हें मोठें व्यापाराचें बंदर होतें. एथें सर्व देशाचे लोक अरब, मोगल, आरमानी, पोर्तुगीज, फ्रेंच, वलंदे[1] (Danes) व शेवटीं इंग्लिश यांहीं मोठाल्या वखारी बांधून व्यापार चालविला होता. तेव्हां याच देशांत हे परमुलखी व्यापारी पुष्कळ माल नेत असत, आणि त्याच्या ऐवजीं सोनें, रुपें व दुसरे मोलवान पदार्थ आणून देत असतां आतां जो व्यापार चालला आहे त्याच्या उलट तेव्हां व्यापार चालत होता. या कारणानें एथील लोक सधन होण्यास पुष्कळ द्वारें होतीं व एथले लोकही मोटे कारगीर[2] होत होते. आतां सर्व उलट झालें आहे. त्या परमुलखी व्यापाऱ्यांच्या एथें आतां मोडलेल्या वखारी कोठें कोठें दृष्टीस पडतात. अद्यापि एथें **वलंदाबाद** या नांवानें एक चौक प्रसिद्ध आहे. तशीच **मोंगली सराई.** मीं गेलों तेव्हां एथें दोनतीन आरमानी यांचीं घरें होतीं, आणि त्यांच्या बायका कोठें कोठें दृष्टीस पडत होत्या. ते लोक अगदीं गरीब झालेले होते. गौरवर्ण व सौंदर्य हाच काय तो त्यांच्या संततीचा मालमत्ता राहिला होता. आतां हें शहर जरीं अगदीं मोडकळस आलेलें मला आढळलें, (त्यांत संवत् १८९३ ची मोठी आग लागून अर्धी वस्ती जळालेली व जागोजाग खिंडारें पडलेलीं माझ्या दृष्टीस पडलीं) तरीं जशी एकादी म्हातारी पाहिली असतां तिच्या तारुण्याच्या सौन्दर्याचें अनुमान होतें, तसें हें शहर पाहिलें असतां त्याच्या पहिल्या संपत्तीचें अनुमान होतें. या व्यापारा मुळें एथें मोटमोठे आत्माराम भुखण, त्रिवाडी आदिकरून ल्हानमोठ्या शतावधि साहुकारांच्या पेढ्या देशदेशाच्या अनेक तऱ्हेच्या नाण्यांनीं भरलेल्या असत. सोन्याचीं रयाळें म्हणजे Dollars हें तर मुख्य

---

१ Cf. "विलंदा Veelunda, the Guzerat mode of pronouncing the Portuguese Olandez, a Dutchman, the joculer Brahmins and observers of character tear the roots of this title from the Sanscrit **Veelumbena duddatee.**" (विलंबेन ददाति.)—Drummond, 1808.

२ (फारसी—कारिगर)

परमुलखी व्यापाऱ्यांचें देण्याघेण्याचें नाणें होतें. शिवाजी मोठा धूर्त होता. त्याणें हें त्या काळचें व पूर्वीचें व्यापाराचें मुख्य बंदर जाणून हें लुटलें असतां आपल्यास पुष्कळ संपत्ति मिळेल असें खरें अनुमान करून तें लुटलें;[1] तेव्हां या शहराची संपत्ति पाहून त्याचे व त्याच्या लोकांचे डोळे दिपले असतील यांत संशय नाहीं. या शहरांत तेव्हां मोठमोठ्या गगनचुंबित माड्या व त्यांज वर गच्च्या व त्या गच्च्यां वर एक पतंग उडविण्या करितां गच्ची अशा माड्या व घरें पुष्कळ असावींत.

## एथील मागला व्यापार व वस्ती.

एथें मागल्या शतकाच्या आखेरीस राघोबादादा पेशवे हे इंग्लिशांचा आश्रय मागायास आले होते त्यांहीं मोठा वाडा आपल्यास राहण्या करितां बांधिला होता तो आतां त्यांच्या नांवानें प्रसिद्ध जो रघुनाथपुरा (रघुनाथ परूं) आहे तेथें अद्यापि आहे. मीं गेलों तेव्हां त्यांत दक्षणी ब्राह्मण राहत होते. सन १८८२[2] त आतां कोणास ठाऊक तो कोणाच्या स्वाधीन आहे आणि त्यांत कोण राहतें. **रघुनाथ परूं** हा एथें मोठा पुरा[3] आहे. तसाच **गोपीपुरा, नबाबाचा गंज,**[4] **बक्षीचा दर्यामेहल,**[5] **केळां पीठ,**[6] **हवाडपीना चकलो,**[7] **सोनी कळयूं, लोहार पोळ,**[8] **वाकीबोडी, बहणपुरी भागळ,**[9] **वोसारी भागळ,** [अशीं], नाना परूं, वस्तीचीं बोळ व ठिकाणें आहेत. मध्यें शहर व त्याचा कोट आणि पुरे अशी ही पूर्वी वस्ती असावी.

सुरतेंत सर्व जातीचे व धर्माचे लोक आहेत. पारशी लोकांची तर ही जुनी वस्ती. बोहरी यांचीही तशीच. त्यांच्या मुल्लयाचें हें मुख्य स्थान. या लोकांच्या मुल्लयाचीं तीन मुख्य स्थानें – सुरत, बऱ्हाणपूर व उज्जनी. मुसलमान व हिंदु लोकांत तर सर्व जातीचे लोक एथें आहेत. त्यांत ब्राह्मण व वाणी ही मुख्य जाती – ब्राह्मणांत –

---

१ Henry Gary आपल्या ता. २५ जाने० १६६४ च्या पत्रांत Earl of Marlborough ला लिहितो—"Savagee...caryed a vast treasure away with him. It is credibly reported near unto ten millions of rupees." (**English Records on Shivaji, I, 76**)

२ कालनिर्देश पहा. (xii) ता. १७ अक्टो. १८८२ मध्यें वारले. त्यांच्या निधनामुळें हा ग्रंथ अपुरा राहिलेला दिसतो.

३ पुरा म्हणजे उपनगर, गुजराती परूं.

४ बाजार. ५ वाडा. ६ बाजार. ७ चौक, बाजार. ८ रस्ता. ९ बाजार.

**नागर, मोड, भार्गव, श्रीमाळी, औदिच** ( सहस्त्र आणि टोळक्ये हे यांत मोठे भेद. ) इत्यादि अनेक जाती व त्यांचे भेद आहेत. एका नागरांत सहा भेद— **वडनगरा, विसनगरा, कृष्णोरा, प्रश्नोरा, साठोद्रा व पाठोद्रा.** तसेंच मोडांतहि सहा भेद—**चतुर्वेदी, त्रिवेदी, धणोजा, तांदळजा** इ०. वाण्यांतही —**नागर, मोड, दींडू, खंडायता, श्रीमाळी, लाड, कपोळ, गुजर** इत्यादि. त्यांचे भेद व दसावीस[1] हे आणखी एकेका वाण्याच्या जातीचे उपभेद. असे सर्वत्र भेदी–भेद–भेदांस तोटा नाहीं. अशा हिंदूंच्या अनेक जाती. हे जातीचे भेद पाहणें असल्यास गुजराथेंत जावें.[2] एवढें बरें आहे कीं, त्यांस एका जाती मध्यें जेवण्यांत बहुधा हे भेद नडत नाहींत; परन्तु कन्याव्यवहारांत तर त्यांस या भेदा मुळें अनिर्वाच्य दुःखें सोसावीं लागतात.

## एथील लोक व वस्ती.

मीं सुरतेंत असतां एक त्रिवेदी भार्गव जातीचा ब्राह्मण येऊन मला आपलें दुःख सांगूं लागला. तो म्हणाला, " आमच्या सर्व जातीचीं चारपांच घरें आहेत. त्यांत कन्याव्यवहार तितक्या मध्येंच झाला पाहिजे. दुसरे कोणी भार्गव आमच्या मुलांस मुली किंवा मुलीस आपले मुलगे देत नाहींत. या वरून पहा आमची काय अडचण असेल ती. कन्या असली तर आह्मांस फारच संकट पडतें तें सांगतां येत नाहीं. या सर्व ब्राह्मणां मध्यें उंच म्हटले म्हणजे **नागर,** त्यांतही अति उंच म्हटले म्हणजे वडनगरे व त्यांतही या लोकां मध्यें गृहस्थ म्हटले म्हणजे मेहते, आणि भिक्षुक म्हटले म्हणजे त्यांस हे ब्राह्मण म्हणतात. भिक्षुकाची मुलगी बहुधा गृहस्थ करित नाहींत. या **वडनगऱ्यांतही** सुरती आणि अहमदावादी असे आणि कन्या व्यवहारांत भेद पाडतात. **विसनगऱ्यांस वडनगरे** नीच मानितात. " ए तो रांड विसनगरी छे एने शुं ! " असें वडनगर नागर व नागरिणीला रस्त्यांत बोलतांना मीं ऐकिलें आहे.. हे मेहते नागर मोठे दरबारी व फारच देखणे असतात. यांच्या बायका तर अतिलावण्यवती व बहुतकरून

१ दशानागर व विसनागर, 'दशानागर वणिक ज्ञातिनु टुंक वर्णन' (१९११) नांवाचें एक पुस्तक उपलब्ध आहे.

२ गुर्जर ब्राह्मण व त्यांचे भेद यांच्यासंबंधी जास्त माहितीकरितां Dr. John Wilson चें **Indian Caste**, ( part II, 1877 ) Pp. 91–123 पहा.

सडपातळ असतात. यांचा पेहराव, स्वयंपाक व गर्भे तर फारच सुंदर आणि मधुर असतात व ह्या बायकाही मोठ्या चतुर असतात. पुऱ्या तर नागरांच्याच खाव्या. त्या इतक्या मुलायम[१] असतात, किं एकेक असामी समयास पन्नास पाऊणशें पुरी खातो. मला सुरतेंत असतां यांज कडेस जेवणाचा फार प्रसंग असे. अशीं सुंदर पक्वान्नें तर मीं कोठेंच जेवलों नसेन. यांच्या बायकांस बहुधा लिहिणें-वाचणें येत असतें. नागरिणी ह्या नागकन्याच खऱ्या आणि नागर हे मोठे आर्जवी, कार्यसाधक, गोडबोले असे असतात. यांज पासून आपल्या जाती शिवाय इतर जातीच्यांस आश्रय मिळणें फारच दुर्मिळ. हे गुजराथ देशांतले शुद्ध चित्तपावन समजावे. सुरतेंत माझा सहवास याच लोकां बराबर फार होता. त्या देशांत व काठेवाडांत मोठे दिवाण, मुतसद्दी व कारकून हेच लोक बहुधा असतात. नागर हे शंकर व नागरिणी या गौरी–**रमाशंकर, शिवशंकर, पार्वतीशंकर, गिरिजा-शंकर, नर्मदाशंकर, दिनमणिशंकर, जटाशंकर** हीं पुरुषांचीं नांवें; आणि **शिवगौरी, हरगौरी, ललितागौरी, विजयागौरी, लक्ष्मीगौरी** हीं स्त्रियांचीं नांवें. या ब्राह्मणां शिवाय आणखी उतरते **ब्रह्मक्षत्रिय, खत्री, कायत,** याहि जाती आहेत. कायत हे गुजराथी परभू. इतकेंच कीं, गुजराथ निर्हिंसक देशा मध्यें यांची वस्ती असल्या मुळें येथील कायतां मध्यें मद्यमांस खाण्याचा प्रचार नाहीं. हे वल्लभाचार्य महाराजांची कंठीहि बांधितात. एथें नवी इंग्रेजी झाली तेव्हांपासून या शहरांत मुंबईचे कांहीं परभु वस्ती करून राहिले आहेत. पूर्वी ते त्या वेळच्या इंग्रेजी अमलांत बरेच अधिकारी होते व त्यांहीं बराच पैका गोळा केला होता. त्यांचीं मीं गेलों तेव्हां सुरतेंत दहाबारा घरें होतीं व त्यांची एथें जन्मभाषा बदलून गुजराथी भाषा झाली आहे. घरीं बायकापोरां सुद्धां गुजराथींत बोलतात. कित्येकांस तर मराठी येतच नाहीं. कित्येकांनीं तर महाराजाची कंठी सुद्धां बांधली आहे. आतां यांची वस्ती थोडी मोडत चालल्या सारखी दिसत्ये. एथले ब्राह्मण व गुजराथी वाणी तर त्यांस निंदेनें वांसफोडे[२] म्हणतात. त्याचा अर्थ मला कांहीं दिवस समजला नव्हता. परंतु पुढें विचारांतीं समजला. यांचा मुंबईच्या परभांशीं संबंधव्यवहार असतो.

---

१ ( अरबी ) मृदु, नाजूक.

२ बुरुड; बांबूच्या चटया व टोपल्या करणारे. हलके किंवा नीच हिंदू.



त १३

## सुरतेंतले या काळीं प्रसिद्ध असलेले पांच दकार

मीं सुरतेंत जाण्याचे पूर्वी तेथें एकट्या दुर्गारामा शिवाय (व दलपतराम मास्तर,) उघडपणें या देशसुधाऱ्याच्या गोष्टी कोणी बोलत नसे. परंतु मीं गेल्या वर त्यांस मोठें बळ मिळालें, मग थोड्या दिवसांत बरीच बोलणारी मंडळी जमली. त्या मध्यें जे पुढारी म्हणोन होते त्या सर्वांचीं नामें दकारारंभक होतीं. म्हणजे **दुर्गाराम, दलपतराम, मीं, दिनमणिशंकर पंडे, दामोदरदास व दौलतराम.** हे सर्व मिळून पांच किंवा सहा दकार सर्व सुरतेंत त्या काळीं बायकापोरां मध्यें प्रसिद्ध होते. त्या कालची हकीकत, अलीकडेस **महीपतराम रूपराम** माझे विद्यार्थी यांणीं गुजराथींत दुर्गारामचरित्र[1] म्हणोन एक ग्रंथ प्रसिद्ध करून तो उपकारस्मरणार्थ मला अर्पण केला आहे त्यांत सविस्तर लिहिली आहे.

## माझ्या तान्ह्या मुलाचा मृत्यु

मीं सुरतेंत असतां मुंबईहून आलेला एक आठ नऊ महिन्यांचा बाळा या नांवाचा तान्हा मुलगा मरण पावला. त्या वेळेस एथें मीं आणि माझें कुटुंब अशीं दोनच माणसें होतीं. मुलाची आई तर त्यास घेऊन रडायास बसली. आमच्या समोर दोनचार परभांचीं घरें होतीं त्या घरांत त्या बायकांनीं तर हा आक्रोश ऐकून आपल्या घराचीं व खिडक्यांचीं दारें बंद केलीं. मीं त्या बालकास मूठमाती देण्याच्या मोठ्या विचारांत पडलों. दुर्गाराम मेहताजी व त्याची मावशी, आणि दिनमणिशंकर शास्त्री व त्यांची आई यांस हें वर्तमान कळतांच ते व दुसरे एकदोन नागर गृहस्थ आमच्या घरीं येऊन त्या बालकास तापीच्या कांठीं मूठमाती दिली. परंतु त्या प्रसंगीं आमच्या देशाचे परभु असून त्यांहीं आपलीं दारें खिडक्या बंद केल्या. परदेशांत यांच्या जातीचे एथें कोणी नाहीं, आपण त्यांस मदत करूं हा विचार त्यांच्या मनांत सुद्धां आला नाहीं. त्यांत आणखी त्यांचे मुलगे आमच्या शाळेंत शिकत होते.

---

१ मेहताजी दुर्गाराम मंछाराम चरित्र या गुजराती पुस्तकाचा पहिला भाग १८७९ साली प्रसिद्ध झाला. (पुढील भाग प्रकाशित झालाच नाही.) त्याच्या अर्पणपत्रिकेंत "Dedicated to Rao Bahadoor Dadoba Pandurang—Leader of the band of Reformers who so boldly and nobly attempted, 35 years ago, to dispel ignorance and superstition from their fellowcitizens at Surat," असा मजकूर आहे. जास्त माहिती उत्तरार्धांत पहा. दुर्गारामासंबंधी विशेष माहितीकरितां मनीषक (जुलै १९४४) मधील माझा लेख, नवलग्रंथावलि भा. २ रा व समाजसुधारानुं रेखादर्शन (ले. नवलराम त्रिवेदी, १९३४) वाचा.

## सुरतेंतील गुजराथी लोकांच्या बायकांचे गर्भे

आश्विन महिन्यांत पौर्णिमे पर्यंत एथें सर्व जातीच्या बायका गर्भे गात असतात. मध्यें कांहीं ठेवून त्याच्या सभोंवतीं हाता वर हाताच्या टाळ्या वाजवित गोड स्वरानें हे गर्भे गातात. बहुधा हे गर्भे बायकाच रचितात. यांत नागरांचे गर्भे तर फारच सरस. त्यांच्या बायका घराच्या माडी वरून गात असतात. नऊदहा वाजतां आरंभ होतो तो रात्र सरे पर्यंत हे गर्भे बंद होत नाहींत. इतर जातीच्या बायका तर रस्त्यांत गर्भे गात असतात. ते ऐकायास रात्रीं पुरुषांच्या टोळ्यांच्या टोळ्या फिरत असतात. त्यांत नागर व तशा उंच जातीच्या बायकांचे गर्भे पाहण्यास वगी[1] शिवाय मिळत नाहींत. परंतु माडी खालीं उभे राहून सर्व लोक ऐकतात. त्यांचा रात्रीचा मंजुळ स्वर व शुद्ध वर्णोचारांचं गायन तर फारच चित्तवेधक असतें. एकदोनदां मीं व मेस्तर ग्रीनसाहेब हे गर्भे ऐकण्या करितां चांदण्यांत फिरायास निघालों होतों.

मीं बडोयांत **सयाजी महाराज गायकवाड** यांज बराबर वचनास गुंतलों होतों, आणि घरांत बंधूचाहि आग्रह पडला किं बडोयास जावें हें बरें; परंतु आमचे शुभचिंतक **जगन्नाथ शंकरशेट,** डाक्टर स्टोवेल (Dr. Stovel) आदिकरून बोर्ड आव एज्युकेशनचे अधिकारी यांहीं मला मोठ्या आग्रहानें सल्ला दिली व इष्टमित्रांचीही तशीच सल्ला पडली किं "तुह्मीं बडोयांत न जातां हीच जागा पतकरावी. यांत तुमचा फार मोठा लौकिक आहे." मग मीं सखाराम रोडे यांस पत्र पाठवून ही माझी अडचण महाराजांच्या काना वर घालून माझें बडोयास न येण्याचें कारण त्यांस कळवावें म्हणोन विनंति केली. ती महाराजांस फारशी रुचली नाहीं असें मला पुढें कळून आलें.

★

[1] वाशिला, पृ. १८८, टीप १ पहा.

## ३० + पंतोजी तयार करण्याचें काम

त्या वेळेस बाळशास्त्री हे सर अर्स्किन पेरी[1] ( Sir Erskine Perry ) यांच्या सल्ल्यानें **बोर्ड आव एज्युकेशन** ( Board of Education ) या सरकारानें नेमलेल्या शिक्षामंडळीनें स्थापिलेल्या नार्मल क्लासास ( Normal class ), म्हणजे हुशार पंतोजी तयार करण्याचें काम, पाहत होते. हें बोर्डिंग स्कुला प्रमाणें लहानसें स्कूल होतें. बाळशास्त्री यांहीं आपल्या घरा जवळच एक जागा पाहिली होती. त्यांत या शाळेंतील विद्यार्थ्यांची जेवण्याची व राहण्याची सोई केली होती. ही शाळा पढविण्यांत त्यांस दोन इन्स्पेक्टर मदतनीस होते. एक **रणछोडदास गिरधरभाई** यांज कडेस गुजराथी विद्यार्थी आणि दुसरे कृष्णाजीपंत गाडगीळ यांज कडेस कानडी विद्यार्थी. बाळशास्त्री सांगत त्या प्रमाणें ते त्यांस त्यांच्या भाषेंत पढवीत. असें या शाळेचें सुमारें दीड वर्ष पर्यंत काम चाललें असतां बाळशास्त्री वारले आणि तें त्यांचें या शाळेला पढविण्याचें व ती तयार करण्याचें काम मज कडेस आलें.

### बाळशास्त्री यांचें नार्मल क्लास तयार करण्याचें काम माझे हातीं आलें

या शाळेंत इंग्लिश भाषा, देशभाषा, गणित वगैरे विषय चालत होते. या

१ Sir Thomas Erskine Perry (१८०६-१८८२) Morning Chronicle पत्राचे James Perry यांचे चिरंजीव. १८३४ साली बॅरिस्टर झाल्यावर १८४१ साली मुंबईच्या सुप्रीम कोर्टाचे न्यायाधीश म्हणून आले. याचसाली सर झाले. १८४७ मध्यें चीफ जज्ज. दहा वर्षे बोर्ड ऑफ एज्युकेशनचे अध्यक्ष. १८५२ त सेवानिवृत्त होऊन स्वदेशीं गेले. १८५४-९ पार्लमेंटचे मेंबर. १८५९-८२ इंडिया कौन्सिलचे सभासद. १८८२ प्रिव्ही कौन्सिलर. कायदा व इतर विषयावर पुष्कळ निबंध लिहिले. Cases illustrative of Oriental Life ( 1853 ) व Bird's eye View of India ( 1855 ) हे यांचे स्वतंत्र ग्रंथ आहेत.

शाळेंत त्या वेळेस मुख्य विद्यार्थी होते त्यांचीं नांवें:–लक्ष्मण नृसिंह जोशी,⊕ नारायण बाळकृष्ण पटवर्धन +, महादेव गाडगीळ *, नारोपंत दातार ‡, पुरुषोत्तम जनार्दन चिपळोणकर ¶, केशव शिवराम भवाळकर ф, वासुदेव भिकाजी करमरकर ψ, वगैरे बारा असामी होते. आतां † मला यांचीं नांवें बराबर आठवत नाहींत.[1]

---

⊕ लक्ष्मण नृसिंह जोशी[2] सरकारी शाळेंत आसिस्टंट मास्तराचें काम करून पुढें आपल्या हुशारीनें सिंध मध्यें मुनसफीचें काम करून हाल्लीं तेथें पेन्शन घेऊन चैनींत आहेत. चार वर्षा वर त्यांणीं आह्मांस वचन दिलें होतें कीं मीं पेन्शन घेतल्या वर लोकोपयोगी ग्रंथ लिहिण्याच्या व उपदेश करण्याच्या कामास आह्मां पाशीं राहून आपल्यास साहाय्य करून आपला पुढला काळ घालवीन. परंतु तें वचन कोठल्या कोठें राहून आह्मीं त्यांस या त्यांच्या वचनाचें स्मारक म्हणोन एक पत्रहि पाठविलें आणि दोघां गत पुत्रांच्या मरणाचें दुःखकारक वर्तमानहि कळविलें. असें असतां त्यांहीं आह्मांस उत्तर पाठविलें नाहीं. यांच्या पहिल्या वर्तणुकी वरून हे दुर्वृत्त निवतील असें आह्मांस वाटत नव्हतें तें आतां समजून आलें.

+ हे कोणी कडेस मुनसफीचें काम करितात. यांहीं ही शाळा सोडल्यापासून आजतागाईत आमची भेटहि घेतली नाहीं व दोन ओळींचें पत्रहि पाठविलें नाहीं.

* यांज विषयीं आह्मांस कांहींच माहिती नाहीं.

‡ सदहू प्रमाणें.

¶ हे पुण्यांत किंवा आणखीं कोणी कडेस पुढें दीड वर्षांत इन्स्पेक्टर झाले. या कामा वर असतां चैनबाजींत व मद्याच्या सेवनांत पडून त्या योगें त्यांचा देहान्त झाला. यथास्थित मराठी व इंग्लिश भाषेंत (भाषा समजण्याइतका) व गणित वगैरे विषयांत अभ्यास होऊन त्यांस बोर्डाच्या शिफारशी वरून सरकारानें तूर्त जिल्हा आसिस्टंट मास्तर नेमिलें.

ф हे पुष्कळ वर्षे नागपूर प्रांतीं पोलिटिकल खात्यांत आहेत. यांज पाशीं बराच द्रव्यसंचय झाला असावा. ते गेल्यापासून आह्मांस भेटले नाहींत व दोन ओळींचें पत्रहि लिहून त्यांहीं आमचें कांहींच क्षेमकुशल पुसलें नाहीं.

ψ हे बहुत वर्षे नगरांत शाळेचे शिक्षक असून पुढें साताऱ्यास डेप्युटी इन्स्पेक्टर झाले.

† म्हणजे सन १८८२ त. कालनिर्देश (xiii)

१ १८४५ सालीं ज्यावेळीं हा वर्ग स्थापन झाला त्यावेळीं त्याच्यामध्यें कोण कोण मराठी, गुजराती व कानडी विद्यार्थी होते त्यांची संपूर्ण यादी G. D. 1745, vol. 30, pp. 143, 149, 161 मध्यें सांपडेल. त्यांत वरील नारायण ब. पटवर्धन हें नांव नाहीं. पुरुषोत्तम ज. चिपळोणकरचें 'खरे' व केशव शिवराम भवाळकरचें 'जोशी' असें आढळतें. या प्रत्येक विद्यार्थ्याला दरमहा पांच रुपये भत्ता व ०–१२–० घरभाडें मिळत असे.

२ 'मराठ्यांच्या राज्याचा उत्कर्ष अपकर्ष' हा यांचा निबंध 'ज्ञानप्रसारक' (वर्ष १ लें, अं. ५–८) १८४९ मध्यें प्रसिद्ध झाला आहे.

गुजराथी व कानडी विद्यार्थी हे मराठी विद्यार्थ्यां पेक्षां कमी होते. मीं काम घेतलें त्या वेळेस या विद्यार्थ्यांचा सुमारें अर्धा अभ्यास झाला होता.

## आमचे बंधु भास्कर इ. स. १८४७ साच्या जून महिन्यांत १७ वे तारखेस एकाएकीं मृत्यु पावले

माझे प्रिय बंधु भास्कर[१] हे सर जमशेटजी जीजीभाई यांच्या आफिसांत इंग्लिश क्लार्क असतां अकस्मात् छातींतून रक्त पडून तीनचार तासांत परलोकास गेले. यांणीं ईंग्लिश स्कुलांत फार दिवस राहून तेथें व्हावा तसा अभ्यास केला नाहीं. मरेझ स्पेलिंग बुक (Murray's spelling book) शिकत होते तेव्हांच त्यांणीं शाळा सोडिली. तथापि यांहीं आपल्या स्वबुद्धीनें, श्रमानें व निरंतर बुकें वाचून त्या भाषेचा इतका सुंदर परिचय करून घेतला आणि यांचें इंग्लिश अक्षर इतकें सुंदर होतें कीं, तेणेंकरून शेटजींची त्यांज वर पूर्ण मर्जी बसली. त्या काळीं मुंबईत कोरियर व ग्याझेट (Courier and Gazette)[२] व आणखी एक वर्तमानपत्र निघत होतें. त्या पत्रांत या आमच्या बंधूंनीं इंग्लिश पत्रें लिहून पुष्कळ प्रसिद्ध केलीं. त्यांचा मुख्य विषय स्वदेशकल्याणपर असे. इंग्लिशांची राजनीति केवळ स्वार्थपर. जींत लोकांचें व देशाचें कल्याण होणें दुरापस्त असें त्यांहीं तेव्हां पूर्णपणें जाणिलें. त्या आमच्या बंधूचीं इंग्लिश भाषेंत इतकी सुंदर शैली पाहून व त्यांणीं प्रसिद्ध केलेल्या पत्रांच्या विषयांचा उद्दाम व स्वतंत्रपणा पाहून त्या काळचे पुष्कळ ईंग्लिश व सिव्हिल सर्व्हंट विस्मय करूं लागले. त्यांचीं तीं पत्रें a Hindu (एक हिंदु) या सहीचीं होतीं.[३] त्या वेळचे विद्यार्थि व इंग्लिश शिकलेले तरुण लोक तर तीं

---

१ यांचा जन्म १८१६ साली झाला. रा. भास्करराव सदानंद तर्खड, जे. पी. हे यांचे नातु.

२ रुस्तुम कावसजी नांवाच्या एका पारशी गृहस्थानें १७७७ सालीं मुंबईंतील बाजारगेटमध्यें छापखाना घातला व १७८० मध्यें पहिलें पंचांग छापलें. बॉंबे गॅझेट हें अर्धे साप्ताहिक पत्र १७८९ मध्यें सुरू झालें व १८४२ सालापासून सर्यानें गव्हर्नमेंट गॅझेट म्हणून चालू राहिलें. कूरियर या अर्ध साप्ताहिकाचा जन्म १७९१ साली झाला व १८४७ पर्यंत तें चाललें. पुढें धि टेलिग्रॉफ या पत्रांत तें समाविष्ट झालें व हें जोडपत्र १९१४ पर्यंत चालू होतें.

३ हीं एकंदर पत्रें आठ असून बॉंबे गॅझेटच्या ता. १० जुलै १८४१ च्या अंकांत पहिलें पत्र प्रसिद्ध झालें असून शेवटचें म्हणजे आठवें २७ अक्टोबरच्या १८४१ च्या अंकांत छापलें आहे. या पत्रांच्या समर्थनार्थ Second Hindu चें ता. १४ अक्टोबर १८४१ च्या अंकांत व Third Hindu चीं ता. ६ व २० नवंबरच्या अंकांत प्रकाशित झालीं आहेत.

पत्रें मोठ्या विस्मयानें व उत्कंठतेनें वाचित असत. यांणीं सर जमशेटजी यांस आमच्या तीर्थरूपांच्या पुष्कळ वर्षांच्या चाकरीचा कांहीं तरी योग्य बदला मिळावा म्हणोन पुष्कळ विनंतीपत्रें लिहिलीं तीं वाचून शेटजीनें त्यांस एक घर चौदा हजार रुपयांस विकत घेऊन दिलें. तें काळकादेवीच्या समोर होतें, व त्या लगत एक चाळ होती. परंतु त्याचा उपभोग घेण्या करितां ते राहिले नाहींत. हे आमचे बंधु माझ्या पेक्षां शरीरानें फार निरोगी, सदृढ व गौरवर्णाचे होते. त्या काळीं मुंबईत फोटोग्राफी (Photography)[1] नव्हती, लोखंडी सडका[2] झाल्या नव्हत्या; परंतु त्या होण्या विषयीं थोडथोडी वाटाघाट चालण्यास आरंभ झाला होता. त्या काळचीं वर सांगितलेलीं इंग्लिश वर्तमानपत्रें (Gazette and Courier) व त्यांत प्रसिद्ध केलेलीं आमच्या बंधूंचीं देशकल्याणाचीं व लोकहितवादाचीं पत्रें आतां कोठेंच दिसत नाहींत, त्याचा आह्मांस मोठाच खेद वाटतो. कारण तीं पत्रें व त्यांची इंग्लिश लिहिण्याची शैली पाहून दर्पणकर्ते जे विद्वान् बाळ गंगाधर शास्त्रीही कांहीं दिवस मोठे चकित होते. मग अशीं पत्रें आतांचे विद्वान् पाहते तर एका गोष्टी वरून तर त्यांस आश्चर्य झाल्या शिवाय राहवतें ना, कि ज्यांचें इंग्लिश स्कुलांत मरेझ स्पेलिंग बुक

---

१ फोटोग्राफीचा हिंदुस्थानांत प्रवेश नक्की केव्हां झाला कळत नाहीं. १८६३ सालच्या मुंबईवर्णनांत (पृ. २५०) माडगांवकर लिहितात, "सूर्य किरणाच्या योगानें तसबिरी काढण्याचे कारखाने हल्लीं येथें जिकडेतिकडे आहेत...असे चेहरे काढणारे हल्लीं सुमारें तीस चाळीस सांपडतील. डॉ. नारायण दाजी व हरिश्चंद्र चिंतामण हे हिंदु लोकांत या कामांत हुशार आहेत. रा. हरिश्चंद्र चिंतामण यानें किल्ल्यांत मोठा कारखाना घातला आहे व या शास्त्रावर एक लहानसा मराठींत ग्रंथ छापला आहे." हा फोटोग्राफी ग्रंथ (पृष्ठें १०+३९) गणपत कृष्णाजीच्या छापखान्यांत १८६० सालीं मुद्रित झाला. Encyclopadia Britanica (14th Ed.) मधील Photography या निबंधावरून १८५७ नंतर केव्हांतरी ही कला आपल्याकडे आली असावी, असें वाटतें.

२ मुंबईत लोखंडी सडका करण्याची कल्पना १८४३ सालीं निघून ता. १६ एप्रिल १८५३ संध्याकाळीं पांच वाजतां मुंबई येथें आगीची गाडी प्रथम चालू झाली. "या गाडीमध्यें मुंबईचे गव्हर्नर आदिकरून मोठमोठाले हुद्देदार व सरकारी कामदार, इंग्रज व दुसरे शेटसावकार मिळोन चारशें गृहस्थ बसले होते. गाडीस तीन वाफेचीं यंत्रें लाविलीं होतीं व वीस मोठे रथ जुंपिले होते. ही गाडी पांच वाजतां बोरीबंदराहून निघाली ती सुमारें सहा वाजायाचे सुमाराम ठाण्यास गेली व तेथून रात्रीस सुमारें आठ वाजतां परत मुंबईस आली."—मुंबईवर्णन, पृ. २५३.

(Murray's Spelling Book) या पलीकडेस कांहींच अध्ययन झालें नव्हतें. त्यांणीं पुढें स्वबुद्धीनें व वाचण्याच्या श्रमानें त्या भाषेचा इतका दाट परिचय केला. या पत्रांनीं तो त्यांचा लेख त्यांच्या गुणाचा स्मारक होता. तो आतां कोठें उपलब्ध नाहीं,[1] या गोष्टीचा आह्मांस कसा खेद होऊं नये ?

सन १८४८ सांत या नार्मल क्लासाचा (Normal Class) अभ्यास इच्छिल्या प्रमाणें पुरा झाल्या वर तो क्लास मोडला, आणि बोर्ड आव एज्युकेशन (Board of Education) या मंडळीनें माझी नेमणूक पहिल्या व दुसऱ्या[2] तुकडीचे सुपरिन्टेन्डेन्ट (Superintendent of the Government Vernacular schools in the 1st and 2nd division) या जागे वर केली. आणि हे काम करित असतां मला महाराष्ट्र देशांत व कोंकणांत फिरावें लागेल म्हणोन त्रावेलिंग आलोआन्स (Travelling allowance) शंभर माझ्या पगार पेक्षां करून दिलें. या जागे वर माझ्या पूर्वी दोन निराळे सुपरिंटेंडेन्ट होते. मि. ईसडेल (Mr. Eisdale) पुण्याचे इंग्लिश स्कुलाचे हेडमास्तर आणि बाळ गंगाधर शास्त्री व यांच्या मागून लेफ्टेनंट [गॉर्डन][3] यांहीं आपआपलीं नेमलेलीं कामें करून वर्षांतून दोनतीन महिने आपआपल्या तुकडींत फिरून आपल्या हद्दींतल्या शाळा तपासाव्या आणि त्यांचा वार्षिक रिपोर्ट करावा. पहिल्या तुकडींत **पुणें, अहमदनगर, खानदेश** आणि **सोलापूर** जिल्ह्यांतल्या शाळा होत्या आणि दुसऱ्या तुकडींत **ठाणें, रत्नागिरी, बेळगांव,** आणि **धारवाड** या जिल्ह्यांतल्या शाळा होत्या. हें काम माझ्या फार आवडीचें होतें. कारण हें देखरेखीचें काम प्रतिष्ठित असून त्या मुळें मला सर्व देश व गांव पहायास सांपडण्या जोगी यांत मोठी सोई होती.[4]

★

---

१ मुंबई, रॉयल एशियाटिक सोसायटी व मुंबई सरकारचें रिकॉर्ड ऑफिस येथें या पत्राच्या जुन्या फाइली उपलब्ध आहेत.

२ दादोबा पहिल्या व तिसऱ्या तुकडीचे तपासनीस होते. दुसरी गुजराती शाळांची.

३ हें नांव दादोबांना आठवलें नसावें. हस्तलिखितांत जागा कोरी टेविली आहे.

४ यापुढें "व माझी या वेळेस—" एवढीच हस्तलिखितांत अक्षरें आहेत.

# रा. ब. दादोबा पांडुरंग

## उत्तरार्ध

[ चरित्र ]

लेखक

अ. का. प्रियोळकर

१

# मराठी शाळांचे तपासनीस

मुंबई इलाख्यांतील देशी भाषांच्या शाळा तपासण्याचें काम एल्फिन्स्टन इन्स्टिट्यूशनमधील प्रोफेसर, पुणें संस्कृत पाठशाळेचे सुपरिंटेंडेंट व इतर इंग्रजी शाळांचे शिक्षक ह्यांच्यावर सोंपविलेलें असे. शाळातपासणीकरितां मुंबई शहर सोडून मुंबई इलाख्याचे तीन विभाग पाडण्यांत आले होते. पहिल्या विभागांत पुणें, अहमदनगर, सोलापूर आणि खानदेश; दुसऱ्या विभागांत भडोच, सुरत, अहमदाबाद व कायरा आणि तिसऱ्या विभागांत ठाणें, दक्षिण कोंकण, बेळगांव व धारवाड ह्या जिल्ह्यांचा समावेश होई. ठाणें जिल्हा प्रथम दुसऱ्या विभागांत होता,[1] पण पुढें भाषावार विभागणीप्रमाणें त्याचा तिसऱ्या विभागांत अंतर्भाव करण्यांत आला. युरोपियनांचा देखील शाळातपासणीच्या कामीं उपयोग व्हावा म्हणून कोणत्याहि विद्यालयामध्यें युरोपियन माणसाची नेमणूक करतांना त्यानें इलाख्यांतील कोणत्या तरी एका देशी भाषेची परीक्षा यशस्वीपणें दिल्याखेरीज त्याला त्या जागीं कायम करण्यांत येत नसे.[2] पहिल्या विभागांतील शाळातपासणीचें काम प्रथम पुणें संस्कृत पाठशाळेचे सुपरिंटेंडेंट मे. कँडी हे करीत. पुढें पुणें हायस्कूलचे हेडमास्तर मि. ईस्डेल ह्यांच्याकडे हें काम गेलें. दुसऱ्या विभागाचें काम प्रथम प्रो. ओर्लेबार, नंतर प्रो. हार्कनेस व त्यांच्यामागून प्रो. ग्रीन पाहूं लागले; आणि तिसऱ्या विभागाच्या शाळा असि० प्रोफेसर बाळ गंगाधरशास्त्री जांभेकर तपाशीत असत. हिंवाळ्यांत वर्षांतून एकदा त्यांनीं प्रत्येक शाळेला भेट द्यावी, असें ठरलें होतें. पण ह्या इन्स्पेक्शनच्या दौऱ्यावर गेल्यामुळें आपल्या मुख्य शाळेच्या कामाची आपल्या गैरहजेरींत हयगय होते, अशी पुणें शाळेचे हेडमास्तर मि. ईस्डेल यांची नेहमींच तक्रार असे. १८४५ च्या आरंभीं प्रो० हार्कनेस ह्यांनीं आपली ह्या इन्स्पेक्शनच्या कामांतून मोकळीक करावी, अशी बोर्डाकडे विनंती केली होती, आणि प्रो० बाळशास्त्री जांभेकरांकडे नॉर्मल क्लासचें काम असल्यामुळें त्यांच्या मागें ह्या वार्षिक दौऱ्याचा व्याप लावणें बरोबर नाहीं, असें स्वतः बोर्डाचेंच मत झालें होतें. अशा स्थितींत मुंबई शहराबाहेरच्या शाळांचे दोन विभाग करून त्यांच्यावर खास ह्या

1 Report of the Board of Edu. for 1845, Appendix F.

2 G. D. 1840, Vol. 13/530, pp. 93-4.

कामाला वाहिलेले दोन सुपरिंटेंडेंट नेमावे, अशी सूचना पुढें आली. पण ह्या कामाला लायक माणसें उपलब्ध नव्हतीं. टाण्याच्या शाळेचे हेडमास्तर मि० रॉबर्ट मॅके हे मिळण्यासारखे होते; पण दुसऱ्या विभागाची जबाबदारी कोणावर सोपवावी हा प्रश्न होता. मि० ग्रीन ह्यांना सुरतेहून हलविणें म्हणजे तेथें त्यांनीं चालविलेल्या उत्कृष्ट कार्याचा बिघाड करणें होतें. मि० ईस्डेलची प्रकृति नीट नसे. त्यामुळें सतत बारा महिने इन्स्पेक्शन करीत भटकण्याचें काम त्यांच्या हातून उरकण्यासारखें नव्हतें. अशा परिस्थितींत मधला मार्ग म्हणून व्यवस्था करण्यांत आली ती अशी:—उत्तर कोंकण, दक्षिण कोंकण आणि दक्षिण महाराष्ट्र येथील शाळा तपासण्याचें काम मि० मॅकेनीं पाहावें, पहिल्या विभागाचें काम मि० ईस्डेलनींच चालवावें, मुंबई शहरांतील देशी शाळा प्रो० बाळशास्त्र्यांनीं तपासाव्या व गुजरातेंतील शाळांना दरवर्षी हिंवाळ्याच्या महिन्यांत मि० ग्रीन ह्यांनीं भेट द्यावी.[1]

## शाळा तपासण्याचें काम दादोबांकडे कसें आलें?

मि. रॉबर्ट मॅके हे ता. १४ फेब्रुवारी १८४३ रोजीं हिंदुस्थानांत आले व त्यांची ठाणें हायस्कूलमध्यें नेमणूक करण्यांत आली होती; परंतु ही शाळा नीट चालेना म्हणून ती बंद करण्याचें घाटत होतें. शाळेंत मुलांची संख्या असावी तितकी नाहीं व त्याकरितां एका इंग्रज मास्तरचा खर्च चालविणें बरोबर नाहीं, असें बोर्डाचें म्हणणें होतें. तेव्हां, इंग्रज मास्तर मुलांचे उच्चार सुधारण्याच्या दृष्टीनें असलेला बरा; तो ठेवणें शक्यच नसल्यास मुंबईच्या सरकारी शाळेंत तयार झालेल्या एखाद्या विशेष बुद्धिमान तरुणाची ह्या जागीं नेमणूक करावी; पण शाळा मात्र बंद पाडूं नये, अशी ठाण्याच्या नागरिकांनीं आपल्या ता. १ एप्रिल १८४५ च्या अर्जांत सरकारला गळ घातली आणि त्याप्रमाणें ही शाळा चालू ठेवण्याचें ठरलें व ता. १–६–१८४५ पासून नाना मोरोजी ह्यांची त्या जागीं योजना झाली. अशा प्रकारें मि० मॅके मोकळे झाले व त्यांनीं वर लिहिल्याप्रमाणें आपलें शाळातपासणीचें काम चालू केलें; परंतु दुर्दैवानें ता. २० डिसेंबर १८४६ रोजीं मि० मॅके माळशिरस येथें एकाएकीं वारले व पुनः मे० बोर्डाकडे हें काम आलें.[2] पण त्यांना हें काम सतत करणें शक्य नव्हतें, म्हणून सरकारकडून लष्करामधील लेफ्टनंट गॉर्डन ह्यांची मागणी करून ह्या जागीं त्यांची ऑक्टोबर

1 Report of the Board of Edu. for. 1845, pp. 22-23.

2 Report of the Board of Edu. 1846, p. 8.

१८४७ पासून योजना करण्यांत आली. इतक्यांत पंजाबांत युद्धाचा अग्नि भडकला. त्यामुळें नव्हेंबर १८४८ मध्यें तिकडे जाण्याबद्दल ले० गॉर्डनला सरकारी हुकूम सुटला आणि शेवटीं हें पहिल्या व तिसऱ्या विभागांतील शाळातपासणीचें काम नॉर्मल क्लासचे ॲक्टिंग डायरेक्टर दादोबा पांडुरंग ह्यांजकडे आलें. कारण हा नॉर्मल क्लास केवळ तीन वर्षांकरितांच उघडण्यांत आला होता व ती मुदत भरल्यामुळें तो विसर्जन करून ज्या विद्यार्थ्यांचा अभ्यासक्रम पुरा झाला होता, त्यांची इलाख्यांतील निरनिराळ्या शाळांमध्यें नेमणूक करण्यांत आली. चारच विद्यार्थ्यांनीं आपला अभ्यास पूर्ण केला नव्हता. ह्यांपैकीं दोन मराठी विद्यार्थ्यांना एल्फिन्स्टन इन्स्टिट्यूशनमधील प्रि० हार्कनेस ह्यांच्या हाताखालीं व राहिलेल्या दोन गुजराती विद्यार्थ्यांना सुरत येथें प्रि० ग्रीन ह्यांच्या नेतृत्वाखालीं तो पुरा करण्याकरितां ठेवण्यांत आलें.

दादोबांना ह्या नव्या जागीं पगार २०० व प्रवासखर्च १०० मिळून एकंदर तीनशें रुपये दरमहा यावे असें ठरलें होतें.[1]

दादोबांची ही नेमणूक पहिल्या विभागाचे इन्स्पेक्टर म्हणून केवळ हंगामी झाली होती, असें दिसतें; कारण त्यांना ह्या जागीं दरमहा दोनशें रुपयांवर कायम करावें व तिसऱ्या तुकडीचे हंगामी तपासनीस म्हणून दरमहा आणखी जादा पंचवीस रुपये मिळावे, अशी शिफारस बोर्डानें पुढें केली असून सरकारची तिला मंजुरीही मिळाली आहे.[2]

## दादोबांचे शिक्षणविषयक विचार

मुंबई शहरांतील देशी भाषांच्या शाळा तपासण्याचें काम प्रो. बाळशास्त्र्यांकडे होतें, ह्याचा उल्लेख वर आलाच आहे. त्यांच्या निधनानंतर ज्यावेळीं दादोबांची त्यांच्या जागीं नॉर्मल क्लासचे डायरेक्टर म्हणून नेमणूक झाली, त्यावेळीं शाळातपासणीचें कामही त्यांच्याकडे आपोआपच आलें. १८४६ च्या बोर्डाच्या रिपोर्टामध्यें आपणास त्यांचे ह्यासंबंधीचे विचार पाहावयास सांपडतात.[3] ह्या शाळांतील वरचे विद्यार्थी देशी भाषेचें थोडेंसें ज्ञान मिळालें म्हणजे इंग्रजी शाळेमध्यें

1 G. D. 1848, Vol. 33, p. 83–84.
2 G. D. 1850, Vol. 30, pp. 33–34.
3 **Report of the Board of Edu.** 1846, p. 16.

जाण्याकरितां त्या शाळांना रामराम ठोकतात, अशी तक्रार दादोबांनीं केली आहे व ह्या खेदकारक प्रकाराला आळा घालण्याकरितां इंग्रजी शाळेंत प्रवेश मिळण्यास लागणाऱ्या देशी भाषेच्या ज्ञानाची पायरी वाढवावी आणि देशी पाठ्यपुस्तकांत भर घालून जास्त चांगल्या शिक्षकांचा पुरवठा करावा, असेंही सुचविलें आहे. सुपरिंटेंडेंटच्या ह्या प्रत्येक सूचनेचा आपण काळजीपूर्वक विचार केला आणि ज्यावरून पुढील आर्थिक फायद्याच्या दृष्टया इंग्रजी भाषेचें शिक्षण विद्यार्थ्यांना व त्यांच्या पालकांना महत्त्वाचें वाटतें व ज्यावरून शेजारच्या इतर इंग्रजी शाळा[१] त्यांना उघड्या आहेत त्यावरून इंग्रजी शाळेंत प्रवेश मिळण्याकरितां लागणाऱ्या देशी भाषेच्या ज्ञानाची पायरी वाढवावी ही सूचना अमलांत आणणें कठिण आहे, असें बोर्डानें म्हटलें आहे.

ले. गॉर्डन युद्धाच्या कामगिरीवरून मोकळे होऊन परत आल्यावर आजारीपणाच्या रजेवर युरोपला गेले व शाळातपासणीचें त्यांचें काम दादोबांकडेच राहिलें. १८४९ सालच्या ऑक्टोबर महिन्यांत त्यांनीं जो रिपोर्ट बोर्डाकडे पाठविला आहे त्यावरून पहिल्या विभागांत त्यांनीं शाळातपासणीचें काय काम केलें त्याची माहिती मिळते, ती अशी[२] :—

| जिल्हा | शाळा | मुलें |
|---|---|---|
| पुणें[३] | २२ | १११३ |
| अहमदनगर | २९ | १६४५ |
| सोलापूर | १४ | ६३६ |
| खानदेश | ९ | ५०४ |
| | ७४ | ३८९८ |

१ ह्या सुमारास परोपकारबुद्धीनें किंवा धंदेवाईक दृष्टीनें चालविलेल्या मुंबई बेटांत पुढील इंग्रजी शाळा होत्या. **Charity English Schools** :—Parsi Panchayat, 2 Free Church General Assembly, 3 Byculla Charity School, 4 Money School. **Private Schools** :-1 Mr. Boswell's, 2 Mr. Hilton's, 3 Mr. Robert's 4 Sarvottam Sakharam's, 5 Mr. Rustomji Merwanjee's, 6 Mr. Peyton's, 7 Sorabji Merwanjee's, 8 Sorabshaw Dosabhai's 9 Portuguese School ( Mazgaon ). **Report of the Board of Edu.** 1849, p. 74.

2 **Report of the Board of Edu.** for 1849, p. 19.

३ ह्यांत जिल्हा पुणें तालुका पुरंदर येथील खेड्यांतील ५५ शाळा व १२२४ मुलें.

ह्या एकंदर विभागांतील शाळांमध्यें जो कार्यक्षमतेचा अभाव दिसतो त्याचें सर्वच खापर बिचाऱ्या पंतोजींवर फोडतां येणार नाहीं, असें दादोबांनीं आपल्या रिपोर्टांत म्हटलें आहे. ते लिहितात,

" There are several other causes, independent of the incapacity and negligence of the masters, which cannot be allowed to pass unnoticed. Educated as the masters have been and possessing as they do, very limited means of enlarging their little sphere of knowledge, it cannot be much wondered at if the state of the schools under them does not come up to that point of perfection to which the rapid progress of knowledge and learning in the Western hemisphere renders it desirable that it should. Besides, the schoolmaster, being confined to a lonely town or village, and shut up as it were from the rest of the world, where he cannot have the least opportunity of benefitting himself from the experience of others from abroad, he has to contend with a variety of whims and prejudices at home. The people of this country are not yet prepared to appreciate the sort of education which is afforded by our schools to their children ; their idea of school learning amounting to no more than mere reading, and writing the current hand in which business is transacted, and a little of cyphering, the rest being considered by them as a mere waste of time. They are consequently not very punctual in sending their children to the schools. This ignorance added to their poverty makes the parents overanxious to remove their children from the schools as soon as they can read and write a little of Modi character. This, I noticed in my tour of inspection, was the invariable case with a vast majority of the boys of the working classes. It is the Brahmins and a few other high castes, who from birth look up to the pen as the sole means of earning their bread, that have some patience to keep their children at school for a period, say of two, three or four years. The lower we descend in the scale of caste, the less is the desire or aptitude for our school learning. Under these desponding circumstances

the position of the schoolmaster may easily be imagined, even granting him to be a man of talents and industrious habits. And, moreover, if his school happens to be in a town where there is an English Government School, his position is still worse; the quarterly egress of the best of the scholars to feed the English school cannot but have the effect of detracting considerably from the merits of his own."[1]

ह्या रिपोर्टांवर गव्हर्नर लॉर्ड व्हायकौंट फॉकलंड ह्यांनीं जें मिनिट लिहिलें आहे त्यांत ते म्हणतात,

"The Report of Dadoba Pandurang on the district vernacular schools of the lst division is interesting and satisfactory. His remark that a vast majority of the children of the working classes are too soon removed from the schools for the purposes of a sound education is however not peculiar to India. As a general rule it will apply everywhere where a man's livelihood is to be gained by his manual labour and the fact affords no reasonable grounds for despondency."[2]

## जुन्या काळचें भूगोलविषयक ज्ञान

नव्या शिक्षणपद्धतीमुळें मुलांच्या भूगोलविषयक कल्पनांमध्यें जी क्रांति झाली आहे तिच्यासंबंधी दादोबा लिहितात,

"In this branch of study it affords me some degree of gratification to state that the ignorance which has long been prevalent in this country with regard to this subject is now fast giving way, and the Pauranic and romantic description of the nonexisting oceans and countries, and the hyperbolic heights and lengths of mountains and rivers, are now fast making room for a true and correct knowledge of the earth, and what diversifies its surface. Our little catechisms on geography and the school maps are working wonders in the task of dispelling darkness on the subject. But it will have added much to the diffusion of true

1 The Report of the Board of Edu. 1849, p. 21.
2 G. D. 1851, vol. 12.

ideas, and to the establishment of the still tottering minds of some of the native youth on a strong and sure footing, had all our school masters been thoroughly impressed with the truth of the subject they are communicating to their pupils. It is a lamentable fact to notice that a considerable number may still be found among them who cannot yet bring their consciences to believe that the earth is not placed on one of the heads of the great serpent, and that there might not yet be discovered in some parts of it which have not yet been explored by European navigators, oceans of milk and curd. But, inspite of all these drawbacks, I have strong reason to believe that true knowledge is surely making its way, though slowly, but steadily." [1]

रा. सा. महीपतराम रूपराम ह्या नव्या ज्ञानासंबंधी शिक्षक लोकांमध्यें असलेल्या अविश्वासाविषयीं लिहितात, " मुंबईमध्यें असतांना मेथाजीनीं ( दुर्गाराम ) भूगोल व खगोल विद्येमध्यें प्रवेश केला होता आणि वरिष्ठ हुकुमानुसार त्या पद्धतीप्रमाणें आपल्या शाळेंत शिक्षण चालू केलें होतें; पण पुराणामध्यें वर्णन केल्याप्रमाणें हें भूगोलज्ञान नाहीं म्हणून लोक त्यांची निंदा करूं लागले. नित्यानंद व परमानंद यांच्या संवादाच्या रूपानें छापलेल्या या विषयावरील पुस्तकामध्यें लिहिलें आहे तें या लोकांना मान्य नव्हतें. प्राणशंकर[2] मुलांना म्हणे कीं, साहेब परीक्षा घेण्यास आला आणि विचारलें तर त्याला सांगा कीं पृथ्वी गोल आहे आणि फिरते आहे; पण या गोष्टीवर विश्वास ठेवूं नका. कारण जर पृथ्वी गोल असती आणि फिरती तर आपलें घर पडलें असतें. तें पडत नाहीं यावरून ही गोष्ट खोटी आहे. "[3]

" मि. होपनी सत्तानीचे प्रगट थयेली गुजराती नवीन मालावीशे " ह्या गुजराती लेखांत असाच मजकूर आहे :—" एकदा माजी ग्रीनसाहेब ज्यावेळीं गुजरात प्रांतमध्यें शाळांचे सुपरिंटेंडेंट होते, त्यावेळीं फिरतीवर असतां, एका शाळेंतील वर्गाला भूगोलासंबंधी ' पृथ्वीचा आकार कोणता ? ' असा प्रश्न केला. तेव्हां एका मुलानें, " गोल आहे, " असें उत्तर दिलें. पुनः त्यांनीं विचारलें, " तुझी खात्री आहे ना ? कीं आणखी दुसरा कोणता तरी तिचा आकार आहे ? "

1 Report of the Board of Edu. for 1849, p. 22.
2 प्राणशंकर उमानाथ, सुरत–शाळा नं. २ मधील शिक्षक.
3 दुर्गाराम मंछाराम चरित्र, पृ. ८.

त्यावेळीं त्या मुलानें म्हटलें, " गोल आहे, असें तर माझ्या पुस्तकामध्यें लिहिलें आहे ; त्याप्रमाणें आठवणींत ठेवा, पण खरें खोटें राम जाणे! परीक्षेच्या वेळीं साहेबाला सांगण्याकरितां पुस्तकांत लिहिण्याप्रमाणें पाठ करा," असेंही आह्मांस पंतोजानें बजाविलें आहे. " [1]

## पहिला व तिसरा ह्या विभागांची तुलना

तिसऱ्या विभागामध्यें दादोबांना ह्या सालीं तपासाव्या लागलेल्या शाळा व मुलें [2]—

| जिल्हा | शाळा | मुलें |
|---|---|---|
| रत्नागिरी | १९ | १३०४ |
| बेळगांव | १३ | ७२९ |
| धारवाड | १४ | ९११ |
| ठाणें | ९ | ५२९ |
| एकंदर | ५५ | ३४७३ |

१८५०-५१ सालीं पहिल्या व तिसऱ्या विभागाची जी तपासणी दादोबांनीं केली त्या शाळांच्या माहितीचा तक्ता त्यांनीं पाठविलेला त्या सालच्या बोर्ड ऑफ् एज्युकेशनच्या रिपोर्टाला जोडला असून ज्यांना महाराष्ट्राचा शैक्षणिक इतिहास लिहावयाचा असेल त्यांना त्यांत पुष्कळ उपयुक्त माहिती सांपडेल. त्यांत (१) गांवाचें किंवा शहराचें नांव (२) शाळा केव्हां स्थापन झाली (३) गांवची लोकसंख्या (४) पटावरील मुलांची व हजर मुलांची संख्या (५) मास्तराचें नांव, जात, पगार व त्यांनीं किती वर्षे काम केलें ह्याची माहिती सांपडते. [3]

दादोबांनीं त्या शाळांच्या व्यवस्थेसंबंधी सादर केलेल्या रिपोर्टांतील कांहीं उतारे बोर्डाच्या रिपोर्टांत दिले आहेत. त्यांपैकीं पहिला विभाग व तिसरा विभाग ह्यांतील शाळांची जी त्यांनीं तुलना केलेली आहे, तो भाग सदर रिपोर्टांतून उद्धृत करतों :—

" The Superintendent draws an interesting contrast between the state of the schools in the first and third divisions, after personally inspecting both. He says that the " present state, progress and character of vernacular education in the

1 बुद्धिवर्धक ग्रंथ, १८६०, पु० ५, पृ० २६१.

2 Report of the Board of Edu. 1849, p. 25.

3 Report of the Board of Edu. 1850-51, p. 143.

collectorates of Tanna, Rutnagherry, Belgaon, and Dharwar are, generally speaking of the same description as those in the collectorates of Poona, Ahmednuggur, Sholapur and Candeish, collectively; but on a closer inspection, and on a more rigid examination, in as much as the routine of the business and tact with which duties are performed are taken into account I should be inclined to give the preference in favour of the 3rd division. Here talents and industry displayed by the masters, regularity of attendance and attendance to studies shown by the pupils, and the interest evinced by the inhabitants in the education of their children, are perhaps more happily and harmoniously combined to give effect to our educational operations being well and satisfactorily performed under the present state of circumstances than what is observable with regard to a majority of our schools in the 1st division."[1]

पहिल्या व तिसऱ्या विभागांतील शाळांना 'ज्ञानप्रसारका' चे अंक बोर्डाकडून दिले जात. प्रथम शिक्षकांनीं वाचून नंतर ते वरच्या वर्गांतील विद्यार्थ्यांना द्यावे, अशी व्यवस्था होती. ह्यासंबंधी दादोबा आपल्या रिपोर्टांत लिहितात,

"I have not yet had an opportunity of noticing what effect the perusal of these periodicals has produced, but if they could ever be found to create even so much as a taste for reading which is the first step towards the introduction of knowledge, I think we shall have gained a most important point through their instrumentality."[2]

## दादोबांची बदली

दादोबा जर ह्याच जागीं असते तर त्यांच्या अनुभवाचा व ज्ञानाचा इलाख्यांतील शाळा सुधारण्याच्या कामीं बराच उपयोग झाला असता; परंतु इतक्यांत त्यांची सरकारनें निराळ्या खात्यांत बदली केली व विद्याखात्याशीं असलेला त्यांचा संबंध सुटला. १ मे १८५१ ते ३० एप्रिल १८५२ च्या वर्षाच्या बोर्ड ऑफ् एज्युकेशनच्या रिपोर्टांत दादोबांसंबंधी पुढील शेरा आढळतो—

1 Report of the Board of Edu.for 1850—51, p. 55.
2 *Ibid*, p. 57.

" The able superintendent of this division, Dadoba Pandurang, Esq. having been selected by Government for one of the newly made appointments of Deputy Collector and Magistrate, we in April last nominated as his successor Mahadeo Govind Shastri, an able and energetic man, who a twelve month ago was selected for the appointment of Professor in vernacular literature at the Poona College." [1]

हा रिपोर्ट ता. १० जून १८५२ चा आहे. दादोबांनीं मार्च अखेरपर्यंत बहुतेक सर्व शाळांची तपासणी करून आपल्या जुन्या कामावरून मोकळे होण्याच्या पूर्वी, बोर्डाच्या शब्दांत सांगावयाचें म्हणजे, " an able and carefully prepared Report" बोर्डाकडे सादर केला होता. ह्या विभागांत ह्या सालीं एकंदर शाळा ७४ व मुलें ३६२२ होतीं. तिसऱ्या विभागाचीही जबाबदारी जरी दादोबांकडेच होती, तरीपण ह्या सालीं पहिल्या विभागाच्या कामापुढें त्यांना तिसऱ्या विभागाकडे लक्ष पुरवितां आलें नाहीं. हें काम धारवाड शाळेचे हेडमास्तर मि. बेकर ह्यांच्याकडे देण्यांत आलें. मि. बेकर ह्यांना कानडी भाषेचें ज्ञान चांगलें होतें आणि मराठी भाषेची परीक्षा त्यांनीं दिली होती.

★

1 Report of the Board of Edu. 1851-52, p. 63.

२

# हुजूर डेप्युटी कलेक्टर

## थोडा मागील इतिहास.

नेटिव्ह एज्युकेशन सोसाइटीचा एक प्रधान हेतु असा होता कीं आधीं इंग्रजी शिक्षण कांहीं तरुणांना द्यावें व त्यांच्या मार्फत हें नवीन ज्ञान देशी भाषांच्या द्वारा त्यांच्या इतर बांधवांमध्यें प्रसृत करावें ; पण १८३५ सालीं ह्यापैकीं कांहीं तरुणांना जमाबंदी खात्यामध्यें कामाला पाठवावें, अशा प्रकारची मागणी ने. ए. सोसाइटीकडे सरकारनें केली. ह्याकरितां योग्य अशीं माणसें सोसाइटीकडे तयार नव्हतीं आणि ज्या तरुणांचें शिक्षण पुरें झालें होतें ते शिक्षक म्हणून काम करीत होते. ह्या लोकांना तिकडे पाठविणें म्हणजे शाळेच्या चालत्या गाड्याला खीळ घालणें होतें. त्यामुळें सरकारची ही मागणी सोसाइटीला मोठ्या कष्टानें नाकारावी लागली.[1] दादोबांचें ह्यावेळीं शिक्षण पुरें होत आलें होतें; इतकेंच नव्हे तर रेव्हेन्यू खात्यामध्यें जाण्यास कोण तयार आहेत ह्या संबंधी चौकशी केली असतां, ने० ए० सो० च्या ज्या सहा विद्यार्थ्यांनीं आपलीं नांवें दिलीं त्यांमध्यें दादोबा एक होते.[2] पुढें दहा वर्षांनीं मुंबईसरकारनें बोर्ड ऑफ् डायरेक्टरला अशी शिफारस केली कीं जर प्रत्येक कलेक्टरला दोन असनदी मदतनीस (uncovenanted assistants) दिले तर सनदी नोकर कमी लागतील व त्यांची योजना अन्य जास्त जबाबदार जागीं करतां येईल. जमाबंदी खात्यामध्यें असलेले विशेष कार्यक्षम व सन्मान्य असे देशी गृहस्थ ह्या जागांकरितां विशेष पसंत करावे, अशीही सरकारची एक सूचना होती. ह्या योजनेला बोर्ड ऑफ् डायरेक्टरनीं आपल्या ता. २४ डिसेंबर १८५१ च्या पत्रानें मान्यता दिली. ह्या असनदी नोकरांची संज्ञा 'डेप्युटी कलेक्टर व मॅजिस्ट्रेट' अशी असावी व त्यांच्यावर देखरेख जिल्ह्याच्या कलेक्टरची राहून त्यांना पगार दरमहा ३००-३५० द्यावा, असेंही त्यांनीं सुचविलें.[3] ह्या नव्या योजनेचा फायदा बोर्ड ऑफ् एज्युकेशनच्या मंडळीला

---

1 Report of the Board of Edu. for 1835, p. 12.
2 G. D. 1836, Vol. 10, p. 40.
3 R. D. 1852. Vol. 309, p. 1.

मिळाला. गव्हर्नरचे सेक्रेटरी बोर्ड ऑफ् एज्युकेशनच्या सेक्रेटरींना आपल्या ता. २०–३–५२ च्या पत्रांत लिहितात—

" It may be gratifying to the Board to know that
Vinayak Wasudeo
Dadoba Pandurang
Nana Morogy
Naorojee Byramjee
pupils of the Elphinstone Institution have been selected for the newly created appointments of Deputy Collectors and Magistrates in the consideration of the Educational attainments and good character."

ह्यापूर्वीच ही बातमी सर अर्स्किन पेरी ह्यांनीं दादोबांना घाईघाईनें एक पत्र लिहून कळविली होती. तें पत्र हें—

In Court, March 19, 1852.

My dear Dadoba,

I am very happy to inform you that you have been this day appointed Assistant Collector, and that you will be allocated at Nuggur under a very good friend to natives, Mr. Rose. I congratulate you sincerely. I must now add you are under a deep obligation to me and to the Board of Education to exert yourself most actively, so as to justify the warm recommendation we have made of you. In haste—

Sincerely yours,
( Signed ) E. Perry.

दादोबांची नेमणूक जरी मार्चमध्यें झाली होती, तरीपण मेपर्यंत ते ह्या नव्या जागेवर रुजू झाले नाहींत. बोर्ड ऑफ् एज्युकेशनच्या नोकरींतून मोकळे होऊन नव्या हुद्यावर केव्हां दाखल व्हाल, ह्याचा खुलासा करण्याबद्दल, त्यांना ता. ११ मे १८५२ रोजीं सरकारकडून आलेलें एक पत्र उपलब्ध आहे.[1] येथें कामावर हजर झाल्याबरोबर त्यांना कायद्याची परीक्षा द्यावी लागली. 'सुबोधपत्रिके'तील त्यांच्या मृत्युलेखांत ह्यासंबंधी उल्लेख आहे तो असा :—'त्यावेळीं तेथील कलेक्टरानें

1 R. D. 1852, Vol. 97, p. 189.

यांची विद्वत्ता व हुशारी पाहून सरकारास लिहिलें कीं, "माझा डिपुटी फारच हुशार व शहाणा आहे. त्यानें एका महिन्याच्या आंत डिपुटीचे कामासंबंधी कायद्याची परीक्षा दिली." याप्रमाणें शिफारस केली व आपलें काम उत्तम रीतीनें केल्यामुळें यांस सर्व लोक चाहू लागले."[1]

ता. १ जुलै १८५२ च्या ज्ञानोदयांतही 'किर्कोळ बातमी' ह्या सदराखालीं, "दादोबा पांडुरंग डिपुटी माजीस्ट्रेट, नगर यांनीं परीक्षा माजीस्त्रेट कामाची देऊन काम घेतलें," अशी बातमी आढळते.[2]

## लॉ कॉलेजचा उगम

येथें एक गोष्ट सांगावयाची म्हणजे त्या काळीं आतांच्या सारखें लॉ कॉलेज अस्तित्वांत नव्हतें. १८३५ मध्यें एल्फिन्स्टन इन्स्टिटयूशनमध्यें ज्युरिस्प्रुडन्सवर व्याख्यानें देण्याची व्यवस्था करावी, असा ठराव कॉलेजच्या कौन्सिलपुढें येऊन पासही झाला होता, पण तो दप्तरांतच पडून राहिलेला दिसतो. पुढें ता. १३ सप्टेंबर १८४७ च्या आपल्या मिनिटांत चीफ जस्टिस सर अर्स्किन पेरी ह्यांनीं एल्फिन्स्टन कॉलेजला जोडून एक कायद्याचा वर्ग काढावा, अशी सूचना सरकारपुढें ठेविली होती,[3] पण त्यावेळीं ती अमलांत आली नाहीं; परंतु ज्यावेळीं सर अर्स्किन सेवानिवृत्त होऊन युरोपला गेले त्या वेळीं त्यांचें स्मारक करण्याकरितां श्री. जगन्नाथ शंकरशेटच्या अध्यक्षतेखालीं एक स्मारकसभा स्थापन करण्यांत आली व ता. २० जुलै १८५३ च्या पत्रानें, "Perry Professorship of Jurisprudence" स्थापन करण्याचा प्रश्न अध्यक्षांनीं सरकारपुढें ठेवला.[4] पुढें दोन वर्षांनीं म्हणजे १८५५ सालीं पहिला लॉ प्रोफेसर नेमला गेला.[5] दादोबा १८५२ पासून १८५६ च्या एप्रिल महिन्यापर्यंत अहमदनगरला राहिले. नंतर ठाण्याचे हुजूर डेप्युटी कलेक्टर मि. शॉवेल हे सुमारें एक वर्षाची रजा घेऊन विलायतेला गेल्यावेळीं

1 सुबोधपत्रिका : ता. २२ अक्टोबर, १८८२.

2 ज्ञानोदय १८५२, पृ. २०७.

3 G. D. 1848, Vol. 29.

4 G. D. 1853, Vol 26, No. 900.

5 History of the Govt. Law College, Bombay. 1855 to 1935 by Mr. R. P. Karve, 1939, p. 1.

लॉर्ड एल्फिन्स्टन ह्यांनीं ता. ५ एप्रिल १८५६ च्या हुकुमानें दादोबांची त्यांच्या जागीं तात्पुरती नेमणूक केली.[1]

## दादोबांचें अहमदनगरांतील सार्वजनिक कार्य

अहमदनगरमधील ह्या आपल्या तीन चार वर्षांच्या पहिल्या वास्तव्यांत दादोबांनीं आपल्या सरकारी कामाखेरीज इतर पुष्कळ लोकोपयोगी कामें केलीं असलीं पाहिजेत. दादोबांच्या सार्वजनिक कार्यांची रूपरेखा देणारी एक पुस्तिका उपलब्ध आहे. तिच्यामध्यें १८५६ सालीं जेव्हां दादोबांची ठाण्याला बदली झाली तेव्हां अहमदनगरच्या नागरिकांनीं सभा भरवून त्यांना कृतज्ञतापूर्वक ‘ मानपत्र ’ दिल्याचें नमूद आहे.

“ On this occasion, at a public meeting of the inhabitants of the town of Ahmadnuggur, Mr. Dadoba was presented with an Address written in Marathi and English declaring in detail his valuable public services and the manner in which they were discharged ; and expressive of the highest satisfaction mingled with feelings of gratitude which the inhabitants had entertained towards him for his useful services, and of the deep regret they felt at his departure from them though temporary as it then was. ”[2]

टाइम्स ऑफ् इंडियामधील त्यांच्या मृत्युलेखांतही “ There he made himself so popular that even to this day his name is a household word in that part of the Presidency, ”[3] असे उद्गार आहेत. ह्यावरून दादोबा त्याकाळीं अहमदनगरांत बरेच लोकप्रिय होते व ही लोकप्रियता आपल्या सार्वजनिक कार्यामुळें त्यांना लाभली होती, असें म्हणण्यास हरकत नाहीं; परंतु खेदाची गोष्ट ही कीं त्यांच्या ह्या कार्याची माहिती करून घ्यावयाला त्या काळचीं माणसें किंवा समकालीन निकटील वृत्तपत्रांच्या फायली उपलब्ध नाहींत. त्या काळीं अहमदनगरांत स्थानिक वृत्तपत्र नव्हतें. ‘ ज्ञानोदय ’ ह्या ख्रिस्ती पाक्षिकाचा जन्म

1 R. D. 1856, Vol. 34, p. 221.

2 Brief outline of the Public Services of Rao Bahadur Dadoba Pandurang. p. 2.

3 The Times of India, Oct. 20th, 1882.

नगरांतच १८४२ त झाला होता; पण ह्या काळीं त्याचें स्थलांतर मुंबईला झालें होतें. ह्या काळच्या 'ज्ञानोदया' च्या पुस्तकांमध्यें ह्यासंबंधी माहिती मुळींच नाहीं. परमहंससभेचें कार्य मात्र त्यांनीं जोरानें चालविलें होतें, ह्याला बाबा पद्मनजीच्या 'अरुणोदयां'त आधार आहे.[१] ह्यासंबंधी माहिती पुढें यावयाची असल्यामुळें त्याचा विचार येथें करण्याचें कारण नाहीं. पण हें कार्य लोकांमध्यें अप्रीति उत्पन्न करणारें होतें. ह्याखेरीज शैक्षणिक वगैरे इतर सार्वजनिक कामेंही अहमदनगरांतील ह्या पहिल्या वास्तव्यांत त्यांनीं केलीं असलीं पाहिजेत. दादोबा आपल्या 'शिशुबोधां'त लिहितात, "सरकारांत हुद्याचीं कामें करीत असतां हाताखालच्या व सर्व लोकांस खुषच ठेवित गेलों. गुन्हेगारांस नीति सांगितल्याशिवाय बहुतकरून कधीं दंड केला नाहीं."[२] आपल्या डे. मॅजिस्ट्रेटच्या जागीं रुजू झाल्यावर तीनच महिन्यांनीं आपली कर्तबगारी त्यांनीं दाखविली. "The Court request the Acting Magistrate to inform his Deputy that his proceedings have given the Court much satisfaction." असें असिस्टंट रजिस्ट्रार, मि. जे. मॉरिस ह्यानें अहमदनगरला कळविलें, असें ता. १ सप्टेंबर १८५२ च्या सदर फौजदारी अदालतच्या हकीकतींत नमूद आहे. कोणाची भीति अगर भीडभाड न धरतां आपल्या न्यायबुद्धीला जागून निकाल देण्याच्या दादोबांच्या पद्धतीचा एक नमुना म्हणून ठाण्याच्या मुक्कामांतील एका केसची थोडी माहिती सांगतों:

## दादोबांच्या न्यायदानाचा एक मासला

ठाण्याचे हुजूर डेप्युटी कलेक्टर व मॅजिस्ट्रेट मि. शॉवेल हे रजा घेऊन विलायतेला गेलेले परत आले व त्यांच्या जागीं दादोबांची अदलाबदल होऊन नेमणूक झाली. या वेळची ही हकीकत आहे. ता. २८ फेब्रुवारीं १८५७ रोजीं जमशेदजी दोराबजी नांवाच्या एका पारशी गृहस्थाला रात्रीच्या वेळीं त्यांच्या घरांतून बाहेर ओढून पांच जणांनीं चोप दिला. ह्यांपैकीं भाऊ राजबाराव दाभाडे, सय्यद महमद-उसमान आणि विठू सकरेजी आगरी, असे तिघेजण पोलिस शिपाई, चौथा शेख जाफर येनूस हा ठाण्याचा अदालतचा शिपाई व पांचवा काजी अम्रुद्दीन गुलाम मोहिद्दीन नांवाचा इसम होता. त्यांच्याविरुद्ध सदर पारशी गृहस्थानें फिर्याद गुदरली व हें प्रकरण डेप्युटी मॅजिस्ट्रेट ह्या नात्यानें दादोबांपुढें आलें. हा खटला

१ अरुणोदय, पृ० ३६६.
२ शिशुबोध, पृ० ४०.

ता. ५, ६, ७, १४, १६, व १७ मार्च असा सहा दिवस चालला. पहिल्या दोन आरोपींना चार चार महिन्यांची आणि तिसऱ्या व चौथ्या आरोपीला तीन तीन महिन्यांची सक्तमजुरी शिक्षा त्यांनीं ठोठावली. ह्या विषयावर आपला निकाल देतांना दादोबा लिहितात,

" Although the offence with which the prisoners are charged is in itself of a trivial nature and would have been viewed in that light had it been committed by parties other than policemen yet when the manner of its perpetration and the position of the offenders as in the present case, are taken into consideration, it assumes the character of a serious nature. Every policeman is expected to know that it is his duty to keep the peace, and not to be the author of its disturbance himself, whether in his private or public capacity."

पांचव्या आरोपीला योग्य पुराव्याच्या अभावीं सोडून देण्यांत आलें. पुढें हें प्रकरण मॅजिस्ट्रेट मि. जे. डि. इन्व्हेरारिटी ह्यांच्याकडे गेल्यावर त्यांनीं ता. १८ मार्च रोजीं ही शिक्षा कमी करून प्रत्येकाला केवळ पंधरा रुपये दंड सांगितला! ह्या विरुद्ध फिर्यादी मि. दोराबजी ह्यानें सदर फौजदारी अदालतकडे अपील केलें व दोघां जज्जांपुढें हें प्रकरण शेवटीं ता. २० मे रोजीं आलें. ह्यांपैकीं एक जज्ज मि. विल्यम हेन्री हॅरिसन म्हणतो कीं, ज्या शांततारक्षणाकरितां हे पोलीस ठेविले आहेत तिचा त्यांनींच भंग केल्याबद्दल त्यांना केवळ पंधरा रुपये दंड ही शिक्षा पुरेशी नाहीं. तरीपण ज्यावरून मॅजिस्ट्रेटच्या मर्जीतली ही बाब आहे त्यावरून मि. दोराबजीचा अर्ज फेटाळावा. मात्र सरकारनें ह्या पोलिसांना बडतर्फ करण्यासारखा हा गुन्हा आहे. दुसरा जज्ज मि. रॉबर्ट कीइस ( Robert Keays ) लिहितो,

" I think it is much to be regretted that the Magistrate interfered with the sentence of the Deputy Magistrate. The manner in which the offence was perpetrated, and the position of the parties, gave the crime much more serious aspect, in my opinion, than a mere trivial assault and I think Jamshetjee has reasonable ground for complaint. I would hand this case up for the consideration of Government, and suggest that these Policemen should be discharged as unfit persons to be entrusted with Police duties. "

अखेर हें प्रकरण पुढील विचाराकरितां सरकारकडे पाठविण्यांत आलें. त्याला उत्तरादाखल जो ठराव सरकारचे ज्युडिशियल डिपार्टमेंटच्या सेक्रेटरींकडून सदर फौजदारी अदालतच्या रजिस्ट्रारकडे आला तो असा—

"The Right Honourable the Governor in Council is clearly of opinion that the Deputy Magistrate took a more correct view of this case than the Magistrate. The former officer states that the offence would have been of a trivial nature if it had been committed by any person but Policemen. The Right Honourable the Governor in Council is not prepared to say that it would have been trivial offence on the part of any persons to enter a house at night, to drag the unoffending man into the street and beat him, but he is clearly of opinion that such couduct was most monstrous on the part of Policemen......... The Magistrate speaks of the Policemen having " got into a disreputable brawl with the complainant." This appears to be a very mild representation of four men ( three of them Policemen ) beating one man. The guilt of the prisoners is, in the opinion of the Right Honourable the Governor in Council, greatly aggravated by the offence......... As to the prisoners themselves, the Right Honourable the Governor in Council considers them to have been guilty of most shameful misconduct, and he accordingly directs their immediate dismissal from Tanna Police." [१]

मि. इन्व्हेरारिटी ह्यांची ता. २ मे १८५७ रोजीं ठाण्याच्या मॅजिस्ट्रेटच्या जागेवरून ॲक्टिंग चीफ सेक्रेटरी व ॲक्टिंग सेक्रेटरी रेव्हेन्यू व फायनॅन्शिअल डिपार्टमेंटच्या जागीं दोन महिन्यांकरितां मि. हेन्री यंगच्या गैरहजिरींत नेमणूक झाली, व त्यांच्या जागीं मि. जे. आर. मॉर्गन हे कायराचे मॅजिस्ट्रेट ठाण्याच्या ॲक्टिंग कलेक्टर व मॅजिस्ट्रेट म्हणून आले. ह्याच वेळीं ही केस पुढें आल्यामुळें मि. मॉर्गन ह्यांनीं दादोबांविरुद्ध मनांत अढी किंवा भीति धरलेली दिसते. ती कशी ह्याचा उल्लेख पुढें येणारच आहे.

★

१ **Cases disposed of by the Suddir Foujdaree Adawlut,** Vol. VII, Jan. to June 1857, pp. 624 to 633 व 754 पहा.

३

# सत्तावन सालच्या बंडांतील कामगिरी

## दक्षिणेंतील धामधूम

ठाण्याचे हुजूर डेप्युटी कलेक्टर व मॅजिस्ट्रेट मि. शोवेल रजेवर विलायतेला गेलेले अकरा महिन्यांनीं परत आले आणि दादोबांना आपल्या अहमदनगरच्या मूळ जागेवर रुजू व्हावें लागलें. सत्तावन सालच्या बंडाची धामधूम उत्तर हिंदुस्थानांत नुकतीच सुरू झाली होती आणि तिचे पडसाद अहमदनगरला उठत होते. आणि तिकडील एकंदर वातावरण प्रक्षुब्ध झालें होतें. उत्तर हिंदुस्थानांतील ह्या वणवा जर असाच पेटत राहिला तर त्याच्या ज्वाला खालीं मुंबई इलाख्यांतही पसरल्याखेरीज राहणार नाहींत, अशी मुंबईचे गव्हर्नर लॉर्ड एल्फिन्स्टन ह्यांना भीति पडली, व म्हणून आग्रामुंबईचा रस्ता रोखण्याकरितां मेजर जनरल वुडबर्न ह्यांच्या आधिपत्याखालीं एक तुकडी उभारण्यांत आली.[१] पण इतक्यांत मुंबई इलाख्याच्या उत्तर सरहद्दीवर महु व इंदूर येथें असंतोषाचीं चिन्हें जाणवूं लागल्याची बातमी थडकली. त्याचा जर बंदोबस्त वेळींच केला नाहीं तर सगळा माळवाभर ही आग पसरून दक्षिणेकडेही उतरेल, हें निश्चित होतें. म्हणून जनरल वुडबर्नला महूला पाठविण्याचें ठरून ता. ८ जून १८५७ रोजीं त्यानें पुण्याहून कूच केलें. औरंगजेब बादशहाच्या शेवटच्या दिवसांतील आवडतें निवासस्थान व एके काळीं अहमदनगरची राजधानी असलेल्या औरंगाबादमध्यें घोडदळ, पायदळ व तोफखाना असें हैदराबादच्या नैनाती फौजेचें ठिकाण होतें. त्या फौजेंतील घोडदळाच्या तुकडीनें ज. वुडबर्नच्या सैन्याबरोबर कूच करावें असा बेत ठरला होता. ह्या नैनाती फौजेंतील बहुतेक लोक मुसलमान असून आपणास दिल्लीच्या बादशहाविरुद्ध लढावयास पाठवितात असें त्यांच्या मनानें घेतलें होतें; आणि त्यामुळें ता. १३ जून रोजींच उत्तरेकडे रवाना होण्याच्या योजनेला घोडदळानें आपली स्पष्ट नापसंती दर्शविली. इतकेंच नव्हे तर आपल्या इच्छेविरुद्ध दिल्लीकडे कूच करण्यास जर आपणांस भाग पाडलें तर आपण अधिकाऱ्यांना ठार करूं, अशीही धमकी त्यांनीं दिली. ह्या सैन्याचे प्रमुख कॅप्टन ॲबट ह्यानें ह्या धुळ

[१] History of the Indian Mutiny, 1857–58, by Col. G. B. Malleson, Vol. III, 1880, p. 9.

पुढाऱ्यांना आपल्या घरीं बोलावून त्यांना दिल्लीला जावें लागणार नाहीं, असें सांगून तात्पुरतें शांत केलें. पण ह्यांची ही बंडखोरवृत्ति पुनः उचल खाल्ल्याशिवाय राहणार नाहीं, अशी लष्करी अधिकाऱ्यांना भीति पडली असावी. आपण हा एक नैतिक विजय मिळविला अशा आनंदांत हे बंडखोर लोक मग्न असतांच, ता. १३ जून रोजीं, ज. वुडबर्नच्या नेतृत्वाखालील फौजेनें औरंगाबादेंत एकदम प्रवेश केला व ज्या ठिकाणीं हे बंडखोर लोक होते त्या भागांत जाऊन तैनाती फौजेला आपलीं शस्त्रें खालीं ठेवण्याचा हुकूम सोडला. घोडेस्वारांच्या पहिल्या तुकडीशिवाय बाकीच्या सगळ्या फौजेनें ही शस्त्रसंन्यासाची आज्ञा मान्य केली. आपला काय तो निर्णय ठरविण्याकरितां केवळ सहाच मिनिटांचा अवधि ह्या तुकडीला देण्यांत आला होता; पण शस्त्रें खालीं ठेवण्याऐवजीं एकदम घोड्यांवर स्वार होऊन हे पळून जाऊं लागले व ह्या झटापटींत कॅप्टन ॲबटला ठार करण्याचाही प्रयत्न झाला! दुसऱ्या दिवशीं सकाळीं कोर्ट मार्शल भरून ॲबटच्या खुनाच्या प्रयत्नाबद्दल एकाला शिक्षा होऊन फांशीं देण्यांत आलें[१] व अशा प्रकारें शांतता प्रस्थापित करण्यांत आली.

पूर्वी ठरल्याप्रमाणें तडक महूला न जातां ज. वुडबर्ननें जो औरंगाबादला जाण्याचा कार्यक्रम स्वीकारला तो कमांडर-इन-चीफ सर हेन्री समरसेट ह्यांच्या हुकुमावरून होता. अशा प्रकारें निजामाच्या सैन्यांतील कांहीं असंतुष्ट लोकांना शासन करण्यांत कालापव्यय करण्यापेक्षां मध्य हिंदुस्थानांत निकडीनें धाव घेणें जास्त अगत्याचें होतें, असें लॉर्ड एल्फिन्स्टनचें मत होतें. उत्तर हिंदुस्थानांत कुमक पाठविण्याबद्दल कर्नल ड्यूरंड ह्याचा सारखा तगादा लागला होता; पण औरंगाबादेहून ही फौज हलविणें आतां धोक्याचें होऊन राहिलें होतें. लॉर्ड एल्फिन्स्टन ता. २७ जुलै १८५७ च्या पत्रांत ड्यूरंडला लिहितात,

"I quite agree with you in regretting the delay which took place in the advance of the force. You cannot have written more strongly than I have upon the subject but there was a strong counter–prejudice on the part of the officers on the spot, everyone of whom declared that the departure of the column from Aurangabad would be signal of general rising...It was represented that it was not so much the troops but the whole population was against us. Mr.......the Deputy Commissioner

१ **The Poona Observer** अर्धसाप्ताहिकाचा ता. २७ जून १८५७ चा खास अंक.

in North Berar, said that there were, I am afraid to say how many armed Mussulmans in his district who would rise the moment the column was ordered to move." [1]

## बंडाची ठिणगी

सत्तावन सालच्या बंडाचा स्फोट जरी प्रथम उत्तर हिंदुस्थानांत झाला तरी त्याचा उगम दक्षिणेंत आहे, अशी पुष्कळांची समजूत होती. सातारच्या महाराजांना पदभ्रष्ट करून ज्या पद्धतीनें तें राज्य खालसा केलें तो प्रकार कित्येक जबाबदार इंग्रजांना देखील अन्यायाचा वाटत होता. ह्या गोष्टीला विरोध करतांना मद्रास कौन्सिलचे जुने सभासद मि. जॉन सलिव्हान ह्यांनीं ता. २५ एप्रिल १८४९ रोजीं कोर्ट ऑफ प्रोप्रायटर्सपुढें खणखणीत शब्दांत इशारा दिला होता. तो असा—

"You may think that you have the strength of the sword, but never forget that the sword is in the hands of the Native Army. You cannot rouse disaffection among the Native Chiefs without endangering the position of your Native Army." [२]

फार काय पण पुण्याचे एक वेळचे रेसिडेंट मे. जॉन ब्रिग्स ह्यांनीं देखील कोर्ट ऑफ प्रोप्रायटर्सच्या एका सभेमध्यें असेंच भाषण केलें होतें :-

"Whenever the people of India feel that they can no longer rely on our good faith and that their dearest rights and privileges are trampled on, I promise you that the destruction of our power will not occupy as long a time as the American War of Independence." [३]

हिंदुस्थानांतील इंग्रजी साम्राज्याच्या हितकर्त्यांनीं दिलेला इशारा आपण राज्यलोभामुळें जुमानला नाहीं व त्याचाच परिणाम ही धामधूम तर नाहीं ना, अशी शंका मुंबईसरकारपुढें उभी राहणें स्वाभाविक होतें. श्रीमंत प्रतापसिंहावर आलेला आरोप दूर करून त्याची पुनः साताऱ्याच्या गादीवर स्थापना व्हावी म्हणून ज्यानें भगीरथ प्रयत्न केले तो रंगो बापूजी तर ह्यांतून हीं सूत्रें हलवीत नसेल, अशी

१ History of the Indian Mutiny, Vol. III, p. 9.

२ Memoirs of General John Briggs, by Major Evans Bell, 1885, p. 240.

३ *Ibid* p. 242.

कल्पना होती. ता. १२ जून रोजीं एक गुप्त कट उघडकीला आल्याचें व त्याचा मुख्य नायक रंगो बापूजी असल्याचें जाहीर झालें. पण ह्या संकटाचा सुगावा लागतांच रंगो बापूजी निसटला आणि त्याचे साथीदार म्हणून पकडलेल्या लोकांपैकीं त्याच्या मुलासह सतरा जणांना तोफेच्या तोंडीं देण्यांत आलें.[१] कोल्हापूर, बेळगांव व धारवाड ह्या ठिकाणीं जुलैऑगस्टच्या दरम्यान बंडाचीं लक्षणें सुरू झालीं. त्यामुळें मुंबई शहरांतील युरोपियन लोकांनीं आपलीं बायकामुलें बंदरांतील बोटीमध्यें नेऊन ठेविलीं. सप्टेंबरच्या सुरुवातीला पुण्याच्या बुधवार वाड्यामध्यें युरोपियन लोकांना ठार करणाऱ्याला बक्षीस जाहीर करणाऱ्या आणि नानासाहेब पंतप्रधान पेशवा पेशवेपदावर आपला हक्क प्रस्थापित करण्याकरितां येत आहे, अशा अर्थाच्या मोठ्या जाहिराती चिकटविलेल्या आढळल्या.[२] खुद्द मुंबईबेटामध्यें दहाव्या पलटणींत बंडाचें कारस्थान चालू आहे, असें बाहेर आलें आणि त्याचा तपास होऊन त्यापैकीं दोघांना तोफेच्या तोंडीं देऊन सहा जणांना जन्मठेपेची शिक्षा फर्मावण्यांत आली.

## भागोजी व पथाजी भिल्लांचा धिंगाणा

अशा ह्या धामधुमींत भर घालण्याकरितां नाशिकच्या दक्षिण भागांत व अहमदनगरच्या उत्तर भागांत सुमारें सात हजार भिल्ल उठले. त्यांचा बंदोबस्त करण्याकरितां पोलिस सुपरिंटेंडेंट कॅप्टन हेन्री हा गेला असतां कसा ठार झाला, ह्या विषयीं पत्रव्यवहार प्रसिद्ध आहे.[३] ह्या पत्रांत त्यांच्या नायकाचें नांव रघोजी दिलें आहे तर गॅझेटियर त्याला भागोजी असें म्हणतो.[४] ह्या भिल्लांच्या उठण्याचा व सत्तावन सालच्या क्रांतीचा कांहीं संबंध नव्हता, हें लक्षांत ठेविलें पाहिजे. भागोजी हा पोलीस खात्यांत नोकरीला होता व तेथें त्यानें कांहीं गडबड केल्यामुळें त्याला कैदेची शिक्षा मिळाली होती. तिकडून त्याची सुटका झाल्यावर त्यानें आपल्या भोवतीं कांहीं मंडळी गोळा करून तो पुणें–नाशिक रोड अडवून बसला. आपला मागील दोन वर्षांचा पगार द्यावा व आपली पुढील पोटापाण्याची तरतूद करावी,

१ **Administration Report of Bombay for 1857–58, p. 18.**

२ **The Bombay Times, 11th Sept. 1857.**

३ **The Bombay Times (12–10–57); Oriental News (18–10–57).**

४ **Bombay Gaz., XVII, Ahmadnuggur, 1884, p. 418.**

अशी त्याची मागणी होती. ह्याच वेळीं सार्वत्रिक शस्त्रसंन्यासाचा ( disarming ) हुकूम सुटला होता व त्यामुळें सगळेच भिल्ल क्षुब्ध झाले. सुपरिंटेंडेंट ऑफ पोलीस मि. थेचर ह्यानें त्यांना पिटाळून लावलें पण पथाजी नांवाच्या दुसऱ्या एका भिल्लाच्या नायकत्वाखालीं एक नवी टोळी जमा झाली व तिनें आपला धिंगाणा सुरू केला. टाइम्स ऑफ इंडिया लिहितो—

" कॅप्टन हेन्री ठार झाल्याची बातमी ऐकून त्या भागांत एकच धांदल उडून गेली. ह्या गोंधळांत व अडचणींत भर घालण्याकरितां मोहरमचा सण जवळ येत चालला. कांहीं तरी गडबड खास होणार अशी अधिकाऱ्यांना भीति वाटूं लागली. तेव्हां सरकारी खजिन्यांतील सर्व रोकड जास्त सुरक्षिततेकरितां किल्ल्यामध्यें नेऊन ठेवावी, अशी इच्छा कलेक्टर मि. फ्रेझर टायट्लर ह्यांनीं दादोबांकडे व्यक्त केली. पण अशा प्रकारचें कांहीं करूं नका; कारण त्याचा दुष्प्रवृत्त लोक भलताच विपरीत अर्थ करतील, असा जोराचा सल्ला दादोबांनीं त्यांना दिला. इतकेंच नाहीं तर लोकांमध्यें जी गाळण उडून गेली होती ती दूर करून त्यांच्यामध्यें धीर व निर्भयता निर्माण करावी म्हणून दादोबा मोहरमच्या दिवसांत स्वतः होऊन घोड्यावर स्वार होऊन रात्रीच्या वेळीं गस्त घालूं लागले. वास्तविक हें काम पोलीस खात्याचें होतें, व हुजूर डेप्युटी कलेक्टरच्या कक्षेंत येत नव्हतें. लवकरच १८५७ सालचा २८ वा निःशस्त्रीकरणाचा कायदा जारी करण्याचें ठरलें आणि अगदींच अनपेक्षित रीतीनें ही कटुतम कामगिरी करण्याकरितां दादोबांची निवड करण्यांत आली.

## शिष्टाई व निःशस्त्रीकरण

अशा आणीबाणीच्या वेळीं हें काम अत्यंत जिकिरीचें तितकेंच धोक्याचें होतें, हें निराळें सांगण्याचें कारण नाहीं. पथाजी नायकाच्या नायकत्वाखालीं पारनेर व बागुंडा ह्या तालुक्यांच्या जवळच्या डोंगराळ प्रदेशांतील उघड्यावर शेकडों भिल्ल तळ देऊन बसले आहेत अशी बातमी आली. त्यांना निःशस्त्र करून परत लावण्याचा हुकूम दादोबांना देण्यांत आला व त्यांनीं तो आनंदानें मान्य केला. हुजूर डेप्युटी मॅजिस्ट्रेट म्हणून आपल्याबरोबर पोलीस त्यांनीं मुळींच घेतले नाहींत. ज्या ठिकाणीं भिल्ल जमले होते त्या ठिकाणीं ते एकटेच गेले आणि त्यांना चार उपदेशाच्या गोष्टी सांगून त्यांना शस्त्रें खालीं ठेवण्याच्या आणि घरोघरीं

परत लावण्याच्या कामीं दादोबांनीं यश मिळविलें." [1] हा निःशस्त्रीकरणाचा प्रयोग आधीं केला असावा. दादोबांनीं तात्पुरती समजूत पाडिली तरी भिल्ल लोक कायमचे स्वस्थ थोडेच राहणार आहेत? पथाजीनें पुनः उचल खाऊन जनरल मॉंटेगोमरी ह्यानें त्याच्या तुकडीला उधळून लाविलें. [2] पण पुढें तो शरण आला. 'ज्ञानोदय' लिहितो, "पथाजी नाईक हा आपल्या आपण पुण्याच्या पोलीस कामगाराकडे आला आणि म्हणाला, 'महाराज, मी पथाजी नाईक भील आहें. तुह्मांकडे येऊन तुमच्या हस्तगत व्हावें, असें जर माझ्या मनांत आलें नसतें तर मी तुमच्या हातीं कधींही लागलों नसतों. आतां तुह्मीं मला धरा आणि पाहिजे असल्यास ताबडतोब फांशीं द्या. पण माझ्या दोघां मुलांस मात्र वांचवा.' भागुजीचा अझून ठिकाणा नाहीं." [3]

भागोजी ह्याचा १८५९ च्या नव्हेंबरांत अहमदनगरचे पोलीस सुपरिंटेंडेंट सर फ्रँक सौटर ह्यांच्याशीं सिन्नर येथें समोरासमोर सामना होऊन तो ठार झाला.

## भिल्लांचें सत्र

भिल्ल लोकांचा संहार ज्याप्रमाणें साप, विंचू किंवा व्याघ्रसिंह ह्यांच्यासारख्या हिंस्र श्वापदांचा आह्मी करतों त्याप्रमाणें जुन्या काळीं करीत, असें दिसतें. बाजीरावाचा खानदेशचा सुभेदार बाळाजी लक्ष्मण ह्यानें एकदा बऱ्याचशा भिल्लांना बोलावून विश्वासघातानें विहिरींत ढकलून ठार केलें होतें. १८०६ सालीं त्रिंबकजी डेंगळे ह्यानें नारोबा पाटील ह्याच्या मदतीनें वर्षा सव्वा वर्षाच्या मुदतींत पंधरा हजार भिल्लांची कत्तल केली, असें नमूद आहे. [4] डॉ. विल्सन ह्यांनीं ता. ३-८-१८७५ च्या एका पत्रांत चाळीस वर्षांपूर्वी ज्यावेळीं पहिल्यांदाच आपण गायकवाडाच्या राज्यांत गेलों त्यावेळीं एके ठिकाणीं झाडाच्या फांद्यांना उलटे टांगून जाळलेल्या भिल्लांच्या चिता आपण पाहिल्याचें लिहिलें आहे! [5]

इतकी कामगिरी बजावल्यावर पारनेर, शिरूर ह्या तालुक्यांतील व वासुंडा आणि कोलेगांव ह्या पेठांतील शांतताप्रिय लोकांचींही हत्यारें सरकारजमा करण्याची

१ The Times of India, 10-11-1857.
२ Bombay Gaz., Vol. XVII, p. 418.
३ ज्ञानोदय, ता. १ मे १८५८, पृ. १४३.
४ Bombay Gaz., Vol. XVII, p. 414.
५ Life of John Wilson, p. 633.

कामगिरी दादोबांकडे देण्यांत आली होती, असें टाइम्सकारांनीं लिहिलें असून दादोबांनीं वेळोवेळीं कलेक्टरकडे पाठविलेले रिपोर्ट अहमदनगरच्या दप्तरांत आहेत, असें म्हटलें आहे. आपल्या 'यशोदा पांडुरंगी' च्या प्रस्तावनेंत ह्या गोष्टीचा दादोबांनीं उल्लेख केला आहे.[१] गुजराथ, धारवाड, बेळगांव वगैरे ठिकाणचें सार्वत्रिक निःशस्त्रीकरणाचें धोरण जरी सरकारनें १८५७ सालच्या डिसेंबरच्या अखेरीला जाहीर केलें तरी जून ते ऑगस्ट १८५८ ह्या महिन्यांत तें अंमलांत आणलेलें दिसतें. त्याचा व ह्यावेळच्या दादोबांनीं केलेल्या निःशस्त्रीकरणाचा संबंध नसावा. शांतताप्रिय लोकांजवळ असलेलीं हत्यारें बंडखोर लोक हिसकावून घेऊन त्यांचा दुरुपयोग करतील म्हणून कांहीं विशिष्ट भागांत दादोबांना सरकारी आज्ञा म्हणून जरी हें भिल्लांचें निःशस्त्रीकरणाचें काम हातीं घ्यावें लागलें तरी पण ज्या पद्धतीनें त्यांनीं तें केलें त्यावरून त्यांचो त्यांत भूतदयेची धार्मिक भावना जास्त होती, असें दिसतें. भिल्ल लोक क्रूर असले तरी अज्ञ आहेत आणि इंग्रजांपुढें त्यांचा टिकाव न लागतां ते नाहक प्राणांस मुकतील हेंच दादोबांनीं आपल्या मनांत आणलें असावें.

दादोबांच्या स्वभावाची शांतताप्रिय बैठक जर लक्षांत घेतली तर त्यांच्या-भोवतीं चाललेली ही धालमेल त्यांना किती दुःसह झाली असली पाहिजे, ह्याची सहज कल्पना करतां येते. परंतु नोकरीला रामराम ठोकल्याखेरीज तिच्यांतून मुक्त होणें आतां कठिण होतें. इतक्यांत एका अनपेक्षित प्रकारानें त्यांची ह्या कैचींतून आपोआप सोडवणूक झाली.

★

---

१ केकावलि ( पहिली आवृत्ति ), १८६५, पृ. ७, तळटीप.

४

# नोकरीला रामराम

## पुनः ठाण्यांत

ठाण्याचे डेप्युटी कलेक्टर मि. शोवेल ह्यांना ठाण्याला राहावयास नको होतें. कारण ठाण्याची हवा त्यांच्या स्वतःच्या व विशेषतः त्यांच्या कुटुंबाच्या प्रकृतीला मानवत नव्हती व त्यामुळेंच त्यांना अकरा महिन्यांची आजारीपणाची रजा घेऊन विलायतेस जाणें प्राप्त झालें होतें. रजेवरून परत आल्यावर त्यांची प्रकृतीची जुनी तक्रार पुनः सुरू झाली. ती दूर करण्यास एक सोपा मार्ग होता. तो असा कीं त्यांच्या रजेच्या मुदतींत दादोबांनीं जसें त्यांचें काम पाहिलें तसें त्यांनीं तें कायम पाहावें व त्यांच्याजागीं शोवेलेनीं स्वतःची बदली करून घ्यावी. ह्या व्यवस्थेला शोवेलनीं दादोबांची अनुमती घेतली. दादोबांनीं त्यांच्या जागीं काम केलेंच होतें व अनेकदा फौजदारी खटल्यांमध्यें त्यांनीं सदर अदालतकडून वाहवाही मिळविली होती. ह्या स्थानांतरामुळें दादोबा स्वतःच्या घराजवळ येऊन पोचणार होते व शिवाय नगरच्या धामधुमींतून त्यांची विनाप्रयास आयतीच मुक्तता होणार होती. तेव्हां ही बदली दादोबांना नाकबूल कशी होईल? पण ठाण्याचे कलेक्टर मि. जी. पी. मॉर्गन ह्यांना ही जागांची अदलाबदल झालेली नको होती.

शोवेलला ठाण्याच्या परिस्थितीची व गुंतागुंतींची जास्त माहिती आहे, असें मॉर्गनचें म्हणणें होतें. शिवाय सासष्टीमध्यें वजनदार अशा मुंबईच्या पुष्कळ लोकांच्या जमिनी आहेत व अशा ठिकाणीं स्थानिक माणूस अधिकारी नसलेला बरा, असें त्यांना वाटलें असावें. एकंदरींत दादोबांची ठाण्याला बदली करण्याला मॉर्गनचा जोराचा विरोध होता. दादोबांच्या कार्यक्षमतेबद्दल अहमदनगरचे मि. टाइटलर (Mr. C. E. F. Tytler) ह्यांना शंकाच नव्हती. पण शोवेलच्या हुशारीबद्दल त्यांना ठाण्याच्या खराब हवेंत डांबून ठेवून व अशा प्रकारें प्रकृति बिघडण्याचें पारितोषक कां द्यावें ह्याचें त्याला मोठें आश्चर्य वाटे. त्याचा ह्या अदला-बदलीला विरोध मुळींच नव्हता. अशा प्रकारें ह्या प्रश्नाची दोन महिने 'भवति न भवति' होऊन शेवटीं ता. ६ जानेवारी १८५८ रोजीं गव्हर्नर साहेबांनीं ह्या परस्पर बदलीला लेखी मान्यता दिली. त्याप्रमाणें जानेवारीमध्येंच दादोबांनीं आपल्या ह्या ठाण्याच्या नव्या जागेचा ताबा घेतला. येथें सुमारें तीन वर्षें ते राहिले व आपल्या

नोकरीची मुदत भरण्यापूर्वीच सेवानिवृत्त झाले. एकंदर एकवीस वर्षे त्यांनीं सरकारी नोकरींत व्यतीत केलीं. ह्या वेळीं त्यांचें वय ४६-४७ वर्षांचें होतें. अशा स्थितींत त्यांनीं सरकारी नोकरीला एकाएकीं रामराम कां ठोकला हें पाहणें जरूर आहे. सर आर्स्किन पेरी ह्यांनीं लॉर्ड फर्ग्युसनला पाठविलेलें एक पत्र उपलब्ध आहे त्यांत आपल्या लेखनकौशल्यावरील फाजील आत्मविश्वासामुळें त्यांनीं मुदत भरण्यापूर्वीच नोकरी सोडली व लेखणीच्या जोरावर चरितार्थ समाधानकारक रीतीनें चालणें शक्य नाहीं, हें आतां त्यांना कळून आलें आहे, असे दादोबांसंबंधी पेरींनीं उद्गार काढले आहेत. स्वीडनबोर्ग सोसाइटीला पाठविलेलें जें त्याचें पत्र आहे त्याच्या आरंभीं, 'माझा एकान्तीं राहाण्याचा स्वभाव आणि विद्येच्या व्यासंगांत कालक्षेप करण्याची आवड ह्या दोन कारणांवरून सरकारी चाकरी सोडण्याचा जो नेटमांचा कालावधि आहे त्याच्या फारच अगोदर मीं ती सोडिली, असें दादोबांनीं म्हटलें आहे.'[1] वरील कारणें खरीं आहेत. परंतु एवढ्याचकरितां कांहीं दादोबांनीं नोकरीवर लाथ मारली नाहीं, हेंही तितकेंच खरें आहे. दादोबांच्या निधनोत्तर त्यांच्या मुलानें प्रसिद्ध केलेलें दादोकृत शिशुबोध नांवाचें जें पुस्तक आहे त्याच्या मध्यें आपल्या राजीनाम्याचें मुख्य कारण त्यांनीं उघडपणें सांगून टाकलेलें आपणांस सांपडतें. तें असें—

"कित्येक वरिष्ठ अंमलदार आपल्या दुर्दैवानें फारच वाईट व दुष्ट स्वभावाचे असतात. अशांच्या हाताखालीं काम करणें म्हणजे मोठा त्रासच भोगणें आहे. तेव्हां एकतर त्यांच्यासारखें आपण दुष्ट व्हावें आणि अन्याय करावे किंवा त्यांच्या वरिष्ठांकडे आपली दाद लागत नसली तर आपल्या कामाचा राजीनामा देऊन त्यांच्या त्रासातून सुटावें. माझ्या दुर्दैवानें मागून उत्तरोत्तर मला हे असेच दुष्ट स्वभावाचे व वाईट मनाचे वरिष्ठ अंमलदार मिळून त्यांच्या हाताखालीं कामें करावीं लागलीं. ते स्वतः कांहीं बरोबर समजत नसत, आणि समजून घेण्यासाठी त्यांना लागला त्रास उत्पन्न होऊन आपल्या हाताखालच्या कामगारांवर राग भरवीत आणि त्यांना उगीच त्रास देत असावा; अशा स्वभावाच्या इंग्लिश अंमलदारांच्या हाताखालीं कामें करावयाचीं नशिबीं आलीं. त्याच्या पूर्वी मला उमद्या मनाचे व सुस्वभावाचे वरिष्ठ अंमलदार मिळाल्यामुळें मला हा त्रास सोसेनासा झाल्यावर मी लवकरच थोड्या पेनशनावर सरकार-चाकरी सोडून त्या त्रासांतून सुटलों. असें

१ A Hindu Gentleman's Reflections, p. 1.

करण्यानें मीं चांगला दूरवर विचार केला नाहीं, असें पुढल्या विपत्तीनें मला शिकविलें खरें ; परंतु होणाऱ्या गोष्टीपुढें उपाय चालत नाहींत. जें होणार तेंच होतें. बुद्धि, ज्ञान, विचार हीं सर्व व्यर्थ होतात हेंही मी आपल्या व इतर हजारों मनुष्यांच्या अनुभवांवरून जाणून या विपत्तींत हायहाय करीत बसलों नाहीं. आपल्या पुढल्या काळाचा सद्व्यय केल्यानें तेंच मनाला समाधान मिळविलें. "[१]

मि. मॉर्गन हेच ठाण्याचे दादोबा सेवानिवृत्त होईपर्यंत मॅजिस्ट्रेट व कलेक्टर होते. मि. शोवेल व दादोबा ह्यांच्या नोकरीच्या परस्पर अदलाबदलीविषयींची मागें दिलेली माहिती पाहिली म्हणजे दादोबांना सळो कीं पळो करून नोकरीचा राजीनामा देण्यास भाग पाडण्यास कारणीभूत कोण झाला असला पाहिजे ह्याचें अनुमान सहज करतां येईल.

ता. २७ ऑगस्ट १८६१ रोजीं दादोबा सेवानिवृत्त झाले. त्यांच्या मासिक पेन्शनचा दर रु. ११६–८–० होता.[२]

★

१ शिशुबोध, पृ. २६.

२ Abstract of the Proceedings of the Govt. of Bombay in the Finance Dept., August 1861, Pension Resolution No. 721.

५

## मुंबईतील धार्मिक स्थित्यंतरें

मराठी भाषेला नियमबद्ध करून तिला ठाकठीक स्वरूप दादोबांनीं आपल्या व्याकरणाच्याद्वारें प्राप्त करून दिलें, ही गोष्ट सर्वश्रुत आहे; परंतु आपल्या धर्मामध्यें जी घातक अनवस्था व बजबजपुरी माजली होती ती दूर करून आपल्या धर्माचें खरें शुद्ध स्वरूप आपल्या देशबांधवांना समजावून द्यावें व समाजधारणेला त्याला जास्त पात्र करावा, ह्याबद्दल दादोबांनीं जे उद्योग केले त्यांची कल्पना मात्र फारच थोड्या लोकांना असेल. महाराष्ट्र भाषेच्या व्याकरणाप्रमाणें धर्माच्या व्याकरणाचेही पाणिनि दादोबा कसे होते हें समजून घेतांना त्या काळची परिस्थिति लक्षांत घेणें अवश्य आहे.

राष्ट्रामध्यें ज्या वेळीं एकादी धार्मिक क्रांति किंवा सामाजिक स्थित्यंतर व्हावयाचें असतें, तेव्हां तेथील लोकांना अंतःप्रेरणा किंवा बाहेरचे धक्के तरी मिळावे लागतात. बौद्ध किंवा जैन ह्यांच्या ज्या धर्मक्रांत्या भरतखंडांत झाल्या त्यांच्या बुडाशीं अन्तःप्रेरणा होती; परंतु पंधराव्या शतकामधील नानकाचा शीख पंथ किंवा एकोणिसाव्या शतकाच्या आरंभीं जे ब्रह्मसमाजादि एकेश्वरी पंथ निर्माण झाले, त्याला अनुक्रमें मुसलमान व ख्रिस्ती या नव्या राज्यकर्त्यांच्या धर्मांचा व संस्कृतीचा संघर्ष मुख्यतः कारणीभूत झाला होता हें लक्षांत ठेवलें पाहिजे. बाकी कोणत्याहि धर्मक्रांतीला भगवद्गीतेंत म्हटल्याप्रमाणें धर्माची ग्लानि व तेणेंकरून चालू परिस्थितीसंबंधीं असंतोष उत्पन्न व्हावाच लागतो.

एकोणिसाव्या शतकाच्या आरंभीं जेव्हां इंग्रजांचा अंमल महाराष्ट्रामध्यें सर्वत्र प्रस्थापित झाला, त्यावेळीं आपल्या लोकांमध्यें एक प्रकारचा न्यूनगंड निर्माण झाला. हे मूठभर गोरे लोक हिंदुस्थानांत येतात काय व शेंदोडशें वर्षांच्या अवधींत ह्या अवाढव्य देशाचे मालक होऊन बसतात काय, ह्याचें लोकांना आश्चर्य वाटूं लागलें. ज्याअर्थीं पाश्चात्यांनीं राजकीय दृष्ट्या आपल्याला जिंकलें त्याअर्थीं त्यांचा धर्म, संस्कृति, समाजपद्धति–प्रत्येक गोष्ट आमच्यापेक्षां श्रेष्ठ तरी असली पाहिजे किंवा आपल्यामध्यें कांहीं बिघाड तरी झाला असला पाहिजे, अशा प्रकारची विचारपरंपरा आपल्यामध्यें सुरू झाली विशेषतः ख्रिस्ती मिशनऱ्यांना

स्वधर्मप्रसार व तो करतांना हिंदुधर्म व हिंदूंच्या चालीरीती व आचारविचार ह्याच्यावर त्यांच्याकडून करण्यांत येणारे जोराचे हल्ले ह्यांच्यामुळें आपल्या बुद्धीला जबरदस्त धक्के मिळूं लागले.

मुंबई हें त्या काळीं एक वैचारिक केंद्र बनलें होतें; कारण नव्या शिक्षणाला येथेंच सुरुवात झाली होती. सर्वसाधारण जनसमाज हा अज्ञ व पुराणप्रिय असल्यामुळें त्याच्यावर मिशनऱ्यांच्या धर्मप्रसाराचा विशेष परिणाम होण्याचा संभव नव्हता. परंतु ह्यावेळीं स्थापन झालेल्या शाळांमध्यें जे तरुण शिकत होते ते मात्र ह्या मिशनरी मतांपासून अलिप्त राहणें कठिण होतें. शाळांत शिकविल्या जाणाऱ्या शास्त्रीय ज्ञानामुळें विद्यार्थ्यांच्या जुन्या धार्मिक समजुतींवर आघात होत असत आणि त्यांत मिशनरी हिंदुलोकांच्या धर्माचें व आचारविचारांचें जें अतिशयोक्तिपूर्ण हिडीस चित्र रेखाटीत, त्यामुळें कांहीं तरुणांचा स्वधर्माभिमान संपुष्टांत येऊन मिशनऱ्यांच्या जाळ्यांत ते हळुहळू अडकले जात होते.

लंडन मिशन, अमेरिकन मिशन ह्यांचे प्रचारक मुंबईमध्यें प्रथम आले; परंतु ख्रिस्ती मिशनरीकार्याला खरी सुरुवात स्कॉटिश मिशनरी १८२२ सालीं येथें आल्यापासून झाली. विशेषतः १८२९ सालीं जेव्हां रे० जॉन विल्सन येथें आला तेव्हां त्यानें मिशनरी कार्याला जोराची चालना दिली. दादोबांचें शिक्षण जरी मिशनऱ्यांच्या शाळेंत झालें नव्हतें व धार्मिक प्रचारापासून सोवळी असण्याचा बाणा बाळगणाऱ्या सरकारी संस्थेंत जरी ते शिकत होते, तरी पण त्या वेळच्या सरकारी शाळांमधील विद्यार्थ्यांभोवतीं देखील मिशनऱ्यांचें जाळें पसरलेलें असे. रॉबर्ट कॉटन मनी हा नेटिव्ह एज्युकेशन सोसाइटीचा सेक्रेटरी सिव्हिल सर्व्हंट होता; पण तो आंतून मनस्वी मिशनरी प्रवृत्तीचा असे. सरकारी शाळांमध्यें बायबलच्या शिक्षणाला जो मज्जाव होता त्या विरुद्ध त्याचा निषेध Memoir on the Education of Natives ह्या १८३२ सालीं सरकारकडे पाठविलेल्या त्याच्या पत्रांत आपणास पाहावयास सांपडतो.[१] विल्सनच्या Oriental Christian Spectator ह्या मासिकाच्या चालकमालक व संपादकवर्गापैकीं मनी एक होता. " The Natives who are acquiring a knowledge of the English language were viewed by Mr. Money with peculiar interest. It was for their sake principally that he became secretary of the

१ O. C. S., May 1835, p. 161.

Native Education Society," [१] असे उद्गार मि. मर्नीच्या निधनोत्तर १८३५ एप्रिलमध्यें दिलेल्या एका व्याख्यानांत डॉ. विल्सन ह्यानें काढले होते, ते लक्षांत ठेवण्यासारखे आहेत.

## प्रो. हेंडर्सनचा ख्रिस्ती धर्मप्रचार

दादोबांचे पूज्य गुरु एल्फिन्स्टन इन्स्टिट्यूशनमधील प्रो. हेंडरसन हा तर एक जाज्वल्य मिशनरी प्रवृत्तीचा गडी होता. त्याच्या निधनोत्तर रे० विल्सन ह्यानें ता. २७ जून १८५० रोजीं जें प्रवचन केलें त्यामध्यें आपल्या ह्या मित्राविषयीं तो म्हणतो,

"He held that right mental culture facilitates Christian tuition. He said, that though he could not publicly direct the attention of his pupils to the claims of the only living true God to the love and service of his intelligent and morally endowed creatures......he would inform them of the deficiencies and imperfections of the system according to which they were instructed; seek to awaken within them a spirit of inquiry after divine truth which might find satisfaction elsewhere." वगैरे.[२]

प्रो. हेंडर्सनचें अन्तरंग ता. ३१ ऑक्टोबर १८४३ रोजीं त्यानें विल्सनला इंग्लंडमध्यें पाठविलेल्या पत्रांत दिसून येतें.' तो लिहितो :-

" Lectures are given in Marathi and Gujarati by Bal Shastri and others for the benefit of native school masters, a series of treatises and schoolbooks and maps is in the course of preparation and translation for the native schools......Now what is to be the result of all this? You know I never cordially approved of the Government plan of education; but of late and I may say exactly in proportion as I myself thought more solemnly on the truths of Christianity and made them the subject of conversation with educated natives, the more convinced I have become of the evil tendency of the system

१ O. C. S., June 1849, p. 208.

२ O. C. S., July 1850, p. 270.

which has hitherto been pursued and the necessity of strenuous exertion in opposition to it by all who have at heart the enlargement of Messiah's kingdom, or even the tranquillity of India and **the safety of the British Empire.** The Government in fact does not know what it is doing. No doubt, it is breaking down those superstitions and dispersing those mists which by creating weakness and disunion facilitated the conquest of the country but instead of substituting any useful truth or salutary principle for the ignorance and false principles which they remove, they are only facilitating the dissemination of the most pernicious errors and the most demoralising revolutionary principles. I have been appalled by discovering the extent to which atheistical and deistical writings together with disaffection to the British Government and hatred to the British name have spread and are spreading among those who have educated in the Government schools or are now in the service of Government. The direction of the Government system of education is rapidly falling into the hands of astute Brahmans, whom you know, and who know how to take advantage of such a state of things, and at the same time to strengthen themselves by an alliance with Parsi and Mussulman prejudices, while the European gentlemen, who still remain nominally at the head of the system know nothing of the undercurrents which pervade the whole or consider themselves as bound either by principle or policy not to make any exertions in favour of Christian truth while the professed object of the Government is to give secular instruction only."[१]

सरकारी विद्यालयांत उघडपणें ख्रिस्ती धर्माचा प्रचार करतां येत नाहीं म्हणून ता. ३१ डिसेंबर १८४५ रोजीं त्यानें बोर्ड ऑफ एज्युकेशनच्या देखरेखीखालील नोकरीचा राजीनामा दिला व ता. २ जानेवारी १८४६ पासून फ्री चर्चच्या मिशनरी शाळेंत निम्मे पगारावर नोकरी पत्करली. सरकारी शाळेंतील विद्यार्थ्यांभोवतीं देखील

१ O. C. S., July 1850, p. 270.

मिशनऱ्यांचे पाश कसे पसरले होते ह्याची साक्ष विल्सन ह्यानें ग्लासगो येथें, The General Assembly of the Church of Scotland या संस्थेसमोर The Apostasy and conversion of India ह्या विषयावर व्याख्यान दिलें त्यांत सांपडते. विल्सन म्हणतो,

"I cannot leave the school department of our work without noticing the gratifying fact that, in Bombay at least we have been able, to a considerable extent to supplement the educational institutions of Government. Their pupils have been among not the least interested auditors at our evening lectures both scientific and theological and with many of them we are permitted to hold the freest private intercourse. We owe much to the friendship of their professors and particularly of Messrs. Henderson, Bell and Eisdale (हे शेवटचे गृहस्थ पुण्याच्या शाळेंत शिक्षक होते) who are among our best friends and never prevent their pupils from repairing to our residence.[१]

मुंबई सोडून जावयाला गेल्यावर ता. २० मार्च १८३७ रोजीं दादोबांनीं प्रो. हेंडर्सनला पाठविलेलें एक पत्र उपलब्ध आहे. त्यावरून दादोबांचे व प्रो. हेंडर्सन व डॉ. विल्सन ह्यांचे खासगी संबंध किती जिव्हाळ्याचे होते तें कळून येतें. दादोबा लिहितात,

"I beg also you will make my best compliments to the Rev. Dr. Wilson, and mention to him, that I extremely regret not having had the pleasure of seeing him at the time of my leaving Bombay; more, because I have lost the best opportunity of obtaining from him some best works on divine subjects, of which kind, I am unspeakably sorry to say I have not a single book with me......some best works on the immortality of the soul, futurity etc, etc, will also be exceedingly welcome to me... If either you or Dr. Wilson favour me with the loan of some of these essays, it will be a great obligation conferred upon me."[२]

१ The Evangelization of India, (Rev. John Wilson) 1849, p. 156.

२ O. C. S., Oct. 1837. p. 463.

दादोबांची मूळापासून धर्मशील व विवेचक वृत्ति कशी होती, हेंही आपणांस ह्या पत्रावरून दिसून येईल. डॉ. विल्सनचें अशा तरुणांकडे फार लक्ष असे. डॉ. स्मिटनला ता. १ मार्च १८४१ रोजीं पाठविलेल्या पत्रांत तो लिहितो,

"The Moonshi Abdul Rahman Khan whom you will perhaps remember as a companion of Dadoba Pandurang......comes to us every morning to read the scriptures. He will, we hope, declare for Christ. What an accession he would be to our strength!" [१]

हे जे वर निरनिराळे समकालीन पत्रांचे उतारे दिलेले आहेत, त्यांवरून त्या काळची परिस्थिति चांगल्या प्रकारें लक्षांत येईल.

ख्रिस्ती मिशनऱ्यांचा हा जो पद्धतशीर मतप्रचार चालला होता, त्याचे नवशिक्षितांच्या कोंवळ्या मनावर काय परिणाम होत राहिले असतील ह्याचा अंदाज करणें कठिण नाहीं. स्वधर्मावरचा ह्या लोकांचा विश्वास अजिबात उडत चालला होता. हिंदुधर्माच्या नांवावर त्या काळीं सती, बालहत्या, देवाच्या रथाखालीं जीव देणें, गळाला लोंबकळविणें, नरबलि अशासारखे अनेक अमानुष प्रकार प्रचलित होते[२] व मूर्तिपूजा, जातिभेद, बालविवाह वगैरे अनेक हिंदु आचारविचारांचें स्वरूप आजच्यापेक्षां जास्त संकुचित, उपद्रवी व घातक स्वरूपाचें होतें. ख्रिस्ती धर्माच्या नांवाखालीं अशा प्रकारचे वेडगळ अमानुष प्रकार युरोपांतही अगदीं नव्हते असें नाहीं; परंतु आपल्या तरुणांपुढें मांडण्यांत येणारें ख्रिस्ती धर्माचें बायबलप्रणीत तात्त्विक शुद्ध स्वरूप होतें. त्यामुळें स्वाभाविक ख्रिस्ती धर्माकडे कांहीं तरुणांचीं मनें ओढ घेऊं लागलीं. परधर्म स्वीकारण्यामुळें आईबाप व आप्तसुहृद ह्यांचे मायेचे पाश तटातट तोडून टाकण्याचा प्रसंग येत असल्यामुळें ही मंडळी जुन्या धर्माला चिकटून होती. अशा प्रकारें स्वधर्मावर विश्वास नाहीं व परधर्मांत जातां येत नाहीं, ह्यामुळें कांहीं तरुणांची स्थिति त्रिशंकुसारखी होऊन त्यांच्या मनाचा कल नास्तिक मताकडे झुकूं लागला. मिशनरी लोक हिंदु धर्माविरुद्ध त्यांचें मत कलुषित करीत होते; परंतु ख्रिस्ती धर्माची दुसरी बाजू किंवा व्यंगें त्यांच्या पुढें मांडणारीं थॉमस पेन ह्याच्या

१ The Life of John Wilson by Dr. George Smith., 1878, p. 266.

२ अशी एक यादीच विल्सननें तयार केलेली उपलब्ध आहे. *Ibid*, p. 619.

Age of Reason सारखीं पुस्तकें त्या काळींही होतीं,[1] हें लक्षांत ठेवलें पाहिजे. एल्फिन्स्टन इन्स्टिट्यूशनच्या विद्यार्थ्यांमध्यें जातिभेदाच्या इष्टानिष्टतेविषयीं चर्चा चालत. त्यांना उद्देशून ओरिएंटल ख्रिश्चन स्पेक्टेटरचा संपादक लिहितो —

"A writer in the 'Prabhakar'[2] directs the attention of his countrymen to these discussions and their tendencies. He points out the danger to Hinduism. He maintains that the young men who object to caste are on the high road to Christianity. This writer has been answered by 'An Elphinstone scholar.' This 'scholar' freely admits that caste is denounced by himself and his fellows. He enters into the reasons on which his dislike to caste is grounded, and argues with much good will and with some ability against the system; why more, he admits that the young men who study English in Bombay, generally lose all faith in Hinduism. But then comes the grand question: Do the young men who reject Hinduism become believers in Christianity? 'The Elphinstone scholar' in the most decided terms declares that they do not, and he employs language regarding the Divine founder of Christianity which we cannot think of transcribing."[3]

---

१ थॉमस पेन ख्रिस्ती धर्मासंबंधीं काय लिहितो पहा—

"It is curious to observe how the theory of what is called the Christian church sprung out of the tail of the heathen mythology. A direct incorporation took place in the first instance by making the reputed founder to be celestially begotten. The trinity of Gods that then followed was no other than a reduction of the former plurality......The Christian theory is little else than the idolatry of the ancient mythologists accommodated to the purposes of power and revenue; and it yet remains to reason and philosophy to abolish the amphibious fraud."— Age of Reason, 1884, pp. 4-5.

२ प्रभाकर, २६ मार्च १८४३-' स्वधर्माभिमानी.'

३ O. C. S. 1843, pp. 248-9.

नेहमीं हिंदु देवदेवतांवर स्वैरपणें तोंडसुख घेणाऱ्या मिशनऱ्यांना स्वतःच्या आराध्यदेवतेवर उलट प्रयोग झाल्यावर कसें वोचे हें वरील उताऱ्यावरून दिसून येईल! 'एल्फिन्स्टन स्कॉलर' चे उपरिनिर्दिष्ट उद्गार पुढीलप्रमाणें आहेत, "स्वधर्माभिमानी लिहितो कीं, 'जे इंग्रजीचा अभ्यास केलेले नवीन उमेदवार आहेत त्यांस असें वाटतें कीं धर्मांत धर्म येशू ख्रिस्ताचा.' हें बोलणें तुमच्या पत्र लिहिणाऱ्यानें सिद्ध केल्यावांचून आमच्या नजरेस वजनदारसें वाटत नाहीं...कोणी एक आपल्या धर्माविरुद्ध कांहीं बोलला व त्यास दूषणें देऊं लागला म्हणजे त्यास लोक विचार न करितां मिशनरी अथवा ख्रिस्ताचा भक्त असें म्हणतात, परंतु आपल्या धर्मास दोष लावणें व येशू ख्रिस्ताचा भक्त होणें ह्या दोन गोष्टींत कोणता सारखेपणा आहे हें अद्यापि माझ्या लक्षांत येत नाहीं. तो मुसलमान झाला असें कां म्हणत नाहींत बरें? तर हा दोष तो इंग्लिश शिकल्यामुळें त्यास लावितात असें दिसतें. तर असे जे विचारशून्य लोक आहेत त्यांस माझें सांगणें हेंच आहे, कीं इंग्लिश ते शिकतात ती शुद्ध भाषा होय. त्यांत धर्मास अगदीं संबंध नाहीं. जशी त्यांची श्रद्धा आपल्या धर्मावर नसतीं त्याचप्रमाणें त्यांचा येशूख्रिस्तावरहि विश्वास नसतो. त्यांस इंग्लिशांचा येशू व हिंदूंचा कृष्ण हे दोघेहि समान धुतारे वाटतात. तस्मात् त्यास एकाएकी ख्रिस्ती म्हणणें ही लोकांची मोठी चूक आहे."[1] धुतारा याचा अर्थ Impostor किंवा भोंदू असा आहे. ओरिएंटल ख्रिश्चन स्पेक्टेटरच्या संपादकाला हा मजकूर उद्धृत करणें अशक्य झालें व 'ज्ञानोदय' कारांनीं, "This exhibits in a striking light the effect of the Government system of education. Here is infidelity without disguise," अशी तळटीप दिली आहे.[2]

आपल्या धर्मावर होणारे हल्ले परतविण्याकरितां प्रतिहल्ले करण्याकरितां अवश्य असणारें ख्रिस्ती धर्माचें ज्ञान आपल्या लोकांना नव्हतें, किंवा आपल्या धर्माची बाजू तर्कशुद्ध पद्धतीनें मांडण्याची धमकही आपल्या लोकांमध्यें आरंभीं तरी होती असें वाटत नाहीं. मिशनरी लोकांनीं हिंदुधर्माचा बारकाईनें अभ्यास केलेला असे व हिंदुधर्मावर अचूक शरसंधान नेमकें कसें व कुठें करावें हें त्यांना कळून चुकलें होतें. ह्याशिवाय ह्या कामांत त्यांना बाटक्या ब्राह्मणांची मदत मिळे. मोरभट दांडेकर

१ प्रभाकर, २ एप्रिल १८४३.
२ ज्ञानोदय, एप्रिल १८४३, पृ. ५८.

ह्यांच्या 'हिंदुधर्मस्थापना' ह्या हिंदुमतप्रतिपादक पुस्तकाला डॉ. विल्सन ह्यानें उत्तरादाखल इंग्रजी व मराठी भाषेमध्यें जें पुस्तक लिहिलें आहे त्याच्या प्रस्तावनेंत, "I enjoyed the assistance of a converted Brahman who some months before had publicly entered the lists with a puranik"[१] अशी त्यानें कबुली दिली आहे. संस्कृत व इंग्रजी ह्या दोनही भाषांचें उत्कृष्ट ज्ञान असलेलें व आपल्या अप्रतिम बुद्धिमत्तेमुळें हिंदुधर्माची बाजू चांगल्या प्रकारें मांडू शकणारे बाळ गंगाधरशास्त्री जांभेकर हेच तेवढे एक विद्वान् त्या काळीं होते; परंतु त्यांचें वय अगदींच लहान होतें, आणि ने. ए. सो. चे सेक्रेटरी, दर्पणाचे संपादक किंवा पुढें असिस्टंट प्रोफेसर व निरनिराळ्या शालेय पुस्तकांचे लेखक ह्या नात्यानें त्यांच्यावर जी जबाबदारी होती, त्यामुळें त्यांना अशा प्रकारच्या वादांत शिरण्यास सवड नव्हती. शिवाय सरकारी नोकर ह्या नात्यानें ह्यांना अशा गोष्टींपासून अलिप्त राहणें भाग पडलें असावें. ते स्वतः धर्मशील वृत्तीचे होते. समाजसुधारक म्हणून ते जरी विशेष पुढें आले नसले किंवा क्रांतीच्या द्वारा सामाजिक पुनर्घटना घडवून आणूं इच्छिणाऱ्यांची जरी त्यांनीं बाजू उचलली नाहीं तरी त्यांचे विचार प्रगमनशीलच होते, अशा प्रकारची ग्वाही इंदुप्रकाशांतील 'राजकीय ऋषि' ह्यांनीं दिलेली आहे. हाच लेखक पुढें म्हणतो,

"Liberal in his ideas and free from superstition, he never the less performed his Sandhya like an orthodox Hindu, because he considered that the institution of Sandhya supplied one of the best means of cultivating the spirit of devotion and that without prayer and devotion man could not prepare himself for the trials and temptations of life. Another practice, to which he adhered almost to his last day and which show how highly he cherished the spirit of godliness, was the regularity with which he performed bhajan daily before retiring for the night... Though a Brahmin himself among the orthodox he was known and hated as a "Hater of Brahmanism" and that because thoroughly devout and godfearing he cherished liberal views and, as far as he could, supported the cause of sensible and practical reform."[२]

१ An exposure of the Hindu Religion, 1832.

२ इंदुप्रकाश, ता. ११ मे १८८५.

नारायण शेषाद्रि व श्रीपत शेषाद्रि असे परळीवैजनाथकडील [१] दोन बंधु ख्रिस्ती धर्मांत गेले होते. त्यांपैकीं धाकटा जो श्रीपत त्यानें परत हिंदुधर्मांत येण्याची इच्छा दर्शवितांच त्याची शुद्धि करून पतितपरावर्तन करण्याचा पुढाकार बाळशास्त्र्यांनीं घेतला होता, ह्यावरून त्यांचा हिंदुधर्माविषयींचा अभिमान स्पष्ट दिसून येतो. ह्या चळवळींत भाग घेतल्याबद्दल बाळशास्त्र्यांवर मिशनरी लोकांचा व इतर युरोपियन लोकांचा घुस्सा झाला असणें स्वाभाविक आहे. वर प्रो. हेंडर्सनचें जें एक पत्र उद्धृत केलें त्यामध्यें ब्राह्मणांना उद्देशून असलेले उद्गार बाळशास्त्र्यांना दृष्टीपुढें ठेवून लिहिलेले आहेत हें निराळें सांगण्याचें कारण नाहीं. परंतु आपल्या हिंदु लोकांचाही त्यांना विरोध कमी नव्हता. पुण्याच्या सनातनी ब्राह्मणांनीं नगरकरांच्या वाड्यांत मार्गशीर्ष शुद्ध १३ शके १७६६ रोजीं एक सभा भरवून ह्या पातकाच्या क्षालनाबद्दल शुद्धिविधींत भाग घेतलेल्या लोकांना दंड ठोठावण्यांत आला होता. [२] ह्या प्रकरणांत बाळशास्त्र्यांची फार छळणूक झाली. ते ज्यावेळीं एकाएकीं वारले त्यावेळीं 'आमच्या शापानें बाळशास्त्री मेला' अशी प्रौढी सनातनी लोक मिरवीत, असें म्हणतात. [३] 'दर्पण' नांवाचें एक इंग्रजी-मराठी पाक्षिक (पुढें हें साप्ताहिक झालें) बाळशास्त्र्यांच्या संपादकत्वाखालीं प्रसिद्ध होत असे, ह्याचा उल्लेख मागें आलाच आहे. त्याच्या पहिल्याच वर्षी 'जात' ह्या विषयावर वाद सुरू झाला [४] व हिंदु, ख्रिस्ती व मुसल्मान अशा अनेक लेखकांनीं त्यांत भाग घेतला होता. हा वाद पांचसहा महिने चालला. ह्यांत संपादकांची तटस्थ वृत्ति होती. कधींमधीं एखाद्या लेखकानें मर्यादातिक्रम केला म्हणजे 'पत्र लिहिणाऱ्यांस उत्तरें' ह्या सदराखालीं 'ख्रिस्तियन धर्मांत गेलेला हिंदु' याणें हिंदुधर्माची निंदा करतेवेळेस लक्ष्यांत आणिलें

---

१ ज्ञानोदय, सप्टेंबर १८४३, पृ. १३५.

२ ज्ञानोदय, मुंबई, १५ जाने० १८४५.

"प्रायश्चित्ताचें पूर्वांग साक्षात् करविणारे ब्राह्मण यांस साक्षात् पूर्वांग प्रायश्चित्त कारयितृत्वयुक्त दोषारोप परिहारार्थ दर असामीस एक एक लघुरुद्र व सहस्र गायत्री जप याप्रमाणें करावें.

बाळशास्त्री जांभेकर यांजकडे प्रायश्चित्तपूर्वांग कारयितृत्व प्रयुक्त दोष परिहारार्थ चार प्राजापत्यें करावीं. बाबाजी दिवाणजी याजकडे कारयितृत्व संसर्गजनित दोषारोप परिहारार्थ एक प्राजापत्य करावें." (ह्यावर एकवीस ब्राह्मणांच्या सह्या होत्या)

३ भ्रमनिरास, (रा. भि. गुंजीकर) १८८५, पृ. ११९.

४ दर्पण–१६–३–३२.

नाहीं कीं, धर्मसंबंधी वाद जास करायाचा असेल त्याणीं जा धर्माचे विरुद्ध लिहिणार त्या धर्माचे लोकांचे मनास वाईट वाटण्याजोग्या गोष्टी उगाच लिहूं नयेत. ही गोष्ट त्याणें मनांत आणिली नाहीं म्हणोन आह्मीं त्याचें पत्र छापीत नाहीं," [१] किंवा "दुरुत्तरें किंवा एका पत्र लिहिणारानें दुसऱ्याचीं वर्मे काढावीं हे आमचे मनास येत नाहीं, आणि असें ज्या पत्रांत असेल तीं सर्व पुढील छापलीं जाणार नाहींत," [२] अशा मधूनमधून कानपिचक्या ते देत! आपल्या पत्रांत संपादकांनीं विचारस्वातंत्र्याला सर्वांना जो पूर्ण वाव ठेवला होता त्याबद्दल डॉ. विल्सन यानें 'दर्पण', वर अभिप्राय देतांना संपादकांचें अभिनंदन केलें आहे. [३] M. M. S. अशी 'आद्याक्षरी' असलेल्या मूर्तिपूजेविरुद्ध दोन कविता 'दर्पणां' त प्रसिद्ध झालेल्या आढळतात. त्यांच्या तीन पंक्तीपैकीं शेवटचे भाग देतों म्हणजे प्रचलित हिंदुधर्माविरुद्ध मतप्रसाराला त्या पत्राचा उपयोग कसा होत होता, हें कळून येईल.

(i) And shall a little block of stone
To image him by man, be hewn!
Be black you heavens and terrified
Earth be astonished than to see
The puny hand of human pride
Raised up to mock your deity! [४]

(ii) My heart aches for the chain of thrall
That crushed down poor Ind;
She knows no God, on whom to call.
But more than she hath sin'd
Land of the Sun awake arise!
Too long hath been thy night
Dream not of idol vanities
Which fear to see the light! [५]

★

१ दर्पण : ता. २२-जून १८३२.
२ दर्पण : ता. २७ जुलै १८३२.
३ O. C. S. : March, 1833, p. 128.
४ दर्पण : २२ जून १८३२.
५ दर्पण : २७ जुलै १८३२.

## ६
## परमहंससभेचा उगम मानवधर्मसभा

अशा प्रकारें हिंदुधर्मावर सर्व बाजूंनीं हल्ले चालले असतां तरुण पिढीला परधर्मांत जाण्यापासून किंवा नास्तिक मतापासून जर राखावयाचें असेल तर हिंदुधर्माचें उपनिषत्कालीन शुद्ध स्वरूप तिच्यापुढें ठेवणें अवश्य आहे, ही गोष्ट दादोबांच्या नजरेस आली आणि त्याकरितांच त्यांनीं मुंबईंत परमहंससभेची स्थापना केली. मूर्तिपूजा किंवा जातिभेद ह्यांना प्राचीन हिंदुधर्मांत जरी स्थान नसलें तरी आजचा हिंदुधर्म त्यांच्यावरच आधारलेला असल्यामुळें ह्या नव्या पंथाला जुन्या लोकांचा भयंकर विरोध होणार, ही गोष्ट दादोबांना माहीत होती. म्हणून सुरुवातीला ह्या सभेचें काम अत्यंत गुप्तपणें चालवावें व निदान एक हजार सभासद झाल्याखेरीज तिची परिस्फुटता करूं नये, असा त्यांनीं बेत केला; परंतु एका सभासदानें मध्येंच दगा देऊन संस्थेचें दप्तर लांबविलें व संस्थेच्या कार्याचें बेंड अकालींच उघडकीला आणल्यामुळें ही सभा मोडली असें म्हणतात.[१] ह्याचा परिणाम असा झाला आहे कीं ह्या संस्थेचा आरंभकाल, उद्देश व कार्यपद्धती यांच्या संबंधी अज्ञान व विलक्षण गैरसमज पसरलेले आहेत!

परमहंससभेची स्थापना सन १८४० च्या सुमारास झाली, असें पुष्कळांनीं लिहून ठेवलेलें आहे.[२] बाबा पदमनजीनें आत्मचरित्रांत, "सन १८४० पासून जातिभेद मोडावा व मूर्तिपूजा सोडावी ह्याविषयीं पुष्कळ तरुणांच्या मनांत विचार येऊन त्यांची एकजूट झाली होती, तिला त्यांनीं "परमहंससभा" किंवा मंडळी असें नांव दिलें होतें,"[३] असें जें लिहिलें आहे, तोच त्यांचा आधार असावा. मूर्तिपूजा किंवा जातिभेद ह्याविरुद्ध तरुण पिढीचें मत इंग्रजी शिक्षणाबरोबरच होत होतें; परंतु परमहंससभेची पद्धतशीर स्थापना केव्हां झाली हाच प्रस्तुत प्रश्न आहे.

१८३९-४० च्या सुमारास दादोबा जावऱ्याहून मुंबईस आले व एल्फिन्स्टन इन्स्टिटयूशनमध्यें शिक्षकाची जागा त्यांनीं पत्करिली. "ही जागा मीं आठनऊ

---

१ अरुणोदय, (बाबा पद्मनजी), १८८८, पृ. १७७.
२ प्रार्थनासमाजाचा इतिहास, १९२७, पृ. ९.
३ अरुणोदय, पृ. १४३.

महिनेपर्यंत चालविली," असें दादोबानींच लिहून टेविलें आहे.[1] पुढें सुरतेला इंग्रजी शाळा काढण्याचें ठरलें व १८४१ च्या अखेरीस त्यांना तिकडे जावें लागलें. ह्या गडबडींत त्यांना संस्थेची स्थापना करण्याची सवड होती असें वाटत नाहीं. राम बाळकृष्ण (जयकर) हे परमहंस सभेचे 'पहिले व शेवटचे अध्यक्ष' होते, अशी कल्पना आहे.[2] ती जरी खरी मानली तरी १८४० हा परमहंससभेचा आरंभकाल मानतां येणार नाहीं; कारण राम बाळकृष्ण ह्यांचा जन्म ता. ७ जानेवारी १८२६ रोजीं झाला, व त्यांनीं शिक्षण १८४४ सालीं सोडलें.[3] म्हणजे १८४० सालीं त्यांचें वय अवघें चवदा वर्षांचें होतें, हें उघड दिसतें. अशा कोंवळ्या वयांत परमहंससभेसारख्या धर्मक्रांति करणाऱ्या संस्थेचीं सूत्रें त्यांनीं हातांत घेतलीं असणें शक्य दिसत नाहीं.

## मानवधर्मसभा

वास्तविक परमहंससभेचें बीजारोपण सुरत येथें झालेलें आहे. दादोबांना त्यांच्या धर्मशील वडिलांकडून हिंदुधर्माभिमानाचें बाळकडू मिळालें होतें. पुढें इंग्रजी शिक्षणानें व विशेषतः मिशनरी लोकांच्या संसर्गानें प्रचलित हिंदुधर्मावरील त्यांचा विश्वास उडत चालला. सुरतेला आल्यावर त्यांचे मुख्यतः दोन फायदे झाले. पहिला फायदा हा कीं त्यांची व नर्मदाशंकर(?) नर्भयरामशास्त्री, यज्ञेश्वरशास्त्री वगैरे संस्कृतज्ञांची गांठ पडली. व्याकरणाकरितां म्हणून संस्कृत भाषेचा दादोबांनीं अभ्यास आरंभिलाच होता. ह्या शास्त्र्यांच्या मदतीनें त्यांनीं संस्कृत भाषेमध्यें बरेंच प्रावीण्य मिळविलें व ह्या भाषेंतील भागवतादि अनेक ग्रंथ वाचले.[4] त्यामुळें खरा हिंदुधर्म भटाभिक्षुकांच्या प्रचलित हिंदुधर्मापेक्षां निराळा आणि व्यापक, उदात्त व उदार आहे, असें त्यांना आढळून आलें. दुसरा फायदा म्हणजे मि. हेन्री ग्रीन ह्या सुरतेच्या इंग्रजी शाळेच्या हेडमास्तरचा सहवास होय. मि. ग्रीन हे अज्ञेयवादी व ख्रिस्ती धर्मावर विश्वास नसणारे असे गृहस्थ होते. त्यांच्याशीं झालेल्या संभाषणावरून ख्रिस्ती धर्माचीही न्यूनें काय आहेत, हें त्यांना कळून आलें. दादोबांच्या धार्मिक विचारांचा एकांगीपणा गेला. प्रत्येक धर्मामध्यें

१ आत्मचरित्र, मागें पृ. १४३ पाहा.
२ प्रार्थनासमाजाचा इतिहास, पृ. १०.
३ मनोरंजन, (कै. रा. ब. गो. म. टेंगे यांचा लेख) डिसें० १९२३.
४ प्रभाकर-ता. १८ सप्टेंबर १८४२.

चांगलें तसें वाईटही आहे व 'हंसक्षीर' न्यायानें सगळ्या धर्मांतील चांगलें तेवढें ग्रहण करून जर एक मानवधर्म स्थापन केला तर धर्मांच्या नांवावर आतांपर्यंत जो कलह चालला आहे तो बंद पडेल व मानवजातीचें ऐहिक तसें पारमार्थिक कल्याण होईल, अशी त्यांची खात्री झाली. दादोबा हे हॅम्लेटप्रमाणें अतिविचारी होते. विचारांना आचाराचें स्वरूप झटकन कसें द्यावें हें त्यांना फारसें साधत नव्हतें. परंतु ही त्यांची लंगडी बाजू दुर्गाराम मंछाराम ह्यांनीं भरून काढली. दुर्गाराम हे सुरतेच्या गुजराती शाळेचे साधे मास्तर. इंग्रजी शिक्षण त्यांचें मुळींच झालें नव्हतें. इतकें असूनही सारासारविवेकबुद्धि व नवविचारग्रहणक्षमता त्यांची विलक्षण होती. ह्यांच्यासंबंधी प्रो. ग्रीन बोर्ड ऑफ एज्युकेशनच्या १८४६ सालच्या रिपोर्टांत लिहितात,...

'I do not for a moment hesitate to place (him) above all the natives of India, whom I have yet had any opportunity of observing. Without knowing a syllable of English or of any other European language, his manner of thinking and feeling, the energy and fearlessness of his character, his high notions of duty and his perfect freedom from all the native prejudices make him much more European than any of even the most thoroughly English taught natives." [१]

दुर्गारामांची इंग्रजी ज्ञानाची ही उणीव दादोबांमुळें भरून निघाली होती व अशा प्रकारें दादोबा व दुर्गाराम हे एकमेकांना पूरक झाले होते. दुर्गारामांसंबंधी प्रशंसोद्गार दादोबांनीं आत्मचरित्रामध्यें काढलेले आहेत. दुर्गारामांच्या डायरी-मध्यें ता. ६ फेब्रुवारी १८४३ च्या नोंदींत, "दादोबा पांडुरंग जे अंग्रेजी नीशाळनो मेताजी छे ते सारो सुधरेलो भगवद्भक्त छे, [२] " असा शेरा आढळतो. ह्यावरून दादोबांविषयींचा दुर्गारामांचा नितांत आदर दिसून येतो. ह्या दोघांनीं आपल्या समानशील मित्रांच्या साह्यानें सुरतेमध्यें 'मानवधर्मसभा' नांवाची एक संस्था स्थापन केली. ह्या संस्थेचा उगम कसा झाला ह्याची नोंद दुर्गारामांच्या ता. १० फेब्रुवारी १८४३ च्या डायरीमध्यें सांपडते. ती अशी–" आज ताबुतचा दिवस होता. त्यामुळें सगळ्या कारखान्यांत रजा होती, तशी शाळांनाही पण मिळाली. अजमासें दोन

१ Report of the Board of Education, 1846, p. 53.
२ दुर्गारामचरित्र, (महीपतराम रूपराम) १८७८, पृ. १८.

वाजतां मी फिरायला निघालों. ताबूत पाहाण्याचा कांहीं माझा विचार नव्हता. पण मनांत होतें कीं दादोबा पांडुरंगांच्या शाळेमध्यें जावें म्हणजे सत्समागम घडेल; पण रस्त्यामध्यें दादोबा व दिनमणिशंकर हे दोघेजण मला भेटले...पुढें जातां जातां मी माझ्या मित्रांना म्हणालों कीं, फार दिवस झाले आमचे समानधर्मी असे जे दलपतराम भगुभाई ते भेटलेले नाहींत; त्यांच्यापाशीं जाऊं." अशा प्रकारें हे तिघेही दलपतरामाच्या शाळेमध्यें गेले. येथें सिद्धपदार्थविज्ञानांतील एका प्रश्नाची दादोबांनीं थोडी चर्चा केल्यावर दलपतरामानीं सूचना केली कीं, लोकांना सत्यधर्म सांगण्याचा तुमचा उद्योग चाललेला आहे तरी त्याचा वृत्तांत लिहून काढावा व आपल्याशीं सहमत कोण कोण आहेत त्यांचीही नोंद ठेवावी. दादोबा म्हणाले कीं, विचार करून कांहीं नियमही बांधूं. दुर्गाराम आजचें काम उद्यांवर टाकणारा नव्हता. तो म्हणाला, "मी सांगतों, आतांच लिहा." शेवटीं विचार करून निर्णय ठरले ते हे :—

**पहिला**—सर्व सृष्टीचा ईश्वर एक आहे.

**दुसरा**—मनुष्यमात्राची जाती एक आहे.

**तिसरा**—मनुष्यमात्राचा धर्म एक पण आपआपला धर्म भिन्न भिन्न समजतात हा केवळ त्यांचा अभिमान होय.

**चौथा**—मनुष्यांमध्यें उत्तम कोण व अधम कोण हें गुणांवरून ठरवावें, कुळावरून नव्हे.

**पांचवा**—विवेकाला अनुसरून कर्म करावें.

**सहावा**—ईश्वरानुग्रहार्थ भक्ति करावी.

**सातवा**—सन्मार्गाची शिक्षा सर्वांना सांगावी.

वरील निर्णयांप्रमाणें आपण स्वतः वागेन व त्याप्रमाणें वागण्याना इतरांना उपदेश करीन, अशा प्रकारची प्रत्येकानें प्रतिज्ञा करावी, असें दादोबा म्हणाले; पण ह्याप्रमाणें आपल्याला प्रसिद्धपणें बोलतां येणार नाहीं अशी दिनमणिशंकर ह्यांनीं कुरकूर केली. दिनमणिशंकर हे कर्मकांड्यांचे आचार्य होते. ते उघड नाहीं तरी गुप्त रीतीनें लोकसुधारणेचें काम करण्यास राजी आहेत हें कळून बाकीच्यांना समाधान वाटलें. शेवटीं आपल्या उद्योगाला आशिर्वाद असावा, अशी ईश्वराची प्रार्थना केल्यावर मंडळी घरोघरीं गेली.[१] वरील निर्णय आचारांत आणण्याकरितां ता. २२ जून

१ दुर्गारामचरित्र, पृ. २५.

१८४४ रोजीं मानवधर्मसभा ह्या संस्थेचा 'रणस्तंभ' रोवण्यांत आला.[१] 'एक जगद्वासी आर्य' ह्या टोपण नांवाखालीं 'धर्मविवेचन' नांवाचें एक पुस्तक इ. स. १८६८ सालीं प्रसिद्ध झालें आहे. हे जगद्वासी आर्य म्हणजे दादोबाच होत, हें प्रसिद्ध गौप्य आहे! ह्या पुस्तकासंबंधी बाबा पदमनजी लिहितात, "ह्या (परमहंस) मंडळीकरितां कोणीं एका गृहस्थानें बहुत दिवसांमागें एक मराठी पुस्तक रचिलें होतें, परंतु तें तेव्हांच छापलें नव्हतें. माझा कल ख्रिस्ती धर्माकडे आहे असें माझ्या कित्येक मित्रांनीं जाणून त्यांनीं तें मला वाचावयास दिलें......(हें) हस्तलिखित पुस्तक पुढें (१८६८) 'धर्मविवेचन' या नांवानें छापून प्रसिद्ध झालें.[२]" बाबांना ह्या हस्तलिखिताचे मूळ कर्ते दादोबा होते, हें माहीत नव्हतें. ह्या पुस्तकाच्या प्रस्तावनेंत हा ग्रंथ शके १७६५ (सन १८४३) मध्यें गुजरातेंत असतां आपण लिहिला, पण आपल्या संग्रहीं तो तसाच पडून राहिला, असें लेखकांनीं लिहिलें आहे. ह्या पुस्तकाच्या आरंभीं 'ग्रंथांतील निर्णयांची अनुक्रमणिका' दिलेली आहे तो अशी :—

१ ईश्वर एक व तोच पूज्य.

२ नीतिपूर्वक सप्रेम ईश्वरभक्ति हाच धर्म.

३ मनुष्यमात्राचा पारमार्थिक धर्म एकच होय.

४ प्रत्येक मनुष्यास विचार करण्याचें स्वातंत्र्य आहे.

५ नित्यनैमित्तिक कर्मे विवेकास अनुसरून असावीं.

६ मनुष्यमात्राची एक ज्ञाति.

७ सर्वांस ज्ञानशिक्षा असावी.

ह्या सात निर्णयांची फोड करण्याकरितां सात प्रकरणें लिहिलीं आहेत. मागें सांगितलेले मानवधर्मसभेचे सात निर्णय व परमहंसमंडळीचे हे सात निर्णय जवळ जवळ एकच आहेत असें दिसून येईल.

धर्मविवेचन ह्या ग्रंथांत दादोबा लिहितात,

..."जे विवेकी **पारमहंसिक** वृत्तीचे पुरुष असतात ते मात्र आपल्या मनांत या अभिमानजन्य गोष्टीचा त्याग करून, सर्वांचें रहस्य, सर्वत्र संमत, अतएव

---

१ दुर्गारामचरित्र, पृ. २५, ४५.

२ अरुणोदय, पृ. १९४.

त्यासच ईश्वरप्रवृत्त मार्ग म्हटला पाहिजे, त्यावर आपलें मुख्य लक्ष ठेवून असतात. "[1] ह्यांतील पारमहंसिक या नामोल्लेखावरून परमहंस मंडळीच्या नांवांतील रहस्य समजून येईल. परंतु 'परमहंस' असे ह्याच अर्थी उल्लेख मानवधर्मसभेच्या वृत्तांतांतही ठिकठिकाणीं सांपडतात, इतकेंच नव्हे तर 'परमहंससभा' असाच मानवधर्मसभेचा एके ठिकाणीं निर्देश करण्यांत आला आहे.

उल्लेख ( १ ) ता. ६ जुलै १८४४.

"आ सभामां बेसनारा चतुर पुरुषोने हुं कहुंछौं के ते टगनी सामां तमे **परमहंस** थाओ ने तेना धर्ममां जे जे कचराओ छे ते काढीने सारने ग्रहण करो."[2]

उ० ( २ ) ता. २० जुलै १८४४.

"इसुना उपरथी परमेश्वरपणानो विश्वास खसेडीने तेने तमे माणस जाणो ने बायबलने माणसनी बनावेली चोपडी जाणो, ने ते बंधनमांथी छूटीने केवळ **परमहंस** धर्मने लो, ने सर्व धर्ममांथी कचरीने काढीने सारनुं ग्रहण करो."[3]

उ० ( ३ ) ता. २८ जुलै, १८४४.

"आ पृथ्वि उपर अनेक जातना माणस छे, तेणे पोतपोतानी बुद्धिप्रमाणे अनेक ग्रंथो कीधेला छे; तेमांथी विवेकी पुरुष होय छे ते सार तथा असारने जुदुं पाडी जाणे छे. जेम **हंस** होय छे ते दुध अने पाणीने जुदुं करे छे, तेज रीते विवेकी पुरुष समजे छे. माटेज तेमनुं नाम **परमहंस** केहेवाय छे. जे विवेकी होय ते तो हिंदु, मुसलमान, अंग्रेज, पारसी, ए सर्व जातिना धर्मने सरखी दृष्टिये जुए छे, केमके ते तो सारग्राही छे."[4]

उ० ( ४ ) ता. २८ जुलै, १८४४.

"बाळभाई बोल्या के **परमहंस** कोन कहेवा तेनुं उत्तर मेहेताजीए दिधुं के जेने सार अने असार तथा खरुं ने खोटुं समजाय छे तेने **परमहंस** कहेवो. वळी बाळभाई बोल्या के त्यारे जे लोको नागा थईने राख चोळीने पोतानुं नाम **परमहंस**

---

१ धर्मविवेचन, पृ. ९.

२ दुर्गाराम चरित्र, पृ. ५५–५६.

३ तत्रैव, पृ. ७२.

४ तत्रैव, पृ. ७८–८०.

धरावे छे ते शूं जुठा वेशधारी छे? दादुबा बोल्या के हा वेषधारी जुठा छे. **परमहंसना** लक्षण तो मेहेताजी केहे छे. तेवां छे" [१]

उ० (५) ता. २५ आगष्ट, १८४४.

"अेक भगवां लुगडांवाला **परमहंससभामां** आवीने प्रश्न कीधो के आत्मा शूं मेलो थाय छे के तमे तेने धुओछो?" [२]

उ० (६) ता० १० नवंबर, १८४४.

"**परमहंस** बुद्धि राखीने सार मात्र ग्रहण करजों. जुओ हुं अनेक पंथवाळाओने घेर जाऊं छऊं. तेमां हिंदुमां स्वामीनारायणनो तथा इतर जातिमां अंग्रेजनो अे बे पंथ सारा लागे छे. पण अे बे पंथोमां पण अज्ञान तथा अभिमान छे, ते मूकी **परमहंस** बुद्धि राखी केवळ सारने मात्र ग्रहण करूंछौं." [३]

हे जे उतारे दिले त्यावरून **परमहंस** सभेला हें नांव कां मिळालें व मानवधर्म सभा व परमहंससभा एकच कशा होत्या व त्यांचें ध्येय काय होतें याची स्पष्ट कल्पना होईल.

दादोबांचें 'मावाईच्या ओव्या' या नांवाचें एक अप्रकाशित काव्य आहे, त्यांतही कांहीं ओव्यांवरून आपणास 'परमहंस' या नांवांतील रहस्य कळून येतें:—

खरें तोचि धर्म
खोटें तो अधर्म
जाणा हेंचि मर्म
थोडक्यांत ॥
धर्माधर्माची ही
मिसळ प्रपंचीं
राजहंसें चोंचीं
निवडावी ॥
गढूळ तें पाणी
केव्हां त्या मोहरीचें
मेळविलें साचें
दुधामाजी ॥
एकरूप झालें
दूध आणि पाणी
मळकीं दिसणीं
दिसे जरी ॥
करावा निवाडा
कोणी त्यांचा कैंचा

१ दुर्गाराम चरित्र पृ. ८३.
२ तत्रैव पृ. १०१.
३ तत्रैव पृ. १३८.

| | |
|---|---|
| एका राजहंसा | भक्तिरसीं ॥ |
| वांचुनिया ॥ | तेच येथें जाणा |
| खरे जे प्रेमळ | तुह्मीं राजहंस |
| भक्त विद्वज्जन | निवड ही त्यांस |
| करिती जे स्नान | कळतसे ॥ |

मानवधर्मसभेचे दादोबा पांडुरंग अध्यक्ष व दुर्गाराम मंछाराम दप्तरदार (कार्यवाह) होते. दुर्गारामचरित्रामध्यें डिसेंबर १८४४ पर्यंतच सभेचा वृत्तांत आहे. मानवधर्मसभेनें केलेलें एक मोठें कार्य म्हणजे जादूगार व मांत्रिक यांच्याविरुद्ध चालू केलेली यशस्वी मोहीम होय. जादूमंत्र खरा आहे हें सिद्ध करण्याबद्दल त्या लोकांना या सभेनें जाहीर आव्हान दिलें. प्रथम कोणीच पुढें होईना! शेवटीं स्वतःस विख्यात मांत्रिक म्हणविणारा वज्यारामबुवा नांवाचा जादुगार पुढें आला. ही मौज पाहाण्याकरितां सुमारें चार[१] हजार लोक जमले होते पण तो कांहींच चमत्कार दाखवूं शकला नाहीं शेवटीं या लोकांनीं मोठा गोंगाट चालविला व आपली फजिती झालेली पाहून सभा संपवून दुर्गाराम मंछाराम परत घरीं जात असतांना त्यांच्यावर या लोकांनीं हल्ला केला. पण एक लठ्ठ पारशी मध्यें पडल्यामुळें व दादोबांचें घर जवळ आल्यामुळें दुर्गाराम बचावला असें महीपतरामनें लिहिलें आहे.[२] मि. ग्रीन यानें आपल्या Idiomatic sentences या पुस्तकांत या विषयावर कांहीं वाक्यें देऊन हा प्रसंग अमर केला आहे. त्यांपैकी कांहीं अशीं—"Some of the people wanted to beat Durgaram...A mob followed Durgaram all the way to Dadoba's house...They remained for a long while shouting in front of the house. They were mostly Ouditch Brahmins".[३]

दादोबा १८४६ च्या आरंभीं मुंबईला आले. पुढें या सभेचें काय झालें समजत नाहीं. १८५२ सालीं दुर्गारामांची बदली राजकोटला सब डेप्युटी एज्युकेशनल इन्स्पेक्टर म्हणून झाली. तेव्हां ही गुप्ततेची संस्था संपुष्टांत आली असावी. सभेनें

१ ज्ञानोदय, फेब्रु. १८४५, पृ. ५७.

२ दुर्गाराम चरित्र, पृ. १९८.

३ A collection of English phrases with Gujarati equivalents, 1894, p. 30.

अर्धें दप्तर त्यांची शाळा कांहीं दुष्टांनीं जाळली त्या वेळीं त्या आगीला बळी पडलें. अर्धें राहिलें त्यावरून दुर्गारामांनीं आपल्या जीवनवृत्तांताची खासगी नोंद १८५३ सालीं लिहावयास सुरवात केली होती, तिच्यावरूनच रा. सा. महीपतराम रूपराम यांनीं ' दुर्गारामचरित ' हें पुस्तक तयार केलें. काठेवाडमध्यें दुर्गारामजींचें वास्तव्य आठ वर्षें होतें. तेथें मणिशंकर कीकाणी यांच्या साहाय्यानें त्यांनीं लोकसुधारणेचें कार्य चालविलें. पुढें १८७६ सालीं ते निधन पावले.[१]

★

१ समाजसुधारानुं रेखादर्शन. ( न. ज. त्रिवेदी ), १९३४, पृ. २३–२७; **Further Milestones of Gujarati Literature** या पुस्तकांत त्यांचा निधनकाळ १८७८ दिला आहे, पृष्ठ ११.

७

# परमहंससभा

१८४६ सालीं दादोबा मुंबईला आल्यावर त्यांची नेमणूक बाळशास्त्री जांभेकर यांच्या निधनानें नॉर्मल क्लासच्या डायरेक्टरची जी त्यांची जागा रिकामी पडली होती त्या जागीं झाली. येथें विद्यार्थ्यांमध्यें व मित्रमंडळीमध्यें त्यांनीं आपला मतप्रचार सुरू केला; त्याकाळीं पद्धतशीर अशी संस्था या कामाकरितां अस्तित्वांत आली नव्हती. कारण दुर्गाराम मंछारामासारखा कर्तबगार जोडीदार त्यांना येथें सांपडलेला नव्हता; पण पुढें असा माणूस त्यांना लाभला आणि तो म्हणजे राम बाळकृष्ण जयकर होय. राम बाळकृष्णांचें १८४४ सालीं शिक्षण पुरें झाल्यावर १८४५ सालीं रत्नागिरी येथें नवीनच स्थापन केलेल्या सरकारी हायस्कुलांत हेडमास्तर म्हणून त्यांची नेमणूक झाली. पुढें १८४७ सालीं नाना मोरोजी (त्रिलोकेकर) यांनीं ठाणें हायस्कूलच्या हेडमास्तरच्या जागेचा राजीनामा दिल्यावर तेथील लोकल स्कूल्स कमिटीचे सेक्रेटरी, मि. जी. डब्ल्यू विंश्वेस्टर यांनीं बोर्ड ऑफ एज्युकेशनकडे राम बाळकृष्ण यांची त्या जागीं नेमण्याकरितां मागणी केली. पुढें १८४९ सालीं विद्याखातें सोडून राम बाळकृष्ण कस्टमखात्यांत शिरले व आपल्या अंगच्या गुणांमुळें असिस्टंट कमिशनरच्या हुद्यापर्यंत चढले. व्यापारांत शिरण्याच्या हेतूनें १८६३ सालीं त्यांनीं इंग्लंडचा प्रवास केला होता. सरकारी नोकरी सोडून देह ठेवीपर्यंत (३१ जुलै १८६६) ते "दि एल्फिन्स्टन फिन्यान्शियल असोसिएशन ऑफ इंडिया" या कंपनीचे दरमहा बाराशें रुपये पगारावर म्यानेजर होते.[१] त्यांचा व दादोबांचा संबंध अत्यंत जिव्हाळ्याचा होता. "या प्रांतीं माझ्या स्वतांच्या ओळखीच्या जुन्या आणि नव्या शिक्षित मनुष्यांच्या मोठ्या समुदायांत रा. ब. रामचंद्र यांचें माझ्या मनांत निरंतर पहिलें स्थळ असे," असें सांगून त्यांची इंग्रजी भाषा व विद्या यांवरील प्रभुत्व व समाजसुधारणेविषयींची सक्रिय तळमळ याबद्दल दादोबांनीं आपल्या स्वीडनबोर्गवरील पुस्तकांत मुक्तकंठानें प्रशंसा केली आहे.[२]

---

१ मनोरंजन, डिसेंबर १८२१ (रा. ब. गो. म. टेंग यांचा लेख.)

२ स्वीडनबोर्ग यांच्या मताविषयीं एका हिंदी गृहस्थाचे विचार, १८८१, पृ० ५.

## परमहंससभेचा स्थापनाकाळ

माझी अशी भावना आहे कीं, राम बाळकृष्ण १८४९ सालीं कस्टमखात्यांत शिरून मुंबईमध्यें स्थायिक रहिवासी झाल्यावर मुंबईच्या परमहंससभेची पद्धतशीर प्राणप्रतिष्ठा झाली असावी.[१] बाबा पदमनजीच्या 'अरुणोदया' मध्यें परमहंससभेचे एका काळचे सभासद नारायण रघुनाथ (हे पुढें ख्रिश्चन झाले!) यांचें जें एक पत्र छापलें आहे त्यांत देखील, "If my memory does not fail me, it was in 1850 that this Mandali was started" असें लिहिलें आहे.[२] गोविंद नारायण माडगांवकरांनीं आपल्या मुंबईवर्णनांत ही गुप्त संस्था सुमारें १८५२ सालीं स्थापन झाली असें म्हटलें आहे.[३] परंतु १८५२ च्या पूर्वींचे या सभेसंबंधीचे उल्लेख आढळतात. अगदीं जुन्यांत जुना असा समकालीन उल्लेख जो मला आढळला तो ता. १ अक्टोबर १८५१ सालच्या 'ज्ञानोदया' मधील होय. या पत्राचे संपादक लिहितात—

"मुंबईमध्यें परमहंसमंडळी म्हणून स्थापित झाली आहे, आणि याविषयीं छापण्याकरितां कांहीं पत्रें आह्मांस आलीं आहेत. परंतु त्या गोष्टीविषयीं बहुधा कोणास बरावर ठाऊक नाहीं. थोड्या दिवसांनीं उघड होईल तेव्हां छापणें तें छापूं. अद्यापि कांहीं विशेष घडला नाहीं. परंतु प्राचीन हिंदु व हल्लींचे हिंदु यांमध्यें बहूत फेर पडला आहे. कांहीं एकांस शास्त्रपुराणांतील गोष्टी खोट्या दिसतात. तरी ते आपणाला हिंदु म्हणवितात. कांहीं एक नास्तिक सारखे आहेत. कांहीं लोक साहेबलोकांच्या समजुतीप्रमाणें समजतात. कांहीं लोक साहेबांची निंदा करतात." [४] या उताऱ्यावरून त्या काळच्या समाजाची वैचारिक स्थिति कोणत्या प्रकारची होती, हें आपणास कळून येतें व परमहंससभा हीही नुकतीच स्थापन झाली होती हीही गोष्ट स्पष्ट होते.

---

१ तुला "As early as 1849 a number of young men formed themselves into something like a secret association called Paramhansa Sabha."—**History of the Brahmo Samaj by** Sivanath Sastri, Vol. II, 1912, p. 411.

२ अरुणोदय, पृ० ४०८.

३ मुंबईवर्णन, पृ. ३७९.

४ ज्ञानोदय, १८५१, पृ० ३०५.

## रा. ब. दादोबा पांडुरंग

डॉ. रामकृष्णपंत भांडारकर हे स्वतः परमहंससभेचे सभासद झाले होते आर्यन ब्रदरहूडच्या दुसऱ्या कॉन्फरन्ससाठीं त्यांनीं जें भाषण लिहिलेलें उपलब्ध आहे. त्यांत ते म्हणतात,

"सुमारें १८५० सालीं जातिभेद हा राष्ट्रघटनेच्या आड येत असतो हा विचार लोकांच्यापुढें विशेषरूपानें आला, आणि त्याच वेळीं रा. ब. दादोबा पांडुरंग हे नारमल क्लासांतील आपल्या विद्यार्थ्यांना[१] जातिभेदापासून किती अनिष्ट परिणाम होत आहेत तें सांगून जातिभेद नष्ट झाला पाहिजे, असें प्रतिपादीत असत. त्यांनीं परमहंससभा स्थापन केली होती. ह्या परमहंससभेची हळुहळू सारखी भरभराट होत गेली. मंडळीमध्यें कोणासही सभासद करून घेतेवेळीं त्यास प्रथम एक प्रार्थना वाचावयास सांगत; नंतर जातिभेद न मानण्याची तयारी झाली आहे असें पटवून देण्यासाठीं किरिस्तांवानें तयार केलेल्या पावाचा एक तुकडा खावयास देत असत. वर्षांतून एकदां, किंवा कधीं अनेक वेळां, निरनिराळ्या जातींच्या लोकांचें मिळून सहभोजन होत असे; परंतु हें सर्व गुप्तपणें होत असे. नांवें उघडकीस आलीं तरी हरकत नाहीं असें कोणासही वाटत नसे. नारमल क्लासचे विद्यार्थी फणसवाडींत दुमेव्याच्या चाळींत दुसऱ्या मजल्यावर राहात असत. हेच विद्यार्थी परीक्षा पास झाले म्हणजे शिक्षक म्हणून बाहेरगांवीं जेथें जेथें जात तेथें तेथें परमहंससभेच्या मतांचा प्रसार व प्रचार करीत असत. त्यांपैकीं एक विद्यार्थी रत्नागिरीस मास्तर होता. येथेंच १८५२ पर्यंत मी होतों. ह्या मास्तरानें पुष्कळांना परमहंसमताची दीक्षा दिली होती. माझ्या बरोबरीच्या एका विद्यार्थ्यानें परमहंसमताचा स्वीकार केला होता व तो मला वळविण्याचा प्रयत्न करीत असे. आम्हीं संध्याकाळच्या वेळीं दूर दूर फिरावयास जात असूं व तेथें जातिभेद हा कसा घातक आहे, उच्चनीच भेदामुळें आपलें कसें नुकसान होत आहे व जातिभेद घालविल्यावांचून राष्ट्राची खरी उन्नति होणें कसें अशक्य आहे, ह्या विषयावर संभाषणें होत. हीं सर्व मतें माझ्या विचारास पटलीं होतीं, परंतु त्यावेळीं मला सभासद करून घेतलें नव्हतें. पुढें १८५१ सालीं एल्फिन्स्टन इन्स्टिटयूशनमध्यें मी अभ्यास करीत असतां वयाच्या सोळाव्या वर्षी मी परमहंससभेचा सभासद झालों. हा विधि वर म्हटलेल्या दुमेव्याच्या चाळींत एका खोलींत झाला. ज्यावेळीं मला पावाचा तुकडा खावयास दिला व मी तो खाऊं लागलों त्यावेळीं माझ्या

१ मार्गे पृ. २०० पहा, भांडारकर म्हणतात त्या काळीं नॉर्मल्क्लास अस्तित्वांत नव्हता.

अंगावर शहारे उभे राहिले. जणूं काय मी कांहींतरी गैर केलें आहे असेंच वाटलें. अशा प्रकारें सुमारें १८६० पर्यंत परमहंससभा चालू होती. नंतर कोणीतरी सभासदांच्या नांवांचें पुस्तक लांबविलें व त्यामुळें सर्वांचें धाबें दणाणलें व आपआपल्या जातींकडून आपल्याला त्रास होणार असें ज्याला त्याला वाटूं लागलें. अशा प्रकारें परमहंससभा मोडली व जातिभेदाचा प्रश्न दुसऱ्या संस्थेकडे सहज रीतीनें गेला[1].

परमहंसमंडळीमध्यें प्रवेश करते वेळीं तिचे नियम वाचून ते मान्य असल्याचें दर्शविल्यावर ओंजळींत पाणी घेऊन खालीं सोडावें लागे, असा बाबा पदमनजी,[2] (मुंबई) कासम महमदजी[3] (सातारा) व नारायण रघुनाथ[4] (पुणें) या तिघां सभेच्या जुन्या सभासदांनीं जलसंस्कार वर्णिला आहे. हा जलसंस्कार झाल्यावर "एक दुधाचा प्याला आणून प्रथम अध्यक्षानें व दुसऱ्या कित्येकांनीं तोंडास लाविल्यावर त्याला प्यायास देत," असें बाबा पदमनजीनें जें लिहिलें आहे[5] त्याला दुसऱ्या कोणत्याही सभासदाच्या स्वानुभवाची जोड मिळत नाहीं. जातिभेद मोडल्याचें निदर्शक म्हणून पावाचा तुकडा खाण्याचा निर्देश भांडारकर आद्य करून सर्वांनींच केलेला आहे.[6] हा पावभक्षणाचा प्रकार सुरतेच्या मानवधर्मसभेमध्येंही होता. ता. ६ जुलै १८४४ च्या मानवधर्मसभेची हकीकत देतांना "तेज वेळा भठीआरानीं दुकानेथी रोटलो मंगावी मेहताजी दुर्गाराम, मास्तर दादोबा अने तेमना मतना साथीओए जोडे खाई," असा निर्देश दुर्गाराम चरित्रांत आहे.[7]

परमहंससभेसंबंधी तिच्या एके वेळच्या प्रत्यक्ष सभासदांनीं दिलेली माहिती सांगितली. याखेरीज 'राजकीय ऋषि' या नांवानें इंदुप्रकाशमध्यें[8] १८८५

---

१ प्रार्थनासमाजाचा इतिहास, पृ० १८.

२ अरुणोदय, पृ० १७७.

३ तत्रैव, पृ० ३६२.

४ तत्रैव, पृ० ४०९.

५ तत्रैव, पृ० १७७.

६ आरंभीं कांहीं वर्षें पावाबरोबर सभासदांना मुसलमानाच्या हातचें पाणीही प्यावें लागे, असें राजकीय ऋषीनें लिहिलें आहे. इंदुप्रकाश, ता. २५, मे १८८५.

७ दुर्गाराम चरित्र, पृ० ५९.

८ इंदुप्रकाश, २५ मे, १८८५.

सालीं कांहीं अतिशयोक्तिपूर्ण माहिती प्रसिद्ध झालेली आहे. हे 'राजकीय ऋषि' म्हणजे सर नारायण चंदावरकर होत.[१] ती माहिती अशीः—

आपल्या परमहंससभेचा कार्यक्रम पार पाडण्याकरितां Khatrolee (क्षत्रियवाडी किंवा खत्तरवाडी) नांवाच्या शहरांतील एका भागांत सभेच्या लोकांनीं एक घर मुक्रर केलें. त्या घराचा मालक तें घर या तरुण लोकांना द्यावयास तयार होता, पण तिकडचा जुना भाडोत्री तिकडून हलेना! आपणास या मंडळीकडून आतां उपसर्ग पोंचल्याखेरीज राहणार नाहीं हें जाणून त्या भाडेकऱ्यानें तिकडे राहणें बंद केलें, पण घराला कुलूप लावून किल्ली तो बरोबर घेऊन गेला! शेवटीं या तरुण मंडळींनीं कुलूप फोडून घरांत प्रवेश केला व घरांत असलेले त्या गृहस्थाचे देव कोपऱ्यांत फेंकून दिले!!! या जागीं सभेचा मुक्काम थोडेच दिवस राहिला. पुढें गिरगांव बॅकरोड वरील एका निवांत अशा जागीं ही सभा नेण्यांत आली. ती जागा म्हणजे राम बाळकृष्ण यांचा बंगला असावा. हा अजून तेथें आहे.

बंधुभाव व समता यांच्या पायावर या संस्थेची उभारणी झालेली असल्यामुळें इंग्रजी शिक्षण घेऊन पाश्चात्य संस्कृतीशीं परिचय करून घेतलेले स्वातंत्र्यवादी तिच्याकडे आकर्षित झाले असल्यास नवल नाहीं; पण या ध्येयवादी व भावनाप्रधान तरुणांना जगाचा प्रत्यक्ष असा अनुभव कमीच होता. 'राजकीय ऋषि' म्हणतात,

"Thus some were led into the society by considerations bearing on the greatness of its mission and others less intellectual and more worldly by the example of certain men such as the late Mr. Dadoba, the late Mr. Ram Balkrishna and a few others among its leading lights, who held places of honour and emolument in Government services and had a certain amount of official patronage at their disposal."

एकदा फोर्टांतून ख्रिस्ती बेकरचे पाव घेऊन येतांना कांहीं सभासदांनीं उत्साहातिरेकाच्या भरांत गिरगांवपर्यंत त्या पावांची उघड मिरवणूक काढली, असेंही या लेखकानें लिहिलें आहे!

दुर्गाराम मंछाराम यांच्यासारखा कार्यतत्पर, जागरूक व कळकळीचा कार्यकर्ता जर या संस्थेला आरंभाला लाभता तर या उच्छृंखल सभासदांवर जरब राहून

१ सर नारायण चंदावरकर यांचें चरित्र, (दा. गो. वैद्य) १९१७, पृ. ११८.

संस्थेचें कार्य सुरळीत व अव्याहत चाललें असतें. दादोबा विचारशील असले तरी प्रत्यक्ष कार्याला त्यांचा विशेष उपयोग नव्हता. माझ्या समजुतीप्रमाणें मुंबईच्या परमहंससभेशीं दादोबांचा सल्लामसलतीखेरीज प्रत्यक्ष असा संबंध नव्हता; कारण त्यांच्या व्यवसायामुळें त्यांना तिकडे लक्ष देण्यास फुरसद होती, असें वाटत नाहीं. ता. १ सप्टेंबर १८४८ रोजीं 'ज्ञानप्रसारक मंडळी' स्थापन झाली. तिच्या मराठी शाखेचे ते अध्यक्ष होते; पण "कांहीं महिन्यांनंतर दादोबा पांडुरंगजी यांची स्थलांतरीं योजना झाल्यामुळें नारायण दीनानाथजी यांस अध्यक्षस्थानीं सर्व सभासदांहीं योजिलें," असा शेरा ज्ञानप्रसारकमंडळीच्या पहिल्या वृत्तांतांत सांपडतो.[१] डिसेंबर १८४८ मध्यें दादोबांची नेमणूक पहिल्या विभागाचे इन्स्पेक्टर म्हणून झाली व त्यांना फिरतीवर जावें लागलें. पुढें १८५२ सालीं तर त्यांची हुजूर डेप्युटी कलेक्टर म्हणून अहमदनगरला कायम नेमणूक झाली. परमहंससभा मोडल्यावर ते पेन्शन घेऊन १८६१ सालीं पुनः मुंबईंत स्थायिक झाले. बाबा पदमनजी लिहितात, "सभेच्या आरंभीं व शेवटीं मराठींत प्रार्थना वाचीत, त्या रावबहादूर दादोबा पांडुरंग यांनीं रचलेल्या होत्या. रा० ब० दादोबा पांडुरंग व रा. रा. भाऊ महाजन हे जरी मंडळीच्या मताचे व मंडळीचे पुरस्कर्ते होते तरी ते सभेस कधीं येत नसत. आलेच तर दुसऱ्या खोलींत बसत व सभा विसर्जन झाल्यावर अध्यक्षांची व कांहीं निवडक मंडळीची भेट घेत. रा० ब० दादोबांचे बंधु रा. रा. दाक्तर आत्माराम पांडुरंग हे ह्या मंडळीचे सभासद होते, पण यांची वर्तणूक अशा प्रकारची नव्हती. ते सभेस येत इतकेंच नाहीं तर आपल्या घरीं सभा भरवीत."[२]

दादोबांच्या या अशा वर्तणुकीचें कारण ते कधींमधीं मुंबईंत आल्यास पाहुणे म्हणून सभेच्या जागीं येत, हेंच असावें. परमहंससभेचें कार्य जरी गुप्त होतें तरी तिच्या नांवाचा बभ्रा १८५१ सालींच झाला. बाबा पदमनजी लिहितात,

"एका दिवशीं ह्या मंडळीच्या सभेस कोणी नवीन तरुण गृहस्थ येऊन नेमाप्रमाणें शपथा वगैरे घेऊन तींत मिळाला. आणि कांहीं दिवसांनीं त्यानें सर्व सभासदांचीं नांवें फोडून असें प्रसिद्ध केलें कीं, ते सर्व ख्रिस्ती होणार असून

१ ज्ञानप्रसारक, वर्ष १ लें, अंक १ ला.
२ अरुणोदय, पृ० १७८.

अमुक दिवशीं त्यांचा बाप्तिस्माही होणार आहे. ही बातमी शहरांत पसरतांच मोठा गवगवा झाला. मिशनशाळेंत जाणाऱ्या मोठमोठ्या हिंदु मुलांस त्यांच्या आईबापांनीं भराभर शाळेंतून काढलें; कित्येकांस मुंबईच्या बाहेर पाठविलें."[1]

या गोष्टीचा त्यावेळीं वर्तमानपत्रांत बराच गवगवा झाला. ही संधि साधून सभेच्या विरोधकांनीं 'परमहंसमतप्रशंसा' नांवांचें एक निंदात्मक कवन छापून प्रसिद्ध केलें. ग्रँटच्या कॅटलागमध्यें या चोपड्याची नोंद आहे; पण त्याची प्रत कुठेंच उपलब्ध नाहीं. या पुस्तकावर अभिप्राय देतांना 'ज्ञानोदय'कार आपल्या मार्च १५,१८५२ च्या अंकांत लिहितात,

"अलीकडे अशी बातमी निघाली कीं कोणी इंग्लिश शिकलेले तरुण हिंदु यांनीं जातिभेद नसावा व हिंदुधर्मामध्यें असेच अनेक फेरफार करावे या हेतूनें परमहंस-मंडळी स्थापली हें ऐकून पुष्कळ हिंदु लोकांस वाईट व भय वाटलें कीं, आमचा धर्म आतां लयास जाईल. आणि एल्फिन्स्टन विद्यालयांत मराठी ज्ञानप्रसारक मंडळी इनें आपले जे कारभारी ते परमहंसमंडळींतले आहेत असें समजून त्यांस कामावरून दूर केलें आणि हिंदु धर्माचें पालन करावें म्हणून कांहीं दिवसांमागें हिंदु सभा या नांवाची मंडळी स्थापिली गेली.

"हल्लीं रामकृष्ण अनंत जोशी, ज्याला बहूत लोक गुजाबा ह्मणतात, यानें 'परमहंसमतप्रशंसा' या नांवांचा ग्रंथ केला. त्यांत शिवीगाळ केल्यासारिखी फारच निंदा केली आहे. (हा) आपण पाहिला असतां नेहमी लावण्या गात व नाच तमाशा बैठकी करीत रांडांच्या मागें फिरतो, सबब तो कसा सोदा किंवा प्रमाणिक आहे, हें सर्वांच्या लक्षांत आहे. लिहावें असें नाहीं. असल्या घाणेऱ्या वाईट मनुष्यानें निंदा केल्यावरून त्या मंडळीचें कांहींएक होणार नाहीं; कारण जो लबाड तो कोठेंही लोपला जात नाहीं, आणि जो प्रमाणिक, भला तोही नाहीं. असला पाजी मनुष्य निंदा करतो ती स्तुतीसारिखी आणि जी स्तुति ती निंदेसारिखी असें विपरित भावानें समजावें."

'प्रभाकर'पत्रामध्यें भाऊ महाजन यांनीं तर या पुस्तकावर जास्त सात्त्विक संतापानें लिहिलेलें आहे. तें असें :—

---

१ अरुणोदय, पृ० १७९.

"परमहंसमतप्रशंसा या नांवाचें अष्टपत्री सांच्याचें एक लहानसें पुस्तक आलीकडेस गणपत कृष्णाजी यांच्या छापखान्यांत छापून प्रसिद्ध झालें आहे. या ग्रंथाचीं पृष्ठें चौदा आहेत, व त्याचा कवीश्वर 'रामकृष्ण अनंत जोशी पुणेकर' हा आहे. हा ग्रंथ श्लोक, आर्या, अभंग, ओव्या, कटिबंध, सवाई, पदें, फक्रीका वगैरे प्रासांहीं बद्ध आहे.

"कित्येक असामिनीं परमहंस असी आपणास संज्ञा घेऊन ते हिंदु धर्मास विरुद्ध आचरण करीत असतात, व ते एक नवीन मत स्थापायास पहात आहेत, असें लोकांत जघन्य झालें आहे, हें सर्वांस माहितच आहे. तेव्हां या परमहंसमताचें खंडण करावें हा या ग्रंथाचा उद्देश दिसतो. यांत परमहंसाच्या कर्माचें जें वर्णन केलें आहे त्यांत कित्येक गोष्टी तर अशा लिहिलेल्या आहेत कीं त्या खऱ्या तर असण्याचा अगदींच संभव दिसत नाहीं. ज्यांजवर "परमहंस" असा लोकापवाद आला आहे (आणि हा लोकापवाद असें आह्मीं म्हणतों; कारण लोक बोलतात त्याप्रमाणेंच जर वस्तुगत्या गोष्ट असती तर त्यांस श्रीपत शेषाद्रीप्रमाणें लोक बहिष्कृत केल्यावांचून राहतेना, व त्यांणीं नयेच राहूं हें त्यांच्या धर्माभिमानास योग्य आहे.) त्यांतून कित्येक आमच्या ओळखीचे आहेत. यांजवर तर "**शौच्या पाणी नको, श्वसा त्यजूं नको, कन्येसी सोडूं नको**" इत्यादि वाक्यें लागू होत नाहींत, असें त्यांच्या अब्रूवरून व वर्तणूकीवरूनहि साफ आह्मांस दिसतें आणि ग्रंथकार "रामकृष्ण अनंत जोशी" याणें क्षणभर विचार केला असता तर हीं वाक्यें कोणत्या दिशेस लागू आहेत हें त्यांच्या ध्यानांत सहज येतें.

"आतां इतकें खरें कीं अशा आरोपित लोकांपैकीं कित्येकांचें मत जातिभेद नसावे असें आहे व कित्येकांनीं उघडपणें स्वाभिप्राय लेखनद्वारा प्रगट केला आहे, आणि जे लोक हिंदी लौकिकांत दक्ष आहेत व जे फार सावधगिरीनें वागतात त्याशीं तुलना केली असतां हे लोक आमळसे अविचारी आणि उतावळे दिसतात खरे, परंतु त्यांचे जे अभिप्राय आहेत ते असत्य आहेत असें पश्चिम दैशिक विद्यांच्या द्वारांत जे शिरले असतील त्यांचें मन त्यांजपुढें साक्षी भरणार नाहीं यांत संशय नाहीं. परमहंसाचा आह्मीं पक्ष धरितों असें कोणी समजूं नये. जे लोक हिंदुधर्माभिमानी असतील त्यांनीं युक्तीनें व सभ्य रीतीनें त्यांच्या मताचें खंडण करावें यांत आह्मांस फार संतोष आहे. पण हे मतवाले जातिभेद मानीत नाहींत

त्यापेक्षां ते अन्य बीजाचे असावे ही एकच युक्ति ग्रंथकारानें लिहिली आहे तर याजवरून त्यांचें मत खंडून हिंदु धर्माचा बचाव करण्यास दुसरी युक्तिच नाहीं, असें होऊं लागेल, आणि आपले धर्मसंस्थापक शंकराचार्य यांनीं इतक्या प्रबल जैनाचे मताचें खंडन करण्यास कोणत्या प्रकारचे ग्रंथ केले आहेत, व कशा प्रकारें वादविवाद केले हें सर्वांचे लक्षांत असेलच; परंतु जर करितां " रामकृष्ण अनंत जोशी " सारिखा एकादा कवीश्वर त्यांच्या पदरीं असता तर त्यांस एवढा आयास न पडतां " **अन्य बीज असल्यास कवि म्हणे मग निखालस वाटारे,** " अशा एकाद्या महाराष्ट्र कारिकेंत जैन मताचें खंडन झालें असतें.

" विद्या आणि एल्फिनस्तन विद्यालय या बाबद या ग्रंथकारानें जे अमूल्य स्वाभिप्राय लिहिले आहेत ते आह्मीं खालीं उतरून घेतोंः—

" प्रभुराज्यधारकानीं आणिवली ह्या पुरांत सोसाटी ॥ मिशनारीही नट्टन झटती अत्यंत भ्रष्टतेसाठीं ॥ नित्य सोसेटींत विद्याभ्यास ॥ तेथें म्लेंछांसी सहवास ॥ आवडूं लागे कैफ मनास ॥ ज्वान मुलाला ॥ कर्माचा लोप झाला ॥ गांजाभांग जिरणीस पडली ॥ बरांडीवर इच्छा जडली ॥ ही उत्पत्ती कोणीकडली ॥ टाऊक आईला ॥" इत्यादि.

या कवीनें मिळेल त्यांच्यावर अवस्त्वारोप करून जो शिमगा केळेला आहे तो किती खोटा व नीच आहे हे दाखवून शेवटीं प्रभाकरकर्ते लिहितात.

" हा कवि तर चावट आहे हें सर्व मुंबईंत प्रसिद्धच आहे. आणि याच्या कवनाची वास्तविक किंमत लोक जाणतच आहेत परंतु आधीं या लोकांस विद्येची अभिरुचि नाहीं, आणि तशांत अज्ञ लोकांचा मनास सुकर्मापासून भ्रष्ट करायास हा पाहत आहे म्हणून आह्मांस इतकें लिहिणें प्राप्त झालें. परंतु आह्मांस मोठें आश्चर्य हें वाटतें कीं, एकापेक्षां अधिक बडे लोकांनीं या ग्रंथास आश्रय दिला आहे. आणि अशी जो गांवांत बातमी उडली आहे, ती जर खरीच असली तर या अगल्या नीच आणि बिभत्स कवनास एकापेक्षां अधीक बडे लोकांनीं आपला आश्रय द्यावा येणेंकरून त्यांस त्रिवार धिःकार असो. "[1]

यावेळीं सभेच्या सभासदांचीं नांवें प्रसिद्ध झालीं व सभेविषयीं गुजराथीत महाकाव्य अवतीर्ण झालें तरीपण सभेला धक्का बसला नाहीं, व पुढें सभासदांच्या

---

१ प्रभाकर, १५ मार्च १८५२.

नांवाची केवळ यादी अदृश्य झाली इतक्यानेंच सर्वांची गाळण उडून सभा मोडली हें कसें? याचें कारण असें कीं १८५१ सालीं म्हणजे आरंभीं आरंभीं जीं माणसें सभेला मिळाली होतीं तीं तत्त्वानें प्रेरीत व खऱ्या कळकळीचीं होतीं. त्यांनीं आपलीं नांवें प्रसिद्ध झालीं तरी सभा सोडली नाहीं; परंतु पुढें निरनिराळ्या उद्देशानें सभेंत शिरलेले ध्येयशून्य भुरटे लोकच सभासदांत जास्त झाल्यामुळें आपलीं नांवें प्रसिद्ध होतील या भीतीने ते सैरावैरा उडाले असावेत. १८६० च्या सुमारास सभासदांच्या नांवांची यादी जी पळविली ती सभेच्या एकाद्या शत्रूनें लांबविली नसावी. तसें असतें तर त्यानें तीं नांवें प्रसिद्ध केलीं असतीं. तसें झालेलें दिसत नाहीं. माझी अशी समजूत आहे कीं, सभेचा सभासद होऊन पुढें मागें आपलें नांव बाहेर फुटेल म्हणून घाबरलेल्या एकाद्या कुक्कुटहृदयी सभासदाचाच हा उपद्व्याप असावा! पुढें चाळीस वर्षांनंतर १८९० मध्यें पंचहौद मिशनच्या समारंभांत चहाच्या कपाला ओठांचा नव्हे तर केवळ नुसत्या बोटांचा स्पर्श केल्याबद्दल न्या. मू. रानड्यांसारख्यांना कशा नाकधुऱ्या काढाव्या लागल्या हें लक्षांत घेतलें तर लोकमताचा बागुलबुवा त्या काळीं केवढा विलक्षण व भयंकर होता, हें कळून येईल!

परमहंससभेच्या सभासदांची संख्या सुमारें एक हजार असावी, असें इंदुप्रकाशांतील 'राजकीय ऋषी'नें लिहिलें आहे. पण "मी ज्या दिवशीं तींत मिळालों त्या दिवशीं ५०-६० लोक हाजर होते," असें बाबा पदमनजी म्हणतात.[1] माडगांवकर १८६३ मध्यें लिहितात, "ह्या सभेंत निरनिराळ्या जातींतील तरुण गृहस्थ सुमारें पन्नास पाऊणसें होते, आणि गुप्तपणें पत्रें पाठवून त्यांनीं देशोदेशीं आपल्या सभेच्या शाखा स्थापिल्या होत्या. त्या कलकत्ता, मद्रास व काशीपर्यंत होत्या असें सांगतात.[2]"

आमणास जीं परमहंससभेच्या सभासदांचीं नांवें कळतात तीं हीं:—

१ दादोबा पांडुरंग. (आद्य प्रवर्तक)

२ रान बाळकृष्ण. (अध्यक्ष)

३ डॉ आत्माराम पांडुरंग. (पुढें प्रार्थनासमाजाचे अध्यक्ष)

---

१ अरुणोदय, पृ. १७७.
२ मुंबईवर्णन, पृ. ३७९.

४ भिकोबादादा चव्हाण. ( मनिहायस्कुलांतील शिक्षक, पुढें प्रार्थनासमाजाचे कार्यकर्ते ).

५ सखाराम लक्ष्मण ( भिकोबादादांचे बंधु, मनिहायस्कुलांत शिक्षक. या बंधूंचें "The Bible was full of absurdities, errors and immoralities," असें मत होतें )

६ लक्ष्मणशास्त्री हळबे.

७ बाळशास्त्री शिंत्रे. ( The Translator's Dept. of the Appellate side of the Supreme Court of Judicature मध्यें नोकर )

८ मदन श्रीकृष्ण ( पुणें स्मॉल कॉज कोर्टाचे जज्ज. पुढें कर्मठ बनून देव मामलेदारांचे शिष्य झाले ! )

९ मोरोबा विनोबा. ( संगमगिरी, पुढें प्रार्थनासमाजाचे कार्यकर्ते. )

१० बाबा पदमनजी. ( पुढें ख्रिश्चन झाले ! )

११ नारायण रघुनाथ. ( पुढें ख्रिश्चन झाले ! )

१२ सखारामशास्त्री. ( मुंबई कस्टमहौसमधील मराठी खात्यांत नोकर )

१३ रामकृष्ण गोपाळ भांडारकर. ( पुढें प्रार्थनासमाजाचे कार्यकर्ते )

'प्रभाकर' कर्ते भाऊ महाजन हे सभेचे पुरस्कर्ते असले तरी सभेच्या बैठकांना कधींही हजर राहत नसत, व डॉ. भाऊ दाजी व भाऊ रसूलचा दादाजी हे सभासद होणार होते इतक्यांत सभा मोडली, असें नारायण रघुनाथ लिहितात. अहमदनगरच्या शाखेंत सुमारें पंचरावीस सभासद होते. यांपैकीं तिघे[1] दादोबा पांडुरंग, वासुदेव भिकाजी करमरकर ( नॉर्मल क्लासांतील विद्यार्थी ) व कासम महमदजी ( हे पुढें ख्रिस्ती झाले ! [2] ) हे होते.

---

१ अरुणोदय, पृ. ३६६.

२ कासम महमद ( वय २० ) व शाहू दाजी ( ब्राह्मण, वय २३, अहमदनगर येथील इंग्रजी शाळेचे मास्तर ) परमहंससभेचे सभासद होते. त्यांनीं ता. ९ जून १८५६ रोजीं बाप्तिस्मा घेतला. कासमचे वडील बंधु शेक दाऊद हे पूर्वीच ख्रिस्ती झाले होते. शाहू दाजीचा धाकटा भाऊ ( वयें १९ ) वासुदेव हा ख्रिस्ती धर्म स्वीकारणार होता; परंतु त्याच्या आईने आक्रोश केल्यामुळें हिंदुधर्मांत राहिला. शाहूच्या बाप्तिस्म्याची हृदयद्रावक हकीकत ज्ञानोदय ( जुलै, ता. ४ व १५, १८५६ पृ. २०५ ते २१८ ) मध्यें प्रसिद्ध झाली आहे त्यांत पुढील मजकूर आहे, " यांनीं चार पांच वर्षांपासून केवलेश्वर मत अथवा कचित् परमहंस मताि

सभासदांची यादी नाहींसी झाल्यामुळें परमहंससभा मोडली म्हणतात तें वास्तविक खरें दिसत नाहीं. अवसानघातकी किंवा कच्चा दिलाची जी मंडळी होती त्यांची तिच्यांतून झाडलोट होऊन निस्सीम कार्यकर्ते तेवढे शिल्लक राहिले व त्यांनीं आपलें कार्य चालूच ठेवलें होतें. माडगांवकर लिहितात, "ही सभा निखालस मोडली नाहीं. हिचे कित्येक सभासद अद्याप आहेत व ह्यांचे उद्योग चालले आहेत." [१]

बाबा पद्मनजी यांनीं 'ज्ञानोदयांत' जो दादोबासंबंधी संपादकीय मृत्युलेख लिहिला आहे त्यांत 'परमहंससभे'चें विसर्जन व प्रार्थनासमाजाचा आरंभ यांवर नवा प्रकाश पाडणारा कांहीं मजकूर आहे. ते म्हणतात—"प्रसिद्धपणें आपणास परमहंसमतधारी म्हणविणारा व त्याप्रमाणें उघड रीतीनें चालणारा असा त्यांतून कोणीच नव्हता, ही गोष्ट या मंडळींतील पुस्तककर्त्यांपासून तो नवशिक्या-पर्यंत सर्वांची सारखी होती. या मंडळींत आह्मीं व आमचे कित्येक मित्र मिळालों होतों, म्हणून आह्मीं दादासाहेबांस गुरुस्थानीं समजत होतों. या मंडळींत ८०० पासून १००० पर्यंत लोक होते. पुढें अशा रीतीनें गुप्त व्यवहार केल्यानें कांहीं चांगलें होणार नाहीं, जें करणें तें उघड रीतीनें करावें, असें कित्येक गृहस्थ म्हणूं लागले. तें म्हणणें कित्येकांस योग्य वाटलें व कित्येकांनीं म्हटले कीं, जरी हें खरें आहे तरी उघड होण्याची वेळ अद्यापि आली नाहीं! यावरून त्या मंडळींत फूट पडून ती लौकरच लयास गेली. यापैकीं पहिल्या पक्षाच्या लोकांनीं पुढें प्रार्थनासमाजाची स्थापना केली, पण मि. दादोबा वगैरे जी मंडळीं दुसऱ्या पक्षांत होती, ती त्यापासून अलग राहिली." [२]

म्हणतात, तें घेतलें. हे दोघे तरुण गृहस्थ आपले दुसरे सहचरांसुद्धां ख्रिस्ती धर्माचा फार धिक्कार करीत असत, आणि आपले सुधारलेले मताचा फार अभिमान बाळगून राहत असत. तेव्हां त्यांस असें वाटे कीं धर्माविषयीं आपले मतांतील लोकांसारखे शाहणे कोणीच नाहींत. हिंदु, मुसलमान व इंग्लिश लोकही धर्माविषयीं अविचारी, भोळे आणि अत्याचारी आहेत. आह्मीं मात्र काय ते विवेकी आणि सद्धर्मी आहोंत." (पृ. २०६) दादोबांनी फेब्रुवारीमध्यें दोन महिन्यांची घरगुती कामाकरितां रजा घेतली होती. (ज्ञानोदय, फेब्रु० १, १८५६ पृ. ५५) व पुढें एप्रिल १८५६ पासून त्यांची मि. शोवेलच्या जागीं ठाण्याला बदली झाली (R. D. 1856, Vol. 21, p. 221) या संधीचा फायदा घेऊन मिशनरी लोकांनीं या तरुणांना आपल्या जाळ्यांत पकडलें, असें स्पष्ट दिसतें.

१ मुंबईवर्णन, पृ. ३८०.

२ ज्ञानोदय, २६ अक्टो० १८८२.

## रा. ब. दादोबा पांडुरंग

**मुंबई येथील प्रार्थनासमाजाचा वृत्तांत** म्हणून एक पुस्तक, चिटणीस कै. ना. ग. चंदावरकर यांनीं १८८३ सालीं प्रसिद्ध केलें आहे त्यांत, " पुढें सुमारें पांचसहा वर्षें लोटल्यावर त्याच (परमहंस) मंडळींपैकीं कित्येकांस असें वाटूं लागलें कीं, आपल्या उद्देशाच्या सिद्ध्यर्थ प्रसिद्धपणें एक मंडळी स्थापावी. या नव्या मंडळीच्या स्थापनेच्या विचाराकरितां पहिली सभा ता. ३० डिसेंबर १८६६ रोजीं डॉक्टर आत्माराम पांडुरंग यांच्या घरीं भरली व प्रार्थनासमाजाच्या स्थापनेचा विचार झाला, ' असा मजकूर आढळतो. (पृ. २)

अशा प्रकारें १८६७ सालीं प्रार्थनासमाज हें नवेंनांव देऊन परमहंससभेचेंच कार्य मुख्यतः याच मंडळीनें पुढें चालू केलें. यावेळीं परमहंससभेचे पहिले अध्यक्ष रा. ब. राम बाळकृष्ण दिवंगत झाले होते. रा. ब. दादोबा पांडुरंग यांना १८६५ च्या आर्थिक अनर्थांत जी ठोकर मिळाली होती त्या आपत्तींतून डोकें वर काढण्याकरितां काठेवाड, बडोदें, वगैरे संस्थानांत आपला नोकरीचा कुठें नवा जम बसतो कीं काय या शोधांत ते होते! अर्थात् डॉ. आत्माराम पांडुरंग यांना साहजिकच या नव्या नांवाखालीं चाललेल्या संस्थेचे नेतृत्व स्वीकारावें लागलें. ' मराठा दुर्गाराम मंछाराम ' — भिकोबा दादा — यांनींच पहिली उपासना केली. इंग्रजी भाषेचा गंधही नसून नवविचारग्रहणक्षम व निस्सीम तळमळीच्या त्यांच्या वृत्तीचें कौतुक वाटतें. मोरोबा विनोबा हेही जुन्या परमहंससभेचे सभासद प्रार्थनासमाजाच्या आद्य उत्पादकांपकीं होते. अशा जुन्या लोकांशिवाय या पांचसात वर्षांत तयार झालेली बाळ मंगेश वागळे यांच्यासारखी मंडळीही प्रार्थनासमाजाला मिळाली. या नव्या चळवळीला किंवा पुनर्घटनेला स्फूर्ति बंगाली होती. कारण एकदोन वर्षांपूर्वीं केशव चंद्रसेन मुंबईकरांना उत्साहाचे डोस पाजून गेले होते. समाजस्थापनेच्या दिवशींही आनंदाश्रम नांवांचा एक बंगाली साधु सभेच्या कार्यास आशिर्वाद देण्यास हजर होता.

★

८

# दादोबा व बंगालांतील पुरोगामी मंडळी

१८४४ सालीं ज्या वेळीं सुरतेला मानवधर्मसभा स्थापन झाली किंवा १८५० च्या सुमारास ज्यावेळीं परमहंसमंडळी मुंबईत अस्तित्वांत आली, त्यावेळीं पंधरावीस वर्षे आधीं स्थापन झालेला राममोहनराय यांचा ब्रह्मसमाज, दादोबा किंवा दुर्गाराम मंछाराम यांच्या नजरेसमोर होता कीं काय हा विचार करण्यासारखा प्रश्न आहे. इंदुप्रकाशांतील 'राजकीय ऋषी 'नें दादोबांची तुलना कृष्णमोहन बानर्जी यांच्याशीं केलेली आहे, ती भ्रममूलक आहे. ती कशी हें दाखविण्याकरितां आपणास बंगाल्यांतील धार्मिक आंदोलनाकडेही दृष्टिक्षेप करावा लागेल. पण त्या पूर्वी 'राजकीय ऋषि' या संबंधी काय लिहितात तें त्यांच्याच शब्दांत पाहा:—

"Social reform in Bombay commenced fifteen years later than in Calcutta under almost similar circumstances and shared in the end nearly the same fate. The two movements were not of course alike in all points. For instance, the practical Mahratta was less impulsive than the imaginative Babu and unlike the latter worked secretly to put down the caste, nor did he go in, like the latter, for steaks of beef to herald the change that he wished to bring in. Yet in the case of both, the principle of-action was the same—viz. the demolition of caste distinctions. As in Bengal they had Mr. K. M. Banerjee for their leader so in Bombay the movement was led by Mr. Dadoba Pandurang—two men who might be said to have been cast almost in the same mould. Both were Sanskrit scholars of repute in their days, and were widely acquainted with Christian teachings and philosophy. The spiritual element was active in both, with this difference, though, that while Mr. Bannerjee bacame a convert to Christianity Mr. Dadoba passed through life with strong Christian leanings at times, often wavering and doubting, as his mind had a speculative turn, which the more he thought and felt on religious questions, loved the more to roam, rather than rest in quest of religious truth. But it was in the capacity to

lead that they resembled each other most and the strong point of the one—his ardour, his burning sense of indignation against every form of social wrong and his infusive spirit—enabled him in Bombay as it had enabled the other in Calcutta to become the centre of a group of ready followers." [१]

कलकत्यामध्यें १८३१ च्या सुमारास मुख्य चार मतप्रवाह होते:—१ ब्राह्मसमाज, २ धर्मसभा, ३ ख्रिस्ती मिशनरी, आणि ४ हिंदुकॉलेजांतील तरुणमंडळ. १ ब्राह्मसमाज—राजा राममोहनरॉय ( १७७२-१८३३ ) यांनीं Tuhafat-ul-Muwahhidin ( एकेश्वरी लोकांना देणगी ) हें फारसी भाषेंत एक पुस्तक लिहून प्रथम मूर्तिपूजेविरुद्ध रणशिंग फुंकलें होतें. या ग्रंथामुळें लोक इतके चिडले कीं, आपल्या जिवाच्या जास्त सुरक्षितपणाकरितां त्यांना कलकत्ता शहराचा १८१४ सालीं आश्रय करावा लागला ! १८१५ सालीं त्यांनीं 'आत्मीयसभा' स्थापिली व तिचें धर्मचर्चेचें काम १८१९ पर्यंत चाललें. या कालांत उपनिषदांचीं भाषांतरें प्रसिद्ध करून वेद व उपनिषदें यांमध्यें एकेश्वरी मतच कसें प्रतिपादित आहे, तें त्यांनीं दाखवून दिलें. दरम्यान ख्रिस्ती त्रिनिटेरियन मिशनऱ्यांशीं त्यांचा वाद जुंपून त्यांपैकीं मि. ॲडम यानें १८२१ सालीं राममोहनचें युनिटेरियन मत कबटाळलें. त्याच्यासमवेत राजा राममोहननीं युनिटेरियन सभा स्थापिली. त्यामुळें पुष्कळ लोकांची राममोहन ख्रिस्ती बनले अशी कल्पना झाली ! पुढें या ख्रिस्ती युनिटेरियन सभेंत जाण्याऐवजीं निराळी हिंदु युनिटेरियन सभा असावी अशी कल्पना निघून ता. २० आगष्ट १८२८ रोजीं तींतूनच सध्यांची ब्राह्मसभा अवतीर्ण झाली. ख्रिस्तीसभेचा उपासनाग्रंथ बायबल असे, तर ब्राह्मसभेचा वेद व उपनिषदें हे प्रमाणग्रंथ झाले. ख्रिस्ती मिशनऱ्यांचाही आपल्या देशबांधवांच्या सुधारणेकडे उपयोग कसा करून घ्यावा, याकडे राममोहनचें लक्ष असे. ब्राह्मसभेच्या स्थापनेसंबंधी डॉ. टकरमन यांना ता. २२ जाने० १८२९ रोजीं मि. ॲडम यानें जें पत्र लिहिलें आहे, त्यांत तो लिहितो.

"Rammohan Roy, I am persuaded, supports this institution, not because he believes in the divine authority of the Ved, but solely as an instrument for overthrowing idolatry. To be candid however, I must add the conviction has lately gained

१ इंदुप्रकाश, २५ मे १८८५.

ground in my mind that he employs Unitarian Christianity in the same way, as an instrument for spreading pure and just notions of God without believing in the divine authority of the Gospel."[1]

दादोबांवर ख्रिस्ती असल्याचा आरोप करतात तो अशाच मासल्याचा आहे. राममोहन रायांची खरी विचारपद्धति ज्यांना समजून घ्यावयाची असेल त्यांनीं त्यांचा इंग्रजी लिखाणाचा संग्रह[२] व तो उपलब्ध नसल्यास मिस् कोलेट हिनें लिहिलेलें त्यांचें चरित्र तरी जरूर वाचावें.

**२ हिंदु धर्मसभा**–सतीच्या चालीविरुद्ध राममोहननीं जी चळवळ चालविली होती तिला तोंड देण्याकरितां आणि याच प्रकारें हिंदूंच्या इतर चालीरीती व धर्म यांविरुद्ध होणाऱ्या आघातांना विरोध करण्याकरितां सनातनी हिंदूंनीं १८३० सालीं ही संस्था स्थापिली.[३] हिच्यासंबंधीं जास्त लिहिण्याचें कारण नाहीं.

**३ मिशनरी**–बंगालमध्यें कॅरे, मार्शमन वगैरे मिशनरी येऊन श्रीरामपूर येथें त्यांनीं आपलें कार्य सुरू केलें होतें. परंतु खऱ्या मिशनरी कार्यास डॉ. आलेक्झांडर डफ हा स्कॉटिश मिशनरी कलकत्त्याला १८३० सालीं येऊन स्थायिक झाल्यापासून सुरुवात झाली. डॉ. विल्सन यानें जें कार्य मुंबईमध्यें केलें तेंच कार्य डॉ. डफ यानें बंगालमध्यें केलें. डॉ. डफ याचाही उत्साह आपल्या लोकांच्या सुधारणेच्या कामीं लावण्याच्या हेतूनें त्याला शाळा उघडण्याकरितां

---

१ Life of Rammohan Roy, (Miss S. D. Collett) p. 90.

२ The English Works of Raja Rammohan Roy, (The Panini Office,) 1906.

३ मुंबईमध्येंही १८५१ मध्यें एक हिंदु धर्मसभा स्थापन झाली होती. तिच्याविषयीं ज्ञानोदयकर्ते लिहितात, "हल्लीं कित्येक हिंदूंस वाटलें आहे कीं स्वधर्मस्थापक सभा अवश्य करावी, आणि त्याप्रमाणें वासुदेव नारायण परभु यांनीं पुढारीपणा घेऊन गेल्या महिन्याच्या (नवंबर) १६ वे तारखेस आपल्या घरीं सभा केली.......हिंदुधर्मसभेच्या स्थापनेविषयीं आह्मांस एक आश्चर्य वाटतें तें हें कीं, इचा पुढारी परभु आहे. पूर्वीं धर्मस्थापक व धर्मरक्षक ब्राह्मण असत, आणि हल्लीं असा विपरीतपणा दिसतो. (ज्ञानोदय, १ डिसें० १८५१, पृ. ३६१.) पुणें येथें वैशाख वद्य ११ शके १७७२ (१८५०) मध्यें नेमस्तपणें हिंदुसमाजामध्यें सुधारणा घडवून आणण्याकरितां कल्याणोन्नायक मंडळी नांवाची संस्था स्थापन झाली होती.—ज्ञानोदय, १५ जून १८५०, पृ. २१८.

राममोहननें ब्राह्मसभेचा दिवाणखाना दिला.[१] ही शाळा ता. १३ जुलै १८३० रोजीं उघडली. त्यावेळीं राममोहन राय जातीनें हजर होते. एका बंगाली विद्यार्थ्यानें, "ख्रिस्ती लोकांचें बायबल आम्हीं कसें वाचावें ? तेणेंकरून आम्हीं ख्रिस्ती बनूं," अशी कुरकूर केली. त्यावेळीं राममोहन म्हणाले, "Christians, like Dr. H. H. Wilson have studied the Hindoo Shasters, and you know that he has not become a Hindoo. I myself have read all the Koran again and again, and has that made me a Mussulman? Nay, I have studied the whole Bible and you know I am not a Christian. Why, then, do you fear to read? Read and judge yourself."[२]

**४ हिंदु कॉलेजांतील तरुणमंडळ**—यांचा पुढारी कृष्णमोहन बानर्जी हा होता. याच्याशींच दादोबांची तुलना 'राजकीय ऋषीनें' केली आहे. जातीनें हा कुलीन ब्राह्मण; परंतु हिंदु कॉलेजांतील मि. हेन्री डिरोझियो (१८०९-१८३०) नांवाच्या एका युरेजियन प्रोफेसराच्या नादीं लागल्यामुळें आपल्या जुन्या आचार-विचारांना साफ मुकला होता. याच्यासंबंधीं डिरोझियोचा चरित्रकार लिहितो, "He was the leader of the advanced liberal party amongst the Hindoo youths of Calcutta and he though a Kulin Brahmin, sat down at Derozio's table with advanced thinkers of his countrymen and in defiance of all caste rules partook freely of beef, [illegible] and other European luxuries. The Brahmanical thread was thrown aside and Pope and Dryden were held in more esteem than the sacred books of Hindoos."[३]

डिरोझियो हा De Rosario या पोर्तुगीज नांवाचा अपभ्रंश. पोर्तुगीज बाप व हिंदी आई यांपासून झालेल्या मिश्र कुलांतील तो होता. इंग्रजी भाषेवर त्याचें चांगलें प्रभुत्व असे. The Fukir of Jungheera वगैरे कांहीं इंग्रजी कविता त्यानें लिहिल्यामुळें त्याचें नांव सर्वतोमुखीं झालें व १८२८ मध्यें त्याला हिंदु कॉलेजमध्यें इंग्रजी वाङ्मय व इतिहास या विषयांचा प्रोफेसर नेमण्यांत आलें.

---

१ जास्त माहितीकरतां Dr. George Smith यानें लिहिलेलें Alexander Duff चें चरित्र (१८७९) पाचा.

२ Life of Dr. A. Duff, Vol. I, p. 122.

३ Henry Derozio : (Thomas Edwards) 1884, p. 121.

डिरोझियो हा फार उत्साही असल्यामुळें वर्गाबाहेरच्या वेळांतही तो विद्यार्थ्यांना शिकवीत असे. विद्यार्थ्यांमध्यें भाषाज्ञान, वक्तृत्व व विचारशक्ति वाढावी म्हणून स्वतः डिरोझियो अध्यक्ष व अमरचंद बोस सेक्रेटरी असें एक चर्चामंडळही स्थापण्यांत आलें. येथें रात्रींच्या वेळीं धर्म, तत्त्वज्ञान, मूर्तिपूजा वगैरे विषयांवर व्याख्यानें, निबंधवाचन होऊन त्यावर चर्चा होई. याचा परिणाम असा झाला कीं, विचार-स्वातंत्र्याच्या नांवाखालीं तरुणांमध्यें स्वाभिमानशून्यता, नास्तिकपणा व अनैतिक स्वैर वृत्ति बोकाळली ! " The principles and practices of the Hindu religion were openly ridiculed and condemned and angry disputes were held on usual subjects. The Hindu religion was denounced as vile and corrupt and unworthy of the regard of rational beings. The degraded state of the Hindu formed the topic of many debates," असें या सभांचें वर्णन मि. थोमस एडवर्ड यानें केलें आहे.[१] या हिंदुकॉलेजांतील तरुण विद्यार्थ्यांसंबंधीं डॉ. विल्सन लिहितो—

"We may look at the Hindu College of Calcutta, where nearly every youth brought up at that purely intellectual seminary, renounces religion of his fathers but embraces no other and is sent forth to the world like a ship without a rudder."[२]

ही गोष्ट हिंदुकॉलेजच्या चालकांच्या नजरेस आल्याखेरीज राहिली नाहीं. त्यांनीं कॉलेजचे हेडमास्तर Mr. D. Anselm यांच्या मार्फत या प्रकाराला आळा घालण्याचा प्रयत्न केला, पण त्याचा उपयोग न झाल्यामुळें डिरोझियो कामावरून दूर करण्याचें ठरलें. या कामांत ब्रह्मसमाजाचे पुढारी केशवचंद्र सेन यांचे आजोबा रामकमल सेन यांनींच पुढाकार घेतला होता, ही गोष्ट लक्षांत ठेवण्यासारखी आहे. डिरोझियोवर तीन आरोप ठेवण्यांत आले, ते खासगी रीतीनें प्रो. विल्सन यानें त्याला खरे आहेत कीं काय म्हणून विचारलें. ते हे :—(१)" Do you believe in God? (२) Do you think respect and obedience to parents no part of moral duty? आणि (३) Do you think intermarriage of brothers and sisters innocent and allowable?" अशा प्रकारच्या मताचें विद्यार्थ्यांसमोर तुम्हीं समर्थन करतां काय, असाही प्रो.

---

१ **Henry Derozio : p. 64.**

२ **O. C. S.** 1836, p. 30.

विल्सननें त्याला प्रश्न केला; पण हे आरोप साफ खोटे असल्याबद्दल डिरोझियोनें सांगितलें, असें त्याचा चरित्रकार म्हणतो. परंतु यांपैकीं पहिला आरोप त्यानें कबूल केला, पण विद्यार्थ्यांना "प्रश्नाच्या दोनही बाजू पाहण्यास मिळाव्यात म्हणून आपण ईश्वराच्या अस्तित्वाविरुद्ध बोललों," असें त्यानें सांगितल्याचें मि. स्मिथ लिहितो.[1] कसेंही असो. डिरोझियोमुळें हिंदु कॉलेजांतील तरुण पिढीमध्यें अनीश्वरवाद व वडील लोकांना धाब्यावर बसविण्याची उच्छृंखलवृत्ति बळावत होती ह्यांत शंका नाहीं. तिसऱ्या आरोपासंबंधी स्वतः डिरोझियोच्या वर्तनाबद्दल लोकांत कुजबूज होती कीं काय समजत नाहीं. डिरोझियोला Amelia नांवाची एक बहीण होती. त्याचा चरित्रकार एडवर्ड लिहितो, ("Henry had a sister Amelia between whom and Henry there was that warm enduring love which sometimes bind together, in a more than usual degree, a brother and a sister." मि. स्मिथनें The atheistic and immoral poet असें त्याचें वर्णन केलेलें आहे![2] आपणांस बडतर्फ करतात हें कळल्याबरोबर डिरोझियोनें स्वतःच राजीनामा देऊन तो मोकळा झाला!

हिंदु कॉलेजांतील तरुणांमध्यें चाललेल्या या क्रांतीला उद्देशून रे. डफ लिहितो,—"We rejoiced in June, 1830, when in the metropolis of British India, we fairly came in contact with a rising body of natives, who had learnt to think and to discuss all subjects with unshackled freedom, though that freedom was ever apt to degenerate into licence in attempting to demolish the claims and pretentions of the Christian as well as every other professedly revealed faith. We hailed the circumstance as indicating the approach of a period for which we had waited and longed and prayed."[3]

कृष्णमोहन बानर्जी यानीं आपल्या नवमतवादी किंवा पुरोगामी मतप्रचाराकरितां Enquirer नांवाचें पत्र जन्मास घातलें होतें. कलकत्त्यांतील या निरंकुश तरुणांचें तें मुखपत्र होतें. या पत्राच्या ऑफिसांत या लोकांच्या सभा भरत. ता. ११ ऑगस्ट

1 Life of Dr. Duff, Vol. I, p. 144.
2 *Ibid*, p. 144.
3 *Ibid*, p. 145.

१८३१ रोजीं अशीच ही तरुण मंडळी जमली असतां त्यांनीं भाजलेलें गोमांस आणलें [1] आणि त्याच्यावर ताव मारून राहिलेलें मांस जवळच राहत असलेल्या स्नानसंध्याशील व सोवळा म्हणून प्रसिद्ध असलेल्या एका सदाचारसंपन्न ब्राह्मणाच्या घराच्या अंगणांत फेकून, "हें पहा गोमांस! हें पहा गोमांस!" म्हणून मोठ्यानें ओरड केली! अशा प्रकारचा हा भ्रष्टाकार व अत्याचार पाहून तो सनातनी ब्राह्मण भडकला व आपल्या नोकरांसह त्या पत्राच्या ऑफिसांत शिरून संपादकांना व त्याच्या मित्रांना त्यानें चोप दिला. या मंडळीला आपला गुन्हा कबूल केल्याशिवाय गत्यंतरच नव्हतें. त्यांनीं त्याची माफी मागितली व असा प्रकार पुनः कधींही होणार नाहीं असेंही सांगितलें. परंतु इतक्यावर हें प्रकरण मिटलें नाहीं. आजूबाजूचे शेंकडो ब्राह्मण गोळा झाले व त्यांनीं कृष्णमोहनच्या घरीं जाऊन त्याच्या वडिलांना सगळी हकीकत कळवली व या कुलांगाराला घरांतून हांकलून द्या, नाहींतर तुम्हांला जातिबहिष्कृत करूं, असें निक्षून सांगितलें. आपलें वर्तन सुधारून हिंदुधर्मावर निष्ठा ठेव नाहींतर घरांतून चालता हो, असें कृष्णमोहनला सांगण्याशिवाय त्याच्या घरच्या मंडळीला आतां गत्यंतरच राहिलें नाहीं! कृष्णमोहननें दुसरा मार्गच पत्करला. यावेळच्या आपल्या अनुकंपनीय मनःस्थितीसंबंधी तो लिहितो, "We left the home where we passed our infant days; we left our mother that nourished us in our childhood; we left our brothers with whom we associated in our earliest days; we left our sisters with whom we sympathised since they were born." लोकसमाज इतका खवळून गेला होता कीं, कृष्णमोहन व त्याचे साथी तिकडून परत जातांना मोठ्या मुष्किलीनेंच त्यांच्या तडाक्यांतून ते निसटले. कृष्णमोहनला त्याचा एक जिवलग दोस्त दक्षिणारंजन मुकर्जी यानें आपल्या घरीं आश्रय दिला; पण कांहीं दिवसांनंतर त्याच्या वडिलानें कृष्णमोहनला घरांतून हांकलून लावलें! आणखी कोणीच त्याला घरांत घेण्यास धजेना. शेवटीं एका युरोपियन वसतिगृहामध्यें त्यानें मुक्काम ठोकला. कृष्णमोहन ह्याची नास्तिक मताकडे प्रवृत्ति

१ बंगालांतील या उच्छृंखल तरुणांप्रमाणेंच मुंबईमध्येंही गोमांसभक्षक तरुणांचा वर्ग होता. बाबा पद्मनजी लिहितात, "मी ख्रिस्ती झाल्यावर ह्याच डा० उइल्सन साहेबांच्या बंगल्यांत दुसऱ्या दोन तीन ख्रिस्ती भावांसह वर्तमान राहत असतां पुष्कळ तरुण हिंदु आमच्या घरीं येऊन आम्हांला "बीफ" कसें लागतें तें खाऊन पाहूं द्या असें म्हणत, आणि कांहीं खाणें झालें तर दारें बंद करून खात."— अरुणोदय, पृ. १७५.

होती. "I was perfectly regardless of God,"[१] अशी त्यानेंच कबुली दिली आहे. बापाकडे याचें कांहीं आतां जुळत नाहीं, हें पाहिल्याबरोबर डॉ. डफ यानें त्याच्या भोवतीं आपलें जाळें टाकलें, व आपल्या घरीं बोलावून प्रेमानें त्याला जवळ केलें. कृष्णमोहन लिहितो, "I considered upon my lonely conditioh—cut off from men to whom I was bound by natural ties, and thought that nothing but a determination on the subject of religion could give me peace and comfort. And I was so struck with Mr. Duff's words, that we instantly resolved to hold weekly meetings at his house for religious instructions and discussion."[२]

कृष्णमोहनचा समानशील असा हिंदुकॉलेजमधील दुसरा एक विद्यार्थी महेशचंद्र घोष अशाच परिस्थितींत होता. आपल्या बंधूबरोबर मि. डफ याला पाठविलेलें त्याचें पत्र उपलब्ध आहे. त्यांत तो लिहितो—"Convince him, and make him a Christian, and I will give no secret opposition. Scepticism has made me too miserable to wish my dear brother the same. A doubtfulness of the existence of another world and of the benevolence of God, made me too unhappy and spread a gloom all over my mind."[3]

याचा भाऊ ख्रिस्ती झाला कीं माहीत नाहीं, परंतु स्वतः महेशचंद्रानें बाप्तिस्मा घेतल्याचें वर्तमान ता. २८ आगष्ट १८३२ च्या Enquirer च्या अंकांत जाहीर झालें! याच्या मागोमाग ता. १७ अक्टोबर १८३२ रोजीं कृष्णमोहननें संस्कारपूर्वक ख्रिस्ताला कवटाळलें. ता. १४ डिसेंबरला गोपीनाथ नंदी हा चौथा आध्यात्मिक पुत्र मि. डफला लाभला. ता. २१ एप्रिल १८३३ रोजीं आनंदचंद्र मुजुमदार यानें ख्रिस्ती धर्मात प्रवेश केला! मि. डफचा पहिला पुत्र मि. घोष पुढें एका वर्षानंतर म्हणतो, "A twelve month ago I was an atheist, a materialist, a physical necessitarian and what I am now? A baptised Christian!"[४]

या निरनिराळ्या तरुणांच्या कबुल्या वाचल्या म्हणजे हे परमहंस वृत्तीचे स्वातंत्र्यवादी लोक नसून आपल्या उच्छृंखळ वृत्तीनें अगतिक होऊन त्यांनीं

---

1 Life of Dr. Duff, Vol. I, p. 155.
2 *Ibid*, p. 156.
3 *Ibid*, p. 158.
4 *Ibid*, p. 159.

आगरकरांच्या शब्दांत सांगावयाचें म्हणजे केवळ शृंखलान्तर केलेलें उघड दिसतें. यांच्यापैकीं दक्षिणारंजन मुकर्जी, ज्यानें प्रथम कृष्णमोहनला आपल्या घरांत आश्रय दिला होता, तो तर अगदींच माणसांतून उठलेला होता ! डिरोझियोच्या बहिणीभोवतीं घिरट्या घालीत असलेला पाहून त्याच्या नातलगांनीं त्याला गुंगीचें औषध देऊन ठकबाजीनें काशीस नेऊन ठेविलें; परंतु त्याच्यामध्यें सुधारणा झाली नाहीं. कलकत्त्यामध्यें परत आल्यावर तो अगदींच बाहेरख्याली बनला. पुढें त्यानें नोकरी धरली व बरद्वानच्या विधवा राणीशीं त्याची गांठ पडली. टोपल्यांत बसून तो गुप्तपणें तिची भेट घेत असे. शेवटीं अशा चोरट्या प्रकाराला कंटाळून देवदर्शनाला राणी गेली असतां तिला पळविण्याचा त्यानें प्रयत्न केला !. त्याला पकडून राजसेवकांनीं मार दिला; पण पुढें त्या राणीनें त्याच्याशीं उघड पुनर्विवाह लावला !

अशा प्रकारच्या या कंपूशीं व त्यांचा पुढारी जो कृष्णमोहन बानर्जी त्याच्याशीं दादोबा पांडुरंग व परमहंससभा यांची तुलना करणें म्हणजे दादोबांची व परमहंससभेची शुद्ध बदनामी होय.

परमहंससभेसंबंधीं 'राजकीय ऋषीनें' दिलेली माहितीही अतिरंजित व अविश्वसनीय आहे. लेखकानें लहानपणीं ज्या लोकांकडून गप्पा ऐकल्या त्यांच्यावर त्यांनीं फाजील भिस्त ठेवलेली दिसते.

प्रार्थनासमाजाच्या १९०९ सालच्या वार्षिकोत्सवांत सर नारायण चंदावरकर यांनीं जें भाषण केलें तें Darkness or Dawn या मथळ्याखालीं प्रसिद्ध आहे.[१] त्याच्यामध्यें देखील सरसाहेबांनीं परमहंससभेसंबंधी वरील माहितीचा पुनरुच्चार केलेला आहे.

परमहंससभेसंबंधी जरी जुन्या लोकांनीं खोट्या कंड्या पिकविल्या होत्या तरीपण तिचें वास्तविक स्वरूप काय होतें, हें आपणास 'दुर्गारामचरित,' 'धर्मविवेचन' व 'पारमहंसिक ब्राह्मधर्म' नांवाचें जें दादोकृत अभंगांचें पुस्तक उपलब्ध आहे त्यावरून स्पष्ट कळून येतें. परमहंससभेच्या सुरुवातीला व शेवटीं दादोबांनीं रचिलेल्या प्रार्थना म्हटल्या जात, असें जें पुष्कळांनीं लिहून ठेवलें आहे, त्यावरून या लोकांची ईश्वरावरील निष्ठाही स्पष्ट होते. परधर्मांतील चांगल्या गोष्टी ग्रहण

1 The speeches and writings of Sir N. G. Chandawarkar, 1911, p. 401.

करण्यास व स्वधर्मातील वाईट गोष्टींचा त्याग करण्यास जरी हे लोक उत्सुक असत, तरीपण परमहंससभेची बैठक आर्यधर्मावरच होती. दादोबा धर्मविवेचनांत लिहितात, "हें जें मी सर्व निःशंकपणें बोललों, त्यांत सर्वांनीं खचीत समजावें किं माझ्या पदरचा एक शब्द देखील नाहीं; वेद, शास्त्र, पुराणें यांचें विवेचन करून पाहिलें असतां हाच त्यांचा मुख्य सिद्धांत होय, असें सर्वांच्या प्रतीतीस येईल." [१] परमहंससभेचे व पुढें प्रार्थनासमाजाचे एक उत्साही कार्यकर्ते भिकोबादादा चव्हाण यांचा वेदांती म्हणून स्पष्ट निर्देश 'ज्ञानोदय'मधील ता. १८ फेब्रु० १८५६ च्या एका निनांवीं पत्रांत करण्यांत आलेला आहे.—"या मुंबईत सुधारलेल्या वेदांतमताभिमान्यांपैकीं दोन पुरुषांची मोठी प्रख्याती आहे. हे दोघे मुंबईशहराच्या दोन टोकांस राहतात. एकाचें वास्तव्य धोबीतळ्याजवळ व दुसऱ्याचें गिरगांवांत. यांचीं नांवें–रा० भिकोबा लक्ष्मणजी, व रा० हरि केशवजी. आतां यांपैकीं दुसरे गृहस्थ ज्ञानेश्वरीवर फार भक्ति ठेवितात. पहिले गृहस्थ कोणते विशेष ग्रंथावर भाव ठेवितात तें मला पूर्तें माहीत नाहीं तरी तेही कडकडीत वेदांतविचारी आहेत." [२] नीतीवर परमहंसमंडळीचा किती भर होता, हें धर्मविवेचनांतील शेवटच्या उद्गारांवरून कळून येतें. दादोबा म्हणतात,

"नीतिविना ज्ञान केवळ शुष्क. नीति हें ज्ञानांचें मूल्य होय. तद्व्यतिरिक्त जें ज्ञान तो केवळ वरील झळकाट व आडंबर मात्र. आतां नीति हा सर्वव्यापक शब्द होय, परंतु त्यांतील रहस्य म्हणून इतकेंच कीं–अनृत, लोभ म्हणजे परद्रव्याभिलाष, मत्सर, वैर, कौटिल्य, वंचना, आलस्य, गर्व, क्रूरता इत्याद्यनेक दुर्गुणांपासून अलिप्त राहून, सत्य, निर्लोभ, परदुःखवेदना, परसुखानंद, जगमैत्री, सरळता, परोपकार, उद्यम, विनय, भूतदया इत्याद्यनेक सद्गुण आपल्या अंगीं बागविण्याचा अभ्यास करावा. शेवटीं सर्व नीतीचें सार म्हणून इतकेंच समजावें कीं पापास भिऊन कोणा एकास दुःख न देतां आपल्या हातून होईल तितका परोपकार करीत असावा आणि सर्व नीतींचें तात्पर्य व सुखाचें मूळ जो परमेश्वर, त्यास न विसरतां पवित्र व सप्रेम अंतःकरणानें त्यास शरण असावें व त्याचा गौरव करीत असावा." [३] जातिभेद मोडल्याचें निदर्शक म्हणून परमहंससभेच्या सभासदास ख्रिश्चनचा पाव खावा लागे,

१ धर्मविवेचन, पृ. ४७.
२ ज्ञानोदय, ता. १ मार्च, १८५६.
३ धर्मविवेचन, पृ. १११.

परंतु आहारासंबंधी सभेचें धोरण कोणतें हें 'पारमहंसिक ब्राह्मधर्म' या पुस्तकांतील 'भक्ष्याभक्ष्य' या अकराव्या अभंगावरून कळून येतें. पहाः—

भक्षपानीं ठेवूं। शुद्ध तो विचार। त्यांत अनाचार। साहूं ना तो ॥ १ ॥ नसे रुचिकर तोंडीं लावण्यास। भक्षूं समयास। मासे तेव्हां ॥ २ ॥ मृगछागमांस। आमुची मर्यादा। उलंघूं न कदा। तिला आह्मीं ॥ ३ ॥ (परंतु शाकाहारी लोकांना याची सक्ति नव्हती) परी तो न आणूं। इतरां कंटाळा। मांस खाणें मोळा। नसे ज्यांचा ॥ ४ ॥ रोग्यां पथ्य जेवीं। तेवीं मांस मद्य। आह्मां सांगे वैद्य। तेंचि सेवूं ॥ ५ ॥ भक्षूं मांस परी। नच सेवूं मद्या। प्राण वांचे सद्यां तरीच तें ॥ ६ ॥ भक्षूं हे पदार्थ औषधाचे परी। आरोग्य शरीरीं होई जो तों ॥ धान्य शाख दूध। दहीं तूप लोणी। आमुच्या भक्षणीं। नित्य हेंचि ॥ ७ ॥[1]

यावरून कलकत्त्यांतील Enquirer पक्षाची चळवळ व मुंबईतील परमहंससभेची चळवळ यांच्यामध्यें दक्षिणोत्तर ध्रुवांइतकें कसें अन्तर होतें, हें कळून येईल. दादोबांची जर कोणाशीं तुलना करतां येईल तर ती राममोहन राय यांच्याशींच होय. राममोहन राय प्रमाणेंच त्यांचा इंग्रजी, संस्कृत व फारशी या भाषांचा अभ्यास होता. दोघांनींही आपआपल्या भाषांचीं व्याकरणें लिहिलीं, दोघांनींही हिंदु, ख्रिस्ती व मुसलमान या धर्मांचा तुलनात्मक अभ्यास केला व दोघांवरही त्यांच्या उदार मतांमुळें ख्रिस्ती असल्याचा आरोप होता. राममोहनप्रमाणें दादोबा यशस्वी झाले नाहींत याचें कारण त्यांची गरिबी होय. राममोहनची वडिलोपार्जित इस्टेट होतीच, शिवाय दहा वर्षें त्यांनीं जी सरकारी नोकरी केली त्या अवधींत त्यांनीं इतकी जमीन घेऊन ठेवली कीं, दर वर्षी त्याला दहा हजाराचें उत्पन्न येई. त्यामुळें राममोहनमध्यें एका प्रकारची तडफ व बेफिकीर झुंजार वृत्ति दिसून येते. मिशनरीही त्यांचे आश्रित असत. परंतु दादोबा गरिबींत जन्मले आणि गरिबींतच वारले. त्यामुळें आर्जवांत व सगळ्यांशीं नमून वागण्यांत त्यांचा जन्म गेला. असें असलें तरी एकोणिसाव्या शतकाच्या पूर्वार्धांत त्यांनीं ज्याप्रमाणें मराठी व्याकरणाच्या द्वारें मराठीभाषेला नवें व इष्ट वळण लावलें तसेंच परमहंससभा स्थापून नव्या महाराष्ट्राच्या धार्मिक प्रवृत्तीला नवी दिशा दिली यांत शंका नाहीं. १८४४ सालीं त्यांनीं व दुर्गाराम मंछाराम यांनीं मिळून मानवधर्मसभा स्थापिली. १८५० च्या सुमारास निघालेली परमहंससभा ही तिची दुसरी आवृत्ति होय आणि विद्यमान प्रार्थनासमाज

१ पारमहंसिक ब्राह्मधर्म, (शके १८२०) पृ. ७.

ही त्याच संस्थेची सुधारून वाढविलेली तिसरी 'एडिशन' म्हणावयास हरकत नाहीं. मानवधर्मसभा किंवा परमहंसमंडळी या दोनही संस्था बुद्धिप्रधान असून त्यांमध्यें भावनेला विशेष अवसर नव्हता. याचा परिणाम असा झाला कीं, भावनाप्रधान सभासदांच्या मनाची तेथें उपासमार होऊं लागली. त्यामुळें बावा पदमनजी सारखे भावनेची भूक भागविण्याकरितां ख्रिस्ती धर्मांत गेले व मदन श्रीकृष्ण देवमामलेदाराचे शिष्य झाले![1] कोणताही धर्म ईश्वरदत्त नाहीं व कोणतेंही शास्त्र ईश्वरप्रणीत नाहीं असें दादोस्मृति जें 'धर्मविवेचन' त्यांत सांगितलेलें वाचून परहंसमंडळी-विषयींची पूज्यबुद्धि आपल्या मनांतून नष्ट झाली, असें बावा पदमनजींनीं स्वतः कबूल केलें आहे. भातभाकर खाऊन कोठा बिघडतो म्हणून एकायाला एकादशीचा उपवास करावयास सांगावा व त्यानें एकादशीचें व्रत पत्करून जिव्हाळल्यामुळें शेंगदाणे व रताळीं यांच्यावर फाजील ताव मारून अजीर्ण करून घ्यावें, अशासारखाच बावा पदमनजी वगैरेंचा प्रकार होता. रानडे, भांडारकर यांचीं भाषणें लक्षपूर्वक वाचून पाहिल्यास मानवधर्मसभेच्या या तिसऱ्या आवृत्तीमध्यें त्यांनीं काय सुधारणा केल्या तें कळून येईल. मनुष्यप्राण्याचा आध्यात्मिक कोठा बिघडणार नाहीं, अशा प्रकारचा भावनेचा हलका आहार त्यांनीं त्यांत भरपूर वाढून ठेवला आहे. त्यांनीं या संस्थेला भागवतधर्माची जोड दिली आहे व इतर धर्मांतील चांगलें तें ग्रहण करण्याची पूर्ण मुभा ठेविली आहे. कलकत्त्याचा आदिब्राह्मसमाज व देवेंद्राची तत्त्वबोधिनीसभा यांच्यामध्यें जो फरक आहे तोच मानवधर्मसभा किंवा परमहंस-मंडळी व प्रार्थनासमाज यांच्यामध्यें आहे, असें म्हणावयास हरकत नाहीं.

★

1 श्री मद्यशवंतराव महाराज उर्फ देवमामलेदार यांचें चरित्र, (के. के. स. [illegible]) १८९५, पृ० ७० पहा.

९

# आर्थिक अनर्थ

मागें सांगितल्याप्रमाणें दादोबांनीं आपल्या सरकारी नोकरीची रुपेरी शृंखला ताडकन् तोडून ते स्वतंत्र झाले. आपल्या चरितार्थाकरितां लागणारे पेनशनच्या भरीला पैसे लेखणीच्या जोरावर आपण मिळवूं असा त्यांना आत्मविश्वास होता. पण पुढें तो मृगजलाप्रमाणें निष्फल ठरला. दादोबांचें व्याकरण (मोठें) त्यावेळीं शाळाखात्यांत चालू होतें; पण तें वरच्या वर्गांत. त्याकाळची विद्यार्थ्यांची संख्या जर लक्षांत घेतली तर व्याकरणापासून त्यांना मोठीशी प्राप्ति होती, असें वाटत नाहीं. शिवाय होती तीही जुनीच होती. पेनशन घेतल्यामुळें त्यांना जी सवड मिळाली तिचा फायदा घेऊन केलेली ही जादा कमाई म्हणतां येणार नाहीं. आतांसारखें शालेय पुस्तकांचें बंड त्याकाळीं माजलें नव्हतें. मेजर कडाचीं वाचनपुस्तकें शाळाखात्यांत ध्रुवपदच मिळवून बसलीं होतीं. त्यांना खो देऊन त्यांची जागा घेणें इतर ग्रंथकारांच्या पुस्तकांना शक्य नव्हतें. शिवाय खपेल तें लिहावें, या नव्या दंडकाला अनुसरून गोष्टीकादंबऱ्यांसारखें 'अनर्थवाङ्मय' (literature of despair) किंवा अज्ञ भोळ्याबापड्या लोकांच्या चित्ताची पकड घेण्यासारखीं धार्मिक पुस्तकें निर्माण करण्याचें लेखनपाटव किंवा मनाची तयारी दादोबांपाशीं नव्हती. आजही प्रामाणिकपणानें केवळ लेखनावरच आपली गुजराण करीन, असें म्हणण्याची परिस्थिति महाराष्ट्रांत प्राप्त झालेली नाहीं. मग जवळ जवळ शंभर वर्षांमागें ज्यावेळीं शिक्षणाचा प्रसार व वाचकवर्ग अगदींच बेताचा होता, त्यावेळीं ही गोष्ट कशी शक्य असणार? दादोबांची त्याकाळीं बऱ्या लोकांत गणना होती. त्या मानानें त्यांचा खर्चेही वाढला होता. पदरीं आठ मुलें व संसार वाढता, अशा स्थितींत मासिक साडेतीनशें रुपयांवरून एकदम ११६ रुपयांवर निर्वाह करणें त्यांना फार मुष्किलीचें झालें असलें पाहिजे. त्यांना कोणतातरी द्रव्यार्जनाचा नवा मार्ग शोधणें प्राप्त होतें.

ज्यावेळीं दादोबा सेवानिवृत्त झाले त्याच सुमारास अमेरिकेंतील संयुक्त संस्थानांमध्यें आपआपसांत यादवी सुरू झाली होती. या अंतस्थ युद्धामुळें तेथें होणारी कापसाची पैदास बंद पडली व तिकडून मँचेस्टर वगैरे भागांतील कापडांच्या गिरण्यांना होणारा कापसाचा पुरवठा पूर्वीप्रमाणें होईनासा झाला. त्यामुळें अर्थातच

हिंदुस्थानांतील कापसाला भारी मागणी आली, आणि हें अमेरिकन युद्ध चालू असेपर्यंत हिंदुस्थानांत कापसाचा भाव इतका वाढला कीं, लोकांनीं या महागवंगीचा फायदा घेण्याकरितां आपआपल्या नित्याच्या वापराच्या गाद्यागिरद्या फाडून त्यांतील कापूस विकून टाकला व गवत, सण किंवा नारळाचा काथा अशासारख्या पदार्थांचा गाद्यांच्या कमीं ते उपयोग करूं लागले! हुबळी, धारवाड, नागपूर, वऱ्हाड, गुजराथ या भागांतील कापूस मुंबईच्या मार्गानें इंग्लंडला पाठविला जात असे. या युद्धामुळें मुंबईंतील कापसाच्या निर्यातीमध्यें किती वाढ झाली याची कल्पना खालील युद्धपूर्व व युद्धकालीन आंकड्यांवरून होईल:—

**गट्ठ्यांची निर्यात**

| युद्धपूर्व | युरोपांत | अन्य देशांत |
|---|---|---|
| १८५९ | ४९० हजार | १५२ हजार |
| १८६० | ५६६ ,, | २०२ ,, |
| **युद्धकालीन** | | |
| १८६१ | ८३५ ,, | ६१ ,, |
| १८६२ | ९११ ,, | ८ ,, |
| १८६३ | ८६७ ,, | ८ ,, |
| १८६४ | १०६५ ,, | १ ,, |
| १८६५ | ११८७ ,, | १४ ,, |

कापूस म्हटला कीं झाला, मग तो कसलाही भिकार का असेना, वाटेल तो पैसा देऊन लोक खरेदी करूं लागले. सुरतेचा कापूस ज्याचा भाव १८६३ सालापूर्वी खंडीमागें १२० ते १८० रुपये असे तो पुढें ६००-७०० पर्यंत वाढला व १८६५ च्या आरंभीं तर तो १००० वर कधीं जाईल याची लोक उत्सुकतेनें मार्गप्रतिक्षा करूं लागले!

हिंदुस्थानांत सरकारी कागदी चलन १८६२ सालीं सुरू करण्यांत आलें होतें; परंतु खेड्यांपाड्यांतील लोकांचा नोटांवर अद्याप विश्वास नव्हता, किंवा नोटा वापरण्याची त्यांना संवय नव्हती असेंही म्हणतां येईल. शहरांतून जें रुपेरी नाणें कापूस खरेदी करण्याकरितां म्हणून खेड्यांत जाई तें परत फिरतच नसे! खेडूत लोक त्यांचें दागिन्यांत रूपांतर करीत किंवा जमिनींत पुरून ठेवीत. याचा परिणाम असा झाला कीं,

१८६४ सालीं कांहींकाळ रुप्याचा दुष्काळ भासूं लागला व अर्थव्यवहार अशक्य होऊन बसला. अमेरिकेंतून आणखी रुप्याचा पुरवठा होण्याची आशा खुंटली. हिंदुस्थानांत आलेलें रुपें जर असेंच जिरून जाऊं लागलें तर सर्वच राष्ट्रांच्या रुप्याच्या चलनव्यवहारांत बिघाड होईल, असें त्यावेळीं मुंबईतील व्यापारीवर्गानें व्हायसरायला पाठविलेल्या अर्जांत म्हटलें आहे. युद्धपूर्वकालीं दोनचार कोटींच्या सोन्याची हिंदुस्थानांत आयात होत असे; परंतु १८६४-६५ या सालीं तिचें प्रमाण दहा कोटींवर गेलें. १८६१ ते १८६५ या पांच वर्षांच्या युद्धकालांत एकतीस कोटींचें सोनें हिंदुस्थानांत आलें. संपत्तीचा जो हा महापूर हिंदुस्थानांत धो धो लोटत होता त्यामुळें मुंबईला विलक्षण महत्त्व आलें. शहरांतील लोकसंख्या विलक्षण वाढली. त्यांना राहण्याकरितां जुन्या पद्धतीचीं घरें मोडून चारपांच मजली नव्या इमारती उभारण्यांत आल्या. नवनव्या बँका व औद्योगिक कंपन्या निघाल्या. यांपैकीं बॅकबे रिक्लेमेशन कंपनी ह्या संस्थेनें तर लोकांना वेडच लावलें होतें, असें म्हणावयास हरकत नाहीं. या कंपनीच्या उगमाशीं कापूसच होता. गुजरार्थेतून जो कापूस मुंबईला येत असे त्याकरितां बी. बी. अँड सी. आय. कंपनीला बंदराच्या ठिकाणीं सोइस्कर असें टर्मिनसचें ठिकाण तयार करण्याकरितां जागा हवी होती. या काळीं ग्रँटरोड पर्यंतच या रेल्वेचा फांटा आला होता. इथपर्यंत कापूस दाब न देतांच (unpressed) आणला जात असे. पुढें पाण्यानें चालणाऱ्या यंत्रांनीं (Hydraulic presses) तो येथें दाबून युरोपांत पाठवावा लागे. नाहींतर बोटींत जास्त जागा त्याला लागली असती. अशा प्रकारचीं जीं कांहीं यंत्रें त्यावेळीं होतीं तीं सर्व कुलाब्याला होतीं. तेव्हां ग्रँटरोड, रेल्वेनें कुलाब्याला जोडण्यास व तेथें स्टेशन बांधण्यास जमीन कुठली आणावी हा प्रश्न आला. अर्थात् समुद्र मागें हटविल्याखेरीज गत्यंतर नव्हतें. या बाबतींत परशुरामानें उदाहरण घालून दिलेंच होतें. त्याचें अनुकरण करून रेल्वेकरितां व मुंबईतील वाढत्या लोकसंख्येच्या गरजेकरतां दीड हजार एकर जमीन सागरराजाकडून घेण्याचें ठरलें। त्याकरितां दोन हजार भागांत विभागलेली दोन कोटी रुपये भांडवलाची बॅकबे रेक्लेमेशन कंपनी उभारण्यांत आली. बॅकबे प्रमाणें माजगांव शिवडीकडीलही समुद्राचा भाग जमिनींत घेण्याची योजना निघाली. अशाप्रकारें बँका, रिक्लेमेशन व इतर लहानमोठ्या औद्योगिक कंपन्या या अर्थातच भागीदारांच्या शेअर्सच्या पैशांवर उभारल्या जात. एकादी बँक किंवा कंपनी निघण्याची खोटी कीं तिचे शेअर्स चुटकीसरसे उडून जात.

ते पुनः विकून लोक त्यावर हजारो रुपये कमावीत. अशा प्रकारें शेअर्स विकत घेणें व त्यांवर थोडाफार नफा ठेवून ते पुनः विकणें हा लोकांचा धंदाच होऊन राहिला! बॉंबे रिक्लेमेशन कंपनीचा शेअर ज्याची मूळ किंमत ५२०० रुपये होती तो बाजारामध्यें सहज पन्नास हजार रुपयांना विकला जाई. लोकांमध्यें शिरलेला हा शेअरांचा उन्माद (share mania) शेवटीं 'अव्यापारेषु व्यापार' ठरून त्यांचा घात केल्याशिवाय राहणार नाहीं, असा धोक्याचा इशारा देणाऱ्या लोकांची वाण नव्हती. १८६३–६४ सालच्या चेंबर ऑफ् कॉमर्सच्या रिपोर्टांमध्यें यासंबंधीं धोक्याची सूचना आढळते. मि. सोराबजी शापुरजी बंगाली यांनीं याबाबतींत आपल्या देशबांधवांचे डोळे उघडण्याचा प्रयत्न केला होता. कॉर्पोरेशनचे एक प्रसिद्ध सभासद डॉ. थोमस ब्लॅनी (Dr. Thomas Blaney) " Q " या टोपण नांवाखालीं बॉंबे गॅझेटमध्यें या सट्टेबाजीविरुद्ध लेख लिहीत, परंतु त्या पत्राचे स्वतः संपादक मि. जेम्स मॅक्लिन तिच्या नादीं लागले होते! नेटिव ओपिनियन वगैरे पत्रांमध्यें या संबंधी विनोदी कविता आढळतात. गुर्जर कवि दलपतराम यांनीं १८६५ सालीं या घातुक वेडाविरुद्ध कांहीं कविता लिहिलेल्या प्रसिद्ध आहेत.[1] त्यावेळचे मुंबईचे गव्हर्नर सर बार्टल फ्रेयर यांनीं तर या सट्टेबाजीमध्यें सरकारी नोकरांनीं भाग घेऊं नये, व या बंदीचा एकाद्यानें भंग केल्यास त्याची पगारवाढ तहकूब केली जाईल असा हुकूम सोडला होता; पण पौर्णिमेच्या भरतीचें पाणी केरसुणीनें मागें लोटण्यासारखेच हे प्रयत्न होते. अमेरिकेंतील हें युद्ध जगाच्या अंतापर्यंत सतत चालेल अशी या लोकांची समजूत होती असें दिसतें!

१८६५ च्या सुरवातीला अमेरिकेंतील दक्षिण व उत्तर संस्थानांमध्यें तह झाल्याची बातमी येऊन थडकली व या लोकांच्या साऱ्या आर्थिक आशा पिंजारलेल्या कापसाप्रमाणें वाऱ्यावर उडून गेल्या! युद्ध खलास झाल्याबरोबर मँचेस्टर व लँकेशायर मध्यें पूर्वीप्रमाणें अमेरिकेंतून कापूस येण्यास अडथळा राहिला नाहीं आणि त्यामुळें स्वाभाविकच हिंदुस्थानांतील कापसाला पूर्वीप्रमाणें मागणी येण्याची एकदम बंद झाली. या वेळच्या बँकांच्या कारभारामध्येंही विलक्षण बेपर्वाई, अव्यवस्था व गोंधळ माजून राहिला होता. सर चार्लस जॅक्सन यांच्या अध्यक्षतेखालीं जुन्या बॉंबे बँक कंपनीच्या आनागोंदी कारभाराची चौकशी

१ दलपत काव्य, भाग १ लो, १८९५, पृ. २३३–६.

करण्याकरितां जी कमिटी हिंदुस्थानसरकारनें पुढें १८६८ च्या १७ व्या ऑक्टोबरमध्यें नेमिली तिच्या बैठका प्रथम मुंबई व नंतर लंडन येथें भरल्या. तिच्या पुढें आलेला विलक्षण पुरावा पाहून मन थक्क होऊन जातें. या गडबडींत पुष्कळांनीं आपलें उखळ पांढरें करून घेतलें; पण शेंकडो चांगले लोक हकनाक अजिवात बुडाले. दादोबा यांपैकींच एक दुर्दैवी गृहस्थ होते. डॉ. विल्सन यांनीं आपल्या ता. १३ जून १८६५ च्या दैनंदिनीमध्यें डॉ. भाऊ दाजी वगैरे आपले बहुतेक सुधारणावादी मित्र आर्थिकदृष्ट्या बुडाले असून पन्नास हजार रुपयांना विकत घेतलेल्या बॅंकचे शेअरची किंमत एक हजारावर उतरल्याची नोंद केली आहे. डॉक्टर विल्सननीं ज्यांचा आपले सुधारक मित्र म्हणून उल्लेख केला आहे त्यांत दादोबा हे तर होतेच; परंतु त्यांच्या खेरीज नाना शंकरशेट, दादाभाई नौरोजी, कर्सनदास मूळजी अशा कितीतरी सुप्रतिष्ठित व्यक्तींना या आर्थिक आपत्तीचा तडाका बसला होता. आपल्या अविचारामुळें किंवा द्रव्याच्या लोभामुळें जरी पुष्कळांनीं आपलें नुकसान करून घेतलें होतें, तरीपण या पंचवार्षिक घालमेलींत मुंबईमध्यें विलक्षण सुधारणा होऊन या बेटाचें स्वरूप अजिवात पालटलें हें विसरतां येत नाहीं. अमेरिकेंतील संस्थानें जर त्या काळीं आपआपसांत भांडलीं नसतीं तर मुंबई शहराचें रूप आजच्यापेक्षां अगदीं निराळें असतें, हें निःसंशय होय.

डॉ. भाऊ दाजी किंवा रा. ब. दादोबा पांडुरंग हे स्वतः होऊन या शेअरबाजाराच्या उलाढालींत लक्ष घालीत असें वाटत नाहीं. त्यांच्या पारशी किंवा जैन मित्रांनीं सद्‌हेतूनें कां होईना त्यांना या मोहांत पाडलें होतें. त्यांच्या तंत्रानें ते हा संभावित जुवा खेळत होते ! दादोबांचा सुरतेचा एक पारसी विद्यार्थीमित्र मेहरवानजी नसरवानजी भावनगऱ्या "हा १८६३–६४ सालीं कापसाचा मोठा व्यापारी बनला व त्यानें आपल्या भरभराटींत आपणास दहा हजार रुपये एका खेपेस कापसांत मिळवून दिले," असें दादोबांनींच आपल्या चरित्रांत लिहिलें आहे. १८६४–६५ सालांतील शेअरबाजारचा बादशहा प्रेमचंद रायचंद याची व दादोबांची दोस्ती होती, असें मानण्यास पुरावा आहे. १८६५ सालीं प्रसिद्ध झालेल्या 'यशोदा पांडुरंगी' या आपल्या टीकाग्रंथाची एक प्रत दादोबांनीं प्रेमचंद रायचंद यांना अर्पण केली होती. ती प्रत अनपेक्षित रीतीनें प्रस्तुत लेखकाच्या हातीं आली असून तिच्या आरंभीं पहिल्याच पानावर असा मजकूर आहे :—

रा. ब. दादोबा पांडुरंग

To,

Premchand Roychand, Esq.
as a mark of the greatest
respect and esteem from

(सही) Dadoba Pandurang

मि. मेरवानजी भावनगरी याचा बाँबे सिटी बँक व धि एशियाटिक फिन्यान्सियल-मध्यें निकट संबंध होता. १८६५ च्या २८ व्या कायद्याप्रमाणें ज्या दिवाळखोर लोकांची मालमत्ता आवरण्यांत आली त्यामध्यें प्रेमचंद रायचंद व मेहरवानजी भावनगरी हे दोघेही होते. जुन्या बाँबे बँकच्या देणेदारांमध्यें ता. ३१ डिसेंबर १८६७ रोजीं ज्यांचीं नांवें होतीं त्यांमध्येंही ह्या दोघांचीं नांवें आढळतात. प्रेमचंद रायचंदला बँकेनें कर्जाऊ ३५·६२ लाख रुपये दिले व त्यांपैकीं २०·७८ लाख बुडाले आणि नसरवानजीला दीडलाख दिले त्यांपैकीं सवालाख बुडाले! या बँकेच्या प्रमुख देणेकरांच्या यादींत गोविंद रामचंद्र हा एकटाच महाराष्ट्रीय दिसतो. बाकीचे सर्व युरोपीयन, पारशी किंवा गुजराती होते. तात्पर्य भांडीं ब्यालीं म्हणून लोभानें जास्त दिलीं आणि तीं सगळींच मेलीं, अशासारखी दादोबांची गत झाली! पहिल्या खेपेस भावनगऱ्यानें दहा हजार रुपये मिळवून दिलेले पाहून दादोबांनीं होते नव्हते ते सारे किंवा बरेचसे पैसे शेअरबाजारांत या मित्रांमार्फत पेरले असावेत. अर्थात् ज्यांनीं त्यांना या मोहांत पाडलें त्यांचा दादोबांचा फायदा करावा हाच हेतु होता, हेंही येथें सांगणें अवश्य आहे. दादोबांनीं स्वतःचा हात भाजल्यावर या बाबतींत जो स्वानुभव कथन केला आहे तो मोठा बोधप्रद आहे. दादोबा लिहितात, "जर तुम्हांस शांति पाहिजे ; आणि सुख पाहिजे ; तर चोख व्यवहार ठेवून थोडक्या लाभांत तृप्त असा. पुढें होणाऱ्या आणि संदिग्ध अशा लाभा पेक्षां हल्लीं होणारा स्वल्प लाभ अधिक चांगला. पुढल्या लाभाचा लोभ फारच घातक आणि हानि करणारा आहे हें मुलांनो, तुम्ही निरंतर मनांत आणा आणि थोडक्या लाभांत तृप्त असा. सन १८६४ त अशा लोभांत पडून मुंबई सारखें मोठें शहर धराऱ्यास आलें. तुम्हीच पहा त्या काळापासून माझी स्वतःची दशा कशी झाली आहे मीं तर चिमणी प्रमाणें एका पोटा पुरता दाण्याचा लोभ केला. त्या लोभाचें आज चौदा वर्षे पर्यंत दुःख भोगीत आहे. मग जे घरचे सावकार असून पुढें त्यांनीं

मणावारी आणि खंड्यावारी दाणा सांठविण्याचा लोभ केला, त्या सर्वांची आतां कशी काय दशा झाली आहे हें तुह्मींच पाहत आहां. रुस्तमजी जमशेटजी बाटलीवाले, खरशेटजी फर्दूनजी दाढीवाले, वाच्छे, जगन्नाथ शंकरशेट व शेंकडो या शहरांतले पैसेवाले लोक सन १८६३ च्या सालीं अमेरिकेस लढाई चालू झाली आणि त्यामुळें कापूस महाग होऊन मुंबईत कापसाच्या व्यापाऱ्यानें कडेलोट पैका येऊन एक दीड वर्षपर्यंत तींत सोन्याचा धूर निघूं लागला. त्या धूरानें सर्व लोकांचे डोळे भरून गेले, आणि त्यांस दिसेनासें झालें. नानाप्रकारचीं जुव्यासारखीं त्यांनीं कामें आरंभिलीं आणि लोभानें अधिकाअधीक श्रीमंत होण्यासाठीं अशा मोठ्या गृहस्थांनीं इतर हजारो गोरगरिबांसही लोभांत ओढून आणिलें, आणि मोठमोठाले खळगे खणून शेवटीं त्यांत आपण पडले आणि आपणांबरोबर इतर गरिबांसही पाडिलें. त्या लोभाचा परिणाम मुंबई आज सोळा वर्षें भोगीत आहे. लोभाचा किती वाईट परिणाम आहे हें प्रत्यक्ष आज मुंबईशहर दाखवित आहे. म्हणोन मुलांनो आपल्या हातांत थोडें जरीं असलें तरीं त्यांतच तृप्त असावें; पुढें मोठा लाभ होईल म्हणोन तें हातांतून कदापि दवडूं नये. सवा रुपयाचा माल जेव्हां एका हातीं येईल, तेव्हां दुसऱ्या हातांतून रुपया जाऊं द्यावा."[१]

दादोबांचा हा उपदेश बहुमोल आहे. परंतु हा शहाणपणा मिळविण्याकरितां त्यांना भारी किंमत द्यावी लागली!

सुबोधपत्रिकाकार दादोबांच्या मृत्युलेखांत लिहितात, "(पेन्शन घेतल्या-) नंतर (दादोबा) व्यापाराचे धंद्यांत शिरले. त्याकाळीं त्यांना बराच पैसा मिळाला, परंतु तो फार दिवस राहिला नाहीं; बहुतेक लोक त्याकाळीं अडचणींत आले त्यांत हेही आले. मिळालेला सर्व पैसा जाऊन जवळचेंही सर्व गेलें. याप्रमाणें स्थिति झाली तरी त्यांनीं धैर्य न सोडतां काठेवाडांतील कांहीं राजेरजवाडे यांच्या भेटी घेतल्या. ते विद्वान् असल्यानें त्यांचें नांव सर्वत्र महशूर होतेंच. तेणेंकरून जेथें जेथें ते गेले तेथें तेथें त्यांचा सन्मान होऊन त्यांस जरीकाठी शालजोड्या, शेलेपागोटीं, अशा वस्तु बहुतांकडून नजर मिळाल्या."[२] दादोबा काठेवाडांत गेले ते तेथील एकाद्या संस्थानामध्यें मोठ्या पगाराची नोकरी मिळाल्यास पाहावी व आपली आर्थिक हलाखी हलकी करावी, याच हेतूनें गेले असावेत. कारण त्या

१ शिशुबोध, १८८४, प्र. ३ रें, पृ. १४–१५.
२ सुबोधपत्रिका, २५ अक्टो० १८८२.

काळीं काठेवाडच्या राजेरजवाड्यांमध्यें आपआपल्या संस्थानांत सुधारणा घडवू आणण्याची अहमहमिका लागली होती.[१] राजकोट येथें काठेवाडांतील राजे रजवाड्यांच्या मुलांकरितां एक राजशाळा (King's school) स्थापन करण्याच तिकडचे पोलिटिकल एजंट मेजर कीटींज यांची खटपट चालली होती; परं काठेवाडांतील ही जागृति म्हणजे 'दुरून डोंगर साजरे' यापैकींच आहे, अ दादोबांच्या निदर्शनास आलेलें दिसतें. कारण या अव्यवस्थितचित्त संस्थानिकांच्य कारभारांत शाश्वती मुळींच नव्हती. या बाबतींत रा. विनायक नारायण भागवत यांच्या उदाहरणावरून त्यांच्या मनानें धाक घेतला असावा! रा. भागवत हे एल्फिन्स्टन कॉलेजांतील एक माजी विद्यार्थी होते. ते अत्यंत चाणाक्ष, बहुश्रुत व सत्यनिष्ठ गृहस्थ होते, असा निर्वाळा नेटिव ओपिनियनकारांनीं दिला आहे.[२] भागवतांसारखा तरुण त्या काळच्या संस्थानांतील नोकरीकडे वळणें शक्य नव्हतें, परंतु आनंदाश्रमस्वामी (प्रार्थनासमाजाच्या स्थापनेच्या वेळीं हजर असल्याबद्दल ज्यांचा उल्लेख मागें आला आहे) या इंग्रजी शिकलेल्या बंगाली संन्याशाच्या प्रेरणेनें नवानगरच्या जामसाहेबांनीं आपला कारभारी (Secretary) म्हणून भागवतांची निवड केली. भागवतांच्या या नेमणुकीमुळें नवानगरमधीलच नव्हे तर एकंदर काठेवाडांतील पिढीजाद कारभारी लोकांमध्यें विलक्षण खळबळ उडाली. आतांपर्यंत कारभाऱ्याची जागा हें नागर ब्राह्मणांचें राखीव कुरण झालें होतें. त्यांच्या हितसंबंधाला बाधा आणणारी कोणतीही गोष्ट ते टिकूं देत नसत. या कामीं वाटेल तो पैसा खर्च करायला त्यांची तयारी असे. त्यांच्या या पाताळयंत्री उद्योगांमुळें कितीतरी मी मी म्हणविणाऱ्या व 'कर्तुमकर्तुमन्यथाकर्तुम्' अशी शक्ति असलेल्या पोलिटिकल एजंटांनासुद्धां त्यांच्यापुढें हार खावी लागून सुधारणेचे प्रयत्न फसले जात. शिक्षण, आरोग्य, न्याय, जमाबंदी वगैरे खात्यांमध्यें या नव्या कारभाऱ्यानें पुष्कळच सुधारणा घडवून आणल्या. त्यामुळें हा कारभारी लोकप्रिय होऊन त्याचीं पाळें आपल्या भूमींत जास्तच खोल व घट्ट रुतूं लागलीं हें पाहून या लोकांचें धाबें दणाणलें! त्याचें उन्मूलन करण्याकरितां नेटिव ओपिनियन-कारांच्या म्हणण्याप्रमाणें त्यांनीं तीन गोष्टींचा फायदा घेतला. पहिली गोष्ट भागवत दक्षिणी असून गुजराती नव्हते. दुसरें त्यांचा पगार इतरांच्या मानानें पुष्कळ

१ नेटिव ओपिनियन, ता. २१ एप्रिल १८६७ मधील इंग्रजी अग्रलेख पहा.
२ Native Opinion, (28-4-1867) p. 130.

होता. (सामान्यतः तेथें नियमित पगार थोडा असे, पण त्याच्या पन्नास पट इतर अन्याय्य मार्गांनीं ते कमाई करीत!) या दोन गोष्टी लोकांमध्यें त्याच्याविषयीं द्वेष, मत्सर व अप्रीति उत्पन्न करण्यास पुरेशा होत्या. त्यांत सुधारणा करण्याच्या भरांत आपल्या भोंवतीं कोणती परिस्थिति आहे याचा पोंच भागवतांना राहिला नसावा, अशीही शंका नेटिव ओपिनियनकारांनीं व्यक्त केली आहे.[१] मार्चे महिन्याच्या सुमारास स्वामी आनंदाश्रम मुंबईला गेले आहेत व स्वतः कारभारीही बाहेरगांवीं फिरतीवर आहेत, अशी संधि साधून या लोकांनीं जामसाहेबांना गांठलें व कारभाऱ्यासंबंधीं त्यांचे कान फुंकून रा. भागवतांचा कांटा काढून टाकला! पोलिटिकल एजंटालाही भागवतांनीं दुखविलें होतें. कारण त्याच्या वशिल्यानें जामसाहेबांनीं नोकरीला लाविलेला एक युरोपियन थोड्याच दिवसांत कामाला निरुपयोगी दिसून आल्यावरून नोकरीवरून कमी करण्यांत आला होता. रा. भागवतांच्या जागीं तीन वर्षांची कैदेची शिक्षा मिळालेला, परंतु पैसे चारून ज्यानें माफी मिळविली होती अशा इसमाची नेमणूक झाली! याच सुमारास दादोबा काठेवाडांत गेले होते आणि भागवतांना मिळालेल्या ठेंचीनें शहाणे होऊन येथें आपलें जमणें शक्य नाहीं असें म्हणून ते परत फिरले असावे.

बडोद्याचे अधिपति श्री. खंडेराव गायकवाड यांची व दादोबांची जुनी ओळख होती, हें त्यांच्या आत्मचरित्रांत आपण पाहिलेंच आहे. बडोदें दप्तरांतील संवत् १९२१ (इ. स. १८६५) च्या मखलासींत, "श्रीमंत खंडेराव महाराज मुंबईस गेले असतां एका खलिताच्या मसुद्याचें इंग्रजी भाषांतर मुंबई येथें दादोबा पांडुरंग तर्खडकर यांजकडून करवून घेतलें त्याबद्दल दादोबास एक हजार रुपये मेहताणा देण्यांत आला," अशा आशयाचा मजकूर सांपडतो. यावरून त्यांची ही जुनी ओळख दृढ झाली होती हें उघड आहे. ता. ९ डिसेंबर १८६७ च्या 'ज्ञानप्रकाशा'च्या अंकांतील बडोद्याच्या बातमीपत्रांमध्यें पुढील मजकूर सांपडतो– "दादोबा पांडुरंग यांस महाराजांनीं दरमाहा ४०० रु. पगार करून दिला व त्यांजला पारशी भाषेंत व गुजरातींत एक व्याकर्ण तयार करण्यास सांगितलें आहे. त्याप्रमाणें दादोबा पांडुरंग हे येथें येऊन परत मुंबईस जातों म्हणून बोलून गेले आहेत." बडोदें हेंहीपण एक संस्थानच होतें. येथील अधिपति महाराष्ट्रीय असले

१ **Native Opinion, 16–6–67, p. 186.**

तरी कारभारी लोकांची मनोवृत्ति काय निराळी असणार ? ज्यावेळीं दादोबा बडोद्याला गेले त्यावेळीं तेथें एक नुकतीच क्रांति झाली होती. गायकवाडांचे माजी दिवाण गोविंदराव रोडे हे ता. १० नवंबर १८६७ रोजीं बडतर्फ होऊन त्यांची जागा भाऊसाहेब शिंदे यांनीं घेतली होती. दुसऱ्या सयाजीरावांच्या तिघां पुत्रांपैकीं खंडेरावच जास्त कर्तबगार होते. त्यांच्या कारकीर्दीच्या सुरवातीला राजकारभारामध्यें विलक्षण सुधारणा घडून येतील अशी आशा त्यांनीं निर्माण केली होती; परंतु त्यांना लायक असे सल्लागार मंत्री लाभले नाहींत. हिरे माणकें विकत घेणें व राजवाडे उभारणें याच्यामध्यें त्यांचें चित्त रमलें व राज्यसुधारणांकडे लक्ष कमी होत गेलें. भाऊ शिंदे हा तर मोठा नीच, उपद्व्यापि व भयंकर माणूस होता. महाराजांना खुष ठेवण्याची कला मात्र त्याला उत्कृष्ट साधली होती.[1] राज्यपदावर येण्यापूर्वीची खंडेराव व भाऊ शिंदे यांची गट्टी होती व त्याला खंडेराव आपल्या भावाप्रमाणें मानीत होते. या मानलेल्या भावाच्या चिथावणीवरून खंडेरावांनीं आपला सख्खा भाऊ जो मल्हारराव त्याला पादरा येथें अटकेंत टेविलें होतें, असें म्हणतात.

खंडेराव हे निपुत्रिक होते. मुसलमान फकिरांच्या प्रसादानें आपल्याला पुत्रप्राप्ति होईल अशी त्यांना आशा वाटत होती. मुसलमान धर्माकरितां ते लाखो रुपये दरवर्षी खर्च करूं लागले. मक्केला पाठविण्याकरितां त्यांनीं एक रत्नजडीत गलेफ (चादर) तयार करविली होती. तिची किंमत सुमारें तीस लक्ष रुपये होती असें बडोद्याच्या एका बातमीपत्रांत म्हटलें आहे.[2] या चादरीसंबंधीं व खंडेरावांच्या धार्मिक खुळासंबंधीं समकालीन वृत्तपत्रांमध्यें पुष्कळच चर्चा झालेली आढळते. भाऊ शिंदे त्याला आळा न घालतां उलट प्रोत्साहनच देई. या कामीं त्याचा साथी हवीबुल्ला मुनशी नांवाचा एक मुसलमान होता. हा मुसलमान खंडेरावांना आपणास खुदाचा साक्षात्कार आहे असें सांगे! अशी आख्यायिका आहे कीं, भाऊ शिंदे यानें खंडेरावांच्या बिछान्यांत एक मोहरांनीं भरलेली पिशवी टेविली व खुदानें

---

1 " He was an ignorant low fellow, a bargir by occupation, an illegitimate son by birth as his name seems to show, but his one merit lay in his power of amusing the Maharaja."—**Bombay Gaz. Baroda, 1883, p. 276.**

2 **Native Opinion, 23-2-68, p. 62.**

रात्रीं आपणास स्वप्नांत येऊन स्वतः सदर पिशवी ठेवल्याचें सांगितलें असें म्हणून, दुसऱ्या दिवशीं ती पिशवी त्याच्या बिछान्यांतून काढविली![1] भाऊ शिंद्याला नेमण्याच्या आधीं मुंबई सरकारचीही परवानगी घेण्यांत आली नव्हती. भाऊ शिंद्याच्या कारस्थानामुळेंच जुने दिवाण गोविंदराव रोडे यांना विषप्रयोग झाला असावा, अशी शंका होती. 'ज्ञानप्रकाशा'च्या (९-१२-१८६७) बातमीपत्रांत, भाऊसाहेब शिंदे सरकारचे दिवाण हे आपल्या यजमानास थोड्याच दिवसांत मेजवानी देणार आहेत व या मेजवानीप्रीत्यर्थ साठसत्तर हजार रुपये खर्च होतील. गायकवाडाचे माजी दिवाण गोविंदराव रोडे हे यात्रेकरितां डाकुरास जाणार व त्यांस महाराजांनीं ४५००० रुपयांचें पेनशन करून सनद दिली आहे, अशा अर्थाचा मजकूर सांपडतो. पुढें ता. १९ जानेवारी १८६८ च्या नेटिव ओपिनियनमधील वर्तमानसारांत, "गोविंदराव रोडे माजी दिवाण हे डाकुर्जीच्या यात्रेस पायानें जात असतां वाटेस एक दिवस भोजन झाल्यावर वांती होऊन एकाएकीं आजारी पडले. तेथून त्यांना बडोद्यास आणलें. तेथें आल्यावर ते लागलेच (१०-१-६८) मरण पावले. यांस विष घातल्याचा संशय आहे," अशी बातमी सांपडते. या सर्व घटना दादोबा बडोद्याला गेले त्याच सुमारास घडत होत्या, हें लक्षांत ठेवण्यासारखें आहे. अशा स्थितींतही ते तेथें गेले यावरून त्यांची किती ओढग्रस्त व अनुकंपनीय स्थिति झाली होती, याची कल्पना करतां येते. सुबोधपत्रिकाकार उपरिनिर्दिष्ट मृत्युलेखांत म्हणतात, "काठेवाडाहून परत आल्यावर ब्यांकीचे तगादे लागले व त्यांतून सुटका व्हावी, अशा हेतूनें बडोद्यांत खंडेराव महाराजांनीं त्यांस दरमहा पांचशें रुपये देऊं करून बोलाविल्यावरून तेथें गेले; परंतु भाऊ शिंदे कारभारी यांजवर खंडेराव महाराजांचा पूर्ण विश्वास होता. त्यांच्या मनांत मुंबईतील त्यांचे एका मित्रानें (हे गृहस्थ सांप्रत मुंबईत आहेत.) आपणाविषयीं वांकडें उत्पन्न करण्याची खटपट चालू केल्याचें जेव्हां दादोबांच्या कानीं आलें तेव्हां ते राजीनामा देऊन परत आले. कारण ह्या मराठी दरबारांत सर्व भालेराई व अविद्वानांचा मोठा भरणा; तेथें एकट्या विद्वानाचें काय चालणार, असें जाणून पैशाचा लोभ न करतां परत आले, हें शहाणपणाचें केलें. ज्या मनुष्यानें भाऊ शिंद्यास लिहिलें त्यास यांचा उत्कर्ष ऐकून बरें वाटलें नाहीं.

[1] श्रीमंत महाराज मल्हारराव गायकवाड ह्यांचा खरा इतिहास—ब. अ. देव, १८८२, पृ. १०.

त्यांच्या विद्वत्तेवरून खंडेराव महाराज यांचा मान इतका ठेवीत असत कीं, हे जवळ असले तर त्यांच्या अनुमोदनावांचून त्यांनीं हुक्का ओढूं नये व याजकरितां पालखीही नवी करावयास सांगितली होती. परंतु जेव्हां भाऊ शिंद्याची नजर करडी पाहिली व कारणही समजण्यांत आलें तेव्हां हा मनुष्य कोणत्या वेळेस घात करील याचा नेम नाहीं असें जाणून परत आले......पुढें बडोद्याहून परत आल्यावर ब्यांकोचें देणें होतेंच."

"भाऊ शिंदे यांचे मनांत एकाद्याचा उत्कर्ष करावयाचा असला किंवा एखाद्या हतभाग्य मनुष्याचा घात करावयाचा असला म्हणजे खुदानें आपल्यास स्वप्नामध्यें अमुक मनुष्याच्या सदाचरणाविषयीं किंवा दुराचरणाविषयीं अमुक प्रकार सांगितला आहे, असें आह्मांस समजलें आहे, अशा रीतीनें भाषणाचा ओघ आणून महाराजांचे मनांत त्या मनुष्याविषयीं लोभ किंवा राग आणीत,"[1] असें म्हणतात. अशा या खुदाच्या अवकृपेला दादोबा घाबरले असल्यास त्यांत नवल नाहीं.

भाऊ शिंद्याची वक्रदृष्टि ही शनीच्या वक्रदृष्टीपेक्षांही घातक होती. खंडेरावांचा प्राण घेण्याचा प्रयत्न केला असा आरोप ठेवून मल्हारराव पक्षाच्या कांहीं लोकांना ता. १२ मार्च १८६७ रोजीं हत्तीच्या पायांखालीं बडोद्याच्या रस्त्यांत बळी दिलें होतें व कांहीं लोकांना कैदेंत टाकलें होतें. ही भयंकर शिक्षा पाहून अशा प्रकारची क्रूरता केव्हांही केली जाणार नाहीं, अशा प्रकारची कबुली इंग्रज सरकारनें बडोदे सरकारकडून घेतली होती. भाऊ शिंद्याची खंडेरावांवर विलक्षण मोहिनी होती. "श्रीमंत नारायणराव बिन येशवंतराव उर्फ भाऊसाहेब शिंदे, दिवाण, यांणीं गायकवाडीचा राज्यकारभार उत्तम प्रकारचा आज वर्षभर केला, सबब महाराज खुष होऊन दिवाण बाहादूर यांस २०,००० रुपयांचें जहागीर व १००,००० रु० इनाम दिले," असें सप्टेंबर १८६८ मध्यें ज्ञानप्रकाशच्या बातमीदारानें लिहिलें आहे! १८६९ सालीं असिस्टंट रेसिडेंट कर्नल फाल्मन यास लांच देण्याचा प्रयत्न केल्यावरून इंग्रज सरकारच्या दडपणामुळें भाऊ शिंद्यास बडतर्फ करून त्याच्या जागीं हंगामी दिवाण म्हणून वरकरणी निंबाजीराव धवळे यांची नेमणूक झाली. परंतु त्यांना सल्लागार म्हणून भाऊ शिंदे राहिलेच! शेवटीं हा दुराग्रा

---

१ श्रीमंत महाराज मल्हारराव गायकवाड ह्यांचा खरा इतिहास, पृ० ९.

खंडेरावांच्या निधनोत्तर ता. १ मे १८७२ रोजीं स्वतः विषप्रयोग होऊनच मेला !!![1]

दादोबा १८६७ च्या अखेरीला किंवा १८६८ च्या आरंभीं बडोद्याला गेले याला आधार आहे, परंतु ते तिकडून नक्की केव्हां परत आले हें जाणण्यास मार्ग नाहीं. इतकेंच नव्हे तर बडोदें-सरकारच्या राज्यांत ते कोणत्या कामावर होते याबद्दल तेथील दप्तरांत कांहींच माहिती मिळत नाहीं. १८६७-६८ सालच्या दप्तरांत " दादा पांडुरंग मुंबईकर याजला बक्षीस खातें ऐवज लग्नाबद्दल देण्याची सरकार परवानगी झाली त्याजबद्दल रोख दिले ते हस्ते खुद छ. ९ रोज—

४०० दोन मुलांचे मुंजीबद्दल दर २०० प्र॥
५०० कन्येचे लग्नाबद्दल
———
९००

एवढीच माहिती मिळते.[2]

भाऊ शिंद्याच्या वक्रदृष्टीला भिऊन दादोबा जरी परत आले तरीपण बडोदें संस्थानचा मोह त्यांचा सुटला नव्हता. ' ज्ञानप्रकाशा 'चा बातमीदार लिहितो, " बडोद्याच्या नायब दिवाणगिरीचें काम मिळण्याकरितां रा. ब. दादोबा पांडुरंग, रा० गणेशशास्त्री, वकील इंदूर व रा० दादाजी रसूल यांनीं खटपट चालविली होती परंतु एकाचीही सिद्धीस गेली नाहीं."[3] भाऊ शिंदे पदभ्रष्ट झाले होते व त्यांच्या जागीं दिवाणपदावर अमदाबाद येथील स्मॉल कॉज कोर्टाचे जज्ज रा० ब० गोपाळराव हरि देशमुख ( लोकहितवादी ) यांची नेमणूक होणार असल्याबद्दल बोलवा होती.[4] त्यामुळें तिकडे जाण्याचें पुनः दादोबांनीं मनावर घेतलें असावें.

★

1 **Papers connected with the deaths of Bhaoo Scindia and Govind Naik**, London, 1875 पहा.

२ द. अं. ४९. पु. नं. १३, सन १८६७-६८.

३ **नेटिव ओपिनियन**, ता. ५ डिसेंबर १८६९. पृ. ३९०.

४ तत्रैव, ता. १९ डिसें. १८६९. पृ. ४०७.

## दादोबांचे प्रकाशित किंवा अप्रकाशित ग्रंथ

### (१) व्याकरणें

ग्रंथकार या नात्यानें दादोबा पांडुरंग यांच्या योग्यतेची महाराष्ट्राला असावी तेवढी जाणीव नाहीं. त्यांनीं निरनिराळ्या विषयांवर जे अनेक ग्रंथ लिहिले त्यांपैकीं कांहीं

**मराठी भाषेचें व्याकरण**

ज्यांत

**या भाषेचे मुख्य नियम आणि रीती**

यांचें

**वर्णन केलें आहे**

---

ग्रंथकर्ता

**दादोबा पांडुरंग तर्खडकर**

मुक्काम मुंबई

गणपत कृष्णाजी यांचा छापखान्यांत छापिलें.

शके १७५८

इसवी सन १८३६ माहे डिसेंबर

अप्रकाशित आहेत; आणि प्रकाशित आहेत त्यांपैकीं देखील पुष्कळशा ग्रंथांचा लोकांना मुळींच परिचय नाहीं. दादोबांचें नांव ज्या ग्रंथानें अमर केलें आहे तो त्यांचा ग्रंथ म्हणजे मराठी भाषेचें व्याकरण हा होय. पण हा त्यांचा ग्रंथराज

आपण पाहिला आहे असें आजच्या सुशिक्षित समाजामध्यें तरी कितीसे लोक सांगूं शकतील ? १८६५ सालीं जें लघुव्याकरण दादोबांनीं प्रसिद्ध केलें तेंच तेवढें त्यांचें व्याकरण अशीही पुष्कळांची समजूत असलेली दिसते. म्हणून दादोबांच्या प्रकाशित व अप्रकाशित किंवा उपलब्ध व अनुपलब्ध अशा ग्रंथांची व निबंधांची जी माहिती मिळूं शकली ती येथें सादर करतों :

### ( १ ) मराठी भाषेचें व्याकरण, १८३६, पृ. ६ + ९ + १९४.

या ग्रंथाचा उल्लेख मागें आलाच आहे.[१] हा ग्रंथ दादोबांनीं १८३६ सालीं आपल्या वयाच्या बाविसाव्या वर्षी प्रसिद्ध केला. मराठी भाषेचा हा पहिलाच व्याकरणग्रंथ आहे असें नाहीं. आद्य मराठी व्याकरण म्हणून ज्ञानेश्वरकालीन पं० भीष्माचार्यांचा 'पञ्चवार्तिक'[२] हा महानुभावीय ग्रंथ पुढें करतां येईल. त्यानंतर जेजुइट लोकांनीं सोळाव्या किंवा सतराव्या शतकांत लिहिलेले फादर थोमस स्टिफन्स प्रभृतींचे मराठी बोलींचे पोर्तुगीज भाषेंतील व्याकरणग्रंथ आहेत.[३] 'समर्थप्रताप' या ग्रंथाचे लेखक गिरिधरस्वामी यांनींही मराठी व्याकरणावर लिहिलेला त्रुटित पद्यमय ग्रंथ धुळ्याच्या श्रीसमर्थवाग्देवतामंदिरांत मला आढळला. या हस्तलिखितांत या व्याकरणाचा आरंभींचा भाग म्हणजे पहिले ८४ श्लोकच आपणास पाहावयास सांपडतात. यांत संधिप्रकरणाचा कांहीं भाग आलेला आहे. एकोणिसाव्या शतकाच्या आरंभीं डॉ. कॅरे[४] किंवा महमद इब्राइम मखबा[५] यानें लिहिलेलीं इंग्रजी भाषेंतील मराठी मुद्रित व्याकरणें आहेत. फार काय, परंतु १८३६ सालीं दादोबांच्या व्याकरणापूर्वी दोन संवादात्मक व्याकरणाचीं पुस्तकें प्रसिद्ध झालीं होतीं. त्यांपैकीं पहिलें बाळशास्त्री जांभेकर यांचें 'बालव्याकरण' व दुसरें गंगाधरशास्त्री फडके यांचें 'महाराष्ट्र

१ मागें पृ. ८५ पहा.

२ मराठी भाषेचें व्याकरणकार व व्याकरणप्रबंधकार, (ले. मो. स. मोने.) १९२७, पृ० ८९-११८ पहा.

३ मराठी व्याकरणाची कुलकथा, (ले. अ. का. प्रियोळकर) १९२६ पहा.

४ **Grammar of the Mahratta Language**, (William Carey) Serampur, 1805.

५ **Grammar of the Mahratta Language**, Revised by Vans Kennedy, Bombay, 1825.

भाषेचें व्याकरण'. इतकीं सगळीं व्याकरणें असूनही दादोबांनाच मराठी भाषेचे आद्यप्रवर्तक मानतात हें कसें ? भीष्माचार्यांचा 'पंचवार्तिक' हा ग्रंथ अलिकडेच माहीत झालेला असून त्याचा आजच्या मराठी भाषेच्या घटनेला कोणताही उपयोग झालेला नाहीं. डॉ. कॅरे यानें आपलें ग्रामर परदेशांतून इकडे येणाऱ्या सिव्हिल सर्व्हंटांकरितां म्हणून लिहिलें व मिशनऱ्यांनीं ग्रामरें आपल्या लोकांकरितां म्हणजे परक्या मिशनऱ्यांकरितां म्हणून तयार केलीं होतीं.[1] जांभेकर किंवा फडके यांचीं प्रश्नोत्तरात्मक व्याकरणें लहान मुलांकरितां म्हणून लिहिलीं गेलीं होतीं. विद्यार्थ्यांना आपल्या व्याकरणाचा उपयोग व्हावा हा तर दादोबांचा हेतु होताच, परंतु मराठी भाषेचे 'नियम बांधणें' व अशा प्रकारें मराठी भाषेचें व्याकरणशास्त्र तयार करणें, हीही त्यांची महत्त्वाकांक्षा होती, असें त्यांच्या १८३६ सालच्या व्याकरणाची प्रस्तावना पाहिली असतां कळून येतें. अशा प्रकारची जबाबदारी अंगावर घेण्यास आपली बौद्धिक तयारी किंवा लायकी कितपत होती, हें दादोबांनीं आपल्या आत्मचरित्रांत व व्याकरणाच्या प्रस्तावनेंत विनयपूर्वक कबूल केलें आहे.[2] बापुशास्त्री शुक्ल यांनीं जें त्यांना मराठी व्याकरण शिकविलें व पुढं इंग्रजी शाळेंत गेल्यावर इंग्रजी व्याकरणाचें जें त्यांना ज्ञान झालें त्याच्या जोरावर आपल्या सूक्ष्म अवलोकनशक्तीचा उपयोग करून त्यांनीं हें व्याकरण लिहिलें; परंतु प्रथम ज्या स्वरूपांत त्यांनीं तें लिहिलें त्या स्वरूपांत पुढं तें प्रकाशित झालें नाहीं. पहिल्यानें कांहीं बंद आपण प्रश्नोत्तररूपानें लिहिले, परंतु ती पद्धति न आवडल्यानें मरेच्या संक्षिप्त इंग्रजी व्याकरणाच्या धर्तीवर म्हणजे प्रसिद्ध झालेल्या स्वरूपांत तें तयार केलें, असें त्यांनीं लिहिलें आहे.[3] तसेंच "तें व्याकरण बाहेर पडतांच सोसाइटीनें चीफ सेक्रेटरी बॉथेन यांच्या शिफारसीनें सरकारनें सर्व प्रती विकत घेतल्या[4]" असीही त्यांची समजूत आहे; परंतु यांत त्यांच्या स्मरणशक्तीनें त्यांना दगा दिलेला स्पष्ट दिसतो. हें सबंध पुस्तक त्यांनीं प्रश्नोत्तररूपानेंच लिहून सोसाइटीकडे तें सरकारनें स्वतः प्रसिद्ध करावें म्हणून प्रथम पाठविलें होतें व भाषांतरसमितीचें एक सभासद व सोसाइटीचे

---

१ **Gramatica Marastta**, Lisboa, (2nd Edition) 1805, p. 40.

२ मागें पृ. ८६ पहा.

३ मागें पृ. ८५ पहा.

४ मागें पृ. ८५ पहा.

नेटिव्ह सेक्रेटरी बाळशास्त्री जांभेकर यांनीं हें व्याकरण सरकारनें घ्यावें व तावड-तोब प्रसिद्ध करावें, अशी जोराची शिफारसही केली होती. पण मध्येंच माशी कुठें शिंकली हें कळत नाहीं! आपली विनंति मान्य करतां येत नाहीं, व जर आपण तें स्वतःच प्रसिद्ध करीत असाल तर सरकार कांहीं प्रतींना आश्रय देईल, अशा प्रकारचें वॅथेनच्याच सहीचें पत्र दादोबांना आलें आहे! या वेळचा दादोबा व सरकार यांच्यामधील उपलब्ध पत्रव्यवहार[१] पुढें देतों म्हणजे त्या काळींही ग्रंथकारांच्या प्रसूतीवेदना आतांसारख्याच दुःसह कशा होत्या हें कळून येईल:—

## बाळ गंगाधरशास्त्र्यांची शिफारस

I have examined this Grammar with great attention, and I am happy in being able to recommend it to the favorable notice of the Committee. It is clear, well arranged and short, and explains many anomalous points in a satisfactory manner. I have made a few remarks in different parts of the work, in pencil, ( Marked 'B') which the author must be required to attend to before his work is accepted. The only additional suggestion, which I have to make in this place is that instead of complicated manner in which the different Moods and Tenses of verbs are arranged, Mr. Stevenson's short but clear and comprehensive plan be followed by the author. Those who will take the trouble to peruse it will easily admit its superiority.

Though there are now one or two treatises on Marathee Grammar Dadoba Pandoorang has wisely refrained from following any of them. The Grammar compiled by the Pundits of the Society, is too voluminous and purely written on Sanskrit model. Mr. Stevenson's is somewhat Philosophical treatise on the subject, and is intended for Englishmen studying Marathee. Dadoba has followed a middle course, and besides the originality which his Book possesses, it is written in popular style and being in the form of Dialogues is admirably adapted to be used in Schools.

---

१ G. D. 1836, Vol. 22—354, pp. 88-93.

Those who superintend the examinations of Native schools, are aware of the difficulty which is experienced for the want of a printed Grammar. Nothing on the subject being settled, the schoolmaster, the Inspector and the Secretaries often happen to have different opinions, and there is nothing at present, which may be considered as authority.

I recommend therefore that the Grammar now offered be accepted and **immediately** published. It being so much wanted in schools, that a large impression will be disposed of in a short time. The subject of remuneration will properly be considered by the managing committee.

30th September 1835.

Sd/-Ball Gungadhur Shastree.
Member of the Translating Committee and
Honorary Native Secretary to the Society.

### सोसाइटीच्या 'सत्कार'चा दादोबांस नकार !

To,

Dadoba Pandoorung,

Sir,

In reply to your letter to my address, under date the 5th September last accompanying a manuscript Marathee Grammar, I am directed to inform you, that the Society cannot undertake the publication thereof, but that Society will sanction its use in their schools, should you see fit to publish the work yourself.

I have the honor to be,
Sir,
Your most obedient servant,
Sd/ – G. Pope
Secretary to the Society

Bombay,
Society's Rooms,
18th March, 1836.

The manuscript is herewith returned.
Sd/ – G. P.

## दादोबांचें चीफ सेक्रेटरींस पत्र

To

W.H. Wathen, Esqr.
Chief Secretary to Government.

Sir,

With due deference I take the liberty to state, that in pursuance of your kind suggestion I had the honor to submit to the Native Education Society my two manuscript Grammars, of which the Persian one, was soon afterwards returned to me as being not useful in forwarding the objects of the Society. The other, viz., the Marathee was very carefully examined by them, and I am happy to bring to your kind notice the favourable remark made upon it by the Gentleman to whose criticism it was submitted. I enclose herein for your satisfaction a copy of it and that of a letter received from the Secretary to the Society, from which you will know all the particulars that might have otherwise been necessary to mention here. Suffice it to say in this place that the Society does not condescend to publish my work which it leaves me to do a task which my circumstances are too narrow to undertake merely in dependance on its sale. I therefore most earnestly pray that his Excellency in Council would be pleased to patronise the works ( I include also the Persian ) which I have been at great pains to compile for upwards of two years under the most sanguine expectation that they would most certainly meet the patronage of the N. E. Society and will be published at their expense, from the combination of circumstances–the one being the great usefulness and the want of such works particularly the Marathee one), so universally felt at present, and the other being the connection in which their compiler stands to that Noble Institution. But I am quite disappointed, and my heart sinks under the idea that such an unceasing labour of two years is very likely to be quite fruitless. I do not mean to say fruitless because I derive no profit from them but because the boys in

Those who superintend the examinations of Native schools, are aware of the difficulty which is experienced for the want of a printed Grammar. Nothing on the subject being settled, the schoolmaster, the Inspector and the Secretaries often happen to have different opinions, and there is nothing at present, which may be considered as authority.

I recommend therefore that the Grammar now offered be accepted and **immediately** published. It being so much wanted in schools, that a large impression will be disposed of in a short time. The subject of remuneration will properly be considered by the managing committee.

30th September 1835.

Sd/-Ball Gungadhur Shastree.
Member of the Translating Committee and
Honorary Native Secretary to the Society.

## सोसाइटीच्या 'सत्कार'चा दादोबांस नकार !

To,

Dadoba Pandoorung,

Sir,

In reply to your letter to my address, under date the 5th September last accompanying a manuscript Marathee Grammar, I am directed to inform you, that the Society cannot undertake the publication thereof, but that Society will sanction its use in their schools, should you see fit to publish the work yourself.

I have the honor to be,
Sir,
Your most obedient servant,
Sd/ – G. Pope
Secretary to the Society

Bombay,
Society's Rooms,
18th March, 1836.

The manuscript is herewith returned.

Sd/ – G. P.

## दादोबांचें चीफ सेक्रेटरींस पत्र

To

W.H. Wathen, Esqr.
Chief Secretary to Government.

Sir,

With due deference I take the liberty to state, that in pursuance of your kind suggestion I had the honor to submit to the Native Education Society my two manuscript Grammars, of which the Persian one, was soon afterwards returned to me as being not useful in forwarding the objects of the Seciety. The other, viz., the Marathee was very carefully examined by them, and I am happy to bring to your kind notice the favourable remark made upon it by the Gentleman to whose criticism it was submitted. I enclose herein for your satisfaction a copy of it and that of a letter received from the Secretary to the Society, from which you will know all the particulars that might have otherwise been necessary to mention here. Suffice it to say in this place that the Society does not condescend to publish my work which it leaves me to do a task which my circumstances are too narrow to undertake merely in dependance on its sale. I therefore most earnestly pray that his Excellency in Council would be pleased to patronise the works ( I include also the Persian ) which I have been at great pains to compile for upwards of two years under the most sanguine expectation that they would most certainly meet the patronage of the N. E. Society and will be published at their expense, from the combination of circumstances-the one being the great usefulness and the want of such works particularly the Marathee one), so universally felt at present, and the other being the connection in which their compiler stands to that Noble Institution. But I am quite disappointed, and my heart sinks under the idea that such an unceasing labour of two years is very likely to be quite fruitless. I do not mean to say fruitless because I derive no profit from them but because the boys in

the Marathee Schools established by Government and the Marathee students in general, as also the Marathee people studying Persian, would be totally debarred from some assistance which these works might afford them. I therefore most sincerely and earnestly request that our Government would extend its liberality in patronizing these works, and thereby revive the dejected mind of their humble author. The estimated price of the Marathee Grammar will, I trust, not exceed 3 rupees and that of the Persian and Marathee 2 rupees per copy.

I have the honor to be,
Sir,
Your most obedient servant,
Sd/- Dadoba Pandoorung.

Bombay, 2nd April 1836.

## मि. वॉथेनचें उत्तर

To

Dadoba Pandoorung,

In answer to your letter of the 2nd ultimo I am directed by the R. H. the G. C. to inform you that Govt. regrets it cannot comply with your request to publish the works referred to at its own expense, but under the special circumstances stated will subscribe for certain number of copies.

By order,
Sd/-W. H. Wathen.

6th May, 1836.

अशा प्रकारें सरकारकडून नकार आल्यावर दादोबांनीं तें स्वतःच्याच जबाबदारीवर गणपत कृष्णाजीच्या छापखान्यांत १८३६ सालीं मुद्रित केलें. यावेळीं दादोबा जावा संस्थानामध्यें गेले होते, याचा निर्देश मागें आलाच आहे. १८३८ सालीं तिकडून परत आल्यावर या पुस्तकाच्या पन्नास प्रती त्यांनीं सरकारकडे वॉथनमार्फत भेटीदाखल पाठविल्या, व सरकारनें त्यांपैकीं दोन परीक्षणमंडळाकडे रवाना केल्या.

परीक्षकमंडळांतील मे० कँडी व बाळशास्त्री जांभेकर यांनीं कांहीं दुरुस्त्या सुचवून व नव्या सूचना करून लिहिलेले विस्तृत अभिप्राय उपलब्ध आहेत. त्यांतील महत्त्वाचे दोन उतारे देतों:—

पुणे कॉलेजचे सुपरिंटेंडेंट मे० थोमस कँडी (जेजूरी, ता. १५ मार्च १८३८) म्हणतात,

"I beg to report very favourably of the work upon the whole. I think that it does the author great credit, and that it is deserving of the patronage of Government. It would be a useful work for the senior classes of the Government Marathee Schools and would be a suitable present to deserving scholars at the annual examination." १

बाळशास्त्री जांभेकर आपल्या ता. ११ नवंबर १८३८ च्या परीक्षणलेखांत लिहितात,

"I think this Grammar tolerably well executed. It is much superior in point of arrangement to another work that has been published by Gungadhur Shastree, on Marathee Grammar, and its definitions are much more clear and precise. As a first attempt we must make allowance for its few imperfections, which are far from being such as to outweigh its merits. **It seems in many points to enter into the philosophy of Grammar which has not yet been done in any Grammatical treatise in Marathee,** and the notes in smaller letters contain great mass of useful information and instructive discussions in illustration of the obscure parts or in support of the preference which the author has given to particular opinions. The work must, therefore, prove a valuable sequel to the study of the smaller Grammars now in use in the school of Government." २

मे. कँडी व बाळशास्त्री यांच्या अभिप्रायावर अॅ. गव्हर्नमेंट सेक्रेटरी Mr. W. S. Boyd यांनीं पुढील शेरा मारलेला आहे:—

---

१ G. D. 1840, Vol. 540, p. 136.
२ G. D. 1840, Vol. 540, p. 139.

The author is requested to peruse the critiques on his Work and take benefit of the valuable opinions given and submit the work with such alteration as he may think proper to adopt in consequence.

By order of the Hon'ble the Governor in Council,

Sd—W. S. Boyd.

Bombay Castle, 29th November, 1838.

छापील पुस्तकांत दुरुस्त्या करून परत काय पाठविणार ? भेटीदाखल पाठविलेल्या पन्नास प्रती गेल्या व सरकारकडून असें हें विचित्र उत्तर ! दादोबा जे सरकारी आश्रयाबद्दल हताश होऊन बसले ते १८४० मध्यें त्यांनीं पुनः या दिशेनें हालचाल सुरू केली. ता. १२ फेब्रुवारी १८४० रोजीं सरकारला पाठविलेलें त्यांचें पत्र पुढीलप्रमाणें आहे.

To

W. R. Morris, Esq.

Secretary to Government,

General Department.

Sir

In reference to the instruction contained in Mr. Boyd's indorsement dated 29th November 1838 requesting that the Grammar compiled by me and of which 50 copies had been presented thro' the late Chief Secretary Mr. Wathen to Government for their Murathee Schools in the interior should be submitted to Government with such alterations as my perusal of the critiques offered on it by Capt. Candy, the Superintendent of the Poona College and Government Schools and Mr. Ball Gungadhur Shastri, the Assistant Professor in the Elphinstone College may suggest, I take the liberty to state that the Grammar referred, had already been published, as may be seen before these critiques were offered, so it is now too late to adopt any alterations, as recommended by the learned Gentlemen unless it be contemplated to issue a second edition.

I may now take the liberty to acquaint that there have still remained out of 700 copies originally taken off, about 250 copies undisposed from which it can be fairly judged that far from attaining any encouragement for the work as it has been usually the case I have not been able even to recover the expenses and labour bestowed upon its compilation a circumstance the more to be regretted when it will be considered that this has been almost a new attempt in Murathee to organize language and to reduce it to a Grammatical system in the manner in which it is now presented.

That the Grammar in its present shape may be advantageously used in the Government Murathee Schools, will appear quite evident from the extracts made from the critiques already referred to and which for the better understanding of the subject I beg leave to annex.

I therefore most humbly beg that you will have the kindness to lay this my memorial before His Excellency in Council requesting that Government in consideration of the labour and usefulness of the work would be pleased to take the remaining copies for their schools, and should they prove useful to such an extent as to create a demand for its second edition, it will afford me the highest pleasure and inducement to bestow upon the work the most diligent care and attention in order to render it more serviceable by additional improvements.

I have the honour to be,<br>
Sir,<br>
Your most obt and humble servant,<br>
Sd/- Dadoba Pandurang

Bombay,<br>
12th February, 1840.

दादोबांची हांक शेवटीं सरकारनें ऐकिली व आपल्या पुस्तकाची किंमत काय आहे, अशी ता. १९ जून १८४० च्या पत्रानें त्यांना विचारणा करण्यांत आली. याला उत्तरादाखल पाठविलेल्या ता. २२ जून १८४० च्या पत्रांत दादोबा

लिहितात कीं, जरी या पुस्तकाची किंमत प्रथम अडीच रुपये ठेवण्यांत आली असली तरी दर प्रतीमागें दीड रुपया आकारून या सर्व प्रती सरकारास देण्यांत येतील. शेवटीं या सर्व म्हणजे २५० प्रती ३७५ रुपयांला दादोबांकडून सरकारनें विकत घेतल्या.

या वरील पुराव्यावरून दादोबांची समजूत कशी चुकीची आहे तें कळून येईल.

एल्फिन्स्टनच्या वेळचें देशी ग्रंथनिर्मितीच्या प्रोत्साहनाचें मुंबई सरकारचें जुनें धोरण आतां राहिलें नव्हतें. अर्स्किनला पाठविलेल्या ता. १४ नवंबर १८२६ च्या पत्रांत एल्फिन्स्टन लिहितो, "We are bringing up and sending out schoolmasters with small salaries, and are printing books, besides offering rewards as high as 5,000 rupees and more, if recommended by a committee, for translations from English into native languages, or for original treatises on those languages on subjects of science. **To my great disappointment this invitation has produced hardly any candidates.**"[1]

'मुंबईची हैंद शाळापुस्तकमंडळी' चें ता. ८ एप्रिल १८२५ चें एक "प्रसिध्धिपत्र" उपलब्ध आहे त्यांत "व्याकरण मराठी भाषेचें" पाहिजे असल्याचें नमूद आहे. त्यांतील खालील उताऱ्यावरूनही त्या काळचें सरकारी धोरण कळून येईल—

"१ ही मंडळी सर्वांस विदित करित्ये कीं, जो कोणी बालबोध अथवा प्रौढ ग्रंथ यांचीं मराठी किंवा गुजराथी बोलींत चांगलीं भाषांतरें करून आणील अथवा या दोहों भाषांत मान्य पडे असा आपले कल्पनेनें नवीन ग्रंथ रचील किंवा पुढें सांगीतले प्रकाराचे ग्रंथ हिंदुस्थानी भाषेंत करील त्यास बक्षिस देण्याविषयीं गवरनर कौंशळ यांहीं उदार होऊन या मंडळीस समर्थ केलें आहे.

"२ बक्षिस देण्याचा प्रकार असा आहे कीं बालबोध ग्रंथाचीं भाषांतरें करणारांस अथवा नवीन बालबोध ग्रंथ करणारांस शंभर रुपयांपासून चारशें रुपये-पर्यंत प्रतिपुस्तकीं बक्षिस मिळेल आणि प्रौढ ग्रंथाचीं भाषांतरें करणारांस दोन हजार रुपयांपासून पांच हजार रुपयेपर्यंत बक्षिस मिळेल.

1 Life of Mountstuart Elphinstone, Sir T. E. Colebrooke Vol. II, 1884, p. 189.

" ३ जो कोणी फार चांगला ग्रंथ करून आणील तो पाहून या मंडळीस दिसेल कीं या ग्रंथ करणारास पांच हजारापेक्षां अधिक बक्षिस असावें तर तें त्यास द्यावयासाठीं गवरनर कौंशल यांस शिफारस केली जाईल.[१] " वगैरे.

दादोबांसारखे नवे ग्रंथकार तयार होतात तोंच सरकारचें औदार्य आटलें. नदीवरचा पूल बांधून तयार होतो तोंच ती शुष्क व्हावी, तशांतला हा प्रकार होता !

१८५० सालीं या व्याकरणाची " महाराष्ट्र भाषेचें व्याकरण " या नांवाखालीं दुसरी आवृत्ति निघाली. १८३६ सालची पहिली प्रत या दुसऱ्या आवृत्तीशीं ताडून पाहिली तर ही दुसरी आवृत्ति म्हणजे केवळ एक नवीनच ग्रंथ आहे, इतकें या नव्या आवृत्तीचें स्वरूप अजिबात पालटलेलें आढळतें. पुढच्या चवदा वर्षांत दादोबांनीं संस्कृत भाषा व व्याकरण यांचा प्रत्यक्ष अभ्यास केला व मराठी भाषेच्या स्वरूपाचें जास्त बारकाईनें निरीक्षण केलें ; परंतु त्यांना सर्वोत्कृष्ट व्याकरणकार म्हणून कीर्ति त्याच्या व्याकरणाच्या १८३६ सालच्या पहिल्या मुद्रणानेंच मिळवून दिली होती, हें लक्षांत ठेवण्यासारखें आहे.

दादोबांच्या व्याकरणाची वर सांगितलेली दुसरी आवृत्ति ज्यावेळीं बाहेर पडली, त्यावेळीं या ग्रंथाचें एकंदर स्वरूप पाहून लोक थक्कच होऊन गेले. पण आजच्याप्रमाणें त्या काळींही ' परोत्कर्षासहिष्णु ' लोकांची वाण नव्हती. त्यांनीं अशी ' कंडाळी ' उठविली कीं, मयत बाळशास्त्री जांभेकर यांचेच कागदपत्र दादोबांच्या हातीं लागल्यावर त्यावरून हें व्याकरण त्यांनीं तयार केलें व स्वतःच्या नांवानें छापलें ! अशा निंदक लोकांपासून आपला बचाव करण्याकरितां आपल्या विद्वत्तेविषयीं स्वतः बाळशास्त्र्यांचा काय अभिप्राय होता, हें लोकांपुढें दादोबांना ठेवावें लागलें. दादोबांविषयीं ता. ३० एप्रिल १८४० च्या दाखल्यांत बाळशास्त्री लिहितात,

" In the knowledge of the English language, general literature and science, I consider him equal to the best educated natives of Bombay, while no one among them that I know of is so well acquainted with the grammatical structure of the Marathi language. He is the author of a grammar of that

१ ग्रंथांचीं भाषांतरें किंवा नवीन ग्रंथ करणारांस बक्षिसांविषयींचे प्रसिध्धिपत्र, मुंबई, १८५५.

language, which is deservedly esteemed as the best work on the subject." [१]

डॉ. विल्सन आपल्या मासिकाच्या एका तळटीपेंत लिहितात, "This is an excellent Marathi Grammar lately published by the writer and which we confidently recommend." [२]

यावरून दादोबांच्या थोरवीचा पाया अल्पवयांत लिहिलेल्या या पहिल्या व्याकरणानेंच कसा घातला गेला होता, हें कळून येईल.

सरकारनें घेतलेल्या दादोबांच्या व्याकरणाच्या पहिल्या मुद्रणाच्या प्रती ज्यावेळीं संपत आल्या त्यावेळीं म्हणजे डिसेंबर १८४५ मध्यें, "तुमचें व्याकरण पुनः छापणें अवश्य आहे, त्यास तुमच्या मनांत त्यांत कांहीं फेरफार करावयाचा असल्यास तो करून तुह्मीं दुसरी आवृत्ति तयार करावी," अशी बोर्ड ऑफ एज्युकेशननें त्यांना सूचना केली. तिला अनुसरून १८५० सालीं प्रसिद्ध झालेली दुसरी आवृत्ति त्यांनीं तयार केली.[३] हिची विस्तृत प्रस्तावना विद्वत्तापूर्ण व वाचनीय आहे. १८७२ सालच्या सहाव्या आवृत्तीपर्यंत जशाची तशी ती पुनर्मुद्रित केलेली आढळते. तिच्यांत दादोबा लिहितात, "इचा मुख्य उद्देश हाच कीं, जितकें साधेल तितकें करून आजपावेतों जिला नियमांत आणण्या विषयीं कोणी प्रयत्न केलाच नाहीं म्हणोन अत्यंत विस्खलित झालेली व व्याकरणरूप फणीनें जिला कोणीं विंचरलेंच नाहीं म्हणोन जींत अनेक ग्रंथि जमून फारच गुंतलेली अशी ही मराठी भाषा तिला कांहींतरीं नियमांत आणावी आणि दीर्घकाल ग्रथित जी तिची गूत ती हातीं घेऊन तिचे पदर सोडवून कांहींतरीं उकलण्याच्या धोरणांत आणून बसवावी." या व्याकरणाच्या, तिसरी (१८५७), चौथी (१८६६), पांचवी (१८६९), व सहावी (१८७२) अशा ज्या पांच आवृत्त्या निघाल्या त्या किरकोळ दुरुस्त्या व फेरफार वगळले तर केवळ पुनर्मुद्रणेंच होतीं, असें म्हणावयास हरकत नाहीं. सातवी (१८७९) आवृत्ति तयार करतांना "मागील सहावी आवृत्ति फार बारकाईनें शब्दशः तपासून, ठिकठिकाणीं शोध घालून नवनवे अगत्याचे नियम व अर्थाचीं प्रकाशनें व एकदोन नवीं प्रकरणें प्रविष्ट करून पन्नास पृष्ठांनीं हा ग्रंथ अधिक वाढविला आहे." दादोबांच्या ह्यानींनाल

१ मराठी भाषेचे व्याकरण, (आ० ७ वी, १८७९) प्रस्तावना पहा.

२ O. C. S., 1834, p. 35.

३ ज्ञानोदय, १ व १५ सेप्टेंबर, व १ अक्टोबर १८५१ मध्यें विस्तृत परीक्षण पहा.

ही शेवटची आवृत्ति होय. ता. २४ जुलै १८७९ रोजीं लिहिलेल्या तिच्या प्रस्तावनेच्या शेवटीं दादोबांनीं पुढीलप्रमाणें उद्गार काढले आहेत :—

" अलिकडेस मागच्या पंचवीस वर्षांपासून सर्व लोकांचा भर इंग्लिश भाषा शिकण्यांत फार वाढत चालल्या मुळें स्वभाषे विषयीं त्याच मानानें मोठी अनास्था वाढत चालली आहे; ही उघड अत्यंत शोचनीय गोष्ट माझ्या दृष्टी पुढें असतां हा असा स्वभाषा सुधारण्या विषयीं व्यर्थ परिश्रम करणें हा माझा शुद्ध वेडेपणा आहे, असें जरीं मला हस्तामलका सारखें ढळढळीत दिसत आहे, तरीं जीस मीं जननी प्रमाणें मानतों, त्या आपल्या भाषेची शेवटपर्यंत सेवा केल्या वांचून माझ्यानें राहवत नाहीं. "

## (२) मोठ्या महाराष्ट्र व्याकरणाची पूरणिका, १८८१, पृ० २४२.

ही सातवी आवृत्ति तयार करीत असतांना, " पुष्कळ स्थळें अद्यापि अपूर्ण, व्यंग, व उणीं अशीं राहून गेलीं आहेत, " असें दादोबांना आढळून आलें; तीं पूर्ण, निर्व्यंग, व पुरीं करावीं म्हटलें तर ग्रंथ फार वाढेल म्हणून डायरेक्टर मि. चॅटफिल्ड यांच्या सूचनेप्रमाणें दादोबांनीं एक नवाच ग्रंथ रचिला व त्याला 'सातव्या आवृत्तीची पूरणिका' असें नांव दिलें. हा ग्रंथ त्यांनीं १८८१ सालीं प्रसिद्ध केला त्याला इंग्रजी व मराठी अशा दोन माहितीपूर्ण प्रस्तावना जोडल्या आहेत. तो तयार करीत असतांना दादोबांची प्रकृति अत्यंत खालावलेली होती. त्यांतही त्यांचा तेवीस वर्षांचा मुलगा नारायण एकाएकीं क्षयानें आजारी पडून दोन अडीच महिन्यांनीं वारला आणि त्यांचा एक आधार नाहींसा झाला. या ग्रंथांचीं मुद्रितें तपासण्याचें काम त्यांनीं आजारीपणांत बिछान्यावर पडल्यापडल्याच केलें. यावरून त्यांची आपल्या मातृभाषेवरील भक्ति चांगल्या प्रकारें निदर्शनास येते. अलिकडे युरोपियन व देशी लोकांमध्यें मराठी भाषेचा एके काळचा जिव्हाळा राहिलेला नाहीं, याबद्दल त्यांनी खेद व्यक्त केलेला आहे. ' Philological and etymological treatise on the structure of the Marathi language ' या त्यांच्या संकल्पित ग्रंथाचा भाग तयार होण्याच्या मार्गांत आहे, अशीही या इंग्रजी प्रस्तावनेंत माहिती मिळते. तरीपण ' पूरणिका ' हा या विषयावरील आपला बहुतेक शेवटचाच ग्रंथ होय (" perhaps the last work on the subject by me ") अशी त्यांची भावना होती. ही प्रस्तावना ता. २० सेप्टेंबर १८८१ रोजीं पुरी

झाली व ता. १७ आक्टोबर १८८२ रोजीं त्यांचा अंत झाला. यावरून त्यांचें भाकीत अखेर खरें ठरलेलें दिसून येईल.

## मराठी व्याकरणाचे पाणिनि

या शेवटच्या ग्रंथांत, जन्माला येऊन मराठी भाषेकरितां आपण कांहींतरी कार्य केलें, अशा प्रकारची कृतकृत्यता किंवा धन्यताही सुदैवानें त्यांना प्राप्त झाली होती, असें दिसून येतें. आपल्या सुधारकी विचारांमुळें सनातनी ब्राह्मण लोक किंवा त्यांचें सांगणें म्हणजे 'बाबावाक्यं प्रमाणम्' असें मानणारे इतर जातीचे लोक जरी आपली निंदा व द्वेष करीत, तरी त्याच ब्राह्मणांपैकीं कांहीं लोक आपला गुणगौरव करून आपणास 'मराठी भाषेचे पाणिनि' असें संबोधूं लागले आहेत, असें मोठ्या विनयानें पण संतोषानें त्यांनीं प्रस्तावनेंत नमूद केलें आहे. ते लिहितात, "थोडक्या वर्षां वर एथें एल्फिन्स्टन विद्यालयांत बापुसाहेब पटवर्धन नांवाचे गृहस्थ संस्कृत भाषा पढविण्याच्या कामा वर उपगुरु होते. त्यांचा मजकडे येण्याजाण्याचा फार परिपाठ होता. त्यांची व्याकरणशास्त्रांत फार गति असून काव्य, नाटक, अलंकारांत सुंदर व्युत्पत्ति होती, आणि संस्कृत बोलण्यांत त्यांचें वाक्पटुत्वहि वर्णनीय होतें. त्यांणीं पुष्कळदां मला म्हणावें कीं—" दादासाहेब, आपल्यास एथें आपली केवढी योग्यता आहे हें कांहींच ठाऊक नाहीं, परंतु आमच्या मिरज व कोल्हापूर प्रांतीं व शाहपूर बेळगांवाकडे चला म्हणजे आपण पहाल कीं आपलें व्याकरण शिकलेलीं पोरें आह्मांस बोलूं देत नाहींत; आह्मीं एकादे समयीं त्यांची चुकी काढिली, किंवा हें सांगतां यास प्रमाण काय ह्मणोन विचारिलें, तरीं तीं लागलेंच आपल्या व्याकरणाचें प्रमाण दाखवून आमचें तोंड बंद करितात. आपण मराठी व्याकरणाचे केवळ पाणिनि झालां अहां, हें आपण कोठें जाणतां." मग मीं अधोमुख होऊन त्यांस म्हणावें, " जाऊं द्या, बापुसाहेब, अशी भलतीच उपमा देऊन आमचा विनोद करूं नका. मग त्यांणीं म्हणावें, " दादासाहेब, हा विनोद नव्हे, चला मजबराबर, लागलेंच मीं खरेंखोटें आपल्या प्रत्ययास आणून देतों. मग लज्जेनें मीं ती गोष्ट उडवून त्यांस दुसऱ्या विषया वर बोलण्याच्या नादास लावावें. एकदां मला एका इंग्लिश गृहस्थास काशीक्षेत्राची रचना दाखविण्या करितां शिफारस-पत्र देण्याचें जरूर पडल्या वर काशींतल्या एका गृहस्थाचें नांव मला त्याच्या भावानें एथें सांगितलें, आणि ते ह्मणाले, 'मीं आपणास एक पत्र देतों, आपणहि आमच्या बंधूस दोन ओळी ल्याहाव्या म्हणजे ते सर्व आपल्या मित्राचें इष्ट कार्य करितील.

मग मीं त्यांस इतकेंच आपल्या पत्रांत दर्शविलें कीं माझें नांव आपणास अपरिचित असतां हें पत्र लिहिण्याची मीं धिटाई केली आहे, त्याची मला क्षमा असावी. त्यावरून त्यांणीं मला त्या पत्राच्या उत्तरांत असें दर्शविलें कीं, "आपलें नांव एथें आह्मांस अपरिचित असेल इतक्याच आपल्या लिहिण्यावरून आह्मांस आश्चर्य वाटलें. एथें दाक्षिणात्य पंडित आपणास महाराष्ट्र भाषेचे पाणिनि असें समजतात. मग आह्मांस तें नांव अपरिचित कसें असेल बरें." या नंतर एथें रावसाहेब गोपाळराव देशमुख हे थोर, विद्वान्, मोठे शोधक, मर्मज्ञ, आणि सरकारदरबारांत मोठ्या मान्यतेचे प्रसिद्ध गृहस्थ असून त्यांणीं अलिकडेस लोकोपकारक असे ग्रंथ प्रसिद्ध केले आहेत. त्या एकदोन ग्रंथांत त्यांहीं आमचें नांव अलिकडील विद्वानांच्या श्रेणींत दाखल करून एकीकडेस महाराष्ट्र भाषेचे पाणिनि असें म्हटलें आहे तें वाचून मीं आपली मान खालीं घातली, आणि मनांत म्हणालों, कोण ही अतिशयोक्तीची उपमा ![1] आणखी, अलिकडील नव्या तरुण विद्वान् गृहस्थां मध्यें मोठे रसिक व मर्मज्ञ व ज्यांचा महाराष्ट्र लेखणीस हात धरणारा असा मला फारच विरळा दिसतो, असे जे निबंधमालाकार यांची आह्मांविषयींची आजपर्यंत जी थोडी वक्रदृष्टि होती तिही आतां सरळ प्रेमयुक्त अशी त्यांची कृपादृष्टि होत चालली आहे, हेंहि आतां त्यांच्या लेखा वरून आमच्या अनुभवास ते आणून देत आहेत[2]......हा आत्मस्तुतिपर लेख या स्थळीं

---

१ निबंधसंग्रह (प्रथमांश) (१८६६) या ग्रंथांत यासंबंधी दोन उल्लेख आढळले :—

(१) "प्रस्तुत काळीं इंग्रजी ग्रंथाचे आधारानें किती एक भाषांतर करणारे झाले आहेत. परंतु मूळ ग्रंथ या स्वमार्गेंत करणारे अजून फारसे झाले नाहींत. दादोबा पांडुरंग ज्यांनीं व्याकरणाचा निबंध स्वतां शोध करून पाणिनीप्रमाणें आपले अकलेनें बांधला असे मूळ ग्रंथ करणारे थोडे निघतील." (पृ० ७३४)

(२) "......ब्राह्मण आपल्यास हल्लीं ऋषी म्हणवीत नाहींत. आतां स्तोत्रें पाहिलीं तर प्रत्येक स्तोत्रास व मंत्रास ऋषी लावला असतो तो त्याचा कर्ता होय हें प्रसिद्ध आहे. जसा रामरक्षेचा कर्ता बुधकौशिक, शिवकवचाचा ऋषभ व गीतेचा व्यास यावरून ऋषी म्हणजे ग्रंथकर्ते असें ठरतें. तेव्हां या न्यायानें अलीकडील ग्रंथकारांसही ऋषी म्हणावयास बाध काय ? असा आमचा प्रश्न आहे. म्हणजे मराठी भाषेचें व्याकरण करणारे दादोबा पांडुरंग यांस पाणिनीप्रमाणें ऋषी कां म्हणूं नये ?" (पृ० ८२०)

२ निबंधमाला, अक्टोबर १८७४ अंक १०, पृष्ठ ६.

"संस्कृत, इंग्लिश वगैरे भाषा व्याकरणाच्या अटकावांत आज शेंकडो वर्षे तरी आहेत. पण आमच्या मराठीस तो संस्कार नुकता नुकता लागत चालला आहे, असें ह्मणावयास हरकत

प्रसंगानुरोधानें अनिवार्य होता म्हणोन त्यास बाहेर काढणें जरूर पडलें त्याची वाचकांनीं आम्हांस क्षमा केली पाहिजे. ही जरीं पाणिनीचीं उपमा फारच अतिशयोक्तीची असून, ती आम्हांस दिल्यानें आणखी त्या पवित्र नामाभिधानास बराच ओंवळेपणा आल्या सारखें आम्हांस वाटून, आम्हीं आपल्या मनांत फारच लज्जायमान होतों; तथापि या उपमेनें एक मोठेंच कार्य साधिलें;—तें असें कीं–ती उपमा आमच्या मनांत येतांच लागलीच तिणें अशी ईर्षा उत्पन्न केली कीं, पाणिनींच्या पादुका उचलणाराच्या पादुका उचलणाराची जरीं आम्हांस योग्यता मिळाली, तेंहि आमचें मोठेंच भाग्य किंवा त्याचा अंश साधेल तितका संपादन करण्यास आतां झटावेंच झटावें."

कृष्णशास्त्री चिपळूणकर यांनीं शालापत्रकांत जी लेखमाला लिहिली त्यांतील पहिल्याच निबंधांत दादोबांच्या व्याकरणाला उद्देशून ते म्हणतात, "त्याच्या योगानें विद्यावृद्धीस जें पुष्कळ साहाय्य झालें व अद्यापि होत आहे, त्याबद्दल त्या ग्रंथकर्त्याची प्रशंसा करणें व त्याचे आभार मानणें अवश्य आहे असें आम्ही समजतों. मराठी व्याकरणरूप विषयास पूर्णता आणण्याविषयीं रावबहादूर दादोबा पांडुरंग यांनीं बहुत शोध व पुष्कळ विचार केल्याची साक्ष त्यांचा ग्रंथ स्पष्टपणें देत आहे. त्या श्रमानें त्यांनीं पुढील ग्रंथकर्त्यांचे श्रम हलके केले यांत संशय नाहीं व या मदतीबद्दल पुढील मराठी व्याकरणकर्त्यांनीं रावबहादूर यांचे उपकार मानणें अवश्य आहे.[१]" कृष्णशास्त्री गोडबोले यांनींही आपल्या 'मराठी भाषेचें नवीन व्याकरण' या ऐतिहासिक दृष्टीनें लिहिलेल्या ग्रंथांत दादोबांचें ऋण मान्य केलें आहे. इतर शालोपयोगी व्याकरणग्रंथ वगळले तरी मोरो केशव दामले यांनीं आपल्या 'शास्त्रीय मराठी व्याकरण' या बृहद्ग्रंथांत दादोबांची जी मुक्तकंठानें स्तुति केली आहे तीही येथें देणें अप्रासंगिक होणार नाहीं. ते लिहितात,[२] "मराठीच्या आद्य वैयाकरणाचा मान दादोबांसच मिळतो हें योग्य आहे. दादोबांनींच या शास्त्रास मूर्त स्वरूप देऊन त्यास नीटनेटकेपणा, सौंदर्य, उज्ज्वलता, व पूर्णता आणण्याचें कामीं

---

नाहीं. तिचें नियमन करण्यासच आमच्या पाणिनीनें उद्योग केल्यासच नुकतीं कांहें वर्षें होत आहेत." (लेखनशुद्धि.)

१ मराठी शालापत्रक, पुस्तक ५, अं. १, ता० १ मे १८६५, पृ० १८.

२ शास्त्रीय मराठी व्याकरण, १९११, उपक्रम, पृ. १.

आपल्या आयुष्यभर काळजीपूर्वक अव्याहत मेहनत केल्यामुळें तेच मराठी व्याकरणाचे प्रवर्तक होते."

दादोबांच्या निधनोत्तर त्यांच्या व्याकरणाच्या आठवी (१८८५), नववी (१८८९), दहावी (१८९४) व अकरावी (१८९९) अशा चार आवृत्त्यां निघाल्या. कॅनव्हासिंगची कला त्यांच्या प्रकाशकांना माहीत नसल्यामुळें असो किंवा पुस्तकाच्या गुणांवरच ते फाजील विसंबून राहिल्यामुळें असो, हा ग्रंथ मार्गे पडला व विसाव्या शतकाला त्याच्या एकाही पुनरावृत्तीचें मुखदर्शन झालें नाहीं! जुन्या काळीं आरंभीं जांभेकरांचें 'बालव्याकरण' व पुढें वरच्या वर्गास गंगाधरशास्त्री फडके किंवा दादोबा यांचें व्याकरण शिकवावें, असा प्रघात होता. दादोबांनीं 'माबाईच्या ओव्या' लिहिल्या आहेत, त्यांत एका व्यक्तीच्या बालपणच्या पुढील गोड आठवणी आहेत :—

हळूहळू मला। विद्येची कि गोडी।
लागतां न सोडी। पुस्तकांना॥
पानें वीसतीस। **बालव्याकरण**।
आलें मला जाण। तोंडपाठ॥
समज पडतां। माझा त्यांत चांग।
**दादो पांडुरंग**। घेतला म्यां॥
कठीण तो ग्रंथ। न लागे मजला।
तरीं सोडायाला। नावडे तो॥
असें पाहुनियां। करी पंत प्रीति।
दादोक्त रीति। सांगे मला॥
अवघड स्थळें। उकलोनी सांगे।
आवड ती लागे। जास्त मला॥
बुद्धि प्रौढ व्हावी। कळाया तो ग्रंथ।
कळे सर्व अर्थ। प्रौढ होता॥

**(३) मराठी लघु व्याकरण, १८६५, पृ० ६+७४.**

दादोबांचें मोठें व्याकरण लहान मुलांस कठीण व बाळशास्त्र्यांचें बालव्याकरण अगदींच त्रोटक होतें. म्हणून त्या काळचे एक डेप्युटी एज्युकेशनल इन्स्पेक्टर

RUDIMENTARY GRAMMAR.

लघु व्याकरण.

The Educational Department of the Government of Bombay.

A

# RUDIMENTARY MARÁT,HÍ GRAMMAR

FOR THE USE OF

JUNIOR STUDENTS IN THE MARÁT,HÍ SCHOOLS,

BY

DADOBA PANDURANG.

AUTHOR OF MARÁT,HÍ GRAMMAR &c. &c.

Bombay:

PRINTED AT THE "INDU-PRAKASH" PRESS.

1865.

Price Annas 2.

# मराठी लघु व्याकरण

नवीन शिकणाऱ्या मुलां करितां

दादोबा पांडुरंग

यांणीं केलें.

मुकाम मुंबई एथें

" इंदुप्रकाश " छापखान्यांत छापिलें.

सन १८६५.

किंमत २ आणे.

गंगाधर रामचंद्र टिळक (लो० टिळक यांचे वडील) यांनीं "दादोबांच्या मोठ्या पुस्तकाच्या आधारेंच" एक लहान व्याकरण तयार केलें.[1] याची पहिली आवृत्ति १८५८ सालीं रत्नागिरी येथें 'जगन्मित्र' छापखान्यांत मुद्रित झाली. हिच्यावर प्रथम लेखकाचें नांव नव्हतें, पण पुढें तें घालण्यांत आलें. याची दुसरी (१८५९), तिसरी (१८६१), चवथी (१८६२), पांचवी (?) व सहावी (१८६४) अशा सहा वर्षांत सहा आवृत्त्या निघाल्या. यावरून अशा प्रकारच्या पुस्तकाची आवश्यकता किती होती, हें स्पष्ट दिसून येतें. पुढें १८६५ सालीं दादोबांनीं आपलें लघुव्याकरण प्रसिद्ध केलें. त्याच्या प्रस्तावनेंत ते लिहितात, "पहिल्या शिकणारांस व लहान मुलांस माझ्या मोठ्या व्याकरणाची समजूत पाडण्यास शिक्षकास फार कठीण पडतें म्हणोन पुष्कळ दिवसापासून बोभाट चालला होता. याकरतां त्याच व्याकरणाचा संक्षेप केला असतां तो बोभाट राहणार नाहीं, असा विचार करून विद्याखात्यांतील अधिकाऱ्यांनीं मलाच तें काम करावयास सांगितलें; त्यावरून संतोषानें हें पुढील संक्षिप्त व्याकरण म्यां रचिलें आहे आणि त्याचें नांव लघु व्याकरण असें ठेविलें आहे." टिळकांच्या व्याकरणाचें नांवही हेंच होतें. मध्यभागांतील एज्यु० इन्स्पेक्टर कप्तान टी. वार्डिंग्टण यांनीं आपल्या भागांतील शाळांस ता. १९ सप्टें० १८६५ रोजीं 'वटहुकूम' केला कीं, "गंगाधर रामचंद्र टिळक यांचें लघु व्याकरण मध्यभागांतील सर्व शाळांत तारीख १ जानेवारी १८६६ पासून शिकविणेचें बंद केलें आहे. गंगाधर रामचंद्र यांचे लघुव्याकरणाचे ठिकाणीं दादोबा पांडुरंग यांनीं केलेलें व्याकरण शिकविण्याचा ठराव केला आहे.[2]" ताबडतोब ता. २१ अक्टो० १८६५ रोजीं गंगाधर टिळकांनीं आपल्या लघुव्याकरणाच्या "सहाव्या आवृत्तीचीं सर्व पुस्तकें रा. सा० वि. ना. मंडलीक यांस प्रोक्त देऊन सदरहू बुकाची कापीराइट (मालकी) विकत दिली"[3] व या व्याकरणाची सातवी आवृत्ति १८७७ सालीं निघाली, यावरून या व्याकरणालाही मागणी होती असें दिसतें. दादोबांच्या हयातींत म्हणजे १८८२ पर्यंत त्यांच्या

---

१ तुल.—"रा. गंगाधर रामचंद्र टिळक यानें लघु व्याकरण...हा ग्रंथ विशेषेंकरून दादोक्त व्याकरणाचा फार थोडा संक्षेप आहे—" **मराठी शाळापत्रक**, पु० ५, अं. १ (१ मे १८६५) पृ. १९.

२ **मराठी शाळापत्रक**, पु. ५, अं. ६, अक्टो० १८६५.

३ तत्रैव, पु. ५, अं. ७, कव्हर.

लघुव्याकरणाच्या बारा आवृत्त्या निघाल्या. १९१९ तील २४ वी आवृत्ती एक लक्ष प्रतींची असून तिचे प्रकाशक दादोबांचे नातू होते. "वामनराव बावाजी दादोबा पांडुरंग तर्खडकर," असें आपलें नांव त्यांनीं या आवृत्तीवर घातलें आहे ! वामनराव हा दादोबांच्या सरळ (direct) संतानांपैकीं शेवटचा पुरुष १९२० सालीं वारला. ही चोविसावी आवृत्ति (एक लाख प्रती) विकण्याचा हक्क रा. भास्कर श्रीधर चौघुलें या नांवाच्या गृहस्थाला देण्यांत आला होता. असाच मागील एक लाख प्रतींची आवृत्ति छापून विकण्याचा हक्क नेटिव ओपिनियनचे म्यानेजर रा. विनायक बाळकृष्ण परांजपे यांना ता. ९ मार्च १९०८ रोजीं देण्यांत आला होता. दादोबांचा कुणी सरळ वारस नाहीं असें पाहून १९२७ सालीं चौघुल्यांनीं पंचविसावी आणखी एक लाख प्रतींची आवृत्ति कुणास न विचारतां दडपून छापिली ! शेवटीं दादोबांच्या बंधूचे नातु रा. भास्करराव सदानंद यांनीं यासंबंधी कायदेशीर इलाज करून लघुव्याकरणाचा मालकी हक्क स्वतःकडे घेतला व रा. केशव भिकाजी ढवळे यांच्या मार्फत ते स्वतः प्रसिद्ध करूं लागले. लघुव्याकरणाच्या आवृत्त्या कसकशा प्रसिद्ध होत गेल्या, हें पुढील टांचणावरून कळून येईल :—

प्रथम प्रसिद्धि (१८६५), २ री आवृत्ति (१८६६), ३ री (१८६७), ४ थी (१८६८), ५ वी (१८६९), ६ वी (१८७०), ७ वी (१८७१), ८ वी (१८७३), ९ वी (१८७४), १० वी (१८७७), ११ वी (१८७९), १२ वी (१८८२), निधनोत्तर १३ वी (१८८४), १४ वी (१८८५), १५ वी (१८८८), १६ वी (१८९०), १७ वी (?), १८ वी (१८९५), १९ वी (?), २० वी (१९०३), २१ वी (?), २२ वी (?), २३ वी (?), २४ वी (१९१९), २५ वी (१९२७), रा. के. भि. ढवळे यांच्या मार्फत प्रसिद्ध झालेल्या (यांच्यावर आवृत्त्यांचे अनुक्रमांक नाहींत.) १९३१, १९३२, १९३४, १९३७, १९४२, १९४३ व १९४४.

**(४) इंग्रजी व्याकरणाची पूर्वपीठिका**, मुंबई, १८६०। पृ० ४ + १०२.

मि. टी. के. आर्नोल्ड यांच्या मोठ्या इंग्रजी व्याकरणाच्या आधारें मि. एडवर्ड हार्वर्ड यांनीं केलेल्या इंग्रजी लघुव्याकरणाचें हें मराठी भाषांतर दादोबांनीं तयार केलें. त्या काळीं सरकारी इंग्रजी शाळांमध्यें वरच्या इयत्तांकरितां आर्नोल्डचें Classical English Grammar व प्राथमिक वर्गांकरितां Reid चें ग्रामर चालू होतें. रीडच्या जागीं हार्वर्डचें हें लघुव्याकरण (Rudimentary English Grammar) किंवा त्याचें

दादोबांनीं केलेलें भाषांतर चालू करावें, असा नवा हुकूम काढण्यांत आला. इंग्रजी व्याकरण इंग्रजींतून शिकवावें कीं मराठींतून शिकवावें, यांत जास्त सुफलदायी कोणतें हें अनुभवांतीं सिद्ध होईल, असें मि. हावर्डनें प्रस्तावनेंत म्हटलें आहे. दादोबांच्या मनांत इंग्रजी भाषेचें एक मराठींतून मोठें व्याकरण लिहावें असें होतें, पण तें कधींच प्रसिद्ध झालेलें दिसत नाहीं. ते वरील व्याकरणाच्या प्रस्तावनेंत लिहितात, "बहुत वर्षांपासून माझ्या मनांत इंग्लिश भाषेच्या व्याकरणाचें ज्ञान महाराष्ट्र विद्यार्थ्यांस त्यांच्याच भाषेच्या द्वारानें सुगम करून द्यावें अशी इच्छा उत्पन्न झाली होती. त्यांत अलिकडेस या देशांत बहुतकरून सर्व मोठमोठ्या ठिकाणीं इंग्लिश शाळा स्थापित होऊन त्या भाषेच्या अभ्यासाचा प्रचार वाढत चालला आहे. या कारणा वरून तर ती आपली इच्छा सिद्धीस नेणें फार अवश्यक जाणून लोकशिक्षणखात्यांतील मुख्य अधिकारी मेस्तर एडवर्ड ए. हावर्ड यांस म्यां ती गोष्ट सुचविली; ती माझी सूचना त्यांणीं मोठ्या उत्साहानें मान्य केली इतकेंच नाहीं, परंतु ही गोष्ट सिद्धीस नेण्या करितां अवश्यक जें इंग्लिश साहित्य तेंहि न मागतां त्यांणीं मला पुरविलें. या गोष्टीची वाटाघाट होत असतां त्यांच्या आणि माझ्या विचारांत इतकाच भेद राहिला किं माझ्या मनांत विस्ताररूपानें जो ग्रंथ लिहावयाचा होता त्याची तूर्त अवश्यकता त्यांस दिसली नाहीं; लहान विद्यार्थ्यांस इंग्लिश भाषेच्या मूळपीठिकेचें ज्ञान तूर्त त्यांच्या भाषेच्या द्वारानें करून दिलें म्हणजे पुरे असें त्यांचें म्हणणें पडलें; माझ्या मनांत प्रौढ वयस्क व ज्यांस स्वभाषेचें ज्ञान परिपूर्ण असेल अशा एतद्देशीय विद्यार्थ्यांच्या उपयोगा करितां इंग्लिश व्याकरणाच्या बारीक बारीक खोंची, व जेथें जेथें त्या व्याकरणाचे नियम आपल्या भाषेच्या नियमाशीं मिळतात, व जेथें जेथें ते मिळत नाहींत तेथें तेथें ते सर्व दाखवून त्यांचें ज्ञान सुलभ करून दाखवावें, अशा उद्देशानें एक विस्ताररूपानें ग्रंथ ल्याहावा असें होतें; परंतु तो आपला विचार सिद्धीस नेण्याचे पूर्वी जरीं हावर्डसाहेबांच्या विचारा प्रमाणें लहानशा इंग्लिश व्याकरणाचें भाषांतर मराठींत झालें तरीं तें माझ्या विचारास साहाय्यकारीच होईल, असें समजून हें पुढील त्यांनीं दिलेल्या व छापविलेल्या इंग्लिश पत्रांचें म्यां भाषांतर केलें आहे."

या पुस्तकाची दुसरी आवृत्ति १८६३ सालीं पुणें येथें मुद्रित झाली. याशिवाय ज्यांचे उल्लेख सांपडतात, परंतु जे ग्रंथ प्रकाशित झालेले दिसत नाहींत, असे

निरनिराळ्या भाषांचें व्याकरणविषयक ग्रंथ पुढील आहेत.

**(५) संस्कृत भाषेचें व्याकरण.** (अप्रकाशित)

या पुस्तकाचें नांव त्यांच्या लघुव्याकरणाच्या विसाव्या आवृत्तीच्या (१९०१) मलपृष्ठावर आढळतें. "विद्वज्जनाचा आश्रय मिळाल्यास छापण्यांत येईल," असा प्रकाशकांचा शेरा आहे. आपण लघुकौमुदीचें भाषांतर केलें असल्याचें दादोबा लिहितात तो हाच ग्रंथ असावा. The Laghu Koumudi with the original sutras of Panini, translated and explained in Marathi with Notes and Observations असें या ग्रंथाचें वर्णन त्यांच्या कार्याविषयींच्या छापील इंग्रजी पुस्तिकेंत दिलेलें आहे.

**(६) फारशी भाषेचें मराठींत व्याकरण.** (अप्रकाशित)

**(७) फारशी भाषेचें इंग्रजींत व्याकरण.** ( ,, )

लघुव्याकरणाच्या विसाव्या आवृत्तीमध्यें या ग्रंथांची जाहिरात आहे. तसेंच उपरिनिर्दिष्ट इंग्रजी पुस्तिकेंत An Elementary Grammar of the Persian Language with numerous examples असें या व्याकरणाचें वर्णन आहे. १८३६ सालीं मराठी व्याकरणाबरोबर एक फारसी भाषेचें व्याकरण दादोबांनीं सरकारकडे आश्रयाकरितां पाठविल्याचा निर्देश मागील पत्रव्यवहारांत आलाच आहे.

**(८) गुजराती भाषेचें व्याकरण.** (? अप्रकाशित)

ता. ९ डिसेंबर १८६७ च्या 'ज्ञानप्रकाशाच्या' अंकांत बडोद्याच्या बातमीपत्रांत "दादोबा पांडुरंग यांस महाराजांनीं दरमहा ४०० रुपये पगार करून दिला व त्यांजला फारशी भाषेंत व गुजराथींत एक व्याकर्ण तयार करण्यास सांगितलें," असा मजकूर आढळतो. दादोबा वर्षभर बडोद्याला होते त्या अवधींत त्यांनीं गुजराती व्याकरण तयार करून दिलें असावें व तें बडोद्याच्या त्या वेळच्या अंदाधुंदीच्या कारभारांत कोठेंतरी गडप झालें असणें शक्य आहे.

★

११

# स्वीडनबोर्गच्या धर्मपंथाची जिज्ञासा

दादोबांची धर्मजिज्ञासा तरुणपणापासूनच कशी जागृत व प्रखर होती याचा निर्देश मागें आलाच आहे. त्यांच्या अखेरच्या दिवसांत स्वीडनबोर्ग याने स्थापन केलेल्या न्यू जरुसलेम चर्च नांवांच्या धर्मपंथाकडे त्यांचें लक्ष बरेचसें वेधलेलें होतें.

इम्यान्युएल स्वीडनबोर्ग (१६८८–१७७२) हा शास्त्रज्ञ व प्रख्यात गूढवादी (mystic) पुरुष स्वीडनमध्यें होऊन गेला. त्याच्या अभिनव तत्त्वज्ञानानें एके काळीं लोकांच्या चित्ताची विलक्षण पकड घेतली होती व जगभर त्याचे अनुयायी पसरले होते. आज त्या पंथाची काय स्थिति आहे ठाऊक नाहीं. बायबलचा त्यानें अगदीं नव्या पद्धतीनें अर्थ लावला असून मानवी प्राण्याच्या मरणोत्तर स्थितीसंबंधीं आश्चर्यकारक शोध प्रसिद्ध केले आहेत. विशेषतः आपणास स्वर्गगमन करतां येतें व तेथील देवदूत व आत्मे यांचें आपआपसांतील संभाषण आपणास समजतें व त्यांच्याशीं आपणास बोलतांही येतें, असी त्याची समजूत होती. इतकेंच नव्हे तर आपले ,स्वर्ग व नरक यासंबंधीचे अनुभव त्यांच्या तपशीलवार वर्णनासह त्यानें लिहूनही ठेविले आहेत. माणसाला ईश्वराच्या राज्यांत प्रवेश नाहीं, असें येशूनेंच म्हटलें आहे.[1] आपणास ही विशेष सवलत देण्याचें कारण ईश्वरानें



एम्यान्युएल स्वीडनबोर्ग

1 St. John III, 5, 13.

भूतलावर अवतीर्ण होऊन जी ख्रिस्ती धर्मसंस्थापना केली तिच्या तत्त्वांचा पुढील लोकांनीं आपल्या खोट्या आचरणांनीं विपर्यास केला आणि त्या आद्य तत्त्वांना उजाळा देण्याचें किंवा त्यांचें पुनरुज्जीवन करण्याचें कार्य आपल्याकडे सोंपविलें आहे, असा त्याचा आग्रह होता. अशा प्रकारचा दावा जर एखाद्या अडाणी माणसानें मांडला असता तर बुवाबाजी म्हणून त्याला सहज डावलतां आलें असतें; परंतु आध्यात्मिक शास्त्रांप्रमाणें भौतिक शास्त्रांतही स्वीडनबोर्गची तितकीच असामान्य पारंगतता होती. गणित, रसायन, खगोल, शारीर, पदार्थ-विज्ञान, अर्थशास्त्र धातुविद्या वगैरे वगैरे विविधशास्त्रांमध्यें त्यानें आश्चर्यकारक शोध लावले होते.[1]

स्वीडनबोर्ग (जन्म १६८८) याचें उच्च शिक्षण उपसाला विश्वविद्यालयामध्यें झालें. त्याच्या अठ्ठाविसाव्या वर्षी त्याची खनिजपदार्थपरीक्षक (Assessor of the Board of Mines) म्हणून नेमणूक झाली. या जागेवर असतांना त्यानें अनेकवार युरोपांत प्रवास करून तेथील इंग्लंड, हॉलंड, फ्रान्स, जर्मनी वगैरे देशांमधील विश्वविद्यालयें व खाणी यांचें निरीक्षण करून आपले शोध प्रसिद्ध केले. पुढें १७४३ सालीं म्हणजे आपल्या वयाच्या सुमारें पंचावन्नाव्या वर्षी आपणास कांहीं निराळी दृष्टि किंवा साक्षात्कार झाला असें वाटून त्यानें आपल्या नोकरीचा राजीनामा दिला, आणि भौतिक विषयांचा नाद अजिबात सोडून आध्यात्मिक जगाचा ध्यास धरला. आपल्या आयुष्यांत ही क्रांति कशी झाली याचें वर्णन त्यानेंच दिलेलें आहे. आपण एके दिवशीं खाणावळींत बसलों असतां ईश्वरानें आपणास दर्शन दिलें, पण आपण या पहिल्या भेटीला घाबरलों, असें सांगून तो लिहितो, "मी रात्रीं घरीं गेलों आणि पुनः तोच पुरुष मला दृष्टोस पडला; पण मी यावेळीं गांगरून गेलों नाहीं. तो मला म्हणाला, "जगाचा कर्ता व तारक जो

1 "The results of these studies exist to the present day in the form of volumes and tracts which travel over almost the whole surface of natural history and science and in which it is only just to-day, are found, more or less obscurely, many of the germs of recent and brilliant discoveries."—**An historical and critical view of the speculative philosophy of Europe in the Nineteenth century**, 2nd Edition, vol. I, p. 315.




स्वीडनबोर्गनें पाहिलेला परलोकांतील एक भाग.
( The Spiritual Diary of Emanuel Swedenborg, Vol. IV, 1889, p. 365. )

परमेश्वर तो मीच आहें. बायबलचा आध्यात्मिक अर्थ लोकांना सांगण्याकरितां तुझी मी निवड करीत आहें. या विषयावर त्वां काय लिहावें हें मीच तुला सांगेन." त्याच रात्रीं मला स्वर्ग व नरक यांचीं द्वारें उघडीं झालीं. तेथें मला निरनिराळ्या परिस्थितींतील आत्म्यांची ओळख पटली, आणि परलोकाच्या अस्तित्वाबद्दल माझी पूर्ण खात्री झाली. त्या दिवसापासून मी ऐहिक विद्यांचा अभ्यास सोडून परमेश्वराचे आज्ञेप्रमाणें आध्यात्मिक विषयांना स्वतःला वाहून घेतलें. पुढें ईश्वर बहुतेक दर दिवशीं मला दिव्य दृष्टि देई (opened the eyes of my spirit) आणि मला दुपारच्या प्रहरीं पूर्ण जागृतावस्थेंत असतां देवदूत व आत्मे यांच्याशीं संभाषण करतां येऊं लागलें." स्वीडनबोर्ग यानें लिहिलेले सगळे ग्रंथ मूळ लॅटीन भाषेमध्यें असून त्यांपैकीं बहुतेक ग्रंथांचीं इंग्रजीमध्यें भाषांतरें झालीं आहेत.[1] या सर्वांत त्याचा अत्यंत लोकप्रिय व प्रातिनिधिक ग्रंथ म्हणजे 'स्वर्ग, त्यांतील आश्चर्यें व नरक' (Heaven and its Wonders and Hell) हा होय. या ग्रंथाचीं भाषांतरें जगांतील साऱ्या भाषांत— जपानी व हिंदीसारख्या पौर्वात्य भाषांतही—झालीं असून स्वीडनबोर्ग सोसायटी-शिवाय इतर Every Man's Library सारख्या प्रकाशकानींही हा ग्रंथ प्रसिद्ध केला आहे. स्वीडनबोर्गच्या तत्त्वज्ञानाकडे दादोबांचें लक्ष वेधण्यास प्रथम हाच ग्रंथ कारणीभूत झाला, "स्वीडनबोर्ग ह्यांच्या मताविषयीं एका हिंदु गृहस्थाचे विचार," या नांवाचा जो एक पत्ररूपानें निबंध १८७८ सालीं इंग्रजी भाषेंत लिहून दादोबांनी स्वीडनबोर्ग सोसाइटीकडे लंडन येथें पाठविला[2] त्याच्या आरंभीं ते लिहितात.

"सुमारें दहा वर्षे झालीं एके दिवशीं मीं मुंबईच्या किल्ल्यांत फिरत असतां

---

१ स्वीडनबोर्गचा बायबलसंबंधीं पहिला ग्रंथ जो **Adversaria** (१७४५ ते १७४७ मध्यें लिहिला.) याचें मात्र इंग्रजी भाषांतर झालेलें मी पाहिलेलें नाहीं. **Arcana Caelestia** (स्वर्गीय गुपित) हा त्याच्या बायबलावरील टीकाग्रंथाची इंग्रजी आवृत्ति लंडन येथील स्वीडनबोर्ग सोसायटीनें सूचिसह तेरा खंडांत प्रसिद्ध केली आहे (१८७८–८०). त्याचा तिसरा महत्त्वाचा ग्रंथ म्हणजे आध्यात्मिक दैनंदिनी (**Spiritual Diary**) हा आहे. त्यांत परलोकांतील अनुभव त्यानें तपशीलवार रीतीनें कथन केले असून त्यांत फेब्रुवारी १७४७ ते एप्रिल १७६५ पर्यंतची नोंद आहे.

२ हा निबंध या सोसायटीनें पुस्तकरूपानें प्रसिद्ध केला असून त्याच्या तीन तीन आवृत्त्या लंडनमध्यें प्रसिद्ध झाल्या आहेत. त्याचें मराठी भाषांतर ग्रंथकारांच्या कन्या अहल्याबाई यांनीं आपल्या पित्यांच्या देखरेखीखालीं केलेलें प्रसिद्ध आहे, १८८१.

एका जागेंत लेलांव होत होतें, आणि जेथें लेलावांत घालण्यांत तयार केलेलीं जुनीं पुष्कळ पुस्तकें होतीं, तेथें मीं शिरलों. त्या पुस्तकां मध्यें एक जें बाहेरून वापरलेलें, आणि दुसऱ्या पंधरावीस जुन्या पुस्तकां बराबर बांधून ठेवलेलें होतें, त्याच्या सरनाम्या वरून माझे डोळे त्या कडे फक्त लागले. तो सरनामा **स्वर्ग आणि नरक** असा त्या पुस्तका वर लिहिला होता. त्या पुस्तकांच्या सरनाम्याचें पृष्ठ जरीं जलदीनें पहावें अशी माझी इच्छा म्यां दाखविली ; तरीं ज्या मनुष्याच्या हवालीं तीं पुस्तकें होतीं, त्याणें मीं त्या सर्व गठ्ठयांची इतर घेणाऱ्यां पेक्षां अधिक किम्मत बोलल्या वांचून माझी इच्छा मला पूर्ण करूं दिली नाहीं.

" विकरीची पाळी येईल तिची वाट पाहत मीं तसाच स्तब्ध राहिलों. त्या पुस्तकाच्या सरनाम्यानें मला इतकें मोहित केलें होतें कीं जरीं त्या गठ्ठयांत तीं बाकींचीं पुस्तकें नसता कचरा होता, तरीं त्यांची किम्मत देऊन तें पुस्तक विकत घेण्याचा म्यां निश्चय केला. म्यां तो सारा गट विकत घेतला, आणखी पुस्तकमजकुरांत कोणकोणते विषय आहेत हें जाणण्याची माझी मोठ्या जिज्ञासा होतीच. तेव्हां ती पूर्ण करण्या करितां म्यां तें सरनाम्याचें पृष्ठ लागलेंच तेथें अवलोकन केलें; परंतु तेणेंकरून माझी जिज्ञासा तृप्त न होतां त्यांतील सर्व अनुक्रमणिका वाचून पहावी म्हणोन उलटी ती अधिक वाढली. मीं त्वरीत घरीं आलों, आणि जसा एखादा भुकेला मनुष्य आपलें आवडतें जेवण मोठ्या घाईनें जेवतो, तसें मीं त्याचे अध्याया मागें अध्याय जणो गटगटा गिळों लागलों. त्या पुस्तकाचा कर्ता इम्यान्युएल स्वीदनवोर्ग यांचें नांव मला त्या वेळेस पहिल्यानेंच माहित झालें. "

ही गोष्ट १८६३ सालीं घडली. 'स्वर्ग व नरक' हा ग्रंथ वाचल्यावर दादोबांना स्वीडनबोर्गचे इतर ग्रंथही वाचण्याची अनिवार इच्छा उत्पन्न झाली. याच सुमारास त्यांचे परममित्र रा. ब. रामचंद्र बाळकृष्ण हे इंग्लंडांत प्रवास करीत होते. त्यांना लिहून दादोबांनीं स्वीडनबोर्गचे इतर इंग्रजींत भाषांतर झालेले ग्रंथ आणविले. 'टाइम्स ऑफ इंडिया' पत्राचे त्या वेळचे एक संपादक मि. माथियस मिल्ल यांनींही त्यांना गार्थ वुलकिन्सनकृत स्वीडनबोर्गचें जन्मचरित्र, प्रो. बुप याचें Reasons for embracing the Doctrines of Emanuel Swedenborg, रे. डॉ. बेइलीचे The Divine Word Opened व मि. नोबल याचें Appeal अशीं पुस्तकें दिलीं. हीं पुस्तकें वाचण्यांत दादोबा अगदीं रंगून

गेले. या ग्रंथांचा अभ्यास केल्यावर त्यांना ज्या शंका आल्या त्या त्यांनीं उपरि निर्दिष्ट स्वीडनबोर्ग सोसाइटीकडे पाठविलेल्या निबंधांत अन्तर्भूत केलेल्या आहेत. या निबंधानें युरोप व अमेरिका येथें मोठेंच कुतूहल उत्पन्न केलें होतें, असें त्या छापील इंग्रजी निबंधाच्या शेवटीं जे पंचवीसवर निरनिराळ्या प्रसिद्ध नियतकालिकांचे अभिप्राय उद्धृत केले आहेत त्यांवरून दिसून येतें. स्वीडनबोर्गच्या या ग्रंथाकडे दादोबांचें इतकें लक्ष वेधण्याचें कारण त्यांत व्यक्त केलेलीं मतें त्यांना अगदीं नवीन होतीं हें नव्हे; तर युरोप किंवा अमेरिका यांसारख्या आधिभौतिकाच्या मार्गे लागलेल्या देशांतही आधिदैविकवाद व परलोकावरील विश्वास मूळ धरूं लागला आहे, हेंच त्यांच्या कुतूहलाचें खरें कारण असावें. प्रचलित ख्रिस्तधर्ममतांच्या दृष्टीनें स्वीडनबोर्गचे विचार जरी कितीही अभिनव असले तरीपण ज्यांना भारतीय तत्त्वज्ञानाचा अभ्यास आहे त्यांना ते जुनेच आहेत. दादोबा लिहितात, "माझा हिंदु लोकांच्या धर्ममतांत आणि शास्त्रमतांत पूर्वी अभ्यास झालाच होता, तेणेंकरून नूतन यरुशलेम यांच्या धर्ममतांचें उत्सुकतेनें आणि सुखानें ग्रहण करण्यास माझी तयारी झाली होती...स्वीडनबोर्ग यांच्या ग्रंथाची माहिती होण्याच्या पुष्कळ पूर्वी म्यां मेस्मरिझम्-क्लेरवॉयन्स आणि आत्मविद्या, या विषयांवरचे लहानमोठाले बरेच ग्रंथ वाचून त्यांचा अभ्यास केला होता; आणि त्यांत माझें मन फार लागून गेलें होतें, ही गोष्ट एथें मला सांगितल्यावांचून राहवत नाहीं...हा मनुष्याचा ज्ञानाचा एक भाग युरोपाच्या आणि अमेरिकेच्या सुपीक जमिनीत आतांशा उगवूं लागला आहे; परंतु तिकडील केवळ शास्त्रीलोक नुसत्या त्याच्या पार्थिव भागाच्या फार पलिकडचा जो भाग तो न पाहतां केवळ पार्थिव भागच पाहतात असें मला दिसतें...हिंदूंच्या अद्वैतमताचा, म्यां पूर्वीच अभ्यास केला होता; योगशास्त्र अथवा त्यांचीं गुप्त मतें यांतही माझा शोध होता; याशिवाय हिंदु लोकांतील शेंकडो साधु यांचीं चरित्रें आणि मतें यांचें ज्ञान मला होतें; याशिवाय हिंदु लोकांच्या योगाशीं मिळत्या अशा मुसलमान सुफी लोकांचे आश्चर्यकारक अभ्यास आणि अद्भुत सिद्धि ज्यांत ते तसउफ अथवा इल्मेकशफ म्हणतात, त्याचीही मला माहिती होती. याशिवाय ख्रिस्ती लोकांचे मठाचे निरनिराळे बैरागी पंथ आहेत, त्यांमध्यें येशूचें हृदय या नांवाचा एक पंथ आहे, त्याचीही थोडी माहिती होतीच; या सर्व गोष्टींनें दैविक सृष्टीच्या गुप्त गोष्टींत मनुष्याच्या मनाचा प्रवेश होण्यांत अद्भुत प्रयत्न आणि पुढील भरंवसा या सर्वांचें योग्य ग्रहण

करण्यास माझी सिद्धता होण्याचा मार्ग तयार झाला होता. "—

## दादोबा मनानें ख्रिस्ती होते काय ?

अशा प्रकारची प्रस्तावना करून हा जो निबंध दादोबांनीं स्वीडनबोर्ग सोसाइटी-कडे पाठविला त्यांत हिंदुधर्मशास्त्र व स्वीडनबोर्गचे विचार यांच्यामध्यें काय फरक आहे आणि त्यांच्यामध्यें हिंदुधर्मशास्त्रच जास्त बरोबर कां, हें त्यांनीं शंकारूपानें ते लोक बिचकणार नाहींत किंवा त्यांच्या भावना बिलकूल दुखवणार नाहींत अशी विशेष सावधगिरी ठेवून स्पष्ट केलें आहे. अशा शंका काढण्यांत ख्रिस्तीधर्माविषयीं आपला अनादर किंवा द्वेषभाव आहे असें त्यांना वाटूं नये म्हणून ते लिहितात, "...ख्रिस्तीधर्मशास्त्र मीं आपल्या दृष्टीसमोर निरंतर ठेवित गेलों आहे. पिता, पुत्र, आणि पवित्र आत्मा यांच्या नांवानें अद्यापि माझा पवित्र जलानें संस्कार झाला नाहीं, म्हणोन मीं जरी धर्मबाह्य आहें, तरीं ख्रिस्तीधर्मशास्त्राचीं सर्व बाह्य अंगें, आणि मुख्य विषय हींपण म्यां चांगलीं अवगत करून आणि त्या शास्त्राचें तत्त्वज्ञान व उपपत्ति यांत कांहींसा ओढ शिरून, तें शास्त्र आपल्या सर्व जन्माच्या अभ्यासाचा विषय केला आहे."

प्रतिपक्षाच्या अगदीं पोटांत शिरून आपले विचार त्याच्या गळीं उतरविण्याची दादोबांची ही आर्जवी भाषापद्धति व हातोटी ज्यांना परिचित नाहीं त्यांनीं दादोबा मनानें ख्रिस्ती झाले होते, अशी आपली चुकीची समजूत करून घेतली आहे. दादोबांचा ख्रिस्ती धर्मशास्त्राचा खोल अभ्यास होता व ख्रिस्ताच्या नैतिक उपदेशा-विषयीं त्याला आदर होता याबद्दल वादच नाहीं. हिंदु धर्माच्या त्या काळच्या प्रचलित स्वरूपावर ते विटले होते हेंही खरेंच आहे. त्यामध्यें सुधारणा केल्या-शिवाय आपला तरणोपाय नाहीं, असें ते आग्रहानें सांगत. सुबोधपत्रिकाकार त्यांच्या मृत्युलेखांत लिहितात, "स्वीडनबोर्ग नांवाच्या ख्रिस्ती पंथाच्या मताविषयीं त्यांनीं आपले विचार इंग्रजींत लिहून विलायतेंत प्रसिद्ध केले त्यांत त्यांचा हेतु हाच होता कीं आमच्या शास्त्राशीं स्वीडनबोर्गचे विचार मिळतात हें दाखवावें.... आतां त्यांचे विचार कधीं कधीं ख्रिस्ती धर्माकडेस ओढत असें जें कित्येकांस वाटत असे त्याचें कारण ते कधीं कधीं म्हणत असत कीं, जर आपले लोक धर्मांत सुधारणा करीत नाहींत तर सांप्रत ख्रिस्ती धर्म सर्वांस घेण्यास मोकळा व सुलभ आहे, असे उद्गार त्यांच्या मुखांतून निघत एवढ्यावरून त्यांचें मत त्या धर्माकडेस आहे असें

वाटावयास लोकांस कांहींसें कारण झालें हें खचित आहे; परंतु त्यांचें मत वास्तविक ख्रिस्ती धर्मास अनुसरून होतें किंवा तो धर्म ईश्वरप्रणीत आहे असें ते मानीत असत असें नाहीं; त्यांचें वास्तविक मत एक परमेश्वराची भक्ति करावी व सर्व मनुष्यांनीं परमेश्वराशीं निष्कपटपणें व प्रेमभावानें वागावें असें होतें." "लहानपणापासून दादोबांचा विश्वास हिंदुधर्मावर असे. तो वयपरत्वें रूपांतर पावला तथापि शेवटपर्यंत अढळ राहिला होता," अशी जी याच लेखकानें ग्वाही दिलेली आहे तीही लक्षांत ठेवण्यासारखी आहे. राममोहन राय हेही मनानें ख्रिस्ती असल्याची कल्पना होती. आणि ते ज्यावेळी वारले त्यावेळीं त्यांच्या गळ्यांतील यज्ञोपवित पाहून पुष्कळांना आश्चर्याचा धक्का बसला असें म्हणतात. राममोहनचें औपनिषदिक तत्त्वज्ञानाचा पुरस्कार करणारें व मिशनऱ्यांशीं वादविवादात्मक असें पुष्कळसें वाङ्मय उपलब्ध असूनही [1] लोकांचा असा समज असावा, ही आश्चर्याची गोष्ट आहे. एकदा डॉ. डफला राममोहन म्हणाले,

"As a youth I acquired some knowledge of the English language. Having read about the rise and progress of Christianity in apostolic times and its corruptions in the succeeding ages and then of the Christian Reformation which shook off these corruptions and restored it to its primitive purity, I began to think that something similar might have taken place in India and similar results might follow here from a reformation of the popular idolatry."[2]

दादोबांची धर्मविषयक दृष्टि यापेक्षां निराळी नव्हती. दादोबांची ख्रिस्तासंबंधी काय कल्पना होती, हें आपणास त्यांच्या धर्मविवेचन या पुस्तकांत पहावयास सांपडतें. ते लिहितात, "ईश्वराचा पुत्र जो यीशु त्याच्याच द्वारानें पापविमोचन होतें हें वाक्य पहिल्या दर्शनास मोठें दुःसह दिसतें, परंतु मला तसें दिसत नाहीं. तुम्हीं म्हणतां हें अगदीं खोटें असें म्हणून लक्षावधि मनुष्यांचें अन्तःकरण दुखवून त्यांशीं वैर करावें त्यापेक्षां युक्तीनें होय म्हणून सर्वांशीं मैत्री करणें हें बरें. सर्व जगाचा पिता तर परमेश्वर खरा, हें तर सर्वांस मान्य आहे; मग यीशु ईश्वराचा पुत्र कां नव्हे! सर्व आपण ईश्वराचीं लेंकरें आहोंत खरीं, परंतु इतर मनुष्यांपेक्षां

1 English works of Ram Mohan Roy, Allahabad, 1906 पहा.
2 Life of Dr. A. Duff, Vol. I, p. 74.

त्याचें आचरण अत्यंत पवित्र व त्याच्यांत भगवत्तेज विशेष होतें म्हणून त्यास विशेषेंकरून ईश्वराचा पुत्र म्हणावयाचें. आतां त्याणें दाखविलेल्या सदाचरणानें व सन्मार्गानें चालले असतां सद्गति मिळत्ये, अर्थात् ही सद्गति मिळायास ज्या देशांत यिशूच्या धर्माची प्रवृत्ति आहे, तेथील जनांस यिशूचें द्वार म्हणजे मुख्य कारण होय. परंतु पुढें यिशूचे जे अभिमानी भक्त जहाले, ते आपल्या मनांत असें समजूं लागले कीं यिशूनें दाखविलेला जो सन्मार्ग व सदाचरणें तीं इतर देशांत अगदीं नाहींत हा एक मुळीं त्यांचा सिद्धांत. आणखी त्यांत धर्माभिमानी लोकांची तर अशी समजूत पडून गेली असत्ये कीं, यद्यपि यिशूनें जें सदाचरण सांगितलें आहे तदनुसार न वर्तलें, आणि त्याच्या नांवानें नुसतें मस्तकावर जलसिंचन केलें आणि त्याचे सांप्रदायी आपणास म्हणविलें तरी तितक्यावरून आपण तरूं. आणि इतर लोक जरी नीट सदाचरणानें चालले, आणि तितकें त्याच्या नांवानें जलसिंचन न केलें, तरी ती कदापि तरणार नाहींत. परंतु हें शुद्ध अज्ञान होय. कां कि त्या यिशूनें स्वतः म्हटलें आहे कीं, जेव्हां तुह्मीं माझ्या आज्ञेचें यथास्थित परिपालन कराल म्हणजे तदनुसार वर्ताल तेव्हांच तुह्मीं माझे खरे भक्त होत्साते ईश्वरी कृपेस पात्र व्हाल. नाहीं तर नुसत्या दांभिक आचरणानें तुमची सद्गति कदापि होणार नाहीं. यावरून स्पष्ट अनुमान होतें कीं, मुख्य तात्पर्य सदाचरणावर आहे. बाह्याचरणांत कांहीं अर्थ नाहीं. "[१] धर्मसंस्थापनेचे नर। ते ते ईश्वराचे अवतार। झाले आहेत पुढें होणार। देणें ईश्वराचें॥ असें रामदासांनीं म्हटलें आहे. त्या दृष्टीनें ख्रिस्ताला अवतारी पुरुष विवेकानंददेखील मानीत असत, हें त्यांचा Christ, the Messenger of God हा निबंध वाचला असतां दिसून येतें. फार काय परंतु स्वतः रामकृष्ण परमहंस यांनीं ख्रिस्तासंबंधीं, " It is the one and the same *Avatāra* that having plunged into the ocean of life rises up in one place and is known as Krisna, and diving again rises in another place and is known as Christ," असे उद्गार काढले आहेत. [२] यावरून ते मनानें ख्रिस्ती होते असें म्हणतां येणार नाहीं.

दादोबांच्या एका प्रकारच्या आर्जवी लेखनपद्धतीमुळें स्वीडनबोर्गवरील त्याच्या

---

१ धर्मविवेचन, पृ. ३५.

2 **Ramakrisna** ( His life and sayings ) **1923, F. Max Muller, p. 108.**

निबंधावर अभिप्राय लिहितांना कांहीं विदेशी समीक्षकांनीं त्यांना "A convert to the New Jerusalem Church," असें म्हटलें आहे. वास्तविक आर्य तत्त्वज्ञानाच्या दृष्टीनें स्वीडनबोर्ग कमी कोठें पडतो हेंच या पत्ररूपी निबंधांत त्यांनीं दाखविलें आहे. "A Hindu Gentleman's Reflections" असें जें पुस्तकाला नांव दिलें गेलें आहे त्यावरूनही त्यांची प्रवृत्ति कळून येते. न्या. मू. रानडे यांनीं या निबंधाचें परीक्षण पुणें सार्वजनिक सभेच्या त्रैमासिकांत करतांना दादोबांच्या मताची पारख बरोबर केली आहे. ते लिहितात,

## न्या० मू० रानडे यांची साक्ष

"R. B. Dadoba Pandurang deservedly occupies a foremost place in the ranks of thoughtful inquirers after religious truth, and the fact that his letter to the Swedenborgian or New Church has been published by that body in London is a great compliment. It is a great relief to us to find that, as the result of fifty years' study, Dadoba, though he reveres the Holy Bible, and has made Christianity the favourite study of his life, has failed to accept the current doctrines of the Christian religion as a satisfactory solution of the problems of life and death. To judge from his letter under review there is not a single point among the cardinal doctrines of the Christian Churches to which Dadoba has been able to subscribe unqualified adhesion; nay more, he has expressed his dissent from the philosophy and rationale of these doctrines with unmistakable freedom, and the general impression left on the reader's mind from the perusal of his letter is that both Dadoba and the Swedenborgian Church have more affinities and points of agreement with the philosophy and mysticism of the old Hindu Religion than with Christianity as it is professed and taught in the present day.

"We shall briefly enumarate the points of these affinities and divergences. (1) Dadoba admits without reserve that the doctrine of the Holy Trinity, i. e. of three persons in the Godhead, appears to him to be paradoxical, and the arguments usually advanced in its support are characterized

as mere cobwebs and stultiloquence. Dadoba would rather accept the *Trayamurti* of the Hindus as far more rational. The Swedenborgian solution of the question, namely that the father is the divine essence, the son is the personal manifestation of that essence, and the Holy spirit is its sanctifying energy and influence, is a creed which Unitarians and Hindu theists may well subscribe, except that it is weak in the important point noticed by Dadoba that, by regarding the incarnate Christ as the only personal manifestation of the essence, it affects God's character in its infinity and omnipresence, and as the ruler not of the earth only, but of myriads of worlds besides. Dadoba's suggestion that Christ represents a personal manifestation of only a very small drop of the great unbounded ocean of the divine essence reconciles his views with the Hindu philosophy of incarnation. (2) On the question of the origin of evil, the creed taught by the Christians of the fall of Adam and Eve, and the consequences it has entailed upon mankind, appears monstrous and unjust to Dadoba and the Swedenborgian solution that every man and woman are so many Adams and Eves, whose tempting serpent is their evil nature, which leads them astray in the false pride of knowledge and power, and the Eden tree of life is the growth of Godliness, the union of the man in the Lord and the Lord in the man, is the present Hindu theistic account of the great mystery, and has its foundations deep in the old Hindu philosophy. (3) With regard to the eternity of future rewards and punishments, and the final day of judgement, both Dadoba and the Swedenborgians repudiate the ordinary Christian notions as inconsistent with the divine character, and they subscribe to the Hindu theory that the soul is judged immediately after its separation from the body, and is relegated to other worlds corresponding with the *Swargs*, *Patals*, *Näraks* and *Loks* which Swedenborg professes to have seen in his visit to those parts in a state of absent or (*Turiya*) consciousness, and

where he found Heathens and Christians indiscriminately mixing with one another. (4) With regard to the doctrine of the resurrection, the Christian view that the resurrection is to be of the material body of flesh and bones is so puerile that Dadoba regards it as a wonder how people ever come to believe in it. Dadoba with good reason recommends Christians to accept the Hindu ;and also the Swedenborgian solution of this question, namely, that the *Sukshama* or *Ling Deha* survives the separation from the body and suffices to give effect to the powers of the soul, being endowed with respiratory and heart functions of its own. (5) According to the Christians the descent of the Lord on the day of Judgment is to be on earth. Dadoba thinks that the Hindu belief on this head accords with the Swedenborgian creed that there is to be no descent on earth which will be all burnt up at the appointed time. The human souls after their escape from the bodily coil live in spiritual worlds, and each soul has its own day of Judgment, not once, but at repeated stages of its advance. (6) With regard to the doctrine of salvation through the sacrificial atonement made by Jesus Christ's passion on the cross, Dadoba regards the Christian view to be similarly irreconcilable with God's character and man's reason. Vicarious sacrifice can never atone for the sins of men. Each soul must offer its own sacrifice on the cross, must become a living sacrifice holy and acceptable to God. This is the modern theistic, and, old Hindu solution, and the Swedenborgians and a section of the Unitarians have alone among Christian countries recognized this great spiritual truth."[1]

स्वीडनबोर्गच्या मताचें हिंदुधर्माशीं साम्य व भेद दादोबांनीं कोणत्या बाबतींत दाखविलें आहेत तें न्या. रानड्यांनीं आपल्या परीक्षणांत थोडक्यांत सुंदर रीतीनें

1 Poona Sarwajanik S. Quarterly, Vol. I, No. 3, Jan. 1879, pp. 42–46.

स्पष्ट केलें आहे. दादोबांच्या निबंधाचें मराठीमध्यें भाषांतर झालें असल्यामुळें त्याची पुनरुक्ति विस्तारभयास्तव येथें मी करीत नाहीं.

दादोबा ह्यांची हंसवृत्ति होती. ख्रिस्ती धर्मातील चांगल्या गोष्टी ते पाहत. त्यामुळें तितक्यापुरता त्यांचा ख्रिस्तीधर्मासंबंधी आदर होता. स्वतःच्या धर्मातील अनेक वाईट गोष्टीही त्यांना दिसत. त्या आपल्या ऐहिक व पारमार्थिक उन्नतीच्या आड येणाऱ्या असल्यामुळें त्यांचा स्पष्ट शब्दांनीं निषेधही त्यांनीं केलेला आहे. पण यांचा अर्थ त्यांना हिंदुधर्मातील चांगल्या गोष्टी माहीत नव्हत्या, असा करणें मूर्खपणाचें आहे. त्या काळीं हिंदु धर्म सोडून ख्रिस्ताच्या कळपांत जे लोक जात ते आगरकरांच्या शब्दांत सांगावयाचें म्हणजे केवळ शृंखलांतर करीत. आपल्या जुन्या धर्मातील सगळेंच त्यांना त्याज्य व ख्रिस्ती धर्मातील प्रत्येक गोष्ट त्यांना ग्राह्य वाटे. ख्रिस्ती मिशनऱ्यांचे ते केवळ बौद्धिक गुलाम होते असें म्हणावयास हरकत नाहीं. अशा लोकांना दादोबांच्या या उभयान्वयी वृत्तीचें नवल व दुःख वाटे. अशापैकींच रेव्हरंड बाबा पदमनजी हे एक होते. दादोबांवरील संपादकीय मृत्युलेखांत 'ज्ञानोदया' मध्यें ते लिहितात, "गेल्या शुक्रवारच्या 'टाइम्स ऑफ् इंडिया' पत्रांत मि० दादोबा पांडुरंग यांच्या चरित्राची जी हकीकत प्रसिद्ध झाली तींत असें सांगितलें आहे कीं त्यांस ख्रिस्ती धर्म व हिंदु फिलॉसफी म्हणजे तत्त्वज्ञान यांची फार आवड होती हें खरें आहे. ख्रिस्ताचें शुभवर्तमान व हिंदु तत्त्वज्ञान हीं परस्पर विरुद्ध असतां त्या दोहोंची आवड एका स्थानीं बसणें दुर्घट दिसतें. तरी ती दादासाहेबांच्या ठायीं वसत होती. म्हणूनच त्यांस कोणत्याही गोष्टीचा निश्चय करवला नाहीं. त्यांनीं केव्हां केव्हां आह्मांपाशीं ख्रिस्ती धर्माची फार प्रशंसा करावी, आणि केव्हां केव्हां त्यावर अगदीं तुटून पडावें.....पुढें स्वीडनबोर्ग यानें स्थापिलेल्या पंथाचे कांहीं ग्रंथ यांच्या वाचण्यांत आले. हा पंथ युरोपांत इतर प्रॉटेस्टंट ख्रिस्ती पंथापेक्षां फार गौण आहे, तरी त्यांत मनुष्याच्या स्वाभाविक बुद्धीला ज्या प्रकारचीं लपण्याचीं ठिकाणें या पंथांत बरींच आहेत, म्हणून दादासाहेबांस तो फार रुचला. यावरून त्यांस ख्रिस्ती धर्म व हिंदु तत्त्वज्ञान या दोहोंच्या मधील अनिश्चित प्रदेशीं स्वस्थ बसून राहाण्याची चांगली सोय झाली."[१]

दादोबांच्या धार्मिक मनःप्रवृत्तीकडे पाहण्याचे जे दोन दृष्टिकोण वर मांडले आहेत त्यांचा वाचकांना स्वतांचें स्वतंत्र मत बनविण्यास पुष्कळ उपयोग होईल.

★

१ ज्ञानोदय—२६ अक्टो० १८८२.

१२

## दादोबांचे प्रकाशित किंवा अप्रकाशित ग्रंथ

### (२)

**(९) केकावलीवर 'यशोदापांडुरंगी' टीका, १८६५, एकंदर पृष्ठें ४६०.**

महाराष्ट्रसारस्वतामध्यें दादोबा पांडुरंग यांचें नांव अमर करणारा महाराष्ट्रभाषेच्या व्याकरणानंतर त्यांचा दुसरा ग्रंथ म्हणजे **यशोदापांडुरंगी** टीका हा होय. हा ग्रंथ लिहून दादोबांनीं मराठी भाषेमध्यें चिकित्सक टीकापद्धतीचा नवा पायंडाच घातला, असें म्हणावयास बिलकूल हरकत नाहीं. इतकेंच नव्हे तर मराठी कवितेविषयीं लोकांमध्यें या टीकेनें विलक्षण गोडी व कुतूहल उत्पन्न केलें. स्वतः विष्णुशास्त्री चिपळुणकर म्हणतात, " 'केकावलि' हा ग्रंथ सन १८६५ या सालीं रा. ब. दादोबा पांडुरंग यांच्या आवृत्तीवरूनच पहिल्यानें सुप्रसिद्ध झाला, असें म्हणण्यास हरकत नाहीं. त्याच्या पुढें ज्या दोन तीन आवृत्त्या निघाल्या त्या वरलीच्या मुळेंच निघाल्या. रावबहादुरांच्या आवृत्तींत पुष्कळ विलक्षण प्रमाद आहेत हें खरें; तरी त्यांच्यासारख्या प्रख्यात विद्वानानें आमच्या कवीच्या अत्यंत रमणीय कृतीचा पुरस्कार करून 'यशोदापांडुरंगी' सारख्या महाराष्ट्र टीकेचा अपूर्व प्रकार प्रथम सुरू केला याबद्दल सर्व रसिकांनीं व महाराष्ट्र भाषेच्या हितचिंतकांनीं त्यांचे आभार मानणें अवश्य होय. वरील टीकेचें नांव आह्मांस तर फार प्रिय आहे. आमच्या वाचकांस येथें सांगण्यास फारसी हरकत दिसत नाहीं, कीं मयूर कवीचा 'अपूर्व टाहो' आमच्या कानीं समग्र पडण्यास सदरील टीकाग्रंथच कारण झाला; आणि तेव्हांपासून आमचें प्रेम पंतांच्या कवितेवर जें स्थिरता पावलें तें उत्तरोत्तर तेथें दृढतरच होत गेलें." [१]

प्रस्तुत टीकालेखनाला आपण कसे प्रवृत्त झालों, याचा इतिहास प्रस्तावनेंत दादोबांनीं कथन केला आहे. तो असा—

..." वामन, मोरोपंत यां सारिख्या महापंडितांनीं संस्कृत भाषेंत आपले ग्रंथ रचण्याचें तात्कालिक श्लाघ्य कृत्य सोडून प्राकृत ग्रंथ रचण्यांत जे इतके परिश्रम

---

१ निबंधमाला, (एप्रिल, १८७८.) अं. ५२, पृ० ८, तळटीप.

केले, यावरून सद्यःप्राप्त यशा कडेस त्यांनीं लक्ष न देतां इतर सर्व प्राकृत लोकांस ज्ञान व्हावें याच औपचारिक बुद्धीनें त्यांहीं हे ग्रंथ रचले असावे, अशी माझी दृढ अटकळ होत्ये. म्हणून हा त्यांचा परम स्तुत्य हेतु सिद्धीस नेण्याच्या मार्गांत ज्या ज्या अडचणी आढळतील, त्या त्या सर्व दूर करणें हा आतां आमचा धर्म होय, असें मनांत आणून म्यां ही प्रकृत टीका करण्याचा उद्योग प्रथमतः हातीं धरला... त्यांतहि या ल्हानशा ग्रंथाचा विषय निवळ भगवत्स्तुतिपर असल्यानें माझें मन अधिक लोभावलें. त्यांत आणखी पंतांच्या काव्यांत निष्णात म्हणून वाखाणिलेल्या पुरुषां मध्येंहि बहुत्येकांस केकावलि हा ग्रंथ सायंत लागत नाहीं, असाहि बोभाट माझ्या ऐकण्यांत होताच; या सर्व कारणां वरून मोरोपंतांच्या ग्रंथा वर टीका करण्यास हाच ल्हानसा ग्रंथ म्यां निवडून काढिला.

"त्यांत ज्या विस्तारपद्धतीनें प्रथम ही टीका करण्यास म्यां आरंभ केला, त्या गोष्टीस आज पांच वर्षें झालीं. त्या विस्तारपद्धतीचा मुळारंभीं हेतु असा होता कीं माझी परम आवडती आणि सुशीला कन्या कावेरीबाई, जीस जगदीशानें आतां दोन वर्षें झालीं आपल्या सन्निध नेलें, तिला ज्या रीतीनें हें काव्य सुबोध होई अशा रीतीनें पाल्हाळ करून म्यां याज वर टीका लिहिली. ती अशी कीं कोणताहि कठीण शब्द पर्याया वांचून आणि अर्था वांचून ठेविला नाहीं; महाराष्ट्र ग्रंथभाषेच्या रूपांचींहि पर्यायरूपें लिहून ठेविलीं; मनांत कीं तिला या अशा पद्धतीच्या टीके वरून हा ग्रंथ लागला तर इतर बालांसहि सहज लागेल. ही टीका म्यां शके १७८१ च्या वर्षी ठाण्यांत सरकारी कामा वर असतां प्रातःकाळीं मला जो दोन तीन तास वेळ सांपडे, तो या कामा कडेस देऊन आरंभिली, आणि तेथें सुमारें सहा महिन्यांत अर्धाअधिक ग्रंथ संपविला. पुढें सरकारी काम संपवून घरीं मुंबईस आलों, तेव्हां बाकी राहिलेला ग्रंथ लवकरच संपविला. त्यानंतर २३ वी मे सन १८६३ इस्वीच्या रात्रीस त्या कन्येस जगदीशानें आपल्या जवळ नेलें. त्या तिच्या वियोगानें अत्यंत दुःखितांतःकरण होत्साता आपल्या मनांत विचार करूं लागलों कीं, तिचें स्मरण राहण्याकरितां वापी, कूप, तडाग, अथवा धर्मशाळा, बांधून एकादें पूत कर्म करावें तर तितकें द्रव्यसामर्थ्य आपल्यास नाहीं; तेव्हां जिच्या अभ्यासा करितां जो ग्रंथ लिहिण्यास प्रथम लेखन हातीं धरिली तोच ग्रंथ आतां तिच्या स्मरणास अर्पण करून प्रसिद्ध करावा, आणि त्यापासून आपल्या स्वदेशीय लोकांस कांहीं उपयोग घडला तर तसें तरी स्मरणीय पूत कर्म करावें,

असा मनांत विचार करून ज्या रीतीनें आबालवृद्धांस हा ग्रंथ उपयोगी पडेल अशा रीतीनें पुनः याचें पूर्वापर शोधन करून छापण्या करितां सिद्ध केला. "[1]

या ग्रंथाची बावन्न पृष्ठांची प्रस्तावनाही विद्वत्तापूर्ण व दादोबांची रसिकता, मराठी भाषेचा अभिमान व चिकित्साबुद्धि यांची साक्ष देणारी आहे.

दादोबांची ही टीका ज्यावेळीं प्रसिद्ध झाली त्यावेळीं मोठीच चळवळ उडून "ज्ञानप्रसारक, इंदुप्रकाश इत्यादिकांनीं 'यशोदापांडुरंगी'वर 'कुलपी गोळ्यांचा भडिमार' करून तिच्या कर्त्याच्या पदरांत प्रमादबाहुल्याचें गांठोडें बांधलें", असें कै. लक्ष्मणराव पांगारकर लिहितात.[2] विष्णुशास्त्री आपल्या **विद्वत्त्व व कवित्व** या निबंधांत म्हणतात, "आमचे मराठीचे वैय्याकरण व प्रसिद्ध ग्रंथकार दादोबा पांडुरंग यांनीं" केकावलीवर सुमारें आठदहा वर्षांपूर्वी एक भली लांब टीका करून ती प्रसिद्ध केली आहे हें सर्वांस माहीत असेलच. त्यांत त्यांनीं बुद्धया आडरानांत शिरून केलेले विलक्षण अर्थ पुष्कळ आहेत. त्यांवर या पूर्वी पुष्कळ चर्चा मागेंच झाली; व तींत एवढ्या मोठ्या ग्रंथकाराची व लोकोपकारी सद्गृहस्थाची होऊं नये अशी चारगटपणाची विनाकारण पुष्कळ विटंबनाहि झाली हेंही लिहिणें आह्मांस वाजवी वाटतें. असो; त्या टीकेच्या संबंधानें प्रस्तुत प्रसंगीं लिहावयाचें तें हेंच कीं, तींत पहिल्या केकेवर व्याख्या देतांना दादोबांना वरील अप्रयोजक टीकाकारांचा श्लेषप्रिय दुर्विदग्ध संस्कृत शास्त्र्यांचा बाणा उचलला आहे. पहिल्या मंगलाचरणरूप केकेचा अर्थ अगदीं उघड असतां तीवर पंचवीसतीस पानें व्याख्या देऊन तिचा अर्थ वेदांतपर लावला आहे!"

दादोबांनीं आपली ही टीका पाल्हाळ करून कां लिहिली याचा खुलासा त्यांनीं विस्तृतपणें प्रस्तावनेंत केलाच आहे. पण या पुस्तकाची '**होऊं नये अशी चारगटपणाची विनाकारण विटंबना**' होऊन तिच्यावर '**कुलपी गोळ्यांचा भडिमार**' कां व्हावा याची कल्पना होते. दादोबा हे मूर्तिपूजेविरुद्ध असलेल्या व वेदांतावर उभारलेल्या परमहंसमताचे आद्यप्रवर्तक होते. आणि मागें वर्णिल्याप्रमाणें हें परमहंसमतप्रकरण लोकांपुढें ताजेंच होतें. तेव्हां 'नावडतीचें मीठ अळणी' या म्हणीप्रमाणें हा वेदांत सनातनी लोकांना सहन झाला नसावा! दुसरी एक गोष्ट लक्षांत ठेवली पाहिजे ती ही कीं, शास्त्रीबुवा

---

१ यशोदापांडुरंगी, प्रस्तावना, पृ. ४६-८.

२ मोरोपंत-(चरित्र आणि काव्यविवेचन) १९०८, प्रस्तावना, पृ. १२.

म्हणतात त्याप्रमाणें पंचवीसतीस पृष्ठें पहिल्या केकेच्या व्याख्येला खर्च झालेलीं नाहींत आणि तिचा केवळ वेदांतपर ,अर्थ लावलेला नाहीं. बावीस पृष्ठांमध्यें ही व्याख्या किंवा टीका असून तिच्या पहिल्या बारा पृष्ठांत " उघड " अर्थ सांगून पुढें तेराव्या पृष्ठावर, " ही पहिली केका मंगलाचरणात्मिका असल्यानें महामायोपाधिकहरिहरादिभगवदवतारपर न लावितां केवळ तदुपाधिरहित सच्चिदानंदरूपपरब्रह्मपर लाविली असतांहि लागाया जोगी आहे, असें माझ्या बुद्धीस वाटतें ", असें म्हणून पुढील दहा पृष्ठांत हा वेदांतपर अर्थ दिला आहे. दादोबांनीं मोरोपंताची तुलना श्रीहर्षाशीं केलेली आहे. श्रीहर्षाच्या नैषधीय काव्यावर नारायणानें केलेली टीका ज्यांनीं वाचलेली असेल त्यांना टीकाकारानें मूळ कवीलाही कदाचित् माहीत नसलेले अर्थ काढावे, यांत नवीन असें कांहीं वाटणार नाहीं. पांगारकरांनीं व चिपळूणकरांनीं[1] 'ज्ञानप्रसारक' व 'इंदुप्रकाश' यांमधील या टीकालेखांचा उल्लेख केला आहे. इंदुप्रकाशांतील टीका उपलब्ध नाहीं. ज्ञानप्रसारकांतील टीका मी वाचली आहे व ती सहानुभूतीपर व ग्रंथकारासंबंधीं आदर ठेवूनच लिहिलेली आहे.[2] हा टीकाकार म्हणतो :–" ग्रंथाची सुधारणा व्हावी म्हणून जे दोष आढळले ते खालीं श्लोकक्रमानें लिहितों. ग्रंथाची निंदा करावी म्हणून लिहीत नाहीं. आमची खात्री आहे कीं जे दोष किंवा चुका झाल्या त्या ग्रंथकर्त्याच्या बहुकार्यव्यग्रतेमुळें झाल्या आहेत. बुद्धीपूर्वक झाल्या नाहींत आणि असें आहे कीं मित्राच्या गुणांचा प्रकाश होण्याकरितां त्याकडून अनवधानतेमुळें जर कांहीं दोष घडले असले तर ते त्यास सुचवावे हा मित्रधर्म आहे. " या टीकेचे लेखक रा. भास्कर दामोदर पाळंदे हे असावेत, अशी माझी कल्पना आहे. या चारपांच अंकांमध्यें प्रसिद्ध झालेल्या परीक्षणामध्यें दाखविलेल्या चुका किती व मतभेदाचीं स्थळें किती याचा विचार येथें करणें जागेच्या अभावीं शक्य नाहीं. ' यशोदापांडुरंगी 'ची नवी आवृत्ति काढण्याचा संकल्प आहे. तो सिद्धीस गेल्यास त्यावेळीं या प्रश्नाची चर्चा करूं.

पण येथें एका गोष्टीचा निर्देश करणें अनाठाई होणार नाहीं. कै. न्या. महादेव गोविंद रानडे हे ॲक्टिंग मराठी ट्रान्स्लेटर असतांना त्यांनीं कै. परशुरामतात्या गोडबोले यांच्या 'केकादर्शावर' आपला अभिप्राय प्रगट केला.[3] त्यांत

१ निबंधमाला, अंक ५२, पृ० ५.

२ मराठी ज्ञानप्रसारक, पुस्तक १६, अंक १०, ऑक्टोबर १८६५, पृ. ३०५ पहा.

३ **Educational Record**, *Nov.* 1867 पहा.

मोरोपंताच्या ' केकावली 'संबंधी रानड्यांनीं जे विचार व्यक्त केले आहेत त्याबद्दल कै. विष्णुशास्त्री चिपळूणकरांनीं रानड्यांवर केलेला जोराचा हल्ला प्रसिद्ध आहे.[१] रानड्यांच्या इंग्रजी अभिप्रायांतील चिपळूणकरांनीं मराठी भाषांतर केलेला उतारा खालीं देतों—

" ईश्वराविषयीं भक्ताच्या मनांत ज्या वृत्ति स्वभावतः उत्पन्न व्हाव्या—म्हणजे त्याचें ऐश्वर्य पाहून भयचकित होणें, आपली क्षुद्रता मनांत येऊन अत्यंत नम्र होणें, त्याच्या अगाध महिम्याकडे लक्ष जाऊन आश्चर्यानें थक्क होऊन जाणें, आपल्या पापमग्नतेमुळें धाक वाटणें,—त्या या काव्यांत बिलकूल दृष्टीस पडत नाहींत. उलट भज्य आणि भजक यांजमधील संबंध यांत अत्यंत निकटतेचा आढळतो. जागोजाग ईश्वराशीं अतिप्रसंग केलेला व त्याच्यावर कोटी लढविलेली, हा प्रकार प्रस्तुत काव्यांत आहे. यास्तव या देशांतील तत्त्वज्ञानाचें व ईश्वरज्ञानाचें स्वरूप जे जाणत असतील,—म्हणजे मनुष्य व देव हे समसमान असून ते एकरूपच होत किंवा पुढें तरी त्यांचा अभेद होणार आहे,—हें ज्यांस माहीत असेल त्यांसच प्रस्तुत काव्यांतील भाषणप्रकार अगोदर कळेल. वरील तत्त्वज्ञानाचा मार्ग हा खऱ्या ईश्वरभक्तीचा केवळ विध्वंसक होय. " यावरून चिपळूणकर म्हणतात कीं, " यांत (केकावलींत) सलगीचा जो प्रकार आहे तो रावबहादुरांस बिलकूल पसंत नाहीं.... दुसऱ्या एका रावबहादुरानें (म्हणजे दादोबांनीं) ' केकावली'तील कांहीं चरणांचा अर्थ फिरविला एवढ्याबद्दल त्या विचाऱ्यावर वर्तमानपत्रांतून, मासिक पुस्तकांतून जसा काय गहजब उडाला. पण सगळ्या काव्यावर ज्यांनीं इंग्रजी पेन फिरविलें त्यांच्या अभिप्रायाबद्दल कोणी कोठें हूं कां चूं सुद्धां केलें नाहीं." वास्तविक ' पहिल्या ' रावबहादुरांनीं (रानड्यांनीं) व्यक्त केलेले उपरिनिर्दिष्ट विचार म्हणजे ' दुसऱ्या ' रावबहादुरांनीं दोन वर्षे आधीं व्यक्त केलेल्या विचारांचा केवळ अनुवाद होय, हें चिपळूणकरांच्या लक्षांत आलेलें नाहीं ! दादोबा ' यशोदा-पांडुरंगी 'च्या प्रस्तावनेंत लिहितात, " अत्यंत अल्पज्ञ, पापमालिन्यानें अंतर्यामीं आपादमस्तक मलिन, आणि प्रतिक्षणीं अपराधी, अशा नरदेहधारी पामर जीवानें सर्वज्ञ, अत्यंत पवित्र, न्यायी आणि षड्गुणैश्वर्यसंपन्न अशा जगदीश्वरापुढें आपल्या अपराधाची क्षमा मागणें झाल्यास, इतर सर्व भाव एकीकडेस टाकून शुद्ध विनयने-

१ निबंधमाला, (जून १८७८) अंक ५४, पृ० १–१४.

च्याच भावानें प्रार्थना करणें उचित. असें असतां आपल्या कवीनें तर या स्तोत्रांत आपल्या विनयतेच्या भावांत भाषांतरांचें पुष्कळ विरजण घातलें आहे. तेव्हां ही यांची कृति अशा दृष्टीनें दोषप्रवण म्हटल्यानें आपणा कडेस धृष्टतेचा आरोप येणार नाहीं;... ईश्वराचें महत्त्व आणि पवित्रता, आणि मनुष्याचें क्षुद्रत्व आणि पापमलिनता, यां विषयीं विचार केला असतां जें महदंतर दिसतें, त्या वरून पाहतां मनुष्यानें तर ईश्वरा पुढें धुळींतच पडून असावें; मान उचलून वर त्याज कडेस पाहण्याचीहि याची योग्यता नाहीं; असें असतां त्या ईश्वराला उद्देशून जी प्रार्थना केली तींत प्रार्थकानें सलगी, अथवा लडिवाळपणा, अथवा रोष, यांतून कोणत्याहि भावाचें प्रदर्शन करणें, हें तर त्यास केवळ अनुचित होय."[१]

(१०) **धर्मविवेचन**, मुंबई १८६८. एकंदर पृष्ठें १४४.

'एक जगद्वासी आर्य' या टोपण नांवानें ही दादोस्मृति लिहिलेली असून "प्रार्थनासमाज व इतर सर्व विचारी लोक यांस हा ग्रंथ ('धर्मविवेचन अर्थात् पारमार्थिक धर्म आणि व्यावहारिक धर्म यांचें विवेकपूर्वक, निश्चयात्मक, व सारांशरूपानें कथन') विचार करण्याकरितां स्नेहपूर्वक सादर केला आहे." या पुस्तकाची जास्त माहिती परमहंससभा या प्रकरणांत मागें दिलेलीच आहे. मानवधर्मसभेकरितां म्हणून हा ग्रंथ लिहिला. परमहंससभेचा प्रमाणग्रंथ म्हणून त्याचा उपयोग करण्यांत येत असे. परंतु मध्यें परमहंससभेसंबंधीं जें लोकमत कलुषित झालें होतें त्याचा परिणाम या पुस्तकावर होऊं नये म्हणून मानवधर्मसभा किंवा परमहंसमंडळी यांचा उल्लेख टाळलेला दिसतो. या ग्रंथाचें **गुजराथी भाषांतर** 'एक जगज्जनहितेच्छु' यानें करून स. १८७५ सालीं अहमदाबाद प्रार्थनासमाजाला अर्पण केलें आहे. हे गुजराती भाषांतरकार कायरा येथील जज्ज भोलानाथ साराभाई हे होत. हस्तलिखित-स्थितींत असतांनाच दादोबांच्या या पुस्तकास उत्तरादाखल म्हणून 'निःशास्त्रवाद-परीक्षा' नामक एक पुस्तक बाबा पदमनजींनीं १८५८ सालीं लिहिलेलें प्रसिद्ध आहे. हें पुस्तक पत्ररूपानें लिहिलें असून दादोबांच्या ग्रंथास तें अप्रत्यक्ष उत्तर आहे.

(११) **पारमहंसिक ब्राह्मधर्म**, १८८०, पृ० २+१३.

या छोट्या पुस्तकांत एकंदर वीस अभंग असून कर्त्याचें नांव जरी वर पुस्तकावर नसलें तरी त्याचा कर्ता 'पांडुरंगात्मज दादो' हा होता, असें शेवटच्या अभंगावरून

---

१ केकावलि, (यशोदापांडुरंगी) प्रस्तावना, पृ० ३६–३७.

करून येतें. हें पुस्तक गणपत कृष्णाजीच्या छापखान्यांत छापिलें. प्रकाशन काल शके १८०२ विक्रमनामसंवत्सरे, असा दिला आहे. प्रत्येक प्रतीवर "फाल्गुन शु० १५" असें हातानें दादोबांनींच लिहिलेलें दिसतें. ठाणें ग्रंथसंग्रहालय व पुणें नगरवाचनालय मध्येंच केवळ याच्या प्रती आढळल्या. या पुस्तकाचा रचनाकाल कळण्यास मात्र मार्ग नाहीं. परमहंससभेकरितांच हे अभंग रचलेले स्पष्ट दिसतात; पण त्यांचा उल्लेख मात्र जुन्या सभासदांपैकीं कोणीच केलेला मला आढळला नाहीं. "सभेच्या आरंभीं व शेवटीं मराठी प्रार्थना वाचीत. त्या रावबहादुर दादोबा पांडुरंग यांनीं रचलेल्या होत्या," असें बाबा पदमनजी लिहितात,[1] त्या प्रार्थना या नाहींत. हें पुस्तक अत्यंत दुर्मिळ असल्यामुळें त्याच्यांतील कांहीं अभंग खालीं उद्धृत करतों. दादोबांचें धार्मिक तत्त्वज्ञान त्यांवरून चांगल्याप्रकारें कळून येईल. सुरवात अशी आहे—

ॐनमः परमहंसास्वादितचरणकमलचिन्मकरंदाय भक्तजनमानसनिवासाय सच्चिदानंदरूपाय ब्रह्मणे.

ॐनमः परमेश्वराय

(१)

ऐका सांगतों मीं । विसां अभंगांत । सर्वशास्त्रमत । ब्राह्मधर्म ॥ १ ॥
विश्वकटुंबी जो । सर्वादिकारण । बापा त्या शरण । जावें तुह्मीं ॥ २ ॥
बंधूच्या नात्यानें । वागा मानवांशीं । उदार मनाशीं ठेवुनियां ॥ ३ ॥
जातिभेद सर्व । सोडा अभिमान । द्यावें आलिंगन । एकमेकां ॥ ४ ॥
भूतदयेनें ती । करा देवपूजा । हीच अधोक्षजा । आवडते ॥ ५ ॥

(२)

मनाची शुद्धता । धरा हें सोवळें । पाप हें ओवळें । टाका वेगीं ॥१॥
व्रतें तीर्थदानें । सोवळीं आचार । दांभिक प्रसार पूजेचा तो ॥ २ ॥
नसे जों हृदयीं दया क्षमा शांती । तितिक्षोपरती । विषयीं जों ॥ ३ ॥
तों हे सर्व जाणा । खटाटोप व्यर्थ । नसे परमार्थ । यांत कांहीं ॥ ४ ॥
असे हे प्रकार । पूजनाचे नाना । खटाटोप माना । व्यर्थ सारे ॥ ५ ॥

[1] अरुणोदय, पृ० १७७.

(३)

देवा नावडती । बाह्य उपचार । नसे जों अंतर शुद्ध कांहीं ॥ १ ॥
जरीं करूं इच्छा । परेशाची भक्ती । तरीं अनुरक्ती । भूतीं धरा ॥ २ ॥
जरीं आराधणें । असें देवराया । हृदया आलया । शुद्ध करा ॥ ३ ॥
परेशाचें त्यांत । करा आवाहन । बसाया आसन । त्यांत द्यावें ॥ ४ ॥
सदाचरणांनीं । करावें पूजन । हेंचि देवार्चन । खरें जाणा ॥ ५ ॥

(४)

मना माझि जेव्हां । उठे सद्वासना । धूप तो गगना । देवा जाय ॥ १ ॥
देवाच्या गौरवीं । संपादितां ज्ञान । होई दीपदान । देवा तेंची ॥ २ ॥
क्षुधार्त्यां भोजन । नागव्यां नेसण । नैवेद्य हा जाण । होय देवा ॥ ३ ॥
प्रसन्न करणें । असे जरीं देव । तरीं नीतिन्याय । सोडूं नका ॥ ४ ॥
दयानीतिन्यायें । तोषे याचि योगें । तैसा तो न यागें । यज्ञें देव ॥ ५ ॥

(५)

देवा आवडती । दया क्षमा शांती । सात्त्वन-संपत्ती । हीच करा ॥ १ ॥
हीच ती संपत्ती । प्रयत्नें मिळवूं । आवडते होऊं । देवाजीचे ॥ २ ॥
असा दृढ मनीं । करा तो निश्चय । तोडोनी संशय । सर्व कांहीं ॥ ३ ॥
दया क्षमा शांति । हींच मतें धरा । यांणींच हा तरा । भवसिंधु ॥ ४ ॥
परमहंसाची आत्मज्ञाना साठीं । ठेवा ती रहाटी । अन्तर्यामीं ॥ ५ ॥
तरींच सुखावे । परलोकीं धणी । व्हाल घ्या ही वाणी । दादो ह्मणे ॥ ६ ॥

(१५)

ज्ञानी व महन्त । सर्व देशीं झाले । बोल जे बोलिले । ज्ञानाचे ते ॥ १ ॥
लिहुनि ठेविला । ग्रंथीं उपदेश । त्याचा तो सारांश । घेऊं आह्मीं ॥ २ ॥
जिथें मिळे त्यांची । एकवाक्यता ती । प्रमाणप्रतीती । आमची पैं ॥ ३ ॥
सर्वानुभविक । महंताचे बोल । प्रमाणांचें मोल । देऊं त्यांना ॥ ४ ॥
त्यांत देशकाल । विचार न सोडूं । सर्वांशींच जोडूं । स्नेहभाव ॥ ५ ॥

असो कृष्णगीता किंवा खिस्तगीता । महम्मदाची वार्ता । असेना कां ॥६॥
असो बौधाचार्य । किंवा जैनाचार्य । शंकर आचार्य । कबीरही ॥ ७ ॥
तत्त्वज्ञान एक । असे त्यांचें जरीं । न कां तें पदरीं । घ्यावें आम्हीं ॥ ८ ॥
येईना कां आला । थोडा तो विरोध । दाऊं तो न क्रोध । तेणें आम्हीं ॥९॥
स्वर्गाहूनि जणूं । आणियेलें ज्ञान । भांडों न जाणून आम्हीं ऐसें ॥१०॥

## (१२) दादोक्त शिशुबोध, १८८४, पृ० ६+४८.

दादोबांच्या निधनोत्तर त्यांच्या कन्या अहल्याबाई यांनीं हा ग्रंथ प्रसिद्ध केला. त्या पुस्तकाला 'शिशुबोध' असें जरी नांव दिलेलें असलें तरी यांतील दादोबांचे स्वानुभवाचे बोल वृद्धांना देखील मार्गदर्शक होतील असेच आहेत. रामदासांच्या दासबोधाप्रमाणें या शिशुबोधांत आपणास व्यावहारिक ज्ञान सांपडतें. या ग्रंथाच्या प्रस्तावनेंत अहल्याबाई लिहितात, "हा ग्रंथ विद्वान् पित्यानें आपल्या अशक्त प्रकृतीमुळें मजकडून लिहिविला, हा ग्रंथ त्यांच्या देखत समाप्तीस न जातां ते परलोकवासी झाले. त्यांची इच्छा तो लोकप्रसिद्ध करण्याची होती, ती तशीच राहिली. म्हणून त्यांचें स्मारक समजून हा मी प्रसिद्ध केला आहे." या ग्रंथाच्या प्रकरणांचीं नांवें:—

१ परमेश्वरो जयति. २ लोकांशीं व्यवहार कसा ठेवावा? ३ आपला स्वतांचा व्यवहार कसा ठेवावा? ४ घरीं आपला प्रपंच कसा चालवावा? ५ सरकारदरबारीं कसें वागावें? ६ आपला धंदा कोणता व कसा करावा? ७ खरे सोयरे व इष्टमित्र कोणते? ८ तारुण्यांत आपणास कसें सांभाळावें? ९ म्हातारपणीं विसावा कसा घ्यावा? हीं नऊ प्रकरणें संपवून दहावें "माझा या सृष्टीचा अनुभव," या प्रकरणास दादोबांनीं प्रारंभ केला व इतक्यांत जास्त आजारी होऊन ते निधन पावले, म्हणून नऊच प्रकरणें यांत छापलीं आहेत. या ग्रंथाच्या प्रती दुर्मिळ आहेत. एक अपूर्ण प्रत बडोदा सेंट्रल लायब्ररीमध्यें असून एकदोन प्रती खासगी संग्रहांत आहेत. हें पुस्तक १८७८ च्या सुमारास लिहावयास घेतलें होतें, असें अन्तर्गत प्रमाणांवरून दिसून येतें. (पृ० १४ पहा.) धर्मविवेचन किंवा पारमहंसिक ब्राह्मधर्म या पुस्तकांत ज्याप्रमाणें त्यांचें पारमार्थिक व ऐहिक तत्त्वज्ञान आपणास कळतें त्याप्रमाणें हा त्यांच्या प्रापंचिक किंवा व्यावहारिक तत्त्वज्ञानाचा स्वानुभवपूर्ण ठेवा आहे.

**१३ विधवाश्रुमार्जन** [संस्कृत] १८५७, पृ० २८.

बाबा पद्मनजी या ख्रिस्ती गृहस्थांनीं विधवाविवाहाच्या पुरस्कारार्थ 'यमुनापर्यटन' या नांवाची एक छोटी कादंबरी किंवा दीर्घ कथा लिहिली आहे. या ग्रंथासंबंधी ता. ११ नव्हेंबर १८५६ चें एक जाहिरातवजा पत्र ग्रंथकारांनीं प्रसिद्ध केलेलें उपलब्ध आहे.[१] त्यांत ह्या ग्रंथाचें हस्तलिखित दादोबांनीं लक्षपूर्वक नजरेखालीं घातलेलें आहे व शास्त्रीपंडितांच्या उपयोगाकरितां विधवापुनर्विवाहाचें समर्थन करणारा एक संस्कृत भाषेंत निबंधही लिहून देण्याचें त्यांनीं कबूल केलें असून तो या ग्रंथाच्या आरंभीं जोडण्यांत यावयाचा आहे, असें नमूद केलेलें आढळतें. याप्रमाणें हा संस्कृत निबंध त्याच्या मराठी गोषवाऱ्यासह सदर कादंबरीबरोबर प्रसिद्ध झाला व त्याच्या स्वतंत्र निराळ्या प्रतीही छापल्या गेल्या असल्याचें समजतें. हा मराठी गोषवाराही दादोबांच्या हातचा असावा, अशी कांहीं लोकांची समजूत दिसते; परंतु ती वस्तुस्थितीला धरून नाहीं. बाबा पद्मनजी आपल्या डायरींत ता. १३ फेब्रु० १८५७ रोजीं लिहितात—"आज सकाळींच मी मि० दादोबा पांडुरंग यांजकडे गेलों, आणि तेथून यमुनापर्यटन पुस्तकाकरितां संस्कृत निबंध घेऊन घरीं आलों...एकदां वाटूं लागलें कीं, मि० दादोबांनीं पूर्वीच निबंध दिला असता तर एव्हां मीं बेळगांवीं गेलों असतों. दोन महिन्यांत ४० रुपयांचा तोटा झाला......चार वाजतांना संस्कृत निबंधाचें भाषांतर करायास एका शास्त्र्यापाशीं बसलों."[२]

या निबंधांत हिंदुधर्मशास्त्राच्या आधारें पुनर्विवाहाचें मंडन करून दादोबा शेवटीं लिहितात,

एवं सति भारतवर्षीया आचार्यास्तासामेतत्क्लेशगर्ताविमोचने पुरैव कृतप्रयत्ना भवितुमर्हन्ति स्म परंतु यदैतासामनन्यगतिकानामबलानां हृदयविदारकमाक्रंदनं नाश्रावि तदा करुणार्द्रचेतसा परमेश्वरेण तासां दुःखशमनायान्यधर्मीयानां द्वीपान्तरवासिनां राज्यकार्यधुरंधराणां व्यवस्थापकानां बुद्धिं प्रचोद्य भारतवर्षीयविधवा-पुनर्विवाहविधायकं नूतननिर्देशं स्थापयित्वैतदौपकारिककर्मोत्पादकयशसा ते अन्यधर्मीया धवलतां नीताः। अधुनातु राजाज्ञयैव विधवापुनर्विवाहो विहितो

---

1 The Bombay Guardian, (15-11-56).

२ अनुभवसंग्रह, बाबा पद्मनजी, भाग १ ला, १८९५, पृ० ६०.

जातस्तस्मादत्रनिषेधविषये अस्मद्विवादाः केवलशब्दव्ययाय भवितुमर्हंति न तु किंचिदपि सारोत्कर्षाय अतएव यत्परमेश्वरेच्छया विधिनोपपत्रं तदेवावश्यमनुसरणीयम्.

**(१४) मराठी नकाशाचें पुस्तक, १८३६.**

दादोबा पांडुरंग व नाना नारायण या दोघांनीं मिळून हें पुस्तक छापविलें, व सुप्रसिद्ध गंगाधरशास्त्री पटवर्धन यांचे मुलगे बाळकृष्णशास्त्री[१] व विनायकशास्त्री यांना अर्पण केलें. "पृथ्वि, एशिया, युरोप, आफ्रिका, उत्तर अमेरिका, दक्षिण अमेरिका, हिंदुस्थान, महाराष्ट्रदेश, आणि ग्रेट ब्रिटन" असे नऊ नकाशे यांत आहेत, व Nine Maps अशा नांवानेंच हें पुस्तक एके काळीं प्रसिद्ध होतें. "या देशांत हा केवळ पहिला उद्योग आहे म्हणोन जरी त्यांत कांहीं दोष आढळले तर विशेष आश्चर्य मानाया जोगी गोष्ट नाहीं", असें प्रस्तावनेंत ग्रंथकारांनीं म्हटलें आहे. १८३८ सालीं याची द्वितीयावृत्ति निघाल्याचा उल्लेख सांपडतो. १८४७ सालीं याची एक नवी आवृत्ति निघाली. तिचा आकार मोठा असून त्यावर कर्ता म्हणून केवळ दादोबांचेंच नांव आहे. मात्र सुबोधपत्रिकाकारांनीं दादोबांच्या मृत्युलेखांत म्हटल्याप्रमाणें ती पहिली एडिशन नाहीं. भूगोलविषयक यांत थोडी माहिती आहे. मागें पृ० १७९ पहा.

**(१५) गुजराथी नकाशाचें पुस्तक, १८३८.**

दादोबा पांडुरंग व नाना नारायण यांनींच मराठी पुस्तकावरून हें गुजराथी पुस्तक तयार केलें आहे, असा उल्लेख सांपडतो. (G. D. 1843, 24 A, p. 733) परंतु हें पुस्तक मात्र पाहावयास मिळालेलें नाहीं.

**(१६) विद्येच्या लाभाविषयीं—**

एल्फिन्स्टन विद्यालयांत ता. १ सेप्टेंबर १८४८ रोजीं स्थापन झालेल्या 'उपयुक्त ज्ञानप्रसारक सभेच्या' स्थापनासमारंभाच्या वेळीं केलेलें अध्यक्षीय भाषण ज्ञानप्रसारक मासिकाच्या पहिल्या वर्षाच्या पहिल्या अंकांत प्रसिद्ध झालें आहे. (पृष्ठें १०) यांत शास्त्रीय ज्ञानाची आवश्यकता प्रतिपादन करून ते म्हणतात, "ज्ञानशास्त्रांचा प्रसार आपल्या देशांत प्राचीन काळीं कमी होता असें नाहीं. सर्व इतिहासकर्ते असें मान्य करितात कीं, इतर बहुतेक देश ज्या वेळेस अज्ञान दशेंत होते त्या वेळेस

१ मागें पृ० १७०, १७२ पहा.

हिंदुस्थान उत्तमावस्थेंत होता. व ही गोष्ट प्राचीन ग्रंथांवरून खरी अशीही अनुभवास येते. आपणामध्यें पूर्वी व्यासादि ऋषि व कालिदास, भट्टोजी दिक्षित, भास्कराचार्य, इत्यादि पंडित यांनीं शास्त्रीय व व्यावहारिक विषयांवर जे नाना प्रकारचे ग्रंथ केले आहेत त्यांचें मनन करून पाहिलें असतां त्यांचा उद्योग केवढा व त्यांचें ज्ञान किती याचें सहज अनुमान होतें. त्या वेळचे त्यांचे श्रम आणि सांप्रतकालचे आमचे श्रम यांमध्यें तारतम्य पाहिलें असतां किती बरें अंतर? आहो, त्यांच्यासारखे नवे ग्रंथ करणें तर असो, परंतु त्यांनीं केलेले ग्रंथ समजत देखील नाहींत. आपल्या पूर्वजांनीं जो विद्यावृद्धीचा क्रम घालून दिला होता तोच जर आजपर्यंत एकसारखा चालता तर आज आपल्या देशांत किती बरें ज्ञानाची समृद्धि झाली असती. तर पुनः एकदां आपण सर्व मिळून आपल्या देशाची सुधारणूक करण्यास यत्न करूं आणि आपल्या पूर्वजांचें नांव उदयास आणूं."

(१७) **आत्मचरित्र.** (या पुस्तकाच्या आरंभीं संपादकीय निवेदन पहा.)

(१८) **The Absurdity of the Holi Festival as it is now practised by the Hindus., Bombay, 1829.**

दादोबांच्या सार्वजनिक कार्याची माहिती, या पुस्तिकेंत या निबंधाचा निर्देश आहे व हें पुस्तक Rev. J. Stevenson यानें इंग्रजीमध्यें भाषांतरीत केलें असेंही तींत नमूद आहे. हीं दोनही पुस्तकें उपलब्ध नाहींत. ओ. खि. स्पे. मध्यें पुढीलप्रमाणें या पुस्तकाचा उल्लेख सांपडतोः—" **Dadoba Pandurang lately** published an address on the Holi, so powerful and appropriate that with the aid of some liberal friends, we were induced to circulate no fewer than 4500 copies of it during the late celebration of that riotous festival," (O. C. S. 1836. pp. 362-3)

दादोबांनीं १८२९ सालीं आपल्या वयाच्या पंधराव्या वर्षी हा निबंध लिहिला असणें कठीण वाटतें. १८३४-३६ च्या सुमारास तो लिहिला असावा.

(१९) **A Hindu Gentleman's Reflections respecting the works of Emanuel Swedenborg, London, 1878.**

या इंग्रजी पुस्तकाची दुसरीही आवृत्ति प्रसिद्ध झाली असून युरोपांतील वृत्तपत्रांनीं याची फार स्तुति केली आहे. याचें मराठी भाषांतर त्यांच्या देखरेखीखालीं त्यांची कन्या कु. अहल्याबाई तर्खडकर हिनें केलें असून १८८१ सालीं तें प्रसिद्ध झालें आहे. जास्त माहितीकरितां मागें पृ. ३१४ पहा.

(२०) **A Prize Essay on the Native Female Education, 1839.**

हा निबंध O. C. S. च्या आगष्ट १८४१ च्या अंकांत प्रसिद्ध झाला आहे, (pp.333-45) पण दादोबांच्या सा. का. पुस्तिकेंत त्याचा प्रकाशनकाल १८३९ असा दिला आहे. यांत हिंदी स्त्रियांची सद्य:स्थिति वर्णन करून त्यांना शिक्षण दिल्यानें होणारे फायदे त्यांत सांगितले आहेत. दादोबा शेवटीं म्हणतात,

"A few years ago myself and a few friends tried the experiment ourselves in our families and the success that has attended it has been more satisfactory than what we could have anticipated under the present state of circumstances."

डॉ. विल्सन याचें ता. १० मे १८५० चें एक पत्र उपलब्ध आहे त्यांत तो दादोबासंबंधीं लिहितो,

"When Mrs. Wilson congratulated him on having already taught his wife and daughter to read, he said, "This is all the fruit of what I myself learned in Ambrolie many years ago. The knitting and sewing here are great recommendations to him."[1]

(२१) **A Journal of a Trip from Jowrah to Tonk in Malwa.**

हें प्रवासवृत्त O. C. S. च्या १८३८ च्या पुस्तकांत प्रसिद्ध झाल्याचें त्यांच्या सा॰ का॰ पुस्तिकेंत नमूद आहे. O. C. S. च्या मार्च १८३८ च्या अंकाच्या ४ थ्या मलपृष्ठावर "The interesting communications of Dadoba Pandurang, and Naoroji Fardunji will find a place as soon as possible" असें म्हटलें आहे. परंतु हें प्रवासवृत्त O. C. S. मध्यें केव्हांही प्रसिद्ध झालेलें दिसत नाहीं. हें प्रवासवर्णन दादोबांच्या अप्रकाशित ग्रंथांमध्यें समाविष्ट करावें लागेल असें वाटतें.

(२२) **An Address to the inhabitants of Surat showing the advantages of taking the precedence of Bombay in the introduction of Spinning and Weaving Mills, Surat 1841.**

सदर पुस्तिकेंत या गुजराथी निबंधाचा उल्लेख आहे, परंतु तो उपलब्ध नाहीं.

(२३) **शाकुंतलाचें मराठी भाषांतर.** (अप्रकाशित)

मागें पृ० १६० पहा. उपलब्ध नाहीं.

1 Life of Dr. J. Wilson, p. 449.

बहुभाषाकोश (अप्रकाशित)
(२४) इंग्रजी–मराठी–गुजराती–हिंदुस्थानी. (पूर्ण)
(२५) मराठी–इंग्रजी–फारसी–तेलंगी. (अपूर्ण)

ता. ३ मार्च १८४१ रोजीं मि. एच्. एन्. रामसे, बोर्ड ऑफ एज्युकेशनचे सेक्रेटरी, यांनीं कांहीं शिक्षणाधिकाऱ्यांकडे मि. ॲडमचा रिपोर्ट पाठवून त्यांतील पृ. १५३ च्या अनुरोधानें मुंबईतील शिक्षणखात्यांतील क्रमिक पुस्तकांसंबंधीं आप-आपले विचार कळविण्याविषयीं लिहिले होतें.[1] त्याला उत्तरादाखल प्रो. बाळशास्त्री जांभेकर यांनीं जो रिपोर्ट पाठविला आहे त्यांत Vocabulary of English, Marathi, Goojratee and Hindustanee words by Dadoba Pandurang," असा उल्लेख आहे. या शब्दसंग्रहासंबंधीं प्रो. बाळशास्त्री याच रिपोर्टांत पुढें लिहितात,

" The want of a small Marathi and English Dictionary has been long and severely felt. The only aid that a student can now derive for the first two or three years of his studies till he can consult an English Dictionary himself is obtained from his teacher and his progress is necessarily slow. Dadoba's vocabulary of four languages mentioned in the list which is shortly to be published under the Patronage of the Institution, will hardly supply the deficiency as unfortunately it is not compiled on an alphabetical plan. In conjunction with Prof. Orlebar, I have been engaged for some years in compiling a short Dictionary of the roots of the English language which is now nearly ready. As the principal derivatives each root are marked after it and as it is intended to prefix a chapter on the meaning of the prefixes, this attempt may, it is hoped answer the purpose of school dictionary in some measure. But until some such Dictionary is published the progress of our classes will never be so rapid and satisfactory as may be expected. "[२]

बाळशास्त्र्यांनीं निर्दिष्ट केलेला हा दादोबांचा कोश किंवा शब्दसंग्रह प्रसिद्ध झालेला दिसत नाहीं. आपल्या आत्मचरित्रांतही त्याचा दादोबांनीं उल्लेख केलेला नाहीं.

1 G. D. 1843, 24 A, p. 650.
2 *Ibid.* pp. 672–3.

दादोबांचा कोश वर्णानुक्रमानुसार नाहीं. असा शेरा बाळशास्त्र्यांनीं मारल्यामुळें आणि स्वतः प्रो. ओर्लेबार व जांभेकर यांचा कोश तयार होत असल्यामुळें दादोबांचा कोश प्रसिद्ध करण्याची योजना बोर्डानें रद्द केली असावी. (बाळशास्त्र्यांचा कोशही प्रसिद्ध झाल्याच नाहीं!) सुबोधपत्रिकेंतील दादोबांच्या मृत्युलेखामध्यें पुढील उल्लेख आहे. "यांनीं मराठी, इंग्रजी, फारसी व तेलंगी या भाषांत एक कोश तयार करायास मांडला होता, तो पहिल्या दोन भाषांत तयार झाला होता, परंतु फारशी व तेलंगींत कांहीं शब्द होऊन बाकी तसेच राहिल्यामुळें तो कोश प्रसिद्ध झाला नाहीं.[1]" हा कोश पूर्वी सांगितलेल्या कोशाहून अगदीं निराळा दिसतो.

## (२६) महाराष्ट्रभाषेची पूर्वपीठिका. (अपूर्ण-अप्रकाशित)

"Philological and etymological treatise on the structure of the Marathi language", हा ग्रंथ लिहिण्याचा आपण संकल्प केला असून त्याचा कांहीं भाग तयार होण्याच्या मार्गांत आहे, असें दादोबांनीं आपल्या व्याकरणाच्या पूरणिकेंत लिहिलें आहे. (इंग्रजी प्रस्तावना, पृ. ६ तळटीप पहा)

दादोबांचा महत्त्वाचा असा 'माबाईच्या ओव्या' हा एकच ग्रंथ आतां राहिला. या रसाळ, अप्रकाशित काव्यग्रंथाची विस्तृत माहिती एका स्वतंत्र प्रकरणांत देण्यांत येईल.

★

१ सुबोधपत्रिका, ता. २२ आक्टोबर १८८२.

१३

# मराठी ट्रान्स्लेटर

मनुष्यप्राण्यानें बालपणांत झटून अभ्यास करावा व त्याच्या साहाय्यानें तरुणपणांत द्रव्यार्जनाची तरतूद करून ठेवावी: तरुणपणांत उत्तम प्रकारें धनसंचय करून वृद्धावस्था शांततेंत जाईल, अशी दक्षता घ्यावी; व आयुष्यभर पुण्यसंचय करून परलोकांत सद्गति मिळेल, अशी व्यवस्था राखावी अशा अर्थाचें एक संस्कृत सुभाषित आहे. दादोबांनीं बालपणांत चांगल्या प्रकारें विद्यार्जन करून तारुण्यांतील द्रव्यार्जनाचा मार्ग सुकर केला होता. पुढें सरकारी नोकरीही त्यांना सुदैवानें चांगल्या प्रकारची मिळून ती त्यांनीं इमानेंइतबारें केली, व आपल्या सांसारिक वाढत्या गरजा भागवूनही त्यांतून त्यांनीं चार पैसे शिल्लक टाकले असले पाहिजेत. सनातनी लोकांच्या मताप्रमाणें जरी ते धर्मलंड किंवा नास्तिक असले तरी त्यांच्या स्वतःच्या धार्मिक कल्पनेला अनुसरून ते सदाचारसंपन्न व धर्मशीलच होते, यांत शंका नाहीं. इहलोकांतील त्यांची एकंदर वागणूक त्यांना परलोकांत उच्च स्थान व चिरकालीन शांति प्राप्त होईल, अशाच प्रकारची होती. परंतु आपल्या कांहीं मित्रमंडळीच्या नादीं लागून मागें सांगितल्याप्रमाणें ते जे व्यापारांत शिरले, तो शेवटीं त्यांचा ‘ अव्यापारेषु व्यापार ’ च ठरला व तरुणपणांत केलेल्या कमाईचा वृद्धपणांत उपयोग होणें त्यांना अशक्य झालें. दादोबा ‘ शिशुबोधांत ’ लिहितात, “ थोड्या लाभांतच तृप्त असा. सन १८६४ त अशा लोभांत पडून मुंबईसारखें मोठें शहर खराबीस आलें. तुह्मीच पहा. त्या काळापासून माझी दशा कशी झाली आहे. मीं तर चिमणी प्रमाणें एका पोटापुरता दाण्याचा लोभ केला. त्या लोभाचें आज चौदा वर्षेपर्यंत दुःख भोगीत आहें ! ”

दादोबांचा जन्म गरिबींतच झाला. त्यांच्या वडिलांना एकंदर चौदा मुलं होतीं, त्यांपैकीं नऊजणें वारलीं व सहा मुलें बाकी राहिलीं. खर्चाची फार ओढ लागली म्हणजे ते कंटाळून पंढरपुरास जाऊन साधु व्हावें, असें कसें म्हणत, याचें वर्णन दादोबांनीं आपल्या चरित्रामध्यें केलेंच आहे. दादोबांचें शिक्षण संपून कोठें ते नोकरी पाहतात तोंच त्यांच्या वडिलांचा अंत होऊन संसारशकट हांकण्याची जबाबदारी त्यांच्या स्वतःवर येऊन पडली. त्यांचे बंधु भास्कर यांचा त्यांना आधार होता, परंतु तेही अल्पवयांतच १८४७ सालीं कालमुखीं पडले. आत्माराम यांचें या वेळीं वैयक्तीय

कॉलेजांत शिक्षण चालूच होतें. १८५१ सालीं ते डॉक्टर झाले. अर्थात् ते मिळवते होईपर्यंत भावंडांच्या सगळा शिक्षणाचा व पोषणाचा भार दादोबांवर होता हें निराळें सांगण्याचें कारण नाहीं. स्वतः दादोबांच्या कुटुंबाचा विस्तारही कमी नव्हता. त्यांना एकंदर अठरा मुलें झालीं. त्यांपैकीं दहाजणें अल्पायुषी ठरून लहानपणींच निवर्तलीं. राहिल्या आठ मुलांपैकीं चार मुलगे व चार मुली. त्यांची माहिती येणेप्रमाणें:—

**१ कावेरीबाई**— ( १८३७–१८६३ ) हिलाच यशोदापांडुरंगी हा ग्रंथ दादोबांनीं अर्पण केला आहे. तिचें सुरवातीचें शिक्षण नाना शंकरशेटच्या मराठी शाळेंत व पुढील मिसेस विल्सनच्या शाळेंत झालें. आबाजी नारायण मुंगे यांच्याशीं तिचा विवाह झाला होता.

**२ बाबाजी**— ( १८४६ — १९१८ ) कस्टमखात्यांत नोकर. सुरवातीचा पगार रु. ४०. गोपीनाथ रंगोजीची मुलगी पुतळाबाई हिच्याशीं विवाह झाला. दोन मुलगे झाले पण दोघेही अविवाहित स्थितींत निधन पावले. थोरला शिरू आधीं दिवंगत झाला, व दुसरा वामन ता. ९ आक्टो० १९२० रोजीं वारला. त्यापूर्वीच ता० १३ आक्टो० १९१८ सालीं बाबाजी परलोकवासी झाले होते. यांनींच ठेविलेल्या पैशांतून[१] बी. ए. च्या परीक्षेमध्यें मराठी या विषयांत सर्वांत जास्त गुण मिळविणाऱ्या विद्यार्थ्याला १४० रुपयांचें सुवर्णपदक व दरवर्षी सर्वोत्कृष्ट मराठी ग्रंथ लिहिणाऱ्या मुंबई युनिव्हर्सिटीच्या पदवीधराला २४० रुपयांचें पारितोषक १९३५ सालापासून दादोबांच्या नांवानें मुंबई विश्वविद्यालयाच्या मार्फत देण्यांत येत असतें.

---

१ बाबाजीनें ता. १७ अक्टो० १९१३ रोजीं एक मृत्युपत्र तयार करून त्याच्या अन्वयें आपली शिल्लक आपला मुलगा वामनराव यास मिळावी व तो मागें वारस न ठेवितां जर वारला तर ही रक्कम दादोबांच्या नांवें शिष्यवृत्ति किंवा पारितोषक देण्याकरितां मुंबई युनिव्हर्सिटीच्या हवालीं करावी, असें लिहिलें होतें. बाबाजी १९१२ सालीं वारले व त्यांच दोन वर्षांनीं वामनराव दिवंगत झाले. या पैशांचा किंवा बाबाजीच्या मृत्युपत्राचा कुणाला पत्ताच नव्हता. पुढें आठ वर्षांनीं रा. भास्कर सदानंद तर्खड यांना हे पैसे ज्या सिक्युरिटीमध्यें गुंतवून ठेवले होते त्याच्या सेफ कस्टडीची पावती अनपेक्षित रीतीनें दृष्टीस पडली व त्यांनी या प्रश्नाचा पिच्छा पुरवून हे पैसे म्हणजे मूळ रक्कम व त्यावरील सांचलेलें व्याज मिळून ११७९५ रुपये मुंबई विश्वविद्यालयाला मिळवून दिले व अशा रीतीनें मृताची इच्छा पूर्ण केली. याबद्दल ते स्तुतीस पात्र आहेत.

२ वेणुताई—(१८४९–१९२१) हिचे मुंगे घराण्यांत लग्न करून दिलें होतें. पण १८६१ सालीं दुर्दैवानें पुढें ती बालविधवा झाली. तेव्हां तिला समाजसेवेचें शिक्षण मिळावें म्हणून दादोबांनीं तिला सुमारें वयाचे २५ वे वर्षी मिस्. बर्नोल्ड भगिनीजवळ पुण्यास ठेविलें. मिस्. एलन, एमिली व डॉ. मिस्. लेतिशा (एम्. डी.) अशा या तिघी उच्च घराण्यांतल्या भगिनी विनावेतन लोकसेवेचें काम पुण्याला मिशनरी सोसाइटीमध्यें करीत होत्या. बर्मा येथील गव्हर्नर सर चार्ल्स बर्नोल्ड यांच्या या भगिनी व हिंदुस्थानचे व्हाइसरॉय (१८६४–६९) लॉर्ड लॉरेन्स यांच्या भाच्या. अशा थोर मनाच्या बायांच्या हाताखालीं आपल्या दुर्दैवी विधवा मुलीला ठेवल्यास तिला चांगलें वळण लागेल, व समाजसेवेचें शिक्षण मिळेल असें त्यांना स्वाभाविकपणें वाटलें. पुढें बर्नोल्ड भगिनींच्या सहवासामुळें वेणुबाईचें लक्ष खिस्ती धर्माकडे वळलें. त्याचा दृश्य परिणाम म्हणजे, "कांहीं दिवसांमागें रा. ब. दादोबा पांडुरंग तर्खडकर यांची वडील कन्या वेणुताई यांनीं पुणें मुक्कामीं बाप्तिस्मा घेऊन खिस्ती धर्माचा स्वीकार केला हें कळविण्यास आह्मांस आनंद वाटतो", असी ज्ञानोदयांत बातमी प्रसिद्ध झालेली पाहावयास सांपडते.[1] याचसंबंधी जास्त तपशीलवार माहिती पुढील जूनच्या 'ज्ञानोदयांत' आढळते ती अशी—"रा. ब. दादोबा पांडुरंग यांची कन्या वेणुबाई यांचा बाप्तिस्मा पुण्यास झाला, हें आह्मीं मागें कळविलें होतें. आतां सत्यदीपिकेवरून त्याविषयीं आणखी अशी माहिती मिळते कीं, त्या बाइस गेल्या मार्च महिन्यांत रे. मि. ग्रेगसाहेब यांनीं बाप्तिस्मा दिला. वेणुबाई बहुत दिवसांपासून मिस् बरनार्ड मडमेपाशीं राहात आहेत, आणि त्यांस खिस्ती धर्म नीट समजून घेण्याचा फार चांगला प्रसंग होता. त्यांचें मन देवाकडे वळलें आहे, अशी आमची खातरी आहे.

"मिस बरनार्ड मडमसाहेब ह्या फार मेहनती आहेत. त्यांचें काम पुण्यास फार चांगलें चाललें आहे. त्यांनीं रास्त्याचे पेठेंत इस्राएली लोकांतील प्रौढ बायकां-करितां शाळा घातली आहे. ह्याशिवाय त्या गांवांत पुष्कळ हिंदु लोकांच्या घरोघर जाऊन त्यांच्या स्त्रियांस धर्म, विद्या, शिवणकाम वगैरे शिकवितात." [2]

या चर्च ऑफ स्कॉटलंडच्या झनाना मिशन्मध्येंच वेणुबाई कार्य करूं लागल्या,

---

१ ज्ञानोदय, वर्ष ३५, (एप्रिल, १८७६) पृ० १९०.
२ तत्रैव— वर्ष ३५, (१५ जून १८७६) पृ. २८५–६.

मिस् बर्नाल्ड बरोबर १८८५ च्या सुमारास त्या इंग्लंडांत जाऊन आल्या होत्या. पुणें येथें त्यांचा ता. २८ डिसेंबर १९२१ रोजीं अन्त झाला.[१]

**४ श्रीनिवास**–(१८५२–१८९९) डोंगरी येथें जेल सुपरिंटेंडेंट. पुढें हटयोगाचा नाद लागला. चिंतोबा कुसुंबेकर यांची मुलगी नानीबाई हिच्याशीं त्यांचा विवाह झाला होता.

**५ नारायण ऊर्फ धाकजी**–(१८५७–१८८०) शिक्षण बेताचें. विवाहित. क्षयानें वारला.

**६ पांडुरंग**–(१८५९—१८८१) चित्रशाळेंत शिकत होता. अविवाहित.

**७ सुंद्राबाई**–(१८६०—?) हिची वडील बहीण मयत कावेरीबाई हिचा ज्यांच्याशीं विवाह झाला होता, त्या आबाजी नारायण यांच्याशीं हिचा विवाह करून दिला, पण पुढें तिचा भ्रतार वारला.

**८ अहल्या**—(१८६१–१८८८) रा. रामराव मळाककर, जे. पी. यांच्याशीं हिचा विवाह झाला. हिनें स्वीडनबोर्गवरील दादोबांच्या निबंधाचें भाषांतर केलें व त्यांच्या आत्मचरित्राची मुद्रणप्रतही हिच्याच हातची दिसते. दादोबांच्या अखेरच्या दिवसांत त्यांच्या त्या सेक्रेटरी होत्या असें म्हणावयास हरकत नाहीं. दादोबांच्या निधनानंतर त्यांच्या अप्रकाशित व अपूर्ण असें 'शिशुबोध' हें पुस्तक हिनेंच प्रसिद्ध केलें.

हे जे वर जननमरणांचे आंकडे दिले आहेत त्यांपैकीं बरेचसे डॉ. कांताबाई तर्खड (सौ० वासकर) यांच्याकडून मिळालेल्या जुन्या टांचणांवरून घेतले आहेत.

दादोबांची ही जी कौटुंबिक परिस्थिति वर्णन केली तिच्यावरून त्यांना मनःस्वास्थ्य कितपत होतें याची कल्पना सहज करतां येते. राघोबांना (सुप्रसिद्ध भाषांतरपाठमालाकार द्वारकानाथ यांचे वडील) चवदा मुलें झालीं, त्यांपैकीं तीन अल्पायुषी होऊन अकरा मोठीं झालीं. डॉ. आत्माराम यांना पंधरा मुलें झालीं. त्यांपैकीं सहा लहानपणींच दिवंगत होऊन नऊ मोठीं झालीं; अर्थात् त्यांच्यावर आपल्या कुटुंबाचा भार पडणें दादोबांना आवडण्यासारखें नव्हतें. अशा स्थितीत आपल्या मुलांचें आपल्यामागें कसें होईल याचा घोर त्यांच्या मनाला लागून राहिलेला दिसतो. त्यांच्या आत्मचरित्रांत त्यांचा स्वभाव एका प्रकारचा किरकिरा झालेला जो कांहीं

१ ज्ञानोदय, (५-१-१९२२)

ठिकाणीं आढळतो, तो यामुळेंच होय. विद्वत्ता, सद्वासना, बुद्धिमत्ता व आपल्या समाजाच्या, भाषेच्या किंवा धर्माच्या उत्कर्षाबद्दल निस्सीम तळमळ असूनही त्यांच्या हातून व्हावें तसें कार्य झालें नाहीं. त्यांच्यावर जर एकामागून एक कौटुंबिक आपत्ति आल्या नसत्या व त्यांना जर भरपूर आर्थिक स्वास्थ्य लाभतें तर ते महाराष्ट्राचे राममोहन राय झाले असते, असें म्हणावयास हरकत नाहीं.

सर अर्स्किन पेरी हे दादोबांचे मुळापासून हितचिंतक व मित्र होते. सर अर्स्किन यांना त्यांच्या संशोधनांत दादोबांचा पुष्कळ उपयोग होत असे. ते युरोपांत गेले तरी दादोबांचा व त्यांचा पत्रव्यवहार अखंड चालूच होता. अर्थात् त्यांच्याकडे आपलीं सुखदुःखें दादोबांनीं मनमोकळेपणानें उघड करणें स्वाभाविक आहे. वृद्धावस्थेंत दादोबांना सहन करावे लागणारे मानसिक कष्ट पाहून सर अर्स्किन यांचें हृदय कळवळलें व त्यांनीं आपले मित्र मुंबईचे त्यावेळचे गव्हर्नर सर जेम्स फर्ग्युसन यांच्याकडे दादोबांचें एक पत्र पाठवून त्यांना सरकारला काय मदत करतां येईल, यासंबंधी विचारणा केली. दादोबांचें फर्ग्युसनकडे पाठविलेलें उपरिनिर्दिष्ट पत्र उपलब्ध नाहीं. पण सर अर्स्किन पेरी यानें फर्ग्युसनला पाठविलेलें पत्र व फर्ग्युसननें दादोबांना मदत व्हावी म्हणून केलेली खटपट या संबंधीचा पत्रव्यवहार[१] मुंबई सरकारच्या दप्तरांत संग्रहीत आहे. तो खालीं देतों:—

## (१) सर अर्स्किन पेरीचें गव्हर्नर सर जेम्स फर्ग्युसनला पत्र

36, Eaton Place,
S. W. 22nd July 1880

My Dear Fergusson,

I enclose you rather a touching letter from my old Pundit Dadoba Pandurang who seems to have been led by exaggerated opinions of his own literary talents to abandon the Govt. service at an early period, and to have disclosed that his pen brings him but a sorry livelihood. It is indeed no wonder for it is principally devoted to Sanskrit studies and to Swedenborgian religious views. But he is a thorough scholar devoted to his books and whilst in the education service in which I first knew him ( nearly 30 years ago ) he wrote a Marathi grammar which has gone through 10 or 11 editions.

१ Educational Dept., 1880, Vol. 3, Comp. No. 428.

I enclose his letter for the purpose of asking whether your Government could not do something for him as we do here for distressed scholars. I think it would be a step in a right direction for although unsuccessful men of letters have hardly more claim on the public than unsuccessful men in other professions I think a just distinction exists in favour of those who devote their lives to studies having a noble end in view, but which never can be profitable in a worldly point of view. I enclose you also a note from our learned librarian Dr. Ross respecting him.

Yours sincerely,
Sd/- E. Perry.

## ( २ ) फर्ग्युसनची चीफ-सेक्रेटरीला चिट्ठी

Ch. Secy.—Educl. Dept.,

Sir Erskine Perry asks if Pundit Dadoba Pandurang could have some allowance given him as a distressed scholar as is done in England from the Queen's Bounty for which £. 1200 a year is annually voted at the discretion of the Prime Minister. Is there any precedent for such a grant, and in what way could it be proposed ? Would it require sanction ?

Sd/- J. F. 13-8-80

## ( ३ ) चीफ सेक्रेटरी मि. गोने यांचे प्रायव्हेट सेक्रेटरी मिस्टर हार्ट यांना उत्तर

My dear Hart, 15-8-1880.

I have discussed with Chatfield the question of the possibility of this Govt. giving an allowance to Pandit Dadoba Pandurang as a distressed scholar.

I am not certain but I am inclined to think that he has a Pension from Govt. ( he ended service as a Deputy Collector ) and that he is not in personal distress—but complains that he has failed to make a fortune to leave to his children.

We inherited something like the Queen's Bounty from the Peshwa. It was called the *Dukshina* Fund, and was a vote from the Treasury of about Rs. 20,000 a year to be expended in

presents to Brahmins. Our Govt. has appropriated this to the expenses of our Colleges, but there is a small portion Chatfield thinks under Rs. 2000, reserved for presents such as 5 rupees or 10 rupees a year to some old Brahmins who are gradually dying off. It is many years since any new name was added to the list.

Then in the Educational budget there is yearly vote of some Rs. 7000 for encouragement of literature, but this is always spent in the purchase of books.

Mr. Dadoba Pandurang's moral claims can scarcely be based on his Swedenborgian lucubrations, but on two very useful Marhatta Grammars he has written. But these are already a source of income to him. They are used in all the Govt. Marhatta Schools. The copyright is his own. He brings out new editions as wanted and sells the books to Govt.

Chatfield says that there is an office which has been vacant since May last to which Mr. Dadoba Pandurang cd. be very properly appointed. It is that of Marhatta Translator in the Educational Dept.–pay Rs. 200 – It was held by Major Candy, the author of the great Marhatta Dictionary, till his death 4 or 5 years ago, then an old gentleman had it who died last May. Chatfield says that if given to Mr. Dadoba it wd. have to be on the understanding that he wd. come to Poona when wanted to attend certain Committees, but his ordinary work the revision of books cd. be conducted in Bombay.

His merits and his great respectability might also be recognised by the Shrievalty and I fancy a Native ought to be appointed for next year–but I do not know who else there may be with claims. He has written to me to ask me to bring his name forward for this, and I take the opportunity of doing so.

Yours sincerely
Sd/– C. Gonne.

## (४) प्रायव्हेट सेक्रेटरीला चीफ सेक्रेटरीचें पत्र

My dear Hart,

With reference to my letter of yesterday in wh. I conveyed Chatfield's suggestion that the post of Marhatta Translator Rs. 200 a month, vacant since May last might be conferred on Mr. Dadoba Pandurang, Chatfield has since told me that after further consideration he is not sure that the office referred to could not be advantageously abolished and money is so much wanted for different things in the Educational Dept. that this question of abolishing the Marhatta Translatorship ought to be well thought out.

Chatfield also thinks that it might be more acceptable to Mr. Dadoba Pandurang to do something for one of his sons, and he is going to enquire about these youths, and write to me on the subject.

If no one is thought by His Excy. to have better claims on the Shrievalty for next year than Mr. D. P. that alone wd. be quite a sufficient recognition of his moral claims. The duties of the office are quite nominal, and the profits in one year wd. amount to a sum wh. wd. provide Mr. D. P. with at least an extra £. 100 to live on for the rest of his life—besides the honor.

Yours sincerely,

Sd/- Gonne, 21-8-1880

## (५) गव्हर्नरची प्रायव्हेट सेक्रेटरीला चिट्ठी

Mr. Hart,

Ask him if he wd. accept this small appointment on the understanding indicated.

Sd/- J. F.

18-8-80.

## (६) चीफ सेक्रेटरीचें प्रायव्हेट सेक्रेटरींना पत्र

My dear Hart,

This is a letter from Mr. Tarkhadker acting as Press Reporter to Chatfield in answer to enquiries about Mr. Dadoba

Pandurang's circumstances. Chatfield says that it does not seem that anything cd. be done for any of the sons by way of consideration for the Father.

He also says that if the Marhatta Translatorship is not wanted for Mr. Dadoba Pandurang he thinks the money cd. be better used another way.

Yours very sincerely,
Sd/- C. Gonne.
21-8-80.

## (७) रा. ड्रा. रा. तर्खडकरचें चॅट्फिल्डना पत्र

Bombay, 20th August 1880

Dear Sir,

In reply to your note of the 17th instant I beg to inform you that R. B. Dadoba Pandurang, who is my eldest uncle and who was formerly Deputy Collector, gets Rs. 116-10-8 per month as pension, being one-third of his former salary. He is now about 61 years old. He was formerly well off, but lost everything in the days of the sharemania. He is now in somewhat straitened circumstances as he has numerous children (especially daughters) and a rented house. Two of his daughters are young widows, one of whom lives with Miss Bernard in Poona. The other daughters are grown up but unmarried, as our community is so limited, and it is difficult to marry. He has four sons. The eldest (Babaji) is about 35 years old, not well educated, and serves as a clerk on Rs. 40 in the Customs Office. The second (Shriniwas) is 25 years old, has received a very good education in St. Xavier's, has passed his F. A, and is a gaoler of the Umarkhadi gaol in Bombay on Rs. 125. The third (Narayan) is 20 years old and is educated upto the 5th standard. The fourth (Pandurang) is about 18 years old and attends the Arts School. The first two sons are married and have children.

Yours truly,
Sd/- D. R. Tarkhadkar

## ( ८ ) दादोबांचें आभारप्रदर्शक प्रायव्हेट सेक्रेटरींना पत्र

Bombay, Breach Candy Road,
25th August 1880

Dear Sir,

In reply to your kind letter dated 21st inst. received yesterday, I beg respectfully to submit for the information of His Excellency that I most thankfully accept the offer which His Excellency has been pleased so kindly to make to me, feeling confident that the appointment may not, at the same time affect the question of my drawing the small Government pension (Rs. 116-8.) which I now receive: I shall be quite happy to attend the Committees at Poona whenever I am required to do so.

In conclusion I request you to be so kind as to convey the expression of my deep sense of gratitude to His Excellency for the kind interest which he has condescended to take in my case.

I beg to remain
Yours very truly,
Sd/- Dadoba Pandurang.

अशा प्रकारें मराठी ट्रान्स्लेटरची जागा स्वीकारण्यास दादोबांची मान्यता मिळाल्यावर पेन्शनर माणसाला सरकारी नोकरीवर पुनः घेतल्यास त्याला पूर्वीच्या पेन्शनवर हक्क राहतोच कीं काय, असा नवा प्रश्न उपस्थित झाला. त्यावेळीं, "If the pension would lapse we ought to make a special case of it with the G. of I. or here," असा गव्हर्नरनीं शेरा मारला आहे, त्यावरून या प्रकरणांतील त्यांची आस्था दिसून येते. पुढें अकौंटंट जनरल मि० इ. ग्रे यानें नवा पगार व पेन्शन मिळून जुन्या पगारापेक्षां जास्त रकम होत नसल्यामुळें दादोबांना पेन्शनवरील हक्क बुडत नाहीं, असें ता. १६-१०-१८८० च्या पत्रानें कळविलें व हा प्रश्न एकदाचा मिटला. मे० कँडी सेवानिवृत्त झाल्यावर त्यांच्या जागीं श्रीकृष्णशास्त्री तळेकर यांची नेमणूक झाली होती. पण ते ता. २३ एप्रिल १८८० रोजीं वारले. तेव्हांपासून ता. ७ मे पर्यंत ही जागा रिकामीच होती. पुढें ता. ८ मे पासून या जागीं रावसाहेब विष्णु बी. मोडनी यांची हंगामी योजना झाली. शेवटी ता. २९ ऑक्टोबर रोजीं दादोबांनीं या जागेचा चार्ज घेतला.

## शेरीफ कां नाहीं झाले ?

दादोबांना शेरिफची जागा देण्यासंबंधीचा उल्लेख वरील पत्रव्यवहारांत दोन ठिकाणीं आलेला आहे. ती सूचना मागें कां पडली, यासंबंधीं दोन शब्द लिहिणें अवश्य आहे. शेरीफची नेमणूक ही दरसाल २० डिसेंबर पासून चौथ्या जॉर्ज राजाच्या ता. ८ डिसें० १८२३ च्या Letters patent च्या अन्वयें केली जाई.[१] १८७८–७९ या वर्षी डॉ० आत्माराम पांडुरंग हे मुंबईचे शेरीफ होते. एका वर्षी युरोपियन व दुसऱ्या वर्षी हिंदी अशी ही आळीपाळीनें निवड होत असे. १८७९–८० म्हणजे ज्यावेळीं दादोबांसंबंधी हा खल चालला होता, त्यावेळीं Mr. William Maitland हा युरोपियन शेरीफच्या जागीं होता. तारीख २० डिसेंबर १८८० रोजीं जो नवी नेमणूक व्हावयाची त्या जागीं दादोबांची नेमणूक झाल्यास डॉ. आत्माराम पांडुरंग यांच्यानंतर फिरून त्यांच्याच बंधूची निवड केल्याबद्दल सरकारवर ठपका येणार होता. केवळ बंधू म्हणूनच नव्हे तर दुसरा कोणताही हिंदु या वर्षी त्या जागीं नेमणें कठिण होतें. त्यामुळें पारशी समाजांतील सोराबजी शापुरजी बंगाली यांची शेरीफ म्हणून स्थापना झाली. १८८१ डिसेंबरांत Major-General W. S. Huwett हे शेरीफ झाले. १८८२ सालीं डिसेंबरांत कदाचित् दादोबांनाच हें स्थान प्राप्त झालें असतें, परंतु त्याच्यापूर्वीच १७ ऑक्टोबर रोजीं ते दिवंगत झाले. त्यामुळें त्या जागीं या वर्षी रघुनाथ नारायण खोटे यांची योजना झाली.

★

१ J. D. 1879, No. 241.

१४

## दादोबांचे प्रकाशित किंवा अप्रकाशित ग्रंथ

(३)

### (२७) माबाइच्या ओव्या

दादोबांचा हा अप्रकाशित ग्रंथ अर्धवटच उपलब्ध आहे व आहे त्या स्थितींत त्याचे संरक्षण करण्याचें सारें श्रेय पुण्याचे महामहोपाध्याय प्रो. द. वा. पोतदार यांना आहे. ते आपल्या ता. ४-११-३६ च्या एका पत्रांत लिहितात, "दादोबा नुसते गद्यलेखक नव्हते. ते कविताहि रचीत. त्या कविता सोप्या, सुबोध व भावभरित असत. 'माबाईच्या ओव्या,' यांचा नमुना म्हणून सांगतां येईल. मला अभिमान वाटतो या माबाईच्या ओव्यांची मूळ वही आज माझे संग्रहीं आहे. आणि वाईट वाटते कीं ती वही एका रद्दीविक्या मेमणाच्या गळाठ्यांत मला मिळाली. मुंबईस जातों तेव्हां हीं रद्दींतील रत्नें गोळा करण्याचा मला एक नादच आहे. सहज एक दिवस गिरगांवच्या कोपऱ्यावर पडलेला एक मेमणाचा गळाठा तपासतां ही वही आढळली व तिचें महत्त्व ओळखून मीं ती चटकन विकत घेतली. अशा वस्तूंचें संरक्षण बंदोबस्तानें करण्याकडे आपल्या लोकांचें लक्ष बिलकूल नसतें हा अनुभव वारंवार येतो. ही वही माझ्या हातीं न लागती तर खात्रीनें कुंकवाच्या पुड्या बांधण्यास गेली असती." प्रो. पोतदार यांनीं मेमणाच्या गळाठ्यांतून या वहीचा बचाव केला खरा, पण आज 'कार्यकाले समुत्पन्ने' ती त्यांच्या स्वतःच्याच गळाठ्यांत कुठें गडप झाली असून मीं आधीं त्यांना सूचना देऊन चारदां पुण्याला ती पाहाण्यास त्यांच्या घरीं गेलों असतां त्यांना तो दुर्दैवानें सांपडली नाहीं! त्यांच्या या वहीची एक नक्कल मजपाशीं आहे, पण मूळ वही पाहावयाला मिळाली असती तर ती स्वतः दादोबांच्या हस्ताक्षरांत आहे कीं त्यांच्या मुलीनें-अहल्याबाईनीं ती लिहिली आहे हें मी बिनचूक सांगूं शकलों असतों व आणखीही कांहीं गोष्टींवर कदाचित् नवा प्रकाश पडूं शकला असता.

या ग्रंथाची एक इंग्रजी जाहिरात येथील सरकारी दप्तरखान्यांत मला उपलब्ध झाली. ती पुढें जशीची तशी देतों म्हणजे या ग्रंथाचें मूळ संपूर्ण स्वरूप कसें होतें याची स्पष्ट कल्पना होईल—

## THE VERSES OF MABAI

or

The songs of a Grand Mamma.

( A Marathi poem descriptive and didactic divided into four parts )

Part I – Containing the exhordium, and songs addressed by children to their mother and father, in grateful remembrance of their great care and paternal affection with which they individually nursed, educated and brought them up.

Part II – Containing songs addressed to and by Brethren reciprocally, in grateful and happy remembrance of their childhood, and its pastimes exhortatory to the discharge of the duties which they mutually owe to one another.

Part III – Containing the reminiscences of childhood and youthful days exhibiting a very lively, amusing and true picture of the social and domestic life, manners and customs of the Maratha families in the Deccan and Bombay, prevailing and extending over a period of a century past subdivided into two parts.

Part IV – Embracing the changes which have been brought and are now working in the Native social life under the influence of the British Government and English Education, contemplated in a genuine, just and orthodox point of view.

Each part to be had and sold separately also. Apply to Messrs. N. D. Tarkhadkar and Co., Breach Candy Road, Bombay.

Price each part 5 Annas. Whole Book bound 2 Rs.

हा ग्रंथ संपूर्ण छापलेला दिसत नाहीं, परंतु त्याचा एक मुद्रित भाग आपल्याजवळ असल्याचें प्रो० पोतदारांना आठवतें, पण त्या हस्तलिखिताबरोबर हा मुद्रित भागही

त्यांना सांपडत नाहीं[१]! त्यांच्या वहीची जी नक्कल त्यांनीं करून पाठविली तिच्यांतील मजकूर मागेंपुढें झाला आहे, तो मूळ वहींतच तसा आहे कीं नकलेचा दोष आहे हें कळत नाहीं. या हस्तलिखितांत कोणता मजकूर उपलब्ध आहे तो पहा :—

**खंड १ ला.** (१) मंगलाचरण–प्रास्ताविक–ओव्या ( २४५ ).
(२) मुलांनीं बापास उद्देशून लिहिलेल्या ओव्या ( २३५ ).

**खंड २ रा.** (१) भावाबहिणीस सामान्य उद्गार–ओव्या ( १०८ ).
(२) बहिणीनें भावास उद्देशून उद्गार– ओव्या ( ६६ ).
(३) बहिणींस सामान्य– ओव्या ( ४९ ).
(४) वडील भावानें धाकटे बहिणींस–ओव्या ( ३० ).
(५) धाकट्या भावानें वडील बहिणीस–ओव्या ( ५६ ).
(६) धाकट्या बहिणीनें वडील बहिणीस–ओव्या ( १०० ).

**खंड ३ रा.** (१) मुलांचें बाळपण—ओव्या ( ३२६ ).
(२) मुलींचें बाळपण— ओव्या ( १३५ ).

वरील जाहिरात उपलब्ध हस्तलिखिताशीं ताडून पाहतां, पहिल्या खंडांतील आईस उद्देशून असलेल्या ओव्या दिसत नाहींत. दुसरें व तिसरें खंड संपूर्ण आहे. चवथें खंड नाहीं, असें दिसून येतें. उपलब्ध भाग वाचून पाहतां हा सुबोध, गोड व रसाळ ग्रंथ जर संपूर्ण उपलब्ध होईल तर मराठी भाषेला तो भूषणभूत होऊन राहील, असें म्हणावयास हरकत राहत नाहीं.

'भावाईच्या' उपलब्ध सर्व ओव्या या ठिकाणीं देणें विस्तारभयास्तव शक्य नाहीं. शक्य झालें तर स्वतंत्र पुस्तकरूपानें त्या लवकरच प्रसिद्ध करण्यांत येतील. परंतु त्या अजिबात नष्ट होऊं नयेत म्हणून त्यांतील कांहीं भाग वानगीदाखल खालीं देण्यांत येत आहे :—

१ मुंबई सरकारच्या दप्तरखान्यांतील पुस्तकसंग्रहांत हें मुद्रित पुस्तक आढळलें नाहीं. इतकेंच नव्हे, तर मुंबईतील ग्रंथप्रकाशनांच्या ज्या त्रैमासिक याद्या येत्या असतात त्यांतही या पुस्तकाचें नांव सांपडत नाहीं. यावरून या पुस्तकाचा एक भाग छापला आहे असा जो प्रो. पोतदारांचा समज तो चुकीचा असावा, असें वाटूं लागतें.

# माबाईच्या ओव्या

## खण्ड १ ला

### १ प्रस्तावना

ओवी ही पहिली । गाईन देवाला । आळवीन त्याला । जीवेंभावें.
देव माझा बाप । देव माझी आई । देवाला मीं गाई । प्रेमभावें.
दीनबंधु देव । पाठीं उभा राहे । मग काय पाहे । उणें मज.
मायबहिण देव । जिवाची जिवाळी । सुखाची नव्हाळी । देव माझी.
माझें हितगुज । जाणे देवराय । सुखाचा उपाय । तोच योजी.
देवाचें वैभव । सत्तेचा प्रताप । तोचि जाण बाप । विश्वाचा या.
ज्ञानाचा सागर । आनंदाची खाण । विश्वाचें जनन । जेथुनियां.
देव माझा सखा । देव माझा प्राण । मन हें अर्पण । करीं त्याला.
मनीं माझ्या वसो । तोचि देवराय । इष्ट अभिप्राय । वदावया.

\+ \+ \+

पहा तीच मीं ही । आऊ ओव्या गातें । प्रेमें बोलावित्यें । मुलींमुलां.
हाच माझा खोवा । दुधासाखरेचा । मुलांच्या हिताचा । देत्यें त्यांस.
हळुहळू त्यांचीं । माझ्या या गायनें । वळवीन मनें । नीतीकडे.
कोंवळ्या मनाला । देईन दढिमा । आणीन त्या धामा । नीतीच्या मीं.
त्यांच्या मनाचा तो । ताणा वळवीन । युक्तीनें लावीन । नीतिवृक्षा.

### २ बापास

मीं माझ्या बापाला । आतां आळवित्यें । त्याच्याचि साहित्यें । वर्णी त्याला.
त्याणेंच दिलेलें । असे हें गांठोडें । फार किंवा थोडें । मजपाशीं.
त्याणें दिल्या ज्ञानें । करित्यें स्तवन । गंगेचें तें स्नान गंगोदकें.
गुरु तोच मुख्य । आदि अन्नदाता । तसा संगोपिता । बाळपणीं.
मायाममतेचें । तोच माझें घर । सुखाचें माहेर । बाप माझा.
गर्भी असतां मीं । आईला स्नेहाळें । तसे ते सोहोळे । मनीं तुझ्या.

वाटे तुला मज । जगीं वाढवावें । अधिकचि द्यावें । शक्तिहून.
मनीं हीच हौंस । तुझ्या घेई वाढ । गर्भी जेवीं कुड । माझी तेव्हां.
जन्मवार्ता माझी । ऐकाया आतुर । सांगा पृथ्वी वर । कोण दुजा.
कोणाच्याही गांवीं । नसे मीं तो कोण । जन्मलें कीं जाण । कोनीं कोठें.
तरीं तुला होई । मीं ती राजकन्या । होत ना का अन्या । कोणीं कोणा.
राजपुत्रजन्म । वार्ता न सुखाची । तितुकी जन्माची । माझ्या तुला.
ती वार्ता ऐकाया । देई कान कोण । पहिल्यानें जाण । बापा विना.
मुख हें पाहाया । धांवे कोण माझें । कामाचें तें ओझें । टांकुनियां.
असतां वडील । मानिशी संकोच । पहावया साच । मजला तूं.
अवश्य राखणें । त्यांची ती मर्यादा । लोकरीति कदां । नुलंघवे.
निर्दोष सुखाच्या । जरीं येती आड । होतां नये हूड । तरीं तुला.
मुलाचा या बाप । मला म्हणतील । हर्षाला पावशील । इतुक्यानें.
परी तुझ्या मनीं । मोठी ही आसोशी । केव्हां मीं बाळाशीं । पाहें माझ्या.
चोरुनी पाहशी । पुष्कळ सवडी । फेडाया आवडी । मनाची ही.

\+ + +

असे चिंता श्रम । वाहसी दारुण । कराया पोषण । आमुचें तें.
तुझ्या श्रमें आम्हीं । हांसतों खेळतों । पुष्टही दिसतों । तुझ्या श्रमें.
खातों पितों आणि- । शरीर झांकितों । शोभा दाखवितों । त्याच्या मुळें.
सणीं पर्वकाळीं । वस्त्रें अलंकार । उत्तम प्रकार । भोजनाचें.
तुझ्याच श्रमाचीं । उघड हीं फळें । झांकावे हे डोळे । कैसे आम्हीं ?
वाचणें लिहिणें । गणिताचें ज्ञान । पंतोजी कडून । शिकविशी.
पैका देऊनियां । पंताचा आर्जव । राखी मनोभाव । बाप माझा.
पाठशाळे मध्यें । करीं अध्यापन । तयाचा सन्मान । राखिशी तूं.
किती तूं वहासी । मनांत काळजी । शिकवी पंतोजी । कैसें मला.
कैसें देतो तो कीं । लक्ष मज वर । हें तूं वारंवार । विचारिशी.
भेटतां तुला ते । गुरु, तूं पुससी । शिकवण्यांत कैसी । बुद्धि माझी.
शुभवार्ता त्यांची । ऐकतां आनंद । नातरीं तो खेद । जाची तुला.

\+ + +

आह्मीं तुझ्या बापा। आवडत्या लेंकी। गातों कवतुकीं। आतां तुला.
आठवुनी बाळ—पण तें आमुचें। सुख माहेरीचें। भोगिलें जें.
किती बाळपणीं। तुला माझा लळा। म्हणशी ही बाळा। बाई माझी.
बैसविशी मला। आपुल्या पुढ्यांत। नित्य ओसरींत। प्रातःकाळीं.
खाऊ खेळण्यांनीं। मला खेळविशी। राघू तो दाविशी। पिंजऱ्यांत.
म्हणशी मला तूं–। वेडी, तो शहाणा। कदा तो रडेना। तुझ्यावाणी.
येतां भेटावया। दुरुनियां मित्र। कन्या किंवा पुत्र। पुसती ते.
सांगतां ही कन्या। वाटे त्यां अद्भुत। तुझें तें बहुत। प्रेम पहातां.

\+ \+ \+

करितांना खोडी। भाऊला मारिशी। मला दटाविशी। शब्दांनीं तूं.
त्याला छडी थोडा। मला शब्द फार। देई तेव्हां मार। तुझा बापा.
दटाविशी परी। लोण्याचा तूं गोळा। किती कळवळा। माझा तुला.
किती माझी मनीं। वहासी तूं चिंता। आणि ती अहंता। सारखीच.
कोणी अपशब्द। बोलतां मजला। चढशी क्रोधाला। तूंच तेव्हां.
कोणी माझ्या रूपा–। गुणा लागीं नांव। ठेवितां त्या ठाव। कैंचा टिके.
होईना का थोर। घरींचा तो राजा। न त्याचा मुलाजा। राखिशी तूं.
सर्व वाखाणितां। कोणी गुण माझे। होई पात्र तुझें। प्रीतीस तो.
किती शोधीशी तूं। सद्गुणी चतूर। मजला भ्रतार। मिळे ऐसा.
जांवई मिळतां। कुलीन व थोर। सामर्थ्या बाहेर। जाशी तेव्हां.
आठवतो माझा। लग्नसमारंभ। मंडपाचे स्तंभ। अजून ते.
तेव्हांचे ते गाती। अद्यापि माणसें। दळ्या अनारसे। मोतीचूर.
सालंकृत केलें। माझें कन्यादान। ब्राह्मणभोजन। घालूनियां.
कैशी झालें तेव्हां। पाहून मीं वेडी। वस्त्रा व लुगडीं। शालुशेले.
जरीं होतें तव्हां। माझें पोरपण। तरीं तें मेहूण। आठवतें,
आठवितां ऐसें। माझें बाळपण। तुझी आठवण। आईमागें.
जरी दूर आतां। सासुरवाशीण। काढित्यें मीं शीण। संसाराचा.
जरीं झाल्यें आतां। लेंकरांची आई। होऊं उतराई। कैशी तुझी.
क्षणोक्षणीं येतें। मनीं तें माहेर। ठाके ते समोर। मूर्ति तुझी.
दळितां कांढितां। करितांना वाती। तुझी न सोडिती। आठवण.

मीं हें माझें ऐसें । माहेर आठवीं । तुला एक ओवी । गाई नित्य
केव्हां बापा तुझें । ममतास्मरण । घाली मला न्हाण । आसवांनीं
आतांच पहा हा । ओला कीं पदर । असशी अमर । स्वर्गी सुखें
पहा तूं तिथून । तुझी ही सगुणा । आठवी स्मरणा । कैशी तुझ्या
असें माझ्या बापा । तुला नित्य गात्यें । तुझें आवडतें । लेंकरूं मीं

\+ \+ \+

संतोष पित्याचा । जरीं न राखावा । जन्म कां हो घ्यावा । त्याच्या पोटीं !
सत्पिता देवाचें । प्रतिबिंब जगीं । देव जयालागीं । खरा बाप.
मुलां बाप जैसा । तैसा तो विश्वा या । समर्थ रक्षाया । मुख्य असे.
बापाच्या निमित्यें । तोच जन्म देतो । पाळितो रक्षितो । लोकां सर्वां.
म्हणोनी नमित्यें । जगाच्या जनका । विश्वाच्या पालका । देवाजीला.

\+ \+ \+

खण्ड २ रा

## १ भावंडांचे उद्गार

जया उदरांत । जन्म माझा झाला । देवें त्यांत तुला । सांटविलें.
तुझी जी कां आई । पिता जो तुझाची । मायबापें तींची । माझीं जाण.
हातांनीं ज्या मला । घेतलेंसे हळू । तेंचि तुला झेलूं । लागती पं.
जिणें पायांवरी । मला न्हाणविलें । तिणें तुझें केलें । न्हाणें तेथें.
जें थान घातलें । माझ्या या मुखांत । क्षुधा केली शांत । त्याणें तुझी.
हातानें ज्या माझ्या । तोंडीं दिले घांस । अन्नाचा दे रस । तुझ्या तोची.
ज्या डोळ्यांनीं मला । स्नेहानें न्हाणिलें । तेची जाण ल्याले । रूप तुझें.
चुंबितां हे गाल । नाहींच जे धाले । त्यां ओंठीं घेतले । मुके तुझे.
एका मांडी वर । दोघां बैसविलें । स्नेहें खेळविलें । तुला मला.
सारिखीं तीं वस्त्रें । आम्हां नेसविलीं । संगें फिरविलीं । तूं मीं दोघं.
मला एका हातीं । तुला त्या दुसऱ्या । घेऊनीयां फेऱ्या । करविल्या.
तुला मला आई । घेऊन पुढ्यांत । देई ती तोंडांत । घांस दोघां.
म्हणे कोणाची ती । गाई कीं विरील । तेंच तें घेईल । घांस आधीं.

अशी ममतेची । कोंवळी समज । घालुनि सहज । राजी करी.
देई ती ते घांस । तोंडांत पाळीनें । म्हणे पहिल्यानें । देई मला.
देतां ती मजला । तेव्हां तूं रडसी । मग ती अंगाशी । घेई तुला.

\+ + +

कितीदां बागेंत । फिरलों धांवलों । आणि तीं नाचलों । तुह्मीं आह्मीं.
बाबानें दिलेल्या । झाडांचें शिंपणें । केलें खुरपणें । आह्मीं तेथें.
मीं देई तुह्मांला । उघडोनी तोटी । तुह्मीं लहानमोठीं । आपलालीं.
झाडें तेव्हां शिंपा । घेऊनियां झारी । कोणी त्या घागरी । थोर लहान.
एकीकडे चाले । हंसणें खेळणें । झाडांचें शिंपणें । होई त्यांत.
आवडीला मोठी । फुलांची आवड । पुरवीती कोड । आपुलें तें.
सकाळीं उठोनी । रमा व आवडी । भरती परडी । फुलांनीं त्या.
रमेची न चुके । केव्हां ती बकुळ । नित्य एक माळ । करी त्यांची.
नेऊनी आईच्या । घाली तीच माथां । आई तिच्या हातां । चुंबी तेव्हां.
आवडी प्रेमानें । होतांना मोगरे । करी तें गजरे । माझ्या साठीं.
येतां ते सोबती । मीं दावी त्यांना । आठवूनी गुणा । बहिणीच्या.
एकदां बाबांच्या। ज्याच्या त्याच्या नवी। झाडांची टवटवी। दृष्टीं आली.
मनीं झाल्या वरी । तेव्हां तेच खुश । म्हणाले बखशीस । देतों तुह्मां.
देती ते इनाम । रुपये किं तीन । करावें मिष्टान्न । म्हणती ते.
वनभोजनाचा । करुनियां बेत । जेवलों सभेंत । झाडां खालीं.
असे ते दिवस । आणि त्या गमती । आठवाव्या किती । दुःखा साठीं.

\+ + +

## २ बहिणीनें भावास

जरीं आतां पद्मा । एराची अंतुरी । झालें ; तुला तरीं- । विसरेना.
संसार लागला । आतां माझ्या पाठीं । आटाआटी मोठी । जरीं त्याची.
दीनरात्र तरीं । आठवीं माहेर । भाऊ लहानथोर । मनीं माझ्या.
आठवतें मला । गोड बालपण । तुमचें स्मरण । पहिलें तें.
तेंची गातें एथें । दूर मीं सासरीं । जें जें बापा घरीं । पाहिलें म्यां.
म्हणे मीं बयेला । तिचा तूं लाडका । तेव्हां घेइ मुका । बाप माझा.

तेव्हां त्वां म्हणावें । लाडकें तें कोण । आईला धरून । साक्षी साटीं.
आई हांसे बाप- । विनोदें न्याहाळी । आई घाली वाळी । कानीं माझ्या.
मला तूं दाविसी । चित्रें व खेळणीं । तुझ्या सांठवणीं । असती जीं.
दशावताराचा । वाडीचा गंजीफा । पितळेच्या तोफा । वीतभर.
आठवती मला । तुझीं तीं पुस्तकें । दाविशी कौतुकें । जेव्हां मला.
शाळेंतून येतां । आधीं हांक मला । मारिशी बयेला । मग तूं रे.
शाळेचा वृत्तांत । सांगाया मजला । धरवेना तुला । धीर कांहीं.
खुशालीची ती रे । असतां खबर । सांगसी सत्वर । मला सर्व.
म्हणशी येतांच । बाप तो घराला । सांगे त्या पहिला । वृत्तांत हा.
अशा बंधुराया । आठवितां गोष्टी । होतें बहु कष्टी । दूर येथें.
गोड बाळपण । स्वर्गींच्याच सुखा । दाखवीं भूलोका । खचित तें.
तुझ्या नांवें तें मीं । आठवित्यें सुख । विसराया दुःख । वियोगाचें.
गात्यें तुला भाऊ । दळण करितां । उखळीं कांढितां । तुला गात्यें.
काल जात्या वर । होती शेजारीण । ऐकविले गुण । तिला तुझे.
तुला आठवितां । डोळे भरूं आले । मग ते पुशिले । पदरानें.
सख्या शेजारिणी । येती माझ्या पाशीं । गोष्टी सांगे त्यांशीं । माहेरींच्या.
अभिमान वाटे । वर्णितां त्यां पुढें । गुणाचे पवाडे । भावांचे ते.
अभिमानें त्यांना । सांगे वडिवार । भाऊ सुभेदार । आहे माझा.
एथें आल्या वरी । तुला दोन मुलें । झालीं हें कळलें । भाऊ ! मला.
तुझे माझा जीव । केव्हां त्यां पाहीन । कडेला घेईन । गोजिरीं तीं.
दावीन मीं माझ्या । मुलां तीं लेंकरें । जीव माझा झुरे । याचे साटीं.
वाटे केव्हां आतां । येईल ती बीज । ओवाळीन तुज । आनंदानें.

\+ \+ \+

## ३ बहिणींस सामान्य

माझ्या बहिणींना । किती आठवावें । प्रेमें म्हाणवावें । एकांमेकां.
आईबापा घरीं । उडलों नाचलों । खेळही खेळलों । बाळपणीं.
तुम्हीं आम्हीं तेव्हां । खोडी करूं किती । करितां गणती । लाज वाटे.
किती वेडे चाळे । आपण ते करूं । आई राग भरूं । लागे मग.

खाण्या नेसणाचा । भलताच छंद । घेऊं तेव्हां खेद । करी आई.
परक्या मुलींच्या । पाहुनियां नव्या । म्हणों तैशा व्हाव्या । वस्ता आह्मां.
आई म्हणे मुली । गरीब आपण । आणाव्या कोठुन । वस्ता तैशा.
न ये तें आपुल्या । तेव्हां कांहीं ध्यानीं । बसों तैं रुसुनी । तुह्मींआह्मीं.
बोलों एकमेकीं । त्यांच्या पाहा आया । कैसें नेसावया । देती त्यांस.
कां न आपणाला । आपुली ही आई । नेसावया देई । उंच वस्त्रें.
पोरपण तेव्हां । नसे तो समज । वाटे मिळे सहज । सर्व कांहीं.
भलतेच घेऊं । आपण ते हट्ट । अशा होतों नष्ट । पोरपणीं.
कैसा हो दुपारीं । आपला तो पाठ । खेळों नित्य नाट । माजघरीं.
शेजारची गोदु । आल्या वर घरीं । वाघ व बकरी । चाले तेव्हां.
मोठ्या बायकांचे । संसाराचे व्याप । आणूं ते अमोप । खेळण्यांत.
सडूं रांधूं जेऊं । खोटें तें जेवण । आणूं तें मेहूण । वाहुल्यांचें.
एकीकडे बाया । आपुल्या गमती । पाहुनी हंसती । गालीं गालीं.
ह्मणती, पोरींनो । तुह्मींच हा सारा । आटोपा पसारा । आह्मां नको.
आह्मीं आतां जातों । काशीयात्रे सारीं । नांदा करा घरीं । संसार हा.
कंटाळलों आह्मीं । तुह्मीं घ्या जोजार । नको हा तो घोर । आह्मां आतां.
आह्मीं म्हणों घ्या तो । तुमचा संसार । नेतों आह्मीं पार । तुह्मीं बैसा.
पुरी ना ती कळे । पोरींना ते वेळीं । बायकांची रळी । बोलण्यांत.
आतां अनुभवा । आणा त्यांचा भेद । संसाराचा खेद । पदोपदीं.
आईबापा घरीं । कसें पोरपण । गोड हो ते शीण । वाटेना तो.
कितीदां आपण । भाऊ मिळोनियां । गाऊं त्या सवय्या । बाप सांगे.
असे आनंदाचे । गेले ते दिवस । आठवावें त्यास । किती आतां.

\+ \+ \+

## ४ वडील भावानें धाकटे बहिणीस

सये तूं ग माझी । धाकुटी बहीण । वडील जाणून । मला भीशी.
दांडगा मीं भाऊ । मारीन तुजला । वचकसी मला । पाहुनियां.
आई खाऊ देतां । धांवूनी आणिशी । पेसी तूं राखिशी । मन माझें.
पहिल्यानें माझें । तोंड तूं पाहासी । खेळाया लागशी । मग तूं गे.

शेजाऱ्यांच्या पोरी । येतां तूजकडे । नेशी एकी कडे । भयें त्यांना.
हळूंच तूं त्यांना । म्हणशी गलबला । सोसेना दादाला । बायानों गे.
हळूच आणा ती । बाहुली बाहुला । कोनीं जाऊं चला । लग्न लावूं.
वाचण्याचा हेका । माझ्या या दादाला । म्हणूनी गलबला । आवडेना त्या.
असें तूं मुलींनां । सांगसी भयानें । ऐकें एका कानें । तुझे बोल.
प्रीत भय आणि । मर्यादा राखिशी । मज तूं मानिसी । बापा परी.
नको सये मला । इतकी तूं भिऊं । जरीं असे भाऊ । वडील मीं.
माझ्या मनीं वागे । सदां तुझी कींव । काय म्यां उपाव । करावा तो.

\+ + +

## ५ धाकट्या भावानें वडील बहिणीस

ताई! तूं ग माझी । वडील बहीण । तुला मीं गाईन । आवडीनें.
होतों तान्हें मूल । तूं पण धाकुटी । तरीं माझ्या साठीं । कष्टी होसी.
आई घरकामीं । गुंतली पाहून । येशी तूं धांवून । माझ्या पाशीं.
निजेला पाहूनी । पाळण्यांत मला । हळूच गालाला । मुका घेशी.
झणीं मीं होईन । जागा त्या मुक्यानें । म्हणून भयानें । झोंपा देशी.
रडतांच मीं गे । धांवूनियां जाशी । आईला सांगशी । सोनू रडे.
हातींचें काम । लागली ती सोडी । घालावया उडी । मज वरी.
तुला आई म्हणे । त्वांच खोडी केली । असावी मोडली । झोंप त्याची.
मग त्वां म्हणावें । तुझ्या गळ्याची आण । लाविलासे जाण । हात जरी.
पुढें धांवूनीयां । पुसावें त्वां मला । काय म्यां तुजला । केलें बाळा.
आईनें म्हणावें । राहूं दे बाळाला । काय गोष्टी त्याला । पुससी तूं.
जाई तूं खेळाया । माजघरा आंत । लावूं नको हात । त्याला तूं गे.
तरीं जातां जातां । झेपिशी तूं वर । मुके तीनचार । घेशी माझे.
मग आई मला । पाळण्याबाहेरी । काढी म्हणे पोरी । फार द्वाड.
रडशी जोडिशी । तेव्हां दोन्ही हात । आसवें डोळ्यांत । आणूनियां.
उचलोनि तेव्हां । तुला घेई वर । मुके दोन चार । घेई तुझे.
जों जों तूं वाढसी । तों तों तुझा हेत । असे कीं वाढत । मज वरी.
तुला त्याचें नसे । एकें तें स्मरण । मला क्षणोक्षण । आठवतें.

## ६ धाकट्या बहिणीनें वडील बहिणीस

ताई ! तुझे किती । स्मरूं उपकार । झालीसे मीं थोर । तुझ्या हातीं.
बाळपणीं मला । एक माझी आई । दुसरी ती ताई । दिसे सदां.
आई मागें ताई । असें कीं जवळीं । दुजी ती स्नेहाळी । ऐशी कोण.
बाळपणीं माझें । आईला जें काम । तिला तें सुगम । केलें तुवां.
झोळी पाशीं माझ्या । तूंच उभी सदा । आई घरधंदा । करी जेव्हां.
तुझ्या त्या कोंवळया । मंजुळ शब्दांनीं । अंगाई व गाणीं । गाशी मला.

\+ \+ \+

मला दाखवावे । पोरांचे त्वां खेळ । उडती गोपाळ । दारीं कैसे.
कसे ते खेळती । विटी आणि दांडु । फळीनें ते झेंडु । भिरकविती.
कसे फिरविती । भोवऱ्या चकऱ्या । घालिती हुंबऱ्या । कितेक ते.
आटापाट्या अप्पा । -धप्पा खुंटा फळी । दुरून धुमाळी । दाखविशी.
पोरी त्या खेळती । कोणी खिचकुला । कोणी गायवाला । एकीकडे.
गाई कैसी पाजी । आपुल्या वांसरा । पिला देती चारा । पक्षी कैसे.
राघु पिंजऱ्यांत । शब्द कैसे बोले । मांजरीचीं पिलें । बागडती.
चुकतां एकादें । त्याला ती पाचारी । नवी गुरगुरी । काढी तेव्हां.
संतूची कोंवडी । पिलांना न्याहाळी । गेली रानोमाळीं । म्हणोनियां.
तत्काळ तीं सारीं । लगबगां येती । सर्व गोळा होती । तिच्या पाशीं.
कौतुक तें वाटे । ऐशी हो पाहतां । प्राण्याची ममता । बाळा वरी.
केव्हां तुझीं आझीं । बागेंत हिंडावें । फुलांचे पाहावे । नाना रंग.
रंगाचीं त्या मला । नांवें तूं पुससी । नेणतां सांगशी । आवडीनें.
पांखरें आपुल्या । पिसांच्या रंगानें । घेती कीं तुफानें । फुलां वरी.
म्हणती आमुचे । रंग हे चोरीले । साक्षिला आणिले । सूर्यकीर्ण.
फुलां पांखरांच्या । अशा त्या गे फौजा । दाखवूनि मौजा । करिशी तूं.
आठविती ताई । तुझी गुरवळी । पुरणाची पोळी । शेजारिणी.
लोणकढ्या तूपा— । सर्वे खातां घाई । तेव्हांच ती होई । गिळावया.
कसा ताई तुझा । केसरीभात तो । सुवास चालतो । चार घरीं.
वांगेंभाताची ती । तुलाच साधली । अशी ना पाहिली । भट्टी कोठें.

कितीदां भरीत। तुझें गे तें ताई। मागावें न धाई। जीव माझा.
पुनः पुनः येशी। तूं गे वाढायाला। तुझा कानवला। संपतांच.
बायका म्हणती। सुग्रण तुजसी। नाहीं पंचक्रोशीं। तेथें कोणी.
खरेंच गे ताई। तुला मीं सांगत्यें। हात हा ठेविल्यें। गळां तुझ्या.
आईच्या अढीला। जेव्हां तूं रांधिशी। मुलें फार खुशी। होती तेव्हां.
खरेंच रांधप। तुझा तो सुगर। असे जिभे वर। अद्यापि कीं.
आठवतां सुटे। जिभे वर पाणी। अशा सुगरणी। फार थोड्या.
दुसऱ्यांच्या हातीं। घालवीं ना वेणी। तुझी त्यां सरणी। साधेनाचि.
माझीया वेणीची। पाहूनियां परी। देती त्रास भारी। पोरी तुला.
माझ्या बुचड्याचा। पाहुनियां झोंक। मानिती कौतुक। बाया साऱ्या.

\+ \+ \+

## खण्ड ३ रा

## १ बाळपण

उपजलें तेव्हां। होतें वीतभर। आणि सकुमार। फुलावाणी.
शरीराचे सारे। अवयव नीट। गोजिरे चोखट। होते कीं ते.
परी नाहीं कार्यें। कराया समर्थ। आपलालीं व्यर्थ। दीसतीं ते.
डोळे होते परी। नाहीं ते पाहत। कान ते ऐकत। शब्द कांहीं.
जिभेला कळेना। रुचि कांहीं एक। गंध तेंही नाक। जाणेचिना.
मऊ कीं कठीण। कातडी न जाणे। इंद्रियांची ठाण। रीती येशी.
कंठांत किंकाळी। हातपाय हाले। नाकांतून चाले। श्वास माझ्या.
इतुक्यानें मला। सजीव जाणती। उपमा कीं देती। कृमीची पैं.

\+ \+ \+

भूक लागे तेव्हां। रडें अट्टहासें। समजत नसे। माते मला.
काय प्यावें काय-। तोंडांत घालावें। भुकेनें निवावें। कैसा परी.
भुकेची वेदना। आई जाणे माझी। घाली तोंडा माजी। थान जेव्हां.

\+ \+ \+

पराया आधीन। जिणें तुझें बाळा। म्हणोनी कळवळा। येत आहे.
पशुपक्षियांच्या। पिलांचें जीवन। नाहीं पराधीन। तुझ्या परी.

आपुल्या राखणीं । शक्ति आणि ज्ञान । फार तुजहून । त्यांचें असे.
जन्मतांचि किती । टुणूटुणा उडती । लागतीं चालती । चार पायीं.
जिभांनीं चाटती । आपुलीं अंगे तीं । माशा उडविती । शेंपुटांनीं.
आपुल्या आयांच्या । झोंबती सडांना । येतां पाहातांना । गोठ्यांत त्या.
जेव्हां सडां त्यांचें । तोंड तें पुरेना । पुढल्या पायांनां खुंटा देती.
अशीं तीं शहाणीं । वांसरें शिंगरें । हिणावती पोरें । माणसांचीं.

\+ + +

तुला पांच वर्षें । लागती चालाया । नीट तें बोलाया । पांच दुजीं.
किंवा सारें वय । गेलें तरीं नीट । न ये परिपाठ । बोलण्याचा.
खाणेंपिणें याही । स्वाभाविक क्रिया । लागती शिकाया । बाळपणीं.
अशी पराधीन । स्थिति मानवाची । सांगे बाळकाची । दिनचर्या.
एथेंच तें दिसे । मला फार स्पष्ट । देवाचें वरिष्ठ । दयालुत्व.
शक्तिहिन दीन । रडिजे हंसिजे । नलगे पाहिजे । याच्या अर्थीं.
पहिलें त तोंड । आईचें ओळखे । देखतां हरखे । मनीं बाळ.
मग इतरांतें । ज्याची जैशी दाटी । बाळ घाली मिठी । कंठीं तैशी.
स्नेहानें जे पाळी । बाळकांचा लळा । तयाचिया गळां । पडतसे.
हो का बाप भाऊ । मावशी बहीण । बाळ परीक्षण । करी त्याचें.
कसें ईश्वराचें । सूत्र हें अगम्य । मुद्रा जाणे सौम्य । क्रूर तेही.
जणु मुख्य स्नेहीं । असे आकर्षण । बाळकाचें मन ओढी । तेंचि.
आपण पाहतां । स्नेहें त्याज कडे । दावी तें रोकडें । प्रेममुद्रा.
हरुषें चुंबन । करा बाळा लागीं । सवेंच तें वेगीं येऊं पाहे.
खोट्या रोषें जरीं । भवयां कमाण । देतां चढवून । ओंठ काढी.
दटावितां फार । रडे अट्टाहासें । मग तो न सोसे । बालकासी.
प्रेमाचें भरितें । रोषाचा आवेश । जरीं तें बालीश । तरीं जाणे.
एकाच जवळीं । येई प्रेमपाशें । रोषाचे आवेशें । दूरी जाई.
म्हणतां, लाडक्या । बाळ मारी मिठ्या । दुवाडा कारट्या । शब्दां फिरे.
एथें देवाजीचें । दिस कळासूत्र । फिरवी विचित्र । आंतुनी तो.
या लागीं वडिलीं । प्रेमानें सुशब्दीं । बाळकास आदीं । शिकवावें.
कोवळ्या मनाला । हळुहळू जाण । लाडक्या बोलान । वळवावें.

माझ्या सोन्या बाळा । येई बा जवळीं । मिठी गळां घाली । माझ्या कैसा.
गंगू वये माझे । मला मुका देई । म्हणूनियां घेई । सर्वे तिला.
चित्रें दावुनियां । बाळां शिकवावें । पुष्कळ हंसावें । त्यांच्या पुढें.
आरसा दाऊनी । 'आ' शिकवावा । 'का' शिकवावा । कावळ्यानें.
जोडोनी पहिलीं । अक्षरें हीं दोनी । 'आका' ती बोटांनीं । दाखवावी.
असें खेळण्यांत । शिकवावें बाळा । लावावा तो ळळा । ऐशापरी.
अशा शिकण्याची । आठवण त्यांनां । होई शिकतांनां । खेळ ऐसे.
शिकणें खेळणें । मुलांचें आईचें । कौतुकाचें होतें । दोघां जणा.
पांच सहा वर्षे । होत त्यांच्या वया । नसावी तों छाया । पंतोजीची.

\+ + +

## २ मुलांचें बाळपण

सहावें वरुष । लागतां मजला । घातलें शाळेला । आईबापें.
बहु मुलां मध्यें । असें मीं धाकुटा । संवगड्यांचा तोटा । तेव्हां मला.
नाहीं कोणी माझ्या । ओळखीचें पोर । म्हणोनियां फार । दुःख वाटे.
एकटा मीं तेथें । घरींचें स्मरण । पदोपदीं जाण । होई मला.
तेव्हां माझे डोळे । भरोनियां येती । टपटपां गळती । अश्रुधारा.
लाडकी माझी बया । घरीं काय करी । दाटे गहींवरीं । कंठ माझा.
काय म्यां करावें । भावंडें धाकुटीं । घरीं तीं एकुटीं । मजविना.
एथें मीं हा ऐसा । सांपडलों बंदीं । सुटेन मीं कधीं । एथुनियां.
पंतोजी मुलांना । कांहींसें तें पुसे । छडी मारितसे । न सांगतां.
कळेना मला तें । काय कीं पुसतो । भोंवता फिरतो । मुलांच्या तो.
जरीं माझे पाशीं । येईल तो आतां । मारील सांगतां । न कळे तें.
असा माझे मनीं । धाक पंतोजीचा । बोबडी ही वाचा । धळे माझी.
त्याची ती बा छडी । पाहावेना मज । कसा जाई आज । दिवस हा.
केव्हां सांजावेल । होईल पर्वजा । जाईन मीं माझ्या । घरीं केव्हां.
खुणेची साऊली । पाहे घडोघडीं । येतो केव्हां गडी । न्याया मला.
येऊनियां एक । सांगे मूल मज । पंतोजिला आज । ताप आला.
डोकें बांधुनियां । बसले निमूट । न तो हाले ओंठ । आज त्यांचा.

वाटे ही कीं मला। खुशीची खबर। सुटी लवकर। होईल कीं.

\+ + +

अशी आमुची ती। होती तेव्हां शाळा। पोरांचा तो मेळा। रम्य दिसे.
समक्ष उभे हे। जणु पंत पुढें। सांगायला धडे। आमुचे ते.
कैसे ते सोबती। लखु, रम्या, धोंडी। गणू तो लवंडी। नित्य शाई.
बाळपणीचे हे। माझे मोठे गडी। कोठें देशधडी। झाले नेणों.
असते तरीं ना। आतां ओळखते। फिरवूनि जाते। तोंड केव्हां.
शाळेंत खेळलों। ज्यांच्या बरोबर। न राहती समोर। उभे आतां.
ऐसें तें आठवीं। तेव्हां बालपण। सांगडीही जाण। शाळेचे ते.

## ३ मुलींचें बाळपण

ऐसें बाळपण। वर्णि मीं मुलांचें। आतां तें मुलींचें। गाईन कीं.
पांच वर्षे चाले। सारिखा विहार। चेष्टा व्यवहार। बाळमुद्रा.
मुलांचें मुलींचें। रडणें हांसणें। रांगणें खेळणें। समान तें.
दिसेना कांहींच। तेव्हां तें अंतर। पुढें फेरफार। होई हळु.
पांच वर्षां पुढें। सहा वर्षा आंत। खेळतधांवत। असत कीं.
मुलांना तत्रापि। संगति मुलांची। मुलींना मुलींची। गमतसे.
सहा वर्षा पुढें। थोडथोडी लाज। तसाच समज। वाटे त्यांचा.
मुलींचा विशेष। मुलांचा तो थोडा। करितां निवाडा। होतो ऐसा.
बारा तेरा वर्षे। होती त्यांच्या वया। मुलांना खेळाया। मोकळीक.
याहूनि जरीं ते। वाढले सोरट। उघडे ते धिट्ट। धुमाळींत.
त्यांचें तें नवल। नाहीं लोकां जना। पोरींची वलाना। तेव्हांच ती.
आठवे वरुषीं। दटावे ती आई। म्हणे रंगुबाई। हळू चालें.
तुला म्यां कालचि। पाहिलें धांवतां। पुढें उड्या घेतां। बाळा सवें.
त्याला तें शोभतें। जरीं आहे थोर। तुझा अवतार। मुलीचा कीं.
स्वच्छंदे धांवतां। शेजारी पाहती। म्हणतील रीती। नाहीं बऱ्या.
घरांत योजना। लग्नाची चालती। मामाजी पाहाती। स्थळ तुला.
येते वर्षी कार्य। पाहिजे साधिलें। गळां पाणी आलें। म्हणताती.
खर्चाची ही जरीं। घरीं आहे ताण। आजेसासू जाण। खाटे वरी.

दोहों दिवसांची । आहेत पाहुणीं । लग्नाची घोकणी । त्यांना तुझ्य
म्हणती रंगूच्या । लग्नाचे सोहाळे । पाहूं मग डोळे । झांकोंत है
नित्य हाचि धडा । त्यांचा मामाजींना । या साटीं योजना । सत्वर हीं
भिकंभट माठे । मध्यस्थ आहेत । यांशीं हा एकांत । चालतसे
सासुरवाशीण । अद्यापि गे बाई । जरीं झालें आई । लेकुरांचें
त्यांची मसलत । नकळे मजला । कोणां देती तुला । कोणा कडे
झुरुनियां मनीं । आसवें गाळीत्यें । हळुच पुसित्यें । पदरानें
कोणाच्या पदरीं । तुला हे बांधिती । मोहांत पडती । खोटें केव्हां
परवां सकाळीं । चोरुनी ऐकिलें । माठे जे बोलिले । माजवरी
लग्नाची ही गांठ । जन्माची सांगड । नाहीं तोडजोड । सुखादुःखा
म्हणोनी लाडके । माझ्या रंगुबाई । जिवा होते लाई । तुझ्या साटीं
कैसा तो हा जीव । आईचा न झुरे । होतां तिच्या चोरें । योजना या
सास्वडीं थोरांत । घराणें तें मोठें । सांगताती माठे । थोरी त्यांची
त्यांच्या घरीं मूल । आहे बिजवर । रुपये हजार । मोजील तो
चाळिशीच्या घरीं । गेला तरी तो । म्हणताती त्यातें । अल्पवयी
ऐकुनि काळीज । तिळतीळ तुटे । उभारती कांटे । अंगा वरी.
जळोत रुपये । सोनियाचे नग । वर नाहीं चांग । काय करूं.
दिनरात्र मला । निद्रा ती लागे ना । पापीण कल्पना । मनीं येतां.
त्यांना म्हणे परी । देतील थापट । नको होऊं धीट । म्हणती ते.
मध्यें वडिलांचे । येऊं नये आड । करुन ते बोड । नत त्यांची.
चारां लेकरांचे । झाले बाप तरीं । वागताती घरीं । एक जर्मी.
ऐसें कृष्णाबाई । एकांतीं रंगूला । सांगे तें त्या बाळा । उमगेना.
म्हणे ती आईला । बोलशी तें काय । समज न होय । माझा त्यांत.
लग्नांत तें काय । नवरा कशाचा । कोण तो कोठचा । मी हें केंवा.
होईना का मेला । भलता नोवरा । तृप्ति तो विचारा । कां न ये ?.
रडशी कां तूं । न ये माझे ध्यानीं । हंसावें लग्नीं । माझ्या तुवां.
केशीं वाजितरें । वाजतील दारीं । मंडपीं शाल्शी । लागतील.

+ + +

## सांगे हितगोष्ट मावाई ही

बाळका या म्हणे। कांहींच न कळे। वाटताती सोहळे। तिला आतां.
कैसा सासुर्वास। मुलींच्या कपाळा। हे या बालकाला। कैसें कळे.
घरींचे काबाड। निसण कांडण। पाहंटे दळण। मणावारी.
धुण्याची ती मोट। नदी वरी नेतां। घागरी आणतां। पाण्याच्या त्या.
क्षणभर तेथें। मिळे तो विसावा। गांवांतील आवा। भेटतांना.

\+ \+ \+

एथें संपवितें। माझें बाळपण। कथानुसंधान। न तोडितां.
अति रमणीय। पुढील ती कथा। उपेक्षूं सर्वथा। नको तुह्मीं.
पुढल्या त्या ओव्या। गाईन मंजुळ। करूनि प्रांजळ। मना ऐका.
बायांनो बाबांनो। वासा तुह्मीं कान। शब्दांचे घालीन। घांस त्यांत.
जरीं जिरवाल। व्हाल तुष्ट पुष्ट। सांगे हितगोष्ट। मावाई ही.

★

१५

# दादोबा व राजकारण

## (१)

### मुंबईतील राजकीय जागृतीचा उगम व विकास

प्रत्येक माणूस आपआपल्या आवडीप्रमाणें किंवा परिस्थितीप्रमाणें आपलें कार्यक्षेत्र किंवा व्यवसाय निश्चित करीत असतो. प्रत्येकाला सर्वच गोष्टी करतां येणें शक्य नाहीं. डॉक्टराला वकिली करतां येत नाहीं म्हणून किंवा वकिलाला वैद्यकी करीत नाहीं म्हणून नांवें ठेवणें जितकें मूर्खपणाचें आहे, तितकेंच प्रो. कर्व्यांनीं होमरूल लीग स्थापन केली नाहीं म्हणून किंवा लो. टिळकांनीं विधवाश्रम उभारला नाहीं म्हणून दोष देणें अविचाराचें होईल. प्रत्येकाला सर्वच गोष्टी जरी करतां न आल्या किंवा त्यानें प्रत्येक गोष्टींत प्रत्यक्ष भाग न घेतला तरी त्याचीं प्रत्येक बाबतींत स्वतःचीं म्हणून कांहीं ठराविक मतें किंवा बरेवाईट पूर्वग्रह असतातच, हें विसरतां येत नाहीं. या दृष्टीनें पाहतां दादोबांचीं राजकीय बाबतींत मतें तरी काय होतीं, हें पाहणें मनोरंजक होईल. विशेषतः कै. विश्वनाथ काशीनाथ राजवाडे यांनीं आपल्या एका प्रस्तावनेंत इंग्रजी अमदानींतील पहिल्या व दुसऱ्या पिढीवर अत्यंत अनुदार व अन्याय्य अशी टीका केलेली आहे. त्यांत ज्या कांहीं तत्कालीन सुशिक्षितांचा त्यांनीं नामोल्लेख केला आहे त्यांत दादोबांचाही समावेश होतो. त्यामुळें याविषयासंबंधी दोन शब्द लिहिणें अप्रासंगिक होणार नाहीं असें वाटतें. राजवाडे लिहितात, " बंगाल, रजपुताना व महाराष्ट्र या तीन प्रांतांतील तत्कालीन कित्येक बुढ्ढे लोक असें सांगतात कीं, शक १७७९ तील या प्रचंड धडपडीचा अर्थच कळण्याची आपली ताकद नव्हती. मग स्वपक्ष किंवा परपक्ष घेण्याची किंवा टाकण्याची बाब दूरच राहिली! जुन्याच्या अभिमानानें किंवा स्मरणानें येणारा सहज त्वेषही या कुलहीन, राष्ट्रहीन, व समाजहीन लोकांच्या ठायीं नव्हता. भाऊ दाजी, विनायकराव वासुदेवजी, नाना मोरोजी, दादोबा पांडुरंग, कृष्णशास्त्री चिपळूणकर, केरो लक्ष्मण छत्रे, ईश्वरचंद्र विद्यासागर, दिनकरराव रानडे, सालरजंग, टी. माधवराव, विश्वनाथ नारायण मंडलीक, विश्राम रामजी घोले, वगैरे कारकुनी पेशाची राष्ट्रहीन आंग्लशिक्षित शेंकडो मंडळी याच युगांतील होत.

तरुण दादाभाई नौरोजी ह्या राष्ट्रीय आणीबाणीच्या प्रसंगीं लंडनांत स्वदेशीयांकरितां नोकऱ्या मागण्याच्या अर्जदारींत गुंतले होते. असल्या मंडळीला स्वदेश, स्वसमाज, व स्वेतिहास ह्यांची मातबरी काय होय ! "[१]

वर जी नामावलि दिली आहे त्यांतील कांहीं पुरुषांची राष्ट्रनिष्ठा, देशाभिमान व स्वजनसेवेविषयीं कळकळ इतकी उज्ज्वल आहे कीं, राजवाड्यांनीं त्यांच्यावर घेतलेले आक्षेप धादांत खोटे च उद्दामपणाचे आहेत, असेंच म्हणावें लागतें. या पुरुषांनीं सत्तावनसालच्या क्रांतीमध्यें राज्यकर्त्यांविरुद्ध भाग घेतला नाहीं म्हणून राजवाडे भडकले असें म्हणावें तर या क्रांतिकारकांचाही मार्ग त्यांना पसंत दिसत नाहीं ! त्यांची 'अविचारी' म्हणून राजवाड्यांनीं संभावना याच प्रस्तावनेंत केलेली आढळते ! ते म्हणतात, " ही धडपड संन्यस्त, तत्त्वज्ञानी, व **अविचारी** हिंदुमुसलमान पुढारी यांनीं बंगाल्यांतील शिपायांच्या साहाय्यानें केली. काल्पनिक तत्त्वज्ञानाचा व सुयंत्रित शास्त्राचा हा झगडा होता. पहिल्याचे पुरस्कर्ते हिंदुमुसलमान पुढारी होते व दुसऱ्याचे पाश्चात्य लोक होते. त्यांत सुयंत्रित शास्त्राचा विजय झाला. "

उपरिनिर्दिष्ट आंग्लशिक्षितांचे विचार राजवाड्यांच्या या उद्गारांपेक्षां निराळे असतील असें वाटत नाहीं ; मग या लोकांना अशा शिव्या देण्यास राजवाड्यांना हक्क राहातोच कुठें ? पण शेजारणीला ताक नाहीं म्हणून सांगण्याचा हक्क सुनेचा नसून आपलाच आहे, असें समजणाऱ्या खाष्ट सासूप्रमाणें आपले राष्ट्रीय दोष दाखविण्याचा हक्क राजवाडे आपलाच समजतात. ते जर इतरांनीं दाखविले किंवा जाणले तर ते "कुलहीन, राष्ट्रहीन व समाजहीन" ठरतात !

## पारतंत्र्य गोड कां वाटलें ?

वास्तविक ज्यावेळीं मराठ्यांच्या हातून राज्यसत्ता इंग्रजांच्या हातीं गेली त्यावेळीं आपल्या लोकांची अत्यंत अवनत अशी स्थिति होती. यावेळीं ज्यांच्या हातांत राज्यकारभार होता त्यांनांच देशाचा व राष्ट्राचा खरा अभिमान नव्हता. जो तो स्वतःच्या हातांत सत्ता कशी राहील व आपला वैयक्तिक स्वार्थ कसा साधतां येईल, या विचारांत मग्न होता. लोकहितवादींच्या लेखांमध्यें आपणास या वेळच्या समाजस्थितीचें ठिकठिकाणीं उत्कृष्ट चित्र पाहावयास सांपडतें. या जुन्याचा अभिमान वाटण्या-

१ मराठ्यांच्या इतिहासाचीं साधनें, खं० ६ वा, १९०५, पृ. ८२.

पेक्षां तिरस्कार वाटणेंच व त्याच्या स्मरणानें त्वेष येण्यापेक्षां संताप होणेंच जास्त 'सहज' होतें, हें विसरतां येत नाहीं. दुसरी एक गोष्ट अशी झाली कीं, आरंभीं जीं इंग्रज माणसें अधिकारी म्हणून इकडे आलीं त्यांपैकीं कांहीं म्हणजे एल्फिन्स्टन, मालकम, बार्टल फ्रिअर यांसारखे गव्हर्नर किंवा कॅ. जर्विस, सर अर्स्किन पेरी वगैरे खालचीं माणसेंही उदारहृदयी, विद्याव्यासंगी व हिंदी लोकांच्या कल्याणासंबंधीं मनापासून कळकळ बाळगणारीं अशीच होतीं. त्यामुळें हें जें राजकीय स्थित्यंतर झालें तें पारतंत्र्य असलें तरी सुरक्षितता, शांतता, विद्याप्रसार व न्यायप्राप्ति यामुळें लोकांना सुखकारक वाटूं लागलें. एल्फिन्स्टननंतर १८२७ सालीं मुंबईचे गव्हर्नर झालेले सर जॉन मालकम यानें आपल्या हाताखालील लोकांच्या मार्गदर्शनाकरितां म्हणून एक टांचण लिहून ठेवलेलें उपलब्ध आहे त्यांत तो स्पष्ट म्हणतो,

"Our success and moderation contrasted with the misrule and violence, to which a great part of the population of India have for more than a century. been exposed, have at this moment raised the reputation of the British nation so high, that men have forgotten in the contemplation of the security and prosperity they enjoy under strangers their feelings of Patriotism; but these are feelings which that very knowledge that it is our duty to impart must gradually revive and bring into action."[1]

सुयंत्रित शास्त्रापुढें काल्पनिक तत्त्वज्ञानाचा टिकाव लागणें शक्य नाहीं, यावरून राजवाड्यांची कबुली आपण पाहिली. "इंग्रजांची संस्कृति मराठ्यांच्या संस्कृतीहून श्रेष्ठ होती," अशीही कबुली त्यांनीं अन्यत्र दिलेली आहे.[2] तेव्हां इंग्रजांचें हें शास्त्र व त्याच्या संस्कृतींतील आदरणीय गोष्टी आत्मसात् केल्याशिवाय परकीय सत्तेचें हें जूं झुगारून देणें अशक्य आहे, असें त्या काळच्या आंग्लशिक्षित लोकांचें मत होतें. त्यांच्याकडून ही संजीवनी विद्या प्राप्त करून घेतल्यावर त्यांच्या हुकमतीखालीं आपण राहूं हें शक्यच नाहीं, असेंही त्यांना वाटत होतें, याला आधार आहे:—

प्रो. बाळशास्त्री जांभेकर हे आपल्या 'दिग्दर्शन' मासिकांत लिहितात,

---

१ यापुढील उद्धारांकरितां मागें पृ. ७१ तळटीप १ पहा.

२ मराठ्यांच्या इतिहासाचीं साधनें, (वि. का. राजवाडे) खंड १ ला, १८९८ प्रस्तावना, विवेचन ७, पृ. १०२.

" सांप्रत जेणेंकरून इंग्लिश लोकांचा अमल दृढ बसेल अशी कोणतीही गोष्ट जरी झाली तरी तिचा खेद मानूं नये. कारण इंग्लंडांतील सरकार एथील सरकारकरवीं व इंग्लिश लोकांकरवीं या देशचे लोकांस विद्या शिकविण्याविषयीं श्रम करवीत आहे. तेव्हां याप्रमाणें या देशचे लोकांस विद्या शिकविण्यानें असें होईल कीं, त्यांस आपलें राज्य करण्याचें सामर्थ्य येईल व कोणी लोकांस आपलें राज्य करण्याचें सामर्थ्य असतां ते आपण राज्य न करतां दुसऱ्या लोकांच्या तावेंत राहिले, असें कोठें बखरांमध्यें दिसून येत नाहीं. याप्रमाणेंच या देशांत घडून यावें यांत इंग्लिश लोक व या देशचे लोक या उभयतांचें कल्याण आहे. सुज्ञ इंग्लिश लोक हें जाणतच आहेत. त्यांस नेटिव लोकांस सांप्रत इंग्लिश लोकांप्रमाणें विद्वान् मात्र झालें पाहिजे. "[१]

रा० ब० गोपाळराव हरि देशमुख ऊर्फ लोकहितवादी यांचा निर्देश करण्यास राजवाडे कसे चुकले समजत नाहीं. त्यांनीं तर आपल्या एका पत्रामध्यें, "इंग्रज सरकार या देशांत आहेत या विषयीं लोक उघड नाहीं परंतु मनांतले मनांत कुरकूर पुष्कळ करतात. व मुख्यत्वेंकरून भट, पंडित, शास्त्री हे तर फार हैराण आहेत. परंतु माझें मत असें आहे, कीं या देशास हेंच सरकार ठीक आहे,"[२] असें स्पष्टच म्हटलें असून त्याचीं कारणेंही त्यांनीं दिलेलीं आहेत. परंतु याच गृहस्थांनीं 'इंग्लिश राज्यापासून फळ' म्हणून जो एक लेख लिहिला आहे त्यांत केलेलें भाकीत त्यांना वाटत होतें त्याच्या आधींच सत्यसृष्टींत येत असलेलें दिसत आहे. ते लिहितात,

## लोकहितवादींचें भविष्य

..." ईश्वरानें या देशांत इंग्रजांची प्रेरणा केली आहे...तेव्हां या साक्षात् शहाणे लोकांची गांठ पडून हिंदु लोकांच्या वाईट चाली बहुत सुटल्या व आणखीही कितीएक सुटतील. आणि यांचीं मनें शुद्ध होऊन यांस राज्यकारभार, व्यापार, धंदा कसा करावा हें ज्ञान येईल. देशसुधारणा क्षणांत होत नाहीं. तीस पुष्कळ विलंब लागतो. लहान मुलास हुशार होण्यास दहावीस वर्षें लागतात. मग देश चांगला होण्यास अर्थात्च दोनशें चारशें वर्षें लागतील. तोंपर्यंत या लोकांस दुःख आहे. परंतु त्यास उपाय नाहीं. जशी शाळेमध्यें मुलांनीं शिक्षा घेतली पाहिजे तद्वत् हें आहे. यापासून उत्तम फळ पुढें होईल...या लोकांच्या पायांतील शृंखला सुटतील.

१ दिग्दर्शन, वर्ष १ लें, मे १८४०, पृ. २८.
२ निबंधसंग्रह ( प्रथमांश ), १८६६, लोकहितवादी, पृ. ४५५.

हे चहों देशांत जाऊन व्यापार करूं लागतील, विद्वान् होतील, व आपले देशांत कापड वगैरे जिन्नस तयार करावयास शिकतील. तेव्हां सुखी होतील, लोक शाहणे झाले म्हणजे हळूच इंग्रजांजवळ म्हणतील कीं, " आह्मांस तुमच्या देशांत आहे तसें पार्लिमेंट द्या." नंतर आपले लोक त्यामध्यें बसूं लागले म्हणजे हळूच म्हणतील कीं, " तुह्मांसारखेच आह्मीं शाहाणे आहों मग आह्मांस अधिकार कां नसावे? " मग हिंदु लोकांचें बहुमत असें पडलें म्हणजे सरकारास देणें अगत्य आहे. इकडील लोक राज्याचे कारभार वगैरे चांगले करूं लागले. लांच खावयाचें सोडून दिलें, म्हणजे बहुतकरून मोठालीं गवरनरीचीं कामें सुद्धां यांचे हातीं येतील आणि मग अर्थातच इंग्रज फक्त व्यापार मात्र करून राहातील. म्हणजे जसे हिंदुस्थानांत प्रथम इंग्रज आले त्या स्थितीवर येतील आणि आपले लोक पार्लिमेंट व स्वराज्य भोगतील. राज्यकारभारांत व व्यापारांत त्यांस महत्त्व प्राप्त होईल आणि मग परदेशाशीं देखील व्यापार करतील. असे हे लोक प्रबल झाले म्हणजे इंग्रजांस कांहीं दिवसपर्यंत आभारी मानतील. कारण कीं त्यांचे योगानें हे ज्ञानी झाले. परंतु जा काळीं इंग्रज गडबड करूं लागतील किंवा कांहीं नवीन कानू बसवावयाचा आग्रह करतील, त्याकाळीं अमेरिकेंत झालें तसें होऊन हे लोक स्वतंत्र करून घेतील आणि इंग्रजांस सांगतील कीं, " तुह्मीं आपले देशास जावें. आतां आमचे देशाचा काम कारभार आह्मांस चांगला कळतो. तुमचें गुरुत्व नको. तुह्मीं पाहिजे तर व्यापारापुरते इकडे येत जा. आमचे प्रजेचें जसें आह्मीं रक्षण करतों तद्वत तुमचेंही करूं, परंतु तुमचें वर्चस्व नको. याप्रमाणें या देशांची गती होईल आणि नवीन राज्यस्थिति चांगले रितीची होईल. पहिलें अज्ञान अगदीं नाहींसें होईल. यास दोनशें वर्षे तरी पाहिजेत. परंतु असें होईल यांत संशय नाहीं. अशी मागले इतिहासावरून कल्पना होते. आणि हें तथ्य आहे अशी खातर-जमा आहे. "[1]

## चिपळूणकरांची इंग्रजी विद्येची स्तुति

राजवाडे ज्या राजकीय पंथाचे अनुयायी मानले जातात त्याचे अध्वर्यु विष्णुशास्त्री चिपळूणकर यांचाही इंग्रजी विद्येवर हिंदी स्वातंत्र्याचें साधन या दृष्टीनें लोकहित-

१ निबंधसंग्रह,—पृ. २५४.

वार्दोइतकाच विश्वास होता. 'आपल्या देशाची स्थिति,' या आपल्या सुप्रसिद्ध निबंधांत ते म्हणतात, " अमेरिकेंतल्या लोकांनीं गेल्या शतकांत काय प्रकार केला तो तर जगजाहीरच आहे. असो. तर एकंदरींत हें सांगावयाचें कीं सज्ञान दशेचें फळ देशोन्नति हें होय. यास्तव आपल्या देशांत जों जों इंग्रजी विद्येचा प्रसार होत जाईल तों तों सुधारणा, स्वातंत्र्य, सुख यांचा प्रसार अवश्य होत जाणार! एक इंग्रजी विद्येचें वज्र आमच्या हातीं असलें, म्हणजे मग लिटन्शाही, टेंपलशाही, चाटफील्डशाही, मूरशाही, वगैरे शंभर शाह्यांस सुद्धा आह्मीं दाद देणार नाहीं !! " [१]

## इंग्रज राजकर्त्यांचें भाकीत

नव्या मुंबईप्रांताचा ज्यांनीं पायाच घातला असें म्हणतां येईल त्या स्वतः एल्फिन्स्टनलाही या भावी स्थित्यंतराची पूर्ण जाणीव होती. १८१९ च्या मे महिन्यांत महाराष्ट्रांत असतां त्यानें माल्कमला जें एक पत्र पाठविलेलें उपलब्ध आहे त्यांत तो लिहितो,

" Sooner or later, it is probably desirable that we should have all the country... If we can then manage our native army and keep out the Russians, I see nothing to threaten the safety of our empire, until the natives become enlightened under our tuition, and a separation becomes desirable to both parties. "[२]

१८१९ सालच्या जून महिन्यामध्यें माकिन्टोशला पाठविलेल्या पत्रांत तो याच विषयासंबंधी आणखी लिहितो,

" The most desirable death for us to die of should be, the improvement of the natives reaching such a pitch as would render it impossible for a foreign nation to retain the government; but this seems at an immeasurable distance...A time of separation must come; and it is for our interest to have an early separation from a civilised people, rather than a violent rupture with a barbarous nation, in which it is probable that all our settlers and even our commerce would perish, along with all the institutions we had introduced into the country. "[३]

१ निबंधमाला, अंक ७७ पहा.

2 Elphinstone, J. S. Cotton, 1896, p. 185.

3 *Ibid*, p. 186.

हे एल्फिन्स्टनचे उद्गार एकाद्या जाहीर भाषणांतील नसून खासगी पत्रांतील आहेत हें विशेष लक्षांत ठेवण्यासारखें आहे. पुष्कळ वेळां लोकप्रियता मिळविण्या करितां अधिकारी लोक भाषणांत किंवा लेखांत साखर पेरीत असतात; अन्तःकरण त्यांचें निराळेंच असतें. एल्फिन्स्टनचें खरें मनोगत आपणांस त्यांच्या या खाजगी पत्रव्यवहारांत दिसून येतें.

बोर्ड ऑफ कौन्सिलचे अध्यक्ष मि. चार्ल्स ग्रँट यांनीं ईस्ट इंडिया कंपनीबरोबर हिंदुस्थानांतील ब्रिटिश मुलुखाच्या राजकारभाराच्या सुधारणेबद्दल नवा करार करण्याबाबत जें बिल मांडलें होतें, त्याचें दुसरें वाचन चालू असतां लॉर्ड मॅकॉले यांनीं ता. १० जुलै १८३३ रोजीं जें भाषण केलें त्याच्या शेवटीं त्यांनीं थोड्या तोऱ्यांतच का होईना जे उद्गार काढले त्यांवरून त्यांनांदेखील हिंदुस्थानांतील इंग्रजी साम्राज्याच्या भवितव्याची कल्पना होती, असें दिसतें. ते म्हणाले—

"We are free, we are civilised, to little purpose if we grudge to any portion of the human race an equal measure of freedom and civilisation.......

Are we to keep the people of India ignorant in order that we may keep them submissive? Or do we think that we can give them knowledge without awakening ambition? Or do we mean to awaken ambition and to provide it with no legitimate vent?......

It may be that the public mind of India may expand under our system till it has outgrown that system; that by good government we may educate our subjects into a capacity for better government that, having become instructed in European knowledge, they may, in some future age, demand European institutions. Whether such a day will ever come I know not. But never will I attempt to avert or retard it. Whenever it comes, it will be the proudest day in English history. To have found a great people sunk in the lowest depths of slavery and superstition, to have so ruled them as to have made them desirous and capable of all the privileges of citizens, would indeed be a title to glory all our own. The

sceptre may pass away from us. Unforseen accidents may derange our most profound schemes of policy. Victory may be inconstant to our arms. But there are triumphs which are followed by no reverse. There is an empire exempt from all natural causes of decay. Those triumphs are the pacific triumphs of reason over barbarism that empire is the imperishable empire of our arts and our morals, our literature and our laws."[१]

मुंबईच्या बोर्ड ऑफ एज्युकेशनचे अध्यक्ष व दादोबांचे हितकर्ते, मुंबईचे चीफ जस्टीस सर अर्स्किन पेरी हे आपल्या एका लेखांत म्हणतात,

"The effect of our European education is undoubtedly to emancipate the human mind, to investigate the origin, the stability, and the value of all existing institutions, and to trace the causes by which nations become either free or enslaved. Whether we desire it or not, our educational efforts undoubtedly tend to make the Hindus able to govern themselves. I think the object is a noble one, and that to propose to ourselves anything more restricted would be a dereliction of our duty. I am not sanguine that this object will ever be attained; centuries probably will have to pass over before the Hindus are fit for political self-government; but if ever the moment should arrive when the two or three hundred millions who will then people Hindustan shall have become under the beneficent guidance of their European rulers a nation of freemen, I think all history as well as all political economy may convince us that in those days India will be of more value to us as a powerful, intelligent and wealthy ally than she ever can be in her present depressed and impoverished state."[२]

---

1 **The Miscellaneous Writings and Speeches of Lord Macaulay**, 1873, p. 572.

2 **Bird's-eye View of India**, Sir Erskine Perry, M. P., 1855, p. 96.

सर बार्टल फ्रियर हा तर प्रति-एल्फिन्स्टन मानला जात असे. एल्फिन्स्टन प्रमाणेंच तो उदार, विद्याव्यासंगी व संशोधक बुद्धीचा होता. मुंबईला गव्हर्नर म्हणून त्याची नेमणूक झाल्यावर त्यानें कलकत्त्याहून एका जहाजांतून पाठविलेल्या ग्रंथसंग्रह, नाणीं व इतर दुर्मिळ वस्तु यांनीं भरलेल्या बत्तीस मोठ्या पेट्या जहाजाबरोबर बेपत्ता झाल्या असें नमूद आहे. यावरून त्याची विद्याव्यसनी वृत्ति कळून येते. मराठी तर त्याला सफाईनें बोलतां येत असे व नेहमी याच भाषेंत तो देशी दक्षिणी संस्थानिकांशीं भाषण करी. एकदां ता. ४ सेप्टेंबर १८६५ रोजी त्यानें दक्षिणेंतील संस्थानिक व सरदार यांचा दरबार भरवून त्यांच्या विद्याविन्मुख वृत्तीबद्दल त्यांच्या मराठी भाषेंतच त्यांची कानउघाडणी केली होती.[1] अशा प्रकारें एका मागून एक अधिकारी आल्यामुळें त्या वेळच्या आंग्लशिक्षितांमध्यें इंग्रज राजकर्त्यांविषयीं आदर असणें स्वाभाविकच होतें.

## राजकीय चळवळीचें बीजारोपण

असा जरी या कांहीं इंग्रजी अधिकाऱ्यांविषयीं आंग्लशिक्षित लोकांच्या मनांत वैयक्तिक आदर होता तरी पण इंग्रजाचें राजयंत्र अगदीं कांहीं निर्दोष व शुद्ध हिंदी लोकांच्या हिताकरितांच केवळ चाललेलें आहे, अशी त्यांचीं कधींही कल्पना नव्हती. तशी असती तर तर ता. २६ ऑगष्ट १८५२ रोजीं मुंबईच्या नागरिकांनीं श्रीमंत जगन्नाथ शंकरशेट यांच्या अध्यक्षतेखालीं सभा भरवून हिंदी लोकांनीं जास्त हक्क मिळविण्याकरितां 'धी बॉंबे असोसिएशन' ही पहिली राजकीय संस्था स्थापिली नसती. या संस्थेनें इंग्रज सरकारचा हिंदुस्थानांतील राज्यकारभाराविषयीं पार्लमेंट सभेस केलेली अर्जी उपलब्ध आहे. तिच्यामध्यें स्पष्टच म्हटलें आहे—"तुमचे अर्जदार ही गोष्ट पुर्तेपणीं जाणून आहेत व ती ते संतोषानें कबूल करितात की त्यांस इंग्रजांच्या अमलांत पुष्कळ सुखें आहेत; परंतु हीं सुखें इंग्रजांच्या चांगल्या गुणांमुळें प्राप्त जाहलीं आहेत; हिंदुस्थानांत राज्याची धर्ती आजपर्यंत जी चालत आली आहे तिजवरून हीं सुखें प्राप्त जाहालीं असा अर्थ नाहीं. ही राज्याची पद्धत जसजसे प्रसंग पडत गेले तदनुसार पडून आली आहे, ती योजना करून ठरविलेली आहे असें नाहीं. सबब या देशाच्या हल्लींचा स्थितीस व प्रजेच्या गर

1 The Life of Sir Bartle Frere, John Martineau, Vol. pp. 476-79.

इच्छेस ही राज्याची पद्धत फारशी माफक आहे असें नाहीं."[1] ही अर्जी या राजकीय संस्थेचे एक उत्पादक व कार्यवाह डॉ. भाऊ दाजी यांनीं लिहिली होती. डॉ. भाऊंच्या या राजकीय चळवळीमुळें कांहीं युरोपियन लोकांचा त्यांच्यावर घुस्सा झाला होता व याच्या मुळाशीं कांहीं पंचमस्तंभी आपलेच लोक आहेत, असी त्यांना सूचनाही एका मित्राकडून मिळाली होती.[2]

याच वेळींच ही राजकीय चळवळ सुरू होण्याचें कारण असें होतें कीं, १८३३ सालीं ईस्ट इंडिया कंपनीचें जुनें व्यापारी स्वरूप बदलून ती शुद्ध राज्य चालविणारी शासनसंस्था बनली. तिला आणखी वीस वर्षांची नवी सनद याच सालीं देण्यांत आली होती. १८५३ सालीं या सनदेचें पुनरुज्जीवन करावें कीं ती बंद करावी हा प्रश्न होता. १८५२ सालीं तो सर्वत्र प्रामुख्यानें चर्चिला जाऊं लागला. १८३३ सालीं जुन्या सनदेचें आणखीं वीस वर्षें आयुष्य वाढवितांना राज्यकारभारांतील कोणतीही अधिकाराची जागा मिळविण्याच्या मार्गांत कोणत्याही हिंदी माणसाला, त्याचा धर्म, वर्ण, जात किंवा जन्मस्थान या गोष्टी आड येऊं नयेत, असें एक स्पष्ट कलम होतें ; पण तें केवळ दप्तरांतच पडून राहिलें. कारण सनदी ( covenanted ) व असनदी ( uncovenanted ) असा नोकरींतील गोराकाळा हा पंक्तिप्रपंच चालूच होता. Haileybury college मध्यें शिकलेले तरुण इंग्लंडांतून येत व तेथील जमाबंदी, न्याय किंवा इतर खात्यांतील महत्त्वाच्या वरिष्ठ जागा अडवून बसत. त्याच्या इतकेंच किंवा त्यांच्याहीपेक्षां राज्यकारभारामध्यें जास्त कार्यक्षम असलेले आंग्लशिक्षित हिंदी तरुण केवळ ते विलायतेंत जन्मलेले गोऱ्या कातडीचे नाहींत, म्हणून या स्थानाला अपात्र ठरत होते. आपली सर्वतोपरी लायकी असतां आपल्याच देशाच्या कारभारांत आपला हात असूं नये, ही गोष्ट या लोकांना असह्य वाटूं लागली.[3] बंगालांतील तरुणांनीं हा अन्याय दूर करण्याकरितां स्वतंत्र संस्था स्थापन करून ब्रिटिशसरकारकडे शिष्टमंडळ पाठविण्याची व्यवस्था केली. मुंबईतील आंग्लशिक्षित तरुण या बाबतींत मागें राहणें शक्यच नव्हतें, 'बॉंबे असोसिएशन' हा या दिशेनें त्यांचा प्रथम प्रयत्न होय. "दादाभाई नौरोजी लंडनांत स्वदेशियांकरितां

---

१ बॉंबे असोसिएशन ( पार्लमेंटसभेस केलेली अर्जी ), १८५२, पृ. १–२.

2 **Native Opinion**, ७ जून १८७४.

3 Indians in British Indian Administration, हा **The Calcutta Review** ( Oct. 1910, p. 505 ) मधील लेख पहा.

नोकऱ्या मागण्याच्या अर्जदारींत गुंतले होते," असें राजवाड्यांनीं त्या हिंदुस्थानच्या पितामहाला उद्देशून जे उद्गार काढले आहेत, ते विपर्यासात्मक, खोडसाळ व अत्यंत कृतघ्नपणाचे आहेत. आपल्या सग्यासोयऱ्यांची वर्णी लावून त्यांची पोटापाण्याची सोय करण्याकरितां ते इंग्लंडांत गेले नव्हते. तर आपल्या लोकांची लायकी सिद्ध करून स्वातंत्र्याच्या मार्गांतील पहिलें पाऊल टाकण्याचा हा त्यांचा निस्वार्थ व शुद्ध राष्ट्रीय प्रयत्न होता, हें उघड दिसून येण्यासारखें आहे.

साम, दाम, दंड, भेद हे कार्यसाधनाचे विविध मार्ग आहेत. परिस्थितीप्रमाणें यांपैकीं कोणता उपाय यशस्वी होईल, हें ज्यानें त्यानें आपल्या चातुर्याप्रमाणें ठरवावयाचें असतें. इंग्रजांच्या अमलाखालीं आपलें रक्तशोषण होत असून आपला देश दिवसेंदिवस कंगाल होत चालला आहे, ही गोष्ट दादोबांनाही मान्य होती; परंतु ही दुःस्थिति आमचें अज्ञान व मूर्खपणा यामुळें आह्मांला प्राप्त झाली आहे, असें त्यांना वाटत होतें. आपल्यामध्यें विद्येचा प्रसार होऊन जसजसा शाहाणपणा येईल तसतसें आपले गेलेले हक्क आह्मीं हळुहळू परत मिळवूं शकूं; स्वातंत्र्य मिळविण्यांत क्रांतीचा मार्ग पूर्ण न्याय्य असला तरी तो चालू स्थितींत अव्यवहार्य आहे, असें दादोबांचें मत दिसतें. मानवधर्मसभेच्या वृत्तांतांत त्याची नोंद आहे. ती अशी :—

## मरावें लागलें तरी पर्वा नाहीं!

"इ. स. १८४४ च्या ऑगस्ट महिन्यांत २९ गुरुवार रोजीं सुरतेमध्यें मिठाच्या कराविरुद्ध मोठा दंगा झाला. तीस हजार हिंदु लोक जमा होऊन त्यांनीं शहरांतील दुकानें बंद करविलीं. मोठमोठ्या लोकांच्या घरीं जाऊन त्यांना आग्रह करून आपल्याबरोबर घेतलें व कोर्टामध्यें फिर्याद गुदरली. या वेळीं शिपाईलोकांबरोबर त्यांची मारामारी होऊन त्यामध्यें पुष्कळ शिपायांना इजा झाली. रयतेपैकींही पुष्कळ लोकांना मार बसला. त्या दिवशीं रात्र पडल्यावर सगळे लोक आपआपल्या घरीं गेले. दुसऱ्या दिवशीं पण अशीच गडबड उडाली. त्यामध्यें मुसलमानही पण सामील झाले होते. या सर्व लोकांनीं किल्ल्यावर दगड फेंकण्यास सुरवात केली. त्यावरून आज मोठीच गडबड आहे, असें सरकारच्या लक्षांत आलें व रात्रीं सगळ्या इंग्रजांनीं किल्ल्याचा आश्रय केला. तिसऱ्या दिवशींही लोकांनीं अशीच दंगल माजविली. त्यावेळीं स्थानिक एजंट-गव्हर्नर व जज्ज या दोघांनीं शहरांतील कित्येक प्रमुख मंडळी मिळवून असें ठरविलें कीं बऱ्या सरकारला याविषयीं लिहावें

व तिकडून उत्तर येईपर्यंत मीठ पूर्वी ज्याप्रमाणें विकलें जात असे त्याचप्रमाणें विकावें. हा निर्णय सरकारकडून जाहिराती लावून व थाळी पिटून शहरांत सर्वांना कळविण्यांत आला, व शेवटीं एकदांची ही हुल्लड शांत झाली. हा जो प्रकार घडला तो योग्य होता कीं अयोग्य होता, यासंबंधीं मानवधर्मसभेमध्यें बसलेल्या लोकांमध्यें चर्चा सुरू झाली. ती ऐकून मोतीराम दलपतराम म्हणाले, "मला तर हा प्रकार बरोबर वाटत नाहीं; या वेळीं प्रजेनें अर्ज करणेंच योग्य ठरलें असतें." त्याचें हें भाषण ऐकून मेताजी व दादोबा म्हणाले, "तुम्ही म्हणतां तें खरें; पण केव्हां? जेव्हां राजा प्रजेचा विचार घेऊन एकादी गोष्ट करतो तेव्हां. पण ज्या वेळीं असा प्रकार नसतो व प्रजेवर जुलूम होत असतो, त्यावेळीं प्रजेनें राजाबरोबर लढा सुरू करून त्याला शिक्षा करावी व राज्य निराळ्या राजाच्या स्वाधीन करावें. अशासारख्या कामांत जो मदत करतो तें त्याचें भलेपणाचें लक्षण आहे. अशासारख्या कामांत प्रजेपैकीं कांहीं माणसांना जरी मरावें लागलें तरी त्यांत पर्वा नाहीं. कारण जुलमी राजापासून प्रजेचें रक्षण करणें यांत मोठाच परोपकार आहे. लक्षांत ठेवा कीं, राजाचें राज्य हें प्रजेच्या कल्याणाकरितां आहे; प्रजेसंबंधी समभाव राखण्याकरितां आहे. पण असें न करतां उलट जर प्रजेला तो पीडा देऊं लागला, तिला दरिद्री बनवूं लागला, एका देशांतील प्रजेवर कृपा ठेवून त्यांना धनवान् बनविण्याचा उद्योग करूं लागला, आणि दुसऱ्या देशांतील प्रजेला निर्धन करण्यास इच्छूं लागला तर अशा राजाबरोबर लढा करून धर्मबुद्धीनें चालणाऱ्या राजाकडे राज्य सोंपविलें पाहिजे. आमचें हें बोलणें केवळ इंग्रजांकरितांच नाहीं. पृथ्वीवरील सर्व राजेलोकांना उद्देशून आमचें हें बोलणें आहे. आजपर्यंत पृथ्वीवर व आमच्या देशामध्यें पुष्कळ जुलुमी राजे होऊन गेले. त्या सर्वांना प्रजेकडूनच शासन मिळालें आहे. म्हणून प्रजेपैकीं एकाद्या माणसाला ज्यावेळीं एकाद्याकडून त्रास पोंचतो त्यावेळीं त्यानें राजाकडे फिर्याद करावी; आणि स्वतः राजाच ज्यावेळीं प्रजेला दुःख देऊं इच्छितो तेव्हां प्रजेनें स्वतःचें मनगटाचें बळ राजाला दाखविण्याकरितां परमेश्वराचें साहाय्य मागावें."

असें भाषण झाल्यावर सभेचें काम संपलें. वरील भाषणाला उद्देशून महीपतराम रूपराम म्हणतात, "हें भाषण इ. स. १८८४ च्या ऐवजीं इ. स. १८७८ मध्यें जर दादोबानें आणि दुर्गारामानें केलें असतें तर त्यांना आपल्या

जीविताचा शेष भाग, काळेपाण्यावर जाऊन अंदमानबेटामध्यें घालवावा लागला असता !"

## आपल्या अवनतीचीं कारणें

ता. ८ सेप्टेंबर १८४४ च्या मानवधर्मसभेमध्यें गोवर्धनदास गोपाळदास यांनीं प्रश्न केला, "इंग्रजांचें राज्य आपल्या देशामध्यें आहे, त्यामुळें प्रजा सुखी आहे कीं दुःखी आहे?" याचें उत्तर मेताजी व दादोबा यांनीं असें दिलें, "कांहीं बाबतींत इंग्रजांचें राज्य चांगलें आहे; पण हा राजा परदेशचा आहे. त्यामुळें आपल्या देशांतील लोकांवर त्याची जेवढी प्रीति आहे, तेवढी या देशांतील लोकांवर नाहीं. म्हणून इकडची प्रजा दुःखी आहे."

गोवर्धनदास म्हणाले, "मी खरोखरच सांगतों कीं, इंग्रजांच्या राज्यापासून प्रजा निर्धन होऊन गेली; व्यापार सर्व बुडाला; या दुःखाबरोबर इतर दुसरीं कितीही सुखें असलीं तरी तीं अस्त पावतात. पहा, या शहरामध्यें कितीतरी लोक गरीब आहेत. अशा प्रकारें सगळ्याच हिंदुस्थानांत फारच वाईट दशा प्राप्त झाली आहे. जों जों याप्रमाणें इंग्रजी राज्य पांच पन्नास वर्षें राहील तों तों सगळी प्रजा दरिद्री होऊन जाईल." त्याला मेताजी व दादोबा यांनीं उत्तर केलें. "तुम्हीं बोलतां ती खरी गोष्ट आहे. भाई, खरी गोष्ट आहे. आम्हांलाही पण असेंच वाटतें. पण यांत सारा दोष आपल्याच लोकांचा आहे, हें लक्षांत ठेविलें पाहिजे. हें जें सगळें झालें आहे तें आपल्या लोकांच्या दुर्बलपणामुळें व विचाररहितपणामुळें झालें आहे. पहिलीवहिली आपल्या देशांतील एक वाईट गोष्ट आहे ती ही कीं, शस्त्रधारण एकच जात करते; बाकीच्या जाती करीत नाहींत. तसेंच ब्राह्मणलोकांना स्वतः राजासारखें सुख असावें ही चिंता; परंतु प्रजेबद्दल कांहींच काळजी नसते. त्यामुळें आपला देश परकीय राजांच्या हातीं गेला. पण जर आपल्याच्या वेळीं सर्व प्रजेनें हातांत शस्त्र घेऊन इतर देशांतील प्रजेप्रमाणें ती लढती असती, आणि ब्राह्मणलोकांनीं प्रजेची काळजी वाहिली असती, तर स्वदेशरक्षण झाल्याशिवाय राहिलें नसतें. याबद्दल मोठाच टपका आम्हीं आचार्यलोकांना देतों. कारण आपल्या देशांतील लोकांमधील जो एकचित्तपणा नष्ट झाला आहे, तो या भिकारी गुरूंनीं उलटसुलट दिलेल्या शिकवणीचा परिणाम होय. दुसरी गोष्ट ही कीं, आपल्या देशांतील लोक विद्यांचा अभ्यास करीत नाहींत. निरनिराळ्या देशांचे

वृत्तांत वाचीत नाहींत. त्यामुळें अज्ञान वाढलें आहे. तसेंच जुन्या शास्त्रावर आपले लोक फाजील विश्वास ठेवतात. कांहीं विचार करीत नाहींत, धर्माच्या आडकाठीमुळें वाहानांत बसून दूर देशांमध्यें जात नाहींत. त्यामुळें इतर देशांतील कलाकौशल्याची त्यांना माहिती नाहीं, व त्या देशांतील लोक करीत असलेल्या विद्यांमध्यें व कलांमध्यें ते मागें पडले. यामुळेंच सारा व्यापार बसला आहे. आतां हाच उपाय राहिला आहे कीं आह्मीं विद्या व कला यांचें ज्ञान संपादन करावें, नीतिमान व्हावें आणि सरकारजवळ स्वतःचें खरे हक्क मागावे. बाकी याशिवाय दुसरा कांहींच उपाय नाहीं."[१]

यावरून दादोबांची राजनिष्ठा कोणत्याप्रकारची होती, हें कळून येईल.

ज्ञान व नीति यांची प्राप्ति करून आपले हक्क परत मिळविण्याचा हा जो उपाय दादोबांनीं सांगितला त्याचाच अवलंब बॉंबे असोसिएशननें केला असें म्हणावयास हरकत नाहीं.

## स्वातंत्र्याला पहिली हांक !

बॉंबे असोसिएशनची ही अर्जी म्हणजे हिंदी स्वातंत्र्याला मारलेली पहिली हांकच होय. त्यांतील संयम, युक्तिवाद व मांडणी यांमुळें इंग्लंडांतील विचारी लोकांना हिंदी लोकांच्या आकांक्षांची व योग्यतेची खात्री पटली, असें त्यावेळीं प्रसिद्ध झालेल्या विलायतेंतील वृत्तपत्रांतील मजकुरावरून दिसतें. पाहा :—

(1) The Petition is not a long one, though it is full of matter. It is not querulous, in the old Indian's style, nor rhetorical, nor eloquent against 'grievances' or 'oppression,' but it is remarkable for dealing with imperfections in the existing state of Anglo-Indian government in a plain matter-of-fact style, and for offering practical suggestions rather to illustrate principles than to enforce dogmatic demands. Nothing could be more sensible.'—*The Spectator*, January 8, 1853.

(2) The Petition which has been transmitted to this country, and the movement in which it has originated prove that the people of Bombay, notwithstanding their diversities of race, are actually fitting themselves to receive if not to extort,

१ दुर्गारामचरित्र, पृ. १०१–१०७.

a due share of self-government under British institutions... ...and now we find the Natives of Bombay, not begging like spaniels, at the feet of their master, but conducting a political agitation, with money and moderation, like the middle classes of Liverpool or Manchester."—*The Leader*, January 15, 1853.

धि लॅन्सेट या (लंडन) वैद्यकीय विषयांना वाहिलेल्या प्रसिद्ध षण्मासिक पुस्तकानेंही या अर्जाची स्तुति केलेली आहे. डॉ. भाऊ दाजींसंबंधानें लिहितांना हा संपादक लिहितो, "He was the secretary, and in a great measure the founder of the Bombay Reform Association, the good sense, the good taste and Moderation of whose petitions elicited the universal approval of members of Parliament, even when declining to assent to the views they expressed." *The Lancet*, 1855. Vol. I, p. 48.

डॉ. भाऊ दाजी यांच्या वैद्यकीय व्यवसायाचा व्याप एवढा वाढला कीं, त्यांना बॉंबे असोसिएशनच्या कामांत लक्ष घालण्यास पुढें मुळींच सवड मिळेनाशी झाली. त्यामुळें त्यांचें सेक्रटरीचें काम दादोबांचे एक सहाध्यायी, नवरोजी फर्दुनजी यांच्याकडे आलें. त्यांनींही तें कांहीं काळ मोठ्या धडाडीनें चालविलें. "On the Civil Administration of the Bombay Presidency," या नांवाचें एक निवेदन १८५३ सालीं फर्दुनजीनें लिहिलेलें छापील पुस्तकरूपानें उपलब्ध आहे, तें मुंबईप्रांताच्या राजकारणाचा ऐतिहासिक दृष्ट्या अभ्यास करणाऱ्यांना उपयुक्त वाटेल. ज्यावेळीं बॉंबे असोसिएशन स्थापन झालें, त्या सुमारास कांहीं महिने आधीं दादोबांची हुजूर डेप्युटी कलेक्टर म्हणून अहमदनगर येथें नेमणूक झाली होती. त्यामुळें दादोबांचें नांव असोसिएशनच्या आरंभाच्या सभासदांच्या यादींत झळकत नाहीं. त्या काळीं राजकारणाची इकडे नुकतीच कोठें सुरवात होत होती. सरकारी नोकरांना अशा चळवळींत भाग घेण्यास निर्बंध नव्हता; परंतु 'धि टेलेग्राफ अँड क्यूरियर' सारख्या कांहीं अंग्लो-इंडियन वृत्तपत्रांनीं या संस्थेविरुद्ध खोडसाळ प्रचार चालविला. सर जमशेटजी जिजीभाई, महमद अमीन रोग, रामलाल ठाकरसीदास अशासारखीं माणसें या चळवळींतून पाय मागें घेऊं लागलीं.[1] १८५७ राज्यक्रांतीनंतर या संस्थेवर सरकारचा विशेष

1 Dadabhai Naoroji—Sir R. P. Masani, 1939, p. 58.

डोळा होता असें दिसतें. त्यामुळें सभेच्या कामांत जास्त उत्साह दाखविणें धोक्याचें ठरून असोसिएशनचें काम मोडकळीस आलें असावें. या वेळचे बॉंबे असोसिएशनचे रिपोर्ट उपलब्ध नाहींत. त्यामुळें कोणतेंही निश्चित विधान करतां येणें शक्य नाहीं. पुढें राजवाड्यांनीं कारकुनी पेशाचे लोक म्हणून ज्यांचा धिक्कारपूर्वक निर्देश केला आहे, त्यांपैकींच एक रा. सा. विश्वनाथ नारायण मंडलिक यांनीं पुढाकार घेऊन ता. १४-१२-१८६७ रोजीं लोकांची सभा भरविली व या मुंबईच्या पहिल्या राजकीय संस्थेचा जीर्णोद्धार केला. यावेळीं जे जवळ जवळ शंभर सभासद झाले त्यांच्यामध्यें दादोबा पांडुरंग एक होते.[१] डॉ. भाऊ दाजी, श्री. जगन्नाथ शंकरशेटच्या निधनानंतर असोसिएशनचे अध्यक्ष झाले व या जागीं शेवटपर्यंत होते असें सांगतात.

पुढें या संस्थेच्याच सभासदांपैकीं कांहीं नवे सभासद फिरोजशहा मेथा, काशिनाथ त्र्यं. तेलंग, बद्रुद्दीन तय्यबजी यांनीं बॉंबे प्रेसिडेन्सी असोसिएशन ही नवी संस्था १८८५ च्या आरंभीं जन्मास घातली. मुंबईमध्यें राष्ट्रीय सभा जी प्रथंम १८८५ सालीं डिसेंबरांत स्थापन झाली तिची व्यवस्था याच मंडळीकडे होती. पुढील इतिहास प्रसिद्धच आहे.

आपल्याकडील स्वातंत्र्याच्या किंवा राजकीय जागृतीचा उगम व विकास कसा होत गेला त्याचा इतिहास हा असा आहे.

★

---

१ रावसाहेब मंडलिक यांचें चरित्र, ग. रा. हवल्दार, भाग १ ला, १९२७, पृ. २४१,

१६

## दादोबा व राजकारण

### (२)

### भाई भास्कर पांडुरंग तर्खडकर

इंग्रजी अमदानींतील आंग्लशिक्षितांची पहिली किंवा दुसरी पिढी नव्या विदेशी राजकर्त्यांवर एकदम भाळून स्वातंत्र्येच्छेला पूर्ण आंचवली होती, अशी जी अलीकडील पुष्कळ लोकांची कल्पना दिसते ती कशी भ्रांतिमूलक आहे हें मागच्या प्रकरणावरून कळून येईल. त्यांनीं पेशवाईंतील किंवा मोंगलाईंतील अंदाधुंदी राजकारभाराच्या गोष्टी प्रत्यक्ष अनुभविल्या नसल्या तरी त्या पाहिलेल्या लोकांकडून ऐकिल्या होत्या. त्यांच्या तुलनेनें इंग्रजांचा राज्यकारभार सुव्यवस्थित व शांततेचा होता, यांत शंका नाहीं. शिक्षणप्रसार व इतर सुधारणा याही जिकडे तिकडे उघड दिसत होत्या. देशी व विदेशी लोकांच्या भांडणांत जरी न्याय व निःपक्षपातीपणा नव्या राजकर्त्यांना न राखतां आला तरी देशी लोकांच्या आपआपसांतील व्यवहारांत तो त्यांना मुबलक मिळत होता. त्यामुळें सर्वसाधारण लोकांना इंग्रजांचा अंमल सुखाचा वाटावा, हें स्वाभाविक होतें. आज आपण पेशवाईंतील किंवा मोंगलाईंतील परिस्थितीशीं त्या काळच्या लोकांप्रमाणें आपली तुलना करीत नाहीं तर जगांतील इतर सुधारलेल्या देशांशीं आपली तुलना करतों व त्यांच्या मानानें आपली निकृष्ट स्थिति पाहून आपला चित्तक्षोभ होतो. परंतु त्या काळींही आजच्या पेक्षांही इंग्रज राजकर्त्यांविरुद्ध प्रक्षुब्ध असे तरुण होते. जुन्या राजकीय अमदानींत चोरांनीं लुटलें तरी वाटींतलें ताटांत सांडल्याप्रमाणें तें धन देशांतल्या देशांत राहत होतें. त्यामुळें एकादा माणूस निर्धन झाला तरी देश दरिद्री होत नव्हता. परंतु नव्या राजकर्त्यांनी कराच्या किंवा व्यापाराच्या रूपानें जी संभावित लूट चालली आहे तिच्यामुळें देश दिवसेंदिवस कंगाल होत चालला आहे हीही गोष्ट ज्यांच्या नजरेंतून निसटली नव्हती, अशीं माणसें त्या काळांत होतीं. त्यामध्यें दादोबांचा धाकटा भाऊ भास्करराव प्रमुख होते. त्यांनीं बाँबे गॅझेटमध्यें " A Hindoo " या सहीनें लिहिलेल्या पत्रांचा सकौतुक उल्लेख दादोबांनीं आत्मचरित्रांत केलाच आहे. इतक्या निस्पृहपणानें इंग्रज राजकर्त्यांविरुद्ध

त्यांच्या पूर्वी कोणीं लिहिलेलें मीं तरी वाचलेलें नाहीं. स्वतः संपादकही भास्कर पांडुरंगाच्या या लिखाणावर बेहद्द खुश होते, असें दिसतें. त्यांच्या दुसऱ्या [1] पत्राखालीं छापलेल्या तळटीपेंत संपादक Mr. J. W. Crosscadden लिहितात, "We have read the lucubrations of "A Hindoo" with pleasure and delight and are happy to find that he possesses such clear notions of the real undisguised policy which perpetuates the tyrannical sway of Great Britain. We wish we had many more enlightened Hindoos who would take up their pens in defence of their rights. We hope the Hindoo will continue his remarks."—

हीं सगळीं पत्रें जशीची तशीं या ठिकाणीं छापणें विस्तारभयास्तव शक्य नाहीं; परंतु सुरवातीच्या कांहीं पत्रांतील उतारे खालीं उद्धृत करतों म्हणजे या तरुणाच्या सडेतोड विचारसरणीची वाचकांना कल्पना होईल.

(I)

To The Editor, Bombay Gazette, Bombay.

With regard to the Hindoos, history as well as our own experience has taught us that they are the most mild and peaceable race of mankind, it is therefore quite inhuman in their rulers unnecessarily to lay the hand of tyranny upon them under pretext that by such means alone they could be able to retain possession of Hindoostan to permanency. It is quite an hypocritical conclusion to come to that a people who, however, hundred thousand times superior in number to their rulers could be oppressed and squeezed down very easily, the latter cannot be governed by love and leniencies, but by rigour and awe.

You keep yourselves quite aloof from your native brethren and conduct yourselves with such haughtiness and pride as if you were quite a distinct and superior order of beings. Excepting this the whole of the external form of your Policy is very good if you had conformed yourselves strictly to it which is much to be doubted.

---

1 Bombay Gazette, 10th July, 1841, p. 138.

Your partiality to your countrymen is extreme, and it is not very seldom that we witness your sacrificing your conscience and trampling under foot your law, and leaving aside every other consideration to preserve the life of your countryman or lighten his punishment, however extremely heinous his crime may be and however deserved he may be to every harsh punishment. I can cite a thousand instances of this kind......

If I were to give you credit for your having exempted us from Pindharrees and Ramosees, your trading system stands in the way which has indeed more effectually emptied our purses in a few years than the predatory excursions of these tribes could do in some five or six hundred years. In short it must be acknowledged that your progress in cunning and craftiness has kept pace with your advancement in knowledge and wisdom. Alas! the world is deceitful and truly you have verified this saying to a certainty. You may perhaps say that peace and tranquillity being the boon you have conferred on India which in fact, is far from being the case, all people are now most anxious and solicitous about the daily bread and dread very much the effects of the approaching poverty which now makes rapid strides towards them. How could peace and tranquillity reign when such anxiety of mind and fear exist in every breast. However, I admit that you have done some acts of kindness to India, such as the abolition of Sutty and infanticide and your perseverance in detecting things ( thugs ? ) etc. but all these acts of common humanity vanish away in the mighty vortex of your political cruelty. Your ambition and selflove have made a havoc among our countrymen which they have never witnessed before.

—**Bombay Gazette** ( 30-7-1841 ), p. 103.

...Among the modern Asiatic Conquerors, the Tartars and Moguls make a conspicuous figure, and we hear with no little wonder of the successes of Zengiz Khan, Teymoor, and Nadir Shah, but as the policy of all the Mahomedans is invar-

iably the same, I shall confine my dissertations to India only. They never invented any new system of Government for their subjugated countries, but simply followed their own favorite maxim.–From this I would not be understood to mean that I entertain the most favourable opinion of the whole tenor of their management of the kingdoms they were providentially put in possession of, I am perfectly sensible that the extinction of their power is purely owing to their policy being imperfect and full of absurdities. Their system of conforming to their subordinate officers, the possession of all the territory they could hold in subjection was alike destructive to their unanimity of feelings and zeal for the common good. Hence every successful leader wished to be free from the thraldom of his sovereign and was ambitious to be called an independent ruler. Their imprudent love of freedom was the very cause of the destruction of their power and latterly the British have done no other thing than to destroy the formidable Maratha Confederacy but by turning their vain ambition to their own advantage they secured their own supremacy and paramount authority. Scindia, Holkar etc. were highly flattered by being declared independent Princes, and could not forbear exulting at the idea. Poor Simpletons. They did not know that by calling themselves independent they were losing their very freedom and that independence and freedom do not exist in mere words. Thus disunited, the crafty English could easily defeat the helpless Peshwa and establish themselves in his stead,

But to revert to the points—As regards the treatment of the Natives, by their Mahomedan Kings I cannot help admiring them for their entertaining, not the least prejudice against conferring on their Native subjects the most important and respectable situations civil as well as Military. They despised the Hindoos only on account of their religion, which if any of them once relinquished and embraced their own, he was not denied even to being made a King. Was not the founder of the Nizam Shahee King of Ahmednaggar a Brahmin ?

I could fill up a catalogue of the converted Hindoos being raised to the dignity of Kings; many of the Kings of Bengal were Hindoos. The simplicity of Mahomedans cannot be too highly extolled, it enhances them the more in my estimation as it has cost them nothing. Oh! what a mighty contrast there is between these Barbarians and the refined Europeans to the great disadvantage of the latter. Can you point out a single instance of a Native who has embraced Christianity, is nominated to a high Civil appointment and is treated on equal terms with his white-skinned Brethren? How could the poor Native propitiate your good graces? They have evinced their loyalty to you in the highest degree, to this can be added their meekness of character and extreme patience, all these qualities would have ensured them a much better treatment from any other people but you. What heart could not have moved with pity for their fate, but yours? India had been in the possession of the Portuguese, but it had never been so degraded, nor so impoverished. But the greatest of all the evils that you have heaped on India is your anxiety to preserve your name in all the good graces that man can aspire to among the succeeding generation. Historians and authors of every description lavish on you all the praises that could be bestowed on a just and wise King. They say that the security of property is the greatest blessing they have bestowed upon us and that they have made us a free nation; they enumerate a thousand other petty things: such as the construction of roads throughout India and the suppression of Pindharees, not forgetting at the same time to swell up their nomenclature by bringing into account the Molesworth's Dictionary. You plunder us on all sides and pompously say that you have secured us from the depredations of Pindharees and Ramosees etc. etc. What a duplicity is this? How could deceit and sincerity go hand in hand? But no, you would have us believe that they do, and that you, as if their directors have made them reconcile with each other to answer

your purposes,—certainly such deep designs cannot be penetrated, but by those who are well acquainted with your double dealings.

I admit you do not exercise open tyranny such as the Mahomedans and other Barbarians did but why should you do so, when all kinds of aggressions could be committed under the garb of law and justice. Whenever you have to establish a new act of oppression your first precaution is to insert it in your Indian code of laws and give it the colour of justice and equity. If construction of roads etc. are blessings on India, which if properly viewed are nothing but mere conveniences you have made for your own sake, I could with equal justice say that should all the Natives conspire against you and unceremoniously drive you from India, they will pour down shower of obligations upon your head and you should be grateful to them for such mighty acts of kindness.

Among all the celebrated writers in India, I do not find a single worthy who as an impartial and faithful narrator of facts has laid down the true state of things and enumerated both the advantages and disadvantages with equal truth and precision. No, they will convey a very trifling act of kindness on your part with all the pomposity of words combined with the greatest show of erudition, but they will turn a blind eye towards the misery of the myriads of their Indian fellow creatures, and the greatest calamity of being rendered every day poorer and poorer. To say that the country taken possession of by a horde of foreign usurpers whose sole aim is to enrich themselves at the expense of its real masters, is prospering under them, is as absurd as to conclude that a town left at the tender mercies of a gang of robbers is enjoying all the advantages of peace and security in spite of their depredations and oppressions. But all these your antilogical conclusions, I dare say will have no weight with posterity, they will naturally anticipate that a faithful unassuring representation of facts

from a Native is entitled to belief in a far higher degree than all the preposterous descriptions you will give them of your memorable reign, however conveyed in a bombastic or more suitable language. I shall now close this letter with every good wish for your long life and prosperity remaining as ever.

—**Bombay Gazette, 10–8–1847.** pp. 138, 139.

(III)

... I shall now just ask you what could have induced your Government to harbour so much jealousy and hatred of so wise and eminent a Prince as Purtab singh, as to sacrifice your good name and every consideration of national honor and good faith only to depose him. A person unacquainted with your administration of India might naturally conclude that there must be some mystery in the case of the Raja, but Mr. Editor, as we are well versed in the whole train ( trend ? ) of your Indian policy, it is no wonder, if we are not at all surprised at it. We know full well that you would not have a wise and able man for a Prince. A weak and imbecile ruler better–suits your purpose, you could exercise your control upon the latter in the same degree as a landlord in England does over his vassals, and hem him in on all sides so as to make him a mere pageant in your hands while your political ingenuity cannot meet with equal success with the former. Among all the Native Princes in India the Ex-Raja of Sattara was the only one that could be said to have some knowledge of politics and a better known Indian Prince we have never heard of but the same thing which would have recommended him to the esteem of good people, has been the cause of his downfall.......

—**Bombay Gazette,** 13–8–1847, p. 150.

(IV)

... We cannot look upon your Government in any other light than that of the most bitter curse India has ever been visited with. The whole wealth of India has now been trans-

ported to Great Britain and we have no employment left to us. You will perhaps say that it is our duty that we should do everything in our power to ameliorate the condition of our fellow countrymen which is fair enough and we admit the truth of it, but every project that we form to ourselves for such an undertaking would require a capital far beyond our reach to realise. —You have taken away our money and how could we be able to shift for ourselves. You have made us wholly dependent which is all impossible.

However we would have borne all the enormous calamities you have heaped upon our heads with courage and fortitude becoming our present situation had you but undertaken the education of the Natives on your hands, made them wiser and wiser every day, so that they might be freed from their religious prejudices and superstitious fears. Should you only draw your money from them and not do the least thing for their good? If the whole immense revenue of India be considered, the present little donation which your Government have subscribed for educating the Native youth is ridiculously trifling and that too from no other motive but to keep up appearances; if you wished, you could have spread the blessings of education throughout the whole of India by this time and raised her unhappy children in the scale of Knowledge and civilization. Can it be supposed that you could impoverish so extensive an empire in less than a quarter of a century and not made a single individual of the myriads of her people wiser and more enlightened during that time? Oh unhappy fate! India has been got hold of by a race of demons who would never be satisfied until they have dispoiled her of all her precious things and reduced her sons and daughters to total beggary. I have heard the most pious of you say that a bare clothing and coarse fare is all that we require for our maintenance in the world? If such be your notions of our wants, excuse Mr. Editor, if my modesty gives way to resentment,—could I not say with an equal degree of

truth and sincerity that a piece of leather upon your shoulders and a carcass of hog or bullock for your food would be quite sufficient to answer all your necessary calls. The days are past when the Natives were rolling in all the splendour of Eastern grandeur which to this day has been proverbial among you, and the days too are passed when you could boast of nothing but a skin for your clothing and a few animals for your food. However you must not add insult to our misfortune– this cannot be borne–no more of this now.

As a most glaring instance of your disregard for the well being and happiness of the Natives, I can bring forward the circumstances of so great an Empire as Hindoostan being given in monopoly to a body of voracious Merchants. In history, ancient as well as modern, we could not point out a single fact having taken place which could approximate to this circumstance. You have also reserved to yourselves the monopoly of all the civil and military appointments and trampled under foot our just rights and privileges. In America are all your black-coat and red–coat Gentlemen imported from Great Britain to fill up the situations of both the civil and military departments of your colonial Government ? I sincerely confess that notwithstanding the very limited scale on which education to the Natives is conducted, there are some Natives who could vie in point of intellect and general knowledge with the ablest of your politicians and who are decidedly superior to the generality of your present civil and military functionaries. But you would feign ignorance of this well-known fact, and maliciously say, that Natives are too illiterate to be entrusted with high situations. It is much better not to say anything than to utter such nonsensical theories.

You not only withhold from us high appointments, but you would not permit us to have a voice in your administration of our country,–which latter circumstance weighs heavily upon us. Your Law Commission, composed of a few individuals who

know little or nothing of India, have absolute power to construct regulations and laws for our Government! Is it in unison with the dictates of sound principle and common humanity that we, the proper persons who should be consulted on such occasions, we, who know a thousand times much better how to promote our own interests than others, should be excluded from concerting measures for our own good, while a body of foreigners who care for the welfare of the Natives no more than they do for a broken reed, much less than having any regard for our comfort and happiness, be invested with full authority to rule the destinies of a population so vast and extensive as that of India?

Very sincerely yours,

**A Hindoo**

–**Bombay Gazette, 20–8–1841**, pp. 174, 175.

हे वरील उद्गार ब्राह्मणांपैकीं एकायानें काढले असते तर त्याबद्दल विशेष आश्चर्य वाटण्यासारखें नव्हतें. पेशवाई बुडाल्यामुळें भटांभिक्षुकांचा आधार गेला म्हणून हे लोक इंग्रजांच्या नांवानें खडे फोडतात असें लोकहितवादीनीं अनेक ठिकाणीं म्हटलें आहे. मार्च १८२४ मध्यें लिहिलेल्या आपल्या शिक्षणावरील मिनिटांत एल्फिन्स्टन, म्हणतो, "One of the principal objects of the Peshwa's Government was the maintenance of the Brahmins. It is known to the Honourable Court that he annually distributed five lacs of rupees among that order under the name of the *Dakshina;* but it must be observed that the *Dakshina* formed but a small portion of his largesses to Brahmins and the number of persons devoted to Hindu learning and religion, who were supported by him, exceeded what would readily be supposed. With all the favour that we have shown this class of his dependants, great numbers of them are reduced to distress and are subsisting on the sale of shawls and other articles, which they received in better times, while others have already reached the

extremity of want which follows the consumption of all their former accumulation." [१]

१९२० सालीं लेफ्टनंट टी. बी. जर्विस यानें दक्षिण कोंकणांतील शैक्षणिक पाहाणी करून सरकारला जें निवेदन सादर केलें आहे त्यांत देखील पेशवाई बुडाल्यामुळें तेथील ब्राह्मणांना हलाखीची स्थिति प्राप्त झाली असून ते विद्याविन्मुख होऊन कृषि करीत आहेत व इंग्रज सरकारच्या रेव्हेन्यू व ज्युडिशियल खात्यामध्यें खालच्या नोकऱ्या धरीत आहेत असें म्हटलें आहे. [२]

हें सगळेंच दान कांहीं अपात्रीं होत होतें, असें म्हणतां येत नाहीं. पुष्कळ नालायक लोकही त्याचा फायदा घेत. त्याचा यापेक्षां चांगल्या प्रकारें उपयोग करतां आला असता ही लोकहितवादींची तक्रार अन्यथा नाहीं. पण आपली दक्षणा बुडाली म्हणून इंग्रजांविरुद्ध तक्रार करणाऱ्यांपैकीं भास्कर पांडुरंग नव्हते. त्यांची इतिहास, राजकारण व अर्थशास्त्र यांच्यावर आधारलेली नव्या इंग्रज राजकर्त्यांविरुद्ध तक्रार होती. दादोबांना आपल्या बंधूंची ही विचारपद्धति पटत होती असें दिसतें. "आमच्या बंधूचीं देशकल्याणाचीं व लोकहितवादाचीं पत्रें आतां कोठेंच दिसत नाहींत त्याचा आह्मांस मोठाच खेद वाटतो," असें त्यांनीं म्हटलें आहे. इंग्रज राजकर्त्यांसंबंधीं आंग्लशिक्षित पहिल्या हिंदी सुशिक्षित लोकांमध्यें जो आदर होता त्याचें कारण त्या वेळच्या कांहीं इंग्रजांचा वैयक्तिक स्वभावांतील गोडवा होय. पण पुढें अशीं माणसें येईनाशीं झालीं. दादोबा शिशुबोधांत लिहितात, "मुलांनों, आतां इंग्रज सरकारांत चाकरी करणें दिवसानुदिवस फारच कठिण होत चाललें आहे...... अलिकडेस तीस वर्षांपासून उदार व उमद्या मनाचे वरिष्ठ अंमलदार जाऊन त्यांच्या जागीं बहुतकरून हलक्या स्वभावाचे व क्षुल्लक बुद्धीचे असे अंमलदार येत चालले आहेत." [३] त्यावरून दादोबांचा इंग्रजांवरचा विश्वास कसा उडून गेला होता, तें दिसून येईल. स्वतः दादोबांना मुदतीच्या आधीं सेवानिवृत्त व्हायला हेंही एक कारण होतें याचा उल्लेख मागें आलाच आहे.

---

1 Selections from the minutes and other Official Writings of M. Elphinstone, G. W. Forrest, 1884, pp. 106-7.

२ A Source Book of History of Education in the Bombay Presidency, Part I, R. V. Parulekar, 1945, p. 7.

३ शिशुबोध, पृ. २६.

पहिल्या आंग्लशिक्षितांच्या बुद्धीची इंग्रजांच्या स्वामित्वापलीकडे जर धांव नसती तर या गुलामांची श्वानांच्या कोटींत गणना करावी लागली असती. स्वातंत्र्याला नालायक असे बुद्धिहीन लोक जगण्यालाही नालायक असतात. हिंदी लोक जर अशांपैकीं असते तर अमेरिका किंवा ऑस्ट्रेलिया येथील आद्य रहिवाशांची युरोपियनांनीं जी विल्हेवाट लाविली तीच स्थिति हिंदी लोकांचीही त्यांनी केली असती. सुप्रसिद्ध पोर्तुगीज इतिहासकार सि. कुञ्ज रिव्हार यानें १८५६ सालीं गोवा गव्हर्नरचे सेक्रेटरी असतां केलेल्या एका भाषणांत याची स्पष्ट कबुली दिली आहे. असें कां करतां आलें नाहीं, यासंबंधी तो म्हणतो,

"हिंदुस्थान ही कांहीं अमेरिका नव्हती. तेथें युरोपियन विजेत्यांना तद्देशीय अज्ञ व पूर्णपणें रानटी असलेल्या लोकांचा थोडक्या अवधींत नायनाट करतां आला व युरोपांतील आपले लोक तेथें नेऊन तो देश त्यांनीं भरून काढला; परंतु युरोप व हिंदुस्थान यांमधील मोठें अंतर व जेथील कांहीं मुख्य वर्ग संस्कृतीच्या अत्यंत उच्च कोटीला पोंचले होते त्या देशांतील बहुसंख्य लोकांच्या विरोधाच्या भीतीमुळें विजेत्यांना हें अत्याचाराचें ठराविक अस्त्र या देशांत चालवितां आलें नाहीं व ह्याच हेतु साध्य करण्याकरितां अप्रत्यक्ष पण सौम्य नव्हे अशा साधनांचा अवलंब करावा लागला."[1]

हिंदुस्थानची दुर्गति ही त्याच्या डोळ्यांवर आलेली तात्पुरती झांपड आहे. इंग्रजी विद्येमुळें या लोकांचा विचारांना धक्के मिळून त्यांचें डोळे उघडतील व परकीय सत्तेचें जूं ते कदापि सहन करणार नाहींत, याबद्दल भाकीत पुष्कळांनीं आधींच केलें होतें याचा निर्देश मागें आलाच आहे.

---

1 "A India porem não era America. Se nesta puderam os conquistadores europeus exterminar em breve as raças indigenas, simplices, ou totalmente selvagens, e repovoar a terra com moradores importados da Europa; a longa distancia, a que a conquista indiana se achava da Metropole, e sobre tudo a resistencia invencivel, que naturalmente offerecia um povo numeroso, entre o qual as classes principaes haviam chegado a elevado grau de civilisação, fez evitar aos conquistadores a violencia patente, e preferir os meios indirectos, posto que não suaves, para alcançar o mesmo fim."

—**Ensaio Historico da Lingua Concani, 1857, p. XLIX.**

हिंदुस्थानांतील हें राजकीय स्थित्यंतर ज्यानें १८०१ सालापासून पुणें, सातारा, नागपूर वगैरे ठिकाणीं रेसिडेंट म्हणून राहून प्रत्यक्ष अवलोकन केलें होतें तो कर्नल जॉन ब्रिग्स १८३२ सालीं लिहितो,

"My whole life has been devoted to the study of the history, the manners, the customs, and the institutions of the country. It is from these sources I have borrowed materials to show that our measures have been founded on false assumptions ; that the hundred and fifty millions of freemen in India were once ruled by judicious laws which we have overlooked ; that their institutions are founded on wisdom, and have withstood the shock of eight centuries of conquest in a manner that no other institutions with which I am acquainted ever have or could have done; that these people peculiarly claim our protection in their ancient rights and privileges; and that until they are restored to them they must gradually sink lower and lower in the scale of humanity; but I believe that they will never sink into a condition so abject as to render our dominion over them secure from subversions.

"On the contrary, every thought which I have ever given to the subject convinces me that our own safety will be rendered more permanent by the adoption of a system that may raise the Natives to that scale in the State to which they have a right to aspire, and for which they are fitted ; and that by affording them advantages equal, if not superior, to those they would enjoy under the Native Governments, we shall supply them with motives of attachment and fidelity. The connection is, however, an unnatural one, and will probably, in the end, be dissolved. Let us prepare ourselves and them for that separation, by rendering them fit to govern and to defend themselves, and leave them disposed to continue a friendly connection with us. To act otherwise,—to retain them in forcible subjection, to withhold from them those natural rights to which they are entitled,—will be to hasten that disunion which may be protract-

मुंबईतील राजकीय
चळवळीचे
पहिले पुरस्कर्ते



डॉ. भाऊ दाजी
पृष्ठ ३७७



दादाभाई नौरोजी
पृष्ठ ३९७

दादोबांच्या कन्या



सौ० अहल्याबाई
व
तिचे पति
रामराव कमलाकर
पृष्ठ ३४२



श्री. वेणूताई
पृष्ठ ३४१



१८६० सालच्या सुमाराची चौपाटी

ed, and to lay the seeds of that revolution which may end fatally to our dominion in India."[1]

दादोबांनीं सत्तावन सालामध्यें नगर जिल्ह्यामध्यें लोकांच्या निःशस्त्रीकरणाचें जें कार्य केलें तें कोणत्या परिस्थितींत केलें याची हकीकत मागें आलेलीच आहे. शांततारक्षणाकरितां सध्यांच्या राष्ट्रीय सरकारला देखील अशासारखे उपाय अवलंबावे लागत आहेत. यावरून आजचें मंत्रिमंडळ देशाच्या स्वातंत्र्याला विन्मुख आहे असें कोण म्हणेल? तसेंच हे जे भिल्ल उठले होते ते देशाला स्वातंत्र्य मिळवून देण्याकरितां बद्धपरिकर झाले होते, असेंही दिसत नाहीं. शिवाय स्वामिकार्य म्हणून आमरण ब्रह्मचारी अशा भीष्माचार्यांला जेथें,

अर्थाचा दास पुरुष, अर्थ नव्हे पुरुषदास, बापा! हें।
सत्य, मज कौरवानीं केलें अर्थचि बद्ध बा! पाहें॥

असे उद्गार काढावे लागले, तेथें दादोबांसारख्या कुटुंबवत्सल व गरीब माणसाला मनाविरुद्ध वागणें प्राप्त झालें असें मानलें तरीही त्यांत नवल वाटण्याचें कारण नाहीं.

इंग्रजी विद्या प्राप्त करून घेऊन आपली नव्या पद्धतीनें राज्यकारभार चालविण्याची पात्रता सिद्ध करणें व अशा रीतीनें आपलें गेलेलें स्वातंत्र्य मिळविणें हा डॉ. भाऊ दाजी, दादाभाई नवरोजी वगैरे तत्कालिन पुढाऱ्यांचा उद्देश होता. अवेळींच धसमुसळेपणा किंवा जळफळाट करून कार्यभाग तर साधणार नाहींच, उलट तो बिघडण्याचाच जास्त संभव आहे, हें त्यांना माहीत होतें. योगायोग हा कीं हा मजकूर लिहिला जात आहे त्याच दिवशीं इंग्रजांच्या हिंदुस्थानांतून प्रयाणाची घोषणा होत आहे.

याची पूर्वतयारी लॉर्ड लिटन या व्हायसरॉयची (१८७६–८०) अरेरावी कारकीर्द व त्या नंतरचे (१८८०–८४) लॉर्ड रिपन या हिंदी आकांक्षांविषयीं सहानभूति बाळगिणाऱ्या व्हायसरॉयच्या आगमनानें केली. जुलमी लिटनशाहीमुळें लोकांमध्यें एकराष्ट्रीयत्वाची भावना प्रसृत झाली व रिपनचा उदार कारभार व विशेषतः जीत व जेते हा भेद नष्ट करणारें यांच्या कारकीर्दींत पुढें आलेलें इल्बर्ट बील यानें हिंदी लोकांमध्यें स्वाभिमान, आत्मप्रत्यय व नवें चैतन्य निर्माण केलें. १८८२ सालीं चालू असलेल्या क्रिमिनल लॉप्रमाणें कोणत्याही मोठ्या अधिकारावरील हिंदी मॅजिस्ट्रेटला युरोपियन ब्रिटिश प्रजाजनावर एकादा आरोप आला

1 Memoir of General John Briggs, p. 118.

असतां त्याची चवकशी करतां येत नसे. परंतु त्याच्या हाताखालच्या युरोपियन अधिकाऱ्याला ती करण्यास हरकत नव्हती. हा पंक्तिप्रपंच नष्ट करण्याचा या बिलाचा हेतु होता. त्यामुळें युरोपियन लोकांमध्यें भयंकर क्षोभ उडाला. कांहीं उदारहृदयी इंग्रज या बिलाचा पाठपुरावा करणारे होते. एल्फिन्स्टन कॉलेजचे प्राध्यापक प्रो. वर्डस्वर्थ यांनीं बॉंबे गॅझेटमध्यें या बिलाला अनुकूल अशीं लिहिलेलीं कांहीं पत्रें स्वतंत्र पुस्तकरूपानें प्रसिद्ध आहेत.[1] हें बिल जशाचें तसें मूळ स्वरूपांत जरी पास न झालें तरी त्याच्या चळवळीच्या आंदोलनांत पुष्कळ गोष्टी निर्माण झाल्या. बॉंबे प्रेसिडेन्सी असोसिएशन किंवा राष्ट्रीय सभाही याच चळवळींमधून निघालेल्या संस्था होत, असें म्हणतात.

स्वातंत्र्यवृक्ष मोहरला जात असतां त्याचें बीजारोपण कसें झालें हें आपण पाहिलें; पण मुसलमानांच्या विरोधाची त्याला जो कीड लागली आहे व ज्यामुळें हा सगळा मोहर गळून पडण्याची भीति उत्पन्न झाली आहे तिचा उद्भव केव्हां झाला, हेंही पाहाण्यासारखें आहे. बॉंबे असोसिएशन, ईस्ट इंडिया असोसिएशन, बॉंबे प्रेसिडेन्सी असोसिएशन वगैरे या व इतर प्रांतांतील संस्थांनीं जरी हिंदी स्वातंत्र्याची भूमि तयार करून बीजही टाकलें तरीपण राष्ट्रीय परिषदेची स्थापना हाच या स्वातंत्र्याच्या अंकुराचा खरा उगम होय, असें म्हणावयास हरकत नाहीं.

पहिली हिंदी राष्ट्रीय सभा ता. २८, २९ व ३० डिसेंबर रोजीं भरली, व दुसऱ्याच दिवशीं हिंदुस्थानच्या हितशत्रूंनीं मुसलमानांना चिथावण्याचा उपक्रम सुरू केला. ता. ३१ डिसेंबर रोजींच लंडन 'टाइम्स'च्या मुंबईच्या बातमीदारानें जो विलायतेला वृत्तांत लिहून पाठविलेला आहे त्यांत तो म्हणतो,

"*... in spite of the absence of the followers of the Prophet* this was a great representative meeting last week." हें बातमीपत्र Political Progress in India[2] या मथळ्याखालीं 'टाइम्स'च्या ५ फेब्रु. १८८६ च्या साप्ताहिक आवृत्तीमध्यें प्रसिद्ध झालें आहे. या बातमीपत्राला उद्देशून टाइम्सनें जो संपादकीय लेख लिहिला आहे त्यांत तो म्हणतो,

---

1 **Prof. Wordsworth's Considerations in favour of the Jurisdiction Bill,** (B. B. Nagarkar), 1883.

2 **Proceedings of the First Indian National Congress,** (1885), Appendix B.

"The first question which this series of resolutions will suggest is whether India is ripe for the transformation which they involve. If this can be answered in the affirmative, the days of English rule are numbered. If India can govern itself, our stay in the country is no longer called for. All we have to do is to preside over the construction of the new system and then to leave it to work. The lawyers and schoolmasters and newspaper-editors will step into the vacant place and will conduct affairs with no help from us....But that they can govern wisely, or that they can enforce submission to their rule, wise or unwise, we are not equally sure. *That the entire Mahomedan population of India has steadily refused to have anything to do with them is a sufficiently ominous fact.* Even if the proposed changes were to stop short of the goal to which they obviously tend, they would certainly serve to weaken the vigour of the Executive and to make the good government of the country a more difficult business than it has ever been." शेवटीं हा संपादक लिहितो, "Political privileges they can obtain in the degree in which they prove themselves deserving of them. But it was by force that India was won and it is by force that India must be governed, in whatever hand the government of the country may be vested. If we were to withdraw, it would be in favour not of the most fluent tongue or of the most ready pen, but the strongest arm and the sharpest sword. It would, perhaps, be well for the members of the late congress to consider their position from this practical point of view."[१]

या खोडसाळ व खोट्या प्रचारला उत्तरादाखल जें पत्र न्या० मू० का. त्र्यं. तेलंग यांनीं टाइम्सच्या ९ मार्च १८८६ च्या अंकांत प्रसिद्ध केलें आहे त्यांत रहिमतुल्ला महमद सयानी व अबदुल्ला मेहरअल्ली धरमसी हे युनिव्हर्सिटीचे मुसलमान पदवीधर व हायकोर्टचे वकील राष्ट्रीय सभेला हजर होते आणि मि. बद्रुद्दीन तय्यबजी हे

1 **Proceedings of the First Indian National Congress,** Appendix C.

ज्या संस्थेतर्फे ही राष्ट्रीय सभा भरविण्यांत येत आहे तिच्या व्यवस्थापक मंडळाचे अध्यक्ष व कमरुद्दीन तय्यबजी हे उपाध्यक्ष आहेत हें दाखवून दिलें. राष्ट्रीय सभा किंवा हिंदुमुसलमानामधील दुहीचें हें बीजारोपण दादोबांच्या निधनोत्तर घटना आहेत; तरीपण विषयाच्या पूर्ततेकरितां त्यांचा येथें निर्देश केलेला आहे.

गेल्या सवाशें दीडशें वर्षांच्या कालावधींत हिंदी लोकांनीं इंग्रजी विद्या व नव्या प्रकारचें त्यांचें राज्यकारभाराचें तंत्र पूर्णपणें आत्मसात् करून घेतलें आहे. इंग्रजांपेक्षांही ते हिंदुस्थानचा राज्यशकट चांगल्या प्रकारें हांकूं शकतील, अशा प्रकारच्या अपेक्षा निर्माण झाल्या आहेत. परंतु इंग्रजांचें राष्ट्रीय शील (national character) अद्याप आपल्या बऱ्याच लोकांना आपलेसें करतां आलेलें नाहीं, हेंही तितक्याच प्रांजलपणानें कबूल केलें पाहिजे. ज्या ज्या वेळीं राष्ट्रहिताचा प्रश्न येईल त्या त्या वेळीं वैयक्तिक बडेजाव व स्वार्थ यांना दूर सारून देशाकरितां एक होणें, हेंच तें राष्ट्रीय शील होय. ही राष्ट्रीय नीति किंवा शिस्त जोंपर्यंत आपल्या अंगांत बाणली नाहीं तोंपर्यंत आपलें इतर सारें ज्ञान व्यर्थ आहे.

★

१७

# आणखी कांहीं संस्थांशीं संबंध

## (१) मुंबई विश्वविद्यालय, १८५७

मुंबई विश्वविद्यालयाची स्थापना १८५७ सालीं झाली. यावेळीं दादोबा अहमदनगरमध्यें हुजूर डेप्युटी कलेक्टर होते. पुढच्याच वर्षी त्यांची बदली ठाण्याला झाली. १८५९ सालीं मॅट्रिकच्या परिक्षेला ते मराठी भाषेचे परीक्षक असलेले दिसतात. मध्यें कांहीं काळ खंड पडला. १८६९ सालीं फर्स्ट इयर इन् आर्टस्ला मराठीचे परीक्षक म्हणून दादोबा व रा. ब. रानडे यांचीं नांवें आढळतात. याच सालीं हिंदुस्थानी भाषेचे मॅट्रिकच्या परीक्षेला ते परीक्षक होते. त्यांचे जोडीदार म्हणून रहिमतुल्ला महमद सयानी, एम्. ए., एलएल्. बी. यांचें नांव झळकतें. असेच १८७९ पर्यंत मराठी व हिंदुस्थानी या भाषांचे ते परीक्षक होते. 'टाइम्स ऑफ् इंडिया' पत्रामध्यें त्यांचा जो मृत्युलेख प्रसिद्ध झाला आहे [1] त्यांत दादोबा हे संस्कृत भाषेचें जाडे पंडित होते व सध्यांच्या युनिव्हर्सिटीच्या सुरवातीला संस्कृत भाषेचे परीक्षक असत असें जें म्हटलें आहे, त्याला मुंबई युनिव्हर्सिटीच्या दप्तरांत आधार नाहीं.

दादोबा मुंबई युनिव्हर्सिटीच्या सिनेटचे सभासद १८६४–५ मध्यें झाले, व आर्टस् व कायदा या फॅकल्टींचे ते अखेरपर्यंत (१८८२) सभासद होते. युनिव्हर्सिटीमध्यें त्यांनीं केलेल्या कामगिरीची माहिती उपलब्ध नाहीं. युनिव्हर्सिटीच्या दप्तरांत २० डिसेंबर १८७० पासूनच्या सिनेटच्या बैठकांची मिनिटें सापडतात, परंतु तीं अगदींच त्रोटक आहेत. एखाद्या ठरावाला त्यांनीं दुजोरा दिला या पलीकडे त्यांत जास्त माहिती सापडत नाहीं. "In late years he was much grieved to find the Marathi language depreciated in certain quarters and he often complained bitterly to the University of the deficiencies in the knowledge of that language displayed by the students," असें टाइम्सकार त्यांच्या मृत्युलेखांत लिहितात. युनिव्हर्सिटीच्या दप्तरांत जी 'व्हर्न्याक्युलर फाईल' आहे तिच्यामध्यें यासंबंधी कांहीं सापडत नाहीं. कदाचित् परीक्षकांच्या रिपोर्टांमध्यें त्यांनीं

1 The Times of India, 20th Oct. 1882.

यासंबंधी जास्त लिहिलें असेल, परंतु त्यावेळचे कागद उपलब्ध नाहींत. सिनेटच्या बैठकांना ते शक्य तों वर नियमितपणें हजर राहत असें मात्र दिसतें. युनिव्हर्सिटीच्या कॅलेंडरमध्यें रा० ब० दादोबा पांडुरंग असें सभासदांच्या यादींत नांव देऊन खालीं "surname not known," असी तळटीप कित्येक वर्षे आढळते!

## (२) सर जमशेटजी जिजीभाई झरथोष्टी मद्रेसा, १८६३

दादोबा पांडुरंग हे जरी कोणत्याही शाळेंत संस्कृत शिकले नव्हते तरीपण नर्भयरामशास्त्री वगैरे पंडितांबरोबर संस्कृत ग्रंथ वाचून आणि त्या भाषेचा खासगी रीतीनें अखंड अभ्यास करून त्यांनीं या भाषेंत बरेंच प्रावीण्य संपादिलें होतें. कौमुदी व शाकुंतल या संस्कृत ग्रंथांच्या कांहीं भागांचें त्यांनीं भाषांतर केलें होतें. शिवाय बाबा पदमनजीच्या 'यमुनापर्यटन' या पुस्तकाला त्यांनीं संस्कृत भाषेंत 'विधवाश्रुमार्जन' नांवाचा निबंध जोडला होता, त्याचाही उल्लेख मागें आलाच आहे. प्रथम व्याकरण आणि नंतर धर्म यांच्या जिज्ञासेनें त्यांचें या भाषेकडे लक्ष वेधलेलें दिसतें. पण पुढें 'सर जमशेटजी जिजीभाई मद्रेसा' या संस्थेमध्यें संस्कृत भाषेचे ते प्राध्यापक झाले.

सुप्रसिद्ध सर जमशेटजी जिजीभाई हे ता. १५ एप्रिल १८५९ रोजीं वारले त्या वेळीं त्याची विधवा पत्नी लेडी आवाबाई हिनें आपल्या पतीच्या स्मारकाकरितां म्हणून एक उदार देणगी पारशी पंचाईत या सुप्रसिद्ध संस्थेच्या स्वाधीन केली. या स्मारकाचें स्वरूप कोणतें असावें यासंबंधी पंचाइतीनें नेमलेल्या कमिटीनें शिफारस केली ती अशी:—सर जमशेटजी यांच्या नांवानें एक शिक्षणसंस्था स्थापन करावी व तिच्यामध्यें झेंड, पेहलवी, संस्कृत आणि पर्शियन या भाषा शिकविण्यांत याव्या. संस्थेचा मुख्याध्यापक संस्कृत व झेंड या भाषा जाणणारा व युरोपांतून आलेला असावा. संस्थेकरितां आठशें रुपये दरमहा खर्च करावे व त्यांपैकीं तीनशें रुपये या संस्कृतज्ञ प्रोफेसरला द्यावे. असा संस्कृतज्ञ विद्वान् न मिळाल्यास दरमहा ६५० रुपयांत मद्रेसाचा खर्च भागेल अशी व्यवस्था करावी. ही मद्रेसा ता. ४ मार्च १८६३ रोजीं उघडली. पहिले प्राचार्य दस्तुर डॉ. पेस्तनजी बेहरामजी संजाना हे होते. युरोपांतील संस्कृत पंडित न मिळाल्यामुळें संस्कृत शिकविण्याचें काम रा. रमाकांत कृष्ण भेंडे यांच्याकडे सोपविण्यांत आलें. त्यांनीं हें काम सवा वर्ष केलें. त्यांच्यामागून रा. नारायण बाळकृष्ण यांच्याकडे ही कामगिरी आली. त्यांच्यानंतर रा. घेलाभाई माणेकलाल यांची या जागीं योजना झाली. पुढें

ता. १ एप्रिल १८७१ पासून रा. ब. दादोबा पांडुरंग यांनीं हें काम पत्करलें आणि ह्या जागीं ते ऑगष्ट १८७४ च्या अखेरपर्यंत होते. हें काम अर्थात्‌च आठवड्यांतून कांहीं तास करावयाचें असे व त्याबद्दल त्यांना दरमहा पाऊणशें रुपये वेतन मिळत असे. दादोबांच्या मागें हा वर्ग बंद पडला. पुढें १९०६ सालीं या संस्थेच्या द्विवार्षिक बक्षिससमारंभाचे प्रसंगीं डॉ. रा. गो. भांडारकर यांनीं संस्कृत भाषा शिकविण्याची आवश्यकता आपल्या अध्यक्षीय भाषणांत प्रतिपादन केली. त्यामुळें लगेच ही भाषा ऐच्छिक विषयांत समाविष्ट करण्यांत आली. हा संस्कृत वर्ग शाळेचे एक जुने विद्यार्थी तेहेमुरास दिनशा आंक्लेसारिया हे पारसी गृहस्थ चालवीत होते. पुढें तो वर्ग बंद पडला.

## (३) उपयुक्त ज्ञानप्रसारक सभा, १८४८

The Students' Literary and Scientific Society ही संस्था ता. १३ जून १८४८ सालीं स्थापन झाली. हिच्याच ‘उपयुक्त ज्ञानप्रसारक सभा’ नांवाच्या मराठी व गुजराथी शाखा स्थापन झाल्या. मराठी शाखेची सुरुवात ता. १ सेप्टेंबर १८४८ रोजीं झाली व तिचे अध्यक्ष दादोबा होते व गुजराती शाखेचे अध्यक्ष दादाभाई नौरोजी होते. या शाखांच्या द्वारा मराठी व गुजराती या भाषांमध्यें ‘ज्ञानप्रसारक’ याच नांवाचीं मासिकें निघत. ही सभा पंधरा दिवसांच्या अंतरानें महिन्याला दोनदां भरत असे. एका गुरुवारीं कोणीतरी सभासद शास्त्रीय विषयावर व्याख्यान देई व दुसऱ्या गुरुवारीं दोघे सभासद निबंध वाचीत व त्यावर वादविवाद होई. “धर्मसंबंधी व सांप्रतच्या राज्यप्रकरणसंबंधी सर्वथा निबंध लिहिले जाणार नाहींत, व त्या विषयांवर नुसता संवाद देखील होणार नाहीं,” असा सभेचा नियम होता. पहिल्या वर्षाचें व्यवस्थापक मंडळ पुढीलप्रमाणें होतें:—

दादोबा पांडुरंगजी (अध्यक्ष).
महादेव गोविंदशास्त्री (उपाध्यक्ष आणि चिटणीस).
विनायक हरिश्चंद्र (खजीनदार).
नारायण दिनानाथजी.
लक्ष्मण नृसिंह जोशी
भिकाजी भास्कर.
नारायण विष्णु.
दाजी परशुराम.

एतद्देशीय लोकांची इंग्रजी अमदानींतील आरंभीची महत्त्वाची अशी ही पहिलीच संस्था असून दादाभाई, भांडारकर, रानडे, तेलंग, मंडलीक वगैरे पुढें प्रसिद्धीस आलेल्या पुढाऱ्यांना सार्वजनिक कार्याचे बाळकडू याच संस्थेमध्यें मिळालें. पहिल्याच सभेंत, अध्यक्ष दादोबा पांडुरंग यांनीं 'विद्येच्या लाभाविषयीं' व्याख्यान दिलें.[1] सेप्टेंबर १८४८ ते एप्रिल १८४९ या अवधींत सात व्याख्यानांच्या व सहा निबंधांच्या सभा झाल्या. पहिल्या दादोबांच्या व्याख्यानाखेरीज बाकीचीं सहा व्याख्यानें महादेव गोविंदशास्त्री (कोल्हटकर) यांनीं पदार्थविज्ञानशास्त्रावर दिलीं. सहा निबंधाच्या सभांमध्यें वाचलेले निबंध व त्यांचे कर्ते:—

१ सृष्टिसौंदर्याविषयीं......भास्कर दामोदर (पाळंदे).
२ रसायनशास्त्राविषयीं......वासुदेव बापु.
३ मराठ्यांच्या उत्कर्षापकर्षाविषयीं......लक्ष्मण नृसिंह जोशी.
४ हिंदु लोकांच्या त्रिकाल स्थितीविषयीं......सखाराम दीक्षित.
५ सृष्टीमध्यें परमेश्वराची शक्ति दृष्टिगोचर होते याविषयीं ...दाजी परशुराम.
६ उद्योगाविषयीं......विष्णु अमृतराव.
७ व्यवहारशास्त्राचे उद्देश आणि लाभ......विश्वनाथ नारायण.
८ हिंदुस्थानांतील स्त्रियांच्या स्थितीविषयीं......नारायण विष्णु.
९ एकीपासून लाभ......बाळ भास्कर.
१० हिंदुस्थानांतील विद्या व कला यांविषयीं......विनायक हरिचंद्र.
११ सत्याविषयीं......भिकाजी भास्कर.
१२ विद्येविषयीं......बाबाजी कृष्णनाथ.

या व्याख्यानांवरून सभेच्या कार्याचें स्वरूप समजून येईल. यांतील महत्त्वाचे निबंध 'ज्ञानप्रसारकांत' प्रसिद्ध होत. 'कांहीं महिन्यांनंतर दादोबा पांडुरंगजी यांची स्थलांतरीं योजना झाल्यामुळें नारायण दिनानाथजी यांस अध्यक्षस्थानीं सर्व सभासदांहीं योजिलें,' असें पहिल्या वर्षाच्या रिपोर्टांत नमूद आहे.

## (४) पुनर्विवाहोत्तेजक मंडळी

ही सभा मुंबई येथें ता. १४–१२–१८६५ रोजीं स्थापन झाली. तिच्या पहिल्या ७४ सभासदांमध्यें गोपाळराव हरि देशमुख, महादेव गोविंद रानडे,

१ मागें पृ. ३३४ पहा.

दादोबा पांडुरंग, विष्णु परशराम शास्त्री, मोरोबा कान्होबा वगैरे मंडळींचीं नांवें आढळतात.[१] पुढें ह्या संस्थेला विधवाविवाह प्रतिबंधनिवारक मंडळी असें नांव देण्यांत आलें. ता. १५ जून १८६९ सालीं पांडुरंग वि. करमरकर यांच्याशीं झालेल्या वेणुबाईच्या पुनर्विवाहाला दादोबा हजर होते.[२]

## (५) सरकारी बुक-कमिटी

सरकारच्या आश्रयाकरितां जे ग्रंथ येत असत त्यांचा निकाल करण्याकरितां जी मंडळी नेमली होती तिचे दादोबा कांहीं काळ सभासद होते. इतर सभासद प्रो. हार्कनेस, डॉ. विल्सन, मेजर कँडी, मि. जॉन पीट, विनायक वासुदेव, भास्कर दामोदर, गोविंद विठ्ठल महाजन, गोविंद नारायण, बाळाजी पांडुरंग, नारायण विश्वनाथशास्त्री हे असत.[३]

याशिवाय वक्तृत्वोत्तेजक सभा (स्थापना १८६७), वगैरे संस्थांच्या कार्यांमध्यें ते भाग घेत. म्युनिसिपल कमिशनर मि. क्रॉफर्ड यांच्या अरेरावी व उधळ्या कारभाराला आळा घालण्याकरितां जे. पी. लोकांची सर अँड्रू स्कोबल यांच्या अध्यक्षतेखालीं ता. ३० जून १८७१ रोजीं सभा भरली तिलाही ते हजर होते. यावरून त्यांच्या बहुविध कार्याची साधारण कल्पना होईल.

★

१ रा. सा. वि. ना. मंडलिक यांचें चरित्र, पृ० ३०३.

२ Marriage of Hindu Widows, (1869) Publisher, Moroba Kanhoba.

३ रा. सा. वि. ना. मंडलिक यांचें चरित्र, पृ. ९१.

१८

# अखेर

मराठी ट्रान्स्लेटर या हुद्द्यावर दादोबा देह ठेवीपर्यंत दोन वर्षें होते. या कालावधींत त्यांनीं आपल्या व्याकरणाची पूरणिका, शिशुबोध व आत्मचरित्राचा कांहीं भाग लिहिला. या शिवाय मराठी भाषेच्या पूर्वपीठिकेवर ते एक स्वतंत्र ग्रंथ तयार करीत होते, असें त्यांच्या व्याकरणाच्या पूरणिकेंत नमूद आहे. ते आधींच जराग्रस्त व आजारी असत. त्यांत थोड्याच अंतरानें एकामागून एक असे त्यांचे दोन मुलगे कालवश झाले. या व अशाच इतर अनेक कौटुंबिक आपत्तीमुळें त्यांचा धीर खचला होता व त्यांच्या हातून विशेष जोरानें कार्य होऊं शकलें नाहीं. पण शेवटपर्यंत मराठी भाषेच्या अभ्यासाकडे आपल्या लोकांची अनास्था व सरकारचें दुर्लक्ष पाहून त्यांच्या हृदयाला पीळ पडत होता. ते लिहितात,

"I should not wonder if some patriots and admirers of the late politically high position of Maharashtra, and of the richness of her poetical literature, regard it as something approaching to a national insult, that while a professorial chair is founded for the Persian language in the Elphinstone and Poona Colleges, which is not the colloquial language of India, not only no such consideration is shown to the vernacular languages, or to any of them, of this Presidency, but the very standard of the study and examination of the students in those languages is found every now and then gradually lowered as my long experience as a University examiner in the Marathi and Hindustani languages has fully convinced me. Hence the most lamentable inattention and neglect shown by the Native students themselves to the correct and critical study of their own vernaculars, as is now further abundantly brought to my notice in my present capacity as Marathi Translator and Marathi Referee in the Educational Department, and this is the more to be regretted especially in respect to the Marathi

language, notwithstanding the existence of a standard grammar (sanctioned as a text book) and dictionaries in that language for nearly half a century."[1]

दादोबांना आणखी कांहीं वर्षें आयुष्य लाभतें तर त्यांनीं अशाही अवस्थेंत इच्छाशक्तीच्या जोरावर आपले संकल्पित ग्रंथ पुरे केले असते, यांत शंका नाहीं. विशेषतः त्यांचें आत्मचरित्र अपुरें राहिलें ही तर कधींच भरून न येणारी हानि आहे. त्यांच्या स्वतःच्याच लेखणींतून पूर्वचरित्राप्रमाणें उत्तरचरित्राचाही भाग उतरला असता तर तो अत्यंत मनोरम झाला असता. परंतु मृत्यु हा माणसानें अंगीकृत केलेलें कार्य पुरें झालें आहे कीं अपुरें राहिलें आहे, हें पाहाण्यास थांबत नाहीं. रामदासांनीं त्याचें अत्यंत सुंदर वर्णन करून ठेविलें आहे. ते लिहितात—

**मृत्यु न म्हणे वित्पन्न । मृत्यु न म्हणे संपन्न ॥**
**मृत्यु न म्हणे विद्वज्जन । समुदाई ॥**
**मृत्यु न म्हणे हा धूर्त । मृत्यु न म्हणे हा बहुश्रुत ॥**
**मृत्यु न म्हणे हा पंडित । महा भला ॥**
**मृत्यु न म्हणे हा आधारू । मृत्यु न म्हणे उदारू ॥**
**मृत्यु न म्हणे सुंदरू । चतुरांग जाणे ॥**[2]

अखेर त्यानें आपले निर्दय पाश दादोबांभोंवतीं आवळलेच ! ता. १७ ऑक्टोबर १८८२ गुरुवार रोजीं सकाळीं सुमारें साडेआठ वाजतां त्यांचा आत्मा ब्रिच कँडी रोडवरील त्यांच्या राहात्या घरांत शाश्वत परब्रह्मांत विलीन झाला. मरणसमयीं त्यांचें वय अडुसष्ट वर्षांचें होतें. टाइम्स ऑफ इंडियानें त्यांच्यासंबंधी एक विस्तृत मृत्युलेख[3] लिहिला आहे. त्यांत जुन्या पिढींपैकीं एक अग्रेसर सामाजिक व धार्मिक सुधारक, प्रख्यात वाङ्मयसेवक व मुंबईतील प्रतिष्ठित हिंदु नागरीक अशा या थोर पुरुषाच्या निधनानें हिंदी समाजामध्यें रिकामी पडलेली जागा भरून येण्यास फार काल लागेल, असें म्हटलें आहे. दादोबांना उर्दू, पर्शियन, इंग्रजी, गुजराती या परक्या भाषांप्रमाणें तामील व तेलगु भाषाही अवगत होत्या, अशी माहिती या लेखांत मिळते. मृताला एक विधवा व पांच मुलें

१ व्याकरणाची पूरणिका : Introduction, pp. 6, 7.

२ दासबोध, दशक, ३, २.

३ The Times of India–(22–10–1882).

असून त्यांच्या चरितार्थाची नीट सोय नाहीं, तरी त्यानें आपल्या हयातींत जी महत्त्वाची कामगिरी बजाविली आहे ती लक्षांत आणून त्यांच्या कुटुंबाला सरकारनें कांहींतरी मदत करावी, अशीही सूचना टाइम्सकारांनीं केलेली आहे. बाळशास्त्री जांभेकर ज्यावेळीं दिवंगत झाले, त्यावेळीं बॉंबे टाइम्सच्या संपादकांनीं अशीच सूचना केली होती व त्याप्रमाणें त्यांचें कुटुंब व मुलगा यांना पेन्शन देण्याची व्यवस्था सरकारनें केली होती याचा निर्देश मागें आलाच आहे. सुबोधपत्रिकेंत दादोबांच्या निधनोत्तर जो त्यांच्यावर लेख लिहिला आहे त्यांत, "या इलाख्यांतील विद्वद्रत्नमुकुटमणि" असें त्यांना संबोधिलें असून "यांचें वय ६८ वर्षांचें होतें तरी उद्योगाचे संबंधानें ते अगदीं तरुण होते", असे उद्गार काढले आहेत.[1] दादोबा बरेच दिवस दम्यानें आजारी होते, असें सांगून 'नेटिव ओपिनियन' का लिहितात, "सार्वजनिक चळवळींतून बऱ्याच दिवसांपासून अंग काढून घेतल्यामुळे नव्या पिढीला त्यांचा विशेष परिचय नाहीं; परंतु एक प्रेमळ वृद्ध गृहस्थ म्हणून त्यांची आठवण आपल्या स्मृतिसंपुटांत राखून ठेवणारे पुष्कळ सापडतील.[2] विनायक कोंडदेव ओक आपल्या बालवाचकांना 'फार दुःखाची गोष्ट' कळवितात "आमच्या लहान वाचणाऱ्यांनो, ज्यांचें लघुव्याकरण तुम्हीं अहोरात्र घोकतां, ते रावबहादूर दादोबा पांडुरंग हे गेल्या महिन्याच्या सतराव्या तारखेस सकाळीं आठ वाजतां मरण पावले......ते स्वतः गेले, पण लौकिक मागें राहिला आहे. चांगलीं कामें केलीं म्हणजे हा लाभ होतो.[3] मि० बेहरामजी मेरवानजी मलबारी यांनीं आपल्या The Indian Spectator या पत्रांत काढलेले खेदोद्गार अत्यंत जिव्हाळ्याचे आहेत. ते मूळ इंग्रजींतच येथें उद्धृत करतों—

"The death of Mr. Dadoba Pandurang is keenly regretted all over the presidency. The sympathy expressed by the Press in general is warm and deep, and now that the good people of Bombay have been reminded of the services of one of their best scholars and most earnest reformers, it may be hoped that the memory of Dadoba Pandurang will not be suffered to pass out of the people's life. His friends and pupils especially

१ सुबोधपत्रिका, २२ व २९ ऑक्टोबर १८८२.

२ Native Opinion (22-12-1882).

३ बालबोध, नवंबर १८८२.

must lose no time. As head of an enlightened family, a pioneer of popular education, an enthusiastic student, a faithful and intrepid officer and for a Hindu, a singularly bold and outspoken citizen, Dadoba Pandurang made his mark years ago. His evening of life was clouded by bitter trials, but he bore up manfully against them all and sought refuge in the consolations of religion and philosophy. So great was his love of literature that some time ago, almost on his death bed, he was prepared to translate Max Muller's Hibbert lectures into Marathi. Such was Rao Bahadur Dadoba Pandurang. Many Rao Bahadurs and Rajeshris have died ere now, but few of Bombay's best sons have left more solid work behind, than left in many forms, by the veteran, whose loss to her may never be supplied.."[1]

पुना ऑब्झर्वरनेंही दादोबांच्या निधनाबद्दल हळहळ व्यक्त केलेली आहे; परंतु 'केसरी' पत्रांत त्यांच्यासंबंधीं एक ओळ देखील लिहिलेली आढळत नाहीं. 'केसरी' पक्षाचे आद्य प्रवर्तक विष्णुशास्त्री चिपळूणकर ह्यांच्या मनांत दादोबांसंबंधी किती आदर होता, याचा उल्लेख मागें आलाच आहे. यामुळें या मुग्धतेचें विशेष नवल वाटतें. वस्तुस्थिति म्हणजे विष्णुशास्त्र्यांचा अंत दादोबांच्या पूर्वीच म्हणजे ता. १७ मार्च १८८२ रोजीं झाला होता. त्यांच्यानंतरचे 'केसरी'चे संपादक आगरकर व टिळक हे दादोबा ज्यावेळीं निधन पावले त्यावेळीं डोंगरीला तुरुंगवासांत होते. लगेच म्हणजे ता. २६ गुरुवार अक्टोबर १८८२ रोजीं त्यांची मुक्तता झाली.[२] तरी पण या गडबडींत ही गोष्ट राहून गेली असें वाटतें.

दादोबांच्या निधनानंतर कितीतरी वर्षांनीं प्रस्तुत लेखकाचा जन्म झाला, तेव्हां दादोबांच्या प्रत्यक्ष सहवासाचा फायदा त्याला मिळणें शक्यच नव्हतें; इतकेंच नाहीं तर दादोबांच्या आठवणी सांगणारा त्यांच्या काळांतला एकही माणूस मला भेटला नाहीं. पण त्यांच्या आत्मचरित्राचें संपादन, उत्तरचरित्राचें लेखन व त्याकरितां एकंदर चरित्रांचें संशोधन करण्यांत जो तीन वर्षांचा काल गेला तो एका प्रकारें अप्रत्यक्ष रीतीनें त्यांच्या सहवासांतच गेला, असें म्हणावयास हरकत नाहीं. हा काल अत्यंत

1 The Indian Spectator, Oct. 29, 1882.

२ केसरी, अं. ४४ (३१ अक्टो. १८८२) अग्रलेख.

कष्टांत पण एकंदरींत आनंदांत गेला, हें कबूल करण्यास मला आनंद वाटतो. एकाद्या थोर पुरुषाचा स्नेह असला म्हणजे त्याच्या मार्फत अनेक लोकांच्या गांठीभेटी व ओळखी होतात त्याचप्रमाणें दादोबांच्या संगतींत असतांना अनेक समकालीन व्यक्तींचा व संस्थांचा परिचय घडला. यक्षिणीची कांडी हातांत आल्याप्रमाणें मी भूतकालांत म्हणजे एकोणिसाव्या शतकाच्या पहिल्या ८२ वर्षांच्या कालांत सारखा विहरत होतों, असें म्हणावयास हरकत नाहीं. प्रत्यक्ष सत्संगतीपेक्षां अशा प्रकारची अप्रत्यक्ष सत्संगति जास्त फायदेशीर आहे. तेणेंकरून आपल्या आनंदांत आपल्याला इतरांना चिरकाल सहभागी करतां येतें. प्रस्तुत ग्रंथ वाचतांना वाचकांना दादोबा पांडुरंगांचें जीवनचरित्र व कार्य यांची माहिती होईलच, परंतु त्यांच्या काळच्या कितीतरी इतर कार्यकर्त्यांची व संस्थांची ओळख होऊन त्यांचीं स्वतंत्र चरित्रें किंवा इतिहास लिहितां येतील. प्रस्तुत ग्रंथ वाचून कोणाला या अप्रत्यक्ष सत्संगतीची इच्छा म्हणजे इतर थोर लोकांचीं चरित्रें लिहिण्याची स्फूर्ति झाली तर मी मला कृतार्थ समजेन. भर्तृहरीनें जी सत्संगतीची स्तुति केली आहे ती प्रत्यक्षापेक्षां या अप्रत्यक्ष सत्संगतीलाच जास्त लागू आहे, म्हणून तो श्लोक येथें उद्धृत करून लेखणी खालीं ठेवतों.

जाड्यं धियो हरति सिञ्चति वाचि सत्यं
मानोन्नतिं दिशति पापमपाकरोति ।
चेतः प्रसादयति दिक्षु तनोति कीर्तिं
सत्संगतिः कथय किं न करोति पुंसाम् ॥

– समाप्त –

# दादोक्त शिशुबोध

## प्रकरण १ लें

## परमेश्वरो जयति

### श्लोक

**सर्वांतर्यामिणं वंदे सच्चिदानंदविग्रहम्**
**ज्ञानैकगम्यं सर्वेभ्यो रम्यमात्मानमीश्वरम् ॥ १ ॥**

१. प्रथम मुलांनों, तुह्मीं आपल्या मनांत चांगली वासना ठेवावी. म्हणजे जेणेंकरून कोणास दुःख होईल अथवा त्याचें अनहित होईल अशी वासना आपल्या मनांत कदापि आणूं नका, व ती आली असतां मनांतून काढून टाका.

२. आपलें मन व आपली वासना निरंतर पापानें मलिन होत असत्ये, म्हणोन माशी जशी नेहमीं आपले पंख पायांनीं साफ करित असत्ये तसें तुह्मीं आपल्या मनांस व वासनेस विचारानें साफ करित असा.

३. माझ्या लाडक्या मुलांनों, ही सृष्टि मोठी ठक आणि भयंकर आहे असें मनांत आणून मनुष्यांशीं व्यवहार करा.

४. मीं कोणास ठकवित नाहीं म्हणोन मलाहि कोणी ठकविणार नाहीं, असें कदापि मनांत आणूं नका. उलटें असें समजा कीं, मीं कोणास ठकवित नाहीं, असें जाणूनच, लोक मला अधिक ठकवूं लागतील; म्हणोन सावध असा.

५. ईश्वरास व पापास भिणाऱ्या मनुष्यास लोक भोळा समजतात, आणि त्याचा अधिक छळ करूं लागतात. तथापि तुह्मीं ईश्वरास व पापास भिणें कदापि सोडूं नका; यांतच शेवटीं सुख व समाधान आहे असें तुमच्या अनुभवास येईल.

६. लोकांत प्रसिद्ध म्हण आहे कीं, शेरास सव्वा शेर भेटल्या शिवाय कोणाची खोड मोडत नाहीं, ही म्हण पुष्कळ अंशांनीं खरी आहे; तथापि जर तुह्मीं शांत स्वभावाचे असाल, आणि तुह्मांस तात्कालिक समाधान पाहिजे असेल, तर शेरास सव्वा शेर न होतां पाऊण शेर व्हा, ठकविण्याच्या ठिकाणीं ठकले जा, मार देण्याच्या ठिकाणीं मार खा.

७. वाटेंत जातांना जर एकाद्या नीच मनुष्यानें तुह्मांस उगीच दांडगाईनें धक्का दिला, अथवा शिवी दिली, व जर तुमच्यांत सामर्थ्य व अधिकार असला, तर जवळच्या झाडा जवळ नेऊन त्यास वेताच्या चार छड्या मारा, नाहीं तर निमूटपणें सहन करा; आणि उगीच रहा. यांत चांगलीं मनुष्यें तुह्मांस थोर समजतील, आणि त्याचा नीचपणा अधिक उघडकीस येईल, आणि शेवटीं तुह्मांस समाधान वाटेल.

८. या देशांत इंग्लिशांच्या राजसत्तेच्या दुसऱ्या बहुत परिणामांत, हा एक परिणाम तर मला स्पष्ट दिसून येतो कीं, नीच म्हणजे खालच्या दरजाचे लोक उन्मत्त आणि छळक होत चालले आहेत, आणि उंच जातीचे व प्रतिष्ठित लोक सर्व गोष्टींनीं खालीं घसरत चालले आहेत. म्हणोन संभावित व अब्रूच्या लोकांस फारच सांभाळून वागलें पाहिजे.

९. मीं आपल्या वयांत पुष्कळ मोठमोठे राजेरजवाडे व मोठमोठे दरबारी लोक पाहिले, पुष्कळांच्या भेटी घेऊन त्यांशीं संभाषणें केलीं व कित्येकांशीं थोडाबहुत सहवासहि केला, परंतु त्यां मध्यें निवळ खरेपणा, खरा कळवळा व खरी गुणांची परीक्षा हीं मला कोठेंच आढळलीं नाहींत. म्हणोन अशा थोरांस तुह्मीं त्यांचें बाहेरचें ऐश्वर्य व बडेजाव पाहून भुलूं नका, आणि त्यांच्या वचना वर पूर्ण भरंवसा ठेवून, स्वस्थ राहूं नका, आपल्या वर त्यांची मर्जी आहे ती उद्यां अशीच राहील असें मनांत आणूं नका, विनाकारण त्यांची मर्जी केव्हां जाईल याचा भरंवसा नाहीं. म्हणोन अशा थोरां बराबर फारच सावधगिरीनें वागा.

१०. राजे, दिवाण, कारभारी व श्रीमंत लोक, यांची जर तुह्मां वर मर्जी प्रसन्न झाली, तर तुह्मांस ती सांभाळायास अधिक सावध असलें पाहिजे, कारण, तशी त्यांची मर्जी प्रसन्न झाली म्हणजे इतर जवळ वागणाऱ्यांच्या मनांत मत्सर उत्पन्न होतो, आणि गुप्त रीतीनें तुमचा नाश कसा होईल हें पाहत असतात; असें न व्हावें म्हणोन मोठा उपाय हाच कीं, त्या यजमानाच्या प्रसन्न मर्जीनें तुमच्यानें होईल तितकें इतरांचें हित करित गेलेन म्हणजे तितका मत्सर त्यांच्या मनांत उत्पन्न होणार नाहीं. पुष्कळ लोक तुह्मांशीं प्रीतीनें वागतील, आणि तुमचा टिकाव फार दिवस लागेल; तथापि मनुष्याचें मन दुष्ट असतें म्हणोन तुह्मांस निरंतर सावध असलेंच पाहिजे.

११. मुलांनों, या सृष्टींत राजापासून रंका पर्यंत सर्वांची दृष्टि स्वार्था कडेसच असत्ये; त्यांचा स्वार्थ ज्याच्यापासून साधतो तो त्या वेळेस त्यांच्या प्रीतीस पात्र होतो; म्हणोन मनुष्यांशीं व्यवहार करतांना ही गोष्ट निरंतर आपल्या मनांत बाळगली पाहिजे. मोठ्या श्रीमंताची ही मर्जी एका आण्याच्या तोट्या वरून जाईल, म्हणोन त्यांच्या आण्या पर्यंत तुम्हीं जपा, त्यांस आण्याचा नफा करून दाखवा, पण तोटा दाखवूं नका; झालाच तर तुम्हीं आपल्या पदरचे दोन आणे खर्चा; परंतु थोडक्या साठीं त्यांची मर्जी जाऊं देऊं नका. असें कदापि मनांत आणूं नका कीं, हे मोठे श्रीमंत आहेत, यांस एक आणा तो काय? परंतु तुमच्या पेक्षां त्यांस एक आणा अधिक आहे हेंच मनांत आणा, आणि तसा हिशोब ठेवा.

१२. आणखी तुम्हांस सांगतों कीं या सृष्टींत हलके, दुष्ट, पाजी, कृतघ्न असे लोक फार आहेत; आणि वजनदार, दयाळु, मोठ्या मनाचे, आणि उपकार स्मरून वागणारे, असे लोक फारच थोडे आहेत, म्हणोन पहिल्यानें कोणाचा परिचय करण्यांत अथवा त्याज बरोबर व्यवहार ठेवण्यांत फार सावध असलें पाहिजे. तुमच्या स्वतःच्या अनुभवा शिवाय, अथवा त्यांच्या विषयीं पुसतपास करून दुसऱ्याचा अनुभव ऐकल्या शिवाय, अपरिचितांशीं व्यवहार करूं नका.

१३. कोणाच्या मिष्ट भाषणानें एकाएकीं भुलूं नका; कारण जो मिष्ट भाषण करतो त्याच्या मनांत बहुधा कांहींतरीं स्वार्थ साधायाचा असतो. तथापि मिष्ट भाषण ऐकत जा, अशा भाषणानें भुलूं मात्र नका. परंतु तें ऐकण्याचा कंटाळा करूं नका. तो एका तोंडानें हांसत असला तर तुम्हीं दोन तोंडांनीं हंसा, परंतु आंतून सावध असा.

१४. बाहेरच्या आकारा वरून व चेष्टे वरून आंतील माणूस ओळखणें फार कठीण काम आहे. तथापि खोल विचार करून पाहिलें असतां साधारण मुद्रे वरून व चेष्टे वरून व नेत्रांच्या हालण्या वरून आंतील पुरुषांचा आकार दिसून येतो, आणि 'आकारे रंगते चेष्टा' या म्हणीची थोडीबहुत परीक्षा करतां येत्ये. म्हणोन अशा परीक्षेनें नवा परिचय करण्यांत आपल्या मनांत सावध असणें बरें आहे. परंतु ही परीक्षा सर्वांस साधत्ये असें होत नाहीं. ज्याला साधेल त्याणें करावी, तुम्हांस साधेल तर तुम्हीं करा. परंतु मीं तुमची परीक्षा केली असें त्यांस कळवूं मात्र नका. मनांत ओळखून सावध असा.

१५. वरच्या अंकांत जो तुह्मांस उपदेश केला आहे त्या विषयीं थोडा मीं आपला अनुभव तुह्मांस सांगतों, त्या कडे थोडें तुमचें लक्ष असूं द्या.

( १ ) जो मनुष्य ठेंगणा, व शरीरानें पातळ असतो, तो बहुतकरून मतलबी, ठक व दक्ष असतो.

( २ ) ज्याचे डोळे घारे असतात तो बहुधा आंतल्या गांटीचा आणि निष्ठुर असतो.

( ३ ) जो गडबड्या व चंचळ असतो तो परोपकारी आणि वेळेस त्याचें थोडें अनहित झालें तरीं मोठा सूड उगविणाराही असतो.

( ४ ) जो बोलका फार असतो तो मनाचा साफ असतो, परंतु भरंवशास फारसा पात्र नसतो.

( ५ ) जो फारच अल्पभाषणी असतो, तो समयीं मूर्ख असतो, व समयीं मनांत फार सांठवून ठेवणारा असतो.

( ६ ) जो मितभाषणी म्हणजे ज्या वेळेस जितकें बोललें पाहिजे तितकेंच थोडक्यांत बोलतो, तो शहाणा व भरंवशास पात्र असतो.

( ७ ) ज्यास क्रोधाचा उकाळा लौकर येतो, तो खरा प्रामाणिक व मनाचा साफ असतो, परंतु अविचारी व भयंकरहि असतो. त्याच्या क्रोधाचा उकाळा एकदां उठून बाहेर निघून गेला म्हणजे तो बहुधा विचारी व शांत होतो; म्हणोन आपण शांति धरून त्याचा तो उकाळा जाऊं द्यावा. आणि मग त्याशीं बोलावें, व त्यास खरा मजकूर सांगावा. परंतु इतकें धैर्य थोडक्यांस असतें; म्हणोन पुढें क्रोधी आणि शांत या दोघांसहि पश्चात्ताप करावा लागतो.

( ८ ) जो धिमा, ज्यास क्रोध येत नाहीं, तो बहुधा क्रोधाचीं कारणें सर्व मनांत सांठवून ठेवतो आणि इतर गैरसावध असतां अचानक त्याचा नाश करतो. हा क्रोधी मनुष्या पेक्षां अधिक भयंकर जाणिला पाहिजे. म्हणोन क्रोधी नसून शांत व विचारी अशीं मनुष्यें विरळा, आणि तींच लोकांस अधिक आवडतात आणि प्रशंसेस पात्र होतात.

( ९ ) जे पुरुष अथवा ज्या स्त्रिया रूपानें देखण्या असतात, ते पुरुष व त्या स्त्रिया स्वभावानेंहि बहुधा चांगल्या असतात, व जे पुरुष व ज्या स्त्रिया विरूप असतात, ते पुरुष व त्या स्त्रिया स्वभावानें व गुणानेंहि तशाच असतात, असा नियम बहुधा मला आढळतो. परंतु त्यांच्या त्या सौंदर्यांत आणि विरूपपणांतहि

एकेकाची थोडीबहुत मिसळ असत्ये, ती विचक्षण जाणतात. या वरून त्यांच्या स्वभावांची व गुणांची परीक्षा करण्यांत अंमळ खोल पाहिलें पाहिजे.

( १० ) जो मनुष्य शरीरानें मोठा, आणि वाढीनें उंच, तो बहुधा निष्कपटी, उदार, आणि मनाचाहि थोर असतो. कदाचित् बुद्धीचें मांद्य असलें तरीं त्याच्या हृदयाचें थोरपण असतें. म्हणोन मला वाटतें ठेंगण्या मनुष्या पेक्षां असा भव्य मनुष्य दुराचारी कमी असतो.

ही माझ्या अनुभवाची गांठोडी म्यां तुह्मां पाशीं उगीच अमानत ठेविली आहे. गरज लागेल तेव्हां उघडून पाहा. नाहीं तर तशीच बंद ठेवा.

१६. कोणत्याहि मनुष्याशीं ओळख करण्याच्या पूर्वी त्याचें नांव व लौकिक यांचा आंतून शोध करून मग ओळख करण्याचा प्रयत्न करा. बहुत लोकांशीं ओळख असण्या पेक्षां थोड्या चांगल्या लोकां बरोबर ओळख असणें बरें. जितकी ओळख तितकें दुःख व संताप.

१७. थोड्या चांगल्या लोकां बराबर ओळख ठेवा म्हणोन तुह्मांस सांगितलें, परंतु त्यांतहि तुह्मांस स्नेह ठेवणें तो शहाण्या व परोपकारी अशा मनुष्या बरोबर ठेवा. आणि सलगीचा स्नेह कोणाहि बरोबर ठेवूं नका. सलगी स्नेह बिघडवित्ये, वाढवित नाहीं.

१८. निरंतर सहवास करणें तो खरे साधु, व ईश्वराचे भक्त, व पापास थरथरां भिणारे अशा मनुष्यां बरोबर करा.

१९. पापी व दुर्व्यसनी मनुष्याच्या वाऱ्यासहि उभे राहूं नका. त्यांच्या आंगावरला वाराहि तुह्मांस त्यां जवळ ओढून नेईल. तो सुगंध असला तर दुर्गंध समजा, आणि त्यापासून दूर रहा.

२०. तुह्मीं जरीं तरुण असलां तरीं तुह्मीं पोक्त व म्हाताऱ्यांच्या मंडळींत असत जा, आणि त्यांच्या गोष्टी ऐका. म्हणजे तेणेंकरून तुह्मांस सहज आणि लौकर पुष्कळ गोष्टी समजतील. आणि शहाणपणा येईल, आणि पुढें घडणारे तुमचे अनर्थही टळतील. म्हाताऱ्यांच्या गोष्टी मात्र ऐका, परंतु त्यांशीं वाद करूं नका. आणि जरीं त्यांच्या विचाराचा वेडेपणा तुह्मांस वाटला तरीं त्यांचा धिक्कार करूं नका. त्यांशीं निरंतर नम्रपणानेंच वागा.

★

## प्रकरण २ रें

# लोकांशीं व्यवहार कसा ठेवावा

१. लोकांशीं व्यवहार व संबंध करणें तो फार सावधगिरीनें आणि थोडा करा. फार व्यवहार व संबंध वाढवूं नका.

२. तुह्मीं आपणा कडून सर्व लोकांशीं निष्कपटपणानें व सफाईनें वागा.

३. दुसऱ्यानें जरीं तुह्मां बरोबर कपट केलें तरीं तुह्मीं त्याशीं कपटानें वागूं नका. मात्र त्याचें कपट त्याच्या पदरीं घाला. असें न कराल तर तो तुह्मांस भोळे समजेल.

४. सर्वांशीं नम्रपणानें व आर्जवानें वागा म्हणजे तुह्मीं बहुतेकांस गोड वाटाल.

५. थोडें बोला, परंतु मिष्ट आणि खरें बोला. कोणास त्याच्या हिताची गोष्ट सांगणें तीहि नम्रतेनें आणि मिष्ट शब्दांनीं सांगा; नाहीं तर ते तुमची गोष्ट ऐकणार नाहींत आणि तेणेंकरून तुह्मांस त्रास उत्पन्न होईल. कर्कश भाषणानें कोणीहि आपल्या हिताची गोष्ट ऐकायास इच्छित नाहींत.

६. पूर्वी माझा स्वभाव असा होता कीं, मीं प्रथम लोकांस त्यांच्या हिताच्या गोष्टी नम्रतेनें व गोड शब्दांनीं सांगत असें. परंतु त्या त्यांणीं न ऐकल्या तर मला त्रास होऊन मीं त्याच गोष्टी लावून व कांहीं पुढें धमकावून सांगत असें. पुढें म्यां पाहिलें तों माझे सर्व श्रम व्यर्थ जात चालले, आणि कोणी माझें ऐकेनासें झालें. म्हणोन कोणास त्याच्या बऱ्याची गोष्ट सांगणें झाली तरी तीहि आर्जवानेंच सांगितली पाहिजे. बाबा माझ्या लाडक्या सोन्या हें औषध घे म्हणोन जसें लहान मुलास सांगतों, तसेंच या जगांत लोकांस सांगितलें पाहिजे.

७. साधेल तों पर्यंत द्रव्याचा व्यवहार व शरीरसंबंध बरोबरीच्यांशीं करा. तुह्मां पेक्षां ज्याचें पारडें भारी असेल, अथवा ज्याचें फारच हलकें असेल, या दोघांशींहि असा व्यवहार करूं नका. वजनदाराच्या अन्याया पुढें तुह्मांस आपलें तोंड बंद करावें लागेल, आणि हलक्यापासून आपला हात आटोपावा लागेल. हे पुढें येणारे दोन प्रसंग लक्ष्यांत ठेवून वर सांगितलेला व्यवहार करा.

८. बाजारांत सौदा करणें तो भले अब्रुदार दुकानदार पाहून त्यांच्या दुकानीं करा. बाजारांत इतर जिनसां पेक्षां लफंगाई व ठकबाजी ही फार पसरली असते. म्हणोन ती जेथें आढळेल तेथें पुनः कोणताहि सौदा करूं नका.

९. द्रव्याचा व देण्याघेण्याचा व्यवहार कोणा बरोबरहि एकांतीं करूं नका. दोघे तिघे तरीं आपल्या ओळखीचे असतील त्यांच्या समक्ष असा व्यवहार करा. नाहीं तर प्रसंगीं तुमचा व्यवहार खरा असला तरीं खोटा होण्यास कांहीं उशीर लागणार नाहीं.

१०. कोणा बरोबर पैशाचा अथवा देण्याघेण्याचा व्यवहार करतांना तो जरीं भला मनुष्य दिसत असला, तरीं समयास तो बदलला तर कसा परिणाम होईल हें मनांत आणून व्यवहार करा. गरजेच्या वेळेस मनुष्यें एका प्रकारचीं असतात, आणि ती त्यांची गरज सरली म्हणजे तींच मनुष्यें दुसऱ्या प्रकारचीं होतात, हें पक्केपणीं मनांत आणा. त्यांची गरज सरली, आणि तुह्मांस त्यांचीच गरज लागली तर तींच मनुष्यें तुह्मांस दुसऱ्या प्रकारचीं दिसतील, आणि तुह्मांस मोठें आश्चर्य वाटेल. ह्या सर्व परिणाम व्यवहार करण्याच्या अगोदर मनांत आणा. मागाहून आणून उपयोग नाहीं.

११. पुरुषां पेक्षां बायकांशीं देण्याघेण्याचा व्यवहार किंवा कोणताहि कौल करार करण्यांत तुह्मांस अधिक सावध असलें पाहिजे. कारण त्या जरीं लबाड आणि ठक निघाल्या तरीं त्यांच्या अन्याया कडेस लोक फारसे पाहणार नाहींत. परंतु तुह्मांसच वेडे ह्मणतील.

१२. भल्या मनुष्या कडून थोडें व्याज किंवा थोडें भाडें मिळत असलें तरीं तें बरें, परंतु ठक आणि दांडगे अशां कडून अधिक व्याज व अधिक भाडें मिळत असलें तरीं त्यास भुलूं नका.

१३. पैशाचा अथवा देण्याघेण्याचा व्यवहार तोंडचा कदापि करूं नका. पांढऱ्या वर काळें करून व्यवहार करित असा.

१४. त्यांत आतांचा काळ तर असा कठीण चालला आहे, व इंग्रेजी कायदेकानू व बुभुक्षित वकील यांची संख्या इतकी वाढत चालली आहे कीं, एखादा लहानसा कजरोखा व करारपत्र दोनदोन मोठ्या तावां वर लिहून घेतलें तरीं तें खोटें ठरतें आणि मध्यें वकील भलताच अर्थ करून खऱ्याचें खोटें आणि खोट्याचें खरें करून खरा दावा बुडवितात. म्हणोन कागदपत्र करणें तेहि आतां इंग्रेजी अमलांत फारच विचारानें केले पाहिजेत. जिकडे तिकडे खऱ्यास खोटें आणि खोट्यास खरें करणारे थोके वाढत चालले आहेत. पूर्वीचे लोक सांगत होते कीं, लाखों रुपयांचीं देणींघेणीं एका लहानशा चिठी वर लिहून चंद्रसूर्याच्या साक्षी घालित होते. ते दिवस अगदीं गेले समजा.

★

## प्रकरण ३ रें

# आपला स्वतःचा व्यवहार कसा ठेवावा

१. आपला सर्व व्यवहार चोख आणि असंदिग्ध ठेवा. यांत तुह्मांस सुख होईल.

२. जसें एकाद्याचें घरदार पाहिलें, आणि तेथें कांहीं कचरा दृष्टीस न पडला तर लोकांचें मन प्रसन्न होऊन, तेथें त्यास बसावेंसें वाटतें, तसा आपला व्यवहार साफ असला आणि त्यांत कोणतीही भानगड राहूं दिली नाहीं, तर आपल्या बरोबर व्यवहार ठेवण्यांत बहुधा लोक धजतात, आणि आपला व्यवहारधंदा वाढतो, आणि त्यांत आपल्यास बरकत होते.

३. खऱ्यास धोका नाहीं, आणि खोट्यास निश्चितपणा नाहीं, म्हणोन जर तुह्मांस शांति पाहिजे, आणि सुख पाहिजे, तर चोख व्यवहार ठेवून थोडक्या लाभांत तृप्त असा.

४. पुढें होणारा आणि संदिग्ध अशा मोठ्या लाभा पेक्षां तूर्त होणारा स्वल्प लाभ अधिक चांगला.

५. पुढल्या लाभाचा लोभ फारच घातक आणि हानि करणारा आहे हें मुलांनों, तुह्मीं निरंतर मनांत आणा. आणि थोडक्या लाभांतच तृप्त असा. सन १८६४ त अशा लोभांत पडून मुंबई सारखें मोठें शहर खराबीस आलें. तुह्मीच पहा त्या काळापासून माझी स्वतांची दशा कशी झाली आहे; मीं तर चिमणी प्रमाणें एक पोटा पुरता दाण्याचा लोभ केला त्या लोभाचें आज चौदा वर्षें पर्यंत दुःख भोगित आहें. मग जे घरचे सावकार असून पुढें ज्यांहीं मणावारी आणि खंड्यांवारी दाणा सांठविण्याचा लोभ केला, त्या सर्वांची आतां कशी दशा झाली आहे हें तुह्मीच पाहत आहां.

६. रुस्तमजी जमशेटजी बाटलीवाले, खरशेटजी फर्दुनजी दारुवाले, वाले, जगन्नाथ शंकरशेट व शेंकडों या शहरांतले पैसेवाले लोक सन १८६३ च्या सालीं अमेरिकेंत लढाई चालू झाली आणि त्या मुळें कापूस महाग होऊन मुंबईंत कापसाच्या व्यापारानें कडेकोट पैका येऊन एक दोड वर्षांत नोंत सोन्याचा धूर निघूं लागला, त्या धुरानें सर्व लोकांचे डोळे भरून गेले, आणि त्यांस दिसनासें झालें. नानाप्रकारचीं जुव्या सारखीं त्यांनीं कामें आरंभलीं आणि लोभानें अधिकाधिक

श्रीमंत होण्या साठीं अशा मोठ्या गृहस्थांनीं इतर हजारों गोरगरीबांसही लोभांत ओढून आणिलें, आणि मोठमोठाले खळगे खणून शेवटीं त्यांत आपण पडले आणि आपणा बरोबर इतर गरिबांसहि पाडिलें. त्या लोभाचा परिणाम मुंबई आज सोळा वर्षे भोगित आहे. लोभाचा किती वाईट परिणाम आहे हें प्रत्यक्ष मुंबई शहर आज दाखवित आहे.

७. म्हणोन मुलांनों, आपल्या हातांत थोडें जरीं असलें तरीं त्यांतच तृप्त असावें. पुढें मोठा लाभ होईल म्हणोन तें हातांतून कदापि दवडूं नये. सवा रुपयाचा माल जेव्हां एका हातीं येईल, तेव्हां दुसऱ्या हातांतून रुपया जाऊं द्यावा.

८. गहाणा शिवाय नुसत्या अंगा वर किंवा रोख्या वर एकाएकीं कोणास रोख पैका देऊं नका, कारण एकदां रोख पैका हातांतून गेला ह्मणजे पुनः तो परत येईल असा आतां अगदीं भरंवसा नाहीं. लोकांच्या वासनेनें दिवसानुदिवस दरिद्र येत चाललें आहे, या मुळें आणि ईश्वराचें भय उडत चाललें आहे या साठीं सृष्टि फारच बिघडत चालली आहे.

९. आणखी मुलांनों, मीं तुह्मांस हिताची गोष्ट सांगतों. ती अशी: जोंपर्यंत तुह्मांस दुसऱ्या कडून नुकसान सोसवेल तितकी बूड सोसा; परंतु कोणत्याही कोर्टाची पायरी चढूं नका. प्रतिष्ठित मनुष्यास त्या बुडी पेक्षां कोर्टाच्या दगदगीचें दुःख अधिक सोसावें लागतें. आणि जसें भाकरीस तोंड नाहीं तसें इंग्लिश कायद्यांस तोंड नाहीं असें लोक म्हणतात तें बहुधा खरें आहे.

१०. राजदरबारीं न्याय बहुत करून विकत मिळत असतो. म्हणोन ज्यास पैका खर्चण्याची शक्ति व हिंमत असेल त्यानें दिवाण दरबार करावें. नाहीं पेक्षां निमूट स्वस्थपणें घरीं बसावें यांत अधिक लाभ व समाधान आहे.

११. मुलांनों, तुह्मांस पक्कें माहीत आहे कीं, पुष्कळ लोकांनीं मला मोठा विश्वास दाखविला, आणि त्यांत मला बहुतेकांची दया आली ह्मणोन मीं त्यांस थोडाबहुत पैका दिला, परंतु शेवटीं त्यांणीं मला फसविलें, तथापि मीं आज पर्यंत एका शिवाय कोणा वरही फिर्याद केली नाहीं. तसेंच तुह्मीं करा; परंतु सरकार दरबार करूं नका.

१२. जरीं मीं स्वतः सरकार दरबार केलें नाहीं, तरीं तें पुष्कळांनीं केलेल्याचीं दुःखें व त्रास ऐकले आहेत व पाहिलेहि आहेत, तोच मीं मोठा उपदेश मानिला आहे, तुह्मींही तसाच माना.

१३. म्हणोन आरंभींच देण्याघेण्याचा व्यवहार करणें तो फार चौकशीनें व लांबवर दृष्टि पोंहचवून केला पाहिजे. असें केलें असतांही जर तुह्मांस कोणी फसविलें, तर फसले जा; परंतु त्यांचा सूड उगविण्याचा इलाज करण्याच्या भरीस पडूं नका. कारण जर ते दुष्ट व बेअब्रूचे लोक असले, आणि असेच लोक आतां संख्येनें फार वाढत चालले आहेत, तर त्यांचा सूड उगविणें एकीकडेस राहून तेच उलटा तुह्मांस नानातऱ्हेनें त्रास देऊन तुमचा सूड उगवितील हें लक्ष्यांत ठेवा.

★

## प्रकरण ४ थें

# घरीं आपला प्रपंच कसा चालवावा

१. आतां मुलांनों, घरीं आपला प्रपंच कसा चालवावा या विषयीं मोठ्या अगत्याचा उपदेश मीं तुह्मांस थोडक्यांत सांगतों त्या कडेस तुह्मीं चांगलें लक्ष्य द्या.

२. घरीं जर तुह्मांस कोणी वडील असलीं तर त्यांच्या काना वर घातल्या शिवाय प्रपंचा संबंधीं कोणती एकादी मोठी गोष्ट अथवा जडजोखमी काम यांत एकाएकीं पडूं नका. तुमच्या ज्ञाना पेक्षां त्यांचा अनुभव तुह्मांस अधिक उपयोगी पडेल.

३. पहिल्यानें विद्याभ्यास करणें हें तर तुमचें मुख्य कर्म आहेच आहे. परंतु तसा अभ्यास पुरा झाल्या वरहि नियमित प्राप्तीची सोई कायम झाल्या शिवाय व तुमच्या पदरीं कांहीं द्रव्यसंचय झाल्या शिवाय लग्न करूं नका. लग्न करण्यांत फारच विचार केला पाहिजे. या आपल्या लोकांत आईबापें आपल्या प्राप्ती वर लहानपणींच मुलांचीं लग्नें करितात, व कोणी वेडीं कर्जे काढूनहि मुलांचीं लग्नें करितात, परंतु असें करण्यानें तीं आपल्या मुलांस सुखी करण्याचे ठिकाणीं दुःखी करितात.

४. मला शेंकडो पुरुष व स्त्रिया माहीत आहेत कीं, ज्यांच्या आईबापांनीं त्यांचीं लग्नें मोठ्या दिमाखीनें केलीं, आणि पुढें त्यांस सोई न लागल्या मुळें तीं मोठ्या विपत्तींत येऊन आतां त्यांस व त्यांच्या मुलांलेकरांस जाडें भरडें अन्नहि मिळणें कठीण. जितका पैसा व्यर्थ दिमाखींत खर्चला तितका जर त्यांच्या पुढल्या प्रपंचाची सोई लावून देण्या कडेस लाविला असता तर तें त्यांस अधिक उपयोगी पडतें.

५. या देशांत अविवाहित राहणें फार अवघड आहे ही गोष्ट खरी आहे. म्हणोन थोड्या तरीं नियमित प्राप्तीची सोई अगोदर काढावी आणि मग लग्न करावें. आणि आपल्या प्राप्तीच्या मानानें प्रपंच चालवावा. असें करण्यांत फारसें अवघड नाहीं. परंतु अशा कांहीं तरीं नियमित प्राप्तीची सोई नसतां जर लग्न केलें, आणि पुढें मुलांचा जोजार वाढला, तर त्यांत मोठा विटंबना आणि दुःख आहे. या गोष्टीचा विचार विवाहित मुलें जर अल्पवयी असलीं तर त्यांच्या वडिलांनीं तरीं अवश्य केला पाहिजे.

६. गुणी व ज्याला नियमित प्राप्ती आहे असा वर लाधल्या शिवाय उगीच वेठ काढण्या साठीं आपली मुलगी अथवा धाकटी बहीण कोणाच्या तरीं गळ्यांत बांधणें, त्या पेक्षां तिला आपल्या पाशीं इतर मुलां प्रमाणें अविवाहित ठेवणें बरें.

७. आईबाप जिवंत असतां आपल्या मुली वर ममता करितातच, परंतु त्यांच्या मागें भावांनींही आपल्या बहिणी गरीब व अनाथ असल्यास त्यांचा ममतेनें संभाळ करावा.

८. मुलांनों, तुमची प्राप्ती कितीहि असो, तथापि त्यांतूनहि थोडी तरीं नियमित शिल्लक ठेवून बाकीच्यांत निर्वाह करावा. आणि ती शिल्लक वाढवित जावें. अडचणीचे वेळेस अथवा अशक्तपणांत, तीच तुह्मांस थोडा बहुत आधार होईल. आणि आधार नसल्यास फारच कठीण पडेल याचा निरंतर मनांत विचार बाळगून खर्च करित जा.

९. मुलांनों, कर्ज काढण्याचा प्रसंग कदापि आणूं नका. आणि आलाच तर जितका तुमच्यानें टाळवेल तितका त्यास टाळा; कारण, माझ्या व सर्वांच्या अनुभवानें मीं तुह्मांस सांगतों कीं, या प्रपंचांत ऋणा प्रमाणें कठीण थोडींच दुसरीं दुःखें असतील.

१०. मुलांनों, दारिद्र्या पेक्षां ऋण फार वाईट व दुःखदायक समजा. श्रीमंत म्हणवून ऋणकारी असणें या पेक्षां गरीब असून बिनकर्जी असणें फार सुखाचें. म्हणोन मीं तुह्मांस निक्षून सांगतों कीं, दारिद्र्याचे हाल सोसा, परंतु ऋणास आपल्या घरांत शिरूं देऊं नका; कां कीं, तें एकदां घरांत शिरलें म्हणजे तेंच त्या घराचें मालक होऊन बसेल, आणि तुह्मां सर्वांस बाहेर हाकून काढील. ही गांठ पक्की मनांत बांधून ठेवा.

११. मुलांनों, मोठें लहान कर्जाचेंहि ओझें डोक्या वर न ठेवतां प्रपंच चालवावा हें मला तुह्मांस पहिलें सांगणें. तुमच्या प्राप्तीचें मान किती कां असेना तरी त्यांतून कांहीं तरीं शिल्लक मागें ठेवित जा असें हें माझें तुह्मांस अगत्याचें सांगणें आहे.

१२. शिल्लक राहिला तो तुमचा पैका, खर्चला किंवा खर्चायचा तो तुमचा पैका नाहीं; परक्याचा, असें समजून शिल्लक वाढविण्याची हयगय करूं नका.

१३. परंतु यांत तुमच्या सर्व आयुष्यभर तुह्मीं काटकसरीनेंच संसार करून शेवटपर्यंत शिल्लकच वाढवित जावी असा माझ्या या उपदेशाचा अर्थ तुह्मीं अगदीं समजूं नये तर जसजशी तुमची शिल्लक व प्राप्ती वाढत जाईल, तसतसा तुह्मीं

आपल्या कुटुंबास सुख देण्यांत, व इष्टमित्रांस मदत करण्यांत, व गोरगरीबांस धर्म करण्यांत हात ढिला ठेवित जा. म्हणजे तुमची कीर्ति वाढत जाईल आणि तुह्मीं सर्वांचे आवडते व्हाल.

१४. आपल्या कुटुंबाच्याच सुखा करितां पुष्कळ द्रव्य व मालमत्ता करून ठेवण्याची ज्या पुरुषांची हांव असत्ये ते केवळ कृपण व अधम पुरुष जाणावे.

परंतु आपल्या मागें आपल्या कुटुंबाचा नीट निर्वाह चालेल, इतकी त्याज करितां बेगमी करून ठेविल्या वर बाकीचें सर्व आपलें द्रव्य लोकांच्या सुखा कडेस लावितात तेच धन्य होत, आणि त्यांणींच प्रपंच साधून परमार्थहि साधिला असें म्हणून लोक त्यांची कीर्ति गातील.

१५. म्हणोन मुलांनों, द्रव्यसंचय करा परंतु कृपण आणि पामर मनाचे होऊं नका.

१६. द्रव्याचा यथास्थित खर्च करण्यांत तर विचार आणि शहाणपण पाहिजेच पाहिजे, परंतु धर्मकृत्यें करण्यांतहि तसाच विचार व शहाणपण पाहिजे.

१७. उगीच एकदोन दिवस ज्ञातिभोजनाचा अथवा लक्ष ब्राह्मणभोजनाचा समारंभ करून त्यांत द्रव्य खर्चून तात्कालिक बडेजाव मिळविणें त्या पेक्षां तितक्याच खर्चानें शंभर आंधळे, लुले, पांगळे व वृद्ध व अशक्त मनुष्यें व ज्यांचें संरक्षण करण्यास कोणी नाहीं अशा अनाथ विधवा व बालकें यांचें निरंतर उदरपोषण व संरक्षण चालेल, अशी त्याज करितां सोई करून ठेवणें यांत अधिक पुण्य व कीर्ति आहे. असें या देशांतले लोक समजत नाहींत ही त्यांची मोठी चूक आहे.

१८. परमेश्वरानें जर तुह्मांस असा एकादा मोठा खर्च करण्याचें सामर्थ्य दिलें, तर मुलांनों, ही वर दाखविलेली चुकी करूं नका. परंतु ज्यापासून लोकांस निरंतर उपयोग होऊन सुख होईल असें एकादें कृत्य करा अथवा अशा कृत्यास मदत करा.

१९. मुलांनों, या देशांत पूर्वींपासून आईबाप व सर्व मुलगे एकत्र राहून प्रपंच चालवित असत. पूर्वी वडिलांच्या आज्ञे प्रमाणें सर्व प्रपंचाचा बोजा आपसांत विभागून सर्व मिळून तो गाडा सुरळीत रितीनें चालवित असत. परंतु आतांच्या कालमानानें सर्वांची एकी राहून तो गाडा चालणें मला फारच कठीण दिसतें.

कारण दिवसानुदिवस मीं तूं आणि माझें तुझें हें ज्ञान फार वाढत चाललें आहे. या कारणानें क्षुल्लक गोष्टी वरूनहि बायकापोरांत तंटे बखेडे झाल्या शिवाय राहणार नाहींत, म्हणोन ज्याचा त्यानें आपला प्रपंच निराळा आटोपावा यांत मला तुमचें अधिक सुख दिसतें .

२०. जर कदाचित् तुमची प्राप्ती अल्प असून प्रपंच साऱ्यांचा गरीबीचा असला, तर तुह्मीं सारीं एकत्र राहून प्रीतीनें मीठभाकर खावी यांत तुमचें सर्वांचें कल्याण आहे. परंतु गरीबींतहि थोडक्यांच्याच दैवीं असें आपलें कल्याण करून घेण्याचें असतें.

२१. गरीबींत असून सर्व घरचीं माणसें हंसून खेळून नुसती अळणभाकर एकत्र मिळून खाऊन असलीं, तरीं तें सारें कुटुंब मोठ्या भाग्याचें समजलें पाहिजे. आणि मोठ्या वाड्यांत राहून नित्य कलागती करून पोळ्या पक्वान्ना बरोबर दांत ओंठ खाऊं लागलीं तर तें कुटुंब करंटें असें समजलें पाहिजे. म्हणोन मुलांनों, अशा गरीबीच्या अळणभाकरींत जी गोडी आहे, ती तशा श्रीमंतांच्या पोळ्या व पक्वान्नांत नाहीं, हें तुह्मीं आपल्या मनांत पक्केपणीं समजून ठेवा. आणि तशा प्रीतीनें वागा म्हणजे गरीबींतहि सुख आहे असें तुमच्या अनुभवास येईल.

२२. घरांत संसाराच्या उपयोगी असे पदार्थ व सामान सरंजाम थोडाच ठेवावा, परंतु नीटनेटका आणि साफ जिकडच्या तिकडेस ठेवावा. घरांत उगीच सामान भर भर भरावें, आणि त्यां वर धुळमाती व मळी चढली असावी, त्या पेक्षां उपयोगा पुरत्या थोड्याच जिनसा असाव्या, आणि त्या नीटनेटक्या व साफ असाव्या हें अधिक बरें.

बहुतकरून सर्व लोकांस मोठालीं घरें व वाडे बांधण्याचा फार हौस असते. मग ते वाडे तयार झाल्या वर पुढें त्यांचे बहुतेक भाग रिकामे व निरुपयोगी पडले असतात, व घरच्या यजमानास वर्षांतून एकदां देखील ते पाहण्याची गरज पडत नाहीं. तर मुलांनों, मीं तुम्हांस सांगतो कीं, तुम्हीं आपलें घर लहान परंतु सोईवार बांधा आणि असें सोईदार आयतें मिळालें तर बांधण्याच्या भरीस अगदी पडूं नका. आपलें घर व त्याच्या आसपासची परसांतली जागा निर्मळ व साफ ठेवा. शिवाय तो तुमच्या घरा लगत शेतमळ्याची जमीन मिळवून ठेवा. यांत तुमच्या प्रपंचाची फार सोई होणार आहे.

२३. ज्या जिन्नसांचा तुह्मांस तूर्त उपयोग होणार नाहीं व ज्यापासून नुसती शोभा मात्र मिळणार आहे, अशा जिन्नसा खरेदी करून पैका दवडूं नका. सारांश निरुपयोगी पदार्थ अगदीं खरेदी करूं नका. निरुपयोगी पदार्थ खरेदी करणें आणि गांठचा पैका दवडणें हें सारखें नाहीं. ( आहे ? )

२४. सारांश मुलांनों, तुह्मीं आपल्या घरचा प्रपंच थोडक्यांत असा नीटनेटका चालवा कीं, तुमच्या शेजाऱ्यास व इष्टमित्रास नवल वाटून ते तुमचा कित्ता घेतील.

★

## प्रकरण ५ वें

# सरकारदरबारांत कसें वागावें

१. सरकारदरबारांत तुमची असामी असली तर मुलांनों, तुह्मांस फार जपून व भिऊन चाललें पाहिजे, कारण तें द्वेषाचें व मत्सराचें घर आहे.

२. ज्या वरिष्ठांच्या हातां खालीं तुह्मांस वागणें घडेल, ते तुमची कदर जाणणारे, आणि तुमच्या विचारांशीं ज्यांचा विचार मिळतो असे क्वचितच, तुमचें दैव चांगलें असेल तर तुह्मांस मिळतील; परंतु असें थोडक्याच लोकांच्या दैवीं असतें आणि जरीं हा योग तुह्मांस प्राप्त झाला तरीं तो सतत चालणारा नाहीं हेंहि तुह्मीं आपल्या लक्ष्यांत वागवित असावें.

३. परंतु जरीं तुमच्या चांगल्या दैवानें असा योग तुह्मांस प्राप्त झाला, तरी तुह्मीं आपल्या वरिष्ठांशीं नम्रपणानेंच वागावें, आपली अक्कल व हुषारी त्यांस पुढें पुढें होऊन दाखवूं नये. जेव्हां एकादी गोष्ट ते तुह्मांस विचारतील तेव्हांच तुह्मीं आपला विचार व सल्ला त्यांस द्यावा. नाहीं तर निमूटपणें ते सांगतील तसेंच करावें.

४. कदाचित् त्यांची एकादे गोष्टींत नजर घसरली असें तुह्मांस स्पष्ट दिसून येईल, तेव्हां तरीं नम्रपणानेंच ती नजरचुकी त्यांस सुचवावी; परंतु सुचवावी जरूर. नाहीं तर त्यांत तुमच्या गाफिलीला ते तुमचा दुष्टपणा समजतील. आणि तुमच्या वरून त्यांचा विश्वास उडेल.

५. तुमच्या वरिष्ठ अंमलदाराच्या प्रकृतीचें व स्वभावाचें धोरण नेहमीं लक्ष्यांत ठेवून त्यांशीं वागावें तरच तुमचा त्यांच्या हाता खालीं निभाव लागेल. नाहीं तर ते उगीच तुमच्या कामास कांहीं तरीं दोष लावून तुह्मांस चैन पडूं देणार नाहींत.

६. कित्येक वरिष्ठ अंमलदार आपल्या दुर्दैवानें फारच वाईट व दुष्ट स्वभावाचे असतात. अशांच्या हाता खालीं काम करणें म्हणजे मोठा त्रासच भोगणें आहे. तेव्हां एक तर त्यांच्या सारखें आपण दुष्ट व्हावें आणि अन्याय करावे. किंवा त्यांच्या वरिष्ठां कडे आपली दाद लागत नसली तर आपल्या कामाचा राजीनामा देऊन त्यांच्या त्रासांतून सुटावें.

७. माझ्या दुर्दैवानें मागून उत्तरोत्तर मला हे असेच दुष्ट स्वभावाचे व वाईट मनाचे असे वरिष्ठ अंमलदार मिळून त्यांच्या हाता खालीं कामें करावीं लागलीं. ते

स्वतः कांहीं बराबर समजत नसत, आणि समजून घेण्यांतही त्यांस लागलाच त्रास उत्पन्न होऊन आपल्या हाता खालच्या कामगारां वर रागें भरावें, आणि त्यांस उगीच त्रास देत असावा. अशा स्वभावाच्या इंग्लिश अंमलदाराच्या हाता खालीं कामें करायाचीं नशीबीं आलीं. त्याच्या पूर्वीं मला उमद्या मनाचे व सुस्वभावाचे वरिष्ठ अंमलदार मिळाल्या मुळें मला हा नवाच त्रास सोसेनासा झाल्या वर मीं लौकरच थोड्या पेनशना वर सरकारचाकरी सोडून त्या त्रासांतून सुटलों. असें करण्यानें मीं चांगला दूरवर विचार केला नाहीं असें पुढल्या विपत्तीनें मला शिकविलें खरें, परंतु होणाऱ्या गोष्टी पुढें उपाय चालत नाहींत. जें होणार तेंच होतें; बुद्धि, ज्ञान, विचार हीं सर्व व्यर्थ होतात. हेंहि मीं आपल्या व इतर हजारों मनुष्यांच्या अनुभवा वरून जाणून त्या विपत्तींत हायहाय करित बसलों नाहीं. आपल्या पुढल्या काळाचा सद्व्यय केल्यानें तेंच मनाला समाधान मिळविलें.

८. मुलांनों, आतां इंग्रज सरकारांत चाकरी करणें दिवसानुदिवस फारच कठीण काम होत चाललें आहे. काम करणारा एक आणि त्याचें काम पाहणारे व मध्यें उगीच ढवळाढवळ करणारे त्याच्या वर दहा. अशी हरएक कामांत जबाबदारी वाढत चालली आहे. त्यांत आणखी लोकांत दारिद्र्य फार वाढत चालल्या मुळें जो तो पाहत असतो कीं, एकादी जागा रिकामी होते केव्हां अशी जेथें तेथें हलक्या कारकुनापासून व रैटरापासून तर मोठ्या नेटिव कामदारा पर्यंत कोणास काम करण्यांत हौंस व उमेद नसल्ये, सर्व बहुतकरून रात्रंदिवस चिंतेंत असतात; त्यांत अलिकडेस तीस वर्षांपासून उदार व उमद्या मनाचे वरिष्ठ इंग्लिश अंमलदार जाऊन त्यांच्या जागीं बहुत करून हलक्या स्वभावाचे व क्षुल्लक बुद्धीचे असे अंमलदार येत चालले आहेत. व त्यांच्या हाता खालीं काम करणारे नेटिवहि आपल्या हाता खालच्या लोकांपासून काम घेण्याच्या शैलींत त्यांचाच कित्ता घेत चालले आहेत. ह्यांत आणखी एक नवल असें पाहतों कीं, असे जरीं इंग्लिश अंमलदार आहेत, तरीं नेटिव लोकांशीं ताडून पाहतां ते बरे, परंतु हे त्यांच्याहि पेक्षां दुष्ट, असे आमचे नेटिवच असें आणखी म्हणतात, व तें खरें आहे असें माझ्या अनुभवा वरून मलाहि स्पष्ट दिसतें. अशा मिसळींत सरकारचाकरींत सुख कसें असावें ?

९. पूर्वी आमच्या व वडिलांच्या काळांत सरकारचाकरी फार सुखाची व चैनीची होती असें आतांचे म्हातारे आपल्या मुलांचे नातवांचे श्रम पाहून म्हणत

असतात, व जुन्या काळाच्या इंग्लिश अंमलदारांचा थोरपणा वर्णित असतात. दिवसानुदिवस सरकारचें हरएक कामांत बारीक पाहणें फार वाढत चाललें. या मुळें उगीच देखरेखीचें काम वाढून त्यापासून खर्च व लोकांस त्रास वाढत चालला आहे. लाभा पेक्षां हानी फार चालली आहे हें सरकारच्या लक्ष्यांत येत नाहीं. एका गरीब पंतोजीच्या शाळेची देखरेख पाहणारे दहा वरिष्ठ अंमलदार! अलिकडील काम करण्याची शैली पाहण्यास एवढेंच लहानसें उदाहरण पुरे.

१०. म्हणोन मुलांनों, आतां तुह्मीं सरकारचाकरी कडेस आपल्या आशेचे डोळे लावूं नका. स्वतंत्र उद्योगानें जी तुह्मांस भाजीभाकर मिळेल ती बरी व अधिक सुखाची असें समजून एकादे शाळेंत हाल्लीं जो विद्याभ्यास चालवितां त्याच्या भरतीस एकादी कारागिरी अथवा एकादा हुन्नर व कलाकौशल्य शिका म्हणजे शेवटीं उपयोगी पडेल.

★

## प्रकरण ६ वें

# आपला धंदा कोणता व कसा करावा

१. मुलांनों, ही आपल्या लोकांत मोठीच गैरसमजूत चालली आहे कीं, ते जसे मनुष्यांच्या नीच जाती मानितात, तशा धंद्याच्याही उंच नीच जाती मानितात. आणि असें मानण्यानेंच त्यांच्या बुद्धीस विपर्यास होऊन त्या धंद्याच्या जाती वरून व तो तो धंदा करणाऱ्या मनुष्यांच्या उंच नीच जाती मानल्यानें पूर्वीपासून जातीचा परस्पर द्वेष वाढत चालला आहे. आणि याच कारणानें कलाकौशल्य, कारागिरी व स्वतंत्र उद्योग यांस उत्तेजन न मिळतां त्यांचा ऱ्हास होत चालला आहे. मुलांनों, तुह्मीं आपल्या मनांत विचार करा कीं, एकानें कागदा वर सुंदर अक्षर लिहिलें आहे व दुसऱ्यानें कागदा वर कौशल्यानें सुंदर वेलबुट्टी काढिली आणि तिसऱ्यानें नकाशा काढिला व सुंदर तसबीर काढिली, तर तो अक्षर लिहिणारा कारकून परभु म्हणोन उंच धंद्याचा व जातीचा कसा, आणि चितारी व तसबीर काढणारे नीच धंद्याचे व जातीचे कसे समजावे ?

२. माझ्या बुद्धीस तर वाटतें कीं, सुतार, लोहार, सोनार, कासार, शिंपी, कोष्टी, चाम्हार, इत्यादि संसारांत अत्यंत उपयोगी अशा वस्तूंचे कारागीर नुसते सुवाच्य अक्षरें लिहिणाऱ्या कारकुना पेक्षां व रिकाम्या भिक्षुका पेक्षां मानास अधिक पात्र असावे; कारण त्यांचे उपयोगी धंदे मनुष्यमात्रास मोठे उपयोगी व सुखावह आहेत व ज्यां वाचून त्यांचें या प्रपंचांत एक क्षणभरही चालावयाचें नाहीं.

३. आतां एवढें निःसंशय खरें कीं, कागदा वर अक्षरें लिहिणारा समयास मोठमोठ्या व उपयोगी विषयां वर ग्रंथ लिहिणाराहि असतो, व हें असें महत्त्वाचें काम लिहिण्यानेंच होतें, म्हणोन अशा लिहिणाराची खरीच मोठी मान्यता असत्ये, व असली पाहिजे. परंतु त्यांतहि असे ग्रंथ लिहून कविता करून एकादें वर्णन करणारा आणि तेंच वर्णन चित्रानें हुबेहुब दाखविणारा या दोघांच्या कौशल्यांत फारसें अंतर आहे असें मला वाटत नाहीं, यास्तव ते दोघेही मानमान्यतेचे समजले पाहिजेत. त्यांत आणखी कागदा वर नुसता नक्कल करणारा लेखक, आणि त्याच कागदा वर लिहिणारा ग्रंथकार व कवि यांच्या बुद्धी वरून त्यांची योग्यता वास्तविक पाहतां खरीच निराळी असावी हें योग्य आहे.

४. माझ्या बुद्धींत तर असें वागतें कीं, उगीच सभेंत वादविवाद करून प्रतिष्ठे करितां तर्कशास्त्र पढणें, त्या पेक्षां बुद्धिकौशल्यानें व हस्तकौशल्यानें एकादें उपयोगी यंत्र किंवा वस्तु तयार करणें हें अधिक उपयोगाचें व प्रतिष्ठेचें काम आहे.

५. या देशांत उपयोगी कारागिरी, स्वतंत्र धंदा व दुकानदारी, गायन, वाद्य इ. मनोरंजक कला, यांस मान नसल्या मुळें हीं सर्व कामें लोक हलकीं समजतात व फक्त लिहिणें, कारकुनी करून कचेरींत रोजगार करणें, हीं मोठ्या प्रतिष्ठेचीं कामें समजतात. या मुळें देशाची फार हानि होत आहे.

६. म्हणोन मुलांनों, तुह्मीं सर्व स्वतंत्रपणाचे धंदे व कारागिरी करण्यांत लज्जा न मानितां उलटी प्रतिष्ठा मानून स्वतंत्र धंदे करूं लागा. आपल्या हातानें फावल्यास रुप्यासोन्याचे दागिने घडणें, अंगरखा शिवणें, व समयास जोडाही शिवणें यांत कोणतीच लज्जेची गोष्ट मला विचारांतीं दिसत नाहीं. उलटी अशीं फाजील कामें करणाऱ्या कारकुनाची तारीफ करित जा. माझ्या ऐकण्यांत होतें कीं, पुण्यास भार शास्त्री साठे मागें पाठशाळेचे मुख्य गुरु असतां ते घरीं रिकामे वेळेस आपल्या बायकोचे दागिने स्वतः हातानें घडित असत. म्हणोन पुष्कळ प्रतिष्ठित लोक त्यांची निंदा करीत, परंतु मीं तर त्यांची येथें मोठीच तारीफ करतों.

७. सर्व मनुष्यांची सर्व विषयांत सारखी बुद्धि नसते हें तर तुमच्याच अनुभवा वरून तुह्मांस स्पष्ट समजाया जोगें आहे. कोणाचा कल कोणत्या गोष्टी कडेस व कोणाचा भर कोणत्या गोष्टी कडेस असतो. कोणाचा लिहिण्यापढण्यांत, व कोणाचा हस्तकौशल्यांत, व कोणाचा गाणें व वाद्यें वाजविणें यांत, व कोणाचा व्यापारधंद्यांत, असे प्रति मनुष्याच्या बुद्धीचे कल निरनिराळे असतात. ते लहानपणीं मुलांत समजून येतात. मग तसे कल पाहून आपल्या मुलांस ती ती विद्या व तो तो धंदा शिकविला असतां त्यांतच मोठा फायदा आहे.

८. आमचे लोक हाल्लीं असें न करतां जो उठला तो पुढें रोजगार मिळावा या उद्देशानें इंग्लिश भाषा शिकण्या करतां आपल्या मुलांस इंग्लिश स्कूलांत व सामर्थ्य असल्यास कालेजांत पाठवितात. परंतु असा विचार करित नाहींत कीं, इतक्या इंग्लिश शिकलेल्या लोकांस रोजगार तरीं कसा मिळावा. पण अर्थात् हा असा रोजगार पाहणाऱ्या उमेदवारांची संख्या अनोनात वाढत चालली आहे, तसेंच इंग्लिशांची प्रजाही वाढत चालली आहे. आणि रोजगाराच्या जागा आहेत तितक्याच. मग सहजच इतका श्रम करून अन्य भाषा व विद्या शिकून त्यांना

रोजगार आमच्या लोकांत मातीच्या मोलाचा होत चालला आहे. एका गांवांत जर दोनच न्हाव्यांचा धंदा चालतो तर त्या गांवांत पन्नास न्हावी येऊन पडले तर बाकीच्यांस उपाशींच राहावें लागेल अथवा तो गांव त्यांस सोडावा लागेल, तोच न्याय एथें समजला पाहिजे.

९. आपल्यास सामर्थ्य असल्यास मुलां कडून बुद्धिमान असल्यास पुष्कळ विद्यांचा अभ्यास करविणें यांत कांहीं दोष आहे असें तर माझें म्हणणें मुळींच नाहीं. परंतु ज्या विद्येपासून पुढें त्यांचा चरितार्थ चालावयास कठीण पडेल ती विद्या शिकविण्यांत त्यांच्या काळाचा व श्रमाचा व्यर्थ व्यय होऊं देऊं नये. जेणें-करून ते आपला चरितार्थ सुखानें चालवितील, आणि चार पैसे गांठीं करतील ह्याचें ज्ञान त्यांस अगोदर करवून द्यावें व त्यांनींहि शाळेंत शिकत असतां हेंच धोरण मुख्यत्वें लक्षांत ठेवावें, असें न केलें तर लौकरच त्यांस मोठ्या कष्टानें दिवस काढावे लागतील.

१०. आतां जो एकादा आपला चरितार्थ चालविण्या करतां धंदा पत्करिला असेल तर तो मोठ्या सचवटीनें, श्रमानें, हुशारीनें व लक्ष्यपूर्वक चालविला पाहिजे. अशा गुणांनीं आपले गुणाचे परीक्षक व गिऱ्हाईक यांचीं मनें प्रसन्न ठेविलीं पाहिजेत म्हणजे त्यांचा धंदा व लौकिक वाढून पैसा वाढतो; म्हणोन मुलांनों, कोणताहि धंदा करित असतां हा माझा उपदेश तुह्मीं पक्का ध्यानांत ठेवा.

११. तुह्मींच पाहा हे आपले या देशांतले लोक बहुत दिवसांपासून इंग्लिशांचें राज्य झाल्या नंतर हाका मारूं लागले आहेत कीं, आपल्या देशांतून बरकत जात चालली, धंदे, रोजगार, नाहींसे होत चालले आहेत आणि दरिद्र फारच वाढत चाललें आहे. ही त्यांची गोष्ट सर्वांशीं खरी आहे. या देशांत परराज्य होऊन सर्व हुद्याचीं कामें, धंदे, रोजगार इंग्लिशांनीं आपल्या उद्योगाच्या व अकलेच्या जोरानें आटोपल्या वर हीच दशा व्हावयाची. त्यांत जर एथल्या लोकांनीं त्याच इंग्लिशांचीं उदाहरणें न घेतलीं, आणि हे लोक आपले गुडघे टेंकून कपाळा वर हात ठेवून बसले, तर यापेक्षांही पुढें कठिण दिवस लौकर येतील. एथील लोकांचे डोळेच उघडत नाहींत. ज्या ज्या अज्ञानानें व दोषानें यांत विपत्ति येत चालली आहे व येणार आहे, त्या आपल्या अज्ञानास व दोषास सोडितच नाहींत. उलटें त्यांस दिवसानुदिवस पाहतों तों अधिकाधिक वेटाळत चालले आहेत. त्यांची विपत्तिही

त्यांस सावध करित नाहीं. अशा लोकांचा नाश झाल्या शिवाय राहणार नाहीं हें खचीत समजा.

१२. ज्या दिवसांत हे या देशांतले लोक असे कपाळा वर हात लावून अशी विपत्ति व दरिद्र भोगित आहेत, तेच दिवस परदेशी लोक पहा कसे सुखानें काढित आहेत. पैसा व धंदा, रोजगार मिळविण्यांत त्यांचा धर्म त्यांस आडवा येत नाहीं, त्यांचा आळस त्यांस आडवा येत नाहीं, आणि आमच्या लोकांस सर्वच गोष्टी प्रतिकूल. यांचा धर्म तर मोठीच लांब हातीं काठी घेऊन यांच्या कल्याणाच्या सर्व उद्योगास आडकाठी करायास उभाच आहे. अज्ञान, आळस, दरिद्र, परस्परांचा द्वेष हीं तर त्यांची पायमल्ली करितच आहेत. रोग लागले असतां शहाणे औषधें घेतात, आणि हे लोक त्या औषधाच्या ऐवजीं ते रोग वाढविणारीं जी कुपथ्यें तीं मोठ्या आनंदानें चालवितात, आणि काळभैरवाच्या मुखांत आपण स्वतः जाऊन पडतात. मग तो आपल्या विक्राळ दाढांनीं कसा यांस चुरडणार नाहीं.

१३. तुह्मीच पाहा, रोजगार नाहीं म्हणोन एथें आमचे लोक हाका मारितात, आणि त्याच मुंबईत आज सुमारें सात आठ वर्षापासून कोठले, कोठचे दूर देशींचे राहणारे, ज्यांच्या देशाचें नांव देखील या लोकांस माहीत नाहीं अशा अमेरिकेंतील बासन शहरांत थोडे पैकेवाले जमून त्यांनीं सर्कतीनें पैका काढून या मुंबई शहरांत ट्राम म्हणोन लोखंडी कांबी वरून फिरणाऱ्या भाड्याच्या गाड्या फिरविण्याचा धंदा काढिला आहे. आणि त्या मुळें एथील भाडोत्री गाड्या फारच कमी होऊन नित्य शेंकडों रुपये ते अमेरिकेंत हाल्लीं आपल्या डोळ्यां वर झांपट आणून मिळवितात. मला तर त्या ट्रामच्या गाड्या पाहिल्या म्हणजे असें मनांत आणल्या वांचून कदापि राहवत नाहीं कीं, या लोकां कडून रुप्या तांब्याचा खुर्दा गोळा करण्या करितां आपल्या देशांत धूर्त अमेरिकन लोकांनीं जणों हें मोठें पावडेंच हातांत घेतलें आहे काय ? इंग्लिश सरकारही आपल्या शहरांतून हे परदेशस्थ लोक द्रव्य नेऊन आपल्या प्रजेस दरिद्री करित आहेत तें त्यांस करूं न देतां हा अशा प्रकारचा धंदा आपल्याच प्रजेच्या लोकांस उत्तेजन देऊन व त्यांच्या हातून करवावा हें आपलें राजधर्म दृष्टीनें कर्तव्यकर्म आहे असें कदापि मनांत आणित नाहीं. मुंबईच्या लोकांनीं तरीं, जसें कलकत्ता, मद्रास, एथील लोकांनीं या ट्राम गाड्यांतून न फिरण्याचा निश्चय केला तसा यांणीहि करायाचा होता. तसें न करितां हे लोक आपल्या हातून आपल्या देशास दरिद्र आणित आहेत. असा अनर्थ मीं आतां पाहत आहें.

★

## प्रकरण ७ वें

# खरे सोयरे व इष्टमित्र कोणते

१. या संसारांत सोयरेधायरे व इष्टमित्र म्हणविणारे थोडे नसतात; त्यांत संपत्तीची विपुलता व धंद्यारोजगाराचा भरभराट असला तर मग अशा लोकांची कांहींच वाण नसते, नाहीं ते दुरून सोयरे होतात, आणि नाहीं तेथून इष्टमित्र जमतात; आणि मोठ्या आर्जवानें तात्कालिक सुख देणारे होतात. कोणी निरंतर जवळ राहून, कोणी गोडगोड बोलून, व कोणी आशेनें फुकट कामें करून घेतात.

२. परंतु आपल्या संपत्तीला ओहट लागला, आणि धंद्यारोजगाराचा भरभराट कमी होत चालला म्हणजे तेच लोक हळुहळू आपलीं पावलें कसकशीं मागें सारूं लागतात, हेंही सर्वांच्या समजण्यांत येऊं लागतें. त्यांत जे सुस्वभावाचे व कुलीन असतात ते स्वभावाच्या व कुलीनपणाच्या मापानें थोडेबहुत दिवस टिकून राहतात; कार्यसाधु, व अधम असतात तेही आपआपल्या नीचतेच्या मानानें आपल्यापासून सटकून जाण्याची घाई करण्यांत थोडा बहुत विचार करितात, परंतु निदानीं उपयोगी पडायास आई, बाप, बायको, मुलें, बहीण, भाऊ यांतूनच कोणीं राहिलीं तर राहतील.

३. परंतु आपणांस दरिद्र आलें, आपली नादारी झाली किंवा दुखण्यानें शरीर क्षीण झालें तर त्यांतून बहुधा एकहि सोयरा किंवा मित्र आपल्या पाशीं उभा राहत नाहीं. अशा समयीं जो टिकून राहील तोच खरा सोयरा व तोच खरा मित्र जाणला पाहिजे. परंतु अशा समयीं असे खरे सोयरे खरे मित्र संसारांत फारच विरळा. निदानीं उपयोगी पडायास आई, बाप, बायको, मुलें, बहीण, भाऊ, यां पैकींच कोणी टिकलें तर टिकेल.

४. तळें किंवा विहीर भरलेली असली तर त्याज जवळ माणसाच्या झुंडी वर झुंडी येतात; तीच कोरडी पडली म्हणजे पांखरूं सुद्धां जात नाहीं. तसाच हा संसाराचा न्याय आहे. म्हणोन मुलांनों, आपल्या भरभराटांत लोकांच्या आर्जवास भुलून गाफील राहूं नका.

५. या संसारांत सर्व लोक पैक्याचे आहेत, तुमचे खरे मित्र म्हणोन कोणीं नाहींत; जों पर्यंत त्यांस द्याल, त्यांचीं कामेंकाजें कराल तों पर्यंत मात्र ते तुमचे

असें समजा. देण्यांत कमी झालें किंवा त्यांचीं कामेंकाजें तुमच्यापासून होण्याची तुमच्यांत शक्ति राहिली नाहीं म्हणजे ते तुमचे नाहींत हें तुह्मीं आपल्या मनांत पक्कें जाणून असा. त्यांच्या तात्कालिक आर्जवा वर अथवा मधुर भाषणा वर अथवा हंसण्या वर अगदीं जाऊं नका. दरिद्रांत व अशक्तपणांत ते तुमचे कोणी नाहींत हेंच तुमच्या अनुभवास येईल.

६. संसारांत आपलें कार्य साधून घेण्या पुरते सारे लोक आर्जवी व ठक असतात. तेंच कार्य साधून घेतलें म्हणजे तूं कोण आणि मीं कोण असें तेच आपल्या पुढल्या वागणुकीनें आपल्यास स्पष्ट दाखवितात. अशा अधम लोकांत कितीएक तर इतके अधम असतात कीं तुमच्यापासून आपलें कार्य साधून घेण्यांत पाहिजे तसें आर्जव करतील. तुह्मांस खोटी आशा दाखवितील, परंतु तुमचें जर कां त्यांज पाशीं यत्किंचित् काम असलें तर ते कांहीं तरीं बहाणा सांगतील परंतु मनापासून तुमच्या साठीं हातपाय हालविणार नाहींत किंवा ओंठ हालविणार नाहींत, असें हें जग आहे. मला तर मुलांनों, या माझ्या साऱ्या जन्मांत ज्याला मीं आपला खरा मित्र म्हणावें असा, एक दोन गरीब स्थितीच्या पुरुषां खेरीज, कोणीच आढळला नाहीं.

७. मुलींनों, बायकाही अशाच पुरुषा सारख्या किंबहुना पुरुषा पेक्षांहि अधिक गरजकाढू स्वभावाच्या असतात असें समजून त्यां विषयीं आपल्या व्यवहारांत सावध असा. आज ज्या तुमचे डागिणेडुगिणे, वस्त्रें व तुमच्या वैभवा वरून बाई बाई म्हणोन गोड बोलून आर्जव करितात व तुमच्या शब्दास झेलल्या प्रमाणें दाखवितात त्याच पुढें तुमच्या गरीबींत तुमच्या कडेस पाहणार सुद्धां नाहींत, मग तुमच्या उपयोगास कोठून पडणार?

८. या माझ्या वरल्या उपदेशा वरून मुलांनों व मुलींनों, तुह्मीं आपल्या मनांत असा माझा हेतु कदापि समजूं नये कीं, या जगांत खरे सोयरे व खरे मित्र असे फारच विरळा आहेत. संकटसमयीं उपयोगी पडणारे असे पुरुष किंवा स्त्रिया फारच थोड्या किंवा माझ्या स्वतःच्या अनुभवा वरून तर मला आज कोणीच आढळला नाहीं. म्हणोन तुह्मींही कोणाच्या उपयोगी पडूं नका असा माझा उपदेश अगदीं समजूं नका. मात्र हें जग ओळखून ठेवा आणि तुमचा जो खरेपणा, सभ्यपणा, व उपकारबुद्धि ही सोडूं नका. मात्र मनांत असें कदापि आणूं नका कीं

मीं हा आपला धर्म चालवितों तेव्हां लोकहि माझ्याशीं असाच आपला धर्म चालवितील. या अशा कल्पनेचा लेशहि मनांत आणूं नका. आपलें कर्तव्य आपल्यास केलें पाहिजे एवढेंच मनांत आणून तें करित असा. त्यांत गरिबा वर उपकार केला तर त्यांतून कोणी आपल्या मनाच्या लज्जेनें तरीं तुह्मांस स्मरतील, परंतु श्रीमंत व अधिकारी यांज वर उपकार केला असतां त्यास आपल्या गर्वानें तुमचें स्मरणहि होणार नाहीं. हा आणखी मीं आपल्या स्वतःच्या अनुभवानें तुह्मांस भेद दाखविला आहे तोहि मुलांनों तुह्मीं आपल्या लक्षांत वागवा.

९. माझा लहानपणापासून परोपकार करण्याचा स्वभाव होता. आपल्या कडून कोणाचें कांहीं बरें होत असलें तर तें मीं बहुतकरून केल्या वांचून राहिलों नाहीं. मीं स्वतः शिकत असतां दुसऱ्यास मोठ्या आवडीनें जें मला समजत असे तें मीं त्यांस शिकविलें आहे. माझ्या शक्ती प्रमाणें अडलेल्याला पैकाही देऊन त्यांचीं कामें चालविलीं आहेत. माझें पूर्ववय बहुतकरून पढविण्यांत गेलें म्हणोन या देशांत माझे विद्यार्थीहि पुष्कळ झाले. मध्यें सरकारांत हुद्याचीं कामें करित असतां हाता खालच्या व सर्व लोकांस खुशच ठेवित गेलों. गुन्हेगारास नीति सांगितल्या शिवाय बहुतकरून कधीं दंड केला नाहीं. असें सर्व असतां माझ्या उपयोगी पडायास भला कोणी एक दिसत नाहीं. माझे सवंगडी व विद्यार्थी पैकेवाले झाले आहेत ते आतां मला पुसत देखील नाहींत. अशी ही जगाची कृतघ्नता मीं अनुभवली, व आतां उगीच पडून राहिलों आहें हेंहि तुह्मीं पाहत आहां, हा माझा स्वतःचा अनुभव मीं सांगितला.

१०. या वरच्या सर्व माझ्या लिहिण्या वरून मुलांनों, तुह्मीं हाच उपदेश घ्यावा कीं, जे कोणी आपल्यास संकटीं उपयोगी पडतील व जे आपणा वर निर्हेतुक ममता करतील तेच आपले भाऊबंद, सोयरे व तेच आपले खरे मित्र जाणावे यां शिवाय इतर सर्व स्वार्थी व मतलबी आहेत.

★

## रा. ब. दादोबा पांडुरंग

### प्रकरण ८ वें

# तारुण्यांत आपणांस कसें सांभाळावें

१. बाळपणांत आपणास संभाळायास आईबाप व इतर आपलें कल्याण इच्छिणारे वडील असतातच. त्या वयांत बहुधा आपल्यास आपलें हित समजण्याची शक्ति व बुद्धि नसत्ये. म्हणोन मुलांनीं निमूटपणें आपल्या आईबापांच्या आज्ञेंत राहावें, व त्यांच्या इतर वडिलांच्या सांगण्या प्रमाणें वागावें. यांतच या मुलांचें कल्याण व ह्यांचा सांभाळ आहे.

२. पंधरा वर्षां पुढें मनुष्यास थोडथोडें आपलें हितानहित समजूं लागतें व त्या वयापासून तारुण्यदशेस नुकता आरंभ होतो व आपला सांभाळ आपण करणें भाग पडतें.

३. आतां मीं तुह्मांस तारुण्यांत आपणास कसें सांभाळावें म्हणोन सांगणार तें विशेषेंकरून या पंधरा वर्षांपासून तर चाळीस वर्षांच्या वया पर्यंत. व चाळीस वर्षें उलटल्या वरहि बऱ्याच लोकांच्या उमेदीचा भर त्यांस पुढें दहा पंधरा वर्षें लोटत नेतो, आणि त्यांच्या मनांस आंतून अशी समजूत देत असतो कीं, अद्यापि मीं तरुणच आहें. माझे केस पिकत चालले आहेत व दांत गळूं लागले आहेत तरीं माझ्या शक्तींत फारसा कांहीं कमीपणा नाहीं. म्हणोन चाळीसांपासून पन्नास पंचावन वर्षांच्या वयाच्या पुरुषांसहि हा माझा उपदेश थोडाबहुत लागू आहे असें तुम्हीं समजावें.

४. पंधरा वर्षांपासून पुढें पंचवीसां पर्यंत नवी कडकडीत चढती ज्वानी असत्ये, तींत एकी कडून विद्याभ्यासानें ज्ञान संपादन करण्याचें कार्य, व उदरनिर्वाहार्थ धंदारोजगार मिळविण्याचें कार्य, व दुसरे कडून ख्यालीखुशाली व विषय भोगण्याची बलवत्तर वासना या दोहोंचा ओघ समान अंतरानें सारखा वाहत चालत असतो. त्यांत जे विचारी असतात ते पहिल्या ओघांतून पार पडण्यास लागतात, अशांचा समुदाय फार थोडा असतो. व जे अविचारी असतात ते विषयवासनेच्याच नेटानें वाहिले जातात. अशांचा समुदाय फार मोठा असतो. म्हणोन पहिल्या समुदायाचा लौकिक वाढून पुढें बढती होत्ये; आणि दुसऱ्या समुदायाची उतरती कमान असत्ये, आणि कित्तीएक व्यसनांत पडून आपल्या पुढल्या संसाराचा अगदीं नाश करून मोठ्या दुःखांत व दारिद्र्यांत त्यांस आपले दिवस काढावे लागतात.

५. म्हणोन मुलांनों, तुमच्या साऱ्या वयांत या पंधरा वर्षांपासून पंचवीस वर्षां पर्यंत फारच सावध असलें पाहिजे. दुसरा जो वर समान अंतरानें वाहता ओहळ सांगितला त्यापासून दुरच असलें पाहिजे. जरीं तुमच्या वडिलांनीं संपत्ति मिळवून तुह्मां करतां ठेविली असेल तरीं दुसऱ्या ओहळांत शिरलेत तर ती लौकरच फना होऊन अखेरीस तुह्मांस दुःखांतच दिवस काढावे लागतील. हें पक्कें आपल्या मनांत बाळगून ठेवा.

६. पंचवीस वर्षांपासून पुढें तुह्मीं धंद्यारोजगारास लागल्या वर शरीरांत जोम आहे तों पर्यंत सर्व आपल्या तारुण्यांत आपल्या प्राप्तींतून कांहीं तरीं म्हातारपणा करतां संचय करून ठेवित असा. त्यांत पहिल्या चाळीस वर्षां पर्यंत जितका तुमच्यानें काट-कसर करून संचय करवेल तितका करा. कां कीं पुढें तुमच्या संसाराचा पसारा वाढणार आहे, मुलेंबाळें व पुढें नातवंडां पर्यंत संभाळ करण्याचें ओझें कांहीं दिवस तुह्मां वरच पडायाचें आहे. म्हणोन या वयांत जो संग्रहकुशल तोच हितकारी. वाढ झाली तर खास त्या कुणग्यावरच व्हायची. कारण, अद्यापि मिळविण्याचे दिवस पुढें पुष्कळ आहेत. आज संचय करूं, उद्यां करूं, अशीच पुढली मोठी हांव या वयांतच असत्ये. मग तें वय तर दोनप्रहरच्या उन्हा प्रमाणें तेव्हांच टळून जातें, आणि तिसऱ्या प्रहरास आरंभ होतो. मग ते नाउमेदीचेच दिवस समजले पाहिजेत. त्यांत श्रमाचे उद्योग होऊन म्हातारपणा करतां सामग्री होणें कठीण.

७. अशी सामग्री संग्रहीं नसली म्हणजे मोठीच विपत्ति. एक तर शरीरांत शक्ति नाहींशी होत जात्ये, दुसरें आपल्या बाळपणींचे व तरुणपणींचे मित्र व ओळखीचे लोक हे एका मागून एक नाहींसे होत जातात, त्या मुळें संकटीं आपली कोणी कींव जाणेल अशीं आपल्या सुखदुःखाच्या गोष्टी सांगण्यासही स्थळें नसतात. आपल्या मागून जी नवी तरणी प्रजा उत्पन्न होत्ये ती आपल्या विषयीं फारच उदासीन असत्ये, इतकेंच नाहीं परंतु उलटा उपहास करणारी अशी असत्ये. अशां जवळ म्हातारपणीं जाणेंही मोठें लाजीरवाणें होतें, अशा सर्वत्र नडी येऊन म्हातारपणाची संध्याकाळ फारच विपत्तीची व दुःखाची जात नाहीं असे भाग्याचे लोक फारच थोडे. लाखांतून एकादा असला तर असेल.

८. ही मुलांनों, म्यां तुह्मांस प्रपंचा विषयीं गोष्ट सांगितली. आतां या पेक्षांही मोठ्या अगत्याची पारमार्थिका विषयीं तुह्मीं आपल्या वयांत कसें सावध असावें या विषयीं थोडा एथें उपदेश करतों त्या कडेस तुह्मीं आपलें अधिक लक्ष्य द्यावें.

९. परमार्था विषयीं व ईश्वरभक्ती विषयीं वयाची अगदीं इयत्ता म्हणजे काळाचा अगदीं नियम नाहीं हें तर सहज तुमच्या लक्ष्यांत येईल. मुलांच्या तर कांहींच ध्यानांत नसतें. परंतु तरुणपणांत बहुतेक लोकांचा असा समज असतो कीं, परमार्था विषयीं विचार करण्यास पुढें म्हातारपण आहेच. आणखी कितीएक आईबाप व वडीलही आपल्या लहान व तरुण मुलांच्या मनाचा जर परमार्था विषयीं व ईश्वरभक्ती विषयीं फार कल पाहूं लागली तर त्यांस म्हणतात कीं या विषयीं विचार व चर्चा करायास पुढें तुह्मांस पुष्कळ दिवस आहेत. आतां द्रव्य व लौकिक मिळवा. अशा विचारांत तुह्मीं आपलें मन फारसें घालूं नका. तर ह्या समज केवळ निराधार आहे. मरणांस सर्व वय सारखेंच, तें कोणत्या वयांत व कधीं येईल याचा अगदीं नियम नाहीं.

१०. म्हणोन शहाणे व विचारी जे असतात ते परमार्थ व ईश्वरभक्ति साधण्या विषयीं अशा पुढल्या भरंवशा वर कधींच राहत नाहींत. आपला धंदा-रोजगार करित असतां त्यांत ईश्वराज्ञेचें पालन होईल तेंच करितात व परमार्थाचा विचार निरंतर वागवितात. दया, शांति, क्षमा, सत्य यांस धरून राहतात. आणि आपल्यास सद्गति देण्या करतां नित्य त्याची प्रार्थना करितात.

११. निदानींचा आपला बाप, आई, धनी, इष्ट, सोयरा व निदानींचें आपलें स्थान परमेश्वरा शिवाय दुसरें कोणी नाहीं, असें निरंतर आपल्या मनांत समजून त्यास अनन्यभावेंकरून शरण असतात. तरुणपणींचें व म्हातारपणींचें मुख्य साधन काय तें हें. म्हणोन मुलांनों, तुह्मीं कोणत्याहि अवस्थेंत असलां, तरीं या साधनास कदापि सोडूं नका.

★

## प्रकरण ९ वें.

# म्हातारपणीं विसावा कसा घ्यावा

१. काम, क्रोध, लोभ, मोह, मत्सर आदिकरून षड्रिपु आपल्या शरीराच्या अशक्तपणाच्या कारणानें आपोआप निर्बल होत असतां त्यांस बलात्कारानें आपल्या मनांत व वासनेंत पोसणें या पेक्षां म्हातारपणीं दुसरें अधिक लाजीरवाणें कर्म तें कोणतें? दांत नसतां आपल्या हातीं खलबत्ता घेऊन लाडु कुटून खाणें, अंगांत कांहींच बळ नसतां बलिष्ठा वर आवेशानें जाणें, बिछान्या वर पडल्या मुळें सांगतां येईना तरीं पण आपण स्वतः वाडे, बंगले, बाग करायास कारागिरांस बिछान्या वरून बेत सांगणें, इतरां विषयीं भाग्योदय ऐकून श्रमी होणें, हीं जशीं उपहासास्पद व निंद्य कर्में तशींच म्हातारपणीं कामक्रोधादि विकारांस आपल्या मनांत थारा देण्याचीं कर्में होत. म्हणोन शहाण्यानें हीं पहिल्यानें वर्जलींच पाहिजेत. नाहीं तर एक तर जरेनें शरीरास कुरूपपणा आणलाच आहे, त्यांत आणखी हा अधिक कुरूपपणा करून घेणें आहे.

२. शरीराची व मनाची अशा दोन्ही शक्ति कमी होत चालल्या मुळें म्हातारपण हें विसावा घेण्याचें वय आहे. विसावा घेणें म्हणजे उगीच निरर्थक पडून राहून राहिलेल्या आयुष्याचे दिवस काढणें असें कोणीहि समजूं नये. परंतु साऱ्या तारुण्यांत पंचावन साठ वर्षे पर्यंत प्रपंचाचीच ददात काळजी, व मनास ओढ होती, ती आतां हळुहळु काढून टाकून मनास समाधान व विश्रांति देणें व राहिलेले दिवस परोपकारांत व ज्यांणीं या संसाराचें व एथील जगाचें सुखदुःख फारसें अनुभविलें नाहीं अशा अल्पवयस्कांस आपला पुष्कळ वर्षांचा अनुभव देऊन सावध करावें.

३. म्हणोन वर सांगितलेले दुष्ट विकार मनास न होऊं देतां त्यांपासून त्यास दूर व निर्मल ठेवणें ही म्हातारपणीं पहिली साधनभूमिका होय.

४. भक्ति, वैराग्य यांचीं उदाहरणें जनास दाखवून परमार्थ ज्ञान वाढविण्यास म्हातारपण ही दुसरी मोठी साधनभूमिका होय. म्हणोन या दोन्हीं भूमिकां वर टेंकून राहून म्हातारपणाचे राहिलेले दिवस घालविणें या सारखें त्या वयांत दुसरें समाधान आणि त्यांस भूषण व शोभा नाहीं. तारुण्या पेक्षां म्हातारपणाची शोभा व सौंदर्य काय तें हें असें समाहितवृत्तीनें वागणें.

५. शेवटीं याच समाहितवृत्तीनें आपल्या स्वर्गस्थ पित्याच्या राज्यांत जाऊन तेथें वस्ती करणें हाच काय तो परम पुरुषार्थ, व हेंच काय तें मनुष्यजन्माचें सार्थक. असें नसतें तर एथील विषयभोगांतच आयुष्य घालविणें हें आपलें कृत्य सर्व पशु व कीटक करितच आहेत, मग मनुष्यजन्मा कडेस विशेषपणा तो कोणता याचा तुह्मीं सर्वांनीं विचार करावा.

समाप्त

# दर्शिका

[ Index ]


अक्कलकोट, ८०, ८१, १८६
अनर्थवाङ्मय, २७५
अफिण, १००, १०१, ११४
अबदुल रहिमान खान, २३५
अमळनेरकर, सखारामबावा, ६३
अमृतानुभव, ५८
अमेरिकन आदिवासी, ३९५
अमेरिकन मिशनरी, आगमन, ५६, ५७
अमेरिकन अंतस्थ युद्ध, २७५, २७६, २७८, २८१
अमेरिका, स्वातंत्र्ययुद्ध, ३७२, ३७३
अरुणोदय, २१७, २४१, २५१
अर्स्किन, विल्यम, ४२
अवतरणचिन्हें, मराठींत रूढ करावीं काय ? ३
अष्टाध्यायी, १५९ ; आणखी पहा–लघुकौमुदी
अहमदनगर, २००, २०३, २०६, २१४, २१६, २२३, २५५, २६०, ४०१
अहमदाबाद, २०३
अहल्या, ( दा० ची कन्या ), ३४२
अहल्याबाई, होळकर, ९७
आगरकर, ४०९
आगाशे, गोपीनाथशास्त्री, १८०
आंक्लेसारिया, तेहमुरास दिनशा, ४०३
आत्मचरित्र, कां लिहिलें ? १ ; लेखन-कालनिर्देश, १३, १९, २१, ३७, ४५, ५७, ६६, ६९, ८६, ९९, १२०, १९१, १९७; प्रतिलेखक, ३४२
आत्माराम, डॉ. ( दा० चे बंधु ), ६, ९०, १४३, २५५, २६२, ३३९, ३४२, ३४९
आत्माराम भुखण, पहा–भुकणकर
आत्माराम माधवजी, १४३
आत्मीय सभा, २६४
आदि ब्राह्म समाज, २७४
आनंदचंद्र मुजुमदार, २७०
आनंदफंदी, ११७
आनंदराव चापाजी, १४९
आनंदाश्रम स्वामी, २६२, २८२, २८३
आपटे, अण्णासाहेब, १३८
आमदनामा, ३१
आमेलिया, मिस्, २६८, २७१
आवाबाई जिजीभाई, ४०२
आर्देशिर धनजीशाह, १४९, १६१–१६९, १७५, १८३
आर्नोल्ड, टी. के., ३०८
आर्नोल्डस् फिझिक्स, ८४, १४४
आर्बथनट, सर रॉबर्ट, १५८, १५९, १७४, १८०, १८३
आर्यन् ब्रदरहूड, २५२
इंक्वायरर ( वृत्तपत्र ), २६८, २७०, २७३
इंग्रजसरकार, शिक्षण देण्याचा मतलब, २७; शहाणपणा, ९५, ९६ ; कृपा, १५८, १५९; चाकरी, १७७;




त. २९

राजनीति, १९८; अंमलदार, २२८; पहिला अंमल व त्याचे परिणाम, २३०, ३७०; साम्राज्य, २३३; सुयंत्रित शास्त्र, ३६९; प्रयाणाचें भाकीत, ३७१, ३७२, ३७४, ३७६, ३७७; राज्यापासून फल, ३७१; राजकीय मरण, ३७३; खरें साम्राज्य, ३७५; –विषयीं आदर, ३७६; रक्तशोषण, ३७८; –विरुद्ध लढा, ३८९; –पासून सुखदुःख, ३८०, ३८१; संभावित लूट, ३८४ ३९१; जुलमशाही, ३८५, ३८६; मुसलमानाशी तुलना, ३८६–३८९; संस्थानिकांशीं धोरण, ३९०; हिंदुस्थानावरील आपत्ति, ३९०; दुटप्पी धोरण, ३८९; व्यापारी धोरण, ३९३; राष्ट्रीय शील, ४००
इंग्रजी भाषा, शिकविण्याचा हेतु, २७; परिणाम, ७८, ७९, २३६, २३७, २४१, २४२; शिक्षणाचा फायदा व धोका, १२९; कमवख्ती, १३३; उचार, २०४
इंग्रजी विद्या, ३७०, ३७५, ३७८, ३९७
इंग्रजी व्याकरणाची पूर्व पीठिका २०८
इंग्रजी शाळा (दा० च्या काळच्या) इंग्रजी वाटकीनचें स्कूल, २३; गोविंदजी नानाचें स्कूल, २५; सोसाइटीची शाळा, २६; मर्फीचें २९; तातु शेटाचें स्कूल, २९; परोपकारी व धंदेवाईक २०६
इंजिनेरी स्कूल, ७२, ७३
इटालियन आपेरा, १७३
इंडियन स्पेक्टेटर, ४०९
इंदुप्रकाश, २५३, ३३६, ३२७
इंदूर, ९०, ९७, २२०
इनशाए इुहुरी, १३३
इन्व्हेरारिटी, २१८, २१९
इर्विंग्स कांपांझिशन, ५०, ७२
इलियट, १४८, १४९
इल्बर्ट बिल, ३९७, ३९८
ईश्वरचंद्र विद्यासागर, ३६८
इसपनीति, ३४, ३६, ६०, ७४, ८६
ईस्ट इंडिया असोसिएशन, ३९८
ईस्ट इंडिया कंपनी, ३७४, ३७७
ईस्डेल (सुपरिंटेंडेंट), २००, २०३, २०४, २३४
उज्जनी, १००
उत्तम (गाणारीण), १६८
उपयुक्त ज्ञानप्रसारक सभा, पहा—ज्ञानप्रसारक सभा
उमाबाई, (दा० ची आजी), ४, १३२, १४२, १७४
एज ऑफ रीजन, २३६
एडवर्ड थॉमस, २६७, २६८
एतद्देशीय शिक्षा मंडळी, पहा—सोसाइटीची शाळा
एदलजी मोदी, १४७
एन्सेल्म, डी., २६७
एलेगंट एक्सिरसाइज, ११०
एल्फिन्स्टन कॉलेज, २६, ८०
एल्फिन्स्टन नेटिव एज्युकेशन इन्स्टिट्यूशन, पहा—सोसाइटीची शाळा
एल्फिन्स्टन फिनान्शियल असोसिएशन, २५०
एल्फिन्स्टन, मौंट स्टुअर्ट, ३९, ७१, २९८, ३७०, ३७३, ३७४, ३९३
एल्फिन्स्टन, लॉर्ड, २१६, २२०, २२१

एल्फिन्स्टन स्कॉलर, २३६, २३७
अॅडम, रे०, २६४
अॅबट, कॅ०, २२१
ऑरियेंटल ख्रिश्चन स्पेक्टेटर, १२५, २३१, २३६, २३७
ओर्लेबार, प्रो०, ८१, १५२, १८६, ३३७, ३३८
ऑस्ट्रेलिया, ३९५
औदिच, ६३, १९२, २४८
औरंगाबाद, २२१
कबीरवड, १७०, १७१
कमरुद्दिन तय्यबजी, ४००
करमरकर, पां. वि., ४०५
करमरकर, वासुदेव भिकाजी, १९७, २६१
कर्रामा, ३१
करंदीकर, गणेश, ७१
कर्तव्यभूमिति, ३५, ४५, १५५
कर्वे, धों. के., ३६९
कर्सनदास मूळजी, २७९
कळंबकर, तात्या शास्त्री, ११६-११८
कळंबकर, रावजीशास्त्री, ११६, ११७
काठेवाड, २४९, २६२, २८१
कानदास मंछाराम, १५०
कांनाबाई तखड, डॉ., ३४२
कापूस, व्यापार, २७५, २७६; निर्यात, २७६
कामकरी वर्ग, २०७, २०८
कायरा, २०३
कार्नाक, जेम्स (सर), १८७
कावेरीबाई, (दा० ची पहिली कन्या), ११३, १२०, १३२, १३७, १३८, ३२५, ३४०
काशीबाई, (दा० ची मावस आजी), ४ २१, २२
काष्टे, जगन्नाथ, ६४, ६५
कासम महंमदजी, २५३, २६०
किताबे निसाब, १३३
किबे, रखमाबाई, १३८, १४०
किबे, लक्ष्मणराव, १४०
कीटींज, २८२
कीथस् ऑन् धि युज ऑफ ग्लोब, ५०, ७२
कीनी, रेव्ह०, ५६
कृष्ण, २३७
कृष्णमोहन बानर्जी, २६३, २६८, २६९
कृष्णा कुमारी, १२८
कृष्णाजीशेट (दा० चा मातामह), ४
कृष्णाबाई (दा० चें कुटुंब), ४२
कृष्णाबाई (दा० ची आत), ३
कुतुबखाना, पहा–पुस्तकसंग्रह
कुतुबुद्दीनखान, १३३
कुंभार तुकडा, २१
कुराण, १३०, २६६
कुलीन ब्राह्मण, २६६
कुवेर्डे, १२८
कूरियर, पहा–कोरियर
केकादर्श, ३२७
केकावलि, ३२४–३२९
केशवचंद्रसेन, २६२, २६७
कँडी, थॉमस, मे०, ३, ५४, २०३, २०४, २७५, २९५, २९६, ३४५, ४०५
कॅथॉलक, रोमन, ९४
कॅरे, रे०, २६५, २८९, २९०
कोकणस्थ ब्राह्मण, ६०, ९६, १००
कोनकर, पहा–गणेशभट
कोरियर, १९८, १९९

कोलेट, मिस्, २६५
कोल्हापूर, २२३
कोश, बहुभाषांत, ३३७, ३३८
क्रमवंत, जगन्नाथशास्त्री, ३६, ५२, ७२, ७३
क्रॉस केडन, ३८५
खंडेराव गायकवाड ऊर्फ आप्पासाहेब, १७६, १७७, १८१, १८२, २८३-२८६, ३१२
खरर्डा, ६६, ६७, ९१
खरशेटजी, जमशेटजी जिजीभाई, सर दुसरे, ४४, १४७
खरशेटजी, पहा–दार्दीवाले
खानदेश, २००, २०६
खोटे, रघुनाथ नारायण, ३४९
ख्रिस्त, २३६, २३७ ३१८, ३२१
गंगाधर रामजी, ९०, ९१
गंगाधरशास्त्री (जांभेकर), ६१, १८५
गणपत कृष्णाजी, ८७, २५७
गणेशभट कोनकर, (उपाध्या), २०
गफूरखान, ११३, १२०
गर्भ, १९५
गाइड्स ग्रामर, ८६
गाइ, नवरोजी दोराबजी, ७५, ७६
गाडगीळ, जनार्दन आपाजी, ५०, ७१
गाडगीळ, महादेव, १९७
गानु, वामनराव, ७४
गायकवाड, पहा–सयाजीराव, खंडेराव, मल्हारराव, चिमणाबाई
गिरिधरस्वामी, २८९
गुजरात, २२६
गुजाबा, २५६, २५९
गुलिस्तान, ११३
गोडबोले, कृष्णशास्त्री, ३०४
गोडबोले, परशुरामतात्या, ३२७
गोडबोले, विठोबा, ३९
गोने, ३४६
गोपिनाथ नंदी, २७०
गोल्डस्मिथस् हिस्टरी ऑफ इंग्लंड, ५२, ८०, १८५
गोवर्धनदास, ३८०
गोवा, ३९५
गोविंद नारायण, २५१, २५९, २६१
गोविंदराव अग्र्या, ९४
गॉर्डन, (सुपरिंटेंडेंट) २००, २०४-२०६
गौड ब्राह्मण, १३५,
गौस महमद खान, पहा–जावरा नबाब
ग्याझेट, पहा–बॉंबे ग्याझेट
ग्रंथ, पहा–पुस्तके
ग्रीन, हेन्री, १५१, १५६, १५७, १७०, १७३, १९५, २०३, २०५, २०९, २४२, २४८
ग्रे, मॅजिस्ट्रेट, ४२
ग्रँटस कॅटलॉग, २५६
ग्रँट, चार्लस, ३७४
ग्लेन, ज्योजिफ, १४५
घगवे, बाळशास्त्री, ५२
घोडबंदर, ९०
घोळे, विश्राम रामजी, ३६८
घौस महमदखान, पहा–जावरा नबाब
चंदावरकर, सर नारायण, २५४, २६२, २७१
चलन, कागदी, २७६; रुपेरी, २७६, २७७
चव्हाण, भिकोबादादा, पहा–भिकोबादादा
चांदवड, ९२

चित्तपावन, पहा–कोकणस्थ
चिपळुणकर, कृष्णशास्त्री, ३०४, ३६८
चिपळुणकर, वि. कृ., ३२४, ३२६, ३२८, ३७२, ३७३, ४०९
चिपळोणकर, पुरुषोत्तम जनार्दन, १९७
चिमणाबाई, १७७
चॅटफिल्ड, ३०१, ३४५–३४७
चोळीमहेश्वर, ९७
चौवुले, भास्कर श्रीधर, ३०८
छत्रे, केरो लक्ष्मण, ३६८
छत्रे, सदाशिव काशिनाथ, २६, २७, ३२, ५१, ६०, ७०, ७४, ८१५
जगद्वासी आर्य, २४५
जगन्नाथ टकल्या, १८
जगन्नाथ पांडुरंग (दा० चे श्वशुर), ४२
जगन्नाथ शंकरशेट, ४०, ४६, १४५, १४६, १८८, १९५, २१५, २७९, २८१, ३७६
जनरल आसेम्ब्लिझ् स्कूल, २३
जनार्दन वासुदेव, ५०, ७१, ७२, ७५, ७७, ८३
जमशेटजी जिजीभाई, ४०, ४३, १३२, १३६, १४५, १४६, १८८, १९८, १९९, ३८२, ४०२
जर्विस कॅ. जॉर्ज, २६, २८, ३५, ३६, ३८, ४४, ४५, ५०, ५२, ५३, ७२, ७३, ७८, ७९, १५२, १५५, ३७०
जर्विस, लेफ. कर्नल टी. बी., २६, ३९४
जातिभेद, २३५, २३६, २३९, २४१, २५२, २५३, २५६, २५७
जादुमंत्र, २४८
जान्हवेकर, रामचंद्रशास्त्री, ८५
जांभेकर, बाळशास्त्री, ४१, ४६, ५०, ५२, ६१, ७०, ७१, ८१, ११५, १५२, १५५, १५९, १८४, १८५–१८८, १९६, १९९, २०३, २०५, २३२, २३८, २३९, २५०, २८९, २९२, २९५, २९६, ३०५, ३३७, ३३८, ३७०, ४०८
जावरा, नवाब, ८८, ९८, १०१, १०३–१०७, ११९, १२१, १२५, १३२, १३३, १३६, १३९, १४०
जावरा, संस्थान, ८९, ९९, १०३, १०४, २४१
जेजुइट, २८९
जेन्किन्स, ७४
जे. पी., १८७, १८८, ४०५
जोशी, पांडुरंग पांवसकर, ३७
जोशी, रघुनाथ नाना, ४०
जोशी, रामकृष्ण अनंत, पहा–गुजाबा
जोशी, लक्ष्मण नृसिंह, १९७, ४०३, ४०४
जॉन्सन, ६१
झगमग, गाणारीण १६८
झाबुवा, राजे, ८८, ९८, ११२
झाबुवा, संस्थान, ९९, १०२, १११–११३
टकरमन, डॉ., २६४
टाइम्स, लंडन, ३९८, ३९९
टागोर, पहा–देवेंद्रनाथ
टायटलर, फ्रेझर, २२४, २२७
टिळक, गंगाधर रामचंद्र, ३०७, ४०९

टिळक, बा. गं., ३६८
टी. माधवराव, ३६८
टोंक, १२४, १२८
ठाणें, २०३, २१०, २११, २२७, २५०
डफ, रे० आलेक्झांडर, २६५, २६८, २७०, ३१८
डिकिन्स, १५७
डिरोझियो, हेन्री, २६६–२६७
डेंगळे, त्र्यंबकजी, १७०
ड्यूरंड, २२१
ढवळे, केशव भिकाजी, ३०८
तत्त्वबोधिनी सभा, २७४
तपासणी, शाळांची, २०३
तरखड, (दा० चा मूळ गांव), ३
तर्खड, पहा–भास्कर सदानंद
तवारीखें फिरिश्तें, ९३
तळेकर, श्रीकृष्णशास्त्री, ३४८
ताजुद्दीन, (दा० चे सहाध्यायी), ३०
तेलंग, का. त्र्यं., ३९९, ४०४
त्र्यंबक बापूजी, ३८
त्र्यंबकशास्त्री मनोहर, १७६, १८०, १८१
त्रिनिटेरियन, पहा–मिशनरी
थेचर, सुप० पोलिस, २२४
थॉम पेन, २३५
दर्पण, १८७, १८८, २३८–२४०
दलपतराम, १९४, २४४, ३७९
दक्षिणा ब्राह्मण, १७३
दक्षिणाफंड, ३४४, ३९३
दक्षिणारंजन मुकर्जी, २६९, २७१
दाजी परशुराम, ४०३, ४०४
दाजीदाजी, सरदार कदृनजी, २८१
दांडेकर, मारगट, २३७
दातार, नारोपंत, १९७
दादाजी भाऊ रसुल, २६०
दादाभाई नौरोजी, २७९, ३६९ ३७७, ३९७, ४०३, ४०४
दादोबा पांडुरंग, जन्मकाल व स्थळ, २; मातापितरें, २; बाळपणांतील आठवणी, ७–१४; गरिबां विषयीं दया, १९, २०, १७ २०६; मुंज, २०, ६४; पहा— शिक्षण; लग्न ४२–४४; वेदांत-शास्त्रासंबंधीं मत, ५८, ६९; स्मरणेची आरती, ६५; खरटींतील दरबार ६६–६९; वेस्ट स्कॉलर, ७५; मातृवियोग, ८१; नोकरी, ८३, ८८; पहा–व्याकरण; जावयास पोंचवणें, १०३; कन्याजन्म, ११३; ज्यांचे व्यास जातात, ११३; अभ्यारोहण, ११९; इंदुरास गमन, १२०; टोंकास गमन, १२४; पितृवियोग, १३२; प्रथम कन्यादर्शन, १३७; नबाब-साहेबांस भजवाना, १३९; इंदुरचें निमंत्रण, १४०; मुंबईस आगमन, १४२; शिक्षक, १४४; सुरत शाळेंत नेमणूक, १४६, १४७; अवंधनाचा शिरवण, १५८; स्वाध्यायाचें काम स्वीकारतात, १६४, १६५; भोळसर स्वभाव, १६६; मेहेनतानाची मागणी व निराशा, १६६–१६८; मल्हार-रावांशी भेट, १७७, १७८; गादीवर चित उत्तर, १७९, १८०; मल्हार-रावांचा निरोप, १८१; मुंबईस परत, १८२; मुंबईंत पुनरागमन, १८४; राजीनामा नामंजूर, १८०; नान्ह्या मुलाचा मृत्यु, १९४; नानाके

क्लासचे डायरेक्टर, १९६, २०४; मातृवियोग, १९८, शाळातपासनीस, २००, २०४; पगार, २०५; शिक्षणविषयक विचार, व शाळातपासणी, २०५–२११; हुजूर डेप्युटी कलेक्टर, २१२, २१४, २१५; अहमदनगरांतील कार्य, २१६; न्यायदानाची पद्धति, २१७; सत्तावन सालच्या बंडांतील कामगिरी, २२१, २२६; राजीनामा, २२८; धार्मिक कार्य, २३०; मिशनऱ्यांशी संबंध, २३४; अतिविचारी, २४३; भगवद्भक्त, २४३; मानवधर्मसभेचे अध्यक्ष, २४८; परमहंससभेची स्थापना, २५२; आर्थिक ठोकर, २६२, २७९, २८१, २८५, ३३९, ३४३, ३४७; कृष्णमोहनशीं तुलना, २६३; राममोहन रायशीं तुलना, २७३, ३१८; मनानें ख्रिस्ती? २६५, ३१७, ३२३; पेनशन, २७५; मौल्यवान् स्वानुभव, २८०, २८१, ४११–४४०; काठेवाडांत, २८१; बडोद्यांत, २८३–२८७; लोकनिंदा, २९९, ३०२, ३६८; मराठी भाषेवरील प्रेम, ३०१, ४०६; पाणिनि, ३०२–३०३; स्वीडनबोर्गमताचा परिचय, ३१५; हिंदुधर्मावरील विश्वास, ३१८, ३२३; कन्यावियोग, ३२५; ग्रंथ, २८८–३१०, ३२४–३३८, ३५०–३६७; संतती, ३३९–३४२; मराठी ट्रान्स्लेटर, ३३९–३४९, ४०६; राजकीय विचार, ३७८–३७९, ३९४; बाँबे असोसिएशनचे सभासद, ३८३; अर्थदास?, ३९७; युनिव्हर्सिटीचे परीक्षक, ४०१; संस्कृत अध्यापक, ४०२, ४०३; ज्ञानप्रसारक सभेचे अध्यक्ष, ४०३; पुनर्विवाहोत्तेजक सभेचे सभासद, ४०५; निधन, ४०५.

दासबोध, ५, ६४

दिग्दर्शन, ३७०

दिनमणि शंकरशास्त्री, १६०, १९४, २४४

दीनानाथ, (दा० चे बंधु), ६, ९०, १४३

दीना बापट, १७

दुर्गारामचरित्र, १९५, २४३–२४९

दुर्गाराम मंछाराम, १४८, १४९, १५१–१५५, १५७, १६४, २०९, २४३, २४८–२५०, २५४, ३७९, ३८०

दुल्लभदास, १६१, १६२

देपाळपूर, १०१, आणखी पहा–नवलई

देवीदास मनमोहनदास, १८८

देवेंद्रनाथ टागोर, २७४

देशमुख, गोपाळराव हरि, पहा–लोकहितवादी

देशव्यवहारव्यवस्था, ५७

दोन नांवाचे गांव, १०१, १३७

दौलतराम, १९४

द्वारकानाथ जगन्नाथ, ५०

धरमसी, अबदुल्ला मेहरअली, ३९९

धर्मविवेचन, २४५, २७१, २७२, २७४, ३२९

धर्मसभा, २६४

धर्मसमजुती, कोळणीचा इंटाळ, ३७;

हजामाच्या हातचें लेमचें, १३५; छापील ग्रंथ, १५९–६०; बोहरी लेकांचें सोवळें, १७३; जादुमंत्र, २४८
धाकजी दादाजी, ४६, ४७
धाकजी नारायणराव, १४९
धारवाड, २००, २१०–२१२, २२३, २२६
धुळें, ९०, ९३
धोंडभट, वैद्य, ६६, ६७, ६९
नकाशाचें पुस्तक, गुजराती, ३३४
नकाशाचें पुस्तक, मराठी, १७९, ३३४
नर्भयरामशास्त्री, १५९, २४२
नवरोजी चंदाभाई, १५०
नवलई, १०१, आणखी पहा–देपाळपूर
नवानगर, जामसाहेब, २८२
नागर ब्राह्मण, १९२, १९३, १९५
नाथुराम, ११४, ११५
नानक, २३०
नाना नारायण, ४०, ४१, ५१, ५२, ७१, ७२, ७६, ७९, ८९, ९१, ९८, ९९, १०२, १११, ११२, १३७, १७२, १७९, १८१
नानाभाई हरिदास, १५०
नाना मोरोजी, ८३, २०४, २१४, २५०, ३६८
नाना शंकरशेट, पहा–जगन्नाथ शंकरशेट
नानासाहेब पेशवे, २२३
नारायण, (दा० चा पुत्र) ३४३, ३४७, ३५०
नारायण, (दा० चा महाध्यायी) ३१
नारायण दीनानाथ, ८३, १४४, १४६, २५५, ४०३, ४०४
नारायण बाळकृष्ण, ४०२
नारायण रघुनाथ, २५१. २५३, २६०
नारायण विश्वनाथजी, ४०५
नारायण विष्णु, ४०३, ४०४
नारायणशेट, (दा० चे पणजे), ३
नार्मलस्कूल, १९६, २००, २०५, २५०, २५२
नाशिक, ९०–९२, १३२, १३७
निंबाजीराव घवळे, २८६
निःशस्त्रीकरण, २२४–२२६
निःशास्त्रवादपरीक्षा, ३३९
नेटिव एज्युकेशन सोसाइटी, पहा–सोसाइटीची शाळा
नोटा, पहा–चलन
पंचवार्तिक, २८९, २९०
पंचहौदमिशन, २५९
पंचोपाख्यान, ३४, ७४, ८५
पटवर्धन, चिंतामणराव, ३९, ७१
पटवर्धन. नारायण बाळकृष्ण, १९७
पटवर्धन, बापूसाहेब, ३०२
पटवर्धन, बाळकृष्ण ऊर्फ भाऊसाहेब, १७०, १७२, १७३
पटवर्धन, भिमाशंकर ऊर्फ गबनाहेब शास्त्री, १७२
पंढरीमाहात्म्य, ६४
पंनोजीशास्त्र, १५२
पथाजी, २२३, २२४
परभु, २५, ३६, ३७, ६१, १९३, १९४
परमहंस, २४६, २५७
परमहंसमतप्रश्न (ग्रंथ), २५६, २५७
परमहंससभा, उगम व विस्तार, २४१, २४२, २४३, २५०—२६२;

प्रवेशसंस्कार, २५२, २५२, २५३; विरुद्ध प्रचार, २५५; सभासदांची संख्या व प्रसार, २५९; दुफळी, २६१; बदनामी, २७१; आर्यधर्मावर स्थापना, २७२; नीतीवर भर २७२; आहारविषयक धोरण, २७३; भागवत धर्माची जोड, २७४ आणखी पहा– मानवधर्मसभा, प्रार्थनासमाज
परांजपे, विनायक बाळकृष्ण, ३०८
पाकिस्तान, ३९९
पांगारकर, लक्ष्मणराव, ३२६
पांडुरंग, (दा० चे वडील), २; साधुवृत्ति व ग्रंथवाचन ५; संतती, ५-६; खर्चाची ओढ, ६, ३३९; व्यापारांत हुशार, ४३; पत्रांसंबंधी नियम, ६९; माळव्याचा पूसतपास ८८; निधन, १३२; धर्मशीलता, २४२; संतती ३३९
पांडुरंग, (दा० पुत्र), ३४२, ३४७
पाणिनि, १५९ ३०४,
पाताणे, ६४
पारमहंसिक ब्राह्मधर्म, २७१, २७३, ३२९–३३२
पाराशर, क्षेत्रोपाध्याय, ९१
पारितोषक, तर्खडकर, ३४०
पावभक्षण, २५२, २५३
पांवसकर, पांडुरंग, पहा–जोशी
पास्लेस् प्रॅक्टिकल जेवोमेट्री, पहा–कर्तव्यभूमिति
पाळंदे, भास्कर दामोदर, ३२७,४०४, ४०५
पीट, ज्यॉन, ४०५
पुणें, २००, २०३, २०६, २२३
पुणें संस्कृत पाठशाळा, २०३, २१२
पुनर्विवाहोत्तेजक मंडळी, ४०४, ४०५
पुना आब्झर्वर, ४०९
पुस्तक संग्रह, बार्थविक १०८; दादोबा, १५७; पटवर्धन, १७३
पुस्तकें, आश्रय, २९८, २९९
पुस्तकें-फारसी, पहा-आमदनामा, करीमा-गुलिस्तान, बहारदानिश, किताबे-निसाब, इनूशाएख़ुहुरी
पुस्तकें-शालेय इंग्रजी, पहा–Vyee's Spelling Book, New Testament, Murray's Spelling Book, Irvings' Com position, Lindley Murray's Grammars, Keith's On the Use of Globe, Mac Cullock's Moral Class Book, Guy's Grammar
पुस्तकें-शालेय मराठी पहिलीं, पहा–बोधवचनें, शब्दवाचन, पंचोपाख्यान, विदूरनीति, सिंव्हासनबत्तिसी, इसापनीति, बालमित्र, हटन्स कोर्स ऑफ मॅथॅमॅटिक्सचा मराठी तर्जुमा, कर्तव्य भूमिति
पुस्तकें–संस्कृत, लघुकौमुदी, अष्टाध्यायी, भागवत, शाकुंतल
पूरणिका, व्याकरणाच्या सातव्या आवृत्तीची, ३०१, आणखी पहा-व्याकरण
पेरी, सर अर्स्किन, १९६, २१४, २१५, २२८, ३४३, ३४४, ३७०, ३७५
पेशवाई, ३८४, ३८७, ३९३, ३९४,
पोतदार, द. वा., ३५०
पोतनीस, बाबा, ९८

पील, लॉ० जॉर्ज, ८८, २९२
प्रतापसिंह, छत्रपति सातारा, ४०, ५३, ८०, ९०, १८५, २२२, ३९०
प्रभाकर, १५५, १६०, २३६, २५६
प्रसिद्धिपत्र, २९८
प्रस्थानचंद्रिका, १५१
प्राकृत पोथ्या-कारखाना, ६४
प्राणशंकर, २०९
प्राणशंकर मेहता, १४८
प्रार्थना समाज, २६१, २६२, २७२,
प्रिन्सेप, १२९
प्रेमकोर, १६१–१६३, १६७
प्रेमचंद रायचंद, २७९, २८०
फकीर ऑफ जंझिरा (काव्य) २६६
फडके, गंगाधरशास्त्री, २८९, २९०, ३०५
फरामजी बाटलीवाले, १४३
फर्ग्युसन, सर जेम्स, २२८, ३४३, ३४४, ३४९
फर्दुनजी नवरोजी, ७५, ७६, ८३, १६४, २१४, ३३६, ३८२
फारसी भाषा, दा० चा अभ्यास, ३०, १३३
फिरोजशाह धनजीशाह, १४९
फिरोजशाह मेथा, ३८३
फिअर, इंग्रजी मल्हार, २४, २५
फार्ब्स, जेम्स, ५६–५८
फोटोग्राफी, १९९
फॉकलंड, २०८
फ्रामजी कावसजी, २८, ३९, ४३, १४६, १८८
फ्रियर, सर बार्टल, २७८, ३७०, ३७६
फ्रेंच जनरल अॅसेम्ब्लीत हिन्दुस्थान, पहा–जनरल अॅसेम्ब्ली [illegible]
फ्रेझर, डॉ. जे. इ., ७६, ७७
बंगाल, २६३–२७४
बंगाली, शापुरजी सोराबजी, २७८, ३४९
बडोदे, १७८–१८२, २८३
बदुद्दीन तय्यबजी, ३८३, ३९९
बमनजी वाछे, १४६, १८८, २८१
बरद्वानचे राजे, २७१
ब कॅन्स विल्डन्स फंड, ६०
बर्नार्ड भगिनी, ३४१
बहाउद्दीन, १३३
बार्न्स, जॉन, ८८, ८९, १२९, १२२, १३६, १३९
बाजीराव, १७८, २२५
बाटलीवाले, रुस्तुमजी जमशेटजी, २८१
बापूजी कृष्णजी हुन, पहा–[illegible]
बापुमास्तर, नारदेव शुक्र, ३०, ३६, ३८, ८५, ८६
बाबासाहेब, ८५
बावाजी, (दा० चे पुत्र) ३४०, ३४७
बापाजी कृष्णनाथ, ४०४
बाबा पद्मनजी, २१७, २४१, २५१, २५५, २५९, २६०, २७४, ३०३, ३३०, ३३३
बाबा मामा, ३२, ३७
बार्थक, जेम्स, ९९, १०७–१०९, १११, १२६, १३७, १४०
बाळमित्र, ३५, ३६, ७४, ८५
बाळव्याकरण, २८९, ३०५
बाळकृष्ण [illegible], १७
बाळ गंगाधरशास्त्री, पहा–जांभेकर
बाळाजी [illegible], ३९, ५०, ७१
बाळाराम, (दा० चे बंधू) ७, ११, १०–१६, १८, ३५३–३६०

बाळ भास्कर, ४०४
बाळाजी पांडुरंग, १५०, १५१
बाळाजी माधव, कमलाकर, ३, १८
बाळाजी लक्ष्मण, २२५
बी. बी. अँड सी. आय, टर्मिनस, २७७
बुक कमिटी, सरकारी, ४०५
बुंदेले, सरदार गोविंदपंत, ९३
बेकर, हेडमास्तर, २१२
बेडेकर, शंभु कृष्णाजी, ७६
बेल, मि० जॉन, ७३, ८२, ८४, १४३, १४४, १४६, २३४
बेळगांव, २००, २१०, २११, २२३, २२६
बॅकबे रिक्लेमेशन, २७७
बोधवचनें, ३१, ३२, ३४, ७४
बोर्ड ऑफ एज्युकेशन, पहा-सोसाइटीची शाळा
बोहरी, १७३
बॉइड, कलेक्टर धुळें, ९४, १७४
बॉंबे असोसिएशन, ३७६, ३७७, ३८१, ३९८
बॉंबे ग्याझेट, १९८, १९९, ३८४–३९३
बॉंबे नेटिव्ह स्कुल अँड बुक सोसाइटी, पहा–सोसाइटीची शाळा
बॉंबे प्रेसिडेन्सी असोसिएशन, ३८३, ३९८
बॉंबे बँक, २७८, २८०
ब्रह्मसमाज, २३०, २६४, २६६
ब्रिग्स्, जनरल जॉन, ९३, ९४, ३९६
ब्रूस, डब्ल्यू. सी., १४५
ब्रौघॅम् लॉर्ड, ९२, ५३, ५२
ब्लॅनी, डॉ. थॉमस, २७८
भक्तिविजय, ५, ६४
भडोच, १७०, २०३
भर्तृहरि, ४१०
भवाळकर, केशव शिवराम, १९७
भाऊ दाजी, डॉ., २६०, २७९, ३६८, ३७७, ३८२, ३८३, ३९७
भाऊ महाजन, २५५, २६०, ४०५
भाऊ शिंदे, २८४–२८७
भागवत (ग्रंथ), १६०, २४९
भागवत, बाळा, ४९, ७१
भागवत, वि. ना., २८२
भागोजी, २२३, २२५
भांडारकर, डॉ. रामकृष्ण, २५२, २६०, २७४, ४०३, ४०४
भांडारे, आत्माराम केशव, ७१, ७२
भावे बाबजीराम, मामलतदार, ६६, ६९
भास्कर, (दा० चे बंधु), ६, १८, २८, ३१, १३२, १४२, १९८, १९९, ३३९, ३८४, ३९४
भास्कर दामोदर, पहा–पाळंदे
भास्करराव सदानंद, ३०८, ३४०
भिकाजी भास्कर, ४०३, ४०४
भिकोबादादा चव्हाण, २६०, २६२, २७२
भिल्ल, ९५, ९६, २२३, २२५, २२६
भिवंडी, ९०, ९१
भीष्माचार्य, २८९, २९०
भुकणकर, आत्माराम, १५३, १९०
भूगोलज्ञान, २०८, २०९
भेंडे, रमाकांत कृष्ण, ४०२
भोलानाथ साराभाई, ३२९
मकंदराय मणीराय, १५०
मकबा, महमद इब्राईम, १४५, १४६, २८९

मंछा, १६१, १६३
मणिशंकर कीकाणी, २४९
मंडलिक, वि. ना., ३०७, ३६८, ३८३, ४०४
मदन, श्रीकृष्ण, २६०, २७४
मदिरापाननिषेधक पुस्तक, ५८
मद्रेसा, झारथोष्टी, ४०२
मनमोहनदास देवीदास, १४६,
मनी, रॉबर्ट कॉटन, ५१, ७९, ८०, ८९, १८५, २३१
मनोहर, पहा—त्र्यंबकशास्त्री
मरण,—संबंधी दा० च्या बाळपणच्या कल्पना, १८
मराठी कोश, मोल्स्वर्थ कँडी, ५४
मराठी ट्रान्स्लेटर, पहा—दादोबा पांडुरंग
मराठी भाषेचें व्याकरण, पहा—व्याकरण
मराठे, ३६९, ३७०
मरेज स्पेलिंग बुक, ४९, ७१, ७२, १९८, १९९
मर्फी, इंग्रजी मास्तर, २९, ३०, ४८, ५१, ८४
मलबारी, बे. मे., ४०८
महाकाळेश्वर, ज्योतिर्लिंग, १००, १३८
महाजन, भाऊ, पहा—भाऊ महाजन
महादजी शिंदे, १३८
महादेव गोविंद शास्त्री, २१२, ४०३, ४०४
महानुभाव, २८९
महाराष्ट्रभाषेची पूर्वपीठिका, ३३८
महाराष्ट्रभाषेचें व्याकरण (फडके), २८९, २९०, ३०५
महाराष्ट्र, शैक्षणिक इतिहास, २१०
महीपतराम रूपराम, १९४, २०९, २४८
महेश्वर, ९७
महेषचंद्र घोष, २७०
मार्जासाहेब, ९८, १२२, १२३ १३७
माडगांवकर, गो. ना., पहा—गोविंद नारायण
माणेकलाल, घेलाभाई, ४०२
मार्थाउक्त, १९
मानवधर्मसभा, २४२, २४३, स्थापना, २४५; निर्णय, २४४; अध्यक्ष २४८; इतिश्री, २४८; दप्तर जाळलें, २४९; राजकीय चर्चा, ३७८-३८१
माबाईच्या ओव्या, ८, २४७, ३३८, ३५०—३६७
मार्शमन, रे. २६५
मासेंट, मिसेस, ५५, ५७
मालेगांव, ९३
माल्कम, सर जॉन, ४५, ४६, ७१, ७८, १०८, ३७०
माळवा, ८८, होळी, ११४, ११५, ज्येष्ठागौरी, ११८
मिठाचा कर, ३७८
मिताक्षरा, १६३
मिशनरी, २३०, अमेरिकन २३१, स्कॉटीश २३१, कलकत्ता, २६४, त्रिनिटेरियन, २६४, युनिटेरियन, २६४, २६५, ग्रामरें, २९०.
मिमरतन सुखराय, १३६–१३६
मुसल्मान, ३७८, ३८७, ३८८, ३९८—४००
मूस, मेरवानजी, ८३
मृत्यु (दादोबांचा), ४०७; मृत्युलेख, ४०७—४०९

मेंगळे, नारायणशेट, ४०, ८०
मेनवॉरिंग, (मास्तर), ४८–४९, ६०, ७१–७३, ७६
मेह्दपूर, ९९, १०८, ११२, ११३
मेहरवानजी नसरवानजी भावनगऱ्या, १४४, १५०, २७९, २८०
मॅकलेनन, ज्यॉन, १४५
मॅके, रॉबर्ट, २०४
मॅक्कुलोक्स मॉरल क्लास बुक, ७२
मॅक्समुलर, ४०९
मॅमॉइर्स ऑफ सेंट्रल इंडिया, १०८
मैटलंड, विल्यम, ३४९
मैराळ, गोपाळराव, १७९
मोंगलाई, ३८४
मोड, १९२
मोतीराम नरभयराम, १५०
मोरहेड, सी., १४५, १४६
मोरोबा कान्होबा, ५०, ५१, ७१, ४०५
मोरोवा विनोबा, २६०, २६२
मोल्स्वर्थ, कॅ. जेम्स टी., ५३, ५४, ३८८
मॉरिस, डब्ल्यू. आर., १४५
मॉर्गन, जी. पी., २१९, २२७, २२९
म्हौ, ९७, ९८, २२०
यशवंत, (दा० चे आजे), मुंबईत आगमन, ३; निधन, ४, २२
यशोदा पांडुरंग, २२६, २७९, ३२४, ३२९
यशोदाबाई, (दा० ची मातुश्री), २; म्हटलेली कवनें, १२–१४; मृत्यु, ८१; स्मरण, ९१
यज्ञेश्वर शास्त्री, १६०, २४२
युनिटेरियन, पहा–मिशनरी
युनिव्हर्सिटी, मुंबई, ३४०, ४०१, ४०२
रंगो बापूजी, ९०, २२२, २२३
रणछोडदास, गिरधरभाई, १५२, १५६
रतलाम, ८९, १०१, १३८
रत्नागिरी, २००, २१०, २५०, २५२
रमाबाई, (दा० ची मातामह), २१
रशियन, ३७३
रसायनशास्त्रविषयक संवाद, ५७
रसूल, दादाजी, २८७
राघोबा (दा० बंधु), ६, ९०, १४२, ३४२
राजकमलसेन, २६७
राजकीय ऋषि, २३८, २५३, २५४, २५९, २६३, २६६, २७१
राजवाडे, विश्वनाथ काशीनाथ, ३६९, ३७१, ३७८
रानडे (राजवाडे ?) दिनकरराव, ३६८
रानडे, महादेव गोविंद, १५३, २५९, २७४, ३२०, ३२१, ३२७, ३२८ ४०१, ४०४
रामचंद्र दीनानाथ, ८३, १४४
रामचंद्र लक्ष्मणजी, १४३
रामजोशी, ११७
रामदास, ४०७
राम बाळकृष्ण, २४२, २५०, २५४, २६२
राममोहन राय, २६४–२६६, ३१९
रामा हजाम, १३५
राष्ट्रीय सभा, ३८३, ३९८, ४००
रिपन लॉर्ड, ३९७
रिमिंग्टन, (जज्ज), १६७
रिव्हार, कुञ्ज, ३९५
रुपें, चलन, २७६; २७७

रुस्तमजी, जमशेटजी, पहा–बाटलीवाले
रेणुकाबाई, (दा० ची आत) ३, ११
रेल्वे पहा–लोखंडी सडका
लॅम्ब्लर, ५१, ६१
रोगे, महमद अमीन, ३८२
रोझ, कलेक्टर, २१४
रोडे, गोविंदराव, १७५, १७८, १७९, १८१
रोडे, सखाराम, १७५, १७९, १८१, १९५
लक्ष्मण दादाजी, १०५,
लघुकौमुदी, १५९, १७८, ३१०
लघुव्याकरण, मराठी, ३०५–३०८
लछमन शेट, १०४, १०५
लाड, नारायण कृष्णा, ४९, ५१, ७१
लावण्या, १३, १७३
लिंगू, (दा० चा पंतोजी), १७
लिटन, लॉर्ड, ३९७
लिंडले मरेज् ग्रामर, ५०, ८५, ८६
लोकहितवादी, २८७, ३०२, ३६९, ३७१, ४०४
लॉ कॉलेज, २१५
न्युअर्ड, (जज्ज), १६१, १६२, १६४, १६७
वजीर दौला, १२८, १२९
वज्याराम, जादुगार, २४८
वत्साबाई, पहा–वत्सेश्वरी
वत्सेश्वरी, ६२, ९०
वर्ड्स्वर्थ, प्रो., ३९८
वल्लभाचार्य, १९३
वसई, ३, ९१
वाड्य, पहा–बमनजी
वार्नर, ९०
वामन, ३७
वामनराव (दा० चा नातू) ३०८, ३४०
वासुदेव परभु, ४९, ७१
वासुदेव बापु, ४०४
विज्डम् इन् मिनिएचर, ६१
विदूरनीति, ३४, ३६, ७४, ८६
विद्यार्थी (दा० चे), मुंबई, १४३; सुरत, १४९–१५१; नॉर्मलक्लास, १९७
विद्येचे उद्देश, लाभ आणि संतोष, ५३, ७२
विधवाश्रूमार्जन, ३३३
विनायक वासुदेव, ८३, १४४, २१४, ३६८, ४०५
विनायक हरिश्चंद्र, ४०३, ४०४
विल्किन्सन, (भोपाळचे पॉलिटिकल एजंट, ८७, ९९, ११५, ११६
विल्सन, एच्. एच्., २६६, २६७
विल्सन, डॉ. ज्यान, ३, १२४, २२५, २३१, २३२, २३४, २३५, २६५, ३३६, ४०५
विल्सन हायस्कूल, पहा–जनरल असेंब्लिज स्कूल
विवेक सिंधु, ५८
विष्णु परशराम शास्त्री, ४०५
विंचेस्टर, जी. डब्ल्यू., २५
वील्स स्पेलिंग बुक, २३
वुडवर्न, मेजर जनरल, २२०, २२१
वेणूताई (दा० ची कन्या), ३४१
वेस्ट, सर एडवर्ड, ७४
वेस्ट स्कॉलरशिप, ७५, ८३
वॉटकीन, इंग्रजी मास्तर, २३, २४, २९
वॉर्डन, चीफ सेक्रेटरी, ८७, ९९, २९०, २९३, २९४, २९६

व्याकरण, गुजराती, २८३, ३१०
व्याकरण, फारसी, २८३, ३१०
व्याकरण, मराठी भाषेचें (दादोक्त) पूर्वतयारी, ३६; गुरूंचा संतोष, ३८; रचण्याचा उपक्रम, ८५; प्रथम दर्शन, ९९; प्राप्ति, २७५; ग्रंथराज, २८८; प्रश्नोत्तररूप, २९०, २९१; सरकाराच्या आश्रयाची मागणी, २९०, २९६; अभिप्राय, कँडी, २९१; जांभेकर, २९५, २९९; विल्सन, ३००; कृष्णशास्त्री चिपळूणकर, ३०४; दामले ३०४; रचण्याचा उद्देश, ३००; पूरणिका, ३०१; मागें कां पडलें? ३०५
व्याकरण, संस्कृत, ३१०, आणखी पहा—लघुकौमुदी
व्हीगास, ए, ७४, ८८, ८९
शब्दवाचन, ३४
शाकुंतल, १६०, ३३६
शामराव तात्या, ५८
शालोपयोगी नीतिग्रंथ, ५८
शाहापूर, ६६—६८
शाळातपासनीस, २०३
शिवलीलामृत, ६४
शिवाजी, १९१
शिशुबोध, २१७, २२८, ३३२, ३३९, ४११—४४०
शिक्षक (दा० चे), मराठी : पहा—लिंगू, बावामामा, बापुशास्त्री मायदेव शुक्ल, जान्हवेकर रामचंद्रशास्त्री, इंग्रजी : पहा—चाटर्कीन, फीशर, मर्फी, मेनवॉरिंग, फ्रेझर,
शिक्षण, (दा० चें) आरंभ—मराठी, १५—१८; सुट्या १८; आरंभ इंग्रजी, २३; शाळेच्या वेळा, २३; रजा, २४; आरंभ—फारसी, ३०, १३३; आरंभ—संस्कृत, ३१; परीक्षा, ३९, ४४; शूद्रांच्या मुलांस प्रतिबंध, ४५
शुक्ल, पहा—बापुशास्त्री मायदेव
शून्यलब्धि गणित, १५५, १८६
शेखअली आझम, १०३—१०५, १२४
शेणवी, १७, २५, ६१
शेतवळी, (खेतवाडी) २, १६, २०
शेरीफ, ३४५, ३४६, ३४९
शेषाद्रि, नारायण, २३९
शेषाद्रि, श्रीपत, २३९, २५७
शॅअर, (Mania), २७७, २७८
शोवेल, २१५, २२०, २२७, २२९
श्रीनिवास, (दा० चे पुत्र), ३४२, ३४७
श्रीमाळी, १९२
श्रीरामपूर, २६५
संस्थानिक, ३७६
सखाराम दीक्षित, ४०४
सखाराम लक्ष्मण, २६०
सखाराम शास्त्री, २६०
सगनभाऊ, ११७
संजाना, पेस्तनजी बैरामजी, ४०२
सत्तावनसालचें बंड, २२०, ३९७
सत्संगति, ४१०
समर्थ प्रताप, २८९
समर्थ वाग्देवतामंदिर, २८९
सयाजीराव, १७५, १७७, १७८, १८१, १८३, १९५, २८५
सयानी रहिमतुल्ला म., ३९९, ४०१
सरस्वती, १८, १९
सर्वोत्तम सखारामजी, १४४

रुस्तमजी, जमशेटजी, पहा—बाटलीवाले
रेणुकाबाई, (दा० ची आत) ३, ११
रेल्वे पहा—लोखंडी सडका
रॅम्ब्लर, ५१, ६१
रोगे, महमद अमीन, ३८२
रोझ, कलेक्टर, २१४
रोडे, गोविंदराव, १७५, १७८, १७९, १८१
रोडे, सखाराम, १७५, १७९, १८१, १९५
लक्ष्मण दादाजी, १०५,
लघुकौमुदी, १५९, १७८, ३१०
लघुव्याकरण, मराठी, ३०५—३०८
लछमन शेट, १०४, १०५
लाड, नारायण कृष्णा, ४९, ५१, ७१
लावण्या, १३, १७३
लिंगू, (दा० चा पतोर्जा), १७
लिटन, लॉर्ड, ३९७
लिंडले मरेझ् ग्रामर, ५०, ८५, ८६
लोकहितवादी, २८७, ३०२, ३६९, ३७१, ४०४
लॉ कॉलेज, २१५
ल्युअर्ड, (जज्ज), १६१, १६२, १६४, १६७
वजीर टोल्या, १२८, १२९
वज्याराम, जादुगार, २४८
वज्राबाई, पहा—वज्रेश्वरी
वज्रेश्वरी, ६२, ९०
वर्ड्स्वर्थ, प्रो., ३९८
वल्लभाचार्य, १९३
वसई, ३, ९१
वाडये, पहा—बमनजी
वानरें, ९०
वामन, ३७
वामनराव (दा० चा नातू) ३०८, ३४०
वासुदेव परभु, ४९, ७१
वासुदेव बापु, ४०४
विज्डम् इन् मिनिएचर, ६१
विदूरनीति, ३४, ३६, ७४, ८६
विद्यार्थी (दा० चे), मुंबई, १४३; सुरत, १४९—१५१; नॉर्मलक्लास, १९७
विद्येचे उद्देश, लाभ आणि संतोष, ५३, ७२
विधवाश्रूमार्जन, ३३३
विनायक वासुदेव, ८३, १४४, २१४, ३६८, ४०५
विनायक हरिश्चंद्र, ४०३, ४०४
विल्किन्सन, (भोपाळचे पोलिटिकल एजंट), ८७, ९९, ११५, ११६
विल्सन, एच्. एच्., २६६, २६७
विल्सन, डॉ. ज्यॉन, ३, १२४, २२५, २३१, २३२, २३४, २३५, २६५, ३३६, ४०५
विल्सन हायस्कूल, पहा—जनरल असेंब्लिज स्कूल
विवेक सिंधु, ५८
विष्णु परशराम शास्त्री, ४०५
विंचेस्टर, जी. डब्ल्यू., २५
वीज स्नॉलिज युक, २३
वुड्बर्न, मेजर जनरल, २२०, २२१
वेणुताई (दा० ची कन्या), ३४१
वेस्ट, सर एड्वर्ड, ७४
वेस्ट स्कॉलर्शिप, ७५, ८३
वेंटकोन, ईश्वरजी मास्तर, २३, २४, २९
वेब्रन, चाफ सेक्रेटरी, ८७, ९९, २९०, २९३, २९४, २९६

व्याकरण, गुजराती, २८३, ३१०
व्याकरण, फारसी, २८३, ३१०
व्याकरण, मराठी भाषेचें (दादोकृत) पूर्वतयारी, ३६; गुरूंचा संतोष, ३८; रचण्याचा उपक्रम, ८५; प्रथम दर्शन, ९९; प्राप्ति, २७५; ग्रंथराज, २८८; प्रश्नोत्तररूप, २९०, २९१; सरकाराच्या आश्रयाची मागणी, २९०, २९६; अभिप्राय, कँडी, २९१; जांभेकर, २९५, २९९; विल्सन, ३००; कृष्णशास्त्री चिपळूणकर, ३०४; दामले ३०४; रचण्याचा उद्देश, ३००; पूरणिका, ३०१; मागें कां पडलें? ३०५
व्याकरण, संस्कृत, ३१०, आणखी पहा—लघुकौमुदी
व्हीगास, ए, ७४, ८८, ८९
शब्दवाचन, ३४
शाकुंतल, १६०, ३३६
शामराव तात्या, ५८
शालोपयोगी नीतिग्रंथ, ५८
शाहापूर, ६६–६८
शाळातपासनीस, २०३
शिवलीलामृत, ६४
शिवाजी, १९१
शिशुबोध, २१७, २२८, ३३२, ३३९, ४११–४४०
शिक्षक (दा० चे), मराठी : पहा—लिंगू, बावामामा, बापुशास्त्री मायदेव शुक्ल, जान्हवेकर रामचंद्रशास्त्री, इंग्रजी : पहा—वाटकीन, फीशर, मर्फी, मेनवॉरिंग, फ्रेझर,
शिक्षण, (दा० चें) आरंभ–मराठी, १५–१८; सुट्या १८; आरंभ इंग्रजी, २३; शाळेच्या वेळा, २३; रजा, २४; आरंभ–फारसी, ३०, १३३; आरंभ–संस्कृत, ३१; परीक्षा, ३९, ४४; शूद्रांच्या मुलांस प्रतिबंध, ४५
शुक्ल, पहा—बापुशास्त्री मायदेव
शून्यलब्धि गणित, १५५, १८६
शेखअली आझम, १०३–१०५, १२४
शेणवी, १७, २५, ६१
शेतवळी, (खेतवाडी) २, १६, २०
शेरीफ, ३४५, ३४६, ३४९
शेषाद्रि, नारायण, २३९
शेषाद्रि, श्रीपत, २३९, २५७
शॅअर, (Mania), २७७, २७८
शोवेल, २१५, २२०, २२७, २२९
श्रीनिवास, (दा० चे पुत्र), ३४२, ३४७
श्रीमाळी, १९२
श्रीरामपूर, २६५
संस्थानिक, ३७६
सखाराम दीक्षित, ४०४
सखाराम लक्ष्मण, २६०
सखाराम शास्त्री, २६०
सगनभाऊ, ११७
संजाना, पेस्तनजी बैरामजी, ४०२
सत्तावनसालचें बंड, २२०, ३९७
सत्संगति, ४१०
समर्थ प्रताप, २८९
समर्थ वाग्देवतामंदिर, २८९
सयाजीराव, १७५, १७७, १७८, १८१, १८३, १९५, २८५
सयानी रहिमतुल्ला म., ३९९, ४०१
सरस्वती, १८, १९
सर्वोत्तम सखारामजी, १४४

सलिव्हान, ज्यॉन, २२२
सहभोजन, २५२
सातपुड्याचा पहाड, ९७
सार्वजनिक सभा पुणें, ३२०
सालरजंग, ३६८
सिंव्हासनबत्तिसी, ३४, ३६, ७४, ८५
सिद्धपदार्थविज्ञान, ५५, ८२
सिद्धपदार्थशास्त्रविषयक संवाद, ५५
सिद्धान्तशिरोमणिप्रकाश, ११५
सिंधव्याचा घांट, ८९, ९४, ९५, ९७
सिल्वा, दा, १४४
सुटी, १८
सुंदर नारायण, ९२
सुंदरराव, १४९
सुंदरराव मोरोबा, १५०
सुंदर हरिश्चंद्रजी, १४९
सुंदराबाई, (दा० ची भगिनी), ६
सुंद्राबाई, (दा० ची कन्या), ३४२
सुफी, १३०, १३१
सुब्बाजी बापू, ११५
सुरत, इंग्लिश शाळा, १४६, १४७, १४९–१५१, १५६, २४२; नवाब, १५५; कोतवाल, १६१–१६८; वर्णन १९०–१९५; शैक्षणिक विभाग, २०३, नॉर्मलवर्ग, २०५; मानवधर्मसभा, २४२
सोनगांवकर, घनश्यामबाबा, ६३, ६४; दादोबासंबंधी माहीत, ६५, ६६
सोनपतपानपत, १४, १३८
सोनार, ३६
सोनें, आयात, २७७
सोपारा, ९०
सोमवंशी क्षत्रिय, ५५, ५६
सोराबजी जमशेदजी जिजीभाई, १४३
सोराबजी मेहता, १४३
सोलापूर, २००, २०६
सोसाइटीची शाळा, स्थापना, २६, वर्णन, २८, २९, ५१, ५५ २५८, २९८; एल्फिन्स्टन इंस्टिट्यूशन, ८२, १४६, २०३, २१४, २३६, २४१, २५२, २५८; बोर्ड ऑफ एज्युकेशन, ७३, १४५, १४६, १५९, १८८ १९६, २००, २१०, २१३, २१४, २३२, २३३, २४३, २५०; नेटिव एज्युकेशन सोसाइटी (हैंदशाळा मंडळी) २६, १४५, २१३, २३१, २३२, २९३; एल्फिन्स्टन कॉलेज, १८६, २१५; धार्मिक प्रचारापासून आलिप्त २३१.
सोसाइटीची शाळा
सोहनी, विष्णु, ३४८
सौटर, फ्रँक, २२५
स्कॉट, सर वॉल्टर, १५७
स्टिफन्स, फादर थॉमस, २८९
स्टिव्हन्सन, २९१
स्टॉवेल, डॉ०, १८४, १९५
स्त्रीशिक्षण, ११, ३३६
स्पेक्टेटर, ५१
स्मिटन, डॉ., २३५
स्वामिनारायण पंथ, १६१
स्वीडनबोर्ग, २२८, २५०, ३११–३२३, ३३५
हजाम, १३५
हटन्स, कोर्स ऑफ मॅथेमॅटिक्स, मराठी तर्जुमा, ३५, ४५, ७३, १५५
हटन्स मॅथेमॅटिकल रिक्रिएशन्स, १०९, ११२
हणमंत गल्ली, १७

हरगोविंद स्टोर, १६१, १६२
हरि केशवजी, ५५–५८, २७२
हरिविजय, ५, ६४
हरिश्चन्द्रजी परभु, १४८
हरिश्चन्द्र हरिशंकर, ४९, ५०, ७१
हळवे, लक्ष्मणशास्त्री, २६०
हार्कनेस, प्रो., ८१, १८६, २०३, २०५, ४०५
हार्ट, ३४६
हाल्हेड, मॅजिस्ट्रेट, ४२
हावर्ड, एडवर्ड, ३०९
हावर्ड (बॅरिस्टर) १६४, १६८, १८३
हिंदु, अवनतस्थितीचीं कारणें, ३८०, ३८१
हिंदु कॉलेज, २६७, २६८, २७०
हिंदुधर्म, वेडगळ प्रकार, २३५, ३८०, ३८१; शुद्धि, २३९; विरुद्ध प्रचार, २४०; खरें स्वरूप, २४२; मंत्रतंत्र, २४८; विचारपरिवर्तन, २५१
हिंदुधर्म सभा, २६५
हिंदुधर्मस्थापना, (ग्रंथ) २३८
हिबर्ट लेक्चर्स, ४०९
हिस्टरी ऑफ इंग्लंड, गोल्डस्मिथ, ५२, ८०
हेंडरसन, विल्यम, ७३, ८२, ८४, १४४, २३२, २३४, २३९
हेन्री, कॅ. २२३, २२४
हेवन अँड इट्स वंडर्स अँड हॅल, ३१४, ३१५
हैंद शाळा आणि शाळापुस्तक मंडळी, पहा–सोसायटीची शाळा
होगार्थ, ११८
होनाजी बाळा, १३, ११७, ११८
होप, टी. सी., २०९
होळकर, ९७
,, अहल्याबाई, ९७
,, हरिराव, ९८, १२१–१२३, १३७, १३८
,, मल्हारराव, ९८
,, यशवंतराव, ९८
होर्ळाविरुद्ध पुस्तक, ३३५
ह्युएट, ३४९
ज्ञानप्रसारक, २११, ३२६, ३२७
ज्ञानप्रसारक सभा, २५५, ४०३, ४०४
ज्ञानेश्वर, ५
ज्ञानेश्वरी, ५८, २७२
ज्ञानोदय, २१६, २५६.

# वृद्धि आणि शुद्धि

( Addenda et Corrigenda )

## वृद्धि :—कांहीं नवीं टिपणें

पृ० २, मोडकजंत्रीप्रमाणें वैशाख वद्य ४ शके १७३६ रोजीं ८ मे सन १८१४ ही तारीख येते. "पण दादोबांचा जन्म रविवारीं ( ८-५-१८१४ ) रात्रीं बारानंतर व सूर्योदयापूर्वी झाला असेल तर दादोबा व मोडक दोन्हीही बरोबर आहेत." ( रा. बा. सी. बेंद्रे ) यावरून दादोबांचा जन्मकाल ठरवितां येतो.

पृ० १३, अशाच प्रकारचें दुसरें एक वांझ बायकोवरील कवन मेजर नानासाहेब शिंदे यांनीं विविधज्ञानविस्तारामध्यें ( वर्ष ४६ वें, सेप्टेंबर १९१५, महाराष्ट्र-साहित्यपत्रिका, पृ० १०२ ) प्रसिद्ध केलें आहे.

पृ० १७, ओ० ५—बंगालमध्यें धूळपाटीशिवाय विद्यार्थी ताडपत्रावर व केळीच्या पानावर लिहीत असत. जमिनीवर ( खडूनें ), ताडपत्रावर, केळीच्या पानावर, किंवा कागदावर लिहिणारे यांचें निरनिराळे विभाग असत. ( Report on the state of Education in Bengal, 1835–38 by William Adam, New Edition, 1941, p. 20. )

पृ० २१, ओळ १६—हें कुंभारतुकड्यांतील घर १८४१ सालीं विकण्यांत आलें. पहा— "ह्या पत्रावरून वर्तमान कळविलें आहे किं कैलासवासी पांडुरंग येशवंतजी यांचे पुत्र व वारिस दादोबा पांडुरंग, भास्कर पांडुरंग व आत्माराम पांडुरंग यांणीं आपलें घर जमिनीमुद्दां मुंबईचे किल्याबाहेर कुंभारवाड्यांत आहे व त्यावर कलेक्टरसाहेबाच्या दफतरचा नंबर ९ आहे तें दादोबा जगन्नाथजी यांस विकत देणेचा करार केला आहे..."—जाहिरात—**Bombay Courier,** Saturday, Oct. 10, 1841.

पृ० २६, तळटीप २–मुंबईची हैंदशाळा शाळापुस्तकमंडळी ही ता. २१ ऑगस्ट १८२२ रोजीं स्थापन झाली.

पृ० ३९, ओ० ६—बाळाजी सुंदरजी यांनीं "गीता: भावटीका: श्रीकृष्णार्जुनसंवाद" ( १८३९ ) नांवाचें मराठी पुस्तक तयार केलें आहे.

पृ० ५०, टी० ५—'मुंबई वर्तमान' या गुजराती दैनिकाच्या ता. २१-३-१९४५ च्या अंकांत मि. जे. बी. जिजीभॉय 'मुंबई हायकोर्टाचे पहिले हिंदी न्यायाधीश' या मथाळ्याखालीं एक लेख लिहिला आहे व त्यांत न्या. मू. जनार्दन वासुदेव (आगास्कर) यांचा जन्म १८१५ सालच्या नवंबरांत झाला असें म्हटलें आहे.

पृ० ८६, तळटीप §—बारा राशींवर श्लोकांचा अर्थ असा—'दुसऱ्या' = वृषभा (बैला); तिसरें = मिथुन (संग); 'पांचाची' = सिंहाची; 'नववें' = धनं (धनु); 'अकरा' = कुंभ (घागर); या श्लोकाचें पद्यमय स्पष्टीकरण 'मराठी होमर' रा. ग. रा. हवालदार यांनीं करून दिलें तें असें—

ऐकें रे! **वृषभा** करीन **मिथुना** हें बोलसी जें मला।
**सिंहाची** मम शक्ति जाण बरवी तें प्राप्य कैंचें तुला॥
खर्चीशी **धन** तूं तथापि पडती दृष्टीस माझीं नखें
घेई **कुंभ** शिरीं घरीं मम जला वाहोनि राहीं सुखें॥

पृ० १९८, तळटीप २—बॉंबे सिटी गॅझेटियरच्या नव्या आवृत्तीमध्यें (The Bombay City & Island, iii, 1910, p. 140.) मुंबईचें पहिलें वृत्तपत्र The Bombay Herald (१७८९) असें म्हटलें आहे व दुसऱ्या पत्राचा मान Bombay Courier (1790?) ला दिला आहे. वास्तविक Bombay Courier १७९१ सालीं निघाला व त्याच्या आधीं Bombay Gazette निघत होतें. Bombay Gazette च्या ता. ३ जाने० १८१० अंकावर "Vol. XXI" असें लिहिलें आहे व ता. ६ जाने० १८१० च्या Bombay Courier वर "Vol. XX" असें नमूद आहे. यावरून Bombay Gazette आधींचें हें स्पष्ट होतें. The Bombay Government Gazette व Bombay Gazette यांचा कांहीं संबंध नाहीं. (पृ० १९८, तळटीप २ मधील विधान रद्द समजावें) Bombay Government Gazette चा पहिला अंक ता. ४ ऑगस्ट १८३१ रोजीं निघाला. पृष्ठें ६ च होतीं. याचे पहिले संपादक कर्नल जर्विस हे होते. त्यांच्याच सूचनेवरून सर जॉन माल्कम यानें स्वतंत्र सरकारी पत्र सुरू केलें. (**The Memoirs of a Journalist**–J. H. Stocqueler, 1873, p. 65). Bombay Gazette १७९१ सालीं निघालें, हेंही गॅझेटियरमधील विधान चुकीचें आहे. The Newspaper Press of India हा **The Bombay Calendar and Almanac**

for 1856 (pp. 203–238) मधील लेख पाहा. (त्यांत Bombay Government Gazette ची सुरवातीची तारीख ६ ऑगस्ट १८३१ म्हटलें आहे तें मात्र बरोबर नाहीं.)

पृ० २१७, ओ० २०–" विलायतेला गेलेले परत आले व त्यांच्या जागीं दादोबांची अदलाबदल होऊन नेमणूक झाली "—या ऐवजीं " विलायतेला गेले व त्यांच्या जागीं दादोबांची नेमणूक झाली, " असें वाचावें.

पृ० २३७, या व २५८ पृष्ठांतील ' प्रभाकरा'मधील उतारे ' ज्ञानोदया 'वरून घेतले आहेत.

पृ० २६१—प्रसिद्ध गुर्जर कवि व कोशकार नर्मदाशंकर यांनीं ' मारी हकीकत ' या नांवानें प्रसिद्ध असलेल्या आत्मचरित्रांत १८६० सालीं डॉ. आत्माराम पांडुरंग यांच्या घरीं विधियुक्त झालेल्या एक विधवेच्या पुनर्विवाहाची हकीकत देतांना **परमहंससभेच्या** व बुद्धिवर्धक सभेच्या सभासदांनीं वधुवरांना आहेर (चांदला) देऊन समारंभाला शोभा आणिली असें नमूद करून ठेविलें आहे. शिवाय ते लिहितात, "याच सालीं जातिभेद मोडणाऱ्या एका धर्मसभेमध्यें दाखल होण्याबद्दल तिच्यामधील एका विद्वान् ब्राह्मण मित्रानें मला आग्रह केला. मीं त्याला म्हटलें, ' या सभेमध्यें जे ठराव होतात त्यांचा कांहीं सभासदांनीं उपदेशक बनून प्रचार करावा व त्याप्रमाणें स्वतःचें वर्तन ठेवावें तर मी दाखल होतों. ' तेव्हां तो बोलला, ' या सगळ्या गोष्टी मागाहून होतील. सध्यां तुम्ही दाखल तर व्हा. ' हें त्यानें बोलल्यावर सभेमध्यें दाखल झालों. " (**मारी हकीकत** अथवा **नर्मदनुं आत्मचरित्र, भाग १ लो**, १९३३, पृष्ठें ७४-७५)

पृ. ३०३, ओ० ७—' **हिंदुस्थानला दरिद्र येण्याचीं कारणें आणि त्याचा परिहार व व्यापारविषयक विचार** ' या नांवाचा एक निबंध लोकहितवादींनीं लिहिला आहे (१८७६) त्यांत ते लिहितात, " इंग्रज सरकारचे शाळेंत जे मोठाले विद्वान झाले आहेत त्यांनीं प्रत्यक्ष पैसा विद्येकडे खर्च केला असेल; परंतु त्यांची किंमत कोट ६० धरण्यास काय चिंता आहे ! सर टी. माधवराव, भाऊ दाजी, **दादोबा पांडुरंग**, दादाभाई व नवरोजी फर्दुनजी अशीं माणसें इंग्रज सरकारामुळें या देशांत निर्माण झालीं. त्यांची किंमत दर एकाची कोटि ६० म्हणण्यास काय चिंता आहे ! " (पृष्ठें ६–७).

पृ० ३६८, ओळ खालून ३ री.—दिनकरराव 'राजवाडे' ऐवजीं 'रानडे' असें वि. का. राजवाड्यांच्या हातून चुकून पडलेलें दिसतें. ग्वाल्हेरचे सुप्रसिद्ध दिवाण रावराजे सर दिनकरराव रघुनाथ राजवाडे (१८१९–१८९६) यांचा हा उल्लेख आहे. हे पुरुष इंग्रजांना सामील असल्यामुळें शिंदे बंडवाल्यांना मिळाले नाहींत. नाहींतर इंग्रजांची सत्ता हिंदुस्थानांतून केव्हांच नष्ट झाली असती, अशी कल्पना आहे. वि. को. ओक यांनीं यांचें विस्तृत चरित्र ग्रंथरूपानें लिहिलें आहे (१८९७).

पृ० ३७५–सर रिचर्ड फ्रान्सिस बर्टन (१८२१–१८९०) या विद्वान् ग्रंथकारानें हिंदी पारतंत्र्याचें मार्मिक निदान केलें आहे तेंही या ठिकाणीं लक्षांत ठेवण्यासारखें आहे. तो लिहितो :—

"Our empire in the East has justly been described as one of opinion, that is to say, it is founded upon the good opinion entertained of us by the natives, and their bad opinion of themselves......Every one knows that if the people of India could be unanimous for a day they might sweep us from their country as dust before a whirlwind. There is little danger of their combining as long as they dread us. Such fear leads to distrust; every man knows himself and consequently, suspects the neighbour to be false. Like the Italians in their late war of independence the cry of *tradimento* (Treachery) is sufficient to paralyse every arm however critical be the hour in which it is raised. So it is in India. But their distrust of each other, as well as their respect for us, is founded entirely upon their fear of our bayonets." (Goa and the blue mountains, 1851, pp. 157–8).

---

## शुद्धिपत्र

(ह्या ग्रंथात छापतेवेळी इतर कांहीं अशुद्धे राहिलीं आहेत.)

| पृष्ठ | अशुद्ध | शुद्ध |
|---|---|---|
| २५ टीप १ | Lawer | Lawyer |
| २७ टीप ४, ओळ ८ | embrance | embrace |
| " " " १० | Benga | Bengal |
| ३१ ओ० ७ | [illegible] | [illegible] |
| ४० टी० ५, ओ० २ | Deliniated | Delineated |
| ४६ टी० २ | इंदुप्रकाश, ११ मे १८[illegible] | इंदुप्रकाश, ११ मे १८८[illegible] |
| ५० ओ० ८ | Keith's on the use | Keith on the use |
| ५३ टी० ३, ओ० १४ | gopel | gospel |
| ६४ ओ० २६ | [illegible] | [illegible] |
| ६६ टी० १ | [illegible] (viii) | [illegible] (vii) |
| ६९ टी० १ | " (ix) | " (viii) |
| ७२ ओ० ७ | Iring's Composition | Irving's Composition |
| ७३ ओ० १७ | [illegible] | [illegible] |
| ८६ टी० २ | [illegible] (x) | [illegible] (ix) |
| ८७ ओ० ८ | Wathem | Wathen |
| ८७ टी० २, ओ० ३ | Epition | Edition |
| ९० टी० २ ओ० २, | १८२१ | १९२५ |
| १०० टी० १, ओ० २ | [illegible] | [illegible] |
| १०५ ओ० २ | [illegible] | [illegible] |
| ११७ टी० १ | [illegible] | [illegible] |
| ११८ | [illegible]—८,९ | [illegible]—१,२ |
| १२४ ओ० २० | Fhe rev Dr. | the Rev. Dr. |
| १२८ ओ० ९ | [illegible] | [illegible] |
| १३४ ओ० २१ | [illegible] | [illegible] |
| १३५ टी० २ | [illegible] | [illegible] |
| १४० टी० ९ ओ० ५ | [illegible] | [illegible] |
| १४२ टी० १ ओ० ७ | Farther M[illegible] | Further M[illegible] |
| १४६ टी० १, ओ० ७ | [illegible] | [illegible] |
| १७४ टी० २१ | Keeth | Keith |
| १९० टी० १ ओ० २ | [illegible] | Jocular |

| पृष्ठ | अशुद्ध | शुद्ध |
|---|---|---|
| १९८ ओ० १८ | a Hindu | a Hindoo |
| „ टी० २, ओ० ३-४ | १८४२ सालापासून...राहिलें, हें वाक्य रद्द समजा. | |
| २०४ ओ० १४ | हायस्कूमध्यें | हायस्कूलमध्यें |
| २१९ ओ० २७ | ठाण्याच्या ॲक्टिंग कलेकूटर | ठाण्याचे ॲक्टिंग कलेक्टर |
| २२५ टी० १ | 10-11-1857 | 10-11-1875 |
| २५० टी० १ | डिसेंबर १८२३, | डिसेंबर १९२३ |
| २५४ ओ० १४ | सेंकृतीशीं | संस्कृतीशीं |
| २६८ ओ० २१ | pretention | pretension |
| २७५ ओ० १० | कडाचां | कँडीचीं |
| २७६ ओ० २३ | मार्गप्रतिक्षा | मार्गप्रतीक्षा |
| २९३ ओ० १० | seciety | society |
| „ ओ० २० | dependance | dependence |
| ३०५ ओ० १३ | लागतां न सोडी | लागतां न सोडीं |
| „ ओ० २५ | प्रौढ होता | प्रौढ होतां |
| ३०८ ओ० २४ | १८६०१ | १८६०, |
| ३१२ ओ० ६, १७ | भौक्तिक | भौतिक |
| ३१५ ओ० १४ | मोठ्या जिज्ञासा | मोठी जिज्ञासा |
| ३१६ ओ० ७ | आधिभौक्तिकाच्या | आधिभौतिकाच्या |
| ३१९ ओ० १२ | तरी ती कदापि | तरी ते कदापि |
| ३२१ ओ० ३१ | to other world is | to other worlds, |
| ३३८ ओ० ९ | पूवपीठिका | पूर्वपीठिका |
| „ टी० १ | अक्टोबर १८२२ | अक्टोबर १९२२ |
| ३३९ ओ० २१ | चौदा मुलें | पंधरा मुलें |
| ३४० टी१, ओ.४ | १९१२ | १९१८ |
| ३४१ ओ० ३ | बर्नाल्ड | बर्नार्ड |
| ३४२ ओ० १२ | मळाककर | कमळाकर |
| ३५३ ओ० १६ | दृढिमा | द्रढिमा |
| ३७५ ओ० १ | unforseen | unforeseen |
| ३७९, ओ० २८ | १८८४ | १८४४ |
| ३९४ ओ० ३ | १९२० | १८२० |
| ३९७ ओ० ११ | अथन्वि | अर्थेन्वि |
| ४०२, ओ० २१ | झड | झेंड |

# महाराष्ट्र-ग्रंथ-प्रदीपावलि

## १. मराठी वाङ्मयाचा इतिहास

### तिसरा [ रामदास ] खंड

लेखक : कै. ह. भ. प. ल. रा. पांगारकर, बी. ए.

श्रीसमर्थ रामदासस्वामींच्या आणि इतर तत्कालीन
कवींच्या वाङ्मयाचें साधार आणि सविस्तर विवेचन

पृष्ठें ७९३, कापडी बांधणी, मूल्य ४ रुपये

## २. श्रीज्ञानेश्वरांचें तत्त्वज्ञान

लेखक : डॉ. शं. दा. पेंडसे, एम. ए., पीएच. डी.

ज्ञानेश्वरांच्या वाङ्मयाचा आणि त्यांच्यासंबंधीं झालेल्या लिखाणाचा अभ्यास
करून त्यांचें पारमार्थिक तत्त्वज्ञान यथार्थ रीतीनें दाखविण्याचा यशस्वी प्रयत्न

पृष्ठें ५०४, कापडी बांधणी, मूल्य ४ रुप

## ३. अकरा हनुमंतांशीं हितगुज

लेखक : सदाशिव कृष्ण फडके, नवयुग धर्मसालाकार

वेदान्ती प्रतिभेनें चिदाकाशांत मारलेल्या भराऱ्या

पृष्ठें ८८६, कापडी बांधणी, मूल्य ४ रुपये

## ४. श्रीसमर्थ – हृदय

लेखक : समर्थभक्त शंकर श्रीकृष्ण देव

समर्थांच्या समग्र रचनेचा सविस्तर परिचय

पृष्ठें ६००, कापडी बांधणी, मूल्य ४ रुपये

## ५. श्रीसमर्थ – संप्रदाय

लेखक : समर्थभक्त शंकर श्रीकृष्ण देव

संप्रदायाचें रहस्य आणि स्वरूप सांगणारा अमोल ग्रंथ

पृष्ठें २९६, कापडी बांधणी, मूल्य ४ रुपये

## ६. केशवसुत

लेखक : प्रा. रा. श्री. जोग, एम. ए.

केशवसुतांच्या काव्याचा आणि कार्याचा सविस्तर मागोवा आणि [illegible]

पृष्ठें ३४२, कापडी बांधणी, मूल्य [illegible]

---

केशव भिकाजी ढवळे, श्रीसमर्थ – सदन, मुंबई